A CRITICAL STUDY OF THE LIFE OF CHH. SHIVAJI MAHARAJ AS RECORDED IN SANSKRIT LITERATURE

A THESIS

Submitted To

THE SHIVAJI UNIVERSITY,

KOLHAPUR

For The Degree Of

DOCTOR OF PHILOSOPHY

BY

Sou. Suhasinidevi Shahajirao Rajebhonsale,

M. A. (San.), M. A. (Mar.), B. Ed.

SATARA

UNDER THE GUIDANCE OF

Dr. V. B. Inamdar,

VISHRAMBAG, SANGLI

1986

संस्कृत साहित्यातील छत्रपति शिवाजी महाराजांच्या चरित्राचे विवेचक अध्ययन

शिवाजी विद्यापीठाच्या

पीएच्. डी.

पदवीसाठी सादर केलेला प्रबंध

लेखिका

प्रा. सौ. सुहासिनीदेवी शहाजीराव राजेभोंसले,

एम. ए. (संस्कृत)
एम. ए. (मराठी)
बी. एड्.

सातारा

मार्गदर्शक

डॉ. वि. बा. इनामदार,

विश्रामबाग, सांगली

१९८६



ॐ

श्री सूर्यान्वयमौलिमण्डनमणिः श्रीरामवंशोद्भवो
दीन त्राणपरायणः खलु जिजामातुः सुनेत्रोत्सवः।
धर्मध्वंसिमदोद्धतेभकुलभिच्छूरः शहाजीसुतः
श्रीमांश्छत्रपतिः सदा विजयते वन्द्यः शिवाजिर्महान् ॥

CERTIFICATE

Certified that the work incorporated in this Thesis entitled "संस्कृत साहित्यातील छ. शिवाजी महाराजांच्या चरित्राचे विवेचक अध्ययन", a study submitted by Smt. Suhasinidevi Shahajirao Rajebhonsale of Satara was carried out by the candidate under my supervision.

Certified further that such material as has been obtained from other sources has been duly acknowledged in the Thesis and that no part of this Thesis has been submitted previously for any other degree or diploma.

Date: 10/7/1986

(Dr.) (V.B. Inamdar)
Guide.

ऋ_ण_नि_र्दे_श

हा प्रबंध आज सर्वांच्या सहकार्याने आणि परमपूज्य श्री सच्चिदानंद श्रीसंत सद्गुरु श्री. माधवनाथ तथा दादामहाराज सांगवडेकर यांच्या कृपेने आणि आशीर्वादाने पूर्ण होत आहे म्हणून मला अतिशय आनंद वाटत आहे. तो जनताजनार्दनाच्या आशीर्वादासाठी त्यांच्या हाती सुपूर्द करीत आहे.

माझे शोध मार्गदर्शक मा. कै. डॉ. वि.श्री. भांडारीसर यांनीच मला हा विषय सुचविला व माझी या अभ्यासकार्याकरिता नोंदणी करून घेतली आणि मला कामाची प्रेरणा दिली, पण दुर्दैवाने पुढे मला त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ झाला नाही. कारण कालाने त्यांना लवकरच आमच्यातून हिरावून नेले ही मनाला एक कायमची [illegible] लागून राहिली. त्यांचे गुरुऋण मी मान्य करून त्यांच्या आत्म्याला शांती इच्छिते. आज ते हयात असते तर त्यांना अतिशय आनंद वाटला असता.

त्यानंतर शोध मार्गदर्शक म्हणून शिवाजी विद्यापीठाने मला मा. डॉ. वि.बा. इनामदारसरांकडे पाठविले. एवढ्या विद्वान, व्यासंगी पण तरीही निगर्वी व प्रेमळ गुरु मला लाभला, हे मी माझे भाग्यच समजते. केवळ गुरुच नव्हे तर पित्याच्याही दृष्टिकोनातून त्यांनी मला मार्गदर्शन केले. त्यांच्यामुळेच हा प्रबंध लवकरच पुरा होऊ शकला. त्यांचे ऋण फेडता येणे मला अशक्य आहे.

या अभ्यासाच्या निमित्ताने मी तंजावर येथील सरस्वती महाल, ग्रंथालय या राष्ट्रीय ग्रंथालयाला भेट दिली. तेथे पूर्वपरिचय नसताना छत्रपती

तुळजेंद्र राजेभोसले व श्रीमंत सरकार सौ. राजेभोसले यांनी मला अतिशय सहकार्य केले. या ग्रंथालयातील सर्व साहित्य प्राप्त होण्यास मला केवळ त्यांच्यामुळेच कोणतीही अडचण आली नाही. मी त्यांची अत्यंत ऋणी आहे. तसेच तंजावर येथील डॉ.कृष्णास्वामी महाडिक व सौ. महाडिक यांनी भाषेची अडचण असल्यामुळे वेळ काढून ते सर्व ठिकाणी माझ्याबरोबर फिरले व श्री. बृहदीश्वर मंदिरावरील शिलालेख, संगीत महाल, सरस्वती महाल संग्रहालय अशा अनेक ऐतिहासिक स्थळांना भेटी दिल्या. त्यांची मला सर्वच बाबतीत विशेष मदत झाली, मी त्यांची अत्यंत आभारी आहे.

तसेच तेथील इतिहासाचे अभ्यासक श्री. महाडिक व तामीळ विद्यापीठातील प्रमुख श्री. वरदराजन्, सरस्वती महाल ग्रंथालयाचे ग्रंथपाल, संस्कृत विभाग प्रमुख सौ. राजलक्ष्मी व मराठी विभाग प्रमुख श्री. पंडित या सर्वांनी मला अतिशय मदत केली. हस्तलिखितांच्या मायक्रो फोटो कॉपीज ताबडतोब काढून दिल्या, त्या सर्वांची मी अत्यंत आभारी आहे. तंजावरचे आंतरराष्ट्रीय ग्रंथालय मला त्यानिमित्ताने पाहावयास मिळाले, हे महद्भाग्यच होय.

तसेच भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिर, पुणे येथील ग्रंथपाल श्री. मंजुळसर व डॉ. राहूरकरसर यांचेही मला खूप सहकार्य मिळाले. बरीच पुस्तके मला त्या ठिकाणी उपलब्ध झाली. मी त्यांची अत्यंत आभारी आहे.

संस्कृत विभाग ग्रंथपाल, पुणे विद्यापीठातील डॉ. गोस्वामी व इतिहास संशोधक श्री. देवीसिंग चौहाण यांनीही मला अभ्यासाबाबत दिशा दाखविली त्यांची मी आभारी आहे.

भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे येथील थोर इतिहास महर्षी के.ग.ह. खरे यांनी मला अतीव मदत केली. पण दुर्दैवाने त्यांच्या आवडत्या विषयावरील हे काम ते आज पाहू शकले नाहीत, म्हणून अतिशय दु:ख होते. त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ झाला असता, पण तो योग नव्हता, त्यांच्या आत्म्याला शांती इच्छिते.

याशिवाय ` कोल्हापूर ` चे श्री.ग.बा. दंडगे यांनी पूर्वपरिचय नसताना त्यांच्याजवळील ` धर्मराज् विजयम् ` नावाच्या नाटकाची हस्तलिखित प्रत मला विश्वासाने दिली. मी त्यांची अतिशय आभारी व ऋणी आहे. कोल्हापूरचे श्री. दादासाहेब पवार यांनी आपल्याजवळची पुस्तके मला दिली. त्यांनी तसेच कागलचे श्री. घाटगे यांनी तंजावरला प्रवासाला जाताना आवश्यक ती बरीच मदत केली. त्यांची मी आभारी आहे.

नागठाणे येथील चित्रकार व गणेशमूर्तिकार श्री.के.डी. कुंभार यांनी मला मुद्रा, चिन्ह इ. सुरेख चित्रे व सुंदर श्लोक काढून देऊन माझ्या प्रबंधाचे बाह्य स्वरूप सजविण्यास मदत केली. मी त्यांची अत्यंत आभारी आहे.

त्याशिवाय शिवाजी विद्यापीठांतील माजी कुलसचिव डॉ.ठपा इथापे, माजी कुलसचिव श्री. रवींद्र चव्हाण, ग्रंथपाल डॉ. जाधव, पदव्युत्तर विभागाचे माजी कुलसचिव श्री. मोरे व श्री. भोसले, श्री. शिवाजीराव लाड, श्री. कन्नुरकर (जाधव) या सर्वांनी मला अतिशय सहकार्य दिले. त्यांची मी अतिशय आभारी आहे.

माझे सातारा येथील मा. गुरुवर्य प्रा. आ.ह. साळुंखे यांनीही मला खूप सहकार्य केले व प्रेरणा दिली. मला त्यांचे गुरूऋण मान्य आहे. त्यांचे

आभार मानणे हा केवळ वरवरचाच औपचारिकपणा दिसेल. सातारा येथील श्री. आपटीकरसर यांनी मला भाषांतरासाठी मदत केली, तसेच डॉ. वर्णेकर यांनीही मला मार्गदर्शन केले, त्याशिवाय छ. शिवाजी वस्तु संग्रहालयाचे श्री. पोतदार यांनीही मला मदत केली. मी त्यांची आभारी आहे.

याशिवाय माझे सासरे श्री. दादासाहेब राजाळे व सासूबाई सौ. विजयादेवी राजाळे व पति श्री. शहाजीराव राजेभोसले यांच्या पूर्ण सहकार्याने व प्रेरणेने हे काम पुरे होऊन शकले, याचे सर्व श्रेय त्यांनाच आहे. याहून अधिक काय लिहावे ? माझे कै. मातापिता श्री. दादासाहेब चौहाण व सौ. चतुराबाई चौहाण यांचे आशीर्वाद व संस्कार या कार्यासाठी माझ्यामागे आहेत.

त्याचप्रमाणे पुण्याचे श्री. व सौ. मगर, बेळगावचे श्री. व सौ. हलगेकर, मुंबईचे श्री. व सौ. देशमुख, देवळालीचे श्री. आणासाहेब कदम, कोल्हापूरचे श्री. व सौ. घोरपडे, श्री. जे.एस. राजाळे व सौ. राजाळे, श्री. ब.मो. पुरंदरे, श्री. पी.डी. घोरपडे व कु. लता घोरपडे व सौ. पद्मा खासखान या सर्वांनी व अनेक प्रत्यक्ष अप्रत्यक्ष व्यक्तींनी मला खूप मदत केली. त्या सर्वांचे नामोल्लेख करणे अशक्य आहे, पण त्या सर्वांची मी अत्यंत ऋणी आहे. या सर्वांच्या सहकार्यामुळेच हे काम पुरे होऊन शकले.

शिवाजी विद्यापीठातील श्री. कवडे यांनी मला त्वरीत अतिशय सुंदर प्रबंध टाईप करून दिला व हे काम पूर्ण करण्यास हातभार लावला. मी त्यांची अतिशय आभारी आहे.

छ. शिवाजी महाराजां विषयीचा निरतिशय भक्तिभाव हा माझ्या लेखनाचा मूळाधार आहे. या शककर्त्या, पौर्णिमेच्या चंद्राप्रमाणे वाढणाऱ्या व विश्ववंदनीय अशा शिवप्रभूंच्या चरणावर ही माझी प्रबंधरूपी सुमनांची ओंजळ श्रध्दापूर्वक अर्पण करीत आहे.

S.S. Raje Bhonsale

सौ. सु. श. राजेभोसले (राजाज्ञे)

स्थळ : सातारा

दिनांक : १०।१।१९८६

अनुक्रमणिका

४) प्रकरण - चौथे

१९ व्या शतकांतील संस्कृत साहित्यातील शिव चरित्र

अ) शिवकाव्य

ब) शिवराज-विजयम्

क) सरल-शिवराज-विजयम्

ड) शिवावतार-प्रबन्धः

५) प्रकरण - पांचवे

२० व्या शतकांतील संस्कृत साहित्यातील शिव चरित्र

अ) श्रीशिवाजी महाराज चरितम्

ब) शिवप्रताप बिरुदावली

क) छत्रपतिसाम्राज्यम्

ड) शिववैभवम्

ई) छत्रपतिः श्रीशिवराजः

प) शिवराजाभिषेकम्

फ) शिवराज्योदयम्

ब) अध्यात्मशिवायनम्

६) प्रकरण - सहावे

२० व्या शतकातील संस्कृत नियतकालिक साहित्यातील शिवचरित्र

अ) संस्कृत भवितव्यम्

१. श्री छत्रपति श्लोकपंचकम्
२. शिवभूस्मृति
३. शिवराज्योदयम्
४. अध्यात्मशिवायनम्
५. देहल्यां शिवराजः

ब) भारतवाणी

१. शिवराज्याभिषेकोत्सव:

२. शिवाजिर्न मया विजेय:

३. शिवस्वप्नं स्मर्तव्यं -
निश्चयस्य महामेरु:

४. न योऽजीगणद् विघ्नघातं महान्तं

५. अस्ति कश्चित्तरो म्लेच्छत: शिवोनृप:

६. सुप्ताऽभविष्यत् सर्वेषाम्

७. एकं धर्मराज्यं भविता भारतेऽस्मिन

८. शिवराजस्मरणम्

क) संस्कृत साहित्य परिषद

१. श्रीशिवाजिविजय:

७) प्रकरण - सातवे

राज्याभिषेक

अ) शिवराज्याभिषेकाचे प्रयोजन

ब) गागाभट्टांनी घेतलेला राज्याभिषेकाचा निर्णय

क) शिवराजाभिषेक प्रयोग:

ड) तांत्रिक सिंहासनारोहण विधि

ई) श्रीशिवराज्याभिषेक कल्पतरु

८) प्रकरण - आठवे

श्री शिवछत्रपतींची राजमुद्रा

९) प्रकरण - नववे

संस्कृतमधील छ. शिवाजी महाराजांच्या चरित्रा विषयी उपलब्ध असलेले हस्तलिखित साहित्य

अ) समयनय:

ब) साहित्य मंजूषा

क) त्रिपूर विजयचंपू

ड) इन्दुकुलतेजो निधि

ई) भोसल वंशावली

प) तंजावर येथील हस्तलिखित संस्कृत ग्रंथातून घडणारे शिवदर्शन

फ) धर्मराज विजयम्

१०) प्रकरण - दहावे

संकीर्ण साहित्य

अ) जयसिंहराजं प्रति श्रीमच्छत्रपते: शिवप्रभो: पत्रम्

ब) श्री बृहदीश्वर मंदिरावरील शिलालेख

क) शिवाजी महाराजांच्या राज्यपध्दतीचा उगम

ड) छत्रपती शिवाजी महाराजांचा जीवनपट

ई) शिवचरित्राचा आराखडा

प) छ. शिवाजी महाराजांचे कौटुंबिक जीवन व व्यक्तिमत्व

११) प्रकरण - अकरावे

उपसंहार

संदर्भ ग्रंथ.

प्रकरण पहिले

प्र स्ता व ना

प्रकरण पहिले

प्रस्तावना

" गुर्णोविन्दो सोऽस्त्वलयवन - विध्वंसन - पटु:
प्रतापो सोऽमत्ताधिप - दमन - सिंहो वनगत: ।
शिवाजिर्दुष्टारि - प्रहरण - शिवाऽऽजिर्गिरिचर:
त्रिशूलस्ते द्वेष्टा त्रिविधमयि । तेज: प्रसरणाम् ।। "

मातृभू : लहरी

भारतीय इतिहासाच्या सोनेरी पानांवर छत्रपती शिवाजी महाराजांचे युगपुरुष व युगधर्मसंस्थापक महान पुरुष म्हणून चिरंतन स्थान सोनेरी अक्षरात कायमचे कोरलेले आहे. प्रत्येक भारतीयाची मान या महापुरुषापुढे आदराने नतमस्तक होते. प्रत्येक भारतीयापुढे असलेली अखंड व चिरंतन प्रेरणाशक्तीची ही फार मोठी उत्साहमूर्ती सुमारे ३५५ वर्षांपूर्वी या भारतभूमीमध्ये जन्माला आली.

प्राचीन संस्कृत साहित्यात या देशातील पवित्र नद्या, पर्वत, तीर्थक्षेत्रे इ. विषयी पराकाष्ठेची भक्ति प्रकट झालेली दिसून येते. ही या भारत देशाची फार प्राचीन परंपरा आहे. त्यामध्ये व्यक्त झालेल्या उदात्त भावना जगातील कोणत्याही राष्ट्राच्या साहित्यात तद्देशीय नदी - पर्वत इ. विषयी व्यक्त झालेल्यासहसा आढळणार नाहीत. याचे मुख्य कारण म्हणजे हे राष्ट्र जसे विभूतिपूजक आहे, तसे जगातील एकही राष्ट्र नाही. या पूज्य विभूतींमध्ये श्रीमद्भगवद्गीतेत विभूतियोगाच्या अध्यायांत वर्णिल्याप्रमाणे विविध प्रकारच्या आविष्कारांचा अन्तर्भाव होतो. " माता भूमि: पुत्रो अहं पृथिव्या: " यासारख्या

वेदवचनातून किंवा " जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी " यासारख्या हृद्य सुभाषितांतून भारतीयांची राष्ट्रभक्ति उत्तम प्रकारे व्यक्त झालेली आहे. आणि यामुळेच छ. शिवाजी महाराजांच्या बाबतीत या देशात फार मोठी विभूतिपूजा होत आहे. त्यांना ` विष्णूचा ` किंवा ` शिवाचा ` अवतार मानले जावे. याकडे वास्तवतेच्या दृष्टीने जरी पाहिले तरी त्यांच्या अवघड व भरीव कार्याचीच त्यातून कल्पना येते.

" प्रतिपच्चन्द्रलेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता
शाहसूनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते । "

या त्यांच्या मुद्रेतूनच त्यांची सर्व वैशिष्टये व धवलकीर्ति पूर्णपणे नजरेसमोर उभी राहते. छ. शिवाजी महाराजांचे जीवन व कार्य इतके समृध्द आहे की आजसुध्दा देशासमोर असणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी ते उपयुक्त ठरेल.

मातृप्रेम, पितृप्रेम, बंधुप्रेम, स्त्रीप्रेम, पुत्रप्रेम, देशप्रीति, धर्मश्रध्दा, गुरूभक्ती, धर्मसंस्थापनार्थ उद्योग, महाराष्ट्र धर्मपालना, विद्याव्यासंग, कवित्वशक्ती, शूरसंभावना, विद्वत्संभावना, सभ्यता, वीरश्री, साहस, श्रमसहिष्णुता, कार्यबाहुल्य, शिष्टाई, राजकारण धुरंधरता, कानूनसाक्षी, नीती, औदार्य, गुणग्राहकता, समयसूचकता, नम्रता, औध्दत्य, ऐश्वर्य, सेनानीत्व वगैरे शिवाजीच्या शेकडो गुणांचे दाखले नानाप्रकारांनी दृष्टोत्पत्तीस येतात.

शिवाजीचे वर्तन न्यायाचे, नीतीचे, पराक्रमाचे, स्वधर्मपरायणतेचे व परधर्मसहिष्णुतेचे होते. दोन-चारशे लढाया मारून त्यात विजयी होणे, तीन-चारशे किल्ले मैदानात, डोंगरावर व समुद्रतीरावर बांधणे, नवीन सैन्य तयार करणे, नवीन आरमार निर्मिणे, नवे कायदे करणे, स्वभाषेला उत्तेजन देणे, स्वतः पद्यरचना करणे, कवींना आश्रय देणे, नवी शहरे वसविणे,

स्वधर्माचे संरक्षण करणे, गोब्राह्मणांचा प्रतिपाल करणे, सारांश स्वदेशाला स्वतंत्र व सुखी करणे. ह्या लोकोत्तर कृत्यांनी जर कोण्या पुरुषाने ह्या भूमंडळाला अक्षय कीर्ती करून ठेवले असेल तर ते शिवाजीनेच होय. शिवाजीची खाजगी वर्तणूक व सार्वजनिक पराक्रम इतके लोकोत्तर होते की, त्याच्याशी तुलना करावयास जी जी म्हणून व्यक्ती घ्यावी ती ती ह्या नाही तर त्या गुणाने शिवाजीहून कमीच दिसेल. ह्या अवतारी पुरुषासंबंधी लिहिताना समर्थ रामदास म्हणतात, " तयाचे गुणमहत्वासी तुलना कैंची ? " " यशवंत, कीर्तिवंत, समर्थवंत, नीतिवंत, जाणता, आचारशील, विचारशील, दानशील, कर्मशील, सर्वज्ञ, सुशील, धर्ममूर्ती, निश्चयाचा महामेरू, अखंड निर्धारी, राजयोगी " अशी कितीतरी विशेषणे शिवाजीला रामदासांनी लावलेली आहेत. निस्पृही व स्पष्टवक्त्या अशा या समकालीन ग्रंथकाराने हे गुणवर्णन केलेले आहे हे लक्षात घेतले असता शिवाजीच्या अंगी असलेल्या जाज्वल्य गुणांचा अंदाज करता येतो.

या देशात वेद, रामायण, महाभारत या ग्रंथांनी सुध्दा इतर अनेक दृष्टींप्रमाणे इतिहास या दृष्टीने फार मोठे महत्व प्राप्त केलेले आहे. इतर भाषेतील प्राचीन ग्रंथांमध्ये राजकीय इतिवृत्त आढळते. तसे ते संस्कृत भाषेत अजिबात नाही असे म्हणण्यात काहीच अर्थ नाही. कारण " इतिहासपुराणाभ्यां वेदं समुपबृंहयेत " यासारख्या ऋषिवचनांतून इतिहासाध्ययनाला वेदाध्ययनाइतकेच महत्व दिलेले आढळते. उपनिषदामध्येही इतिहास विषयक महत्वाचा उल्लेख आहे. कौटिलीय अर्थशास्त्रामध्येही इतिहासाच्या अध्ययनाचे महत्व प्रतिपादन केलेले आहे.

परंतु मध्यंतरी मुसलमानांच्या कारकीर्दीत काही दुष्ट सत्ताधाऱ्यांनी असंख्य संस्कृत ग्रंथांचा नाश केला. तरीसुध्दा या विनाशातून वाचलेल्या व

सर्वत्र उपलब्ध असलेल्या इतिहासविषयक संस्कृत ग्रंथांची तुरळक नामावली पाहिली तरीसुद्धा आपल्या विशिष्ट शैलीनुसार इतिहास लेखनाची अविच्छिन्न परंपरा दिसून येते.

यानंतरच्या ब्रिटिश राजवटीमध्ये त्यांनी या देशात शिक्षणाचा प्रसार जरी केला तरी त्यांनी आमच्या इतिहासाला विकृत वळण दिले आणि आम्ही त्यांनी लिहिलेल्या इतिहासावर अवलंबून तेच सत्य मानू लागलो. परंतु शिक्षणप्रसारामुळे काही लोकांची अस्मिता जागृत झाली व अनेक प्रयत्न करून, अनेक प्रकारचे कष्ट घेऊन या लोकांनी खरा इतिहास शोधण्याचा प्रयत्न केला.

शिवाजी अक्षरशून्य होता येथपासून सुरुवात करून त्याने दरोडे, लूटमार, खून वगैरे अनुचित पापे केली असे सांगण्याचा इंग्रज लेखकांचा मुख्य रोख त्यांच्या लिखाणातून दिसून येतो. तेव्हा हे वाचून इंग्रज व मुसलमान लेखकांनी ह्या महापुरुषाची निंदा केलेली पाहून त्यांच्या परगुणासहिष्णुतेबद्दल तिरस्कार उत्पन्न झाला व त्यांच्या हृदयातील कुत्सितपणाचा ठाव घेऊन या भारतीय लेखकांनी सत्य इतिहास शोधण्याचा प्रयत्न चालू केला त्यामध्ये प्रामुख्याने श्री. स.म. दिवेकर, श्री. वि.का. राजवाडे, श्री. द.वि. आपटे, श्री. ग.ह. खरे, म.म.द.वा. पोतदार यांचा आदी आवर्जून उल्लेख केला पाहिजे. यांच्या बहुमोल प्रयत्नामुळे छ. शिवाजी महाराजांच्या चरित्रावर नवा प्रकाश पडला व या महान शककर्त्यापुरुषावर श्री. ब.मो. पुरंदरे, श्री. रणजित देसाई, श्री. विजय देशमुख, श्री. वा.सी. बेंद्रे यांनी बरेच लेखन केले व जनमाणसांची अस्मिता जागृत केली.

आज मराठी, इंग्रजी, बंगाली, तामिळ, उर्दू, हिंदी, गुजराथी वगैरे निरनिराळ्या भाषांमध्ये छ. शिवाजी महाराजांवर बरेचसे साहित्य निर्माण झालेले आहे. नुकतेच त्रिशतसंवत्सरी वर्ष मोठया आनंदाने साजरे केले गेले असल्यामुळे शिवस्मरणाला उजाळा मिळाला. लोक आदरभावाने

त्याकडे पाहू लागले. शिवचरित्राला ' राजप्रतिष्ठा ' प्राप्त झाली. महाराजांकडे ' राष्ट्रपुरुष ' या नात्याने पाहण्याची दृष्टी भारतीयांना प्राप्त झाली. पण असे असले तरी ' राष्ट्रपुरुष ' या नात्याने शिवछत्रपतींचे यथार्थ दर्शन घडविणारे चरित्र अजून निर्माण झालेले नाही, अशी खंत सर्वत्र व्यक्त केली जाते. विशिष्ट संदर्भात, विशिष्ट काळात जसे आवश्यक वाटले तसे शिवचरित्र आजवर सांगितले गेले. यातून तात्कालिक गरजेची पूर्ती झालीही असेल पण त्याबरोबर तेच खरे शिवचरित्र, हा ग्रहही कायम झाला, अशी चरित्रे स्थायी स्वरूपाचे मार्गदर्शन करण्यास असमर्थ ठरल्यास नवल नाही. विश्वसनीय साधनांच्या आधारे यथार्थ विश्लेषण करून राष्ट्रचिंतनाच्या संदर्भात गवसलेले सत्य शिवचरित्र निर्लेप मनाने व नि: स्पृहपणाने सांगितले गेले तरच ते मार्गदर्शक ठरू शकेल.

वरील दृष्टीकोनातून पाहिले असता वर उल्लेखिलेल्या इतर निरनिराळ्या भाषांप्रमाणेच संस्कृत भाषेमध्येही छ. शिवाजी महाराजांवर बरेचसे साहित्य उपलब्ध आहे. आणि आजपर्यन्त कोणीही ' संस्कृतमधील शिवसाहित्य ' या विषयावर अभ्यास केलेला नाही, असे माझ्या दृष्टीस आले. म्हणून त्यादृष्टीने अभ्यासाचा प्रयत्न करावयाचे ठरविले. कारण समकालीन व अर्वाचीन संस्कृत ग्रंथांच्या अभ्यासाने छ. शिवाजी महाराजांच्या चरित्रावर अधिक प्रकाश पडेल, असा मला विश्वास वाटतो. या उद्देशानेच मी हा अल्पसा प्रयत्न करीत आहे.

संस्कृतमध्ये सुमारे ३५० वर्षांपूर्वीपासूनच छ. शिवाजी महाराजांच्या जीवनावर साहित्यिक रचना झालेल्या आहेत. ' परमानंद नेवासेकर ' यांनी ' शिवभारतम् ' हे महाकाव्य रचले. महाभारताप्रमाणे हा ग्रंथ लिहिण्याचा लेखकाचा विचार असावा. पण तो ग्रंथ अपूर्ण राहिलेला आहे. तरीसुध्दा समकालीन ग्रंथ म्हणून याला फारच महत्वाचे स्थान आहे.

तसेच शहाजी महाराजांच्या पदरी असलेल्या कवींपैकी ` जयराम पिंडये ` यांनी लिहिलेले ` पर्णालपर्वतग्रहणाख्यानम् ` व ` राधामाधव-विलासचंपू ` व राजपुत्र छ. संभाजी महाराजांनी लिहिलेला ` बुधभूषण ` हे ग्रंथही समकालीन असल्यामुळे महत्वाचे असून त्यावर बरेचसे ऐतिहासिकदृष्टया संशोधनही झालेले आहे.

` गागाभट्ट काशीकरांनी ` छत्रपतींच्या राज्याभिषेक प्रसंगाला अनुसरून लिहिलेला ` शिवराजाभिषेक प्रयोग: ` हा ग्रंथ अतिशय महत्वाचा आहे. त्यांनीच छ. शिवाजी महाराजांच्या प्रेरणेने लिहिलेला ` शिवार्कोदय ` हा ग्रंथ पण महत्वाचा असून छ. शिवाजी महाराजांनी त्यांना आज्ञा करून वरील ग्रंथाद्वारे कुमारिलभट्टाचे अपूर्ण राहिलेले मीमांसेचे काम पूर्ण करून घेतले. शिवाय त्यांनीच ` शिवराज - प्रशस्ती ` हे काव्यही लिहिले आहे. शिवाय शिवाजी महाराजांच्या आज्ञेवरून त्यांनी ` दिनकरोद्योत ` व ` कायस्थ-धर्मदीप ` हेही ग्रंथ रचले आहेत. शिवाय मला त्यांचे भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिर, पुणे येथील ग्रंथालयाच्या हस्तलिखित विभागामध्ये ` समयनय: ` हे हस्तलिखितही सापडले आहे.

छ. शिवाजी महाराजांच्या वैदिक व तांत्रिक राज्याभिषेक हे विद्वानांच्या दृष्टीने मतभेदाचे मुद्दे झाले आहेत. त्यावर प्रकाश टाकणारा ` निश्चलपूरी ` यांचा ` श्रीशिवराज्याभिषेक कल्पतरू ` हा समकालीन ग्रंथही उपलब्ध आहे.

छ.शिवाजी महाराजांच्या आज्ञेने ` पं.कृष्ण ज्योतिषी (दैवज्ञ) ` यांनी लिहिलेला ` करण कौस्तुभ ` हा ग्रंथ व ` पं.रघुनाथ हणमंते ` यांनी लिहिलेला ` राज्यव्यवहार कोश ` यावरून छ. शिवाजी महाराजांनी संस्कृत भाषेला दिलेले उत्तेजन, त्यांना संस्कृत भाषेविषयी असणारा अभिमान व त्यांच्या मुद्रेतून दिसणारी त्यांची संस्कृतनिष्ठता या गुणांवर प्रकाश पडतो.

या ग्रंथासह ` केशव पंडित ` कृत ` राजारामचरितम् ,` परमानंदाचा पुत्र ` गोविन्द ` याचे ` परमानन्दकाव्यम् ` किंवा ` अनुपुराण,` तसेच संकर्षण सकळकळे ` यांचे ` डॉ. गोस्वामी ` संपादित ` शिवकाव्य,` ` स्व.मूळशङ्कर माणिकलाल याज्ञिक ` यांचे ` छत्रपतिसाम्राज्यम् ` हे ऐतिहासिक नाटक, ` डॉ. श्री.भा. वर्णेकर ` यांचे ` शिवराज्योदयम् ` हे ६८ सर्गांचे महाकाव्य, त्यांचेच ` शिवराज्याभिषेक ` हे नाटक, ` श्री.भि. वेलणकर ` यांचे ` छत्रपतिः श्री शिवराजः ` हे संस्कृत नाटक, ` श्री.वि.पां. बोकील ` यांचे ` शिववैभवम् ` हे नाटक, ` श्रीमदम्बिकादत्त व्यास ` यांची ` शिवराज विजय ` ही गद्य संस्कृत कादंबरी व या कादंबरीवरच सार रूपाने प्रकाशित झालेले ` डॉ. नारायणशास्त्री काङ्कर ` यांचे ` सरल-शिवराज-विजय ` हे संस्कृत पुस्तक उत्तर भारतात पाठ्यपुस्तक म्हणून लावलेले आहे. ` श्रीपादशास्त्री हसूरकर ` यांचे ` छत्रपति शिवाजीमहाराजचरितम् ` हे चरित्र, ` पुरुषोत्तमाचे ` ` शिवकाव्यम्,` ` डॉ. हजारीलाल शास्त्री ` यांचे ` शिवप्रताप बिरुदावली,` ` श्री. सहस्त्रबुद्धे ` यांचे ` प्रतिकार नाटकम्,` त्यांचेच ` अफझुल्लमर्दनम्,` बंगालचे ` कालिदास विद्या विनोद ` यांचे ` शिवाजी-चरितम् ` ` व्यंकटेश वामन सोवनी ` यांचा ` शिवावतार प्रबन्ध ` असे प्रकाशित संस्कृत शिवसाहित्य आहेच.

त्याशिवाय ` हरिकवि ` चे ` शम्भूराज चरितम् ` हा अप्रकाशित संस्कृत ग्रंथ, भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिर,पुणे येथे असलेले ` हरिकवि ` चा मुलगा ` नारायणसूरि ` याचे ` शंभुविलासिका ` हे अप्रकाशित हस्तलिखित, इ.स. १८२५ मध्ये ` साहित्य मञ्जुषा ` मध्ये ` सदाजी ` कवीने शिवाजीवर लिहिलेले काव्य, ` महामहोपाध्याय हरिदास सिद्धान्त वागीश ` कृत ` शिवाजीचरितम् ` ` पं. वासुदेव शास्त्री बागेवाडीकर,` यांचे

` छत्रपति शिवराज: ` हे चरित्र (संस्कृत भवितव्य, वर्ष ४ थे), ` डॉ.श्री. भा. वर्णेकर ` यांचे ` श्रीशिवराज स्तवनम् ` हे लघुकाव्य, (संस्कृत भवितव्य वर्ष १ ले), ` जयसिंह राजंप्रति श्रीमच्छत्रपते: शिवप्रभो पत्रम् ` हा फारसी पत्राचा छंदोबध्द संस्कृत अनुवाद आहे. हा अनुवाद ` कविराज ` नावाच्या अज्ञात व्यक्तीने केलेला आहे. तसेच ` गोपालक ` कृत ` प्रतापसिंहोदय, ` ` श्रीधर वेंकटेश उर्फ अय्यावल ` यांचे ` शाहेन्द्रविलास ` हे काव्य, सरस्वती महाल, तंजावर ग्रंथालयातर्फे नुकतेच प्रकाशित झालेले आहे.

तंजावर येथील सरस्वती महाल ग्रंथालयामध्ये ` गंगाधर ` कृत ` भोसलवंशावली ` व ` महाराष्ट्र राजवंशावलि: ` ` भोसलवंशावलिचम्पू: , ` तसेच ` शहाजी महाराजांनी ` लिहिलेले ` संगीतमकरंद, ` ` तुळजाराजकृत, ` ` कर्मविपाक, ` ` तुळाजीराजे, ` रचयिता ` संगीतसारामृत, ` ` संकर्षण सकळकळे कृत ` नृसिंह चम्पू, ` ` डॉ. श्री.भा. वर्णेकरांचे ` ` अध्यात्म-शिवायनम्, ` ` एकाजी ` कृत ` राजरंजन पुराण ` ` श्री बृहदीश्वर मंदिरावर कोरलेला शिलालेख ` म्हणजे ` भोसल वंश चरित्र, ` व गडहिंग्लज येथे सापडलेले ` अज्ञात कवीने ` लिहिलेले ` धर्मराजविजयम् ` हे नाटक हे सर्व अप्रकाशित हस्तलिखित साहित्य आहे.

अशारीतीने संस्कृत भाषेमध्ये गद्य, पद्य, नाटक, महाकाव्य, प्रबंध, लेख, शिलालेख, ताम्रपट, दानपत्रे इ. साहित्याच्या निरनिराळ्या शाखा-उपशाखांमधून शिवचरित्रांवर बरेच लिखाण झालेले आहे.

संस्कृत भाषेचा समाजात एकंदर प्रभाव कमी होऊ लागल्यामुळे संस्कृत भाषेमध्ये असलेल्या ग्रंथांमधून छ. शिवाजी महाराजांच्या चरित्रविषयक प्रकट होणाऱ्या निरनिराळ्या पैलूंकडे अभ्यासकांचे दुर्लक्ष होते. म्हणून या

प्रबंधामुळे संस्कृत साहित्यातून प्रकट होणाऱ्या छत्रपतींच्या चरित्रावर नक्कीच नवीन प्रकाश पडेल याविषयी मला विश्वास वाटतो.

त्याचबरोबर मराठी साहित्यावर पडलेला संस्कृत साहित्याचा प्रभाव, शिवाजी महाराजांच्या चरित्राच्या व व्यक्तिमत्वाच्या निरनिराळ्या पैलूंचा अभ्यास, त्यातून राजनीती, धर्म, अर्थ, समाजव्यवस्था यांवर पडणारा प्रकाश, छ. शिवाजी महाराजांवर पडलेला संस्कृतचा प्रभाव, त्यांची संस्कृत मुद्रा व शिवरायाबद्दल पसरविण्यात आलेल्या गैरसमजाचे निराकरण या सर्व दृष्टिकोनातून अभ्यासकांना या प्रबंधाचा उपयोग होईल, अशी मला आशा आहे.

' संस्कृत मधील शिवसाहित्य ' या विषयावर आजपर्यंन्त कोणी प्रबंध लिहिला नसल्यामुळे या माझ्या प्रबंधात मी सर्व ' संस्कृत शिवसाहित्य ' एकत्र आणलेले आहे. त्यामुळे वाचकांची, अभ्यासकांची व इतिहास संशोधन करणाऱ्यांची मोठीच सोय होणार आहे. हा एक प्रकारचा ' संस्कृत - शिवसाहित्य - कोशच ' या ठिकाणी एकत्र मिळणार आहे.

छ. शिवाजी महाराजांच्या थोरवीबद्दल जास्त विवेचन करण्याची जरूरीच नाही. म्हणून आता संस्कृत साहित्यातून प्रकट होणाऱ्या त्यांच्या शिवचरित्रावर सविस्तर दृष्टिक्षेप टाकण्यास प्रारंभ करीत आहे.

छ. शिवाजी महाराजांचे चरित्र हा विषय अत्यंत व्यापक आहे. या विषयाला मर्यादा घालता येणे अत्यंत कठिण गोष्ट आहे. म्हणून विस्तार भयाने मी १७ व्या शतकातील संस्कृत शिवसाहित्य, १८ व्या शतकातील संस्कृत शिवसाहित्य, १९ व्या शतकातील संस्कृत शिवसाहित्य, २० व्या शतकातील संस्कृत शिवसाहित्य व हस्तलिखित संस्कृत शिवसाहित्य

अशी स्थूलमानाने प्रकरणाची विभागणी केलेली आहे. छ. शिवाजी महाराजांची मुद्रा व छत्रपतींच्या राज्याभिषेकाचे प्रयोजन यासारखी महत्वाची प्रकरणे स्वतंत्र लिहिलेली आहेत.

यामध्ये सर्व संस्कृत ग्रंथाचा आढावा घेतलेला आहे. महत्वाच्या व समकालीन संस्कृत ग्रंथाची सविस्तर माहिती दिली आहे. अर्वाचीन व प्रकाशित ग्रंथांचा थोडक्यात आढावा घेतलेला आहे. मला मिळालेल्या माहितीप्रमाणे बहुतेक सर्व संस्कृत ग्रंथ भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिर, पुणे, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, सरस्वती महाल, ग्रंथालय, तंजावर, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर याठिकाणी मी पाहिले आहेत व त्यांचा अभ्यास केला आहे. क्वचित एखादाच ग्रंथ मला खूप शोध करूनही प्राप्त होऊ शकला नाही, त्याचा फक्त नामनिर्देश केलेला आहे. तंजावरहून आणलेल्या हस्तलिखित ग्रंथांच्या मायक्रो-फोटो कॉपीजचे आवश्यक तेथे झेरॉक्स दिलेले आहेत. छ. शिवाजी महाराजांच्या सुविख्यात अष्टकोनी मुद्रेचे चित्र चित्रकार श्री.के.डी. कुंभार यांच्याकडून काढून घेऊन त्याची झेरॉक्स प्रत दिलेली आहेत. मुखपृष्ठावरील छ. शिवाजी महाराजांचे चित्र समकालीन डच चित्रकाराने काढलेले आहे व त्याचे झेरॉक्स प्रत मी प्रत्येक प्रतीत दिलेली आहे.

अशारीतीने एकूण संस्कृत शिवसाहित्यातून आपल्यासमोर उभी राहणारी शिवप्रतिमा पाहण्यास आता आपण प्रारंभ करू या.

प्रकरण दुसरे

१७ व्या शतकांतील संस्कृत साहित्यातील
शिव चरित्र

प्रकरण दुसरे

१७ व्या शतकातील संस्कृत साहित्यातील शिव चरित्र

अ) ` शिवभारतम् `

संस्कृत साहित्यामध्ये छ.शिवाजी महाराजांच्या चरित्राचा विवेचक अभ्यास करीत असताना छ. शिवाजी महाराजांवर प्रकाशित झालेल्या संस्कृत ग्रंथामध्ये ` परमानंदांच्या ` ` शिवभारताचे ` महत्व सर्वात अधिक आहे. कारण सर्वश्री. श्री.स.म. दिवेकर, श्री. वि.का. राजवाडे, सर जदुनाथ सरकार येथपासून ते श्री. देवीसिंग चौहाण, श्री.ग.ह. खरे येथपर्यन्त सर्वच थोर थोर लेखकांनी ह्या ग्रंथाचे काव्यदृष्टया व ऐतिहासिकदृष्टया महत्व मान्य केलेले आहे.

कवीन्द्र परमानंद हा शिवकालीन विद्वत्समाजामध्ये अत्यंत सन्मान्य व विशेषा म्हणजे शिवाजी महाराजांचा एक श्रेष्ठ सहकारी असल्यामुळे त्याच्या या ग्रंथाचे महत्व शिवचरित्र विषायक सर्व ग्रंथामध्ये असाधारण आहे. परमानंद हा छ. शिवाजी महाराजांचा आश्रित असल्यामुळे अनेक महत्वाच्या घटनांमध्ये त्याने प्रत्यक्ष भाग घेतलेला होता. त्यामुळे तत्कालीन ऐतिहासिक महत्वाच्या घटनासंबंधी या ग्रंथाइतका दुसरा प्रामाणिक ग्रंथ नाही. प्रस्तुत ग्रंथातून जी माहिती उपलब्ध झाली, तिच्यावरून शिवचरित्रासंबंधीच्या अनेक भ्रामक कल्पनांचा निरास झाला.

या शिवाय छ.शिवाजी महाराजावर जे संस्कृत साहित्य आढळते. त्यामध्यें ` शिवभारतम् ` हे महाकाव्य म्हणून विशेषा उल्लेखनीय आहे.

काव्यदृष्ट्या त्याची योग्यता फार मोठी आहे व त्याचा काल शके १५८२ नंतर व राज्यारोहणापूर्वी केंव्हा तरी असला पाहिजे, म्हणून ही क्रमाप्रमाणे ही हे काव्य पहिलेच ठरते. म्हणून मी प्रथमत: परमानंदाच्या ` शिवभारत ` याच काव्याचा परिचय प्रथम करून देत आहे व निरनिराळ्या लेखकांनी त्यावर लिहिलेल्या लेखांचा आढावा घेत आहे.

शिवभारताचे महत्व आगळेच असण्याचे आणखी एक कारण म्हणजे शिवाजी महाराजांच्या विभूतिमत्वाविषयी भारतीयांची आत्यंतिक श्रध्दा हे ही आहे. छ.शिवाजी महाराजांचे चरित्र हे रामचंद्राच्या चरित्राप्रमाणे पापनाशक आहे, अशी श्रध्दा शिवाजी महाराजांच्या काळातच समाजामध्ये निर्माण झालेली दिसते. शिवभारतकार कवीन्द्र परमानंद शिवचरित्रा विषयी लिहितात की,

> ` कलिकल्मषहारीणि हारीणि जनचेतसाम् ।
> यशांसि शिवराजस्य श्रोतव्यानि मनीषिभि: ।। `

` कलियुगांतील पापे नाहीशी करणारी आणि लोकांची चित्ते, हरण करणारी अशी शिवरायाची यशोगीते आपण श्रवण करावीत. ` (अध्याय - १ श्लोक - २२).

ग्रंथकाराने आपले नाव ` कवीन्द्र परमानंदभट्ट गोविन्दनंदन ` या शब्दांनी ठिकठिकाणी निदर्शित केले आहे. यावरून ग्रंथकाराचे नाव ` परमानन्द ` व त्याच्या वडिलांचे नाव ` गोविंदभट्ट ` असे होते. तो आपल्याला ` निधिवासकर ` किंवा ` नेवासकर ` असे म्हणवितो. यावरून हा नेवाशाचा राहणारा असावा. कदाचित त्याचे आडनाव ` नेवासकर ` असण्याचा संभव आहे. त्याची कुलदेवता ` एकवीरा ` होती. तो मोठा

शास्त्रज्ञ, अध्यात्मवेत्ता व पौराणिक प्रवर म्हणजे मार्मिक पौराणिक पंडित होता. त्याच्या विद्वत्तेमुळे व अलौकिक काव्यशक्तीमुळे त्यास कवीन्द्र ही पदवीहि मिळालेली होती. शिवाय तो चांगला इतिहास-चरित्रकार होता, हे ही उघड आहे. कवीने या ग्रंथास ` अनुपुराण ` असे नाव दिले आहे. कारण आपल्या शिवभारत या ग्रंथाचा समावेश रामायण-महाभारतादि महाग्रंथाच्या पंक्तीत व्हावा, अशी कवीच इच्छा असावी, तथापि पुराणे व उपपुराणे यांची संख्या मर्यादित असल्यामुळे त्यात हे १९ वे पुराण म्हणून घालतां येणार नाही. म्हणून कवीने यांस ` अनुपुराण ` हे अन्वर्थक नांव दिलेले आहे. शिवाय या ग्रंथास `पुराणमिव नूतनं ` असे काशीस्थ मनीषींच्या तोंडून वदविले आहे.

त्याने वारंवार ` सूर्यवंशे ` या विशेषणाचा उल्लेख केलेला आहे. मराठ्यांचे क्षात्रियत्व व भोसल्यांचे सूर्यवंशीयत्व त्यास पूर्णपणे मान्य होते. ही गोष्ट परमानंदाने ` दक्षिणस्यां दिशि श्रीमान् मालवर्मा नरेश्वरः । बभूव वंशे सूर्यस्य-------- । ` या श्लोकात कथानकारंभीच स्पष्टपणे व्यक्त करून ठेवलेली आहे.

शिवावताराची कथा अध्याय ५ मध्ये दिलेली आहे. पृथ्वी म्लेंच्छछलाने पीडित झाली असतां ब्रह्मदेवाकडे जाऊन या क्लेशांपासून मुक्त करावी म्हणून प्रार्थना केली. महाभारत जसे सूत शौनकास नैमिषारण्याचे ठिकाणी सांगतो, तद्वतच हे शिवभारत कवीन्द्राने शिवाजी महाराजांच्या आज्ञेवरून तयार केले, पण ते काशी येथील पंडितापुढे सांगितले. वक्ता व श्रोता, प्रश्न व उत्तर अशी प्रसंगाची पध्दती आहे. शिवाय त्याला हा ग्रंथ महाभारतासारखा विस्तृत व सर्वांगसुंदर सजवावयाचा असावा. कवीन्द्रासारख्या बहुश्रुत विद्वानास व समक्ष घडणाऱ्या गोष्टी पाहणारास शिवाजीचे

चरित्र लिहिले असता ते सहजच महाभारतासारखे होईल असे वाटणे साहजिकच आहे.

कविकालाचा विचार केला असता शके १५८६ च्या माधव म्हणजे वैशाख मासांत राजापूर येथे धर्मनिर्णयार्थ एक मोठी सभा भरली होती. या सभेने दिलेल्या निर्णयपत्रात सभेतील पंडितांची जी यादी दिली, तीमध्ये कवीन्द्राचा उल्लेख आहे. " कवीन्द्र: परमानन्दो महादेवश्च पण्डित: ।" या यादीत आरंभीच गागाभट्टांचा उल्लेख आलेला आहे. यावरून कवीन्द्र गागाभट्टादि विद्वानांप्रमाणेच शिवसमकालीन होता. याबद्दल संदेह राहात नाही. शिवाय चरित्र सांगत असताना ` जो रायगडाचा अधिपति ह्या पृथ्वीवर राज्य करीत आहे ` हा उल्लेख कालैक्य दर्शक आहे. चरित्रलेखनाचे कार्य शिवाजी महाराजांनी परमानंदाकडे सोपविले यावरूनही समकालीनत्व प्रस्थापित होते.

या काव्यात कालदर्शक मित्या फक्त दोनच दिल्या आहेत. १) शिवजन्माची, २) अफझलखान वधाची. त्या दोन्हीही अगदी बिनचूक आहेत. कथानकाच्या प्रसंग अनुक्रमाकडे कितीही सूक्ष्मदृष्टीने पाहिले तरी स्थूलकालव्यक्ति विपर्यास कोठेही आढळून येत नाही. शिवकाली लिहिलेल्या ग्रंथातून " महाराज विष्णूचा अवतार होते " असे उल्लेख सापडतात. शिवभारतातही तो तसाच आहे. कवीन्द्राने ` भोसले ` या आडनावाचे ` भृशबल ` असे संस्कृत रूपांतर सर्वत्र वापरलेले आढळते. ते रूप समकालीन ग्रथात व संभाजी महाराजांच्या बुधभूषणामध्येही आढळते.

पन्हाळ्याच्या वेढयाच्या पूर्वी शके १५८१ च्या पौष वद्यात कोल्हापूर नजीक रूस्तुमजमा व फाजलखान यांजबरोबर महाराजांचे युध्द झाले. या युध्दाचे वर्णन २४ व्या अध्यायांत आलेले आहे. त्यात दोन्ही पक्षातील सैन्याची मांडणी सरदारांच्या नांवासह दिलेली आहे.

कार्तलबखानाचा दूत महाराजास भेटावयास गेला तेव्हा अश्वारूढ लष्करी पोषाखात असलेले शिवाजींचे वर्णन व अफझलखानाच्या भेटीच्या समयाचे, महाराजांच्या स्वरूपाचे वर्णन वाचताना असे वाटते की, शिल्पकार व चित्रकार या दोघांसाठी कवीन्द्राने काम सुकर करून ठेवले आहे.

अफझलखानाच्या वधानंतर औरंगजेबाने शास्ताखान याला सेनाधिपत्य दिले, तेव्हा महाराज राजगडावर आले व तेथे मोठी राजसभा भरविली. अशी ही राजगडावरील राजसभेची त्रोटक हकीकत आहे. ही सभा अनेक कारणांनी फार महत्वाची असून या सभेची हकीकत प्रथमत: कवीन्द्रच देत आहे. इतर कोणत्याही ग्रंथांत या सभेचा उल्लेख आढळत नाही. यावरूनही त्याचे समकालीनत्व सिद्ध होते व शिवशाहीत एकतंत्री कारभार नसून राजनीतिला धरून तो होत होता असे दिसते. ऐतिहासिकदृष्टया व शिवाजीच्या व्यक्तिमत्वाचा विचार करीत असता या गोष्टीला फार महत्वाचे स्थान आहे. शके १५८२ मध्यें महाराजांनी राजापूरावर स्वारी करून ते लुटले. या हकीकतीत कवीन्द्राचे व डच व्यापाऱ्यांचे साम्य आहे.

<u>ग्रंथरचना काल</u> :

शिद्दी जोहराचा मृत्यु शके १५८३ त झाला. या गोष्टीचा उल्लेख या ग्रंथात आलेला आहे. यावरून या ग्रंथाची रचना शके १५८३ नंतर व महाराजांच्या राज्यारोहणापूर्वी केव्हां तरी झाली असली पाहिजे हे उघड आहे. अध्याय ५ मध्यें शिवकालीन स्वातंत्र्य भावनेचे दर्शन घडविले आहे. या देशाची ऐतिहासिक लेखनाची परंपरा फार प्राचीन आहे. मुसलमानांच्या आगमनापासून फारशी भाषेत इतिहास लेखनाची परंपरा सुरू झाली, तेव्हा मूळची भारतीय इतिहासाची परंपरा व फारशी लेखनपध्दती यातील गुणांचे सुंदर संमीलन करून परमानंदाने शिवभारताची रचना केलेली दिसते.

या ग्रंथात नद्या व कला यांच्या नांवाच्या याद्या पौराणिक धर्तीच्या आहेत. परंतु निजामशाही बुडण्याची कारणपरंपरा सांगताना व शिद्दी जोहाराच्या मृत्यूची चर्चा करताना परमानंदाचे लिहिणे आधुनिक इतिहासकाराला उत्तमरीतीने शोभेल अशा चिकित्सक स्वरूपाचे आहे. त्याचप्रमाणे स्वर्गातील दरबाराचे वर्णन देताना परमानंद जरी कल्पनेच्या वातावरणांत शिरत असला तरी दाक्षिणात्यांची मोंगलाशी झालेली युद्धे, अफझल प्रसंग, पन्हाळ्याचा वेढा, तानाजी मालुसऱ्यांचा पराक्रम वगैरेची माहिती देताना परमानंदाने खरी ऐतिहासिक दृष्टी दाखविली आहे हे निर्विवाद आहे. सारांश, शिवाजी महाराजांच्या कारकीर्दीतच महाराष्ट्रात पूर्वीपेक्षा शास्त्रशुद्ध व ओजस्वी अशी ऐतिहासिक लेखनाची परंपरा रूढ होऊन लागली होती.

कथानकाच्या दृष्टीने अध्याय पहिला - शाहजी जन्म, अध्याय दुसरा - शाहजी व शरीफजी यांचे विवाह, अध्याय तिसरा - खंडागळे हत्ती प्रकरण व जाधव व भोसले याचे वितुष्ट, अध्याय चवथा - निजामाचा उत्कर्ष, अध्याय पांचवा - भोसल्यांची भाऊबंदकी व त्यांच्या कुळात विष्णूचा अवतार, अध्याय सहावा - शिवराजप्रभव, अध्याय सातवा - बाललीला, अध्याय आठवा - निजामशाहीचा अंत, अध्याय नववा - शिवराजाचे लिपिग्रहण व बंगळूर शहर वर्णन, अध्याय दहावा - शिवराजाचे पुण्यास आगमन व विद्याभ्यास, अध्याय अकरावा - शहाजीचे कर्नाटकात वर्चस्व व मुस्तफखानाचे कर्नाटकात आगमन, अध्याय बारावा - शहाजीस अटक, अध्याय तेरावा - शिरवळ येथील युद्ध व बाळाजी हैबतरावाचा वध, अध्याय चौदावा - मुसेखानाचा वध व फतेखानाचा पळ, अध्याय पंधरावा - शहाजीची कैदेतून सुटका, अध्याय सोळावा - सोनोपंताची राजनीति, अध्याय - सतरावा - अफझलाचे विजापुराहून प्रयाण, अध्याय अठरावा -

अफझुल्लाचा शिवाजीस निरोप, अध्याय एकोणिसावा - अफझुल्लाचे गडाकडे प्रयाण, अध्याय विसावा - गडावर आगमन, अध्याय एकविसावा - अफझुल्लाचा वध, अध्याय बाविसावा - अफझुल्ल सैन्य भंग, अध्याय तेविसावा - पन्हाळगड हस्तगत, अध्याय चोविसावा - रुस्तुमादि सरदारांचा पराभव, अध्याय पंचविसावा - शास्ताखानाचे आगमन, अध्याय सव्विसावा - शिवाजींचे पन्हाळगडाहून विशाळगडास आगमन, अध्याय सत्ताविसावा - विशाळगडाहून राजगडास आगमन, अध्याय अठ्ठाविसावा - कारतलबास अटक, अध्याय एकोणतिसावा - उंबरखिंडीचे युध्द, अध्याय तिसावा - राजापूरची लूट व तानाजी मालुसऱ्यांचा पराक्रम, अध्याय एकतिसावा - शिवाजीचा श्रृंगारपुरात प्रवेश, अध्याय बत्तिसावा - प्रभावल्ली हस्तगत करणे. हा अध्याय अपूर्ण राहिलेला आहे. अशारीतीने निरनिराळे विषय कथानकात मांडलेले आहेत.

ग्रंथस्वरूप पाहताना ३२ अध्याय आहेत. ३२ वा अध्याय त्रुटित आहे. ३२ व्या अध्यायाच्या शेवटी ग्रंथसमाप्तीचे गमक नाही. अध्यायांचा शेवट " इत्यनुपुराणे सूर्यवंशे कवीन्द्र परमानंद प्रकाशितायां शतसाहस्र्यां संहितायां........अध्याय: " याप्रमाणे आहे. तो पुराणे व उपपुराणे यांच्या परंपरागत अध्याय - समाप्तिदर्शक वाक्याप्रमाणेच केलेला आहे. काही अध्यायास नाव दिलेले नाही. ग्रंथ अर्धवटच आहे. शिवाजी महाराजांचा निर्देश " राजा राजगिरीश्वर: " या पदाने केलेला आढळतो. यावरून महाराजांना अभिषेक होण्यापूर्वी सर्व कारभार राजगडावरून चालत असे, असे दिसते.

या ११ अध्यायात मालोजीपासून शके १५८३ मध्ये सूर्यराजाचे श्रृंगारपूर हस्तगत करून तेथे त्र्यंबक भास्करास अधिकारी नेमले, येथपर्यन्तचे वर्णन आहे. परंतु याहि कालानंतर घडून आलेल्या एकाच गोष्टीचा उल्लेख अध्याय १८ श्लोक २१-२२ मध्यें केलेला आहे. शिद्दी जोहारास विजापूरकर आदिलशहाने शके १५८३ च्या अखेर मारले तो जोहराच्या मृत्यूचा काळ श्रृंगारपूरच्या स्वारीनंतरचा आहे.

या ग्रंथात आठ नकाशे असून शिवभारतातील वर्णनाचा विचार करून नवीनच तयार करविले आहेत. इतिहासाच्या अध्ययनास ते उपयोगी पडतील. हस्तलेखांची तीन छायाचित्रे आहेत. मुखपृष्ठावर दिलेले श्री शिवाजी महाराजांचे रंगीत चित्र मुंबई येथील प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियममधील आहे. बंगळूरच्या किल्ल्याचे छायाचित्र, शिवाईचे चित्रही आहे.

श्री. सदाशिव महादेव दिवेकर यांनी शके १८४९ मध्ये हे काव्य प्रथम प्रकाशित केले. त्याला विख्यात इतिहासतज्ञ श्री. दत्तात्रेय विष्णु आपटे यांनी २०० पानांची विद्वत्तापूर्ण मराठी प्रस्तावना लिहिलेली आहे. पुण्याचे संस्कृत पंडित श्री. राजाराम मनोहर देसाई यांनी संपूर्ण महाकाव्याचे मराठी भाषांतर केले. अशारीतीने या ग्रंथाची प्रस्तावना अतिशय चांगली असून अभ्यासकास सर्व प्रकारची माहिती पुरविणारी आहे.

ऐतिहासिकदृष्टया प्रतिष्ठित समकालीनांचे ग्रंथ प्रमाणभूत मानण्यांत येतात व म्हणून शिवाजी महाराजांच्या जीवनासंबंधी शिवभारताला प्रमाणदृष्टया महत्वाचे स्थान दिले पाहिजे.

एवढा महत्वपूर्ण असा हा ग्रंथ यापूर्वी अज्ञात होता. संस्कृत भाषेमध्ये शिवचरित्र विषयक असा महत्वपूर्ण ग्रंथ आहे ही गोष्ट सुमारे ४०-५० वर्षां-

पूर्वी इतिहास पंडितांना ठाऊकदेखील नव्हती. पुण्याच्या भारत इतिहास संशोधन मंडळाचे कार्यवाह श्री. स.म. दिवेकर यांनी मोठया परिश्रमाने हा ग्रंथ शोधून काढला. हा ग्रंथ कसा आढळला यासंबंधी श्री. दिवेकरांनी केलेले आत्मनिवेदन मोठे उद्बोधक आहे. त्याचा सारांश असा की, बालपणी शाळेमध्ये शिवाजी हा निरक्षर, चोर, लुटारू होता असे शिकविण्यात येत होते. इंग्रज व मुसलमान लेखकांनी शिवचरित्राविषयी असेच निर्गल लिखाण करून ठेवलेले आहे. ते वाचून शिवाजीसारख्या पुण्यपुरुषाचे चरित्र प्राचीन ग्रंथ व पत्रसंग्रह वाचून नीट जाणावे, अशी इच्छा त्यांच्या अंतःकरणात बळावली. अनेक प्राकृत व संस्कृत ग्रंथाचे वाचन करीत असताना तंजावरच्या सरस्वती महाल लायब्ररीमध्ये त्यांनी प्राचीन ग्रंथ हुडकण्यास आरंभ केला. कर्नाटकात शिवाजी महाराजांनी अनेकदा आक्रमणे केलेली होती. समर्थ रामदासांनीहि कर्नाटकामध्ये अनेक मठ स्थापन केलेले होते. म्हणून कर्नाटकातील ग्रंथालयांमध्ये शिवचरित्रविषयक प्राचीन अधिकृत ग्रंथ असला पाहिजे अशा श्रध्देने श्री. दिवेकरांनी संशोधन सुरू केले. शेवटी तंजावरच्या ग्रंथालयात भूर्जपत्रावर तामिळ भाषेमध्ये लिहिलेला ` शिवभारत ` नांवाचा एक तामिळ ग्रंथ त्यांना आढळला. या तामिळ ग्रंथाचे अनुवाद करून भाषांतर करवून त्यांनी वाचन आरंभिले. या वाचनातून एक गोष्ट त्यांच्या लक्षात आली ती ही की, हा ग्रंथ मुळातला संस्कृतातला असून त्याचा लेखक परमानंद नांवाचा महाराष्ट्रीय पंडित होता. हा मूळ संस्कृत ग्रंथ कसा वाचावयास मिळेल याची त्यांना तळमळ लागली. जर्मनीतल्या ओरिएन्टल सोसायटी (लिप्झिक) या संस्थेशी त्यांनी पत्रव्यवहार सुरू केला.

त्या संस्थेत हस्तलिखितांचा फार मोठा संग्रह असून त्याची एक प्रचंड सूचीहि या संस्थेने प्रकाशित केलेली आहे. पुण्याच्या आनंदाश्रमात श्री. दिवेकरांना ही ग्रंथसूची पाहावयास मिळाली. तीमध्ये कवीन्द्र परमानंदकृत

शिवभारताचा उल्लेख त्यांना मिळाला. इ.स. १८७९ मध्ये बर्नेल नांवाच्या इंग्रज सूचीकाराने केलेल्या ग्रंथसूचीमध्ये सुध्दा या शिवभारताचा उल्लेख व क्रमांक आढळला. एवढया माहितीच्या आधारे हा संस्कृत ग्रंथ तंजावरच्या ग्रंथालयामध्येच आहे. हे निश्चित ठरले. यानंतर ९ महिन्यांनी मूळ ग्रंथाची हस्तलिखित नवीन आवृत्ती श्री. दिवेकरांना वाचावयास मिळाली. त्यावरून तामिळ भाषेतील ` शिवभारत ` हे या मूळ ग्रंथाचे भाषांतर होते, ही गोष्ट सिध्द झाली. हा श्री. दिवेकरांनी सांगितलेला शिवभारताचा वृतांत फारच उद्बोधक आहे. अशाप्रकारचे सहस्त्रावधी उत्कृष्ट संस्कृत ग्रंथ आमच्या देशांत किंवा परदेशांत अद्यापि उपेक्षित अवस्थेत पडलेले आहेत.

हे परमानंद कवि एकदा तीर्थयात्रेच्या निमित्ताने काशीला गेले असताना तेथील विद्वान पंडित त्यांच्याभोवती छ.शिवाजी महाराजांचे चरित्र ऐकण्याच्या इच्छेने गोळा झाले व म्हणाले, " जो राजगडचा अधिपति राजा ह्या पृथ्वीवर राज्य करीत आहे. तुळजाभवानीच्या प्रसादाने ज्याला राज्यप्राप्ती झाली आहे. जो महातपस्वी, विशेषाकरून विष्णूचा अंश व अष्टदिक् पालांचा अंशभूत आहे. जो बुध्दिमान, प्रसन्नचित्त, प्रतापी, जितेंद्रिय, भीमापेक्षाहि महाभयंकर आणि सर्व धनुर्धरांचा मुकुटमणि आहे तसेच जो शहाणा, उदारचरित, वैभवशाली, अद्भूत, पराक्रमी, ज्ञानी, कृतज्ञ, पुण्यवान, आत्मसंयमी व गुणांनी प्रख्यात आहे. जो सत्यवक्ता, अति चतुर श्रोता, देव, ब्राह्मण आणि गाई यांचा त्राता. दुर्दम्य यवनांचा काळ, शरणागतांचा रक्षक, प्रजेचे प्रिय करणारा आहे. अशा त्या शिवाजी राजाचे जे अनेकाध्यायात्मक चरित्र आपण एकवीरा देवीच्या प्रसादाने प्रसिध्द केलेले आहे. ज्यातील शब्दरचना उत्कृष्ट आहे, जे अद्भूत असून, अर्थगांभीर्याने भरलेले आहे. जे माधुर्यादि गुणांनी युक्त, अलंकारांनी विभूषित, धर्मशास्त्र आणि राजनीति यांनी परिपूर्ण आणि ज्यांची जणू काय नवे

पुराण म्हणून सर्व लोकांत प्रसिद्धी झाली आहे. जे समस्त दोषांपासून मुक्त आणि सर्वनिजलक्षणांनी युक्त आहे, असें ते सर्व चरित्र हे सर्वज्ञ व स्तुत्याचरणी ब्राह्मणा, आम्हांस सांग. "

(अध्याय १ ला, श्लोक क्र. ११ ते १९)

नंतर कवीन्द्र परमानंदाने त्यांना ' दुर्दान्तयवनान्तक ' शिवरायाचे 'कलिकल्मषहारि ' चरित्र सांगितले. हे शिवभारत आपण का लिहिले यासंबंधी कवीन्द्र म्हणतात -

" यो ऽ यं विजयते वीर: पर्वतानामधीश्वर: ।
दाक्षिणात्यो महाराज शाहराजात्मज: शिव: ।।
साक्षान्नारायणस्यांश: त्रिदशद्विषदारण: ।
स एकदात्मनिष्ठं मां प्रसाद्येदमभाषत ।।
यानि यानि चरित्राणि विहितानि मया भुवि ।
विधीयन्ते च सुमते तानि सर्वाणि वर्णय ।। "

" जो हा वीर, गडांचा अधिपति, दक्षिणेतील महाराजा, प्रत्यक्ष विष्णूचा अवतार, यवनांचा संहारकर्ता, शहाजी राजाचा पुत्र, शिवाजी विजयशाली झाला आहे. तो एकदां मला ब्रह्मनिष्ठास विनंती करून म्हणाला की, ' हे सुमते, जी जी कृत्ये मी या पृथ्वीवर केली आहेत व करीत आहे या सर्वांचे तूं वर्णन कर. " अध्याय १ ला, श्लोक २४, २५, २६).

शिवाजी महाराजांचा हा आदेश शिरोधार्य मानून कवीन्द्र परमानंद शिवभारत लिहावयास उद्युक्त झाले व त्यांनी ३१ अध्यायांचा हा ग्रंथ लिहिला.

शिवभारत या नांवावरूनच हा ग्रंथ महाभारताच्या तोडीचा आहे, हे कवींद्र परमानंदाने सूचित केलेले आहे. महाभारतात ज्याप्रमाणे भीम, अर्जुन इ. महावीरांच्या विक्रमकथा वर्णिलेल्या आहेत त्याप्रमाणे या शिव-भारतातसुध्दा भीमपराक्रमी शिवाजी महाराजांच्या विक्रमकथा वर्णिलेल्या आहेत. हे कवींद्राने शिवभारत या नावावरूनच ध्वनित केलेले आहे. त्याचप्रमाणे हा ग्रंथ पुराणग्रंथासारखा आहे हे सूचित करण्यासाठी प्रत्येक अध्यायाच्या शेवटी " इति अनुपुराणे सूर्यवंशे कवीन्द्र परमानंद प्रकाशितायां शतसाहस्त्र्यां ......" हे वाक्य कवींद्राने लिहिलेले आहे. पहिल्याच अध्यायात ` पुराणमिवनूतनं ` असा आपल्या ग्रंथाचा उल्लेख केलेला आहे. पण पुराणांची अठरा ही संख्या निश्चित असल्यामुळे हे नवीन १९ वे पुराण नाही हे सूचित करण्यासाठी आपल्या ग्रंथाला ` अनुपुराण ` असे नांव दिलेले आहे.

शिवभारतांत रघुवंश, किरातार्जुनीय यासारख्या महाकाव्यात आढळतात त्याप्रमाणे निरनिराळ्या प्रकारची हृदयंगम वर्णने आढळतात. आपल्या महाकाव्यातील वर्णनीय विषयांचे स्वरूप कवीन्द्राने पुढील शब्दांत सांगितलेले आहे.

" ज्यामध्ये शंभु महादेव आणि दुष्ट असुरांचा निःपात करणारी तुळजा भवानी यांचा महिमा वर्णिला आहे. धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे चार पुरूषार्थ आणि तीर्थे यांचेहि माहात्म्य ज्यात सम्यक् रीतीने कथिले आहे. या पृथ्वीवर ज्याचा अवतार यवनांच्या विनाशाकरिताच झाला त्या शिवाजीने यवनांबरोबर केलेल्या युध्दाचे वर्णन ज्यात आहे, देव, ब्राह्मण, आणि गाई यांचा महिमा आणि राजांची पवित्र व अद्भुत चरित्रेही ज्यात वर्णिली आहेत हत्ती, घोडे आणि दुर्ग यांची संपूर्ण लक्षणे आणि शाश्वत, राजनीति यांचेहि ज्यात वर्णन आहे, असे त्या पवित्र सूर्यवंशाचे आरंभापासून मी वर्णित

असलेले चरित्र, सर्वांनी लक्ष देऊन ऐकावे." (अध्याय १ ला, श्लोक ३६, ३७, ३८, ३९).

सहाव्या अध्यायामध्ये परमानंद कवीने केलेले शिवजन्माचे वर्णन खरोखरच रसिकांना अत्यंत आनंद देणारे आहेत. त्याप्रमाणे जिजाबाईच्या डोहाळ्याचे वर्णन सूचक व मार्मिक आहे. (अध्याय ६ वा श्लोक १५, १६, १७, १८).

आ मारलावण्यमयं स्वर्णवर्णमनामयम् ।
कमनीयतम प्रवमुळात स्कन्ध मण्डलम् ॥ २९ ॥
अलिकान्तभिलत्कान्तकुन्तलाग्र विराजितम् ।
सरोजसुन्दरदृशं नवकिंशुकनासिकम् ॥ ३० ॥
सहजस्मेरवदनं घनगम्भीर निःस्वनम् ।
महोरस्कं महाबाहुं सुषावे साऽद्भुतं सुतम् ॥ ३१ ॥

इत्यादी श्लोकात केलेले नवजात बालशिवाजीचे वर्णन त्याचे रूप प्रत्यक्ष डोळ्यापुढे उभे करील इतके चांगले आहे. याच अध्यायात आणखी एका ठिकाणी कवीने केलेले बालशिवाजीचे रूपवर्णन व जातकवर्णन केलेले आहे. ते कोणत्याही रसिकाला वारंवार वाचावेसे वाटेल इतके ते उत्तम आहे. सातव्या अध्यायातील शिवाजीचे वर्णन प्रस्तुत प्रकरणात उल्लेखित न करणे दोषास्पद ठरेल, इतके ते सुंदर आहे.

" इंद्राचे इष्ट कार्य करण्यासाठी प्रत्येक युद्धात दैत्यास अनेकवेळा मारून जो शस्त्र उपसलेला विष्णू जणू काय थकून जाऊन क्षीरसमुद्रामध्ये निद्रा घेतो तो आईचे दूध पिण्यासाठी रडत असे. बाललीला करणारा तो बालक पाचेच्या भूमीवर रांगत असता तीत आपले प्रतिबिंब पडलेले पाहून ते

जोराने पकडू पाहात असे. तो गुडघ्यावर रांगत असतां त्याच्या पायाच्या तळव्याच्या लालीच्या योगाने अंगणातील स्फटिक माणकासारखे दिसत. धुळीने अंग भरून घेऊन तो वाडयाच्या अंगणात रांगत असता पायातील रत्नांच्या वाळांचा छुमछुम आवाज मातेला रमवीत असे. रत्नमय अंगणा-मध्ये खेळताना दुडुदुडु रांगणारा तो बालक आपल्या प्रतिबिंबाशी स्पर्धा करीत असे. अहो ज्याच्या कृपेने सर्व देवांना अमृत प्राशन करण्यास मिळाले. त्याला स्वतःला मऊ माती खाऊन आनंद मिळत असे, हे आश्चर्य नव्हे काय ? ज्याने बळीस फसवून तीनहि लोकांचे तीन पावलांनी आक्रमण केले, त्या देवाला घरचा उंबरठा ओलांडण्यास प्रयास पडत. जो प्रभु स्वतः सातहि लोकांचा आधार आहे तो क्षुद्र दाईचे बोट धरून उठत असे. स्फटिकांच्या भिंतीत पडलेले सूर्याचे प्रतिबिंब पाहून ते बोटाने दाखवून ' तू आपल्या हाताने घेऊन मला दे ' असे म्हणून रडू लागे आणि वेडेपणामुळे आईकडून वेडयासारखे हसे करून घेई,. याप्रमाणे ' खा ' म्हटले तरी खात नसे ' पी ' म्हटले तरी पीत नसे आणि दायांनी त्यास आळवून ' नीज ' म्हटले तरी निजत नसे. " शिवाजीच्या बाललीलांचे हे वर्णन वाचून कोणत्याही रसिकाचे अंतःकरण वात्सल्यरसाने भरून आल्यावाचून राहणार नाही. (अध्याय ७ वा, श्लोक ५, ७, ९, १०, ११, १२, १८, २०, ३२, ३४).

सोळाव्या अध्यायातील शिवराज व सुवर्णशर्मा (सोनोपंत) यांचा राजनीतिविषयक संवाद अत्यंत उद्बोधक आहे. सतरा ते बावीस या सहा अध्यायात अफझुल्लखानाच्या वधाचे प्रकरण सविस्तर वर्णिलेले आहे. त्यांतील २० व्या अध्यायात आलेले तुळजाभवानीचे वर्णन वाचीत असताना भवानीची मूर्ति प्रत्यक्ष मनश्चक्षुपुढे उभी राहते. ते वर्णन असे, " जणू काय टवटवीत कल्पलताच समोर उभी आहे अशी रत्नालंकारयुक्त, आरक्त-चरणा, सोन-

चापयाच्या फुलाप्रमाणे कांतिमान, झगझगीत नीलवस्त्र परिधान केलेली, काळ्या कुचडयाच्या खोप्याने शोभणारी, अत्यंत सुकुमार कुमारीचा वेष धारण करणारी, पूर्णेंदुप्रमाणे सुंदर मुख असलेली इंदीवराप्रमाणे (नीलकमल) प्रमाणें सुंदर नेत्र असलेली, मंदस्मित करणारी, नव्या पोवळ्याप्रमाणें लाल ओठ असलेली, तेजस्वी कुंकुमतिलक लावलेली, रत्नजडित कर्णभूषणे घातलेली, सुंदर नासिकेत चित्र विचित्र रत्नजडित नथ घातलेली, कोमल भुजा असलेली कमळाप्रमाणे हात असलेली, नाजूक बोटे असलेली, रत्नांच्या तेजाने चमकणाऱ्या बांगडया घातलेली, रत्नांच्या शुभलक्षणी, गळ्यात मोत्यांचे अनेक पदरी लहानमोठे हार व रत्नांची कंठी घातलेली, जरीच्या फुलांची काळी चोळी घातलेली, नाभीपर्यंन्त लोंबणारा हार घातलेली, रत्नजडित कमरपटयानें शोभणारी, वरदात्री अशी ती विश्वमाता राजाने पाहिली."
(अध्याय २० वा, श्लोक २ ते ८).

अफझुल्लखानाच्या वधासाठी निघालेल्या शिवाजीचे वर्णन २१ व्या अध्यायात पुढीलप्रमाणे आहे.

" उष्णीषेणैव शुचिना व्यथादुत्तंसधारिणा ।
काश्मीरज - पृषाद्वर्ण - रज्जितेनाङ्ग.गिकेन(इ.) च ।। १९ ।।
शिववर्मा भृशाबल: संवृतशिववर्मणा ।
तस्य वज्राशिरस्य किं कार्यं तेन वर्मणा ।। २० ।।
कृपाणपाणिनैकेन ध्रियमाणोऽन्येन पट्टिशम् ।
स नन्दकगदाहस्त: साक्षाद हरिरदृश्यत ।। २१ ।।

" उत्तम कवच घातलेला, शिवाजी राजा भोसला, तुरा खोवलेल्या शुभ्र पगडीने व केशराचा शिडकाव मारलेल्या अंगरख्याने फारच शोभत

होता. त्या वज्रकायास या कवचाची काय गरज ? एका हातात तलवार आणि दुसऱ्या हातात पट्टा धारण करणारा तो शिवाजी राजा, नंदक, खड्ग व कौमोदकी गदा धारण करणाऱ्या प्रत्यक्ष विष्णुप्रमाणे दिसत होता. " या वर्णनावरून त्या प्रसंगाची शिवाजीची प्रतिमा यथार्थपणे मनश्चक्षापुढे उभी राहते. संपूर्ण शिवभारतात अशाप्रकारची हृदयंगम वर्णने प्रत्येक अध्यायात वाचावयास मिळतात. तथापि शिवभारताचे खरे महत्व काव्यदृष्टया नसून ऐतिहासिकदृष्टया आहे. शिवचरित्राचा एक अत्यंत विश्वासार्ह पुरावा म्हणून या ग्रंथाकडे पाहिले पाहिजे.

काव्यदृष्टया या ग्रंथाकडे पाहिले असतां ' माधुर्यादिगुणोपेतमलंकारैरलंकृतम् ' या वाक्याने आपल्या ग्रंथाची काव्यात्मकताही कवीने स्पष्ट सांगून टाकली आहे. शिवाजी महाराजांच्या स्वभावरमणीय चरित्राचे रमणीयत्व अधिक वाढविण्यासाठी कवींद्राने हा ग्रंथ रघुवंशाप्रमाणे काव्यमय केलेला आहे.

शेवटचे ४-५ अध्याय सोडून बाकीचे सर्व अध्याय संबंधचे संबंध सरळ धावत्या अनुष्टुप वृत्तांत रचलेले असून प्रत्येकाचा शेवटचा श्लोक तेवढा कोणत्या तरी दीर्घ वृत्तांत गुंफलेला आहे.

२४ व्या अध्यायांतील ५८ ते ७१ श्लोक प्रहर्षिणी वृत्तांत असून पुढील श्लोक मालिनी, शार्दूलविक्रीडीत, शिखरिणी, वसंततिलका वृत्तांत आहेत. २८ व्यांतील शेवटचे ८-१० वयांतील शेवटचे १५, ३१ व्यांतील शेवटचे ५ श्लोक पुष्पिताग्रा, हरिणी, स्त्रग्धरा, उपजाति, उपेन्द्रवज्रा, स्त्रोध्दता, वसंततिलका, मालिनी, प्रहर्षिणी अशा विविध वृत्तांत असून ३२ व्या अध्यायातील आरंभापासून सर्व श्लोक वियोगिनी (रघुवंशाच्या

आठव्या सर्गाचे वृत्त) या वृत्तात आहे. या विविध वृत्त वैचित्र्यामुळे शिवभारताच्या मोहकत्वात कर्णमाधुर्याचीहि भर पडलेली आहे. ` सर्गान्ते भिन्नवृत्तं स्यात् ` हा महाकाव्याचा संकेत सर्वत्र कटाक्षाने पाळलेला आहे.

शिवाय हे कर्णमाधुर्य अनुप्रास व यमक या शब्दालंकाराचा मार्मिकतेने उपयोग करून साधलेले आहे, उदाहरणार्थ,

प्रतापता पितारातिं धराधिपति मण्डलः । -१-४७
विकरालं महाकालं करवालं करे वहन् । ११-२९
क्रूरः करिकराकारकरः प्रतिभयस्वरः । -२९-६०
चण्डेन भुजदण्डेन दण्डितारातिमण्डलः । - २९-६०
सुखं सुप्तौ निजगृहे तदौ निजगृहे रिभिः । -१६-७

यासारख्या उदाहरणातून कवीद्राचे शब्दालंकार नैपुण्य उत्तमप्रकारे व्यक्त होते. शिवाजीसारख्या वीरपुरुषाचे चरित्र हा या काव्याचा विषय असल्याने स्वाभाविकपणेच संपूर्ण काव्य वीररसप्रधान आहे. वीररसाचे उद्दीपन ओजोगुणावाचून होत नाही. त्यादृष्टीने प्रस्तुत काव्यातील ओजोगुणांची उदाहरणे -

" पाशैः प्रासैश्चन्द्रहासैः पट्टिशैश्चापरश्वधैः ।
मुद्गरैः परिघैस्तद्वत त्रिशूलैस्तोमरैरपि ।।
गदाभिः शक्तिभिश्चापि निषङ्गैरिषुपूरितैः ।
खेटकैः चापि चक्रैश्च छुरिकाभिः कटारकैः ।।

यासारख्या २२ व्या अध्यायातील १०-१५ श्लोकांमध्ये पहावयास मिळतात.

अर्थ

अर्थालंकाराची उदाहरणे :

उपमा -

" निर्मदा इव मातङ्.गा: निर्विषा इव पन्नगा: ।
निष्पणाषा इवं नरा: नि:शृङ्.गा इव भूधरा: ।। "

उत्प्रेक्षा -

" तदा हेत्कियं तद्वपरिप्रायता ऽमुना ।
परितो विततकार: प्राकार: किमकारिन ।। "

दृष्टान्त -

" नावज्ञेया: खलु ज्ञेन वरामा अपि विद्विषा: ।
प्रशाम्यते पतङ्.गेन प्रज्वलन्नापि दीपक: ।। "

अर्थान्तरन्यास -

" नूनं पिपीलको ऽप्यर्क प्रविश्य करिण: करम् ।
भ्रात्यन्तकरस्तस्मादल्यं मन्येत नो परम् ।
तदनु शिवनृपस्तं प्राप्तभङ्.गं पुरस्तात ।
प्रसभमपसरन्तं हन्तुमं ,ास्तमुच्चै: ।।
निकटगमपि नैव न्यग्रहीन निग्रहार्हम् ।
न हि विदधति भीरौ शूरतां सूर्यवंश्या: ।। "

यासारख्या अलंकाराप्रमाणेच

" सहायपरिहीनेन नरेणेह न केनचित् ।
अर्थः समर्थसामर्थ्यात व्रजेन सामर्थ्यमात्मनः ।
असमर्थाश्रितस्त्वर्थो नार्थो ऽ नर्थो हि केवलम् ।
न हि साहसमात्रेण सिध्दिमायान्त्युपक्रमाः ।
अलं फलाय महते सनयाः किल विक्रमाः ।। "

यासारखी उत्तम सुभाषितेही प्रस्तुत महाकाव्यात विखुरलेली आहेत.

आठव्या अध्यायात ५८ व्या श्लोकापासून कालाचे माहात्म्य वर्णित असताना ६४ ते ७० श्लोकामध्ये आणि १२ व्यात यशोमाहात्म्य स्तवीत असताना ६९ ते ७३ श्लोकामध्ये भाषेचा अप्रतिहत प्रवाह पाहावयास सापडतो.

परमानंदाची वर्णनशैली ही प्रसादयुक्त व मनोवेधक आहे, याचे प्रत्यंतर शिवाजीची शिशुलीला (अध्याय ९), रायबागिणीचे भाषण (अध्याय १९), शिवस्वरूप वर्णन (अध्याय २०), व्यवहार निरीक्षण (अध्याय ११), समरभूमी वर्णन (अध्याय २१, २२), वगैरे प्रसंगी दिसून येते. बहारीची वर्णने ग्रंथभर आहेत. शिवभारताची म्हणूनच काव्यदृष्ट्या फार मोठी योग्यता आहे. कवीचे भाषाप्रभुत्व, अपार शब्दसंपत्ति, ओजस्वी व प्रसादयुक्त वर्णनशैली इ. अलौकिक गुणांवरून परमानंद हा कवींद्र या पदवीस पूर्णपणे पात्र आहे.

काही शब्दांचे संस्कृत रूप पाहण्यासारखे आहे. अजबर्देश - ऊजबेग, इंगाल-इंगळे. इंदिरापुर - इंदापूर, जंभाजित - इंद्र, कमलजित सौलाक्षिक - कमळोजी साळुंखे, कार्णाटकः - कर्नाटकः, कर्णपूर - कर्णूल, करहाट - क-हाड, खंडार्गलः - खंडागळे, तानजित् मल्लसूरः - तानाजी मालुसरे, नागराज - नागोजी, घाण्टिकः - घाटगे, चाहुबाणाः- चव्हाण,

बोल - चंपावती, माहिला जवि: - जिवा महाला यासारख्या पुष्कळ शब्दांचे संस्कृतीकरण केलेले आढळते.

राजगडाचा अधिपति असलेल्या शिवाजीचे चरित्र आपणास सांगा अशी विनंती आपल्याला काशीस्थ पंडितानी केल्याचे परमानंद ग्रंथाच्या सुरूवातिलाच ज्या अर्थी सांगतो त्याअर्थी त्याने आपला हा ग्रंथ रायगड ही राजधानी होण्यापूर्वी म्हणजे इ.स. १६७१ पूर्वी लिहिला, हे निश्चित ठरते. शिवाजीची कीर्ति आग्र्याच्या सुटकेनंतर हिंदुस्थानात सर्वत्र पसरली. अफझुल्लखानवध, शास्ताखानावरील हल्ला, सुरतेची पहिली लूट, व आग्र्याहून सुटका हे रोमांचकारी व अद्भुत वाटणारे प्रसंग १६६८ इ.स. पूर्वी घडलेले होते. त्यामुळे इ.स. १७६८ नंतर पण इ.स. १६७१ पूर्वी शिवाजीने आपले चरित्र परमानंदास लिहावयास सांगणे व त्याने ते लिहिणे सहज शक्य वाटते. शिवभारताच्या पहिल्या अध्यायातील ११ ते १९ या श्लोकातील माहिती खरी मानली तर त्यावरून दोन गोष्टी सिद्ध होतील. एक म्हणजे परमानंदाने प्रथमच त्याचा ग्रंथ रचला व नंतर केव्हा तरी तो काशीस गेला असता ज्यांनी शिवाजीच्या पराक्रमाविषयी व परमानंदाने त्यावर काव्य केल्याबद्दल नुसते कानाने ऐकले होते, अशा ब्राह्मणांनी ते चरित्र आपणांस सांगण्याविषयी त्यास विनंती केली. परमानंदाचे वर्णन अगदीच कविकल्पना मानता येणार नाही. तो काशीस्थ पंडित असल्याचा उल्लेख इ.स. १६६४ मध्ये राजापूर येथे धर्मनिर्णयार्थ मोठी सभा भरली होती. तिच्या निर्णयपत्रांत आहे. (भा.इ. सं.मं. १८३५ चे इत्त्वृत - शिवकालीन शास्त्रीपंडित) त्याचप्रमाणे सर यदुनाथांनी " House of Shivaji " मध्ये दिलेल्या २७ डिसेंबर १६६६ च्या पत्रात तो बनारसला जाणार असल्याचा उल्लेख आहे. मात्र त्याप्रमाणे तो बनारसला गेला असावा असे वाटते. त्याला औरंगजेबाच्या रजपून

सरदारांनी एकदां पकडले, पुन्हा सोडले, पुन्हा धरले वगैरे माहिती सरकारांनी प्रसिध्द केलेल्या वरील पत्रातच आहे. तेंव्हा पुन्हा पुन्हा येणारी मोंगल अंमलदाराची ब्याद टाळण्याकरिता तो स्वराज्यात परत येणेच जास्त संभवनीय वाटते. इ.स. १६६७-६८ ही साले शिवाजीच्यादृष्टीने बरीच शांततेची गेली. कारण आदिलशहा व मोगल या दोघांशीहि त्याचे तह झाले होते. तेंव्हा परमानंदाने काव्य लिहिण्यास व शिवाजीने स्वस्थपणे ऐकण्यास हा काळ योग्य होता. इ.स. १६६८ च्या उत्तरार्धात केंव्हा तरी परमानंद काशीयात्रेला गेला असेल व आपले काव्य काशीस्थ पंडितांना ऐकविले असेल. इ.स. १६६९ मध्यें औरंगजेबाने काशीविश्वेश्वराचे मंदिर फोडल्यानंतर तो बहुधा वैतागाने स्वराज्यात परत आला असण्याची शक्यता आहे.

या काव्यातून ऐतिहासिकदृष्टया निश्चित करावयाच्या गोष्टी -

१) मालोजीस शाहजी व शरीफजी हे दोन पुत्र शंकराची उपासना केल्यामुळे झाले (अध्याय १ । ७२-७४) मात्र सिध्द पुरूषाने सांगितल्याप्रमाणे शरीफजी ही दोन्ही नांवे सिध्दांची होती असे तोच शिवभारतकार म्हणतो. (अ. १ । ८९,९०) ?

२) शहाजीस पांचवे वर्ष लागले असतां मालोजी निजामशहाच्या बाजूने इंदापूरच्या लढाईवर गेला व तेथे मृत्यु पावला. (अध्याय २।१,५) ?

३) जाधवरावाने आपण होऊन जिजाबाईचे लग्न शाहजीशी लावले (अध्याय २।४४) ?

४) खंडागळे हत्ती प्रकरण खरे की बखरीतील शाहजी-जिजाबाई लग्नाची हकीकत खरी (अध्याय ३) ?

५) खंडागळे हत्ती प्रकरणावरून निजामशाह लखूजीवर रागावला व त्याने मनांत कपट योजिले, म्हणून लखूजी मोंगलाकडे गेला (अ.४-३,४) ?

६) भातवडीच्या युद्धांतील वीरांची नांवे (अ. ४।१०५४-५७, ५९-३०) ?

७) शाहजी पहिल्यांदा आदिलशहास मिळाला, तेव्हा त्याने कर्नाटक व केरळ प्रांत जिंकला (अ. ५।१९) ?

८) शाहजीच्या पुष्कळ स्त्रिया असूनही, जिजाबाईनेच त्यांचे मन काबीज केले होते ?

९) शिवाजी सात वर्षांचा असताना बंगळोरला होता व तेथे त्या वयात मुळाक्षरे शिकला (अ. ९।६९-७०) ?

१०) महमद आदिलशहाच्या आज्ञेवरून मुस्तफाखानाने शहाजीस कैद केले (अ. ११।११ अ. १५।५-१३) ?

११) शाहजीस पकडताना मुस्तफाबरोबर आलेल्या सरदारांची नांवे (अ. १२।४-७, १६-१९, ५७-५९) ?

१२) इ.स. १६४८ पूर्वी शिवाजीने जावळी घेऊन तेथे चंद्ररावाची स्थापना केली. (अ.१३।४३) ?

१३) बेलसर व शिरवळ येथील लढयात बाजी पासलकर व सर्जेराव जेधे यांचा उल्लेख नाही. (अ.१३) ?

१४) पुत्र व अमात्य यासह चंद्रराव मोऱ्यास शिवाजीने पकडून आणण्यास सांगितले (अ.१७।१६) ?

१५) अशी आदिलशहाने अफझुलखानास शिवाजीस पकडून आणण्यास सांगितले (अ. १७/३१) ?

१६) चंद्रराव मोरे, त्याचे पुत्र दाजी व कृष्णाजी यांना शिवाजीने युद्धात ठार केले व चंद्ररावाचे नातेवाईक कापून काढले. प्रतापराव मोरे आदिलशहाकडे पळून गेला व अफझुलखानाच्या स्वारीत त्याने आदिलशहास मदत केली. (अ.१८/४-१४) ?

१७) कल्याण-भिवंडी घेऊन शिवाजीने तेथील यवनांच्या मशिदी जमीनदोस्त केल्या व तेथील यवनाधिपतीस पकडले (अ. १८/५२,५४) ?

१८) अफझुल्लवधापूर्वी शिवाजी चक्रवर्ती राजांची चिन्हे धारण करीत होता व सुवर्णसिंहासनावर बसत होता. (अ. १८/४५-५७.

१९) तुळजापूरच्या भवानीचा अफझुलखानाने अपमान केला. (अ.१८/१९,२८-२०-२१) ?

२०) शिवाजी व अफझुल्लखानाने भेटीसमयी दहा-दहा सैनिक बरोबर आणावे असे ठरले (अ. २१/३-८) ?

२१) अफझुल्लवधानंतर शिवाजीने कऱ्हाड व कोल्हापूर आपल्या ताब्यात आणले (अ. २३/६९-७०).

२२) कोल्हापूर नजीक शिवाजीने रुस्तुमजम्याचा पराभव केल्यानंतर नेताजीने घेतलेली गांव (अ. २५-४-९) ?

२३) रायबागीण ही उदारामाची बायको व जगजीवनाची आई (अध्याय २५/५२).

२४) शास्ताखानाच्या बरोबरच्या मोगल सरदारांची नांवे (अ.२५/२६-५५).

२५) बाजी-प्रभु देशपांडयांचा उल्लेखहि नाही. (अ.२६) ?

२६) पन्हाळ्याहून विशाळगडास जाण्यापूर्वी शिवाजीने सिद्दी जौहारास द्वंद्वयुद्धाचे आव्हान दिले. (अध्याय २७/५,६,७).

२७) पालवणाचा राजा जसवंतराव, श्रृंगारपुरचा राजा सूर्यराव वगैरेनी इ.स. १६६६० मध्ये शिवाजी पन्हाळ्याहून पळण्यापूर्वीच विशाळगडास वेढा दिला होता. (अ. २७/२६-२८) ?

२८) अफझुल्लखानास शिवाजीने तलवारीने मारले (अ.२१/ ३९, ४०) ?

(संकलित शिवचरित्राची प्रस्तावना व आराखडा व साधने - त्र्यं.शं. शेजवलकर - शिवभारताचे परीक्षण)

त्याचप्रमाणे श्री. य.ग. फपने-मनोहर यांनी शिवभारतातील काही स्थल चर्चा केलेली आहे. त्यातील मुद्दे पुढीलप्रमाणे :

१) मालोजी भोसल्यांचा मृत्यू शक कोणता ?

२) मालोजीच्या पत्नीचे नांव कोणते ?

३) शिवाजीच्या आईचे नांव ?

४) विठोजी भोसल्यांच्या आठव्या पुत्राचे नांव ?

५) नृसिंह पिंगळे हा ब्राह्मण सरदार मोरोपंत पिंगळे कुळातील कां ?

६) जाधवराव पुत्राचे नाव ?

७) शहाजीचा पहिला मुलगा संभाजी याची मुले ?

८) धारागिरीचा वेढा ?

९) शिवाजीचे लग्न व सईबाईचे कुळ ?

१०) बळजित भोसल्याचे नाव ` तळजित् ` हे चुकीचे नांव ?

११) अफझुल्लखान प्रसंग ?

१२) त्र्यंबकराज यांचे नांव ?

१३) शिवपत्तन नेमके कोणते ?

१४) अफझुल्लखान कपट ?

१५) अफझुल्लखानाच्या वधासाठी शिवाजीची तयारी व आक्रमण वर्णन ?

१६) जावळीचा हल्ला ?

१७) जावळी ?

१८) प्रतापगड ?

१९) प्रतापराव मोरे ?

२०) पन्हाळा शक ?

२१) विशाळगड आरोहण ?

२२) पन्हाळा ते विशाळगड - नकाशा ?

२३) मोगल सैन्याचे आक्रमण ?

२४) उंबरखिंडीचे युद्ध ?

२५) तुंगारण्यपति मित्रसेन ?

२६) मोर संस्थानातील पल्लीवन ?

२७) व काही पाठभेद यांच्याविषयी फडके यांनी सविस्तर शंका मांडून ऐतिहासिक अभ्यासकांना एक दिशा दाखविली आहे.

(भा.इ.सं.मं. स्वीय ग्रंथमाला क्र.८४, ऐतिहासिक संकीर्ण निबंध - खंड ५ वा - शिवभारतातील कांही स्थल-चर्चा, श्री.य.ग. फडके, मनोहर).

याबरोबरच भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिर, पुणे येथे असलेल्या श्री. देवीसिंग चौहाण यांच्या लेखसंग्रहात एका लेखांमध्ये समकालीन उर्दु कवी नुसरती व परमानंद यांच्याबाबत तुलनात्मक लेख लिहून दोघांची निरनिराळी भूमिका स्पष्ट केली आहे. दोघेही समकालीन असून दोघेही महाकवी होते व दोघांनाही राजाश्रय होता. नुसरतीने अलीनामा व परमानंदाने शिवभारत या ऐतिहासिक काव्याची रचना केली. दोघेही चांगल्या वरच्या दर्जाचे कवी होते. विलोभनीय हृदयाविष्कार व इतिहास-लेखन व सुंदर कल्पना यांमध्ये दोघेही एकमेकांना हार जाणारे नाहीत. तरीसुध्दा दोघांमध्ये वेगवेगळे विशेषत्व व स्वतंत्र बाणा आहे. या दोघाही महाकवींनी छत्रपतींविषयी आपला जो अभिप्राय व्यक्त केला आहे, त्यातून त्यांचे वेगळेपणा दिसून येते. तो अभिप्राय पुढीलप्रमाणे नुसरती म्हणतो की,

" सिव्या कर जो यक फित्ना अंगेज था ।
बडा चोर मौजी व खूरेज था ।
दकनकी अमीं बीच तुख्मे फितसाद
जो पे-या सो अक्ल यही बदनिहाद । "

त्याच्या मते शिवाजी एक बंडखोर, अशांतता माजविणारा, चोर, दुष्ट, रक्तपिपासू, भांडणाचे बीज पेरणारा, दुष्ट व दख्खनी अशांततेचा जनक होता.

तर परमानंद म्हणतो की,

" हत्वा म्लेच्छकुलं स्वबाहुविभवैराक्रम्य तन्मण्डलं ।
स्वाराज्यं शुभदं जनाय च महाराष्ट्राय दत्वा स्थितम् ।।
धत्ते पोत्विणाजनैर्धनदतां यस्यान्तिके सागरः ।
तस्मिन् रायगिरौ व्यराजततरां छत्राधिपालः। शिवः ।। "

रायगिरिवर छत्रपती म्हणून शिवाजी शोभत होता. त्याने प्रजेला कल्याणकारी राज्य दिले, महाराष्ट्राला अस्मिता दिली. रायगडाला कुबेराचे वैभव प्राप्त करून दिले.

हे उद्गार त्यावेळच्या ऐतिहासिक परिस्थितीवर प्रकाश टाकणारेच आहेत. शिवाय परमानंदाच्या दृष्टीकोनातील व्यापकता, उदारपणा व दूरदृष्टी त्यांतून व्यक्त होते.

अशारीतीने संस्कृत साहित्याचा छ. शिवाजी महाराजांच्या चरित्राबद्दल विचार करीत असताना काव्यात्मक व ऐतिहासिक दोन्हीही दृष्टींनी शिवभारताची योग्यता खूप मोठी दिसून येते. म्हणून त्याचा थोडक्यात आढावा घेतलेला आहे व त्याच्या महत्वानुसार व कालानुसार ते प्रथम दर्जाचे ठरत असल्यामुळे प्रथम त्याचीच ओळख करून दिली आहे.

ब) पर्णालपर्वतग्रहणाख्यानम् :

छ. शिवाजी महाराजांचा समकालीन पं. जयराम पिण्डये याने महाराजांनी पन्हाळा किल्ल्यावर गाजविलेल्या पराक्रमाला अनुलक्षून ५ अध्यायांचे वरील काव्य लिहिले, ते लहान असले तरी ऐतिहासिकदृष्टया महत्वाचे असल्याने त्याचा परिचय मागे करून दिलेलाच आहे. " राधामाधव-विलासचंपू " हा ही ग्रंथ या लेखकाने लिहिला आहे. राधामाधवविलासचंपूमध्ये कवि स्वत: आपल्याविषयी माहिती सांगतो की,

" जामदाग्नि वत्सगोत्रसंभव: पिंडयापनामको जयरामो नाम कवि: "

सप्तशृंगीच्या समोरील मार्कंडयाच्या डोंगराखाली ह्या कवीचे गांव होते. गावाचे नाव कवीने दिलेले नाही. कवीच्या आईचे नाव ' गंगाबा ' व बापाचे नांव

' गंभीरराव.' मार्कंडेय पर्वतापासून अह्विंत पर्वतापर्यन्त जे सात किल्ले आहेत, त्याचे अध्यक्षत्व म्हणजे किल्लेदारी या गंभीररावाकडे होती. अहमदनगरच्या बहिरी निजामशहाच्या राज्याचे पुनरुज्जीवन शहाजी आपल्या पूर्ववयात करीत असता ह्या गंभीररावाशी त्याचा सहजच परिचय झालेला होता. " मार्कंडेयाह्विंतादिसप्तपर्वताध्यक्षतां अविरतं वितन्यमानो गंभीरराम इत्याभिधाप्रसिध्द: स्वामिभिर्नयनार्थं नीत: भविष्यति ।। चंदीपर्वतपुरतो मार्कंडेयोस्ति पर्वतो विपुल: । तत्रोभ्दवेन जयरामेणे ।। "

नाशिक प्रांतातील हे पिंडयाचे घराणे भोसल्यांच्या ऐकून माहितीचे व परिचयाचे असल्यामुळे शहाजी राजांनी कर्नाटकात बंगळूर प्रांती राज्यस्थापना केल्यानंतर आश्रयार्थ हा मार्कंडेय पर्वत निवासी जयराम कवि त्या प्रांती गेला. कर्नाटकातून भाट लोक रजपुतस्थानात जाण्यास परतत असत, त्यांच्या मुखातून शहाजीचे औदार्य ऐकून जयरामाच्या हृदयात शहाजीराजांच्या दर्शनाची लालसा उत्पन्न झाली. नाना देशाचे शेकडो पंडित व कवि शहाजीच्या दर्शनास जातात व परिपूर्ण मनोरथ होऊन स्वदेशी सुखाने आयु:क्रमण करतात. अशी सर्वत्र भरतखंडभर महाराजांची कीर्ति पसरली होती. त्या कीर्तिची प्रतीती पाहण्याची उत्कंठा त्या सरस्वतीपुत्राच्या मनात अंकुरित होऊन, श्री ची आराधना करण्याचा संकल्प त्याने केला. जयराम जात्याच बुध्दिमान होता. तशात त्याला सिध्दी प्राप्त झालेली होती, असेही तो म्हणतो. ज्योतिष्मती उर्फ कांगोणी म्हणून एक वनस्पती सह्याद्रीत खूप सापडते. तिचा तैलकल्प सेवन केला असता, विशेषत: सूर्यपर्वी केला असता, ब्रह्मांड भ्रमणाचा आवाज ऐकू येऊ लागतो, असे महान महान भिषग्वर्यांचे सांगणे आहे. पृथ्वी व इतर गोल अवकाशात भिंग-या-प्रमाणे परिभ्रमण करीत असता जो महान ध्वनि उत्पन्न होत असतो, तो

सामान्यजनांच्या कानास गोचर होत नाही. तो ध्वनि ज्योतिष्मति-कल्पसेवनाने ऐकू येऊ शकतो. हा कल्प इतका तीव्र आहे की, कोटयावधी मनुष्यातून एखाद्यालाच हा सहन होतो. अशा अपवादात्मक व्यक्तींच्या पंक्तीस बसण्याचा हक्क सांगणारा जयराम केवळ संस्कृत किंवा केवळ मराठी अशा एखाद्या भाषेत रचना करणारा तुटपुंजा भाषाकोविद नव्हता, तर भरतखंडातील मुख्य मुख्य दोन चार नव्हे तर तब्बल बारा भाषांचा परामर्श घेणारा अनेक भाषा धुरंधर होता. त्याने ` राधामाधवविलासचंपू ` काव्य शहाजी महाराजांच्या सांगण्यावरून त्यांच्या मनोरंजनाकरिता व कीर्तिचा पोवाडा गाण्याकरिता रचले. नायकाच्या समकालीनत्वामुळे, पुराव्याच्या दृष्टीने प्रस्तुत काव्याचे महत्व सहजच विशेष समजले पाहिजे. कोणत्याही ऐतिहासिक व्यक्तीसंबंधाने तत्समकालीन वर्णनपर लेख अनेक प्रकारचे असू शकतात. ह्या दृष्टींनी पाहता प्रस्तुत कवि द्रव्यादींच्या अपेक्षेने आश्रयदात्याच्या इच्छेवरून त्याचे स्तुतीस्तोत्र गाण्यास मुद्दाम सज्ज होणाऱ्या लेखकांच्या वर्गात पडतो, असे म्हटल्याशिवाय गत्यंतर नाही, तथापि अशा भाडोत्री लेखकांच्या लेखातून ऐतिहासिक सत्य निवडून काढण्याच्याही पध्दती आहेत. जयराम हा बोलूनचालून कवि आहे, नीरस इतिहासकार नाही, तेव्हा उत्प्रेक्षा, उपमा इ. अलंकारांनी त्याची वाणी नटली असल्यास त्यात काही नवल नाही. जयरामाची मुख्य दृष्टि अलंकार करण्याकडे असूनहि त्याने नायकाचे पराक्रम वर्णनही थोडेबहुत केले आहे व अलंकारांचे अवगुंठन एका बाजूला सारून ऐतिहासिक सत्य सांपडण्याची खात्री आहे.

शिवाजी महाराजांनी पन्हाळा किल्ला जिंकण्यासाठी केलेल्या संग्रामाचे वर्णन ` पर्णालपर्वतग्रहणाख्यानम् ` या ५ प्रकरणाच्या ग्रंथामध्ये जयराम पिंडये नांवाच्या कवीने संवादरूपाने केलेले आहे. शिवाजी

महाराजांची युद्धनीति व त्यांच्या मावळे वीरांची युद्धपद्धति यासंबंधी यथार्थ वर्णन या ग्रंथात आहे. छ. शिवाजी महाराजांचे चरित्र लिहिण्याच्या-कामी हा ग्रंथसुद्धा शिवभारताप्रमाणे थोडया अल्प प्रमाणात का होईना उपयोगी आहे.

हे संस्कृत काव्य तंजावर येथील सरस्वतीमहालात मिळाले. याचा कर्ता जयराम हा असून याचे अध्याय अध्याय ५ व श्लोकसंख्या अंदाजे ४०० आहे. पहिल्या अध्यायाच्या अखेरीस " इति श्रीमज्जयरामकविविरचिते पर्णालपर्वत-ग्रहणाख्याने शिवराजचरित्रे प्रथमो ध्याय: " असे म्हटले असल्यामुळे शिवराजचरित्रातील अनेक आख्यानापैकी हे एक आख्यान असावे असे दिसते. या ग्रंथातील अंतर्गत पुराव्यावरून देखील या कवीने अनेक आख्याने रचल्याचे दिसून येते व वरील विधानास चांगलाच दुजोरा मिळतो. या कवीने रचलेल्या ' राधामाधवविलासचंपू ' व ' पर्णालपर्वतग्रहणाख्यानम् ' या दोनच काव्याचा सध्या तरी शोध लागलेला आहे. त्याची आणखीही काव्य उपलब्ध होण्याची शक्यता आहे. कारण या कवीला १२ भाषांतून काव्ये करतां येत होती.

या काव्याचा काल निश्चित करणे हे काही फारसे कठीण नाही. कारण शिवाजी महाराजांनी शके १५९४ फाल्गुन वद्य १२ रोजी पन्हाळा घेतला, तेव्हांपासून पुढे एक महिन्याने उम्राणीजवळ बहिलोल खानाशी प्रतापराव व आनंदराव यांचे युद्ध झाले, येथपर्यन्तची हकीकत या काव्यात आलेली आहे. अर्थात शके १५९५ मध्ये हे काव्य रचले गेले असले पाहिजे. जयराम शिवाजी महाराजांच्या भेटीस गेल्यानंतर सुरतेची दुसऱ्यांदा लूट झाली, तो प्रसंग शके १५९२ च्या कार्तिकातला आहे. त्यानंतर तीन वर्षांनी व्यंकोजीकडे परत येऊन तो सर्व हकीकत सांगत आहे. त्याअर्थी या आख्यानकाव्याचा काल

शके १५९५ हाच धरला पाहिजे. म्हणून कालदृष्टया हा ग्रंथ शिवभारतानंतरचा ठरतो व योग्यतेच्या दृष्टीनेही तो शिवभारतानंतरचाच आहे.

हा आख्यान ग्रंथ जयराम व्यंकोजीस सांगत होता, त्यावेळची व्यंकोजीची मन:स्थिती लक्षात घेणे जरूर आहे. राज्याभिषेकानंतर कर्नाटकच्या स्वारीत व्यंकोजी व शिवाजी यांच्यामधील सावत्रपणाच्या संबंधास उग्र स्वरूप प्राप्त झाले. त्यापूर्वी हे काव्य लिहिले असले पाहिजे. कारण ग्रंथामध्ये

" कविर्निवेदयांचक्रे सर्वं कुशलपूर्वकम्
शृणु तावन्महाराज श्रीशिवस्याग्रजस्य ते
चरितं देववर्यस्य विष्णोरिव जगत्प्रभो: ।
कल्किनो निष्कलंकस्य दुष्टवरमर्दनम् ।।
महाराजाधिराजोऽपि शृण्वंस्तुष्टोऽभवत्पुरा
भवद्भिरपि यद्दौरी विलासाख्ये सभांतरे ।
बेंगरूलाख्यनगरे श्रुतं पूर्वार्धमादित: ।। "

व्यंकोजी म्हणाला, " होय, मी पूर्वी तुमची काव्ये साद्यन्त ऐकली आहेत. पण तुम्ही येथून गेला त्यास तीन वर्षे झाली. तेव्हा या तीन वर्षांत झालेली हकीकत सांगा. तुम्हास राजदर्शन कसे झाले ? सध्या महाराज कोणत्या गडावर आहेत ? आणि तुम्ही तीन वर्षांत काय काय केले ते ऐकण्याची माझी इच्छा आहे. "

कवि म्हणाला, " मी बारा भाषांत काव्य करू शकतो. पैकी महाराष्ट्रभाषेत मी राजगडास घेतलेले राजदर्शन वर्णन केले. नंतर शिवाजी महाराजांनी सुरत दुसऱ्यांदा लुटली, त्याचे वर्णन हिंदी व महाराष्ट्री अशा

दोन भाषेत केले, पुढे त्रिंबकगड घेऊन कारंजे लुटले, त्याचे वर्णन महाराष्ट्र व हिंदुस्थानी भाषेत केले आहे. नंतर बागलाण, अहिवंत, मार्कण्डेय, खळाजवळा, चामुंडगिरी, हरिश्चंद्र, अडसर, जीवधन, विक्रमशहाचे जवार, सोमशहांचे रामनगर वगैरे गड व संस्थाने महाराजांनी लीलेने घेतली व त्यांची नवी नावे ठेवली, हे सर्व मी प्रसंगोपात सांगेनच याची वर्णने मी केली आहेत ती आपण ऐकावी. "

परंतु व्यंकोजीने " पन्हाळ्यासारखा जबरदस्त किल्ला आमच्या राजाच्या म्हणजे आदिलशहाच्या ताब्यातून तह मोडून महाराजांनी कसा व कां घेतला हे ऐकण्याची माझी इच्छा आहे असे सांगून कवीचा विषय मर्यादित करून घेतला. यासंबंधीचे श्लोक पुढीलप्रमाणे आहेत.

" तन्न कस्मादहो किंचिदेतावत्कर्म दुष्करम्
कृतं पुनरहो उग्रं दाजीस्वामिभिरेव हि ।।
तत्कर्माशे श्रोष्यामि पश्चादन्यन्निगद्यताम् ।। "

हे काव्य व्यंकोजीने कोठे ऐकिले याविषयी काही सांगता येत नाही. तथापि शिवचरित्रातील कांही सांगता येत नाही. तथापि शिवचरित्रातील कांही आख्याने शहाजी महाराजांनी व व्यंकोजीने गौरी विलाससमेत बंगळूर येथे ऐकली. शके १५९५ मध्ये व्यंकोजी कोठे होता हे निश्चित करतां आले तर हे काव्य कोठे ऐकले हे निश्चित करता येईल.

या ग्रंथात ग्रंथित केलेल्या ऐतिहासिक माहितीचा सारांश पुढील-प्रमाणे - शके १५९१ च्या पौषात मोंगलाशी मराठ्यांचे युद्ध सुरू झाले. परंतु विजापूरकर व शिवाजी यांच्यामध्ये मात्र बिघाड उत्पन्न झाला नव्हता.

नंतर सुरतेची दुसऱ्यांदा लूट केल्यापासून सालेरी येथे युध्द होऊन जवार व रामनगर मराठयांच्या हातात येईपर्यन्त जो तीन वर्षांचा काळ लोटला, तेवढयात मोंगल अगदी जेरीस आले आणि ते आपले सैन्य घेऊन औरंगाबाद व परंडा येथे आगोटीस राहिले, तेव्हा औरंगजेबाने मोंगली सरदारांना पत्रे पाठवून त्यांची निर्भत्सना केली आणि आदिल व कुतुब यांच्यासह शिवाजीच्या मुलुखावर एकदम चाल करण्याचा हुकूम सोडला. परंतु हा हुकूम येऊन पोहोचण्यापूर्वी मोंगली सरदारांनी शिवाजी महाराजांशी तहाचे बोलणे लावणे इष्ट आहे, असे ठरवून एक ब्राह्मण वकील पाठविला. तेव्हा महाराजांनी तोडीस तोड करण्यासाठी आपल्यातर्फे काजी हैदर यास वकील म्हणून मोंगलाकडे पाठविले अशाप्रकारे बोलाचाली सुरू असताना औरंगजेबाचा हुकूम आला. तेव्हा त्याची अंमलबजावणी करण्यासाठी महाराजांच्या वकिलास मोंगली सरदारांनी परांडयास अडकावून ठेवले. यामुळे मोंगल व मराठे यांचे पुन्हा युध्द जुंपले.

याच सुमारास म्हणजे शके १५९४ च्या मार्गशीर्षात अल्ली आदिलशहा मरण पावून त्याचा मुलगा शिकंदर तख्तानशीन झाला. हा सिकंदर वयाने लहान असल्यामुळे विजापूरचा सर्व कारभार ख्वासखान नावाचा वजीर पाहात असे. ख्वासखान मोंगलांच्या तंत्राने वागणारा असून त्यांच्या मनात मराठयांशी झालेला तह मोडून युध्द सुरू करावे असे होते. इतर मुत्सद्यांना हे धोरण पसंत पडेना. परंतु ख्वासखान सर्वसत्ताधारी असल्यामुळे तो कोणास जुमानीत नव्हता. यामुळे मोंगल व विजापूरकर यांच्या संयुक्त सैन्याशी तोंड देण्याचा प्रसंग येणार असे पाहून शिवाजी महाराजांनी ख्वासखानाच्या हातून विजापूरची सूत्रे निघेपर्यन्त त्या दरबाराशी युध्द

करण्याचे ठरवून बाबाजी पुढे नांवाच्या आपल्या वकिलास विजापुराहून परत बोलाविले.

अशी प्रास्ताविक माहिती दिल्यानंतर तिस-या अध्यायापासून पुढे पन्हाळगड काबीज केल्याची मुख्य हकीकत सांगण्यास सुरुवात केली आहे. यावेळी महाराजांना मोंगल व आदिलशाहा या दोघांशीहि एकदम बिघाड करावयाचा होता आणि दोघांची तयारी होण्यापूर्वी त्यांचा मुलुख हस्तगत करण्याचा त्यांनी विचार केला. अशा संधीत प्रतापराव व आनंदराव हे मोंगलाच्या सरहद्दीवर होते. त्यांना मोंगली व विजापुरी मुलूख ` इक्षुवत् निष्पीडय ` म्हणजे ऊसासारखा पिळून काढण्याचा हुकूम सोडला. आणि येथिल्या बंदोबस्तासाठी आनाजी पंडित व कोंडाजी फर्जन्द यांना काही गुप्त बेत सांगून रवाना केले. याशिवाय गणोजीमामा व मोत्याजीमामा खळेकर यांना वस्त्रे व भूषणे देऊन निवडक लोकांसह कोंडाजीबरोबर जाण्यास सांगितले. हे सर्व लोक महाराजांना नमस्कार करून डोक्यावर शमीची पाने खोवून गुप्तपणे निघाले. इकडे आनाजी पंडितानी राजापुरास जाऊन सर्व बाजूंनी विचार करून सामग्रीची व्यवस्था केली व तिसरे दिवशी संध्याकाळी ठराविक लोक तेथे येऊन पोहोचले. त्यांनी घोरपडी - दोराच्या शिडया, मेखा, बाण वगैरे सर्व सामान बरोबर आणले असून रात्री ते मोठया सावधगिरीने तेथून निघाले व रात्र अंधारी असल्यामुळे त्यांची चाहूल कोणाला कळली नाही. अशारीतीने ते एका किल्ल्याच्या पायथ्याशी जाऊन पोहचले. अनाजी पंडित आपल्या टोळीसह मागल्या बाजूस रानात दबा धरून राहिले. नंतर काही लोकांनी एकमेकांच्या खांद्यावर चढून व शिडयांचा उपयोग करून किल्ल्याची ` अधित्यका ` म्हणजे माची गाठली. आणि तेथे पोहचताच एकदम कर्णा वाजवून आतील लोकांची धांदल उडवून दिली. त्या कर्ण्याच्या आवाजाने

दचकून उठलेला बाळखान नावाचा मुख्य अधिकारी " अरे, हा कर्णा कोण वाजवीत आहे ? " असे ओरडू लागला. पहारेकरी झोपेतून एकदम जागे होऊन शस्त्रे घेऊन धावले. इतर लोकहि घराबाहेर पडले हे पाहून कोंडाजीने समोर जाऊन युध्दास आरंभ केला. इतक्यात पहाट झाली. तेव्हा किल्ल्यावरील मुख्य लेखक नागोजी पंडित घराबाहेर येऊन " हा कसला गोंधळ चालला आहे ? " अशी चौकशी करू लागला. तेव्हा " अरे, किल्ला शत्रूने घेतला, तू अजून झोपेत आहेत की काय ? " असे लोक विचारू लागले ते ऐकून नागोजी मागल्या दाराने पळून गेला. यानंतर प्रत्येक घरावर पहारेकरी ठेवून प्रमुख अधिका-यांना धरून आणले. तेव्हा त्यांच्या तोंडून सर्व माहिती मिळाली व किल्ला हस्तगत झाला.

नंतर अनाजी पंडिताने किल्ला घेतल्याची बातमी महाराजांना कळविण्यासाठी जासूद पाठविला. तो दोन दिवसांत रायगडास पोहचला आणि ` पन्हाळगड घेतला ` असे मोठयाने सांगत त्याने पत्र दिले. नंतर महाराजांनी त्याला शंभर होन बक्षीस देऊन त्याच्या तोंडी साखर घातली आणि गडावर नगारे वाजू लागले व बाण सोडण्यात आले.

दुसरे दिवशी महाराजांनी भरजरीची वस्त्रे अंगात घालून सैन्य व मुत्सद्दी यासह पन्हाळगड पाहण्यास जाण्याचे ठरविले. दधिदूर्वादिकांचे दर्शन घेऊन, सवत्स गाईंना स्पर्श करून व जयजयकार करणा-या ब्राह्मणांना नमस्कार करून महाराज पालखीतून निघाले. तेव्हा भरलेल्या घागरी घेऊन जाणा-या सुवासिनी सामो-या आल्या, त्यांना उजवी घालून पालखी पुढे चालू लागली, तेथून प्रथम पाचाडास जाऊन त्यांनी अंबिकेचे दर्शन घेतले. पुढे महाडास दोन प्रहरचा मुक्काम करून स्वारी पौलस्त्य नगरास म्हणजे पोलादपुरास आली. येथून पालखीतून उतरून महाराज एकटेच समर्थांच्या दर्शनास गेले. त्या संबंधीचा उल्लेख याप्रमाणे -

* नरयानाद्भ्रातीर्थं चतुः शालं मनोरमम् ।
मन्दिराग्रं समासाद्य एक एवाग्रमो भवत् ।।
गोस्वामि चरण द्वंद्वं वन्दयामास मंदिरे
गोस्वामी व ततस्तस्य हस्तं विन्यस्य मस्तके.
पूर्णं साम्राज्यदात्रीभिराशीभिः पर्यतोषायत् ।। *

नंतर महाराज थोड्या लोकांसह प्रतापगडावर गेले. तेथे पालखी ठेवून व पादुका काढून त्यांनी देवीचे दर्शन घेतले. नंतर उपचारयुक्त पूजा करून महाराज जेवण करून उठले तो सूर्य अस्ताकडास गेला व चंद्र उगवला. रात्री तेथे मोठा उत्सव करण्यात आला. नंतर पहाटे महाराज तेथून निघाले ते तीन दिवसांनी पन्हाळ्याच्या पायथ्याजवळ पोहचले. नंतर देवतांची पूजा व पुण्याहवाचन करून ते गडावर चढले आणि किल्ल्यावरील अंबारे (धान्याची भरलेली कोठारे) तोफा, दारू, बाण, धनुष्ये, गवत, शोभने, तेले, गूळ वगैरेचा साठा पहात व बक्षिसे वाटीत त्यांनी त्या गडावर एक महिना मुक्काम केला ही बातमी विजापूरास पोचली, तेव्हा बहलोलादि मुत्सद्यांनी खवासखानाची उघडपणे पत्करली केली. त्यानेही आपली चूक कबूल करून बहलोलास सेनाधिपत्य द्यावे अशी सूचना केली, तेव्हा बहलोलखान मोठ्या समारंभाने विजापुरांतून सैन्यासह निघून तिकोट्यास आला. नंतर आणखी सैन्य जमल्यानंतर दोन दिवसात उम्राणीस पोहचला. इतक्यात त्याच्या हाती एक पत्र आले. त्यावरून त्यास कळले की, मुजाफर मलिक व सर्जाखान रांगण्याकडे सैन्यासह तयार झाले असून, आदवनीचा सिद्दी मसूद, करनूळचा अब्दुल अजीज व नळदुर्गचा खिदरखान हे, निघे सेनापती व दिलेरखान यांनी बहलोलखानास मिळावे, अशी सूचना केली आहे. तेव्हा या सर्वांना घेऊन तुम्ही शिवाजीवर स्वारी करावी असे बहलोलखानास त्यांनी पत्रात कळविले होते. बहलोलाच्या हालचालींची बित्तंबातमी महाराजांना होती. त्यांनी

प्रतापराव व आनंदराव यांना एकांतात बोलाकून सर्व विचार केला आणि ते म्हणाले,

" श्रूयतां प्रोच्यते यावदल्पया स्वीयसेनया ।
तिष्ठन्नास्ते बहुदूरे ऽसौ तावच्छीघ्रं निगृह्यताम् ।।
यथा तृणालवोऽप्यस्य न गच्छेदत्र कुत्रचित् ।
तथा दृढनिपातोऽस्मिन् सिंहवद् प्रविधीयताम् ।।

(अध्याय ५।५०-५१)

तात्पर्य शत्रू एकवटण्यापूर्वी त्यांच्यावर एकदम तुटून पडण्याचा बेत कायम झाला. त्याप्रमाणे प्रतापरावाने सैन्यासह कोणास न कळू देता रात्री कूच करून दोन दिवसात शत्रूचा तळ गांठला. तेंव्हा शत्रूचे काही लोक तळ्याजवळ घोड्यास पाणी पाजीत होते. काही जण आराम करीत होते, जण आराम करीत होते, तर काही जण हिंडत होते. नंतर शत्रूच्या चोहोबाजूस उभे राहून मराठ्यांनी त्यांची पाहणी केली. पुढे काहींनी तळ्यास वेढा दिला. त्यात सिद्दी हिलालखान आघाडीस होता. तेथून मागे एका कोसावर विठोजी शिंदा व बाजूस कृष्णाजी भास्कर व विठ्ठल पीलदेव हे राहिले विसाजी बल्लाळ याने चौफेर टेहळणी करण्याचे पत्करले. इतकी मांडणी होईपर्यन्तदेखील शत्रूला त्याचा मागमूसही लागला नाही. या सुमारास हत्तींचा तांडा तळ्यावर पाणी पिण्यासाठी आणला होता. तो परत नेण्यासाठी मागे वळून पाहतात तो शत्रूने आपल्या सैन्यास वेढल्याचे त्याच्या दृष्टोत्पत्तीस आले. इतक्यात प्रतापरावाने हजारो घोडेस्वारासह शत्रूसैन्यावर चाल केली. तेंव्हा बहलोलखानाच्या सैन्याची जी धांदल उडाली ती काय सांगावी ?

" हयो हयो जिनो जिनो खड्. खड्.ो धनुर्धनु: ।
इति व्यग्रगिरं तावत्सैन्ययमवत् क्षणात ।। "

नंतर चार घटकापर्यन्त मोठे कडाक्याचे युध्द झाले. त्यात आनंदरावाने पिछाडीवर हल्ला करुन व रणांगणांतील शत्रूच्या उन्मत्त हत्तीची साखळी तोडून ती मोकळी केली आणि इतर हत्तींचा असाच घोटाळा उडविण्यांत आला. तेव्हां शिद्दी हिलाल, रुपाजी भोंसला, सामजी मोहिता, सिधोजी निंबाळकर, विठोजी शिंदे व विठ्ठल पलिदेव हे सैन्यासह आंत घुसले. महाद ठाकूर, माईखान, नाईकजी पांढरे, खराडे वगैरे शत्रूच्या सरदारांनी त्यांना अडविले. तेव्हा मोठी रणधुमाळी माजली अशारीतीने तिस-या प्रहारापासून सूर्यास्तापर्यन्त हे युध्द चालू होते. या सुमारास सिधोजी निंबाळकराने शत्रूच्या हत्तींचा पाडाव करुन राजरस्त्याने नेऊन महाराजांकडे पोहचविला. इकडे बहलोलाचा आप्त महमद बकी घोडयावर बसून बाहेर पडला होता. त्याच्यावर दीपाजी राऊतराव, तलवार उपसून धांवला. तेंव्हा बकीने त्याच्यावर सोडलेल्या बाणाने दीपाजीचा घोडा जखमी झाला. नंतर दीपाजी दुस-या घोडयावर बसून लढू लागला. त्यावेळी पुन्हा घोडयास बाण लागला. नंतर तिस-या घोडयावर बसून राऊतराने बकीच्या मानेवर प्रहार करुन त्यास खाली पाडले आणि त्या बकीच्याच घोडयावर बसून दीपाजी रणांत फिरु लागला. बकी मेल्याची बातमी ऐकून बहलोल विव्हळ झाला आणि प्रतापरावाने दाखविलेल्या मार्गाने निसटून गेला. शेवटी कृष्णाजी भास्कराने शत्रूचे सैन्य लुटून हत्ती, घोडे, रथ वगैरे लूट ताब्यात घेतली.

या सारांशावरुन प्रस्तुत आख्यान काव्याची कल्पना करता येण्याजोगी आहे. केवळ ऐतिहासिक माहितीच्या दृष्टीने हे तात्पर्य काढले

आहे. पण मूळ ग्रंथ इतका रसभरित व बहारीचा आहे की, तो कितीही वेळा वाचला तरी मनाचे समाधान होत नाही. व प्रत्येक वाचनाच्यावेळी त्याची माधुरी वाढत्या प्रमाणात प्रत्ययास येते. हे वाचीत असता आपण उत्तम किर्तनकाराच्या तोंडून ऐतिहासिक प्रसंगाचे वर्णन ऐकत आहो. अशी खात्री पटते. आणि यापुढे ऐतिहासिक उत्सव प्रसंगात पांच दिवसपर्यन्त किर्तनकारांची व श्रोत्यांची या आख्यानाने उत्तम सोय झाली असे वाटून मनाला आनंद होतो, इतकी या ग्रंथात विविधता साधलेली आहे. जेधे शकावलीत यासंबंधी ` पनालागड आण्णाजीपंती भेद करून कोंडाजी फर्जंदाबरोबर लोक देऊन घेतला साठी लोक रवाना केले, त्यांनी पनाला घेतला. ` व नंतर ` राजश्री रायरीहून पनाल्यास गेले तेव्ह मासी बहलोलखान यांसी व प्रतापराव व आनंदराव यांसी लढाई जाहली. ` अशी चार वाक्ये आहेत. ती माहितीच्या दृष्टीने बिनचूक आहेत. तरी तेवढयाने या स्वारीचे समग्र स्वरूप लक्षात येत नव्हते. ते आता येण्यास हरकत नाही. प्रो. जदुनाथ यांच्या चरित्रग्रंथात पन्हाळा कधी घेतला याची तारीख देणारे एक व उम्राणीच्या लढाईबद्दलचे एक अशी दोन वाक्य दिलेली आहेत. पैकी पहिले वाक्य बरोबर आहे, दुसरे चुकले आहे. कारण या लढाईच्या वेळी महाराज पन्हाळ्यास नसून कारावारांत होते व त्यांची रसद बंद पाडण्यासाठी बहलोलाने ही स्वारी केली असावी असा त्यांनी तर्क केला आहे. परंतु तो बरोबर नाही.

पर्णालपर्वत ग्रहणाख्यानम् या काव्यातील उल्लेखाप्रमाणे एकोजी व शिवाजी यांचे संबंध जिव्हाळ्याचे व प्रेमाचे होते. (अध्याय ११।१६, १७)

स्वाम्निो रामचंद्रस्य क्निोतो भरतो यथा ।
कविर्निविदयांचक्रे सर्वं कुशलपूर्वकम् ।। १७ ।।
चरितं देववर्यस्थ विष्णोरिव जगत्प्रभो: ।। १८ ।।

छ. शिवाजी महाराजांवर या कवीनेही विष्णुच्याच अवताराची कल्पना केलेली आहे.

शहाजी महाराज बंगळुर येथील गौरीविलास या सभेत बसून काव्य ऐकत असत. (अध्याय १।२२), जयराम कवि बारा भाषेत काव्य करीत असे. (अध्याय १।२७) जयराम कवीने शिवाजी महाराजांवर शिवाचा अवतार ही कल्पना केलेली आहे. (अध्याय १।४०), शिवाजीने दुसऱ्यांदा सुरत लुटली (अध्याय १।२९) त्रिंबकगड (अध्याय १।३०), कारंजा शहर (अ.१।३१), साल्हेरचा किल्ला (अ. १।३३,३४) अहिवंतगड, अचलगड, मार्कन्डगड, खळजवळा हे किल्ले (अ. १।३५,३६), चामुंडगड, हरिश्चंद्रगड, महिषगड, अडसरगड (अ. १।३७, जीवधन किल्ला (अ.१।३८) वगैरे गड, किल्ले, ठाणी, शिवाजीने मोंगलापासून घेतली, त्याचप्रमाणे शिवाजीच्या सैन्याचे व मोंगलांचे अलंग, कुरंग, त्रिंगलवाडी येथे कडाक्याचे युध्द झाले (अ.१।३५) त्यानंतर जव्हार व रामनगरची राज्ये शिवाजीने घेतली (अ.१।३९,४०) वरील ठिकाणे शिवाजीने घेतल्याचा जो अनुक्रम जयराम कवीने दिला आहे, तो बरोबर असेलच असे नाही. शिवाजीने प्रत्येक गडास नवीन नांव दिले (अ. १।४१) मुसलमानी राज्यकर्त्यांप्रमाणे आपल्या स्वामित्वाची खूण दाखविण्यासाठी म्हणून शिवाजीने तसे केले असावे.

कांही संस्कृत शब्दांचे संस्कृतीकरण पुढीलप्रमाणे केले आहे. यदिल - आदिलशहा, कार्णाट - कर्नाटक, श्यामास्या: - काळ्या तोंडाचे हबशी, सिन्धुमध्यज - इंग्रज, अवरंगशाह - औरंगजेब, पौलस्त्यनगर -

पोलादपूर, वगैरे. युध्दाचे सूक्ष्म वर्णन (अ. २।१६-६०), देवींचे वर्णन (अ. ४-२३ ते ५४), रीतिरिवाजांचे वर्णन (अ. ४।५९-७८) ऋग्वेदाप्रमाणे पणींचा उल्लेख सागरी चाचे किंवा व्यापारी यांना उद्देशून केला आहे. (अ. ५।४२)

५ व्या अध्यायात वरीलप्रमाणे कांही लक्षांत घेण्याजोगे विशेष आढळतात.

एकंदर जयराम हा अनेक भाषांत विद्वान, ऐश्वर्यसंपन्न, नम्र क्वी असावा व त्याने केलेल्या सूक्ष्म वर्णनामुळे त्याने प्रत्यक्ष घटना पाहिल्या असाव्यात. या त्याच्या समकालीनत्वामुळेच हा ग्रंथ केवळ ५ व अध्यायाचा असूनही अत्यंत महत्वाचा आहे.

` पर्णालपर्वतग्रहणाख्यानम् ` अध्याय दुस-यांतील श्लो. ९, १० अतिशयोक्तिपूर्ण व ऐतिहासिकदृष्टया निराधार आहेत. औरंगजेबाच्या सर्व राजपुत्रांस त्यांच्या नायकांमुळासह शिवाजीने मारले हे विधान हास्यास्पद आहे. त्याचप्रमाणे अदिलशहा, फिरंगी, हबशी, इंग्रज हे शिवाजीस स्वसंरक्षणार्थ खंडणी देत होते, हें हि विधान चूक आहे. (अ. २।१३) इ.स. १६७३ पूर्वी कुतुबशहानें शिवाजीस दोन तीन लाख होन नजराणा म्हणून दिले. हे विधान (अ. २।१५) संशयास्पद आहे. असे काही किरकोळ दोष या काव्यामध्ये आहेत (संकल्पित शिवचरित्राचा आराखडा व साधने, -यं. शं. शेजवलकर - पर्णालपर्वतग्रहणाख्यानातील काही दोष) कालदृष्टया हा कवि शहाजीच्या आश्रयार्थ असल्यामुळे शिवाजीशी समकालीन आहे व त्यांचा ग्रंथ उत्तम काव्य आहे. तो जरी लहान असला तरी शिवाजीची युध्दनीती जाणून घेणा-यांना सूक्ष्म

मार्गदर्शन करणारा आहे. म्हणून शिवभारतानंतर काव्य व ऐतिहासिक सत्यता या दोन्ही दृष्टीने ' पर्णालपर्वतग्रहणाख्यानम् ' हा ग्रंथ महत्वाचा आहे.

क) राधामाधवविलासचंपू :

या ग्रंथाचे दहा उल्लास आणि शेवटी एक परिशिष्ट मिळून प्रस्तुत चंपूचे एकंदर अकरा भाग आहेत. त्यापैकी पहिल्या पांच उल्लासात राधाकृष्णाच्या विलासाचे संस्कृत भाषेत पारंपारिक वर्णन आहे.

क्रमाने १) जलक्रीडा, २) पुष्पशय्यारिरंसा, ३) नखशिखा, ४) षडर्तु व ५) चंद्रोदयसूर्यास्तमय ह्या परिपोषाणाशक्ति दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे. आणि एकंदरीत तो बरा साधला आहे. ग्रंथारंभी शेषपुत्ररंग या नांवाच्या आलंकारिकाने एक लहानसा उपोद्घात उर्फ प्रस्तावना लिहिली आहे. अलंकारशास्त्र ग्रंथ पढून कवित्वशक्ति येत नसून मुळचीच प्रतिभा कवीच्या ठायी ईश्वरानुग्रहप्राप्त असावी लागते, असे विवेचन केले आहे. त्यांत काव्यप्रकाश, चंद्रालोक, काव्यकल्पकता, काव्यादर्श इ. अलंकार ग्रंथाचा उल्लेख केला आहे.

ह्या पांच उल्लासांत संयोग, विप्रलंभ, स्त्रियांचे नखशिखांत वर्णन इ. मनोन्मादक, बालिश चावट वर्णने कवीने दिली आहेत.

सहाव्या उल्लासापासून ग्रंथसमाप्तिपर्यन्तच्या संबंध भागात म्हणजे ग्रंथाच्या दोनतृतीयांश भागात राधाकृष्णाचे नांवहि नाही. इतकेच नव्हे तर अस्पष्ट उल्लेखसुध्दा नाही. या भागात येथून तेथून शहाजीमहाराजांची प्रशंसा भरलेली आहे, असे करण्यात कवीचा मतलब असा असावा की, शाहनृपतिरूप कृष्णाच्याच स्तुतीपर हा भाग आहे. असा समज व्हावा. नाविष्णु:,

पृथिवीपतिः अशी ग्रंथकाराची परंपरागत श्रध्दा होती. तेव्हा राधाकृष्ण-विलासाला व शहानरेशप्रशस्तिला एकाच ग्रंथात कवीने क संकलित केले हे त्यांच्या मते योग्यच झाले.

सहाव्या उल्लासाचे नांव ' राजदर्शनसमस्यापूरण ' असे असून, सातव्याचे ' राजसभावर्णन, ' आठव्याचे ' राजरीतिवर्णन,' नवव्याचे ' यौवराज्यावाप्ति ' दहाव्याचे ' राजनीतीवर्णन,' अशी नांवे सहाव्या-पासून दहाव्या उल्लासापर्यन्तचा सर्व ग्रंथ संस्कृत भाषेत आहे. परंतु शहाजी महाराजांच्या समोर व इतर राजपुरूषांच्या समोर जयराम कवीने व इतर भाषा कवींनी प्रसंगोपात्त संस्कृत व्यतिरिक्त इतर भाषांत जे कवित्व व समस्यापूरण केले ते संस्कृत संदर्भात अंतर्भाविणे योग्य नव्हे. अशा बुध्दीने स्वतंत्र परिशिष्टात संग्रहणे ग्रंथकर्त्यास इष्ट वाटले. हे परिशिष्ट खंड सर्व ग्रंथाचा एकतृतीयांश संस्कृत भाग, शहाजीराज वर्णनाचा एकतृतीयांश संस्कृत भाग, आणि एकतृतीयांश प्राकृत भाग अशी एकंदर ग्रंथाची विभागणी आहे.

शहाजीराजे भोसले यांची मूळ राजधानी जे बंगळूर शहर तेथे ह्या चंपूची मूळ पहिली प्रत लिहिली गेली. स्वतः ग्रंथकारच म्हणतो की, शहाजी महाराजांनी हे काव्य श्रवण केले. " द्वादशभाषाललित शाहनरेश्वराने आकर्णिले ।। महाराष्ट्रदेशादागतो जयरामो नाम कवीश्वरः ।। " महाराष्ट्र देशाहून शहाजीमहाराजांसन्निध आल्याचा कवीने उल्लेख केला आहे, म्हणजेच ते बंगळूर प्रांती आले. कारण कर्नाटकात बंगळूर प्रांताखेरीज इतरत्र शहाजी महाराजांचे वास्तव्य शेवटची १५ वर्षे नव्हते. कवीच्या काव्यात खालील उल्लेख आला आहे. परमेश्वर ब्रह्मदेवाला विचारतात, " तू सृष्टि रचलीस, तीमध्ये राखणा कोण कोठे ठेवलेस ? " तेंव्हा ब्रह्मदेव सांगतो " पूर्वेचा रक्षक रवि, पश्चिमेला चंद्र, उत्तर दिशेला लोकपाल शहाजहान

पातशाहा व दक्षिण दिशेचा रक्षक शहाजी महाराज. " यावरून शहाजहानची राज्यच्युति होण्यापूर्वी म्हणजे शक १५८० पूर्वी ह्या काव्याची रचना झालेली असावी. शिवाय दक्षिण दिशेचा लोकपाल म्हटले आहे, म्हणजे शहाजीची सुटका होऊन कर्नाटकात त्याचा अंमल झाल्यानंतर हा गौरव सार्थ होणे शक्य आहे. सबब या चंपूकाव्याची रचना शक १५७५ च्या नंतर व शक १५८० पूर्वी झाली असावी किंवा हे काव्यगुंफण शक १५७५ मध्ये सुरू होऊन शक १५८० च्या सुमारास संपूर्ण झाले असावे. या काव्याचा आढावा मला फक्त शिवाजीसंबंधानेच घ्यावयाचा असल्यामुळे या ठिकाणी जयरामाने शिवाजीसंबंधी केलेले उल्लेख पाहू या.

जयराम म्हणतो, " शिवाजीने औरंगजेब, आदिलशहा, बेरीद-शाहा व कुतबशहा इ. प्रबल व दुर्बल यवनांच्या ताब्यातील काही मुलुख काबीज केला होता, किंवा लुटला होता. तसेच अनेक मराठा सरदारास त्याने वठणीस आणले होते. बापाप्रमाणे व आपल्या भावाप्रमाणे तो आपल्या दरबारात संस्कृत विद्वान व प्राकृत कवीवर बाळगीत असे व त्यांनी रचलेले स्वतःच्या कीर्तिचे संस्कृत-प्राकृत पोवाडे तो सहृदयतेने ऐकत असे. " म्हणजे त्यांनी रचलेल्या संस्कृत, प्राकृत पद्यांचा अर्थ कळण्याची पात्रता त्याच्या अंगी होती. जयरामाने केलेल्या शिवाजीच्या ह्या वर्णनावरून स्पष्टच झाले की, शिवाजीला त्याच्या बापाप्रमाणे व भावाप्रमाणे संस्कृत प्राकृत भाषा येत होत्या. ही गोष्ट फार महत्वाची आहे.

जयराम जेंव्हा शहाजी महाराजांना भेटायला आला, तेंव्हा त्यांनी ` शतचंद्रं नभस्तलं ` ही समस्या स्वतः घातली. ` राधामाधवविलास-चंपू ` हा संस्कृत चंपू सहृदयतेने ऐकला व बारा भाषांत लिहिलेली पद्ये सरसतेने श्रवण केली. तोच प्रकार शहाजीचा पुत्र व शिवाजीचा वडील भाऊ जो

संभाजीराजा याने केला. तोच किता शिवाजीचा धाकटा भाऊन जो एकोजी-राजा याने गिरविला. आणि ह्या तिघांचे अनुकरण शहाजीचा रक्षापुत्र जो कोयाजीराजा त्यानेही केले. तेंव्हा आता प्रश्न असा उभा राहतो की, शहाजीचा पुत्र, संभाजीचा धाकटा भाऊन आणि एकोजी व कोयाजी यांचा ज्येष्ठ बंधु जो प्रतिभासंपन्न शिवाजी राजा तोच तेव्हा अक्षरशत्रू कसा निपजला ? व डफ, सरकार वगैरे लेखकांनी त्याचा अपमान कसा काय केला ? सर्व वरवरी लिहितात की, ` शिवाजी राजा उच्चशिक्षित होता ` हे अप्रमाण धरून व शिवाजीचे जे शत्रू त्यांची साक्षप्रमाण धरून सत्येतिहासाचे काम भागणार नाही.

बखरकार शिवसमकालीन नव्हते म्हणून व शत्रूपक्षीय साक्षी कलुषित म्हणून त्यांचा पुरावा सध्या जरी बाजूला ठेवला तरी जयरामासारखा द्वादशभाषाप्रवीण शिवकालीन कवि काय म्हणतो ते पाहिले तर -

" श्री शाहराजात्मजतिलकस्य कलियुगसकलप्रबलयवन
बलवनविदलनकर कलितकरवालोदित प्रतापदिनकरस्य
स्फुरग्दुणगणाद्भुत पंडित मंडली मंडित कविवर
विरचित प्रबंध सिंधुसमुद्भुत शाश्वतनिष्कलंक कीर्ति-
शीतकरस्य प्रचंडक्ष्मापतिमंडल विजयसमासादितवसुवसुं-
धरादिक प्रदान प्रमुदित याचक जनस्तुतिवचनानंदिताष्ट
दिग्जन निवहस्य श्री शिवराजस्य । "

या उद्गारातील स्फुरग्दुण इ. पद लक्ष्य आहे. ह्या पदात जयराम स्पष्ट सांगतो की, शिवरायाच्या ठायी अनेक गुणांचे वास्तव्य होते. त्याचा दरबार अनेक पंडितांनी सुशोभिला असे, आणि त्याची निष्कलंक कीर्ति कविवरांनी वर्णिली होती. प्रस्तुत चंपू शक १५७५ पासून शक १५८०

पर्यन्तच्या कालात क्रमाक्रमाने रचिला जात होता. ह्या सुमारास शिवाजीचे वय तिशीच्या घरात येत चालले होते. आणि त्याने अनेक मुलूख काबीज केले होते व अनेक कविवर पदरी बाळगले होते. त्यातली शिवाजीच्या साक्षरतेसंबंधीची भिकार अफवा पसरलेली होती. कुळातील बाकीच्या सर्व पुरुषांना अक्षरज्ञान होते आणि शिवाजीला एकट्याला तेवढे नव्हते, हा प्रवादच मुळी बाष्पनळ आहे. शिवाजीचे एक पत्र धुळे येथे श्री. देव यांच्या संग्रहास आहे. त्यांच्या समाप्तीस शिवाजीने आपली निशाणी घातली आहे, असे श्री. देव यांना वाटते.

दुसरा उल्लेख असा की, शहाजीचा पुत्र व वारस जो शिवाजी तो शहाजीच्या हयातीनंतर राजत्वदर्शक जो तिलक, त्याचा प्रथम हक्कदार आहे, शिवाजीने चारही पातशहास लढाईच्या रणांगणावर फिरवून घोडयासारखे जेर केले होते व शत्रूराजाच्या गळ्यात कमाना अडकवून त्याने त्यास नरम आणले होते ह्याखेरीज तिसरा उल्लेख संबंध काव्यात नाही.

वरील उल्लेख शहाजीने ऐकलेला होता. त्यावरून उघडच आहे की, शहाजीच्या कर्नाटकातील राज्याचा भूरितम भाग तिलकाचा धनी जो शिवाजी याला मिळावा अशी शहाजीची इच्छा होती. जयरामाने केलेले शिववर्णन यथार्थ होते व ते शहाजीस मान्य होते हे सांगावयास नकोच.

शिवाजीची आई जिजाबाई तिच्यासंबंधाने जयराम लिहितो की, " जिजाई ही शहाजीसारख्या धीर, उदार, पराक्रमी पुरुषाला साजण्यासारखी बायको होती. आणि ती केवळ नवऱ्याच्या कीर्तिवर विकत नसून स्वतःच्या धीर, उदार, गंभीरवृत्तीने तिची कीर्ति त्याकाळी सर्व भरतखंडभर पसरली होती. इतकेच नव्हे तर तिच्या कीर्तिच्या घुमटाच्या सावलीखाली सर्व जंबुद्वीप म्हणजे जंबुद्वीपांतील सज्जन लोक यवनांच्या जुलुमाला कंटाळून आश्रयार्थ सज्जन लोक यवनांच्या जुलुमाला कंटाळून आश्रयार्थ येत असत. " या त्याच्या उद्गारातून जिजाईची थोरवी स्पष्ट होते.

जयराम शहाजीचे आडनांव उर्फ कुलनाम ` भोसले ` असे देऊन वंश नाम ` शिसोदिया ` असे देतो. तेव्हा शिवाजीच्या राज्यारोहण-प्रसंगी सार्वभौम राजाला शोभेल अशी वंशावळ व कुळ गोत मुद्दाम बनावट तयार केली गेली. हा आक्षेप जयरामाच्या प्रत्यक्ष पुराव्यावरूनच लंगडा पडतो. भोसले हे शिसोदिया रजपूतांच्या वंशातील होते, अशी परंपरागत कहाणी शहाजी राजाच्या दरबारी सर्वसंमत होती. ही कहाणी शहाजीच्या किंवा शिवाजीच्या दरबारीच तेव्हा प्रचलित होती असे नव्हे तर उत्तरेकडील रजपुतांनाही मान्य होती. सभासद बखरीच्या ३३ व्या पृष्ठावर जयसिंहाच्या तोंडचे शब्द सभासदाने दिले आहेत, ते असे, " तुम्ही शिसोदे रजपुत, आम्ही तुम्ही एकाचे एकच आहे. " म्हणजे भोसल्यांचे रजपूतत्व म्हणजेच क्षात्रियत्व व शिसोदिया वंशत्व त्याकाळी म्हणजे शहाजीकाळी दक्षिणेकडील व उत्तरेकडील विद्वानांना व रजपुतांना मान्य होते असे झाले. हा शहाजीकालीन पुरावा अकृत्रिम असल्यामुळे विश्वसनीय धरणे प्राप्त आहे. जयराम भोसल्यांच्या मूळपुरुषाचे नांव ` कलीपास ` असे देतो. अवनीपाश्व - कनीपाश्व - कलीपास असे ते प्राकृत रूप तयार झाले असावे. या ` कलीपास ` राजाच्या वंशात मालोजी झाला, पुढे शहाजी झाला. ही वंशावळ त्याने शहाजी व दरबाऱ्यांपुढे गायिली असल्यामुळे ती सर्वांना मान्य होती असेच म्हणावे लागेल. तात्पर्य शहाजीचे उपनांव भोसले, वंश शिसोदे, वर्ण क्षात्रिय उर्फ रजपूत, गोत्र कुशिक, मूळपुरुष कलीपास हे पुराव्याने सिध्द झाले आहे. पूर्वी दक्षिण पश्चिमेकडील राजांना भोज असे म्हणत असत, असा उल्लेख ` ऐन्द्रमहाभिषेक ` या ब्राह्मणांतील उताऱ्यामध्ये आहे त्यावरून भौज्य, साम्राज्य या शब्दांवरून भोज-भोजला-भोसला-भोसले या नांवाने ते महाराष्ट्रात प्रसिध्दीला आले.

बाबाजी उर्फ बाबजी भोसले, संभाजी भोसल्याचा मुलगा शक १४५५ मध्यें जन्मला. मालोजी शक १४७२ मध्यें जन्मला. मालोजीने मूर्तिजा निजामशहाचा बचाव केला व शक १४९९ ते १५१० पर्यंत मालोजीने खूप मोठा पराक्रम केला. शक १५१५ मध्ये मालोजीला भूमिगत द्रव्य सांपडले. जगदंबेचा साक्षात्कार होऊन त्याला राज्यप्राप्तीचा वर मिळाला. ऐतिहासिकदृष्टया या वराचा अर्थ असा की, महाराष्ट्र राज्य स्थापन करावे, अशी महत्वाकांक्षा मालोजीच्या मनांत अंकुर उद्भवली. शक १५१६ मध्यें शहाजीचा जन्म झाला. मालोजीने शिखर शिंगणापूरच्या निर्जल डोंगरावर विस्तीर्ण सरोवर बांधून व वेरूळच्या घृष्णेश्वराच्या देवालयाचा जीर्णोध्दार करून महाराष्ट्रात सर्वतोमुखी कीर्ति संपादन केली. शक १५२५ मध्ये मालोजीने पचहजारी मनसब मिळविली. शहाजीचे पहिले लग्न मोहित्यांची कन्या उमाबाई हिच्याशी झाले. (श्री बृहदीश्वर मंदिरावरील शिलालेख) दुसरा विवाह शक १५२५ च्या वैशाखात झाला. तेंव्हा शहाजी ९ वर्षांचा व जिजाबाई ८ वर्षांची होती. शक १५४१ मध्ये मालोजी युध्दांत मरण पावला. शक १५४३ मध्ये शहाजीस पित्याची सर्व जहांगीर प्राप्त झाली. शिवाजीचा जन्म शक १५४५ च्या वैशाखात आला.

शहाजी महाराजांच्या दौलतीची व शौर्याची अधिकता पाहून पश्चिम महाराष्ट्रातील ९६ कुळीचे मराठे राजे व सरदार त्याला येऊन मिळाले. शिवकाली मावळे, मावळे म्हणून त्यांची पुढे ख्याती झाली, ते हेच कुलीन लोक होते. ओझी वाहणारे सामान्य कुणबी लोक नव्हते. फत्तेखानाच्या अमलाला कंटाळून गेलेल्या मराठे लोकांना शहाजीने आपल्या दरबारी परत बोलाविले. रयतेची आबादी करून फौजेच्या व सरकारच्या खर्चाचे बंध निर्बन्ध शहाजीने घालून दिले. मलिकंबरी जमीन मोजणी शहाजीच्या पदरी असलेल्या साबाजीने केलेली होती.

मोंगल, आदिलशहा व कुतुबशहा या तिघांना धाब्यावर बसवून त्यांच्या नाकावर टिच्चून स्वतंत्र राज्य चालविण्याला देशातील जाणत्या व कर्त्या मराठा व ब्राह्मण मंडळीचा जो निःस्वार्थ पाठिंबा व सहकारिता लागते तिची जाणीव महाराष्ट्राला अजून व्हावी तितकी उत्पन्न झाली नव्हती. शहाजीच्या प्रयत्नाने ती नुकतीच कोठे पैदा होऊन लागली होती. स्वातंत्र्य राज्य आपणालाही चालविता येते, ही जाणीव ब्राह्मणांना व मराठ्यांना शहाजीच्या नेतृत्वाखाली जी अल्पस्वल्प झाली, ती पुढे वाढत जाऊन शिवाजीच्या उपयोगी पडली व शिवाजीला याच पायावर स्वराज्याची उभारणी करता आली.

अशारीतीने कालदृष्टया ' राधामाधवविलासचंपू ' हे काव्य प्रथमचे ठरत असले तरी ते शहाजी वर्णनपर आहे. छ. शिवाजीविषयी एक-दोन त्रोटक उल्लेख आढळतात. पण भोसल्यांचे रजपूतत्व, शौर्य, व शहाजीकडून मिळणारी स्वातंत्र्याची मूळ प्रेरणा या उल्लेखांमुळे व समकालीनत्वामुळे हे काव्य महत्वाचे आहे. ' पर्णालपर्वतग्रहणाख्यानम् ' हे काव्यही लहान असले तरी समकालीनत्वामुळे ते ही ऐतिहासिकदृष्टया महत्वाचे ठरते. जयराम हा कवि असल्यामुळे साहजिकच त्याच्या काव्यात काव्यात्मकता जास्त आढळते. पण ते काव्य आहे म्हणून त्यात ऐतिहासिकता नाही असे म्हणता येणार नाही. म्हणून शिवभारता खालोखाल याचीच योग्यता गुण व कालदृष्टया महत्वाची आहे.

ड) <u>शिवराज - प्रशस्ति</u> :

श्री. गागाभट्ट काशीकर हे शिवाजी महाराजांचे समकालीन असल्यामुळे त्यांनी शिवाजी महाराजांच्या वैदिक राज्याभिषेकाला अनुसरून

लिहिलेल्या " शिवराजाभिषेक प्रयोग: " हा संस्कृत ग्रंथ फारच महत्वाचा आहे आणि तांत्रिक राज्याभिषेकाला अनुसरून असलेला " श्री शिवराजाभिषेक कल्पतरू " हा निश्चलपूरीच्या शिष्याने लिहिलेला ग्रंथ फार महत्वाचा आहे व हे दोन्हीही ग्रंथ राज्याभिषेकाच्या वेळी म्हणजे इ.स. १६७४ मध्ये लिहिले गेले आहेत. पण राज्याभिषेका विषयीचे स्वतंत्र प्रकरण करणार असल्यामुळे त्या स्वतंत्र प्रकरणांत वरील ग्रंथाचा आढावा घेणार आहे.

म्हणून आता येथे श्री. गागाभट्ट काशीकरांनी छ. शिवाजी महाराजांवर लिहिलेल्या इतर संस्कृत ग्रंथाचा आढावा घेत आहे. बाळाजी आवजीच्या आग्रहास्तव श्री. गागाभट्टांनी ` शिवराज - प्रशस्ति ` लिहून दिली असे त्यांना स्वत:च म्हटलेले आहे. विषयाच्या दृष्टीकोनातून समकालीन विद्वान पंडिताने केलेला हा गौरव विशेष महत्वाचा आहे. म्हणून ती संपूर्ण प्रशस्ती येथे उद्घृत करीत आहे.

श्री गणेशाय नम: ।
श्री शिवो जयति ।

सिंदूरं नयनं तृतीयक मति: श्यामं गलं कज्जलं ।
स्वच्छांगं मुकुरं निशाकर कलामाभुग्न मुक्तास्त्रजं ।।
गंगावृनि निबध्द पिंगट जटा पेटी स्थिता मालती -
र्बिभ्राणो गिरिजाम्बिा चिंतुमसौ देव: शिवायास्तु व: ।। १ ।।

या श्रीतिहोम रचनीच (र) वेष्टितापि
पत्या सरोजसुहृदात्मभुवा सहैव ।
ससेवते मलय चंदन गंधवाहं
तत्रां हरित्यहह राजगिरिश्चकास्ति ।। २ ।।

तत्रास्ति राजनगरी शिवराजधानी -
यत्सौधशेखरगता स्फटिका: प्रभाते ।
पारावता अपि च तांडव यं ति तुंडं
तारासु तंडुलधियाण्य निवर्तयंति ॥ ३ ॥

तत्रा भवच्छाहनराधिराज:
स क्षात्रधर्मस्य नवावतार:
सुरद्रु पुष्पोन्दवकामिनीभि:
संगीयते यस्य यश:-प्रशस्ति: ॥ ४ ॥

कादंबिनीव जगजीवनदान हेतु:
सौदामिनीव सकलारि विनाशनाय ।
आलंबिनी भवति राजगिरे रिदानीं
जीजाभिधा जयति शाहकुटुंबिनी सा ॥ ५ ॥

तत्पुण्यराशिरभवाच्छिव राजनामा
यस्य प्रतापशंकिता क्रमते दिगंतं
अस्तोदयाचल परार्ध्दभुवि स्थितानां
मुधोतमारणामिवाकलयन्छिलानाम् ॥ ६ ॥

प्रतापतपनो महन्प्रकुरुतां दिनं क्षाणा:
पराभवितु मीहतामपरकीर्त्यंदुनि क्षणात्
इदं तु महदद्भुतं दहति सात्मत्रानयं
न तापयति यै: कृतमनात्मत्रं शिर: ॥ ७ ॥

दृप्योद्दीप्यद्यवनादितिजोत्क्रांत्दिानाय लोक -
त्राणायोग्रो बहुल करुणा सिंधुराशि र्बभुव ।
मन्ये यस्याब्दहलक्षितिजाधीशवक्षो विदार्य
स्थाने स्वीये निखिल विबुधान्स्थापयामास भूय: ॥ ८ ॥

द्यावा पृथिव्यो र्हि समिध्दवत्यो
ध्द र्न्येवमध्ये किल यस्य कीर्ति: ।
दिल्लीश्वर क्रोध धनंजयस्य
प्रकाशमत्याशु समिंधनं या ॥ ९ ॥

यस्योत्पत्ति स्त्रिदशभवने दुंदुभिध्वानकल्पा
कोपि स्पष्टो यवनभवने - हादिनीपात एष: ।
नाम्नश्चैवं सकृदपि जपो व्रंगजेवस्य क्यो-
त्कर्षं जनयति चिरं जीविता छाहसूनु: ॥ १० ॥

स्येमालंबी भवति भगवान्मानुभान्नक्रविद्या
स्देहारंभी भवति गहने दाव वैश्वानरो पि ॥
किंवा प्यश्वा वदनजनित: सागरे मज्जत्येव ।
सार्थं सर्वो जयति महिमा यत्प्रतापानलस्य ॥ ११ ॥

यत्र क्षात्रमित्राय भार्गवभयत्रस्तं परं विभ्रमं
वंशो वंगम हीपते रपि महान्यास्मिन्पतंगायित:
यन्नामत्रिदशास्य हेतिपटुताप्रासीभवद्यावना -
दक्षीणो पभितोष्ण भूत हृदयो वर्वर्ति दिल्लीश्वर: ॥ १२ ॥

भयात्तवगिरे भृगुं भजति गोलकुंडाधिप:
स दक्षिणदिगीश्वरं श्रयति दक्षिणाशाधिप: ।
महापथमुपासितुं हिमगिरिं च दिल्लीश्वर:
शिवोयमवमन्यतान् जयति राजराज: श्रिया ॥ १३ ॥

स्ववपु र्व्ययशंकया सुमेरू
र्वपु रर्व्वव्ययशंकितो रमेश: ।
सुदृशान्व्यवधाय भूभृदब्धीन
सृजत: स्वानि शिवाय दीपवतौ ॥ १४ ॥

त्वयिदित्सति याचकान् धनेशान्
ददति त्वय्यथ वीक्ष्य तान्तमेशान्
शिवराजनिजाभिभूतिभीत्या
स्वयमाशांबर ता मगान्महेश: ॥ १५ ॥

पीता: शास्त्रहार्णवा: भसितता प्राप्ता: समुल्लसिता
विश्वं भानुमते क्दीर्धितमिदं कात्स्न्येन लब्धाश्रुति: ।
नव्या सृष्टिरकारि सृष्टिविरहैं त्राताद्विजौघा: क्षमा
वासिष्ठी त्वयि जामदग्न्यसदृश्य त्वय्येव संभाव्यते ॥ १६ ॥

समस्तसामंतकिरीट रत्नानुबिंबिता यच्चरणोर्द्ध्वरेखा
सीमंतिनीनां समुवाच तेषां सीमंत सिंदूर शिर: स्थिरत्वं ॥ १७ ॥

दानोद्यते यत्करपद्मगर्भे रत्नप्रभासंवहितांबुदर्भे ।
कल्पद्रुदेश: सुरसुंदरीणां संप्राप संकेतानिकेतनत्वं ॥ १८ ॥

पुरा निबिडगर्जनै र्भृशमपाकृतं यै र्धनै
र्जितं सखि मया स तान् प्रियतमो गृहीत्वागत: ।
विलोक्य गजसंवृतंप तिमुपेत मारा दिदं
वदंति सकुतूहलं पुनरहो यदर्भिप्रिया: ।। १९ ।।

अकब्बर कुलोद्भवा दुदिततापसंतापिता
द्दिवाकरकरा दिव प्रथितकीर्त्युपघ्नादपि ।
यदंबुवहगर्जितश्रवणा निश्चयातेधुना
तपक्षायविनिश्चयात् परमनिर्वृत्तिं भेजिरे ।। २० ।।

पिधाने दीनानां श्रियामिह ददाते धनकृतां
लसद्दर्भे यस्य स्फुरति करगर्भे मृतमति
हरे रेषा योषा सपदि कमलार्हत्कमला-
दुवेत्यैतद्भिक्षावधि वसति लक्षाधिकधने ।। २१ ।।

अवरंगजेब यवनाधिप भीतविप्र
भाजाय य: परिगृहीत नवावतार: ।
अन्योस्ति वा मलयभूवलयात् समुद्रात्
सुभाम्रभीत गिरिरक्षण दीपित: क: ।। २२ ।।

शिशुंगवंशोद्भव वीरसेधेय: क्षात्रजातिं प्रकटीचकार ।
विजित्य सर्वान्धरणीपतींश्च योधारय छत्रमभाव्दाता ।। २३ ।।

अज्ञानसिंधौ पतितान्स्मृतींश्च समुद्दधारार्जुनया स्वकृत्या
वेदाग्निमग्नानुदधौ युगादौ यथैव विष्णु: क्रमठस्वरूप: ।। २४ ।।

कायस्थप्रभुवंशज: समभवत्तस्य प्रधानो धिया
बालाजीति समस्तकार्यकरणोदारो महोत्साहकृत ।
यस्याज्ञामुपयाति राज्यमखिलं सामाद्युपायै: स्फुटै
र्नत्याधैश्च सुगोपितैरपि रिपुन्संबाधते हर्निशं ॥ २५ ॥

आवूजी प्रभूतो मनीषाया यो
मनीषिगणनागत्यतामियात्
किं च धिषाण गिरोपि धिक्कृतिं
नीतिमार्गगधिया स्वया करोत् ॥ २६ ॥

तेन श्री शिववर्मणा नृपतिना स्वाध्यक्षतां प्रापितो
बालाजी समकारय छुमयति: कायस्थधर्मोदयं ॥
मीमांसार्णवसारगामिव च सा विश्वेश्वरेणादराद
गागाभट्ट पराभिधेन सुकृतानुष्ठानसंसिध्दये ॥ २७ ॥

ततो निबंधानवलोक्य भूयो -
भूमश्च हेमाद्रिमतं विचिंत्य ॥
कायस्थधर्मांचरण प्रदीपं
गागाभिधस्तं प्रकटीचकार ॥ २८ ॥

ब्रह्मांडाखंडदंडा श्री बल्लाळ शुभेच्छया ॥
कायस्थधर्मदीपोयं गागाभट्टेन निर्मित: ॥ ॥ श्री ॥
॥ श्री: ॥ ॥ श्री: ॥ ॥

(भा.इ.सं.मं. पुणे च.सं.वृ. शके १८३८
संपा. व प्रका. खं.चिं. मेहेंदळे व दत्तो वामन पोतदार
भाद्रपद शु ११।१८३९ ले.संपादित - वि.का. राजवाडे)

सातारकर महाराजांच्या दप्तरात गागाभट्टकृत कायस्थधर्मदीप नावाची पोथी सापडली. त्याची एकंदर ५० पाने असून यात दोन प्रकरणे आहेत. १) कायस्थधर्मदीप व २) शिवराजप्रशस्ति.

वर श्री. गागाभट्टकृत श्रीशिवप्रशस्ति दिलेली आहे. तिचा सारांश पुढीलप्रमाणे आहे.

१) पहिल्या श्लोकात शिवाजीचे कुलदैवत शंभु महादेव याची प्रार्थना किंवा नांदी गायलेली आहे.

२) दुसऱ्यात रायगडाचे वर्णन आहे.

३) तिसऱ्यात रायगडावरील राजधानीचा उल्लेख आहे.

४) शहाजीचा उल्लेख क्षात्रधर्माचा नवावतार म्हणून केला असून रायगडावर शहाजी होता असे अनैतिहासिक विधान केलेले आहे.

५) जनजीवनदान हेतु व सकलारिविनाशिनी ही विशेषणे मातुःश्री जिजाबाईला लावली आहेत.

६) शिवाजीची कीर्ति दिगंत पसरली.

७) यवननाशक, लोकमाता, करुणासागर ही विशेषणे शिवरायास लावून बहलोलखानाची छाती फोडणाऱ्या शिवाजीने सर्व ब्राह्मणांची स्थापना केली, असे म्हटले आहे.

८) दिल्लीश्वराचा क्रोध पेटविणारा असे शिवाजीला विशेषण वापरले आहे.

९) शिवाजीचे नाव घेताच औरंगजेबाला कंप सुटतो.

१०) परशुरामाच्या भयाने त्रस्त झालेले क्षात्रियकुल शिवाजीच्या छत्राखाली विश्राम पावले. यवनकुलाचा नाश होताना पाहून दिल्लीश्वराचे हृदय कळकळायास लागले.

११) शिवाजीच्या भयाने गोवळकोंडेकर त्वरगिरीत लपला, विजापूरकर पातशाहाने यमसदन पाहिले, दिल्लीश्वराने हिमाल्याकडे महापथाची आसना केली.

१२) शिवाजीची सत्ता पश्चिमसमुद्रावर बसली.

१३) शिवाजीचे औदार्य व दानशूरता.

१४) शास्त्रे व श्रुति यांचे रक्षण करून शिवाजीने नवी सृष्टी निर्मिली.

१५) दानशूरता.

१६) औरंगजेबाच्या जुलूमापासून ब्राह्मणांचे रक्षण केले.

१७) ` शिसोदे ` याबद्दल ` शिशुंग ` असा शब्दप्रयोग वापरला आहे.

१८) पूर्वी कमठरूप धारण करून विष्णूने वेद तारले, तद्वतच शिवाजीने स्मृतींचा समुध्दार केला.

१९) बाळाजी आवजीचे वर्णन.

२०) गागाभट्टापरनामा जो विश्वेश्वर त्याच्याकडून बाळाजी आवजीने कायस्थधर्मदीप ग्रंथ करविला.

२१) हेमाद्रीचा चतुर्वर्गचिंतामणि व इतर निबंध पाहून हा ग्रंथ रचला.

२२) समाप्तीचा श्लोक.

यामध्ये दिसून येणारी वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे -

१. मुसलमानांचा निर्देश दैत्य या नांवाने केला आहे.

२. शिवाजीने ब्राह्मणांचे रक्षण, स्मृतींचा व शास्त्रांचा उध्दार केला.

३. गागाभट्टासारख्या विद्वानाच्या मते ब्राह्मणांचे रक्षण व स्मृतींचा उध्दार ही शिवाजीची थोर कामगिरी होय.

४. शाहजी व शिवाजी क्षात्रधर्माचे मूर्तिमंत अवतार असे गागाभट्टांना भासले.

५. विश्वेश्वराचे देवालय औरंगजेबाने उध्वस्त केले. अर्थातच त्याची शिवाजीने त्रेधा उडविलेली पाहून गागाभट्टाला आनंद झाला.

६. सर्वसामान्य प्रशस्तिप्रमाणे ही प्रशस्ती आहे. कारण गागाभट्ट हा जाडा मीमांसक होता. तो काही जातिवंत कवी नव्हता.

७. शके १५९५ मध्ये बहलोलखानाचा शिवाजीने वध केला व शके १५९६ मध्ये राज्याभिषेक करवून घेतला व २१ व्या श्लोकांत शिवाजीने राजछत्र धारण केल्याचा उल्लेख आहे, अर्थातच हा ग्रंथ राज्याभिषेकानंतर रचला गेला असावा.

८. बाळाजी आवजीच्या आग्रहास्तव हा प्रबंध गागाभट्टांनी लिहून दिला असावा.

३) कायस्थधर्मदीपाचा प्रारंभ :

तत्वाभीरकिशोरं चौरं विद्युच्दतोप्यभिख्याया: ।
कायस्थधर्मदीपं गागाभट्ट स्तनोति लीलात: ।। १ ।।

गागाभट्टपराख्यस्य विश्वेश्वरमनीषिण: ।
सुमनो मानसे शर्म मय निर्मातु निर्मिति: ।। २ ।।

तदुपोध्दातत्वेन आदौ जातिनिर्णय: क्रियते ।।
इति कायस्थाचारदीपिकायां जातिविवेक निरूपणं
संस्कार प्रकरणं नंतर स्वस्तिवाचनादिविधि ।
पुण्याहवाचनादि विधि, होमसाधारण प्रयोग,
नवग्रहमप्रयोग, रजोदर्शन, शांति प्रयोग, व
अब्दपूर्तिप्रयोग इतके प्रयोग दिले आहेत.

पुण्याहवाचन) असे लिहिलेले आहे.
अमंत्रक व समंत्रक)

त्यावेळच्या जातीय वादामुळे याची निर्मिती केली असावी. त्याविषयी सविस्तर वर्णन पुढे राज्याभिषेक प्रयोग या लेखात केलेले आहे. म्हणून येथे पुन्हा पुनरुक्ती करीत नाही.

प) <u>शिवार्कोदय</u> :

शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकासाठी काशीचे वेदमूर्ति विश्वेश्वरभट्ट यांना सन्मानाने निमंत्रित करण्यात आले होते. छ. शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक विधीसाठी या गागाभट्ट काशीकरांनी ' राज्याभिषेक प्रयोग: ' या नावाचा धर्मशास्त्र विषयक स्वतंत्र ग्रंथ निर्माण केला व भोसले वंशाचे क्षात्रियत्व सिध्द करण्यासाठी त्यांनी फार मोठे इतिहास संशोधन केले होते. राज्याभिषेक आटोपल्यानंतर शिवाजी महाराजांनी मीमांसाशास्त्र विषयक प्रस्तुत ग्रंथ लिहिण्याचे दायित्व गागाभट्टावर सोपविले होते. जैमिनीच्या पूर्वमीमांसासूत्रावर शबर स्वामींनी जे भाष्य लिहिले त्यावर ' श्लोकवार्तिक ' नामक पद्यात्मक टीका कुमारिल-भट्टांनी लिहावयास घेतली होती. पण पहिल्या अध्यायाच्या प्रथम पादावरील टीका पूर्ण झाल्यानंतर कुमारिलभट्ट दिवंगत झाले. त्यामुळे हे कार्य ७ व्या शतकापासून अपूर्णच राहिले होते. गागाभट्टांची विद्वत्ता ओळखण्याइतकी बुध्दिमत्ता किंवा गुणज्ञता रणपण्डित शिवाजी महाराजांच्या ठिकाणी होती. गागाभट्टाचे मीमांसा पाण्डित्य कुमारिलभट्टाच्या तोडीचे आहे हे जाणून महाराजांनी त्यांना हे खण्डित कार्य पूर्ण करण्याची आज्ञा दिली. यासंबंधात गागाभट्ट म्हणतात -

' यत्कर्मपादे बहुनाग्रहेण श्लोकैः कृतं वार्तिकमार्यवर्यैः ।
गागाभिधेनायमपूरि शेषः तस्याज्ञयाछत्रपतेः शिवस्य ।।

शिवाजी महाराजांची आज्ञा शिरसावंद्य मानून ' चतुर्थाश्रम-भङ्ग.दोष ' घडत असूनही त्याकडे दुर्लक्ष करून वेदमूर्ति गागाभट्टांनी ग्रंथलेखनाचे कार्य केले व ग्रंथाला ' शिवार्कोदयः ' असे मोठे सूचक नांव दिले.

शिवार्कोदयाला गागाभट्टांनी ` शिवछत्रपतीचा यशास्तम्भ ` अशी उपमा एका श्लोकात दिलेली आहे. तो श्लोक असा -

" श्रीमद् भोसल वंश - भूषाणमणि - क्षोणीश - शाहात्मज: -
छत्राधीश - शिवक्षितीश - यशस: स्तम्भो
शिखातो ऽपर: ।।
गागाभट्टमनीषिणा ऽधिकरणिग्रन्थ: शिवार्कोदयो
येनाब्धदयशोध्वजेन सकलैवास्वेति लोकत्रयी ।। "

शिवाजी महाराजांच्या प्रेरणेने लिहिलेल्या शिवार्कोदया-व्यतिरिक्त गागाभट्टांनी लिहिलेल्या ` दिनकरोद्योत ` यामध्ये आचार, अशौच, कालदान, पूर्त, प्रतिष्ठा, इष्टापूर्त, प्रायश्चित, वर्णकृत्य, व्यवहार, व्रत, शूद्र, श्राध्द आणि संस्कार हे भाग आहेत. ` निरूढप्रतिबन्ध प्रयोग, ` ` पिण्ड पितृ प्रयोग, ` ` कायस्थधर्मप्रदीप, ` ` सुज्ञानदुर्गोदय ` (षोडश संस्कार विषायक) हे धर्मशास्त्रविषायक ग्रंथ आणि मीमांसा कुसुमाञ्जलि, भट्टचिन्तामणि हे महत्वपूर्ण अर्वाक शास्त्रीय ग्रंथही गागाभट्टांनी लिहिलेले आहेत.

श्री. गागाभट्टांनी रचलेला ` शिवार्कोदय ` म्हणजे श्री. शिवाजी महाराजांनी विद्यावृध्दीला दिलेले एकप्रकारचे उत्तेजनच आहे. म्हणून आता त्या ग्रंथातील कांही श्लोक उद्धृत करीत आहे.

" गागाभट्टविरचित: शिवार्कोदय: "

धरित्रीपुत्री दुग्विहरणा पवित्रीकरणाकृत
कटाक्षाणां पात्री मुनिमखविधात्री सपदि सा ।

भवित्री मन्चेतोभवनमलहर्त्री दिविपदा -
ममीतिदात्रीयं दशाब्दनहंस्त्री प्रतिकृति: ।। १ ।।

श्रीमन्दोसल वंशभूषाणमणि क्षोणीश शाहात्मज:
क्ष्माधीश शिवक्षितीशयशस: स्तंभो निखातोपर:
गागाभट्ट मनीषिणाधिधरणिग्रंथ: शिवार्कोदयो
येनाछ्छदयशोध्वजेन सकलैवास्वेति लोकत्रयी ।। २ ।।

पूर्वोक्तयुक्त्या च निषेधतोपि सभा तथान्यार्थ निदर्शनाच्च ।
आर्त्विज्यमिष्टं खलु विप्रनिष्ठं भवेन्न वर्णत्रयगं कदाचित् ।।
श्रीभट्टनारायणवंश जंबुद्वीपोभ्थ गागाभिधभट्टमेरो: ।
स्पुनटे शिवार्कोदय नामभाज्यभूद् द्वादशाध्याय चतुर्थपाद: ।।
प्रारम्भयत्न इह य: खलु कारिकाभि -
रछदाप्रतिभ - विदूषणाय (रछदाप्रतिप्रतिभधाम विदूषणाय)
दु:खं सतां तदसमाप्तिकृतं शिवेन
छत्राधिपेन सुविचिंत्य समापित: स: ।।

यत्कल्पादे बहुन (पादैर्बहु) नाग्रहेण श्लोकै: कृतं वार्तिकमार्यवर्यै: ।।
गागाभिधेनायमपूरि शेषा: तस्याग्नथ (ग्र) या छत्रपते: शिवस्य ।
तस्यानुरोधादिह वादिवर्णाधिक्ये चतुर्थाभ्र (श्रम) भंगदोषा: ।
गुणास्तु विद्वत्कविकंठयाप्तो दुष्टोपि पुण्योभ्रि (ब्धि) गत -
(प्र) वाह: ।।

इति श्री मन्नारायणभट्टसूरिसुनु श्री मद्रामकृष्णात्मजभट्ट
दिनकरसुत गागाभट्टकृत: शिवार्कोदय: समाप्त: ।।

श्री शिवाजी महाराजांच्या राज्यारोहण प्रसंगी अभिषेकसंस्काराचे कार्यात प्रामुख्याने पुढाकार घेतलेले सकलवेदशास्त्रपारंगत काशीस्थ पंडित विश्वेश्वरभट्ट अथवा गागाभट्ट यांनी ` शिवार्कोदय: ` नांवाचा ग्रंथ लिहिला आहे. या ग्रंथासंबंधी माहिती देणारे श्लोक याच ` शिवार्कोदय: ` ग्रंथातून घेतलेले असून ते वर निर्दिष्ट केलेले आहेत.

प्रस्तुत ग्रंथाची प्रत अलवार संस्थानच्या महाराजांचे हस्तलिखित ग्रंथ संग्रहालयांत आहे.

(Catalogue of the Sanskrit Manuscripts in the Library of His Highness The Maharaja of Ulwar by Peter Peterson M.A.D.Sc. Bombay 1892 pp. 37-38).

आपल्या मीमांसा शास्त्राचे दोन भाग आहेत. पूर्वमीमांसा व उत्तरमीमांसा. पूर्वमीमांसा जैमिनीनिर्मित असून ती यज्ञयागादि कर्ममार्ग प्रतिपादनात्मक आहे. उत्तरमीमांसा व्यासप्रणीत असून वेदांतपर आहे. ह्या जैमिनीकृत पूर्वमीमांसासूत्रावर शबरस्वामींचे गद्यात्मक भाष्य असून त्या भाष्यावर श्रीकुमारिलभट्टांच्या टीका आहेत. पहिल्या अध्यायाचे पहिल्या पादावर केलेली पद्यात्मक टीका ` श्लोकवार्तिक ` या नांवाने प्रसिध्द आहे. दुसरी टीका ` वार्तिक ` म्हणून पहिल्या एक ते तीन अध्यायांवर आहे. याशिवाय त्यांचीच एक तिसरी ` टूपटीका ` म्हणून आहे. श्लोकवार्तिकटीका पुरी करण्यापूर्वीच श्रीकुमारिलभट्ट दिवंगत झाले. ही गोष्ट विद्वानांच्या मोठ्या दुर्भाग्याचीच होय, असे गागाभट्ट वरील श्लोकांत म्हणतात. ह्या श्लोकवार्तिक टीकेचे भोसलवंश भूषण, शहाजी महाराज यांचे आत्मज, श्री छत्राधीश शिवाजी महाराज यांनी अतिशय आग्रहाने केलेल्या विनंतीस मान देऊन आश्रमभंगदोषाचे पातक पत्करून, ` शिवार्कोदय ` नामक टीका करून

नूतनीकरण केले, असे गागाभट्टांनी दिलेल्या वरील श्लोकांतील माहितीवरून स्पष्ट होत आहे.

श्रीहर्षादि मोठमोठ्या राजांनी व सार्वभौमांनी ग्रंथकारांस राजाश्रय देऊन ग्रंथनिर्मिती केल्याची पुष्कळ उदाहरणे आहेत. परंतु ह्या राजांनी आश्रय देऊन ग्रंथ करविले व शिवछत्रपतींनी उत्तेजन देऊन ग्रंथरचना करविली, यामध्ये एक मोठा विशेष आहे. हर्षादि राजांनी आपल्या आवडत्या विषयावर नाट्य-कादंब-यादि ग्रंथ निर्माण करविले व वाङ्मयात भर घातली. छत्रपतींची गोष्ट तशी नाही. त्यास हिंदवी स्वराज्य स्थापून 'हिंदवधर्म' जो महाराष्ट्र धर्म याचे रक्षण करावयाचे होते. या ध्येयास अनुसरून त्यांनी राजव्यवहारकोश, करणकौस्तुभ, शिवभारत व शिवार्कोदय हे ग्रंथ तयार करविले. स्वराज्याचे मुख्य जीवन जी स्वभाषा तिचे शुध्दीकरण पं. रघुनाथ हणमंते यांच्याकडून करवून घेऊन 'राजव्यवहारकोश' तयार करवून घेतला. आचारधर्मपालनाचे मुख्य अंग जे पंचांग त्याच्या शुध्दीसाठी कृष्णज्योतिषी यांच्याकडून 'करणकौस्तुभ' ग्रंथ तयार करवून घेतला व सर्व लोक आचारधर्मकर्मक्षम व्हावे, म्हणून हा 'शिवार्कोदय' हा ग्रंथ गागाभट्टांचे कडून तयार करविला. ह्यावरून शिवाजी महाराजांनी केवळ वाङ्मय सजविण्यासाठी ग्रंथास उत्तेजन न देता राज्याच्या बळकटीचे हे एक मोठे अंग आहे, ह्या विशिष्ट धोरणाने ग्रंथ करविले. हे ह्या चार ग्रंथातील अंतर्गत पुराव्यावरून स्पष्ट होत आहे.

छत्रपतींनी हे जे ग्रंथ तयार करविले ते सर्व संस्कृत गीर्वाण भाषेतच आहेत. यावरून छत्रपती शिवाजी महाराजांचे संस्कृत भाषेवरील आदर व प्रेम चांगले व्यक्त होते. त्यांनी आपले स्वतःचे चरित्र परमानंद कवीकडून करवून

त्यास शिवभारत हे नांव देऊन तो ग्रंथहि संस्कृतातच करविला, ही गोष्टी ही वरील विधानासच पुष्टि देत आहे.

प्रारंभी दिलेल्या श्लोकात ` छत्राधीश शिव,` ` शिवेन छत्राधिपेन,` ` छत्रपते: शिवस्य,` अशी शब्दरचना आहे. यावरून हा ` शिवार्कोदय ` ग्रंथ राज्यारोहणानंतर लिहिला गेला हे उघड आहे.

आणखी एक नवीन गोष्ट येथे नमूद करणे जरूर आहे. ती म्हणजे ` गागाभट्टांनी शके १६०३ म्हणजे इ.स. १६८१ मध्ये ` समयनय: ` नांवाचा नीतीपर ग्रंथ संभाजीकरतां तयार केला. ` असे वर्णन जर्मन संस्कृत ग्रंथसूचीकार ` औफ्रेक्ट` आपल्या सूचीच्या दुसऱ्या भागाच्या १३९ पृष्ठावर म्हणतो. ह्या ग्रंथाची प्रत इटालीतील फ्लॉरेन्स येथील हस्तलेख संग्रहात आहे.

(Catalogus Catalogorum by Therdor Aufrecht Part-II. Printed for the German Oriental Society Leipzig, 1896, p. 139).

हा ग्रंथ छत्रपतींच्या निधनानंतर लवकरच लिहिला गेला असल्यामुळे व तो नीतिपर असून संभाजीकरतां लिहिला असल्यामुळे पितापुत्रांच्या चरित्रावर नवीन प्रकाश टाकणारा ठरेल, यात संशय नाही.

आणि तो मला भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिर, पुणे येथील हस्तलिखित विभागामध्यें मिळाला असून पुढे ` हस्तलिखित संस्कृत शिव साहित्य ` या विभागामध्ये तो उद्घृत करणार आहे. तेव्हां अभ्यासकांनी व इतिहास संशोधकांनी त्याबद्दल विचार करावा.

पन) <u>करणकौस्तुभ</u> :

शिवशाहीत भाषाशुध्दीसाठी ` राजव्यवहारकोश ` तयार करण्यात आला. त्याचप्रमाणे पंचांगशुध्दीसाठी ` करणकौस्तुभ ` नांवाचा ग्रंथ मुद्दाम कृष्णज्योतिष्याने रचला. ही गोष्ट कै. शंकर बाळकृष्ण दीक्षित यांनी भारतीय ज्योतिःशास्त्र या ग्रंथात (पृ. २९०।२९१) प्रथम मराठी वाचकांपुढे मांडली. तेव्हांपासून गेल्या तीस वर्षात हा ग्रंथ मिळवून प्रकाशित करण्याची व्यवस्था झाली नाही. याचे कारण, सदर करणग्रंथ ` तंत्ररत्न ` नांवाच्या ह्याच ग्रंथकाराच्या मोठ्या पुस्तकाचा संक्षेप आहे व या मोठ्या ग्रंथाची हस्तलिखित प्रत कै. दीक्षितांच्या किंवा इतर कोणाच्याही पाहण्यात अद्याप आलेली नाही. यामुळे करणकौस्तुभातील शंकांचे निरसन करून घेण्याचे उत्तम साधन अज्ञात स्थितीत आहे. येथे ` करणकौस्तुभा ` संबंधी काही माहिती नमूद करून ठेवीत आहे.

या ग्रंथात चौदा भाग उर्फ अधिकार आहेत. त्यांची नावे अशी - १) मध्यमग्रहसाधन, २) सूर्यचंद्रस्पष्टीकरण, ३) पंचतारा स्पष्टीकरण, ४) त्रिप्रश्न, ५) चंद्रग्रहण, ६) सूर्यग्रहण, ७) तिथिपत्रावरून ग्रहणसाधन, ८) उदयास्त, ९) ग्रहच्छाया, १०) चंद्रशृंगोन्नति, ११) ग्रहयुति, १२) नक्षत्र-छाया, १३) पात, १४) पातसंभवासंभवलक्षण यावरून त्याची मांडणी ठोकळ मानाने ग्रहलाघवी पध्दतीची आहे, हे दिसते. प्रारंभी " वन्दे केशवदैवज्ञ-सार्वभौमपदांबुजम् । " असे नमन केले आहे. यावरून कृष्ण ज्योतिषी ग्रहलाघवकाराच्या पित्याच्या म्हणजे केशवाच्या ग्रंथाविषयी आदरभाव बाळगणारा दिसतो. परंतु ग्रहलाघव ग्रंथ शके १४४२ मध्ये रचला गेल्यानंतर, शे-सवाशे वर्षात त्याचा दृक्प्रत्यय येत नाही, अशी तक्रार सुरू झाली.पण

ही उणीव दूर होण्यासाठी नवीन ग्रंथरचना करणारा नामांकित ज्योतिषी स्वयंस्फूर्तीने पुढे आल्याचे दिसत नाही. तथापि शिवाजी महाराजांच्या दरबारांत विद्यावृध्दीकडे लक्ष देणारे लोक असल्यामुळे त्यांनी असा ग्रंथ रचण्याचे काम कृष्णज्योतिष्यास सांगितल्यावरून त्याने हा ग्रंथ रचला असे.

" प्रकुरू तत्करणं ग्रहसिध्दये । सुगमदृग्गणितैक्यविधायि यत्
इति नृपेंद्र शिवभिधेतोदित: ।। प्रकुरूते कृतिकृष्ण विधिज्ञराट् ।। "

असे या श्लोकावरून दिसते.

यांत गणिताचे प्रारंभीचे वर्ष १५७५ धरले असून क्षेपक त्या सालच्या मेषसंक्रमणाच्या वेळचे दिले आहेत. पण इतरत्र न दिसणारी गोष्ट अशी की, यांत सप्तर्षीचे क्षेपक ६ रा. ११ अं. ३० क. दिले असून त्यांची वार्षिक गति ८ कला म्हणजे १०० वर्षांत एक नक्षत्र अशी सांगितली आहे. सप्तर्षीकालाची गणना काश्मीराखेरीज इतर प्रदेशांत असल्याचे दिसत नाही. असे असून महाराष्ट्रांतील या ज्योतिष्याने ही कालगणना कां सांगितली ते समजत नाही.

ग्रहलाघवकारांनी ज्याचापाशिवाय गणित करण्याचा पाया घालून आमच्या ज्योतिष्यांना शास्त्राच्या उपपत्तीकडे दुर्लक्ष करण्याची सोय करून ठेवली. असा जो आरोप गणेश दैवज्ञावर केरोपंतानी आणला होता, तो या ग्रंथाच्या बाबतीत लागू पडत नाही. कारण यात ज्याचापाचे सहाय्य गणितास घेतले आहे. आणि ज्यापिंड १० अंशाचा मानून त्याच उपयोग ब-याच ठिकाणी केला आहे.

ग्रहलाघवकाराने ११ वर्षांचे चक्र मानून अहर्गण ४०१६ पेक्षा वाढू न देण्याची व्यवस्था केली आहे. करणकौस्तुभकाराने १ वर्षाचेच चक्र योजल्यामुळे अहर्गण ३६५ पेक्षा वाढणार नाहीत व अहर्गणाचे गणित करण्यास त्रास कमी

पडेल हे खरे, पण वर्षगति काढण्यास अधिक खटाटोप पडेल असे वाटते.

यात वर्षमान सांप्रतच्या सूर्यसिध्दांतानुसार म्हणजे ३६५ दिवस १५ घ. ३१ प. ३१ वि. २४ प्र.वि. आहे. शून्यायनांशाचे वर्ष शके ४५० धरले असून वर्षागति ६० विकला धरली आहे. (नक्षत्रभोग) ग्रहलाघवाप्रमाणे आहेत. मात्र भरणी (२० अं.) व आश्लेषा (१०८ अं.) यांच्या भोगांत १ अंशाचा व मघाच्या (१२७ अं.) भोगांत २ अंशाचा फरक आहे.

कृष्णदैवज्ञाने ग्रंथाच्या शेवटी स्वतःची माहिती सांगताना प्रारंभी कश्यप ऋषीचे महत्व वर्णन करून अशी हकीकत दिली आहे.

" तदन्वये पावन एव तत्र वंशावतंसोऽभवदुन्नतांसः ।
श्रीमन्महाज्योतिषि विद्वत्प्रथो नाम्ना महादेव इति प्रसिध्दः ।।

तज्जाया किमु जान्हवी विजयते बर्वाई नाम्नी सदा ।
तस्यां तज्जनितः सुपुण्यनिचयः श्रीरंगनाथानुजः ।।

कृष्णः कौंकणसत्पटाकनगरे देशस्थवर्यो वसन् ।
तेनायं करणेषु कौस्तुभ इति ग्रंथ कृतो धीमता ।। "

यावरून कृष्ण दैवज्ञाच्या बापाचे नांव महादेव, आईचे बर्वाई, वडील भावाचे रंगनाथ असे असून हा देशस्थ ब्राह्मण ' सह्याद्रिसंनिध मावळात राहणारा ' होता असा कै. दीक्षितांचा अभिप्राय आहे. पण ' कौंकण-सत्पटाकनगरे ' याचा अर्थ अद्याप मनाजोगा लागला नाही असे वाटते. (शिवचरित्र प्रदीप - शिवशाहीतील पंचांगशुध्दी - द.वि. आपटे, पृ. २१९ ते २२१).

(ता.क. ` तंत्ररत्न ` हा ग्रंथ अद्याप सापडलेला नाही. मुंबई प्रा. रवींद्र रामदास हे सध्या तो शोधण्याचा प्रयत्न करीत आहेत.)

ब) राज्यव्यवहार कोश :

फारसी, उर्दू वगैरे यावनी भाषांचा अत्यंत प्रचार झाल्यानंतर तत्कालीन प्रादेशिक भाषांचे स्वरूप अत्यंत विकृत झाले होते. अशा परिस्थितीत संस्कृत भाषेचा उध्दार प्रयत्नपूर्वक करणारे अनेक राजे भारतात होते. अशा सर्व संस्कृतसेवक राजपुरुषांमध्ये छत्रपति शिवाजी महाराजांचे स्थान फार मोठे आहे. स्वराज्यस्थापनेच्या महान संघर्षातहि शिवाजी महाराजांचे लक्ष संस्कृत भाषेकडे होते. त्या भाषेचे राष्ट्रीय व सांस्कृतिक दृष्टया असाधारण महत्व महाराजांच्या क्रान्तदर्शी दृष्टीला १७ व्या शतकातही दिसत होते. व म्हणून त्यांनी आपल्या राज्यामध्ये संस्कृत भाषेचा उध्दार करण्याच्यादृष्टीने मोठे महत्वाचे कार्य केले. महाराजांच्या प्रत्यक्ष प्रेरणेने त्याकाळी बरेच महत्वाचे संस्कृत ग्रंथ निर्माण झाले. त्यापैकी ` राज्यव्यवहार कोश ` हा एक ग्रंथ आहे.

स्वराज्य स्थापन होताच, उर्दूच्या प्रभावामुळे कलुषित झालेल्या मराठी भाषेच्या शुध्दीकरणाचे कार्य महाराजांनी आरंभिले. त्यासाठी महाराजांनी पं. रघुनाथ हणमंते यांच्याकडून प्रस्तुत ` राज्यव्यवहार कोश ` लिहवून घेतला. राज्यव्यवहारामध्ये सर्वत्र रूढ झालेल्या परकीय शब्दांचे उच्चाटन करून त्या जागी संस्कृत भाषेतील शब्द रूढ करण्याची महाराजांची आकांक्षा होती व म्हणूनच त्यांनी रघुनाथ पंडिताला हा ` राज्यव्यवहार कोश ` लिहिण्याच्या कामी नियुक्त केले होते. त्यासंबंधीचा उल्लेख :

" कृते म्लेच्छोच्छेदे भुवि निरवशेषं रविकुला-
वतंसेनात्यर्थं यवनवचनैर्लुप्तसरणिम् ।
नृपव्याहारार्थं स नु विबुधभाषां विततितुं
नियुक्तोऽभूद् विद्वान् नृपवरशिवच्छत्रपतिना ।
सोऽयं शिवछत्रपतेरनुज्ञां मूर्धाभिषिक्तस्य निधाय मूर्ध्नि ।
अमात्यवर्यो रघुनाथनामा करोति राज्यव्यवहार कोशम् ॥"

या दोन श्लोकांमध्ये स्वच्छ शब्दांत पं. रघुनाथ हणमंत्यांनी केलेला आहे. प्रथम श्लोकाच्या तिसऱ्या ओळीत शिवाजी महाराजांची संस्कृतविषयक आकांक्षा अभावितपणे व्यक्त झालेली आहे. ' नृपव्याहारार्थम् ' म्हणजे राजाच्या बोलण्यामध्ये संस्कृत भाषेचा वापर व्हावा, या हेतूने शिवाजी महाराजांनी हा कोश लिहवून घेतला होता, हे उघड आहे. या कोशाची कांहीशी कल्पना पुढील उदाहरणावरून येऊ शकेल.

" राजा ज्ञेयः पादशाहः स्वामी साहेब ईरितः
अन्तःपुरं तु दर्न्नीत्याहुर्यवनभाषया ॥
युवराजः परिज्ञेयो वलीयहद नामकः ।
शाहजादा राजपुत्रः प्रधानः पेशवा तथा ॥" इ.

या छंदोबद्ध कोषात अमरकोशातील वर्गाप्रमाणे १० वर्ग असून त्यामध्ये बहुजन समाजाच्या तोंडी रूळलेल्या म्लेंच्छभाषीय शब्दांचे वरीलप्रमाणे पर्याय दिलेले आहेत. रघुनाथपंताच्या या भाषाशुद्धीच्या उद्योगाचा उपहास कांही लोकांनी केला असावा असे दिसते. त्यांना उत्तर देण्यासाठी रघुनाथपंतानी पुढील सुभाषित आपल्या कोशात लिहिलेले आहे -

" विपश्चित्सम्मतस्यास्य किं स्यादज्ञविडम्बनैः ।
रोचते किं क्रमेलाय मधुरं कदलीफलम् ॥"

अशाप्रकारे विरोधकांना काटे खाणाऱ्या उंटाची उपमा देऊन रघुनाथपंतानी निरूपण केले आहे. ` राज्यव्यवहारकोश,` ` करणकौस्तुभ,` ` शिवार्कोदय,` ` शिवराज - प्रशस्ति,` हे ग्रंथ छ. शिवाजी महाराजांना राज्याभिषेक झाल्यानंतर त्यांच्या आज्ञेने निर्माण झाले असल्यामुळे इ.स. १६७४ नंतर निर्माण झाले असले पाहिजे व ते समकालीन असल्यामुळे वर उल्लेखिलेल्या निरनिराळ्या दृष्टीने शिवचरित्रावर वेगळा प्रकाश टाकणारे म्हणून फार महत्वाचे ठरतात. म्हणून कालदृष्ट्या ते ` शिवभारत ` व ` पर्णालपर्वतग्रहणाख्यानम् ` यानंतर महत्वाचे ठरतात व गुणदृष्ट्या ते फार महत्वाचे आहेत.

म) बुधभूषणम् :

१९१० मध्ये बी.बी.आर.ए.एस. चे संस्कृत व प्राकृत हस्तलिखितांचे वर्णनात्मक कॅटलॉग तयार करण्याचे काम श्री. वेलणकर महोदयांकडे सोपविण्यात आले होते. त्यावेळी त्यांना शिवाजीचा मुलगा ` संभाजी ` याने लिहिलेले ` बुधभूषण ` नावाचे एक अपूर्ण हस्तलिखित आढळून आले. राजा संभाजी यांच्या नावाशी फक्त धाडसाची व दुष्टत्वाची कृत्ये निगडित असल्यामुळे ही गोष्ट तशी धक्कादायकच होती. संपूर्ण ग्रंथाचा अभ्यास केल्यानंतर एक गोष्ट अशी आढळते की, त्यामध्ये वाङ्मयीन वा ऐतिहासिक महत्वाचे असे उल्लेख फार थोडेच आहेत. त्याचप्रमाणे छ. संभाजीचा लेखनकौशल्य हा गुण हा ग्रंथ सिद्ध करीत नव्हता, तरीपण संभाजीने लिहिलेला ग्रंथ म्हणून याला फार महत्व आहे.

जरी स्वतंत्र नसले तरी तीन विभागांत हा ग्रंथ विभागलेला आहे. पहिल्या विभागात १९४ श्लोक असून ती बहुतेक सुभाषिते आहेत. प्रामुख्याने

ती मान्यवर लेखकांची अवतरणे असली तरीसुध्दा पुष्कळ वेळा त्यांचे मूळ सांपडत नाही. पहिले १७ श्लोक हे प्रस्तावनापर असून संभाजीचा व त्याच्या घराण्याचा थोडक्यांत इतिहास सांगणारे आहेत. चांगल्या सोप्या संस्कृतमध्ये ते लिहिलेले असून नंतरची ११ कडवी ही भवानी देवीची प्रार्थना असून ती छ. संभाजीने स्वत:च लिहिलेली आहे. यापैकी पहिले ६ श्लोक गजानान, शंकर, गुरु आणि पार्वती यांचे प्रार्थना करणारे श्लोक आहेत. पुढले दहा श्लोक जास्त महत्वाचे असल्यामुळे ते दहा श्लोक व त्याचे भाषांतर येथे उदधृत करीत आहे. ते असे आहेत -

भूशब्दा (ला) न्वयसिन्धुसुधाकर: प्रथितकीर्तिरुदार पराक्रम: ।
अभवदर्थकलासु विशारदो जगति शाहनृप: क्षितिवासव: ।। ७ ।।

येनाकर्ण-विकृष्ट कार्मुक कलत्काण्डावलीकिर्तित -
प्रत्यर्थिक्षितिपालमौलि निवहैरम्यर्चि विश्वंभरा
यस्यानेक वसुंधरा परिवृढप्रोद्गूढ. चूडामणे
पुत्रत्वं समुपागत: शिव इति ख्यात: पुराणो विभु: ।। ८ ।।

कलिकालभुजंगमावलीढं निखिलं धर्ममवेक्ष्य विह्वलं य: ।
जगत: पतिरंशतोवतार्णो: (तीर्ण:) स शिवच्छत्रपतिर्जयत्यजेय: ।। ९ ।।

येन क्षोणितले कलावविकले बुध्दावतारं गते
भूयस्तत्परिपालनाय सकलाञ्जित्वा सुरद्वेषिण: ।
स्वे स्वे वर्णपथे चिरेण विहिता विप्रादिवर्णा: क्रमात् ।। १० ।।

आकर्णाटकदेशतो गिरिवरे सह्येण्यसह्ये परे -
दुर्गाणि क्षितिपालनाय नृपतेर्यो बागलाणावधि ।

आकृष्णातटमासमुद्रमभित: कृत्वा कृती दुर्गमि
दुर्गे रायरिसंज्ञके विजयते भूमीभृतामग्रणी: ॥ ११ ॥

आपूर्वाचल पश्चिमाम्बुधिमथाप्यासेतु शीताचलं
निर्जित्यावनिमण्डलं च करदीकृत्याखिलान्भूमिपान् ।
श्रौतं धर्ममवाप्य साम्प्रदेहदितं राजाभिषेके परं
छत्राद्यैर्नृपलक्षणैरनुदिनं सिंहासने राजते ॥ १२ ॥

नानादेशसमागतान् द्विजवरान्येनाभिषेकोत्सवे ।
संतर्प्याकुलतोलिते बहुधनै वस्त्रैः गजैर्वाजिभि: ।
चन्द्र प्रेरित चन्द्रिकेव विमला गेया बुधैर्वन्दिभि:
कीर्ति: सर्वदिगन्तरेषु जयिना विस्तारिता भूभृता ॥ १३ ॥

सोयं यस्य गडो नरेन्द्रवहितैः प्रासादहर्म्यैरटै (?)
म्यरापणा (रम्यैरापण ?) चत्वैरश्च परित: पूर्णै: सरोभिर्नवैः ।
विद्वद्वैदिक वैद्यवर्यगणकैराढ्यश्च सन्मान्त्रिभि: ।
सैन्यैश्चापि चतुर्विधैरगणितैर्भाति प्रतापान्वितै: ॥ १४ ॥

तस्यात्मज: शंभुरिति प्रसिध्द:
समन्तसामन्तशिरोवसन्त: (वतंस:) ।
य: काव्यसाहित्य पुराणगीतकोदण्ड विद्यार्णव पारगामी ॥ १५ ॥

विविच्य शास्त्राणि पुरातनानामादाय तेभ्य: खलु सोममर्थम् ।
करोति सद्ग्रन्थममुं नृपाल: स शम्भुवर्मा बुधभूषणाख्यम् ॥ १६ ॥
विविच्य सन्त: कृतिमस्मदीयां गृह्णन्तु सच्चासदसच्च जन्तु (त्यजन्तु) ।
क्षीराद्वियुक्तं परिहृत्य नारीं (नीरं) क्षीरं भजन्ते खलु राजहंसा: ॥ १७ ॥

७) शहाजी नांवाचा एक राजा होता. तो पृथ्वीवरचा इंद्रच होता. राजकारण व कला यामध्ये निपुण होता. त्याने धाडसाची व उदारपणाची अनेक कृत्ये केली. तो अत्यंत प्रसिध्द होता. भृशळ घराण्याच्या सागरातून उगविणारा तो चंद्र होता.

८) अनेक विरोधी राजांच्या मस्तकांचे बलिदान करून त्याने पृथ्वीची पूजा केली. ही डोकी त्यांच्या धडापासून त्याच्या धनुष्यातून सुटलेल्या बाणांच्या वर्षावाने अलग झालेली होती. अशा या राजाच्या पोटी असंख्य राजपुत्रांपैकी अत्यंत मौल्यवान असे रत्न विष्णूचा अवतार असा पुत्र जन्माला आला. व तो शिवाजी या नावाने ओळखला जातो.

९) शिवाजी सतत विजयी, अविरोध असा छत्रपती, सर्व जगाचा पती (विष्णू) असा होता. संपूर्ण धर्म कलियुगरूपी भयंकर विषारी सर्पांच्या दंशामुळे संकटात सापडलेला होता. त्यामुळे त्याने (विष्णूने) अवतार धारण केला.

१०) म्लेंच्छामुळे त्रस्त झालेल्या जातीधर्मांच्या उध्दार व संरक्षण करण्याच्या हेतूने त्याने ब्राह्मण व इतर जातींना त्यांच्या संबंधित जीवनामध्ये दृढ असा आधार दिला. त्यासाठी त्याने देवांच्या शत्रूंचा पराभव केला. कली हा पृथ्वीवर सर्व शक्तिशाली असताना गोपालाचा बुध्दावतार धारण करून हे कार्य केले.

११) कर्नाटक व बागलाण यांच्यामध्ये व कृष्णा नदी व अरबी समुद्र यांच्यामध्ये सह्याद्री नावाच्या, शत्रूंना न जिंकता येण्याजोग्या अशा चांगल्या पर्वतामध्ये पृथ्वीचे संरक्षण करण्यासाठी त्याने अनेक किल्ले बांधले. असा हा राजाधिपती रायगड नांवाच्या त्यांच्या अजिंक्य अशा किल्ल्यांमधून यशस्वी राज्य करतो.

१२) याने पूर्वेकडच्या पर्वतांपासून ते पश्चिमेच्या समुद्रापर्यन्त, सेतू-पासून ते हिमालयापर्यन्त सर्व पृथ्वीवर विजय मिळविला. सर्व राजांना नमविले. जाणकार माणसांकडून श्रुतीमध्ये सांगितलेली कर्तव्ये शिकून राज्याभिषेकानंतर तो त्यांच्या सिंहासनावर छत्रासारख्या खानदानी प्रतिकांच्या रूपाने तो दिवसें-दिवस तळपत असतो.

१३) अशा ह्या विजयी राजाने त्याच्या राज्याभिषेकाच्या भव्य सोहळ्याच्यावेळी पुष्कळ ठिकाणाहून आलेल्या अनेक ब्राह्मणांना धन, वस्त्र, हत्ती व घोडे यांचे असंख्य दान करून संतुष्ट केले. अशाप्रकारे त्यांची कीर्ति सर्व दिशांना पसरली. चंद्राप्रमाणे स्तेज व पवित्र अशी आणि देवांनी गुणगान करण्याजोगी अशी त्याची कीर्ति होती.

१४) त्याचा किल्ला, अनेक राजवाडे, भव्य इमारती चमकत असून त्यामध्ये अनेक राजे राहतात. तेथे अनेक कमानी, सुंदर असे चौक, पाण्याने भरलेली तळी आहेत. हे राजे तज्ञ असे धर्मगुरू, वैद्य, ज्योतिषी, तसेच प्रामाणिक वंशपरंपरागत, मंत्री आणि बारही प्रकारचे असंख्य असे शूर सैनिक यांच्या-समवेत राहतात.

१५) त्याचा जो मुलगा सर्व प्रमुखांमध्ये श्रेष्ठ असे रत्न असलेला, काव्य, साहित्य, पुराण, संगीत व धनुर्विद्या यामध्ये पारंगत आहे. हा शंभु या नावाने प्रसिध्द आहे.

१६) राजा शंभुवर्माने हे उत्कृष्ट पुस्तक, त्याने प्राचीन लेखकांचे ग्रंथ काळजीपूर्वक वाचल्याने व त्यांतील माहिती घेऊनन हा ग्रंथ लिहिला आहे.

१७) शहाण्या लोकांनी माझा हा ग्रंथ व्यवस्थित वाचून यातील चांगल्याचे ग्रहण करावे व जे वाईट असेल ते सोडून द्यावे. राजहंस दुधातील पाणी न स्वीकारतां फक्त दूधच ग्रहण करतो.

ही संपूर्ण प्रस्तावना असून त्यानंतर खरा ग्रंथ सुरु होतो. तरीपण या ग्रंथाची सुरुवात ११ श्लोकांच्या भवानीच्या प्रार्थनेने होत असून ती स्वतः छ. संभाजीने रचली आहे. तो आपला ग्रंथ अडचणीशिवाय झटकन् पूर्ण होण्यासाठी त्यांच्या देवतेच्या स्तुतीप्रार्थनेने ग्रंथाला आरंभ करतो.

या स्तुतीनंतर निरनिराळ्या देवतांच्या स्तुतीपर १५ श्लोक (२९ ते ४३) येतात. त्यानंतरचे १८ श्लोक (४४ ते ६१) आशीर्वादपर असून ते प्रसिध्द अशा प्राचीन ग्रंथातून घेतले आहेत. सर्वात शेवटी १३० श्लोकांमध्ये (६२ ते १९१) अन्योक्ती येतात. सर्वात शेवटचे ३ श्लोक (१९२ ते १९४) ही वाङ्मयीन कोडी आहेत व ती अन्तलिपिका या नावाने प्रसिध्द आहेत.

दुसऱ्या विभागात जो या ग्रंथाचा प्रमुख भाग आहे, तो राजकारणावर आधारित असून त्यांत ६३२ श्लोक आहेत. मत्स्य व विष्णूधर्मोत्तर पुराण, कामंदकीय नीतिसार यामध्ये उद्धृत केलेल्या श्लोकांचा आधार घेऊन लेखक खालील विषय हाताळले आहेत. राजा आणि त्याची पात्रता (१ ते ३१), त्याचे सहकारी (३२ ते ४६), प्रधानमंत्री (४७ ते ७१), राजपुत्र, त्याचे शिक्षण व कर्तव्य (७२ ते ९१), राजांचे सल्लागार (९२ ते ९६), राज्याचे प्रमुख विभाग - अ) कोश (९७ ते १०६), ब) राष्ट्र (१०७ ते ११०), क) दुर्ग व त्याची व्यवस्था (१११ ते १८६), ड) सैन्य (१८७ ते १९८), राजाची कर्तव्ये (१९९ ते २०३), हेर (२०४ ते १२५), सेवक (११६ ते २४१), सल्लागार-सदस्य व मंत्रीमंडळ (२४२ ते २७३), राजदूत (२७४ ते २८४), राजांची कर्तव्ये (२८५ ते ३२१), राजांचे दोष

(२२२ ते ३६७), राष्ट्रांचा पाडाव (३६८ ते ३९६), राजाची सर्वसामान्य कर्तव्ये (३९७ ते ६३२).

तिस-या विभागामध्ये राजपुत्रांना उपयोगी अशी विविध प्रकारची माहिती असून ` प्रकीर्णनीति प्रकरण ` असे त्याला म्हटले आहे. उपलब्ध हस्तलिखितामध्ये या विभागातील ५७ श्लोक असून ५८ व्या श्लोकाचा थोडासा भाग आहे.

या ग्रंथाचा लेखक कोण याचा विचार करताना एक मत असे दृष्टीस येते की, मराठी इतिहास वाचकांच्या मते संभाजीकडे कोणतेही वाङ्.मयीन गुण नव्हते. मराठी इतिहासाच्या बखर (जुन्या व नव्या) लेखकांच्या मतानुसार संभाजी जरी शूर असला तरी स्तुती करण्याजोगी पात्रता त्याच्या अंगी नव्हती. तरीपण संभाजी अशिक्षित होता हे दाखवू शकत नाहीत. या ग्रंथाचा प्रमुख हेतू विशिष्ट कालखंडातील राजकीय घटनांचे वर्णन करणे हा असल्यामुळे त्याच्यामध्यें संभाजीच्या वाङ्.मयीन पात्रता वा कर्तृत्वाबद्दलचा प्रत्यक्ष स्पष्ट उल्लेख आढळत नाही, तरीपण असे काही किरकोळ उल्लेख आढळतात की, ज्यामुळे संभाजीला तज्ञ पंडितांकडून शिक्षण मिळाले होते. तसेच संस्कृत वाङ्.मयाची त्याला जाण होती आणि अधूनमधून सुंदर स्त्रियांच्या सहवासात असताना मोकळा वेळ घालविते वेळी कवी कलुषा याच्या प्रभावामुळे हिंदी काव्य रचण्याची त्याला संवय होती. या संदर्भात अगदी स्पष्ट असा उल्लेख चित्रगुप्ताच्या शिवाजीवरील खंडाच्या ७५ व्या पानावर आढळतो.

शिवाजीबरोबर संभाजीची दिल्लीहून सुटका झाल्यानंतर एका घटनेचा यामध्ये उल्लेख आला आहे. औरंगजेबाच्या लोकांनी जोरदार पाठलाग केल्यामुळे शिवाजीला आपल्या मुलाला संभाजीला काशीपंत नावाच्या बनारसमधील पंडितांकडे सोडणे भाग पडले व या तज्ञ पंडितांनी संभाजीला एखाद्या

ब्राह्मणपुत्राप्रमाणे इतर मुलांबरोबर शिक्षण दिले. एवढ्यानेसुध्दा मोगल सम्राटाच्या धूर्त अधिका-याचे समाधान झाले नाही. ` संभाजी मराठा नसून ब्राह्मण आहे ` याची खात्री पटविण्यासाठी त्यांनी या पंडिताला संभाजीच्या पात्रामध्ये जेवण्यास भाग पाडले व ` त्याने नंतर गुप्तपणे शुध्दी करून घेतली.`

सर्वसामान्य वाङ्‌मयाचे धडे देण्यास त्यांनी सुरूवात केली व संभाजीला व्याकरण, अमरकोश, रघुवंश, सिध्दांत कौमुदी, आणि यासारख्या इतर ग्रंथांमध्ये निष्णात केले. त्यामुळे संभाजी खूप हुशार झाला.

दुस-या एका बखरीनुसार (मराठी साम्राज्याची छोटी बखर पान क्र. १२) तो जवळजवळ १ वर्ष तेथे राहिला होता. बखरीवर विश्वास ठेवावयाचा असेल तर असे म्हणता येईल की, बनारसच्या वास्तव्यामध्ये संभाजीला संस्कृत भाषेचे प्राथमिक ज्ञान मिळाले होते.

राजा शिवाजीच्या बखरीतील एका लेखांत (लेख ९१ पान २०) यामधील एक उतारा शिवाजीने संभाजीच्या शिक्षणाची केलेली व्यवस्था सुचवितो. त्यामध्ये संभाजी श्रीरंगपूरला असताना त्याला शिकविण्यासाठी उमाजी पंडिताची नेमणूक केल्याचा उल्लेख आहे.

वरील उल्लेखानुसार आपल्याला निश्चितपणे असे म्हणता येईल की, संभाजीला संस्कृत भाषा आणि वाङ्‌मय ह्याचे निदान प्राथमिक ज्ञान त्याच्या बालपणीच मिळाले होते. नंतरची मूळपत्रे पण असेच सिध्द करतात की, संभाजीने त्याची मोकळ्या वेळी संस्कृत वाचनाची संवय ब-याच काळपर्यन्त जोपासलेली होती. उदा. Kincaid आणि पारसनीस हे त्यांच्या मराठा लोकांचा इतिहास भाग-२, पान क्र. ५८ यामध्ये म्हणतात, ` जरी संभाजीने त्याचे बहुतेक आयुष्य मोहिमामध्ये घालविले, तरी त्याने अभ्यासाकडे दुर्लक्ष केले नाही. त्याने

शिवाजीचा मित्र केशव पंडितअध्यक्षा या तज्ञ माणसांस वाल्मीकीचे रामायण वाचण्यास नेमले होते. १६८४ मध्ये बक्षीस म्हणून त्याने केशव पंडिताला ` लढी ` (ladis) नांवाची १६०० छोटी चांदीची नाणी दिली. शिवाय राजापण असा क्षुल्लक कवी नव्हता. त्याने हिंदी काव्यावर दोन पुस्तके लिहिली आहेत.

त्यापैकी एक ` नखशिखा ` (Nakhashikha) असे असून त्यामध्ये त्याने प्रेमाच्या आनंदाचे वर्णन केले आहे. दुस-याचे नांव ` नायिकाभेद ` (Nayakabhida) असे असून त्यात त्याने मोकळ्या वेळी त्याला आकर्षित करणा-या सौंदर्याच्या विविध छटांचे गुणगान केलेले आहे.

या तज्ञ लेखकांनी या माहितीचे उगमस्थान जरी दिले नाही तरी आपणांस असा तर्क करतां येईल की, त्याने ही माहिती पत्रे किंवा बखरीच्या वाङ्मयीन आधारानुसारच मिळविली असावी. तरीपण हे लक्षात घेतले पाहिजे की ही गोष्ट संभाजी चांगला संस्कृतज्ञ होता हे सिध्द करीत नाही. कारण एखाद्या संस्कृत लेखकास वाल्मीकीचे रामायण वाचण्यासाठी एखाद्या शास्त्र्याची मदत भासणे योग्य नाही. याउलट असेही म्हणता येईल की, पंडिताची नेमणूक केल्याचा उल्लेख व त्यांना चांदीची नाणी बक्षीस दिल्याचा उल्लेख केवळ त्याची कामगिरी दाखविण्यासाठी असावा. तरीपण संभाजीच्या बाबतीत संस्कृत भाषेचे थोडे ज्ञान असल्याचा उल्लेख हेतूला पुरेसा आहे. अशा-प्रकारचे ग्रंथ प्रसिध्द करताना त्या भाषेचे सखोल ज्ञान आवश्यक असतेच असे नाही. विशेषत: जेंव्हा लेखक स्वत: राजा असून तज्ञ पंडितांची मदत त्याने घेतली असावी.

या सर्व गोष्टी हे सिध्द करण्यास पुरेशा आहेत की, राजा संभाजी हा या पुस्तकाचा खरा संग्राहक आहे. त्याने या ग्रंथातील अवतरणांची निवड

व रचना करण्याच्या कामी पंडितांची मदत घेतली असली तरी हे निश्चितपणे सिध्द होते की, संभाजीला मूळ संस्कृत वाचण्याची आवड होती व संस्कृत कवी म्हणावून घेण्याची त्याची महत्वाकांक्षा होती.

मराठी लोकांचा इतिहास यातील अवतरणांचा दुसरा भाग जरा संशयास्पद आहे. लेखकांकडून मिळालेल्या माहितीनुसार हा भाग श्री.पुरुषोत्तम विश्राम मावजी, J.P. of Bombay यांच्या अलीकडील संशोधनावर आधारित आहे. मावजींनी संभाजीच्या हिंदी काव्यावरील दोन ग्रंथांमधील कांही श्लोकांची प्रत श्री. केळणकरांकडे पाठविली होती. विस्कळित असलेल्या या दोन कवितांवरून कथानक व आराखडा यांची कल्पना येते. यांतील पहिले काव्य ` नखशिखा ` असे असून त्यामध्ये कवीने राधेच्या देहाचे पायाच्या नखापासून ते शिखेपर्यंन्त सर्व अवयवांचे काव्यात्मक वर्णन केले आहे. दुसरे काव्य आलंकारिक असून त्याचे नांव ` नायिकाभेद ` असे असून त्यामध्ये मध्यमा, प्रौढा, खंडिता यासारख्या वेगवेगळ्या नायिकांचे वर्णन आहे. हे संस्कृत कवींच्या परंपरानुसार लिहिलेले आहे. या कवितांची जी अवतरणे मिळाली आहेत, त्यावरून लेखकाचा अलंकारावरील संस्कृत ग्रंथाचा खूप परिचय वा अभ्यास दर्शवितात.

या अवतरणातील एक कवी कलुषाचे आहे. आणि ते ख-या अर्थाने काव्यात्मक असून आणि जरी संभाजीच्या या आवडत्या माणसाचे काहीही लिखाण उपलब्ध नाही, तरीपण हा वाङ्मयीनदृष्टया परिपूर्ण असा लेखक होता असे म्हणता येईल. असे म्हणतात की, दिल्लीच्या सम्राटाने या कनोजी ब्राह्मणास तो वश करण्यास समर्थ असल्यामुळे मुद्दामच त्याला संभाजीकडे पाठविले होते. कलुषाने राजावर प्रभाव पाडला तरी कशामुळे ? याचा नुसता अंदाजच करावा लागतो. याचे मूळ संदिग्धच आहे. राजा संभाजीच्या अंगी असलेले वाङ्मयीन गुण कलुषाला त्याच्यावर प्रभाव पाडण्यासाठी ब-याच प्रमाणांत

उपयोगी पडले असावेत. कलुषाने आणखीही बरेच काव्य लिहिले असण्याची शक्यता आहे. पण त्याच्याबद्दलच्या वाईट मतामुळे ते आजपर्यंन्त उपलब्ध नाही, असेल तर एक दिवस प्रसिध्द होईल. आपल्या दृष्टीने असे म्हणता येईल की, या दोन कविता कलुषाच्या वाङ्‌मयीन प्रभावाखाली राजा संभाजीनेच लिहिल्या असाव्यात.

आणखी असे की, शहाजी महाराजांना संस्कृतचे ज्ञान असून त्यांनी जयरामाचे ` राधामाधवविलासचंपू ` हे काव्य स्वत: ऐकले होते. त्याची परंपरा त्यांचा ज्येष्ठ पुत्र संभाजी यानेही चालविली होती. छ. शिवाजीने तर परमानंदाना ` शिवभारत ` रचण्याची आज्ञा दिली. शिवाय विद्यावृध्दीला उत्तेजन मिळावे, यासाठी त्यांनी गागाभट्टांना ` शिवार्कोदय, ` कृष्ण ज्योतिष्याला ` करण कौस्तुभ, ` पं. रघुनाथ हणमंते यांना ` राज्यव्यवहार कोश ` रचण्याची आज्ञा दिली. त्यातून छ. शिवाजी महाराजांना असणारी संस्कृत भाषेची आवड, संकटग्रस्त परिस्थितीत हिंदवी स्वराज्य उभे करत असूनही संस्कृतचा उध्दार करणारा तो श्रेष्ठ राजा होता. तेव्हा पिता व आजोबा हे दोघेही संस्कृतविषयी अभिमान बाळगणारे व संस्कृत जाणकार असतील तर त्यांनी संभाजीला संस्कृतचे ज्ञान करून दिले नसेल, असे म्हणवत नाही व या परंपरेनुसार छ. संभाजी महाराजांनी संस्कृत ग्रंथ रचला असणे असंभवनीय नाही व त्यामुळे आश्चर्य वाटण्याचेही कारण नाही.

स्वत: छ. संभाजीने हा ग्रंथ रचला असल्यामुळे शिवाजीशी समकालीन आहे व त्यामुळे स्वत: संभाजीने दिलेली स्वत:ची, स्वत:च्या पित्याची व स्वत:च्या घराण्याची माहिती विश्वसनीय आहे. व म्हणूनच हा ग्रंथ ऐतिहासिक-दृष्ट्या तो समकालीन म्हणजे सर्वसामान्यपणे १७ व्या शतकातीलच ठरतो. काव्य म्हणून तो फारसा उल्लेखनीय ठरत नसला तरी ऐतिहासिक दृष्टीने तो नि:संशय अतिशय महत्वाचा ठरतो.

म) शिवकाव्य :

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचे जीवनचरित्र ज्या अनेक संस्कृत काव्यांचे विषय झाले आहे त्यापैकी ` शिवकाव्य ` हा एक ग्रंथ असून त्याचा कर्ता ` संकर्षण सकळकळे ` हा आहे.

या ग्रंथाच्या हस्तलिखिताची एक प्रत भारत इतिहास संशोधन मंडळाच्या समृध्द हस्तलिखित संग्रहात उपलब्ध असून हे हस्तलिखित मंडळात साडे तीन तपे संशोधन व सेवा करणारे प्रा. ग.ह. खरे यांच्या प्रयत्नाने नाशिक येथील श्री. पंचाक्षरी यांच्या संग्रहातून आलेले आहे. हा सर्व संग्रह सौ.पंचाक्षरी यांच्याकडील माहेरकडील पैगे घराण्यातून त्यांच्याकडे आला होता.

या पोथीचा आकार २४ × १० सें.मी.असून पाने १ ते ५६ व ५९ ते ११७ आहेत. प्रत्येक पृष्ठावर आठ ओळी असून प्रत्येक ओळीत सरासरी ३० अक्षरे आहेत. र, ट, प, व, च या व इतरहि अनेक अक्षरांची लेखकाच्या अनवधानाने अथवा मूळ पोथीतील अक्षरे न समजल्याने अदलाबदल झालेली आहे व काही ठिकाणी दोन चार अक्षरे मावतील एवढया रिकाम्या जागा सोडल्या आहेत. यावरून ही पोथी अन्य हस्तलिखिताची नक्कल असल्याचे सिध्द होते.

पोथीची सुरुवात दुसऱ्या सर्गापासून झालेली असून शेवटचा सर्ग सतरावा आहे. एकूण श्लोकसंख्या सुमारे ११६० आहे. उपेंद्रवज्रा वृत्त व अनुष्टुभ् छंद याचा मुख्य वापर असून इतरही अनेक वृत्ते उपयोजिली आहेत.

या काव्यात शिवचरित्रातील तीन महत्वाचे प्रसंग आलेले आहेत. ते म्हणजे चंद्रराव मोऱ्याचे पारिपत्य, कोकण-दिग्विजय (कल्याण-भिवंडी मोहीम) अफझलवध हे होत. यासाठी प्रत्येकी एक सर्ग लिहिला आहे. याशिवाय

देवगिरीच्या कर्ण नामक रजपूत राजाकडे दोनदा राजदूत-प्रेषण असून त्यासाठी जवळ जवळ दोन सर्ग खर्चिले आहेत. उरलेल्या ग्रंथात फारच थोडी ऐतिहासिक माहिती आलेली असून त्या त्या प्रसंगात अनुसरून उद्यान-विहार, ऋतुवर्णन, प्रदेशवर्णन, सैन्यवर्णन, उत्सव, दानयज्ञ, पंडित-सभा, रत्न-वधू-परीक्षा, मानसपूजा, शिवस्तुती, राजनीती हे विषय आलेले आहेत. अशारीतीने प्रसंगानुरूप विषयवैविध्य आणून तेथे त्या त्या शास्त्रातील ज्ञान मांडून एकप्रकारे ज्ञानकोशच तयार करावा अशा उद्देशाने हा ग्रंथ लिहिला असून त्यासाठी शिवचरित्र हे केवळ आधार म्हणून घेतले आहे. अशाप्रकारचे संस्कृत ज्ञानकोश पूर्वीहि अनेक राजदरबारात तयार झालेले आहेत. त्यात सोमेश्वराचा अभिलितार्थचिंतामणी, बसवभूपालकृत शिवतत्वरत्नाकर व भोजदेवकृत युक्तिकल्पतरू हे प्रामुख्याने होत. तथापि हे ग्रंथ केवळ शास्त्र संग्रहात्मक असून रूक्ष आहेत. प्रस्तुत शिवकाव्यात काव्यविलास, शास्त्रचर्चा व जीवनवृत्त यांस सारखेच महत्व दिल्याने याचे काही आगळेच वैशिष्टय निर्माण झाले आहे. तुलनाच करावयाची झाल्यास पुराणे अथवा महाकाव्ये यांच्या शैलीप्रमाणे लिहिलेला हा एक दरबारी काव्याचा नमुना आहे असे म्हणावे लागेल.

इतिहासाचे साधन म्हणून या ग्रंथाची योग्यता बरीप्रमाणे ठरेल. चंद्रराव प्रकरण, उत्तर कोकण मोहीम या प्रसंगात व इतरत्रही अनेकप्रकारची नवीन माहिती आलेली आहे. त्यातून शिवाजीच्या अज्ञात चरित्रातील काही दुवे सांधले जातात काय ते पहाणे अगत्याचे असल्यामुळे शिवचरित्राच्या अभ्यासकांना हे काव्य उपेक्षणीय वाटणार नाही.

या काव्याचा कवी स्वत:संबंधी फार माहिती देत नाही. प्रत्येक सर्गाच्या शेवटी तो बहुधा माता-पित्यांसह स्वत:चे नाव देतो. यात मातेच्या ' भवानी ' या नावाचा उल्लेख सर्ग ३, ४, ९, १०, ११ व १२ यांचे शेवटी आहे.

पित्याचे नामोल्लेख शिव, शिवबुध, शिवसूरि असे ३, ४, ५, ७, १०, ११, १२ व १६ या सर्गान्ती आहे. शिवदास, शिवदाससूरी, शिवदासपंडित असे २, ९, १० व १५ या सर्गान्ती, सदाशिव असा १३ व्या सर्गाचे अंती, शिवकोविद असा ६ व ८ चे अन्ती व शिवदास कोविद असा १७ व्या सर्गान्ती असे पित्याच्या नांवाचे एकूण उल्लेख आहेत. स्वतःचे नाव बहुतेक सर्वत्र संकर्षण असे दिले असून सर्ग १४, १५ व १६ यांचे अंती मात्र स्वतःचे नाव शंकर असे दिले आहे.

कवीचा पिता शिवदास हाही पंडित होता असे सर्गान्तीच्या उल्लेखांवरून वाटते. त्याच्या काही रचना असल्यास त्या अजून उजेडात आल्या नसाव्यात. याचे सदाशिव असे नाव १४ व्या सर्गान्ती कसे दिले आहे हे समजत नाही. प्रतिलिपी करणाऱ्याच्या हस्तदोषाने शिवदासाचे सदाशिव झाले असावे असे वाटत नाही. शहाजीच्या दरबारी असलेल्या ज्या अनेक पंडितांचा उल्लेख राधामाधवविलासचंपूतील भाषासमस्या प्रकरणात आलेला आहे त्यात एक ` ठाकूर शिवदास कविकोविद ` असा आहे. (तब ठाकूर शिवदास त्यौं कहत समस्या हेत । वह कविकोविद दरबरकागजपर लिखिलेत ।। राधामाधवविलासचंपू, पृ. २४८) केवळ शिवदास या नावावरून व कविकोविद या पदवीवरून या कवीचा पिता व शहाजीचा दरबारी हे एकच असे निश्चित ठरविता येत नसले तरी या बाबतीत आणखीही एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे, ती म्हणजे प्रस्तुत काव्यात बहुतेक ठिकाणी शिवाजीचा शाहपुत्र या अर्थी शब्द वापरून उल्लेख केला आहे. अशारीतीने शहाजीचे नाव काव्यात बरेच वारंवार आणण्याचा उद्देश कवीच्या पित्याने अथवा कवीने त्याच्या खाल्लेल्या अन्नाला जागण्याचा तर नसावा ? तृतीय सर्गात वनपालबालकाने आपल्या कवित्वसामर्थ्याविषयी काढलेले उद्गार (शिवभक्तनृपाल शाहदत्तप्रयतान्नैः परिपोषिताच्चिरेण । जनकाज्जनिरस्ति गद्यपद्यात्मकव्या शिवभूप मेऽनवद्या ।। ३-१०५) हे कदाचित याच कवीच्या बाबतीत खरे असावेत.

शिवविवाहाचे वेळी कोण्या एका सदाशिव नामक ब्राह्मणाचा उल्लेख आलेला आहे. (सकैतितेष्टान्नयनं नरकेन श्रुतिप्रियेणैव सदाशिवेन । उपस्तृतेनाञ्जलिना वधूः सा शिवेन लाजानजुहोध्दुताशे ।। ११।२६) एरवी महत्वाचे नामोल्लेख टाळणाऱ्या या कवीने येथे सदाशिव नामक ब्राह्मणाचा उल्लेख करण्याचे प्रयोजन काय ? यावरून पाचव्या व सहाव्या सर्गातील यज्ञाचे पौरोहित्य करणाऱ्या सकळकळे नामक व्यक्तीप्रमाणेच अकराव्या सर्गातील लग्नाचे पौरोहित्य करणारा सदाशिव हाही सकळकळे असावा काय अशी शंका येते. सदाशिव व शिवदास एकच होत हे सर्ग १२ व १४ व्या अंतावरून स्पष्ट झाले आहे.

सर्गान्तीचे उल्लेख सोडून दिल्यास प्रत्यक्ष ग्रंथात दोन-तीन ठिकाणी सकळकळे नामक व्यक्तीचा उल्लेख आला आहे. ही व्यक्ती कोणी वैदिक, विद्वान अथवा तपस्वी असावी. कारण शिवाजीने मोरे-मोहिमेवर निघण्यापूर्वी स्वतः ज्या ठिकाणाहून निघून दोन कोसावर जेथे मुक्काम केला होता तेथून पुढे निघताना सकळकळे ब्राह्मणाची पूजा केली व आशिर्वाद घेतला. (५।१२-१३) सहाव्या सर्गातही सकळकळे ब्राह्मण शिवाजीच्या आज्ञेवरून दान-यज्ञाची तयारी यज्ञमंडपासह पूर्ण करतो. (६।१७-१८) यानेच त्या यज्ञाचे पौरोहित्यही केले आहे. (६।३६) यावरून हा शिवाजीचे निकटवर्ती होता असेहि समजण्यास हरकत नाही. त्या सकळकळ्याचे व प्रस्तुत काव्याच्या कर्त्याचे नाते स्पष्ट होऊन शकेल असे स्पष्ट प्रमाण या काव्यात कोठेहि मिळत नाही.

प्रस्तुत काव्याचा कर्ता संकर्षण सकळकळे याने आणखी दोन काव्ये लिहिल्याचे आढळून आले आहे. यापैकी एक ' नृसिंहचम्पू ' असून याची नोंद तंजावर येथील सरस्वती-महाल ग्रंथालयातील संस्कृत हस्तलिखितांचे सूचीत आहे. (भाग ७ पृ. ३०७६) या सूचीत दिलेला त्याचा अंतिम अंश असा -

इह सकलकलोद्यत्स्पनारवारब्रह्मविद्या-
दुराधिगमसमुद्रोत्तुंगपारंगतेन ।
जगदखिल विपश्चिद्भक्त संकर्षणेन
व्यरचि नृहरिचम्पूकाव्यमेतत्क्षणेन ।।
इति सकलकलाकुलतिलक शिवदाससूरिसूनु संकर्षण विरचिते
नृसिंह चम्पूकाव्ये चतुर्थोल्लासः । श्री नृसिंहार्पणमस्तु ।

दुसरे ` रागरत्नकाव्य ` बीकानेर दरबारचे संग्रही आहे. (Catalogue of Anup Sanskrit Library by C. Kunhan Raja, Vol. III, No.3440) या ग्रंथाच्या कालासंबंधी सूचीतील नोंद "Written at आदुणि " अशी आहे. ही स्थानदर्शक नोंद फार महत्वाची आहे.

प्रस्तुत काव्यात सर्ग ८ व १५ मध्यें वर्णन केलेल्या कर्णराजाचा मुलगा अनूपसिंह हा इ. १६८९ साली अदोनी येथील किल्ल्याचा अधिकारी नेमला गेला होता. इ.स. १६९८ साली अदोनी येथेच त्याचा मृत्यू झाला. (गौरीशंकर ओझा - बीकानेर राज्य का इतिहास, प्रथम खंड, पृ. २७२-७३) यावरून तो तेथे नऊ वर्षे असला पाहिजे. अनेक पंडित त्याचे आश्रित होते. संकर्षणाने जेंव्हा तेथे रागरत्नकाव्याची रचना केली, तेंव्हा तो अनूपसिंहाचा आश्रितहि असेल. संकर्षणाने अदोनी येथे ग्रंथरचना करणे व तो ग्रंथ बीकानेरच्या राजसंग्रही उपलब्ध असणे या दोनहि गोष्टीवरून प्रस्तुत कवी या काव्यात वर्णिलेल्या कर्णसिंहाचा व त्याचा मुलगा अनूपसिंह याचा निकटवर्ती होता असे अनुमान काढण्यास हरकत नाही. रागरत्नकाव्याच्या रचनेवरून या ग्रंथकर्त्याचा काळ उशिरात उशिरा इ.स. १६९८ समजण्यास हरकत नाही. इतकेच काय पण या शिवकाव्यात वारंवार दिलेल्या बारीक सारीक तपशिलावरून तो शिव-समकालीन व शिवाजीचे निकटवर्तीहि असावा असे अनुमान काढल्यास फारसे चुकीचे होणार नाही.

शिवक्नाजवळ राहणारा सकळकळे ब्राह्मण, वनाचे पश्चिमेस राहणारा धरणीधरमुनी इ. चे उल्लेख व शिवक्नातील प्रसंगांचा दिलेला बारीक तपशील यामुळे कवीस शिवक्नाचा विशेष परिचय असावा असे वाटते. यावरूनही तो शिवाजीचा निकटवर्ती असला पाहिजे असे विशेषेकरून वाटते.

आणखी एक सकळकळे व्यक्ती महाराष्ट्रास परिचित आहे. ती म्हणजे सोमनाथ उर्फ सोमाजी सकळकळ्या याचा रागविबोध हा स्वोपज्ञ विवेक टीकेसह लिहिलेला संगीतशास्त्रावरील ग्रंथ प्रसिध्द असून त्यासंबंधी प.कृ.गोडे यांनी एक लेख लिहिला आहे. (Journal of the University of Gauhati, Vol. 4, 1953, pp. 365-68) त्या लेखात सोमनाथा विषयी संपूर्ण माहिती आली नसली तरी त्याच्या काही काव्यांचा परिचयात्मक उल्लेख आहे. त्याचा काळ मात्र त्यांनी इ.स. १७५० पूर्वी असा ठरविला आहे. भारत इतिहास संशोधक मंडळातील रागविबोधाचे एक हस्तलिखित शक १५९० (इ.स. १६६८) मध्ये नक्कल केलेले आहे. त्यावरून त्याचा काळ आणखी शंभर वर्षे मागे जातो. तसेच याने रागविबोध हा ग्रंथ इ.स. १६०९ मध्ये लिहिला असे एम. कृष्णमाचार्य लिहितात. (History of Classical Sanskrit Literature, p.866).) यावरून सोमनाथ हा शहाजीचे समकालीन ठरतो.

` सोमाजी सकळकळ्या ` हा शब्द हरहुन्नरी माणूस या अर्थी प्रचारात होता असे मोल्स्वर्थ आणि कँडी यांच्या मराठी इंग्रजी-कोशावरून दिसते. म्हणजे हा मराठेशाहीत प्रसिध्द असलेला व शिवकालीन किंवा शिवपूर्वकालीन पंडित होता हे सिध्द होते. याचे ठिकाण यमलग्राम होते असे त्याच्या वैराग्यशतक या ग्रंथाच्या अखेरीवरून समजते. (गोडे यांचा उपरिनिर्दिष्ट लेख पहावा). व-हाडातील जळगांव जामोद येथे सकळकळे घराणे अजूनहि असून या घराण्यात होऊन गेलेल्या रुद्रनाथ या एका संतपुरुषाचे चरित्र अनन्तकविकृत

भक्तरहस्य या ग्रंथात आहे असे हा ग्रंथ संपादन करण्याचा संकल्प केलेले यवतमाळ येथील श्री. द.बा. महाजन, अॅडव्होकेट यांचेकडून समजते. भक्तरहस्य ग्रंथाचे हस्तलिखित यवतमाळ येथील शारदाश्रम संस्थेतच असल्याचेही समजते. त्यावरून या घराण्याविषयी अधिकही माहिती समजू शकेल, पण प्रस्तुत संकर्षण सकळकळ्याच्या संदर्भात तिची उपयुक्तता किती है या वेळीच सांगता येत नाही. याप्रमाणे हा कवी व त्याचा वंश यासंबंधी अधिक संशोधन होणे जरूर आहे. तेंव्हा संशोधकांनी याकडे आपले लक्ष वळवावे.

हे एक ` महाकाव्य ` रचावे असे प्रथम कवीच्या मनात असावे. सर्ग १२ व्या पर्यन्त बहुतेक सर्गान्ती या काव्यास ` महत् ` हे विशेषण त्याने लावले आहे. एका महापुरुषाचे जीवन काव्यास आधार म्हणून घेतले असले तरी त्या निमित्ताने वेळोवेळी अनेक विषय आणले आहेत. व मुख्य विषय काही ठिकाणी बाजूस राहिला आहे हे शिवकनकतुलीला, रत्नपरीक्षा, राजनीती इ. सर्गांवरून दिसते. म्हणजे याची रचना पुराणे व महाकाव्ये यासारखी ज्ञानकोशात्मक करण्याचा कवीचा विचार असावा. हे काव्य वाचणाऱ्यास काव्य-शास्त्र-विनोदाच्या निमित्ताने बहुश्रुतता यावी हा हे काव्य लिहिण्यामागील प्रमुख हेतू दिसतो. या काव्याच्या उपलब्ध भागात आलेले विविध विषय व शास्त्रे याविषयीचे कवीचे सखोल ज्ञान पाहिले असता त्याचे सकळकळे हे आडनांव सार्थ वाटते.

परमानंदकृत शिवभारतात कवित्वाचे अवडंबर व विषयांतर कमी व घडलेल्या घटनांचा सविस्तर तपशील नावनिशीवार देण्याची प्रवृत्ती अधिक आहे. प्रस्तुत शिवकाव्यात उलट प्रकार आहे. कांही प्रसंगाच्या दिलेल्या सूक्ष्म वर्णनावरून कवीस संबंधित व्यक्तींची नावे व घटनांचे काल निश्चित माहीत असले पाहिजेत. परंतु ते काव्यात देण्याचे त्याने हेतुपुरस्सर टाळले असावे असे त्याच्या

एकूण शैलीवरून वाटते. अन्यथा जावळीचे युध्द आठ दिवस चालले, माहुलीचे युध्द पांच दिवस चालले. चाकण पडल्याचे ऐकून शिवाजी एक दिवसात आपल्या नगरात परत आला. हे माहीत असताना वर्ष व महिने देण्यास कोणती हरकत होती ? संक्रांतीच्या प्रथम दिवशी यज्ञ-दानास सुरुवात केली असा एकच अर्धवट कालोल्लेख या ग्रंथात आहे. (६।३२) काही घटना दिवसाच्या अमुक भागात अथवा अमुक ऋतुत झाल्याचे उल्लेखही आहेत. मात्र वर्षाचे उल्लेख कोठेही नाहीत. व्यक्तींचेही नामोल्लेख टाळलेले असून काही ठिकाणी त्यांची नावे ध्वन्यर्थाने सूचित केली असावीत असे वाटते. नामोल्लेख टाळण्यामुळे काही काल्पनिक व्यक्ती काव्यासाठी उभ्या केल्या असाव्यात असे सकृद्दर्शनी वाटले तरी वस्तुत: तसे नसावे.

जावळी व माहुली येथील युध्दांत शिवाजीचे प्रथम झालेले पराभव, तसेच चाकणचा पराभवही कवी वस्तुनिष्ठ वर्णन करून देत असल्याने हा कवी शिवाजीचा केवळ स्तुतीपाठक नसून ऐतिहासिकाची नि:पक्षपाती दृष्टी यांचेकडे आहे असे म्हणावे लागते. काही प्रसंगातील सूक्ष्म तपशील देण्याच्या त्याच्या पध्दतीनेही या काव्यास इतिहास साधनात स्थान देणे आवश्यक झाले आहे.

बहुतेक सर्गातील शेवटचे श्लोक पहाता त्यात पुढील सर्गातील विषयाचा प्रस्ताव सूचित केल्याचे दिसते. मात्र सतराव्या सर्गाचे शेवटी कूर्मसुताच्या सेनेचा शिवसैन्याने रात्री गनिमी काव्याने पराभव केला असे अर्ध्या श्लोकात सांगून एकाएकी सर्गसमाप्ती केली आहे. यावरून हे काव्य येथेच संपले असावे. असाही तर्क करण्यास जागा आहे. त्यापुढील कथाभाग म्हणजे जयसिंहाची दक्षिण मोहीम व पुरंदरचा तह या गोष्टी शिवाजीस अपमानास्पद असल्याने कवीने पुढे काव्यरचनेचा बेत सोडून दिला असेल. कदाचित या वेळीच

कवी शिवाजीचा आश्रय सोडून बिकानेरकरांकडे (देवगिरीस) गेला असेल. कसेही असले तरी हेही शिवकाव्य कथादृष्टया अपूर्णच आहे.

या काव्याचा कथासारांश सर्गानुक्रम खालीलप्रमाणे आहे :

सर्ग-२ - शिवकनकतुलीला - श्लोक १२१.
सर्ग-३ - नग-नगर-कूपाणिनां वर्णनम् - श्लोक ५९.
सर्ग-४ - शिवगिरिजोत्सव - श्लोक ४३.
सर्ग-५ - चंद्रराजक्षितिमित्विधलीला - श्लोक ६५.
सर्ग-६ - वितरणावर्णन - श्लोक ४६.
सर्ग-७ - कोंकणदिग्जय, श्लोक ४३.
सर्ग-८ - क्षितिमित्द्दौत्यविचार - श्लोक ५८.
सर्ग-९ - पंडित-कवि-श्रवण - श्लोक ३३.
सर्ग-१० - रत्न-वधू-पुष्प-परीक्षा - श्लोक ९१.
सर्ग-११ - शिवविवाह वर्णन - श्लोक ३१.
सर्ग-१२ - अफजलाख्य - प्रतिनृपतिवध - श्लोक ८८.
सर्ग-१३ - जगदंबिकाया: शिवस्य वरदानम् - श्लोक ३७.
सर्ग-१४ - शिवाख्य - क्षितिप - तप - श्लोक ४७.
सर्ग-१५ - कुतकर्मव्याख्यान - श्लोक ५२.
सर्ग-१६ - ललितसुखकृन्नृपस्य नीति: - श्लोक १८७.
सर्ग-१७ - सुखस्य नीति: - श्लोक १५९.

वर दिलेल्या वर्ण्य विषयाच्या अनुक्रमावरून सर्ग २, ३, ४ मध्ये शिवचरित्राचा कोणताही महत्वाचा कथाभाग आलेला नाही हे लक्षांत येईल. तथापि त्यातील काही गोष्टी विचारात घेण्यासारख्या आहेत.

सर्ग २, ३ व ४ मध्ये शिवाजीजवळ असलेली व्यक्ती म्हणजे वनपालबालक अथवा वनपालशिशु होय. येथे कवीपुढे कोणी तरी एक व्यक्ती असून तिचा नामनिर्देश टाळलेला असावा. ही व्यक्ती केवळ काल्पनिक मानल्यास त्याचेच तोंडून शिवाजीस वनवर्णनाचे कवित्व व कोंडाणा, राजगड, चंद्रपुरी व रामाश्रम यांची माहिती ऐकविण्यात कवीने कोणते औचित्य साधले आहे हे समजत नाही. यालाच आक्रीडपालशिशु (२।१०३) म्हटले आहे, म्हणजे हा शिववनावरील अधिकाऱ्याचा मुलगा असला पाहिजे. तुला हे चातुर्य व कवित्व सामर्थ्य कोठून प्राप्त झाले असे शिवाजीने त्यास सकुतूहल विचारल्यावर शहाजीचा आश्रित असलेल्या माझ्या पित्याकडून मला हे काव्यसामर्थ्य प्राप्त झाले असे तो सांगतो. पुढे १०७ व्या श्लोकात त्याला ` वनपालवंशतिलको बाल: ` असे म्हटले आहे. यातील वंश शब्द जातिवाचक न घेता कुटुंबवाचक घेतला तर यातून ` वनपाल ` हे कुटुंबाचे उपनाम तर सुचविले नसेल ना ? तो दुसऱ्या वेळेस शिवाजीस भेटतो तेव्हा त्याचे हातात सुंदर काठी आहे. (करधृतोत्तमयष्टी ३।२) त्याला ` वनचर ` हे विशेषण लावलेले आहे. (३।३,६) हे व्यवसाय निदर्शक असून त्यात त्याचे व्यवसायदृष्टया कनिष्ठत्व दाखविले आहे व शिवाजीचे निकटवर्तित्वामुळे आपण बोलण्याचे धाडस करीत असल्याचे त्याने सांगितले आहे. " राजन् समुद्रवलयांकितभूमिवत्प्रौढा वसिष्ठसमसंतिमंडली त्वाम् । आराध्यत्य-विहतार्थ समूह माप्तुमित्यादिते का वनचरस्य कथा क्वापि ।। इति यद्यपि वस्तुतोऽस्ति युष्मद्बहुसांनिध्यवशात्तथापि वच्मि ।। (३।६-७).

कोंडाणा व राजगड यांचे वर्णन सामान्यच आहे. स्थलवर्णन या दृष्टीने त्यातील उल्लेखनीय गोष्टी थोडया आहेत व कवित्वप्रदर्शनच अधिक आहे. उद्यानाचे पश्चिमेस असलेल्या कोंडाण्यावर भैरवाचे स्थान असल्याचे सांगितले आहे. आजही तेथे अमृतेश्वर भैरवाचे देऊळ आहे. उद्यानाचे नैऋत्येस राजगड असून

त्याचे पायथ्याशी ` शिवपत्तन ` (शिवापाटण) असल्याचे सांगितले आहे. गडावर जगदंबा असल्याचे सांगितले आहे. हा राजगडावरील पद्मावती देवीचा उल्लेख असावा.

सूर्य मध्यानी आल्यावर शिववनातच पश्चिमेस राहणाऱ्या धरणीधर नावाच्या तपस्वी मुनीचे दर्शन शिवाजीने घेतले, त्याचे वर्णन तृतीय सर्गातील श्लोक ४६ ते ५४ मध्ये केले आहे. यावरून ही कोणी महत्वाची व्यक्ती येथे असावी असे वाटते.

चवथ्या सर्गात रात्रीचेवेळी उत्तरेकडून आलेल्या द्विजांनी केलेली कृष्णलीला पाहून झाल्यावर सकाळी वनपालबालकाशी पुन्हा संवाद आहे. त्यात वनपालबालक राजगडाचे दक्षिणेस असलेल्या चंद्ररावाचे पुरीची (जावळीची) शिवाजीस माहिती देतो.

चंद्ररावाची पुरी म्हणजे जावळी घेण्याचा निश्चय शिवाजीने केला हे सांगितले. पण त्याचे कारण स्पष्ट सांगितलेले नाही. तिचे वर्णन प्रस्तुत कवीने ` राजश्रियां सुललिता वसुपेटिकेव ` (४।३९) असे केले आहे. म्हणजे तेथील संपत्ती हेच कारण सुचविले आहे. शिवदिग्विजयात म्हटले आहे - " जावळी बहुता दिवसाची जागा, पुंडपणा करून मोरे यांनी अमोल्य वस्तू जातिमात्र संग्रह केला होतो तो सर्व हरण केला. " अशारीतीने जावळीची श्रीमंती व शिवाजीस येथे मिळालेली लूट बहुतेक बखरकारांनी सुचविली आहे.

शिवाजी दोन कोस अंतरावर सैन्य मिळवणासाठी थांबला असे कवी म्हणतो. चिटणीसी बखरीप्रमाणे शिवाजी प्रथम पुरंदरास व तेथून महाबळेश्वरास दर्शनार्थ गेला. हे वरील विधानाशी सुसंगत आहे. येथे श्लोक १२ व १३ मध्ये सांगितल्याप्रमाणे ` नानाकलाकुशल ` किंवा ` सकलकल `

या उपनावाच्या संदर्भात लक्षात घेण्यासारखे आहेत. यासंबंधी, विवेचन वर केले आहेच. तो शिकारीचे निमित्त करून निघाला ही माहिती नवीन असून तसे घडले असणे स्वाभाविक वाटते. सोयरिकाच्या निमित्ताने ससैन्य निघणे विश्वसनीय वाटत नाही.

मो-यांशी सोयरिक हा या मोहिमेतील आधीच गूढ असलेला भाग या काव्यांतील एका उल्लेखाने अधिकच गूढ बनला आहे. ती पंक्ती अशी - " संपत्तिति: सपदि तत्र रहस्तरूण्या: पाणिग्रहं किल चकार जयश्रियश्च ।" (५।५३) यातील ` संपत्तिति: ` व ` जयश्रिय: च ` ही पदे वगळता बाकी पंक्तीचा अर्थ स्पष्ट आहे. तो म्हणजे त्वरेने येथे गुप्तपणे (अथवा एकांतात) त्याने तरूणीचे पाणिग्रहण केले. आता विवाद्य पदांचा विचार केला असता संपत्तिति: हा शब्द लेखनिकाच्या चुकीने संपत्तिभि: याचे ऐवजी लिहिला गेला असावा व तसे असल्यास हा शब्द शिवाजीस जावळी येथे सापडलेल्या द्रव्याचा सूचक असावा. कारण ही पंक्ती शिवाजीच्या चंद्रराव व नगर (जावळी) प्रवेशाचे दरम्यान आहे. शेवटचे ` च ` हे पद पादपूरणार्थ नसेल म्हणजेच ` आणि ` या अर्थी असेल तर जयश्री म्हणजे विजय असा अर्थ होईल. ` च ` हे पद पादपूरणार्थ असेल तर जयश्री हे त्या तरूणीचे नांव ठरेल. पुढल्या म्हणजेच सहाव्या सर्गातील प्रथम श्लोकातही जयश्री हा शब्द सूचकतेने वापरलेला आहे. (अथो जयश्रीसहित: शिवोऽसौ.......) - नंतर आनंदित झालेल्या ब्राह्मणांनी स्वस्त्ययन केलेला तो शिवाजी वाद्यघोषात जयश्रीसह ससैन्य निघाला. यातील ब्राह्मणांचे स्वस्त्ययन काय सुचविते ?

हे पाणिग्रहण म्हणजे विवाह झाला असे मानले तरी उपलब्ध ऐतिहासिक साधनांत त्यास दुजोरा मिळत नाही. याच मोरे प्रकरणात गोळवाडीतील गोळे यांची सुंदर सून एका ब्राह्मण अधिका-याचे हाती लागून ती

त्याने शिवाजीकडे पाठविली होती. परंतु शिवाजीने तिचा आदर करुन परत पाठविली व त्या ब्राह्मणास नोकरीतून हद्दपार केले असा उल्लेख शेडगावकर बखरीत आहे. आणखी एक संभव म्हणजे हणमंतराव मो-यांच्या ज्या सुंदर मुलीच्या सोयरीकीसाठी शिवाजीने बोलणी सुरु केली होती तिच्याशी हणमंतरावांच्या मृत्यूनंतर त्याने विवाह करणे शक्य आहे. परंतु या बाबतीत मराठी साम्राज्याची छोटी बखर स्पष्ट नकारात्मक सांगते - " मो-याच्या स्त्रिया व कन्या होत्या. त्यांची सोयरीक न करतां सोडून सर्वत्रांस दिल्हे " चिटणीसी बखरीप्रमाणे मो-यांच्या स्त्रियांना पुरंदर येथे काही दिवस कैद करुन ठेवले होते व नंतर सोडून देण्यात आले. ' पाणिग्रह ' या शब्दातील श्लेषाने तसेच संपत्तिभि: तरुण्या: व जयश्रिय: या तीन पदांच्या भिन्न प्रकारे विशेष्य-विशेषण संबंधानी वरील पंक्तीचे तीन-चार प्रकारे भिन्न अर्थ होऊ शकतील त्याचा अधिक विचार सूज्ञांनी करावा.

या युध्दाचे कविकृत वर्णन वर दिले आहे. मोरे मोहिमेतील प्रत्यक्ष युध्दाचे वर्णन प्रस्तुत काव्याशिवाय अन्य कोणत्याही साधनात उपलब्ध नाही. " महाराज महाबळेश्वरी होते तेथे देवाचे दर्शन होऊन सूचना येताच निसणीचे घाटे जावळीस गेले. जावळी दोन प्रहर पर्यन्त भांडली नंतर ठाणे घेतले " असे चिटणीस म्हणतो. शिवदिग्विजयात सैन्य रडतोंडीचे घाटाने व शिवाजी महाबळेश्वराहून जावळीस गेल्याचे सांगितले आहे. या काव्यात सैन्यास रडतोंडीचे घाटाने जाण्यास सांगून स्वत: शिवाजी महाबळेश्वराहून खिंडीने (संकटा) चंद्रवनात उतरतो असे म्हटले आहे. महाबळेश्वराहून जावळीस जाण्याचा जवळचा मार्ग म्हणजे निसणीचा घाटच होय. म्हणजे या काव्यात सुचविलेली खिंड म्हणजे निसणीचा घाटच होय. ' संकटा ' शब्दाचा अर्थ खिंड अथवा दुर्गम मार्ग असा आहे. शिवदिग्विजयांत पाच सात हजार मावळे व पाच बारशे स्वार रडतोंडीचे घाटाने आल्याचे सुचविले आहे. स्वत: शिवाजी बरोबरचे

दोन-अडीच हजार सैन्य जमेस धरल्यास प्रस्तुत काव्यातील सैन्याचा दहा हजार हा आकडा जुळतो. ` पत्तींनामपि दशभिर्युतः सहस्त्रैः ..... ` (४।३८).

` जावळी दोन प्रहरपर्यन्त भांडली ` या चिटणीसी उल्लेखाशी ` साश्चर्यं प्रधनं बभूव भयदं मध्यंगते भास्करे ` (५।३६) हा उल्लेख जुळणारा आहे. शिवाजीचे सैन्य विध्यपर्वतावरून खाली उतरले असा उल्लेख आहे. म्हणजे रडतोंडीचे घाटाजवळील सध्याची मालकमपेठ असलेला डोंगर हाच विध्यपर्यन्त असावा. घाटाखालील दहा योजने विस्तीर्ण चंद्रवन म्हणजे जावळी भोवतीचे जंगल हे इतर संदर्भावरून लक्षात येते. चंद्रनगर किंवा चांद्रीपुरी म्हणजे अर्थातच जावळी होय. हे युध्द जावळी घेतल्यानंतरही आठ दिवस चालू होते असे प्रस्तुत कवी म्हणतो. श्री. दि. वि. काळे यांचे मते ` तेथे सहज महिना पंधरा दिवस झुंज चालली.` (काळे : शिवाजी, पृ. ५१). चंद्रावाचे सैन्याशी बेसावध स्थितीत कलह मात्र या काव्यामुळे नवीनच समजते आहे.

श्लोक ४।३९ व ५।३६ यांमध्ये चंद्रावास पुलिंद म्हटले आहे. पुलिंद म्हणजे रानटी, जंगलात राहणारा असा अर्थ घ्यावा. ` राजन्यः - पुलिंदयोः ` (शिवाजी व चंद्रावाचे युध्द) या शब्दावरून चंद्रावाचे हीन कुलत्वहि सुचवावयाचे असेल (५।३६) किंवा रानटी लोकांवर राज्य करणारा म्हणूनहि त्यास ` पुलिंदपति ` म्हटले असेल (४।३९) येथे पुलिंद हा विशिष्ट जाति-विषयक उल्लेख असेल असे वाटत नाही.

वितरणवर्णन नावाच्या सहाव्या सर्गातील कथाभागात सुरूवातीस ` जयश्री ` सह शिवाजी ससैन्य उद्यानसीमेपर्यन्त (आरामसीमाम्) सायंकाळी येतो. पुढे त्याला हत्ती दान देण्याची इच्छा होते तेव्हा ` आज्ञा केलेल्या त्या सकळकळे ब्राह्मणाने यज्ञाची सर्व सामग्री पूर्ण केली व चंद्रमालेच्या पलीकडील तीरावर पुण्यप्रदेशात अर्धा कोस जमीन मोठ्या नांगरांनी नांगरून शुध्द करून तेथे त्याने

पूर्वेकडे दार असलेला यज्ञमंडप तयार केला. (प्राचीपूर्व यज्ञवाट चकार ६।१८-२०) यज्ञाचे वेळी इंद्रादि देवतांना या ' सकळकळे ' ब्राह्मणाने आवाहन केलेले आहे. (६।३६), या काव्याचा कर्ता हि सकळकळे उपनामकच आहे हे येथे लक्षात घ्यावे.

जिच्या काठावर शिवाजीने यज्ञ केला ती चंद्रमाला नदी कोणती ते समजत नाही. यज्ञसमाप्तीचेवेळी ब्राह्मणांनी राजास सुवर्णकुंभानी गंगोदकाने ' राजाभिषेक ' केल्याचे व शिवाजीने ' सुवर्णाच्या उंच आसनावर ' अभ्यंग केल्याचे सांगितले आहे (६।४०-४१) हा राजाभिषेक यज्ञांगभूतच असावा. पुढे चांदीच्या मूर्तिंच्याचे दान केल्याचे सांगितले आहे. (६।४४). हा विशिष्ट विधी म्हणजे अवभृथस्नान असावे. तसेच त्या तीन मूर्ती कोणाच्या होत्या ते ही सांगितलेले नाही. हा यज्ञ झाल्यावर राजा कोंकण दिग्विजयासाठी निघाल्याचे सांगितले आहे.

सातव्या सर्गात सांगितल्याप्रमाणे कोंकण दिग्विजयासाठी शिवाजी तैलघट्टाने कोंकणात उतरला व समुद्रकिनारी चंपानगरीस (चौलास) गेला. हा तैलघट्ट म्हणजे मावळातून सुधागडचे बाजूने कोकणात उतरण्यासाठी आजहि अस्तित्वात असलेला तैलबैल्याचा घाट होय. या कोंकण मोहिमेचा तपशीलहि या काव्यात विशेष सांगितला आहे.

शिवाजी महाराजांची ही उत्तर कोंकण मोहीम सामान्यत: कल्याण-भिवंडी मोहीम म्हणून ज्ञात आहे. बहुतेक इतिहासकारांनी या सर्व मोहिमेतील कल्याण-भिवंडी भागास महत्व दिले आहे तर या कवीने कल्याण-भिवंडीचा नामनिर्देश गाळून आरंभीचे चौल-ग्रहण व शेवटचे माहुलीचे युध्द यास महत्व दिले आहे. म्हणजे या मोहिमेतील ज्ञात भागास प्रस्तुत काव्यातील माहिती पूरक ठरत आहे. विशेषत: या मोहिमेत चौल नक्की केंव्हा घेतले याचा उल्लेख अन्यत्र नाही. शिवाजी सुरुवातीस चौल घेऊन उत्तरेकडे गेला. मधील भागात पारसीकस्थलीजवळ

यवनांशी युध्द करून उत्तरभागात माहुलीचा किल्ला घेऊन परत आला. या उल्लेखांमुळे या मोहिमेचा सुसंगत कालक्रम लावणे शक्य झाले आहे.

चंपानगरीच्या म्हणजे चौलच्या वर्णनासाठी कवीने अकरा श्लोक लिहिले आहेत त्यात रामेश्वर, च्यवन, भार्गव (राम), व केशवनारायण यांचे मंदिरांचे उल्लेख आहेत. " शिवप्रताप: पुरतोऽपि गत्वा तामाक्रम्यां विचकर्ष चम्पाम् " । (७।५) यातील विचकर्ष (ओढली) या पदावरून शिवाजीने चौल घेतले असे अनुमान काढावे लागते. या अनुमानास पुष्टी देणारे प्रमाण म्हणजे गोवे दप्तरातील शिवाजीसंबंधीचे जुन्यात जुने पत्र होय. त्यात ` शहाजीच्या मुलाने वरच्या चौलचा ताबा घेतला. ` असे सांगितले आहे. हे पत्र २८ नोव्हेंबर १६५७ ला लिहिले आहे. (पिसुर्लेकर : पोर्तुगीज मराठे संबंध, पृ. ३१) कल्याण-भिवंडी घेतल्यावर शिवाजी चौलकडे वळला असे श्री. ब.मो. पुरंदरे समजतात. (पुरंदरे : राजा शिवछत्रपती, पूर्वार्ध, पृ. २४५).

चौलहून शिवाजी उत्तरेकडे निघाल्याचे सोळाव्या श्लोकात सांगितले आहे. येथून पुढे श्लोक १७ ते २९ मध्ये वर्णन केलेल्या भागाचा पूर्ण अर्थ लागत नाही. कल्याण-भिवंडीची मोहीम याच काळातील असल्याने तिचेच वर्णन असावे असा तर्क आहे. तपशील मात्र पूर्णतया नवीन आहे. त्याचे विवरण केवळ प्रश्नचिन्हांनीच करणे प्राप्त आहे.

चौलच्या उत्तरेस सर्व बाजूंनी समुद्राने वेष्टिलेले यवनपत्तन कोणते ? कदाचित हा उल्लेख जंजि-यासंबंधी असेल. तसे असल्यास कवीची ` दिशाभूल ` झाली असे म्हणावे लागेल. तोडलेल्या सोन्याप्रमाणे कान्ती असलेल्या ज्या पारसीक सैन्याशी शिवाजीने युध्द करून त्यांचा पराभव केला ते पारसीक

कोण ? त्यातील काही लोक अतुलारण्यातील किल्ल्यावर गेले. हे अतुलारण्य कोणते व किल्ला कोणता ? त्याचे नांव येथे कां दिले नाही ? युध्दोत्तर शिवाजीने जमीन खणून जडजवाहीर मिळविले या मोहिमेत कल्याण येथे दुर्गाडीचा किल्ला बांधताना शिवाजीस धन सापडले हे अन्य साधनांवरून समजते.

शिवाजीस भिवंडीला द्रव्य सांपडल्याचा उल्लेख कॉस्मा दा गार्दाने केला आहे. (बेंद्रे : शिवाजी, पूर्वार्ध, पृ. १३६). तो या काव्यातील वर्णनाशी जुळतो. यवनपत्तन म्हणजे भिवंडी तर नव्हे ? पण त्याच जागेस ` पारसीकस्थली ` असे म्हटले आहे. मुंबईस जाताना ठाणे-खाडीजवळ डोंगराचे पूर्वेस पारसीक नांवाचे एक ठिकाण आहे. त्याचे जवळच कोळवा येथे शिवकाली टांकसाळ होती असे म्हणतात. ती व ही पारसीक स्थली एकच काय ? या सर्गातील श्लोक ५ व २४ मधील ` शिव-प्रताप ` म्हणजे प्रतापराव गुजर तर नव्हे ? पुढेही सर्ग ८ श्लोक ४२ मध्ये ` शिवातिभक्ति-प्रचुर-प्रताप: ` असा सूचक निर्देश आहेच.

पंचविसाव्या श्लोकात ` श्रीसार्वभौमनृपते: सुहृदो गुरुश्च ` असे शिवाजीस म्हटले आहे. हा ` सार्वभौमनृप ` म्हणजे देवगिरीचा कर्णराजा असावा. शिवाजीने पारसिकांना स्त्रियांसह कैद करून स्वत:चे किल्ल्याकडे (निजगिरिं प्रति) पाठविले. हा किल्ला कोणता ? श्लोक २६ मधील ` प्रबल ` हे कशाचे विशेषण आहे ? प्रबलं महीध्रं या शब्दांनी प्रबलगड तर सुचविला नसेल ? तसे असेल तर पुढे तो गड घेतल्याचा उल्लेख का नाही ? याचवेळी समुद्राच्या पुळणीमध्ये कमलपत्रांच्या चषकांतून मधुपान करण्यास सैन्यास (आणि ते ही शिवाजीच्या) वेळ सांपडला काय ?

चौलच्या उत्तरेस निघाल्यापासून एवढ्या कालखंडातील या प्रश्नचिन्हांकित दुर्गम्य प्रदेशातून वाटचाल केल्यानंतर आपण मलयगिरीचे म्हणजे माहुलीचे पायथ्याशी शिवाजीसह निश्चितार्थासाठी येऊन पोचतो. श्लोक २४ मध्ये ` मलयाद्रि ` असा. उत्प्रेक्षार्थक ज्याचा उल्लेख आलेला आहे तोच हा श्लोक ३० पासून पुढे उल्लेखिलेल्या मलयाचल म्हणजे माहुली होय. हे श्लोक ३५-३६ मधील भांडार दुर्गाच्या उल्लेखावरून सिध्द होते.

माहुली गड ठाणे जिल्ह्यात शहापूरच्या नैर्ऋत्येस चार मैलांवर असून उत्तरेकडे पलासगड (पळसगड ?) व दक्षिणेकडे भाण्डारदुर्ग असे याचे दोन उपदुर्ग (पुरंदराचे वज्रगडाप्रमाणे) मैलभराच्या अंतराने आहेत. मुख्य माहुली-गडास रायगडाप्रमाणे सुमारे ६०० फूट उंचीचा नैसर्गिक तट सर्व बाजूंनी असल्यामुळे तो दुर्जेय आहे. (ठाणे गॅझेटियर) वर पुरेशी सपाटी असल्याने उत्तर कोंकणाच्या रक्षणाचे दृष्टीने हा अत्यंत महत्वाचा किल्ला होय. आणि म्हणूनच शहाजीने निजामशाहीच्या रक्षणासाठी तो शेवटपर्यन्त लढविला होता. इ.स. १६३६ मध्ये एका तहान्वये तो निजामशाहीकडून आदिलशाही-कडे आला. शिवाजीच्या उत्तर कोंकण मोहिमेतील हा गड घेणे या अत्यंत महत्वाच्या घटनेचा उल्लेख शिवापूर शकावली व्यतिरिक्त अन्यत्र फार कोठे नाही. या दृष्टीनेही या काव्याचे महत्व आहे.

युध्दाचा तपशील वर दिलाच आहे. जावळीच्या युध्दाप्रमाणेच याही युध्दाचा बराच तपशील कवीने दिला आहे. या दुर्गाचे महत्व जाणून शिवाजीने तेथे साधनसामुग्रीचा साठा करणे सुरू केले हे ` मलयाचलभूभृद्भिः समेतं खलु चक्रे नृपतिः शिवस्तदैव ` (७।४०) या पंक्तीने सुचविले आहे. हे कार्य बरेच दिवस चालू असावे. यास दुजोरा देणारे एक पत्र ` शिवचरित्र साहित्य खंड १२ मध्ये प्रसिध्द झाले आहे. यात मोगली अधिकारी चौकच्या देशमुखास

लिहितो. " सिवा मक्कूर माल व म्वेसी लोकांची तादी करून नेतो. खजाना व जिनसा जो मुलखात मौदूद आहे तो माहोली गडावरी नेऊन पहातो " इ. शिवाजीस तसे कर देऊन नये असेही यात पुढे बजावले आहे. (पत्र क्र. १०८, चौल देशमुख संग्रह) शिवापूर शकावलीप्रमाणे माहुली घेतल्याची तारीख १ जानेवारी, १६५८ येते. प्रस्तुत पत्राची तारीख ११ मार्च, १६५९ आहे. ' कच्छिदभि: क्रमितम् ' याचा अर्थ वरील पत्राचे संदर्भात अधिक स्पष्ट होतो.

माहुलीगड घेऊन ५ दिवसांनी शिवाजी राजगडावर परत आल्याचे शिवापूर शकावली व यादी यावरून सिध्द होते. या काव्यांतहि माहुली गड घेऊन नंतर शिवाजी स्वत:चे ठिकाणी परत आला असे म्हटले आहे. (स्वपुरीमाजगाम ७।४२). येथे सातवा सर्ग संपतो.

आठव्या सर्गाचे सुरुवातीस शिवाजी माहुलीकडून आपल्या मुलाच्या जातकर्माचेवेळी परत आला आहे. मुलाचे नाव चिंतामणी असे असून तो एक वर्षाचा झाला असता (वृत्तैक वर्षस्य ८।७) शिवाजीने ज्योतिषाकडून त्याचे भविष्य श्रवण केले. हा चिंतामणी ' सती ' चा म्हणजेच सईबाईचा पुत्र असल्याचे ६ व्या श्लोकात सांगितले आहे. याचे पांच ग्रह उच्चीचे असून (८।११) त्यास ' कृष्णा-नवावतार ' म्हटले आहे. (८।९).

सईबाईस १४ मे, १६५७ ला पुत्र झाला तो म्हणजे संभाजी. शिवाजी कोंकण मोहिमेवरून परत आला, १४ जानेवारी, १६५८ या दिवशी. " अथ जातकर्मसमये नृपतिर्गृहमाययौ निजसुतस्य निजम् " ही पंक्ती शब्दश: खरी धरली तर संभाजीचे जातकर्म ८ महिन्यांनी लांबले असे म्हणावे लागेल. तेंव्हा संभाजीचा जन्म व शिवाजी कोंकण मोहिमेवरून परत येणे हे पौर्वापर्य या दृष्टीने बरोबर असले तरी जातकर्मामुळे समजणारे कालाचे अंतर वस्तुस्थितीस

घरून नाही. तसेच चिंतामणी हे संभाजीचे जन्मपत्रिकेतील नाव होते काय हेही शोधून पाहिले पाहिजे.

सर्ग ९, १० व ११ मधील विषय इतिहासदृष्ट्या फार महत्वाचा नाही. नवव्या सर्गाचे सुरूवातीस शिवाजीने देवगिरीच्या राजाकडून आलेल्या प्रतिसंदेशाचे स्वागत संदेश आणणाऱ्या दूतास सामोरा जाऊन केले आहे ते फार मननीय आहे. (९।१-५) यांतील उद्यानसीमा (९।२) हा शब्द शिवनेचा निर्देशक असावा.

पुढे नवव्या सर्गाचे अन्तापर्यन्त विद्वत्सभावर्णन असून त्यात पंडितांनी केलेली शिवाजीची प्रशस्ती (श्लोक १०-३०) म्हणजे उच्च दर्जाच्या कवित्वाचा नमुना आहे. दहाव्या सर्गात शिवाजी विवाहाची इच्छा प्रकट करतो तेव्हा अनेक राजे (म्हणजे उच्च क्षत्रिय घराणी) त्यास नजराण्यासह सोयरिकीचे बोलणे करण्यासाठी येतात. या निमित्ताने रत्नपरीक्षा, स्त्रीसामुद्रिक व स्त्री शरीर-वर्णन (आलंकारिक) हे विषय आलेले आहेत. सर्गास शेवटी `रत्नवधूपुरूषा-परीक्षा` असे नांव दिले असले तरी प्रत्यक्षात पुरूषापरीक्षा हा विषय आलेला नाही. पुढील ११ व्या सर्गाचा विषय शिवविवाह असा आहे. त्यात सामान्यत: कोणत्याही श्रेष्ठ व्यक्तीच्या विवाहास शोभेल असे विवाहवर्णन करून शेवटी `अशारितीने शिवाजीने तीन विवाह करून वैरी राजांची कीर्ति स्वप्रतापाग्नीने जाळून टाकली` (११।३०) असे सांगून हा अकरावा सर्ग संपला आहे. विद्वत्सभा व विवाह यांत कोठेही स्थलाचा व कालाचा उल्लेख नाही. तसेच शिवाजी व्यतिरिक्त कोणाही महत्वाच्या व्यक्तीचा नामोल्लेख नाही. त्यामुळे या सर्गांना इतिहासदृष्ट्या फार महत्व नाही. या काळात म्हणजे इ.स. १६५७ च्या पुर्वार्धात शिवाजीने गायकवाड, इंगळे व जाधव यांचेशी

सोयरीक केल्याचे उल्लेख शिवचरित्राच्या अनेक साधनग्रंथांत आलेले आहेत. येथे कालक्रमदृष्ट्या हा प्रसंग कवीने योग्य ठिकाणी घातला आहे.

बाराव्या सर्गामध्ये श्लोक १ ते १६ मध्ये अफझलखानाचे अत्याचार व त्याचे वाईपर्यन्तचे आगमन सांगितले आहे. त्यात इतर ठिकाणच्या उल्लेखां-प्रमाणेच तुळजा फोडली, पांडुरंगास नाहीसे केले व खंडोबाकडून कर वसूल केला असे उल्लेख आहेत. ` य: पुण्डरीक प्रिय पाण्डुरंग दिगंतविश्रान्तगतिं विधाय । प्रासादमस्यापि निपात्य सद्य: शनैर्ययौ मल्लरिपो: स्थलीं ताम् । ततश्च म्लहारिम्हालसाभ्यां प्रहीतुकाम: करमप्यनल्पम् । वाद्यत्सु ढक्कानिवहेषु तूर्यै: पुरीं विराटस्य ययौ विशालाम् ।। ` (१।१२-१३) या श्लोकद्वयांतील पाण्डुरंग दिगन्तविश्रान्तगतिं विधाय ` म्हणजे ` पाण्डुरंगास देशोधडीस लावून ` या वाक्यांशातून खानाचे भीतीने विठ्ठलमूर्तीचे लपविणे सुचविले असावे. तसेच ` खंडोबाकडून भारी कर वसूल करण्याची इच्छा धरून वाईस आला ` असेहि म्हटले आहे.

श्लोक १५ मधील ` दाक्षिणात्यक्षितिपस्त्री ` म्हणजे विजापूरची बडी साहेबीण. यावरून पुढील सर्गात तीर्थराजपर्वतावर चाल करून आलेले दाक्षिणात्य क्षितीश म्हणजे विजापूरकर समजण्यास हरकत नाही.

अफजल भेटीपूर्वी शिवाजीस झालेला भवानीचा दृष्टांत सभासदी बखरीशी जुळणारा आहे. भेटीच्या दिवसाचा शिवाजीचा दिनक्रम व त्याने दिलेल्या दानांचाही उल्लेख या काव्यात तपशीलवार दिलेला आहे. शिवाजीने बिचवा व पट्टा बरोबर घेतला असून भेटीनंतर प्रथम खानाने वार करून शिवाजीचे शिरस्त्राण किंचित फोडल्यावर शिवाजीने वृश्चिकास्त्राने म्हणजे बिचव्याने खानाचा देह विशीर्ण केला. इ. तपशीलही उपलब्ध माहितीशी पडताळून पहाण्यासारखा आहे.

अफजल वधानंतर यवनव्याप्त वाई लुटून शिवाजी कोल्हापुरास गेला. परमानंदांनी उल्लेखिलेले ` श्रालयं नाम नगरं ` म्हणजे कोल्हापूरच. येथे शिवाजीचे मुखी घातलेली देवीची मानसपूजा हा या काव्यातील एक उत्कृष्ट स्तोत्राचा नमुना आहे. शिवाजीची येथे भावसमाधी लागणे हे इतर चरित्रकारांनी रेखाटलेल्या शिवाजीच्या स्वभावचित्रास साजेसेच आहे.

पुढे शिवाजी ज्या तीर्थराजपर्वतावर तप करतो तो गड कोणता हे समजत नाही. त्याचे भोवती वेढा व बैलांचे शिंगावरील पलित्यांची गोष्ट यामुळे १४ व्या सर्गातील घटना हा अनेक दंतकथांचे धागे एकत्र करून शिवचरित्राला दिलेले ठिगळ आहे असे वाटते. त्यातील घटनांचा सूक्ष्म अभ्यास करणे आवाक्या-बाहेरचे आहे. शिवाजीने येथे बसविण्यासाठी प्राकार बांधला (१४।५) असेच एक गोपुर शिवाजीने उत्तर कालात श्रीशैल्य पर्वतावर बांधल्याचे सर्वश्रुत आहे. १४ व्या सर्गात अशा रितीने अनेक घटनांची सरमिसळ झालेली दिसते. ती अभ्यासकांनी शोधून पहावी.

१४ व्या सर्गातील श्लोक ३७ ते ४४ मध्ये केलेले चाकणच्या वेढयाचे वर्णन आलमगीरनाम्यात दिलेल्या हकीकतीशी बरेच जुळते. (ग.ह. खरे : शिवचरित्र वृत्तसंग्रह, खंड ३, १९४१, पृ. २४-२५) मात्र स्फोटाने किल्ल्याचा भाग अंगावर पडून शत्रूसैन्याची हानी होणे व किल्ल्यातील तीनशे लोकांचे राजगडावर येणे या घटना येथे अधिक दिल्या आहेत. गोस्थल दुर्ग म्हणजे भुईकोट किल्ला चाकणाला चक्रदुर्ग म्हणतात हे प्रसिध्द आहे. या दुर्गाचे सर्पाकृती हे विशेषण लक्षात घेण्यासारखे आहे.

क्षितिमित्दौत्य विचार व दूतकर्मव्याख्यान नावाच्या सर्ग ८ व १५ या दोन सर्गामुळे या काव्यास अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे. या दोन्ही सर्गात शिवाजीने देवगिरीच्या कर्ण राजाकडे दोनदा पाठविलेल्या दूताची हकीकत आली असून रजपूत-मराठे संबंधावर यामुळे काही नवीन प्रकाश पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. विशेषत: शिवाजीशी कर्ण राजाचे अन्तस्थ संबंध यात प्रकट केले आहेत, म्हणून या दोन सर्गांचा येथे विशेष विचार करणे उचित आहे.

आठव्या सर्गातील १५ व्या श्लोकापर्यन्त आपल्या पुत्राचे भविष्यश्रवण संपल्यावर शिवाजी देवगिरीच्या उत्तरीय राजाकडे (त्याचेच प्रार्थनेवरून ?) दूत पाठवितो. या राजास सर्ग ८, ९ व १५ मध्ये अनेक ठिकाणी कूर्म सूनु (८।४८) कूर्म सुत (९।१), कूर्मभूप पुत्र (९।५), सार्वभौमतनय (१५।१), कूर्मराजतनय (१५।४), सार्वभौम (१५।१७) इ. विशेषणांनी संबोधिले असून त्यावरून सकृद्दर्शनी कछवाह (कछुवा) वंशातील कोणाचा तरी हा उल्लेख असावा असे वाटले तरी सर्ग ८ मधील श्लोक ४२ मध्ये त्यास ` कर्णनृप ` असे म्हटले आहे. (सौहार्दशाली नृपकर्णमित्री शिवोऽयमङ्गी कुरुते स्म नूनम् ।) यावरून हा कर्ण-नृप म्हणजे शहाजहान व औरंगजेबाच्या कारकीर्दित इ.स. १६३१ ते १६६९ चे दरम्यान बहुतेक काल बादशहाच्या इतर रजपूत सरदारांबरोबर मराठे व आदिलशाही यांचे विरुध्द सतत लढायांत गुंतलेला प्रमुख सरदार व देवगिरीचा सुभेदार कर्ण राजाच होय असे वाटते. मात्र यास कूर्मतनय का म्हटले आहे हे मात्र समजत नाही. कारण हा कर्ण राजा कछुवा वंशातील नव्हता. प्रख्यात रजपूत राजा अनूपसिंह याचा हा बाप असून त्यानेच औरंगाबादेत कर्णपूरा वसविला व करणीदेवीचे मंदिर बांधले. याची थोडक्यात माहिती अशी -

बिकानेरच्या भरटिया वंशातील राव सूरसिंह याला कर्णसिंह व शत्रुसाल असे दोन मुलगे होते. राव सूरसिंहास चार हजारी जात व तीन हजारी मनसब देऊन शहाजहानने इ.स. १६३० मध्ये दक्षिणेकडे बादशाही फौजेबरोबर पाठविले होते. तो इ.स. १६३१ मध्ये मरण पावल्यानंतर कर्णाने बापाची गादी मिळविण्याचेवेळी आपला मामा ठाकूर तेजमाल कृष्णावत व त्याचा मुलगा खंगार यांच्या बंडाचा बीमोड करुन त्यांना ठार मारले व दिल्लीस जाऊन बापाची मन्सब मिळविली. त्यास लगेच बादशाही फौजेबरोबर दक्षिणेकडे दौलताबादेस पाठविण्यात आले. जव्हारचे राज्य कर्णसिंहाच्या बहादुरीने हस्तगत झाले. इ.स. १६३६ मध्ये शहाजी व विजापूरकर यांच्या विरुध्द पाठविलेला दहा हजार सैनेमध्ये कर्णसिंहाचा समावेश असून विजापूरकरांविरुध्द झालेल्या सर्व लढायात बादशाही सैनेचा सेनापती सय्यद खानेजहाँ बरोबर कर्णसिंहाचा फार मोठा वाटा होता.

दरम्यान त्याच्या मुलुखात बिकानेर संस्थानवर नागोरचा राव ठ अमरसिंह (हा जसवंतसिंहाचा ज्येष्ठ बंधू असून त्यास बापाची गादी मिळाली नव्हती). याने हल्ला केला तेव्हा हा त्वरित बिकानेरला गेला व त्याने आपल्या जहाँगिरीचा बंदोबस्त केला. (बहुधा याच युध्दाचा ` बंधुयुध्द ` असा उल्लेख सर्ग ८ श्लोक ५२-५८ व सर्ग १५ श्लोक ३७ मध्ये आला असावा.) याचवेळी पुंगलचा भाटी राव सुंदरसेन यानेही बिकानेरवर हल्ला केला. त्याचा कर्णाने पराभव करुन पुंगल संस्थानातील गावे भाटी लोकांना वाटून टाकली.

शहाजहान आजारी पडल्यानंतर (सप्टेंबर १६५७) औरंगजेब आग्र्यास गेला. (मार्च-एप्रिल, १६५८). तेव्हा काही रजपूत सरदार त्याचे बरोबर व काही स्वतंत्ररित्या आग्र्यास गेले. कर्णसिंहाने आपले दोन मुलगे औरंगजेबाबरोबर पाठवून स्वत: विनापरवानगी बिकानेरला गेला व याबद्दल औरंगजेबाची त्याचेवर

(काही काळ) गैरमर्जी झाली. ` बिकानेरकी तवारीख ` मध्ये लिहिले आहे की, ` आलमगिराने जेव्हा सर्व हिंदु राजांना मुसलमान करण्याचे मनांत आणले, तेंव्हा त्यांनी एक होऊन कर्णसिंहास पुढारी बनवून त्याचेम मुखाने नकार कळविला. पुढे औरंगजेबाने याचा मुलगा अनूपसिंह यास बिकानेरच्या गादीवर बसवून कर्णसिंहास दौलताबादेस पाठविले. इ.स. १६६९ मध्ये याचा अदोणी येथे मृत्यू झाला.

पुढे याचा मुलगा अनूपसिंह याचीही दक्षिण मोहिमेवर इ.स. १६७० मध्ये रवानगी झाली. अशारितीने या वंशाच्या तीन पिढया (इ.स. १६३० ते १७०७) दक्षिणेत खपल्या, याचेकडे देवगिरीसारख्या अत्यंत महत्वाच्या किल्ल्याचे अधिकार होते. यावरून त्याचे श्रेष्ठत्व समजते. इतकी वर्षे दक्षिणेत असलेल्या या रजपूत राजाचे व शिवाजीचे संबंध या काव्याचे निमित्ताने प्रथमच प्रकाशात येत आहेत.

शिवदूताची व कर्णाची पहिली भेट कोकण दिग्जयानंतर व अफझल-वधापूर्वी म्हणजे इ.स. १६५८ मध्ये झाली असावी. याचवेळी (ऑगस्ट १६५८) सोनोपंत डबीर औरंगजेबाचे भेटीस शिवाजीचा निरोप घेऊन गेले होते ते वाटेत देवगिरीस थांबल्याचा तर हा निर्देश नसेल ना ? पहिल्या भेटीत (आठवा सर्ग) या दूताचे कर्णाकडून विशेष आनंदाने स्वागत झाले नाही. श्लोक १८ ते २३ मध्ये कर्णराजाची प्रशस्ती झाल्यावर ` असा तो राजा ` शिवाजीचे मैत्रीची इच्छा करून दूतास बसण्यास सांगून शिवाजीचे कुशल विचारतो. श्लोक २६ ते ४७ शिवदूताचे संभाषण आहे. पुढे श्लोक ४९ ते ५४ मध्ये कर्णाचे त्यास प्रत्युत्तर आहे.

शिवदूत आपल्या संभाषणात ` कूर्म ` (कर्णाचा पिता) शिवाजीस कुलत्याप्रमाणे (पितृव्यमान्य) असल्याचे सांगतो. कर्णास शिवाजी ज्येष्ठ बंधू

प्रमाणे मानत आहे इ. प्रस्तावना व पुढे २८ ते ३७ पर्यन्त शिवगौरवपर भाषण झाल्यावर शिवाजी हा कर्णाचे वडिलांनी सीमा घालून दिलेल्या त्याचे राज्यावर आक्रमण करीत नाही असे सुचवितो. पुढे ४० व्या श्लोकांत शिवाजीने जुन्नर लुटल्याचा उल्लेख केला आहे. कल्याण-भिवंडी घेतल्यावर लगेच शिवाजीने जुन्नर लुटले होते असे कॉस्मा द गार्द याचे वर्णनावरून वाटते. जुन्नर लुटीचा हा उल्लेख येथे कालदृष्टया बरोबर जुळतो. थोडी भीती दाखवून, थोडा विनय करून दूत मैत्रीचा प्रस्ताव पुढे मांडतो. त्यातील ' यासां भवन्निखिल.......' (४६) या श्लोकाने कोणते राजकारण सुचविले असावे यासंबंधी अनेक अंदाज बांधता येतील.

कर्णराजाच्या प्रत्युत्तरात त्याने आपल्या गृहकलहात (स्वत:च उत्तरेकडे जावे लागत असल्यामुळे देवगिरीचे रक्षण करून ?) शिवाजीने आपल्यास मदत करावी असे सुचविलेले दिसते. यातील ' आस्ते सखे सकलदेव गिरिस्त्वदीय:....' (८।५३) हे शब्द सूचक आहेत. हे कार्य शिवाजीने अंगीकारून पार पाडले असावे असे ' भीमे यदत्रभवतामपि बंधुयुध्दे.....' (१५।३७) या श्लोकावरून दिसते. यात शिवाजीने हे कार्य केल्याची शिवदूत कर्णास आठवण करून देत आहे.

आठव्या सर्गातील ' व्यासङ्ग.मस्मदरिसौख्यकरं विहाय.....'(८।५५) यात कर्णाच्या ' शत्रूस हितकारक ' अशा शिवाजीच्या कोणत्या कार्याचा निर्देश आहे हे शोधून पाहिल्यास या काळातील शिवाजीच्या हालचालींवर अधिक प्रकाश पडेल. या प्रसंगी देवगिरीचे रक्षण शिवाजीने केले असे मानल्यास तो अथवा त्याचे सैन्य इ.स. १६५८ ते १६६० च्या दरम्यान औरंगाबादेजवळ गेले होते काय हे पहावे लागेल. आग्र्यास जाताना (इ.स. १६६६) शिवाजी औरंगाबादेवरून गेला होता, पण या प्रसंगाचा त्याचेशी संबंध नसावा. या पूर्वी

शाहिस्तेखानास दक्षिणेकडे पाठविण्याची कारणे देताना चिटणीस लिहितो, ` ..... औरंगाबादेचा पुरा लुटला. रायबागीण व मोहबतखान ... बुडविले......` इ. (कलम १७७) म्हणजे शाहिस्तेखान दक्षिणेत येण्यापूर्वी शिवाजीची धडक औरंगाबादेपर्यन्त गेली होती. तेथे तो केवळ लुटीनिमित्त गेला की अन्य काही कारण होते हे शोधले पाहिजे. **S.G. Dawane** यांनी आपल्या **Ellora and Environs** या पुस्तिकेत शाहिस्तेखान दक्षिणेत असताना शिवाजी औरंगाबादेजवळ आल्याचा उल्लेख केला आहे तो असा, **"As Shahistakhan proved unequal to the task, Prince Muazzam was sent. In spite of all these efforts Shivaji appeared in the vicinity of Aurangabad itself."** (१९७०, पृ. १७) यात मूळ माहिती कोठून मिळाली हे लिहिलेले नाही. शिवाजी तेथे येण्याचे कारण व तेथे त्याने प्रत्यक्ष काय केले तेही लिहिलेले नाही. शिवाजीच्या औरंगाबादभेटीच्या वरील दोन्ही उल्लेखांचा त्याच्या देवगिरी रक्षणाचे कार्याशी काही संबंध आहे काय हे आणखी सबळ प्रमाण मिळाल्याशिवाय निश्चित सांगता येणार नाही.

दुसऱ्या वेळेस दूत पाठविला आहे तो शाहिस्तेखानाचा पुण्यात मुक्काम असताना. हा दूत एक हजार सैन्यासह पालखीत (शिबिकासनस्थ:) बसून निघाला आहे हे लक्षात घेण्यासारखे आहे. आपल्या येण्याचे प्रयोजन दूत स्व:ता सांगत आहे. ` तुझ्या सैन्यातील यवनांकडून शिवाजीच्या मुलुखास उपद्रव होत आहे.....` असे दूत सांगतो (१५।१३), पुढे चाकणचे वेढ्याची हकीकत सांगतो. पुढे श्लोक ११ ते ३२ चा आशय असा, ` आपला चाकणचा किल्ला पडल्याचे ऐकून शिवाजी दक्षिणेकडील किल्ल्यावरून राजगडास आला. तुझ्या प्रबळ सैन्याने (ब्राह्मणांस ?) उपद्रव दिल्याचे ऐकून व यवनाने (शाहिस्तेखान) सर्व देश बळकावला हे पाहून शिवाजी काही काळ स्वस्थ बसला. तुझ्या पूर्वीचे क्षत्रिय योध्दे शिवाजी घाबरला असे म्हणू लागले तेव्हा निंदा सहन न होऊन त्याने स्वत:चे सैन्यास

युध्दाचा आदेश दिला तेंव्हापासून तुझी सेना (शिवसैन्याचे भीतीने) विस्कळीत होऊन समुद्रकिनारी रेंगाळत आहे. तुझा सेनापती साठ हजार सैन्य अहोरात्र सज्ज ठेवून शिवाजीचे भीतीने पुण्यात जागरूक राहिला आहे. यवन सेनापती (शाहिस्तेखान) चाकण जिंकल्यानंतर शिवाजीचे भीतीने दोन वर्षे (तसाच) आहे. जहाजावरील धन लुटून शिवाजीने समुद्रात हजारो यवन मारले हे त्यांचे आश्चर्यकारक कृत्य तुझ्या योध्द्यांकडूनही ऐक. तू युध्द करत नाहीस असेही नाही व युध्द करणेही टाळत आहेस हे दोन्ही सहन न होऊन शिवाजीने मला तुझ्याकडे पाठविले आहे. प्रभयकोकणातून घाटावर आलेल्या व नेता नसल्यामुळे विस्कळीत झालेल्या तुझ्या सेनेची उपेक्षा काय करतोस ? (१५।११-१२).

यांत विस्कळीत होऊन समुद्रकिनारी रेंगाळणाऱ्या सेनेचा उल्लेख हा उंबरखिंडीतील युध्दानंतरच्या कोकणात राहिलेल्या मोंगली सैन्याचा निर्देशक आहे, असे मानावयास हरकत नाही. ही सेना ` प्रभयकोकणातून ` घाटावर आल्याचा उल्लेख कवीने केला आहे. प्रभयकोकण म्हणजे कोकणाचा कोणता भाग हे समजले म्हणजे हा घाटही समजेल. शाहिस्ताखान दोन वर्षे ठाण मांडून आहे हा उल्लेखही इतिहास संगत आहे. तसेच हा दूत या देवगिरीच्या राजास कधी भेटला हेही अप्रत्यक्ष कालनिर्देशामुळे समजू शकते. शिवाजीने जहाजे लुटल्याचा उल्लेख नेमका कोणत्या वेळचा आहे हे मात्र शोधले पाहिजे.

पुढील श्लोक २३ ते २८ विशेष चिंतनीय आहेत. यात ` नात्मे तेऽतिकृपया.....` या पंक्तीतून एक विशेष गोष्ट सुचविली आहे. तुझ्या वडिलांनी कृपाळूपणे पाहिलेल्या शिवाजीचा तू द्वेष करू नकोस (१५।२३) असे दूत कर्णास म्हणतो. याचा संदर्भ कसा लावावयाचा ? कर्णाचा पिता राव शूरसिंह भुरटिया हा ४ मार्च, १६३० रोजी बादशाही सेनेबरोबर दक्षिणेकडे

निघाला. तो आक्टोबर १६३१ चे दरम्यान कधीतरी वारला. यावेळी शिवाजी शिशु अवस्थेत होता. शिवजन्मकालामध्ये शहाजी धामधुमीतच होता. त्यावेळी मोंगली सैन्याबरोबर आलेल्या या शूरसिंहाने बाल शिवाजीच्या संरक्षणासाठी काही मदत केल्याचे वरील उद्‌गार सूचक त्या नव्हेत ? अन्यथा ` अतिकृपया परिवीक्षातस्य ` या दोन शब्दांचा काय अर्थ होऊन शकेल ?

पुढे यवनसेनापतीच्या आधिपत्याखाली लढणारे तुझे सूर्यवंशीय क्षात्रिय (राजपूत) निष्कारण मरत आहेत असे सांगून शिवाजीने केलेल्या देवगिरीच्या रक्षणाचे स्मरण देऊन माझे म्हणणे लक्षात घेतले नाहीस तर युध्दातच गाठ पडेल असे दूत सांगतो. तेंव्हा या दूतास शांत करून कर्ण प्रतिसंदेश देतो. हा संदेश शिवाजीचे कर्णराजाशी संबंध अधिक स्पष्ट करणारा आहे. त्यातील महत्वाचा भाग असा -

` माझा मित्र जो शिवाजी त्यास एकांतात तू असे सांग की दैवयोगाने आमचे वडील वारल्यानंतर बंधुवर्गाशी युध्द चालू असतां व या देशात दुष्काळ पडला असता माझ्या मामाने कपटाने देवगिरीच्या रक्षणाचे दुर्घट कार्य माझ्यावर सोपवून तुझ्याशी निष्कारण कायमचे वैर निर्माण करून स्वार्थाने येथून काढता पाय घेतला. तो तुझ्याशी युध्द करण्यास आला असेल तर त्यास लवकर स्वतःचा पराक्रम दाखव आणि हा माझा निरोप गुप्त ठेव. कारण माझ्या मित्रांना हे समजले तर ते कष्टी होतील (१५।४४-४७) असा निरोप शिवाजीसाठी देऊन दूतास सूचनाही महत्वाची दिली आहे. ` दूता, तू येथून रागावल्याचा बहाणा करून नीघ. स्नेहसूचक असे हे रत्न शिवाजीस भेट देऊन रणांगणात यवनाचा खुशाल वध कर असे त्यास सांग. (१५।४८)` या संदेशातील ऐतिहासिक सत्य तपासून पाहण्यास आपल्याला पुरेशी साधने उपलब्ध नाहीत. शाहिस्तेखाना-बरोबर असलेला जसवंतसिंह हा या देवगिरीकराचा मामा होता काय ? तसे

निष्पन्न झाल्यास वरील संदेशात काही तथ्य असण्याचा संभव आहे, तसे नसल्यास हा मामा कोण ते ही शोधावे लागेल. याच सर्गात शिवाजीकडे ५६ दुर्ग व १ लक्ष सैन्य असल्याचे सांगितले आहे.

सोळाव्या सर्गाचे आरंभी दूतमुखाकून संदेश श्रवण केल्यावर शिवाजीस पौराणिकाकडून राजनीती ऐकण्याची इच्छा होते. त्याप्रमाणे सर्ग १६ व १७ मध्ये केवळ राजनीती सांगितली असून सतराव्या सर्गाचे शेवटी एकाच पंक्तीत ` रात्री कूर्मसुताच्या सेनेचा शिवाजीच्या सैन्याने कूटयुध्दाने पराभव केला ` असे सांगितले आहे. येथेच कूटयुध्दाचे उपलब्ध काव्य समाप्त होते.

हे शिवकाव्य म्हणजे जसा इतिहास आहे तसेच काव्यही आहे आणि शास्त्रही आहे. यातील केवळ काव्य व शास्त्र वगळून फक्त ऐतिहासिकदृष्टया महत्वाच्या भागाचा परिचय मात्र वर करून दिला आहे.

या ठिकाणी कवीचा हेतू इतिहास सांगण्याचा नसून ` महाकाव्य ` रचण्याचा उघड दिसतो. संपादक श्री. गोस्वामी यांनी ग्रंथाचे नाव ` शिवकाव्य ` असे दिले. पण कवीने मात्र ` शिवमहाकाव्य ` (सर्ग ४), शिवनरपतिकाव्य (सर्ग ५), प्रथितशिवनृपाळ वाङ्-काव्य (सर्ग ६), शिवस्य काव्य (सर्ग ७, १४), शिवनृपाळ - वाङ्-काव्य (सर्ग ८), शिवकाव्य (सर्ग १२, १३, १५) आणि सर्ग ७ च्या अखेरीस नुसतेच ` सुकाव्य ` असे तो लिहितो. तथापि ` शिवकाव्य ` हा उल्लेख तीन सर्गांन्ती आहे. तो सुटसुटीतहि आहे. म्हणूनश्री. म.म. द.वा. पोतदार यांचीही निवड योग्य वाटते.

शाहसुनू - शिवाजी हा शहाजीचा पुत्र आहे असे वर्णन करणारी स्थळे जागोजाग आढळतात व शिवाजीच्या तोंडी कवी म्हणतो, (सर्ग १२-३८),

` पित्रो: पदाब्जे शपथं करोमि ` अशी पित्याच्या पायाची शपथ ।
` आई शपथ ` म्हणण्याची पध्दत प्रचलित आहे. पण येथे कवी वडिलांची शपथ घेत आहे. पुन्हा लगेच ` जानीहि रे बालक शाहसूनो ` (१२।४०) ` श्री शाहसूर्यस्य सुतं कृतान्तम् ` (१२।७४) अशी वचने एका सर्गात लागोपाठ आढळतात. तेंव्हा कवीचा शहाजीविषयी परमादर अत्यंत स्पष्टपणे प्रतिबिंबित झाला आहे.

या शिवकाव्याच्या प्रारंभीच कवी ` वनपालबाल ` या वर्णनाची व्यक्ती उभी करतो. हा वनपालबाल शिवाजीला शिववनात भेटतो. २, ३, ४ या पहिल्या ३ सर्गात हे उल्लेख आलेले आहेत. दुसऱ्याचे केवळ २, तिसऱ्याचे ८ आणि चवथ्याचे सुमारे १० एवढेच श्लोक येथे छापले आहेत. उलट २, १४, १००, १०५, १२० या श्लोकांचे संदर्भ दिले आहेत. पण ते छापलेच नाहीत. अभ्यासकांचे मन त्यामुळे नि:शंक होण्यास अडचण निर्माण होते. सर्ग १० व ११ यांचा त्रोटक सारांश चार-दोन ओळीमध्ये दिले आहेत. आणि सर्गमुद्रण सारख्याने का होईना पण केलेच नाही.

हा वनपालबाळ कोण असावा ? ह्याला समीपमानीय रहस्युवाच जवळ बोलावून एकांतात विचाराने असा एवढा हा कोठला कोण ? त्यापूर्वी जो त्रुटित भाग तिसऱ्या सर्गाचा छापला आहे त्यांत हा वनपालबाल शिवाजीला सुचवितो की, जवळच पर्णशाळेत राहणाऱ्या तपस्वी धरणीधर मुनीचे दर्शन घ्यावे, तेथे क्षुधापीडित कुमारदास (१) दरिद्री वैदिकांना संतुष्ट करावे. एवढे बोलून हा बाळ आपल्या समृध्द पर्णशाळेत शिवपूजनाला जातो मग शिवाजी पायीच चालत गेला आणि त्याने अतिथिपूजन आणि धरणीधर दर्शन केले. हे स्थळ ` श्रीशिवेन विनयेन पालितां ` तसेच ` सन्मुनीश धरिणीधरेण च ` .... शिवाजीने पाळलेले (शिववन ?) असतां एवढे मुनि धरणीधर त्याला ज्ञात

नसावे ? चिंचवडचे धरणीधर महाराज म्हणावे तर जुळणारच नाहीत. असा हा बाळ त्या शिवाजीला तत्र गिरेः राजगडाच्या दक्षिणेस महाबळेश्वराच्या जवळच्या ` चांद्रीपुरी ` कडे वळवितो (सर्ग ४) पण सर्ग २ च्या पृ. ६ वरील सारकथनात ` कौंडिण्य ` पर्वत (कोंडाणा किंवा सिंहगडच हा) राजगड, शिवपत्तन या स्थळांचे दिशापूर्वक निर्देश करतो. तो महत्वाचा भाग मूळ छापलाच नाही. चौथ्या सर्गाच्या मुद्रणात ३६ ते ३९ आणि त्यापुढे पुन: ३८-३९ ते ४२ असे चुकीचे अंक उपलब्ध प्रतीत मुळातच आहेत. एकंदरीत हस्तलिखित एकच, ते अशुध्द, पुन: श्लेषरचना, रडतोंडी घाटनामाचे ` अश्रुमुखी ` असले संस्कृतीकरण, अवघड संस्कृत शब्द लावून त्याचा अर्थ लावणे आणि इतिहासातील घटनांशी मेळ पहाणे असे अत्यंत कटकटीचे कठीण संपादकीय काम श्री. गोस्वामी यांच्यापुढे होते ते त्यांनी यशस्वी केले.

कवी म्हणतो चांद्रीपुरीत कोण्या पुलिंदपतीचा अधिवास होता (सर्ग ४-३९, काचित्पुलिंदपतिनास्ति कृताधिवासा) पुलिंद्रपतीचे हे प्रकरण येथेच दिसते. यापूर्वी इतिहास काही तसे कोठे बोलल्याचे ठाऊक नाही. पश्चिमेला समुद्रतीरावर ` रामाश्रम ` असल्याचा उल्लेख येतो. हे स्थळ कोणते असावे ? राम परशुराम समजून, भार्गवराम-परशुराम क्षेत्र मनात येते. पण स्थळांचा निश्चय योग्य होत नाही.

रडतोंडीच्या बाजूला शैवी सेना व चांद्रीसेना यांचे भयानक युध्द झाले. त्यात शिवकटक उधळले गेले. शैवी सावधान झाले आणि मग मध्यानीवर सूर्य आला असतां (सर्ग ५-३६) राजन्य-पुलिंदांचे मोठे युध्द झाले (५-३६) या प्रकरणी केलेले संपादकीय भाष्य (पृ. १४) स्वीकारार्ह वाटत नाही. कारण त्यावर श्री.म.म. दत्तो वामन पोतदार हे असे म्हणतात की, ` मोरे हे ९६ कुळीत उच्च गणलेले, त्यांनाच गोस्वामींनी पुलिंद कल्पिलेले आहे. पुलिंदावर

राज्य करणारा तो पुलिंदपती या अर्थाने त्या वनात पुलिंद असतीलही. पण पुलिंदपती आणि तो चांद्रीपुरी दाबून बसेल हे कसे शक्य आहे म्हणून त्यांनी पुलिंदपती म्हणजे चंद्रराव मोरे असे मनाशी कल्पून चंद्ररावांचे ` हीनकुलीनत्व ` सुचविण्याचा कवीचा हेतु असावा, अशी कल्पना केली. मो-यांचे कुलीनत्व एवढे अभेद्य होते आणि आहे की कल्पनेच्या भरातहि त्यांच्या पदरी ` हीनकुलत्व ` स्वप्नातहि बांधणार नाही. मग ` विद्यापारंगत ` संकर्षण सकळकळे ते करण्यास क्षणभरहि धजणार नाही, हे सत्य आहे. अर्थ इतकाच की, ` वसनरहितभिल्लीभीषण ` रानात वनवासी पुलिंद होते यांची एखादी लढाऊ तुकडी चंद्ररावाच्या पदरी असेल आणि तिच्याकडे चांद्रीपुरी रक्षणाचे काम, ती हिरीरीने लढणारी म्हणून चंद्ररावाने सोपविले असेल. हे पुलिंद पथक शैवी सेनेला आडवे आले आणि दोघांची भिडत झाली.

पंधराव्या सर्गात दूतकर्म व्याख्यान आहे. हा शिवाजीचा दूत संकर्षण सकळकळे असेल काय ? " दूतो वाचस्पतिः प्रबलकाव्य निबंधदक्षः " असे दूताचे वर्णन आहे. तसेच (सर्ग ८-४९) ` यतोऽस्य चतुरो भवानपि हि दौत्यमाप्तः स्वयम् । ` हाही उल्लेख लक्षात घ्यावा लागतो. ते दूतकर्म, ते संवाद, ते देवगिरी प्रकरण सगळेच जरा अद्भुतपूर्वकच म्हणावे लागेल, पण कवी त्यात खूप गुरफटला आहे. तेव्हा या सकळकळे घराण्याचा संपूर्ण छडा लावणे आवश्यक आहे.

यांत आणखी एक धक्का देणारा विषय आहे. कवीने शिवाजीला ` चिंतामणि ` नावाचा मुलगा बहाल केला आहे. त्याचे मोठे प्रयोजनही काव्यात नाही. असा हा शिवपुत्र चिंतामणी प्रथमच श्रुतिगोचर झाला आहे. माता सती म्हटली आहे. सती म्हणजे सई. ह्या सईबाईंचा मुलगा छत्रपती

संभाजी. मग हा चिंतामणी मध्येच कोठून आला ? ज्या तीन नवीन बायका शिवाजीने केल्या, (शके १५७८-७९) त्याचा इतरत्र नोंदी पहाता कांही मेळ पडत नाही.

नंतर कवीने शिवाजीला चंपा नगरीचा भर्ता व जयश्री म्हणजे विजय ही कोणी पत्नी असे काव्यमय वर्णन केले आहे. चंपा म्हणजे चौल नगरी.

कवीने शिवाजीचे आणि खानाचे घोर युद्ध झाले म्हणून वर्णन केले आहे व हेही प्रकरण मुळातूनच सर्व वाचण्यासारखे आहे.

सातव्या सर्गात अतुलारण्य (सर्ग ७-२१) आणि स्थळात पारसीक, धनपुर, यवनपत्तन असे शब्द कवीने योजले आहेत. ह्या तीन भिन्न वस्तू नसून एकच गोष्ट आहे अशा दृष्टीनेही श्री. पोतदारांनी त्याचा विचार मांडलेला आहे.

या शिवचरितात ' श्रीसार्वभौम ' नावाने कूर्म-वर्ण राजाचा उल्लेख वारंवार केलेला आढळतो. आणि या सार्वभौमाचा व शिवाजीचा निकट संबंध वर्णिलेला आहे. हे एक नवेच प्रकरण आहे. त्याची खूप चर्चाही मागे केलेली आहे. त्याचा एवढा सन्मान आणि तो मानी शिवाजीने करावा यात कवीचे काही तरी लाघव असावे किंवा काही गूढ राजकारण असावे. या काव्यातील सार्वभौम दौत्य प्रकरणाची कसून चिकित्सा करणे जरूर आहे.

अधून, मधून काही प्रसन्न उक्ती या काव्यात आढळतात. अकस्मात तुळजा प्रकट झाली, तेव्हा शिवाजी साहजिकच दचकला (१२-३४) मग जरा सावरून बोलताना म्हणाला, ' नूनं स्वकीयामबलां विनाहमन्यां स्त्रियं मातरमेव मन्ये । अत्रापि चित्ते त्व संशयश्चेत्पित्रोः पदाब्जे शपथं करोमि ।। (१२-३८)

अफजलाला कवी ` प्रत्तिपति ` (१२-९) संबोधितो. त्याचा वध केल्यावर शिवाजी वाईला आला. ही वाई त्यावेळी अशी संपन्न होती - सा विराटनगरी गरीयसी संपदैव यवनेन संभृता । दर्शनोत्तरमलुंठि निर्दय श्री शिवेन यवनीभिराकुला ।। (१३-२) कवी निर्भयपणे शिवाजीला वाई लुटीबद्दल निर्दय म्हणतो. चंद्रराव प्रकरणात कपट शब्द (५-६०) दिसते ते तसे होते असे म्हणावयास संकर्षण कवी कचरला नाही.

अशा रितीने संकर्षण सकळकळे कृत डॉ. गोस्वामी संपादित ` शिवकाव्याचा ` परिचय करून घेतलेला आहे. त्यामध्ये आलेल्या शंकास्थळाचे थोडक्यांत विवेचन केले आहे. तेव्हा हे काव्य इतिहास संशोधन करणाऱ्यांना एकप्रकारेच आव्हानच आहे. तेव्हा वाचकांनी व अभ्यासकांनी या काव्याकडे लक्ष देवून या त्रुटित भागावरून शिवचरित्रावर कोणता नवा प्रकाश पडण्याची शक्यता आहे ती अजमावून पहावी.

घ) राजारामचरितम् :

तंजावरच्या सफर्जी महाराजांच्या सरस्वती महालातील हस्तलिखित ग्रंथ समुच्चय महाराष्ट्रीयांना ज्ञात आहेच. या ग्रंथालयातील संस्कृत विभागाचे सूचीग्रंथ संभाजीविषयक साधनांच्या शोधार्थ तपासले. त्यावेळी वरील चरित्र सापडले.

हा ग्रंथ $९\frac{७}{१०} \times ४\frac{१}{२}$ इंच लांबीरुंदीचा आहे. लिखाण कागदावर असून उजव्या बाजूला आहे. एकंदर पृष्ठसंख्या ३४ असून प्रत्येक पृष्ठावर ६ ते ८ ओळी लिहिलेल्या आहेत. बहुतेक सर्व ग्रंथ अनुष्टुभांतच रचलेला असल्यामुळे प्रत्येक ओळीची अक्षरसंख्या १६ आहे. या काव्याचे एकंदर पाच सर्ग असून काव्य

पूर्ण आहे. केशव पंडित हा या ग्रंथाचा लेखक आहे. हे हस्तलिखित खास केशव पंडिताचा मूळ ग्रंथ आहे की नक्कल आहे असे खात्रीपूर्वक जाणता येत नाही.

केशव कवीची माहिती इतरत्र उपलब्ध नाही. त्याचे आणखी एखादे काव्यही अद्यापि आढळून आले नाही. परंतु त्यानेच आपली जी काही माहिती काव्याच्या उपोद्घातातच आली आहे. त्यावरून हा कवि राजाराम महाराजांचा समकालीन होता, यात शंका राहत नाही. ग्रंथारंभी राम वाल्मीकींना नमस्कार केल्यानंतर " ज्या क्षेत्रांत श्रीमान् परशुरामाचे पूजन केले जाते, त्या क्षेत्रातील रहिवासी, विविज्ञ, सत्यवादी, शुचिर्भूत, शास्त्रप्रवीण, षट्कर्मे करणारा, उत्तम बुध्दिमान, भगवद्भक्तिपरायण, प्राणिमात्रांच्या हितांत रत असणारा, केवळ न्यायानेच मिळविलेल्या धनावर आपल्या कुटुंबाचे परिपोषण करणारा असा ब्राह्मण, " असे त्यांनी आपले वर्णन केले आहे. यावरून कवी कोकणात परशुराम क्षेत्री म्हणजे चिपळूण किंवा त्याच्या आसपासच्या एखाद्या गांवी राहणारा असला पाहिजे, असे अनुमान काढण्यास हरकत नाही. सन १६८९ च्या सप्टेंबरातील नवरात्र-महोत्सवांत पाराशर म्हणजे पन्हाळगडावर राजारामाने बिल्वशाखार्चन केले, त्यासाठी " विद्वान केशवाने ब्राह्मणादिकांना निमंत्रण दिल्याचा उल्लेख केला आहे. विजयादशमीच्या मुहूर्तावर राजारामाने कर्नाटकास जाण्याकरिता प्रस्थान करते समयी म्हणजे १४ सप्टेंबर रोजी स्वस्त्ययन गाण्यात केशवादि विशेषत: होते. " असे म्हटले आहे. यावरून केशव कवि राजारामाचा समकालीन असावा, यात शंका नाही व ते सिध्द करण्यास अधिक पुराव्याची अपेक्षा हि धरण्याचे कारण नाही. परंतु ग्रंथरचनेचा काल चरित्रातच दिला असल्याने कवीच्या कालाबद्दल अगदी विपुल असा पुरावा उपलब्ध आहे. " शुक्लवर्षे माघमासे शुक्लपक्षे शनेर्दिने चतुर्थ्यां भाक्विवृतांत राजाराम-जयावहं कृते पंडित केशवाभिधः " असा सुरुवातीस उल्लेख केला आहे. हा

ग्रंथलेखनाचा काल इंग्रजी तारखेत सांगावयाचा तर तो ४ जानेवारी, १६९० येतो. या कालातील तपशिलात खरे जंत्रीप्रमाणे तिथिवारांचा पूर्ण मेळ बसत आहे. प्रसंगनिर्देशावरूनहि लेखनाचा वरील काल कायमच ठरतो. कवीला १६८९ तील नोव्हेंबरच्या सुरुवातीला रायगड मोंगलानी घेतला हे वृत्त ग्रंथ-समाप्तीपर्यन्त समजले नव्हते असे दिसते. यावरून हा कवि पन्हाळ्याजवळ आसपास राहिला असावा, असे वाटते व हा ग्रंथ महाराष्ट्रातील अपयशी बातम्या त्याच्या कानावर जाण्यापूर्वीच संपूर्ण झाला असावा.

चिपळूणचा एक केशव नांवाचा पुरोहित शिवाजीच्या पदरी होता. तो महाराजास रामायण, महाभारत सांगत असे शिवाजी महाराजानंतर संभाजीसही त्याने रामायण, महाभारत सांगितले, व त्याबद्दल त्याला इ.स. १६८४ मध्ये द्रव्यदान मिळाल्याचा उल्लेख आहे. नंतर त्याच्या मुलाने आपला बाप राजाराम महाराजांबरोबर जिंजीस गेल्याचे व तेथे गेल्यावर निवर्तल्याचे वर्तमान सांगणारी व नव्या सनदा करून मागणारी पत्रे लिहिली. त्यांतील एक दोन प्रसिध्द झालीही आहेत. आता हा केशव प्रस्तुत काव्याचा लेखक हे एकच किंवा नाही हे सांगण्यास काहीच साधन नाही. परंतु नवरात्रात कवीने घेतलेला पुढाकार व बारकाईची माहिती याचा विचार केला तर या केशव पुरोहितानेच हे चरित्र लिहिणे शक्य दिसते. कदाचित हा पुरोहित जिंजिस जाताना मृत्यु पावला असावा व यामुळे या ग्रंथात त्याच काळात घडलेली व मागाहून समजलेली माहिती दिली गेली नसावी. परंतु आधाराशिवाय तर्क करण्यापलिकडे अधिक मजल मारता येत नाही.

काव्य या दृष्टीने हा ग्रंथ फारसा महत्वाचा ठरेल असे वाटत नाही. भाषा व रचना साधी, सरळ व सोपी आहे. लेखन तत्कालीन पध्दतीप्रमाणे सुरुवातीस कथापुराणांच्या थाटाचे झाले असून विवेचनात

स्वप्नवृत्तांत व भविष्य कथनाचाच मार्ग स्विकारलेला आहे. जर कवीने वृत्तबध्द विवेचन करण्याची खटपट केली नसती तर हा एक निर्दोष व उत्तम असा ऐतिहासिक गद्यग्रंथ ठरला असता. या काव्यात अलंकार, उपमा वगैरे नाहीत. एखादी कल्पनेची भरारी आढळलीच तर ती राजाराम विष्णूचा अवथा रामावतार किंवा औरंगजेब पुराणातील कुंभांड राक्षस ठरविण्या पलीकडे गेलेली नाही. प्रथम सर्गाच्या शेवटी केशव ` राजारामाच्या जयाचे व प्रधानांच्या प्रभावाचे वर्णन अनेक पद्यात करेल ` अशी कवीने थोडीशी आत्मप्रशंसा केली आहे. आत्मप्रशंसा म्हणण्याचे कारण इतकेच की या संबंध काव्यात अनुष्टुभ छंदच योजला आहे. फक्त प्रथम सर्गात एक आर्या व एक शार्दुलविक्रीडीत, दुसऱ्या सर्गाच्या शेवटी पुष्पिताग्रा, तृतीयाचे शेवटी एक इंद्रवज्रा व चतुर्थाचे शेवटी उपेंद्रवज्रा व पंचमाचे शेवटी शार्दुलविक्रीडित इतकीच काय ती वृत्तभिन्नता या काव्यात आढळते. मात्र यातील सुरुवातीची ` जयति रघुवंशतिलक ` ही आर्या काही रामलहरीसारख्या स्तोत्रातहि आढळते. यावरून कदाचित असे अनुमान काढता येईल की, शेवटी एखाद्या भिन्नवृत्ताचा श्लोक घालून या काव्याला महाकाव्याचे स्वरूप देण्याचा कवीचा विचार असावा. मात्र कवीच्या वरील गुणादोषांमुळे आपणास सन १६८९ सालातील काही प्रसंगाची सविस्तर निर्दोष व विश्वसनीय अशी नवीन माहिती मिळालेली आहे. कदाचित या ग्रंथाची काव्य या दृष्टीने जरी प्रशंसा करता आली नाही तरी इतिहास ग्रंथ या दृष्टीने याची किंमत बहुमोल ठरेल, यात मुळीच संदेह नाही.

या काव्याचे एकूण पांच सर्ग आहेत. सुमारे २७५ श्लोक आहेत. पहिल्या सर्गात कवीने ग्रंथलेखनाचे प्रयोजन कोणते याचा खुलासा केला आहे. संभाजी महाराजांनी यमधर्म स्वीकारल्याचे म्हणजे ते मृत्यू पावल्याचे वर्तमान ऐकून व या थोर कलियुगात महान म्लेंच्छांचा विजय होत असून दुरात्मा म्लेंच्छराजाने सर्वत्र वर्णाश्रमधर्माचा उच्छेद व सर्व धर्मक्षेत्राचा नाश केलेला आहे, असे पाहून आता लोककल्याणाचा मार्ग कोणता ? म्हणून चिंता मदली येंकटा शंकरांसी सर्व

सर्व लोकांच्या हितासाठी व भक्तांवर अनुग्रह करण्याकरिता हा भाविवृत्तांत कवीच्या स्वप्नात येऊन सांगितला. असे म्हटले आहे. हाच भाग कवीने भार्गव शंकराच्या संवादाने पुन्हा सविस्तर सांगितला आहे. आपल्या विषयाची या सर्गात कवीने प्रस्तावना केली आहे. दुस-या सर्गात रामचंद्र-पंताच्या कारभाराचे सरळ वर्णन केले आहे. रामचंद्रपंताच्या महाराष्ट्रांतील हालचाली हाच मुख्य विषय आहे. तिस-या सर्गात राजाराम प्रतापगडाहून पन्हाळ्यास आल्यानंतरचा मजकूर आहे. नवरात्र महोत्सवाचे सवीस्तर वर्णन केले आहे. सिंहासन लालसेने महीपालांचा पाडाव करणारा त्याचा पिता ` श्रीशिवछत्रपती ` व ज्वलज्वालन तेजाप्रमाणे चमकणारा त्याचा भाऊ ` संभाजी ` असे वर्णन केले आहे. चवथ्या सर्गात तुंगभद्रेपर्यन्तचा राजारामाचा प्रवास वर्णिलेला आहे. पांचव्या सर्गात तुंगभद्रेवर आल्यानंतरची हकीकत दिली आहे.

` दंडनीतिप्रकरणाम् ` हा ग्रंथ शामजी नायक पुंडे याच्या खास संग्रहातील इ.स. १६८२-८३ त लिहिलेला आहे. त्यावरून केशवभट पंडित हा दामोदरभटाचा मुलगा, त्याचे उपनांव पुरोहित, गोत्र कौशिक, ऋग्वेदी, वेदाध्यायी, सूत्र आश्वलायन, परशुराम क्षेत्रांत संगमेश्वरचा राहणारा, हा शिवाजी महाराजांसाठीच होता. महाराज त्याचे हातून दानाध्यक्षपणाचे प्रयोजन घेत होते. शिवाजी महाराजानंतर तो संभाजीजवळ होता. संभाजीही त्याचे हातून दानाध्यक्षपणाचे प्रयोजन घेत होते. त्याने ` धर्मकल्पकता ` हा ग्रंथ लिहिला आहे व त्यातील ` दण्डनीतिप्रकरणाम् ` संभाजी महाराजांच्या बुधभूषणात सामीलकेले. संभाजीने त्याला दानपत्र दिले. संभाजी नंतर तो राजारामा बरोबर होता. केशवभट्टाचा मुलगा रामचंद्र याला ताराबाईने पुढे दान दिले. मौजे पूर्ये येथे हे घराणे अद्याप आहे. ह्याचे आणखीही ग्रंथ

असण्याची शक्यता आहे. परंतु छ. शिवाजी महाराजांविषयी फारसा काही उल्लेख या ग्रंथात आलेला नाही म्हणून याचा फार विचार करीत नाही.

अशा रितीने १७ व्या शतकांतील संस्कृत शिव साहित्यामध्यें परमानंदाचे ` शिवभारत ` जयराम पिण्डये यांचे ` पर्णालपर्वतग्रहणाख्यानम् ` व ` राधामाधव विलासचंपू `, गागाभट्ट काशीकरांचे ` शिवराज-प्रशस्ति,` ` शिवार्कोदय,` ` दिनकरोद्योत,` व ` कायस्थधर्मदीप, ` कृष्ण ज्योतिष्याचे ` करणकौस्तुभ,` पं. रघुनाथपंत हणमंते यांचा ` राज्यव्यवहार कोश,` छ. संभाजी महाराजांचे ` बुधभूषणम्,` संकर्षण सकळकळे याचे ` शिवकाव्य,` व केशव पंडिताचे ` राजारामचरितम् ` अशा संस्कृत साहित्याचा समावेश होतो.

गागाभट्ट काशीकरांचे ` राजाभिषेकप्रयोग: ` व निश्चलपुरी व गोविंद बर्वे यांचे ` श्रीशिवराज्याभिषेक कल्पतरु ` हेही १७ व्या शतकातीलच संस्कृत शिव साहित्य आहे पण राज्याभिषेकाविषयी प्रकरण स्वतंत्र करणार असल्यामुळे त्या ग्रंथांचा समावेश त्या प्रकरणांत केलेला आहे. शिवाय गागाभट्टांचे ` समनय: ` हाही संस्कृत ग्रंथ १७ व्या शतकातीलच आहे. पण तो हस्तलिखित असल्यामुळे त्याचाही समावेश हस्तलिखिताचे स्वतंत्र प्रकरणामध्यें करीत आहे.

प्रकरण तिसरे

१८ व्या शतकातील संस्कृत साहित्यातील
शिव चरित्र

प्रकरण तिसरे

१८ व्या शतकांतील संस्कृत शिव साहित्य

अ) शाहेन्द्र विलास:

शाहेंद्र विलास हे काव्य तंजावर येथील सरस्वती महाल, ग्रंथालयामध्ये प्राप्त झाले. या ठिकाणी जी अनेक संस्कृत हस्तलिखिते आहेत, त्यामध्ये ` शाहेंद्र विलास: ` हे एक महत्वाचे हस्तलिखित असून त्याचा लेखक श्रीधर वेंकटेश उर्फ अय्याकल असून सरस्वती ग्रंथालयामार्फत डॉ. व्ही. राघवन् यांनी संपादित केले असून ते नुकतेच तंजावर येथे प्रकाशित झालेले आहे.

या ग्रंथाचा लेखक श्रीधर वेंकटेश या शहाजीच्या अधिपत्याखाली येणाऱ्या लेखकाविषयी फारशी माहिती उपलब्ध नाही. ` शाहजीराजापुरम् ` ह्या खेडयांत देणगी स्विकारणारे जे ४५ लोक होते, त्यांच्यापैकी हा एक होता. त्याच्या मानसन्मानार्थ केला जाणारा उत्सव व त्याचे रहिवासीत्व यावरून तो त्याच खेडयाचा रहिवासी होता, हे सिध्द होते. त्याच्या नांवावरून तो आंध्र पंडित दिसतो. बोधेंद्रच्या उल्लेखावरून समकालीन पंडित त्याना वेंकटेश शास्त्री या नावाने ओळखत होते. ` पदमणिमंजरी ` हे श्रीधर वेंकटेश व वेंकटेश शास्त्री दोघांनी मिळून लिहिलेले आहे. तो देणगी स्विकारणाऱ्यांपैकी एक असला तर त्या यादीतील तो वेंकटेश शास्त्री असला पाहिजे. पण हा लेखक वेंकटेश शास्त्रीहून भिन्न आहे.

श्रीधर वेंकटेश हा ` अय्याकल ` या नांवानेच प्रसिध्द होता. त्याचा अर्थ ` आदरणीय सर ` असा आहे. तिरुव्हेन्नलूर या गांवी होणारा वार्षिक उत्सव ` अय्याकल उत्सव ` या नांवानेच प्रसिध्द आहे. बहुतेक सर्व

दाक्षिणात्य लोकांना ` अय्याकल ` ची माहिती आहे. काही थोडयाच लोकांना ती माहिती नसेल क्वचित काही भजनीमंडळात व प्रार्थनागृहात ` अय्याकल ` ची पूजा होत नसेल, नाही तर उलटपक्षी अय्याकलवर तयार केलेली गीते भजनीमंडळात वारंवार गायिली जातात. अय्याकल व त्याचा समकालीन कवी बोधेंद्र या दोघांनी मिळून नाम-सिध्दांताचा प्रसार केला. सर्वस्वाचा त्याग व अध्यात्माकडे केलेले केंद्रीकरण म्हणजेच नाम-सिध्दान्त होय.

अय्याकलने रचलेले अनेक प्रार्थना सूक्तांत ` कुलीराष्टक ` (**Kulirastaka**) हे कृत्रिम पाऊस पाडणारे सूक्त प्रसिध्द होते. त्याचप्रमाणे ` तारवलीस्तुती ` (**Taravalistuti**) ह्या सूक्ताने मृत्यू पावलेल्या एका मुलाला त्यांनी त्याचे आयुष्य परत मिळून दिले. वरील दोन आश्चर्यामुळे अय्याकल प्रसिध्द झाला. शरदपौर्णिमा व कार्तिकपौर्णिमा या दोन पौर्णिमा दिवशी त्याच्या वरील दोन आश्चर्यकारक प्रसंगाची आठवण म्हणून उत्सव केले जातात. ` अय्याकल ` ने ` दोषपरिहारक ` नांवाचे एक अष्टक तयार केले होते, की जे म्हटल्यामुळे दुसऱ्यामध्ये दोष काढण्याची वृत्ती कमी होत जाते आणि त्यामुळे निर्माण झालेले पातक नष्ट होते.

चिन्नाई अय्यन्ना दीक्षित या तेलगु पंडितांनी आपल्या ब्रह्मसूत्रांत नाम-सिध्दान्ताची स्तुती केली आहे व आपला गुरु श्रीधर वेंकटेशाचीही स्तुती केलेली आहे. तो म्हणतो -

> ` यद्दीक्षा खिललोककिल्बिषतमः काण्डस्य चण्डद्युतिः
> सूक्तिर्यस्य विरक्तिभक्तिभगवद्बोधप्ररोहावनिः ।
> ब्रह्मानन्दसुधाब्धिमन्थन गिरिर्यस्योपदेशक्रमः
> तस्मै श्रीधर वेङ्कटेश गुरवे कुर्वे प्रणामायुत्वम् ।। `

श्रीधर वेंकटेशाचे आणखी काही ग्रंथ पुढीलप्रमाणे आहेत.
१) अख्यस्तष्टि (Akhyasasti), २) दयासट्क (Dayasataka),
३) मात्रभूतसट्क (Matrbhutasataka), ४) स्तुतीपद्धती (Stuti-paddhati), ५) शिवभक्तीकल्पलतिका (Sivabhaktikalpalatika),
६) शिवभक्तलक्षणा (Sivabhaktalaksana), ७) तारावलीस्तोत्र (Taravalistotra), ८) आर्तीहरस्तुती (Artiharastuti),
९) कुलीराष्टक (Kulirastaka), १०) जंबूनाथाष्टक (Jambunathastaka),
११) दोषापरिहारकाष्टक (Dosapariharastaka), १२) कृष्णाद्वादशमंजिरी (Kranadvadasa manjari), १३) अच्युताष्टक (Acyutastaka)
आणि दोलनवरत्नमाला (Dolanavaratnamala).

त्याच्या सापडलेल्या हस्तलिखितांवरून वरील ग्रंथांची नावे दिली आहेत.

बोधेंद्र यतीन्द्र याने त्याच्या नाम-सिध्दांतावर नाममंत्रसायन लिहिला आहे. कारण त्याने आपल्या ग्रंथात " अथवा ' यम्दक्तथा पुण्डरीकाक्षम् ' इत्यादिमूलस्य तंम्दाष्यस्य च श्रीधर वेङ्कटेशास्त्रिभिः भगवन्नामभूषणे ऽभिहितोऽर्थ एवास्तु । " असे म्हटलेले आहे.

राजमल्लिका या ग्रंथाचा लेखक गोपालकृष्ण यानेही श्रीधर वेंकटेशाचा उल्लेख केलेला आहे.

नल्ला अध्वरीन् व वेंकटेशश्वर शास्त्री हे दोन कवी राजा शहाजीच्या (तंजावर) पदरी होते. त्यांची दोन हस्तलिखिते सरस्वती महाल, ग्रंथालय, तंजावर या ठिकाणी आहेत. त्यापैकी एका हस्तलिखितात असे म्हटले आहे की,

" इति भोसलकुलजलधिकलानिधि शहाजिसार्वभौम - वात्सल्य पात्रतातिमात्रीकृतमनीषाविशेषैः वेङ्कटेश्वर शास्त्रि - नल्ला शास्त्रि श्रीधर वेङ्कटेश शास्त्रिभिः पदमणिमञ्जरी ढान्तपर्यन्तं यथामति लिखिता ।"

दुसरे एक शहाजी राजांची स्तुती करणारे ' नर-स्तुती ' नावाचे काव्य आहे. त्यात शहाजीविषयी असे म्हटले आहे की, " कृतं भास्कररायेण पद्याष्टकमिदं मुदे । शाहभूमीपतेर्यस्मान्ना विष्णुः पृथिवीपतिः "

शाहेन्द्रविलासमध्ये ऐतिहासिक घटना आणि शहाजीच्याविळच्या सैन्यातील दोन महत्वाच्या घटनांचे म्हणजे सेतुमतीला दिलेली मदत व जिंजी येथे रामाराम यांचे वर्णन असले तरी प्रथमतः ती एक कविता आहे.

नित्याच्या लिखाणाप्रमाणे या काव्यातील वर्णन क्रमशः प्रगती-पथावर आहे. बालपण, तारुण्य व लग्न, नायकाचा पराक्रम आणि सैन्याची आगेकूच, शिकार, उद्यानक्रिया व जलक्रीडा, नगर व राजवाडा, सूर्योदय व सूर्यास्त, प्रेम व विरह, ऋतु आणि निसर्गचित्रण असे वर्णन या काव्यातही आढळते.

लेखकाचे कार्य कवीच्या भूमिकेतून पाहिले तर त्याकाळी कवी म्हणून नावलौकिक मिळविलेले नीलकंठ दीक्षित, रामभद्र दिक्षित इ.च्या तुलनेने त्याचे स्थान गौणच. कौशल्य, शब्दयोजना, कल्पकता व काव्यातील प्रवाह यांचा विचार केल्यास समकालीन लेखकांच्यामध्ये त्याचे लिखाण दुय्यम दर्जाचे आहे. त्याचे स्थान जरी धार्मिक प्रार्थना काव्यामुळे जरी ओळखले जात असले तरी ' आकर्षक शब्दयोजना ' ही कांही चांगल्या काव्यगुणांचे प्रमुख वैशिष्ट्य नव्हे.

श्रीधर वेंकटेशाने महाकाव्याच्या पारंपारिक वर्णनात ओढून ताणून आणलेला कल्पनाविलास अगदी सामान्यच आहे. राजाचा घोडा व राजधानीचे शहर, दरबारातील वर्णन, पाण्याखालील आग यामध्यें नित्याच्या ओढून-ताणून तुलना करण्याच्या पध्दतीपेक्षा थोडी भिन्न पध्दत आहे. पण प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे मोजक्या शब्दात व थोडक्यांतच मांडणी. त्याची केवळ कविताच छोटी नाही तर त्यात वर्णनाचा पसाराही नाही व ते कंटाळवाणे देखील नाही.

लेखक आपल्या काव्याच्या शेवटच्या सर्गामध्यें आपल्या शास्त्रातील ज्ञानाचा उल्लेख करतो. पण या प्रघाताला अपवाद ' धर्मी - ग्रहक - मन - सिध्दम् ' ही जी कविता आहे ती अगाध ज्ञानाचा आविष्कार आहे. याची सुरुवात अर्थान्तरन्यास अगर समासोक्ती किंवा शब्दयोजनेचा एक भाग म्हणून केलेली नाही.

व्याकरण अगर शब्दाच्या बाबतीत लेखकाचा उल्लेखनीय असा ठसा नाही. नवीन शब्दयोजना क्वचितच आढळते.

कवितेतील शब्दयोजनेत सर्वत्र आधेपणा आढळते. ते विशेषात: सर्ग ४ मधील दोन धार्मिक प्रार्थनेत, सर्ग ५ मधील विरह व्यथेचे वर्णन, सर्ग ७ मधील प्रधानांचा उपदेश आणि विशेषात: ऋतुच्या वर्णनात आढळते. ' हाटक्द्युति-कण्ठ ग्रहकर्मठा: ' आणि ' उपकण्ठागतमुल्लताम् ' आणि ' विजयश्रीरिव वेषभेषाची ही अधिक रूपक मोजिलेली अपवादात्मक व विशेष उल्लेखनीय उदाहरणे आहेत.

वृत हाताळण्याच्या बाबतीत विशेष गोष्ट म्हणजे प्रत्येक ओळीच्या शेवटी लेखक शब्दाचे विभाजन करतो व ते पुढच्या ओळीपर्यन्त नेतो. अशा प्रकारची जवळजवळ सतरा एक उदाहरणे आहेत. उदा. उन्नत-सम्, किंवा

सम-उन्नत, उल-उसितम्, युज्-ज्वाला, आदि-स्थित, सम-कुलम् वगैरे. हे वैशिष्ट्य लेखकाच्या धार्मिक - प्रार्थना गीतात सुध्दा आढळून येते. ` शिव-भक्तिकल्पलतिका ` मध्ये वसंततिलका वृत्तात पहिल्या ओळीचे विभाजन ` तद्-वी ` असे होते आणि दुसरी ओळ ` सैसोपालंभ ` ने सुरू होते. पण उपसर्गाचे विभाजन केवळ क्षमा अपेक्षूनच होते, पण इतर बाबतीत शब्दविभाजन ओळीच्या शेवटीच येते. जसे ` स-योत `. पण हे कानाला गोड वाटत नाही. लेखकाच्या तेलगु-छंद व वृत्ताच्या संवयीमुळे आंध्र लेखकाच्या कानाला हे विचित्र वाटत नाही.

कल्पना विलास व प्रभावी मांडणी हे गुण श्रीधर वेंकटेशाच्या बाबतीत नाकारता येणार नाहीत. श्लेषाचा उपयोग करून जे काव्य केले आहे, अभंग व सभंग दोन्हीही, तेथे लेखक नेहमीच यशस्वी ठरला आहे. जवळ जवळ सर्वच (१) १४, ४५, ४६, ५४, ६०, (२) १०४, १०९, (३) ५१, ५५, (४) २, (५) १, (८) १९, २१, ३५, ७४, ७७, ८५, ८७. नवनिर्मिती, वेधकता, परिणाम, अंमलबजावणीसाठी उल्लेखनीय आहेत. पूर्वी उल्लेखिलेल्या कल्पना उत्कृष्ट आहेत. उदा. शिकारीच्यावेळी राजाचा बाण रानटी डुकराच्या तोंडावर लागला व त्याच्या सुळ्यात भर पडली आणि प्रेक्षकांच्या पाहण्यांत आश्चर्याची भर पडली (२,५२) सूर्यास्ताच्यावेळी सूर्य लटकणाऱ्या दागिन्याप्रमाणे दिसतो. आगगाडीच्या धुऱ्याने आच्छादूत जाव्यात, तशा अंधाराने वस्तू आच्छादून गेल्या, जलक्रीडेमधील मध्यभाग विशेष उल्लेखनीय, जसे प्रियकराने प्रेयसीचे पांघरूण ओढावे व प्रेयसीला आपले वक्षस्थल केवळ प्रियकराच्या हातानेच झाकण्याचा मार्ग केवळ शिल्लक असावा, अशा कांही लेखकांच्या उत्कृष्ट कल्पना आहेत.

निसर्ग चित्रणाच्या बाबतीतही लेखकाची निरीक्षणशक्ति व रेखीव शब्दचित्रे उल्लेखनीय आहेत. तीव्र उन्हाळ्यातील अनुभव लेखकाने अनेक संदर्भातून

दाखविला आहे. तोच प्रखर सूर्य उभा आहे. दुपारच्यावेळी फुलातील मध मधमाशांना घेणे अशक्य, नर कबुतराला मादी कबुतराकडे तीव्र उष्णतेमुळे जाता येणे अशक्य, वाटसरूची सावली लहान होणे व वाटसरूला विश्रांती घेण्यास सुचित करणे, पाणी तापल्याने मासे खोलवर गार पाण्यात विसावतात. ही सर्व चित्रणे रेखीव व स्पर्शीय आहेत. राहत्या ठिकाणी देखील प्रेमिकांना उष्णतेची झळ जाणवत आहे. सूर्योदयापासूनच उष्णतेची जाणीव सुरू होते त्यामुळे हातातील पंखे जणू त्यांचे जीवन बनू पहात आहे. स्त्रिया कपडे पेनकून तोंडाने घामाने डबडबलेल्या अवयवावर वारा घालीत आहेत.

पाऊसाचे वर्णन परिणामकारक आहे. उन्हाळभर उष्णतेने छळलेल्या आकाशातून, पाऊसाचे थेंब जणू अश्रुचेच थेंब आहेत. साध्या व सोप्या श्लेषामधून, ढग व पाऊस यांच्या माध्यमातून कवि कविता १२ मध्ये मूर्ख आश्रयदात्यांचा शोकाकूल उदय, कलोपासकांचे दमन, मानवता वाद्यांची हकालपट्टी आणि आदर्श आत्म्यांची ससेहोलपट याबद्दल लिहित आहे.

शरद ऋतुचे चित्रण केवळ चित्ताकर्षक नाही तर नीतीशास्त्रातील सूचनेचे महत्व विशद करते. राजहंस, कमळांच्या दांडयांची मेजवानी, कमळांची उशी करून, मधमाशांच्या संगीताकडे कान ठेवून आहे असे चित्रण सुखी राजपुत्राचे दर्शन घडविते. पाऊस पडून दुबळे झालेले ढग जणू आश्रयदात्याचेच प्रतिक आहे. चवथी कविता खरोखरच उदात्त आहे. प्रणय करणाऱ्या विजेचे झोत कुठे आहेत ? त्या समोरील मोराचे नाच कुठे आहेत ? ढग पाणी देणाऱ्याचा म्हणून ओळखला जातो. हेमंतातील दवाचे, थंडीचे व उशिरा होणाऱ्या पहाटेचे दर्शन घडते. दवबिंदूनी जग झाकले गेल्यामुळे सूर्याला आकाशातील मार्ग शोधावा लागतो जसे कांही लोकांना जगांत शोध घ्यावा लागतो तसे, आणि त्यामुळे नैसर्गिकपणे सूर्योदय होण्याला उशीर होतो (५४).

बाह्य जगातील ऊन प्रेमिकांच्या अंत:करणात येते. (५६) राजाने 'पन ल्टे ते सेतू' पर्यन्त दक्षिणेकडील स्त्रियांच्या कानांतील जाडजूड झुब्यांचा केवळ उल्लेख नाही तर त्याला किनोदाची झालरही जोडलेली आहे. त्याची तुलना सर्पाला दगड बांधून बागेत लटकल्याप्रमाणे दिसतात.

राजा शहाजी तरूण वयात सिंहासनावर बसला व ४० वर्षांचा असताना मृत्यू पावला. काही अपवादात्मक घटना वगळल्यास, तंजावर येथे राज्य करीत असताना शांती व भरभराटीत राजकीय अस्थिरता क्वचितच अडथळा करीत होती. लेखक त्याचे वर्णन जणू काय तो केवळ शंकराचाच अवतार नव्हता तर परमेश्वराने दिलेले जीवन केवळ 'मुहम्मदन' च्या (यवन) त्रासातून देशाला मुक्त करणे होय.

'विजयनगर' च्या साम्राज्याच्या वेळेपासून दक्षिणेकडील प्रमुख हिंदूनी हिंदुधर्माला व हिंदू संस्कृतीला सुरक्षितता दिली असे प्रतिबिंबित होते. त्यावेळी ख्रिस्ती धर्मप्रसारक रोमन ब्राह्मणांप्रमाणे कार्य करीत होते. मनुची ख्रिश्चनांकडून शहाजीच्या छळाच्या संदर्भात, प्रतिज्ञापूर्वक सांगतो की, नायकाचा देशधर्माचे रक्षण करण्याचा प्रयत्न वाखाणण्यासारखा आहे यात आश्चर्य वाटण्यासारखे नाही. नल्ला उर्फ भूमीनाथ दिक्षीत म्हणतो की, "हे शहाजीचे चरित्र म्हणजे जणू काही ऐतिहासिक पवित्र कागदपत्रेच." 'धर्मविजयचम्पू' मधील धर्माचाच पुरावा जणू काही शहाजी आहे.

कवी नायकाच्या वैभवशाली जीवनाचे दर्शन घडवितो. सांस्कृतिक भरभराटीच्या परंपरेची प्रभा चौल काळ किंबहुना त्याहून पूर्वीच्या काळाकडे जाते. पण त्याचे श्रेय ज्या राज्यकर्त्यांना संस्कृतीची किंमत कळली व ज्यांनी संस्कृती भरभराटीला आणली, अशांकडे जाते.

जर नायक तेलगु मूल्यांनी प्रभावित होत असेल तर मराठा किंवा महाराष्ट्रीय मूल्यांनी उत्साही जीवन जगतो. भक्ति, आत्मिक प्रयत्न, सांस्कृतिक गुंतागुंत, तेजस्वी व्यक्तिमत्व, उन्नती यांचे दर्शन कला व पत्रांमधून दाखविले आहे. कुव्हेरी (Cauvery) संस्कृतीची जडणघडण होत असताना त्यातील सुगंध हरविलेला दिसत नाही. शहाजीची भूमिका साधीसुधी नाही. शहाजीचे ' अध्याक्ष ' च्या कवितेतील स्वागत यथायोग्यच आहे. तो म्हणजे ' म्युझ ' (काव्यदेवता) चे अंत:करण व आत्मा आहे.

' शाहेंद्रविलास ' हे आठ सर्गाचे संपूर्ण काव्य आहे. त्यामध्ये पहिल्या सर्गात पहिल्या श्लोकांत शिवाची प्रार्थना, नंतर कालिदास वगैरे प्रमुख कवींना वंदन, शिवाची प्रार्थना करून शहाजीला त्याने दिलेला आशीर्वाद, कवी वेंकटेश शहाजी राजावर शाहेंद्रविलास काव्य लिहित आहे त्यांची सूचना, नंतर भोसले कुळाचे मालोजीपासून वर्णन, मालोजी हा अहमदनगरमध्यें निजामाच्या राज्यात मनसब्दार होता, पित्यानंतर ते पद मालोजीचा मुलगा शहाजी याला प्राप्त झाले, शहाजीचे वर्णन, त्याने निजामाला मदत केली. तो शूर होता, स्वत:ला महाराज म्हणवून घेत होता. त्याने कवी व विद्वानांना आपल्या दरबारांत आश्रय दिला होता, त्याला जिवा व तुका नांवाच्या दोन भार्या होत्या, त्यांना अनुक्रमे संभाजी शिवाजी व एकोजी असे पुत्र झाले, नंतर त्या तीन पुत्रांचे वर्णन, त्यांच्या विवाहाचे वर्णन, संभाजीचा मृत्यू, नंतर शिवाजीचे वर्णन, मोंगलाना आपल्या शक्तीने व सामर्थ्याने त्याने तोंड दिले व चातुर्याने शत्रूचे किल्ले जिंकून घेतले व शिवाजीने छत्रपतीचे पद धारण केले. शहाजीला इ.स. १६६४ मध्ये मृत्यू आला. एकोजी स्वसामर्थ्याने यश मिळविले. त्यांच्या राज्याचे शक्तिचे, तेजाचे वर्णन. तो नेहमी शिवाची पूजा करीत असे, त्याच्या स्वप्नामध्यें येऊन शिवाने त्यास इंगळ्याच्या दीपाशी विवाह करण्यास सांगितला, व

तुला तीन पुत्र होतील, त्यामधला सर्वात मोठा मुलगा मी असेन असा दृष्टांत दिला. त्याप्रमाणे एकोजीने दीपाम्बाशी विवाह केला. नंतर दीपाम्बाईचे वर्णन व तिच्या डोहाळ्याचे वर्णन करून पहिला सर्ग संपतो.

नंतर दुसऱ्या सर्गात एकोजीच्या मोठ्या मुलाचा शुभनक्षत्रांवर झालेला जन्म, त्याचे नांव शाह ठेवले. त्याचे बालपण, मोठेपण, त्यांचे खेळ यांचे वर्णन, एकोजीच्या सैन्याचे तंजावरहून बंगलोरकडे गमन व त्याच्या शिस्तीचे वर्णन, त्याच्या दुसऱ्या मुलाचा सरफोजीचा जन्म, युध्द, एकोजीने तंजावर घेतले, चोल प्रदेश जिंकला, शिवाने एकोजीला स्वप्नात येऊन राज्याभिषेक करून घेण्यास सांगितले व तंजावर राजधानी करण्यास सांगितले. त्याप्रमाणे त्याने केले (इ.स. १६७०) शहाजी व सरफोजी तंजावरमध्ये वाढू लागले. नंतर तिसरा मुलगा तुळजा यांचा जन्म, तुळजा व सरफोजी हे जणू कांही शहाजीचे दोन बाहुच. त्या तीन पुत्रांचे वर्णन, शाहजीच्या विवाहाचे वर्णन, सरफोजीच्या विवाहाचे वर्णन, नंतर लोकांनी शहाजीची स्तुती केली व त्यास राज्यपद देण्यास सांगितले, त्याप्रमाणे एकोजीने शहाजीस राज्याभिषेक केला (इ.स. १६८४), एकोजीचा मृत्यू (इ.स. १६८७ ?), शहाजीचे राजा म्हणून वर्णन, शहाजीने तुळजाचे लग्न करून त्याला दोन पत्नी दिल्या, शहाजी, त्याचे राज्य व त्याचे बंधू याचे वर्णन, वसंतऋतुचे वर्णन, शहाजीच्या शिकारीचे वर्णन, येथे दुसरा सर्ग संपतो.

नंतर तिसऱ्या सर्गात राजा शाहजीची शिकार, राजधानीचे शहर, सूर्यास्त, प्रार्थना, लक्ष्मीविलास सभागृहाचे वर्णन आले आहे.

तेथून पुढे चवथ्या सर्गापासून आठव्या सर्गाअखेर राजा शहाजीचे वर्णन आहे. त्यामध्ये आलेल्या विषयांचा यापूर्वी उल्लेख केलेला आहेच. त्यात शहाजीचा दरबार, वैभव, राजधानी, शहर, कवी व विद्वानांना मिळालेला

सन्मान, उन्हाळा, पावसाळा, हेमंतऋतु, राजारामाला केलेली मदत व शेवटी शहाजीला आशीर्वाद देऊन हे काव्य समाप्त झालेले आहे.

शाहजीच्या मृत्यूचा त्यामध्ये उल्लेख नाही. राज्याभिषेकाचा आहे. तेव्हा त्याच्या ह्यातीतच या काव्याची रचना झाली असावी. या राजाने तंजावर येथे इ.स. १६८४ ते १७१० असे राज्य केले. हा राजा शिवाजी व राजारामाला समकालीन आहे व त्याच्या पदरी असलेल्या कवींपैकी श्रीधर वेंकटेश या आंध्र प्रांतीय तेलगू पंडिताने त्याच्या स्तुतीपर त्याच्या जीवनावर हे काव्य रचले आहे. आपल्या आश्रयदात्याचा यांमध्ये गौरव केला आहे. ऐतिहासिक फक्त दोनच गोष्टींचा उल्लेख आला आहे. तो म्हणजे राजारामाचे जिंजिला आगमन व सेतूमतीकडे जाताना शहाजीराजाने त्याला केलेली मदत. बाकी हे सर्व स्तुतीपर काव्य असून त्याची रचना महाकाव्याप्रमाणेच केलेली आहे. शिवाजीविषयी त्यांत फारसा कांही महत्वाचा उल्लेख आलेला नाही. पहिल्या सर्गात फक्त ३३ ते ३६ श्लोकांत शिवाजीचा उल्लेख आहे. म्हणून या काव्याचा फक्त आवश्यक तेवढाच आढावा घेतलेला आहे. शहाजीने इ.स. १६८४ ते १७१० या कालखंडात राज्य केले असल्यामुळे त्याच्या पदरी असलेल्या या कवीची रचना त्याच काळात असावी. म्हणजेच ही काव्यरचना १७ व्या शतकाच्या शेवटी व १८ व्या शतकाच्या प्रारंभी झालेली आहे. म्हणून शिवाजीला कांहीसा समकालीन असलेला असा हा काव्यग्रंथ असल्यामुळे या ठिकाणी आवर्जून उल्लेख केलेला आहे.

ब) परमानंदकाव्यम् :

` परमानंदकाव्यम् ` या नावाचे काव्य शिवभारतकर्त्या कवींद्र परमानंदाच्या नांवावरच बडोदे ओरिएन्टल इन्स्टिटयूट या संस्थेने सन १९५२

साली प्रसिध्द केले आहे. रियासतकार गो.स. सरदेसाई यांनी ते संपादिले. अनेक निरनिराळ्या काव्यांची मिसळलेली पाने वेगळ्या ठिकाणी त्याच संग्रहात जुळवून लावण्याचे काम त्यांच्याकडून पार पडले नाही. १९५२ साली, काव्य छापून प्रसिध्द झाल्यावर श्री.य.ग. फडके यांनी (सह्याद्रि मासिक एप्रिल, १९५२, पृ. १९५-९९) सरदेसाईंचे अपुरे काम पूर्ण केले.

गोविंदाचा मुलगा परमानंद याचा जन्म ब्राह्मणात कुटुंबात झाला होता. गोदावरीजवळ असलेले नेवासे हे त्याचे मूळ गांव होते. दक्षिण कोकणात त्याचे वास्तव्य होते. कवीन्द्र किंवा कवीश्वर ही पदवी शिवाजीने त्यांना दिली होती. राजा शिवाजीबरोबर औरंगजेबाच्या दरबारांत जाण्यासाठी त्यांनी आग्र्याचा प्रवास इ.स. १६६६ साली केला. शिवाजी आग्र्याहून पळून गेल्यानंतर परमानंदाला जयपूर विभागात पादशहा औरंगजेबाच्या आज्ञेवरून पकडण्यात आले. तेव्हा त्याच्याबरोबर खूप किंमती वस्तू, हत्ती, घोडे व मौल्यवान वस्त्रे वगैरे होते. ते सर्व शिवाजीने त्यांना दिले होते. नंतर राजाच्या पलायनात त्याचा हात नसल्यामुळे त्यांची सुटका करण्यांत आली. तेव्हा काही वर्षे ते बनारसला राहिले, कारण त्यांनी जयपूरच्या अधिका-यांना तसे सांगितले होते.

शिवाजीने परत आल्यानंतर ३ वर्षे निष्क्रियेतच घालविली. व नंतर इ.स. १६७० पासून स्वतःला प्रस्थापित करण्यास सुरुवात केली. १६७२ मध्ये महाराष्ट्रात परत येऊन पोलादपूर येथे विद्यार्थ्यांना शिकविण्याचे काम करीत असलेला तो दिसून येतो. तेव्हा शिवाजीने त्यांना भेट दिली होती, त्यावेळेला शिवाजीने त्यांना भेट दिली होती. त्यावेळेला शिवाजीचे स्वागत करतेवेळी त्यांनी पुष्कळ काव्य रचले, असे नमूद केले आहे. पण शिवाजीवरील त्याच्या महाकाव्याची अजून एकही ओळ लिहिल्याचा लेखी पुरावा नाही. १६७४ मध्ये

शिवाजीचा राज्याभिषेक झाला, तेंव्हा शिवाजीवर महाकाव्य लिहिण्याचे काम परमानंदावर सोपविण्यात आले. त्यामध्ये त्यांनी १०० सर्गापर्यन्त काव्य लिहिण्याचे ठरविले होते. पण त्यापैकी केवळ ३१ सर्ग व ३२ व्या सर्गातील ९ श्लोक शिवाजीच्या मृत्यूपर्यन्त लिहिले गेले होते. ते व्यवस्थित प्रकाशित केले, कारण त्याचे एकापेक्षा अधिक ग्रंथ उपलब्ध आहेत. ` सूर्यवंशम् ` याचे नांव ` अनुपुराण ` असे किंवा आधुनिक पुराण असे कवीने संबोधिले आहे.

या कवीने निश्चितपणे इ.स. १६८० मध्ये रायगड येथे झालेला संभाजीचा राज्याभिषेक पाहिलेला होता. त्यावेळी त्यांना ठरलेले ६९ सर्ग लिहिण्यास वेळ नव्हता. १६६१ ते १६८० या १९ वर्षांत शिवाजीच्या कारकीर्दित घडलेल्या प्रमुख घटनांचा ते परामर्श घेऊन शकले नाहीत. १६६१ मधल्या घटनापर्यन्तच ३१ वा सर्ग संपतो. नवीन राजाची मर्जी संपादन करण्याच्या उद्देशाने शिवाजीच्या मृत्युपूर्वी २ वर्षे परमानंदांनी आपले महाकाव्य पुन्हा लिहिण्यास सुरूवात केली. कारण त्यावेळेस संभाजीचा शिवाजीशी संघर्ष होता. तोपर्यन्त आणखी १२ सर्ग लिहिले, ज्यामध्ये शिवाजीच्या (मृत्यूपूर्वीच्या अडीच वर्षांच्या कारकीर्दित १ वर्षापर्यन्त ज्या घटना) १६७९ पूर्वीच्या अडीच वर्षांच्या काळात घडलेल्या घटनांचा त्यामध्ये समावेश केला आहे. अशाप्रकारे १०० पैकी ४४ सर्ग खरे लिहिले गेले, पण त्यात शिवाजीच्या कारकीर्दित १६½ वर्षांचा ज्या दरम्यान त्याने प्रसिध्द अशा कारवाया केल्या, त्यांचा या काव्यात उल्लेख नाही. दुसऱ्या विभागातील हे १२ सर्ग पूर्वीच्या ३१ सर्गामध्ये समाविष्ट केले नाहीत. कारण या दोन विभागांना जोडण्यासाठी जो सर्ग हवा, त्यासाठी कवीला काही वेळ मिळाला नाही. तसेच नवीन सर्ग दुरूस्त केलेले नाहीत. किंवा त्यांची अनुक्रमणिका-सुध्दा दुरूस्त केलेली नाही. फक्त १ च हस्तलिखित या १२ सर्गांच्या संदर्भात उपलब्ध आहे.

शिवाजीवरील महाकाव्याचा अविभाज्य भाग म्हणून या १२ सर्गाकडे पहाणे अवघड आहे. कारण संभाजीचे राज्यावर येणे याबाबतचे हे वर्णन आहे. आणि फक्त ४ थ्या सर्गाच्या मध्यात शिवाजीच्या जीवनाच्या शेवटच्या वर्षाचा उल्लेख येतो. या ठिकाणी शिवाजीने आपल्या मोठ्या मुलाला श्रीरंगपूरला पाठविले. पण हे वर्णन शिवाजीच्या मृत्यूपर्यन्त पूर्ण केलेले नाही. विस्कळीतच आहे.

त्यामुळे संभाजीचा राजा म्हणून गौरव करण्यासाठी नवीनच महाकाव्य लिहिणे जरूर होते. पण या दिशेने जो प्रयत्न झाला आहे, त्यापैकी दोनच गोष्टी अस्तित्वात आहेत. त्यापैकी एक म्हणजे छोटीशी कविता (लघुकाव्य) (यांत १४२ श्लोक आहेत व या ग्रंथाचा तो पहिला विभाग आहे. त्यामध्ये भोसल्यांच्या इ.स. १६८७ पर्यन्त घराण्याचा आराखडा आहे. दुसरे म्हणजे राजारामाच्या कारकीर्दिबद्दल दुसरी कविता ज्यामध्ये ११२+४० श्लोक आहेत. या ग्रंथाचा दुसरा विभाग हे दोन्ही कच्चे भाग आहेत. कोणतेच पूर्ण किंवा दुरूस्त केलेले नाहीत. संस्कृत वाङ्मयाचा गाढा अभ्यासक यांतील चुका सांगू शकेल. (व्याकरण दोष अलंकार दोष, छंद दोष व इतर वाङ्मयीन गोष्टी या दोन कवितात ३१ सर्गाहून बरेच दोष आढळतात. या दोन्ही काव्यात तफावत आहे. त्यामुळेच या दोन कविता एका व्यक्तीने लिहिल्या असाव्यात असे म्हणणे धाडसाचे होईल. श्री. जदूनाथ सरकारांचे म्हणणे असे आहे की, या नंतरच्या कविता परमानंदाच्या नसून त्यांच्याच एखाद्या शिष्य सहकाऱ्याने लिहिल्या असाव्यात, व त्या दुरूस्त करण्याचे परमानंदाने ठरविले असावे. पण तोपर्यन्त ते जगले नसावे.

परमानंदाचा मृत्यु बहुधा १६८७ मध्ये झाला असावा. त्याच्या मृत्युबरोबरच त्याची शिक्षणसंस्था व कवित्व संपुष्टात आले असावे . कारण

त्यांच्या ब्राह्मण कुटुंबास त्याकाळातील महाराष्ट्रातील राजकीय स्थित्यंतरामुळे इनाम खेड्यातून काय उत्पन्न मिळणार ?

यानंतर पुरी ५० वर्षे व २ मानवी पिढ्या गेल्या, तेंव्हा परमानंदाचा नातू दुसरा गोविंद याचा छत्रपती शाहूच्या दरबारात प्रवेश झाला आणि त्यांना राणी सकवारबाईंचा राजाश्रय मिळाला. इ.स. १७४० किंवा १७४५ च्या दरम्यान त्यांनी संभाजी व शाहूवर एक संस्कृत महाकाव्य लिहिण्यास सुरुवात केली. तरी पण ग्रंथाच्या उपसंहारामध्ये त्यांच्या आजोबांच्या महाकाव्याचा असलेला उल्लेख वगळता या ग्रंथाचा अनुपुराण सूर्यवंशाशी कांहीही संबंध नाही.

गोविंदामध्ये त्याच्या आजोबांची प्रतिभा आढळत नाही. कारण त्याच्या इ.स. १७८२ नंतर प्रदीर्घ आयुष्यात त्यांनी फक्त छोटासा ५ सर्गांचा ग्रंथ लिहिला. त्यामध्ये संभाजीने केलेली कालिमातेची उपासना आणि तिची भविष्यवाणी, संभाजीला जगज्जेता शाहू नांवाचा पुत्र होईल ही भविष्यवाणी या दोन गोष्टींचा उल्लेख व शाहूचे गुणगान गाणे, अशा रितीने त्यांची कविता पूर्ण असली तरी कंटाळवाणी व रटाळ स्तुती आहे. व त्यात काहीही वाङ्मयीन सौंदर्य नाही.

गोविंदाची कवित्वशक्ती अपुरी असल्यामुळे त्यांनी कालिमातेची उपासना व त्यांचा संभाजीच्या दरबारावर झालेला परिणाम याबद्दल गद्यात्मक लेखन केले आहे.

पी.के. गोडे यांनी हे लिखाण भांडारकर ओरिएंटल रिसर्च इन्स्टिट्युटतर्फे **Annals of the B.O.K. I Vol. XVIII, Pt.III (1937) pp.287-295 and Vol.XIX Pt.I (1938), pp.40-60** प्रकाशित केले आहे. त्या ग्रंथातील काही श्लोक येथे उद्धृत केलेले आहेत.

यापेक्षाही दुसरा गोविंद व परमानंद यांच्यातील महत्वाचा फरक म्हणजे परमानंद विष्णु उपासक तर दुसरा गोविंद तांत्रिक उपासक, कालिमातेचा उपासक होता. त्याच्या संस्कृत महाकाव्याच्या विवेचक अभ्यासावरून असे दिसून येते की, त्यांना ऐतिहासिक घटना किंवा विविध घटनांची अचूक नोंद म्हणून महत्व देता येणार नाही. उदा. परमानंदांनी सोयराबाईंना मोहिते घराण्याची मुलगी म्हटले आहे, पण खरी ती शिर्के घराण्यांतील होती. तर गोविंदाने शाहूची जन्मतारीख नमूद केलेली नाही, त्याचा उद्देश असा की, चौकशीअंती ती मोकळी जागा भरून काढता येईल.

अशा या महान शिवाजीचा पूजक असून त्याला त्याच्या राणीच्या घराण्याविषयी माहिती नसावी का ? किंवा संभाजीने दिमाखाने साजरा केलेला शाहूचा जन्मदिनसुध्दा माहित नसावा का ?

शिवाजीचा ज्येष्ठ पुत्र संभाजी याचा मराठी इतिहासात एक दुष्ट, स्वार्थी तरूण म्हणून उल्लेख केला आहे. त्याने स्वत:च्या वडिलांविरूध्द बंड पुकारले व जो आपल्या बांधवाचा नाश करण्यासाठी राष्ट्रीय शत्रूला जाऊन मिळाला. अर्थात ही गोष्ट त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या वडिलांच्या दरबारातील मंत्र्यांनी केलेल्या वर्णनावर आधारित आहे. कारण संभाजीचे त्या सर्वांशी वैर होते. कारण हे सर्वजण राजारामासाठी त्याचा वारसा काढून घेण्याचा प्रयत्न करीत होते. आणि त्यांनी तो राज्यावर आल्यानंतर त्याचा खून करण्याचेही कारस्थान रचले. संभाजीचा प्रमुख अक्षम्य दोष म्हणजे कवि कलश या कनोजी ब्राह्मणास स्वत:चा महामंत्री केले आणि त्याच्या हाती संपूर्ण राज्यकारभार देऊन व घरातील सर्व ब्राह्मण नोकरांना बाजूला टाकले. संभाजीची बाजू मराठी इतिहासात मांडलेली दिसत नाही. संभाजीच्या दु:खी मृत्युनंतर संभाजीच्या वहात्यांची सत्ता गेली. आणि राज्यामध्ये त्यांना ३० वर्षे स्थान

मिळाले नाही. (संभाजीचा मृत्यू ते शाहूचा उदय) शाहूच्या सत्तेवर पेशव्यांचा प्रभाव होता. शाहूची आई येसूबाई ३० वर्षे मोंगलांच्या कैदेत होती.

त्यामुळे आतापर्यंतच्या इतिहासात संभाजीच्या चाहत्यांना स्थान नाही. पण आता मात्र संभाजीची संपूर्ण हकीकत अभ्यास करता येते. शाहूच्या स्नेह्यांनी संभाजीने वडिलांविरुद्ध केलेल्या बंडाबाबतची माहिती देण्याचा प्रयत्न केलेला आहे. येसूबाई व तिचे जुने साहाय्यक यांच्याकडून ही माहिती मिळालेली आहे, ती ते जेंव्हा इ.स. १७१८ मध्ये महाराष्ट्रांत परत आले, तेंव्हा मिळाली आहे. हे वर्णन परमानंदांनी एका संस्कृत कवितेत केलेले आहे, पण ही कविता अपूर्ण व दुरुस्त न केलेल्या अशा अवस्थेत असून ती कवीच्या इतर कागदांबरोबर पुरली गेली. या कवीचे सर्व कागद पुरून टाकल्यामुळे संभाजीच्या कारकीर्दीत लिहूनसुध्दा ती कविता प्रसिध्द होऊन शकली नाही.

या कवितेत सांगितलेली कथा पूर्णपणे सत्य आहे. कारण ती मानवी स्वभावाला धरून आहे व त्याला ऐतिहासिक समांतर आधार आहे. याचा थोडक्यांत सारांश असा राजा शिवाजी एका संध्याकाळी त्याच्या अंतःपुरात येत असताना त्याला त्याची धाकटी राणी सोयराबाई निस्तेज, दागिने नसलेली, जमिनीवर पडलेली, उपाशी व रडत असलेली दिसली. त्याच्या सांत्वनपर शब्दावर तिने असे उत्तर दिले की, " त्यांचा मुलगा राजाराम असहाय्य व अजाण बालक आहे, तर सावत्र भाऊ संभाजी हा शक्तिशाली व वयाने मोठा आहे. सत्तेच्या लोभाने राजपुत्र त्यांच्या आई-वडिलांचा, मुलांचा व सख्ख्या भावांचासुध्दा खून करतात. त्यामुळे तुमचे दोन्ही मुलगे एका ठिकाणी सुरक्षित राहू शकणार नाहीत. म्हणून मला खूप काळजी वाटते." राजाने तिचे अश्रु पुसले व म्हणाला, " जर दोघांचे एकत्र राहाणे तुला त्रासदायक वाटत असेल तर मी संभाजीला दुसरीकडे कोठे तरी पाठवितो." तेंव्हा राणी म्हणाली,

" जर मी तुमची लाडकी राणी असेन व तुम्ही सर्वसत्ताधारी असाल, तर हे राज्य राजारामाला द्या व इतर जे काही तुम्ही जिंकाल ते शंभुला द्या. " सौंदर्यावर आसक्त झालेल्या राजाने कबुली दिली.

हे सर्व वाचल्यानंतर आपल्याला असे दिसून येते की, हे सर्व वर्णन रामायणामधील दशरथ व कैकेयीच्या वर्णनाप्रमाणे केलेले वर्णन आहे. पुढे अशी कथा आहे की, " दुसरे दिवशी शिवाजीने दरबार भरविला, संभाजीला बोलावून घेतले आणि असा उपदेश केला की, राज्यकारभार ही अतिशय अवघड अशी कामगिरी आहे. एखादा लायक मनुष्यच त्याचे कर्तव्य पार पाडू शकतो. माझे वडील मला असे म्हणाले होते की, " जरी माझे अमर्याद राज्य असेल तरी, तू खूप कष्ट घ्यावयास हवेत व इतर प्रांत जिंकावयास हवा. तुझ्याशिवाय मला इतर मुलगे आहेत व त्या प्रत्येकांना मी स्वतंत्र वाटणी देणार आहे. जेंव्हा राजा स्वत:च्या प्रयत्नाने एखादा प्रांत न जिंकता वडिलार्जित राज्याचा उपभोग घेतो, तेंव्हा लोकांना त्याच्याबद्दल आदर वाटत नाही. तेंव्हा मी तुला तुझ्या वाडवडिलांनी जिंकलेल्यापुणे विभागाचा प्रमुख करतो. तेथून तुझी शक्ती त्रिविक्रमाच्या पाय-याप्रमाणे जास्तीतजास्त वृध्दिंगत होऊन दे." असे सांगून त्यांनी मला (शिवाजीला) पुणे विभागावर राज्य करण्यास पाठविले. त्यानंतर मी माझी सत्ता आसमुद्र वाढविली व शेजारच्या राजांनी भीतीने शरणागती पत्करली. मी आतां म्हातारा झालो आहे व मृत्यु लवकरच येईल असे वाटते. तू माझ्या पुढच्या मोहिमेवरुन परत येईपर्यन्त श्रीरंगपूरला रहा. प्रभावळी प्रांताचा सांभाळ कर. आणि राज्यकारभाराची कला जाणकारांकडून शिक. संभाजीने वडिलांच्या सांगण्यास आज्ञाधारकपणे मान्यता दिली.

नंतर शिवाजीने राजारामाला त्याच्या मंत्र्यांच्या संरक्षणाखाली रायरी किल्ल्यावर ठेवून कर्नाटकचा पाडाव करण्यास निघाला. श्रीरंगपूरमध्ये

संभाजी सकाळी व्यायाम करावयाचा आणि कायदा व विधी ग्रंथाचा व पौराणिक इतिहासांचा अभ्यास करावयाचा. त्याच्या चांगल्या राज्य-कारभारावर त्याची प्रजा एवढी खूष होती की, त्यांच्या वडिलांच्या मंत्र्यांनी छळलेले लोक त्यांच्या आश्रयास यावयाचे. नंतर त्याने कालिमातेची उपासना केली व त्याला साक्षात्कार झाला व त्याच्या भविष्यकाळीन प्रगतीबद्दल भाकित केले. कर्नाटक मोहिमेहून परतल्यानंतर शिवाजीने महाराष्ट्र राजारामाला तर नवीन जिंकलेला जिंजी प्रांत संभाजीला देण्याचे ठरविले. वारसाच्या या विभागणीवर संभाजी असंतुष्ट झाला, आणि मोंगली साम्राज्याचा अधिकारी दिलेरखान याच्या उपदेशाच्या त्याला जाऊन मिळाला. नंतर या दोघांनी हिंसेच्या साहाय्याने भूपाळगड काबीज केला. येथे हे हस्तलिखित एकदम थांबते, अर्थात ही संपूर्ण हकीकत शाहूला खूष करण्यासाठी लिहिली असे आपल्याला म्हणता येणार नाही किंवा शिवाजीने आपल्या तरूण पत्नीला बळी पडून एक घोर अन्यायाचे कृत्य केले, असे म्हणता येणार नाही.

कारण इ.स. १६७८ मध्यें शिवाजीने त्याच्या साम्राज्याची योग्य अशी विभागणी केली. त्याचे शांत प्रांत व त्याचे वडिलोपार्जित विश्वासू मंत्री, यांची घराणी असलेले प्रांत राजारामाला दिले. तेंव्हा तो ८ वर्षांचा छोटा मुलगा होता आणि त्यावेळेस मोंगल सम्राटाचा अजिबात आवाज नव्हता. आणि त्यावेळेस विजापूर व गोवळकोंडा ही मराठ्यांची दोस्त राष्ट्रेच होती. नव्याने जोडलेला कर्नाटकचा भाग हा संभाजीचा हिस्सा होता. त्या प्रांताची अर्धवट अंकित झालेली अवस्था असल्यामुळे शक्तिशाली असा सम्राटच जो पूर्णपणे नियंत्रण राखू शकेल, तो आवश्यक आहे. आणि या कामासाठी निश्चितपणे संभाजीच योग्य असा राजपुत्र होता व राजारामाचा विचार करणे त्यादृष्टीने अयोग्य होते व संभाजीचेही तक्रार करणे बरोबरच

होते. भोसल्यांचा वडिलार्जित बालेकिल्ला त्याच्या लहान भावाला दिला होता, तर त्याच्या वाटणीस धोकादायक व फायदा नसलेली अशी कामगिरी सोपविण्यात आली होती, ज्यामध्यें त्याला महाराष्ट्रापासून ६०० मैल दूर असलेल्या, परकीय भाषा व जिथे मराठ्यांचा रहिवास नाही, अशा प्रांतामध्ये त्याला स्वत:ला प्रस्थापित करावयाचे होते.

दिलेरखानाने ही गोष्ट अचूक हेरली व संभाजीला गुप्तपणे पत्रे पाठविली व असे वचन दिले की, " जर तो दिलेरखानाला मिळाला, तर तो मोंगल राज्याच्या सैनिकांच्या साहाय्याने संपूर्ण देश त्याला जिंकता येईल. महाराष्ट्र व मोंगल साम्राज्याला जोडण्याचा त्यात उल्लेख नव्हता. दिलेरखानाचा सहाय्यक व मोंगल राज्याच्या मैत्रीपूर्ण संबंधाच्या धोरणावर आधारित असेच धोरण संभाजीला राखावयाचे होते. तत्कालीन इंग्रजी पत्रे व पर्शियन इतिहास असे सिध्द करतो की, संभाजी मोंगलाच्या कॅम्पमध्यें स्वत:ला दिलेरचा सेवक समजत नव्हता तर स्वतंत्र व बरोबरचा मित्र समजत होता. त्याने दिलेरखाना-बरोबर इंग्रजी जनरलने हिंदू लोकांवर अैथनी व तिकोटा येथे केलेल्या कारवायां-विरूध्द उघडपणे लढा दिला. नंतर आपणाला माहितच आहे की संभाजीने दिलेरचा त्याग केला व जेंव्हा दिलेरखानाने त्यांच्याबद्दल उद्दाम भाषा वापरली, तेंव्हा तो त्याच्या वडिलांकडे परत आला. दिलेरखानाने त्याला दिल्ली बाहेर पाठवून त्याला मोंगल मनसबदार बनावयाचा व त्याचा नाश करावयाचा असा कट रचला, तेंव्हा तो आपल्या राज्यांत वडिलांकडे परत आला.

श्री.मनपने यांच्यामते या काव्याची ऐतिहासिक पिंजणी केल्यानंतर असे स्पष्ट होते की, यांतील कोणताही भाग परमानंदकृत नाही. त्याच्या देवदत्त नावाच्या लबाड पुत्राने तो संभाजीच्या कारकीर्दित आपल्या इष्ट हेतू-सिध्दार्थ मागील कांही शिवकाल त्यांत घेऊन त्रुटित स्वरूपांत कसाबसा रचला व त्याला पुढे या देवदत्ताच्या पुत्रानेंच म्हणजे गोविंदाने, शाहूची मर्जी संपादन

करण्यासाठी शाहूच्या जन्माचे रामजन्मासारखे पूर्वाख्यान रचून, पुत्रकामेष्टिद्याने त्याचा जन्म घडवूनआणून जोड दिली. (परमानंदकाव्यम्, पृ. १५५ ते १८३) हाही स्वतःला रविंद्र म्हणूनच म्हणावून घेतो. (परमानंदकाव्यम् पृ. ४१, ५१, ५३ (श्लोक ३२) ५४, ६०, ६८, ७६, ७९) म्हणजेच हे पद त्यांनी उपनांव केलेले दिसते. पहिला कवींद्र परमानंद जगांतील टक्केटोणपे खाल्ल्यामुळे, उत्तर वयांत काव्य रचण्याचा हव्यास सोडून परमानंदबुवा पोलादपुरकर होऊन बसला. (पर्णालपर्वतग्रहणाख्यानम्, अध्याय ४ था, श्लोक १६ ते २०, पृ. २७) शिवकाली त्याला काय समजत असतील तर असो, पण पुढील काळांत बखरकार त्याला परमार्थप्रवण बुवा व शिवाजीचा एक गुरू असेच मानताना दिसतात. श्री. शेजवलकर यांच्या मते तो शिवराज्याभिषेकापूर्वीच म्हातारा होऊन मरण पावला असावा. त्यांच्या दोन मुलांपैकी कोणालही कवींद्र पदवी लाभलेली नाही. ते पुढे त्यांचे लेखनाम झाले. श्री. शेजवलकरांच्या मते जर परमानंद शिवराजाभिषेक समयी जिवंत असता तर त्याचा त्या प्रसंगी विशेष सत्कार झालेला दिसला असता. तसे नमूद नाही त्यावरून तो त्यापूर्वीच दिवंगत झालेला दिसतो.

श्री. फडक्यांनी या छापील पुस्तकांतील प्रकरणांच्या ग्रंथकर्तृत्वाबद्दल जे निष्कर्ष काढले आहेत ते शेजवलकरांच्या मते योग्यच आहेत. त्यांच्या मते छापील भागांतील प्रकरणांचे कमीतकमी चार कर्ते असावेत. तीन तर होतेच. पण ते सर्व संभाजी व त्याचा पुत्र शाहू यांचे आश्रित स्तुतिपाठक आहेत. त्यामुळे काव्यात शंभर नंबरी सत्य येणे कठीणच असते. परमानंदकाव्यात ऐतिहासिक सत्याशी विसंगत व शिसारी आणण्याइतके स्तुतिपठण व वर्णन आढळते. त्यामुळे त्याला काव्यापेक्षा भाटांच्या पोवाड्याची सर येते. तरीही ही वर्णने समकालीन व्यक्तींनी ऐकलेल्या, पाहिलेल्या घडामोडींची असल्यामुळे त्यात सत्याचा अंश निवडता येतो. घटनांची मांडणी कितीहि

काल्पनिक, पूर्वग्रहदुषित किंवा उघड उघड खोटी रचलेली दिसत असली तरी ऐतिहासिक झगडयातील एका बाजूकडील पक्षपाती लोक आपल्या कृत्यांबद्दल व विरुध्द बाजूच्या व्यक्तींबद्दल काय म्हणत होते याचा बोध त्यावरून होतो. देवदत्त व त्याचा पुत्र दोघेही छत्रपतींच्या राजधानीच्या परिसरांत वावरत होते, राहत होते. त्यामुळे इतिहासांत अन्यत्र न नोंदली गेलेली माहिती त्यांच्या काव्यांत येणे स्वाभाविक आहे व ती पारखून ग्रहण करण्यास हरकत दिसत नाही. देवीने संभाजीला काय करण्यास सांगितले, यापेक्षा त्याने काय केले याचे वर्णन सत्यास अधिक जवळ आहे. इष्टहेतूसिध्दयर्थ श्रध्देवर आधारलेले शाक्त संस्कार करणे, संभाजीला आरंभी तरी अकल्पनीय यश आल्याचे दिसणे, त्यामुळे त्याच मार्गावर व त्या मार्गाच्या गुरूवर त्याची कायम श्रध्दा बसून त्याचे पुढील सर्व व्यवहार त्याच अनुरोधाने चालणे, हे मनुष्य-स्वभावास धरून आहे. शिवाजीहि श्रध्दावान पुरुष होता. कठीण, दुर्लंघ्य, केवळ अशक्य असे संकटसमय प्राप्त झाले असता तो देवीची प्रार्थना करी व त्यामुळे त्याला पुढे करावयाच्या गोष्टींबद्दल निश्चिंतता लाभे, असें भवानीच्या त्याच्या अंगात येण्याच्या प्रसंगावरून वाटते. संभाजीचे सर्व धर्माचरण ऐहिक सत्ता, शक्ति, ऐश्वर्य, भोगविलास यांसाठी आरंभिलेले दिसते. त्यांत त्याला भेटलेली माणसें महाराष्ट्र राज्याच्या हिताचा विचार मनांत वागविणारी नसून, आपल्याच वैयक्तिक स्वार्थात गुरफटलेली होती. यामुळे त्याचा अधःपात होण्यास मदत झाली असे दिसते.

प्रस्तुत छापील काव्याचे पांच भाग संपादक श्री. सरदेसाई यांनी केले आहेत. ते वस्तुतः तीनच हवे होते. छापील भागातील कोणत्याच ठिकाणी चपखल न बसतील असे, अधांरी लोंबणारे चार भाग योग्य ठिकाणी बसवून दाखवून श्री. पत्पयांनी सर्व हस्तलिखित, पाने अलिकडे पलिकडे झाली असली

तरी, मुळांत एकच आहे हे स्पष्ट केले आहे. त्यामुळे विसंगत असा भाग कोठें उरतच नाही.

पहिल्या एकवीस पानांतील भोसले कुलाची काव्यमय प्रशस्ति ही मोठ्या जड वृत्तांतील, आदि, अंत किंवा नामिधान नसलेली काव्यपंक्ति कोणा एकाच्या हातची असून, तिचा लेखक दिलेला नाही. तरी बहुधा तो परमानंद पुत्रांपैकी कोणी तरी असावा. हे काव्य शाहजी, शिवाजी व संभाजी यांची राजकीय क्षेत्रांतील कामगिरी कंटाळा येण्याइतक्या पोकळ व नीरस श्लोकांत गाते. पण या छोट्या लिखाणांतहि इतर दोन भागांतील पिता-पुत्रांबद्दलच्या काव्यात आढळणारा संभाजीबद्दलचा जिव्हाळा, त्यांच्या हर्षामर्षाच्या खोंचा, शाक्तपंथाची श्रेष्ठता, त्या पंथाचा स्वीकार संभाजीने केल्यामुळे त्याला व इतरांना अशक्य वाटत असलेली महाराष्ट्र राज्यप्राप्ती व त्यासाठी आवश्यक असलेले शिवाजीचे अकालमरण या गोष्टींची माहिती पध्दतशीर दिली आहे. या पंथाचा गुरु छंदोगामात्य मंत्री कवि कलश हाच होता. त्यानेंच संभाजीला त्याचा पूर्वजन्मवृत्तांत करून शाक्त कलशाभिषेकाला कसे प्रवृत्त केले, या दोघांचा संबंध प्रस्तुत जन्मी सिध्दसाधक असा कसा जुळून आला, सिध्दसाधकांमधील भेद स्त्री-पुरुषांतील भेदाप्रमाणेच कसा असतो. कलशाने संभाजीला परस्परसंबंधाचे दिग्दर्शन करून संभाजी चरित्राची बैठक जुळवून दाखविणाऱ्या श्लोकांची पंक्ति येथील प्रशस्तीत कशी घुसडली आहे. (परमानंदकाव्यम् पृ. ९ व १० श्लोक ६२ ते ७०) वगैरे गोष्टी या लिखाणात स्पष्ट होतात.

काव्यातील तीन पाने शाहजी, चार पाने शिवाजी व बाकीची संभाजीला दिली आहेत. काव्य शाहजादा अकबर याचे इराणाला प्रयाण होईपर्यंत आणून सोडलेले आहे. संभाजीची अखेरची दोन वर्षे त्यांत नाहीत. यावरून ते संभाजी जिवंत असतानांच त्यापुढे ठेवण्यात आले होते असा बोध होतो.

सोयराबाईबद्दल कवीचा रागही त्यांत आहे. (परमानंदकाव्यम्, पृ. ४५, श्लोक ४५ ते ४७, पृ . ५२).

दुसरा भाग परमानंदपुत्र देवदत्तकृत असून, मुलाने बापाच्या काव्याचे ते पुढील प्रकरण असल्याचा आभास निर्माण केला आहे. कांही ठिकाणी तर बापाचे नांव तेथे ठेवून स्वत:चे नांव दिलेले नाही. (परमानंदकाव्यम्, पृ. ५३, श्लोक ३२). या भागात शिवाजीच्या अखेरच्या बार वर्षांचा देवदत्तकृत इतिहास आहे. त्यातील शिवाजीबद्दलचे वर्णन वाचकांना अयोग्य किंबहुना खोटे वाटेल अशी स्वत:लाच भीती वाटून देवदत्ताने त्याचे कारण, सर्वांच्या अंगात शंकराच्या आशीर्वादाने झालेला कलिसंचार हे आहे, असे आधीच म्हणून ठेवले आहे. (परमानंदकाव्यम, पृ. ४४ ते ५६).

शिवाजीच्या अखेरच्या कालांतील भागाची रचना बेमालूम झालेली नाही. हे सर्व कृत्रिम आहे असा प्रत्यय वाचणारास जेथल्या तेथेच येतो. मुळापासूनच लेखकानें संभाजी हा सर्वगुण संपन्न, निर्दोष, सरळ, उदार व सर्व दृष्टींनीं शिवाजीच्या राज्यावर येण्यास लायक असा उमेदवार ठरविला आहे. सोयराबाईला कलीची दूती, राक्षसी समजून तिच्या सर्व कृत्यांचा उल्लेख स्वार्थपर लावला आहे. (परमानंदकाव्यम, पृ. ५६ ते ६०). शिवाजीचे प्रधान तर सगळे लबाड, स्वार्थी, प्रजावंचक, ढोंगी असे रंगविले आहेत. परंतु संभाजीची बुध्दी तेथही कलीने दूषित केलेली नाही. त्याचे सर्व प्रयत्न न्याय्य गोष्टींच्या सिध्दयर्थ, परिणामांची भीती न बाळगता चाललेले आहेत. स्वाभिमान राखण्यासाठी व आपल्या शौर्याला वाट करुन देण्यासाठी तो मोंगलाकडे गेला. ही आपत्ती त्याच्यावर शिवाजी व त्याचे दुष्ट सल्लागार प्रधान यांनी आणली. त्यांत संभाजीचा वाईट हेतू नाही. संभाजीच्या दुर्गुणांचा कोठे नामनिर्देशहि नसल्याने हे पैंशी पानांचे च-हाट वाचणारास त्याच्या दोषाची शंकाहि उत्पन्न होण्याचे कारण कवीने कोठे उरु दिलेले

नाही. काव्य पिठ्कृत शिवभारताचे अनुकरण आहे असा आभास निर्माण करण्यासाठी मधून मधून कवींद्र, मनीषी यांची प्रश्नोत्तरे ठेवून प्रस्तुत भागाची रचना करण्यात आली आहे. कलि, देवी, शाहजी, शिवाजी, संभाजी वगैरे पात्रांच्या तोंडून त्या त्या ठिकाणी काव्याची उकल वाचकांच्या सोईसाठी करून दाखविण्यांत आली आहे. पण एवढे करूनहि कवीचा हेतु मात्र सिध्दीस जाऊन शकलेला नाही. याची कारणे अनेक आहेत. संभाजीच्या अतिरिक्त स्तुतीनेच कविला इष्ट असणारा परिणाम या लिखाणापासून होऊन शकलेला नाही.

कवीची रचना क्लिष्ट असून भाषा ओघवती नाही. कोणीकडून तरी काव्य रचण्याचा खटाटोप आहे. काव्यांत नेहमी येणारे, सोपे शब्द घालण्याऐवजी कोशांत सांपडणारे, अपरिचित शब्द घालण्याचा कवीला नाद आहे. क्रियापदांच्या रूपांची तिच स्थिती. शब्दरचना अशी केली आहे की, अर्थ ताबडतोब उघड होण्याऐवजी तो शोधीत बसावे लागते. शब्दांची मूळ रूपे श्लोकांतून एकदम उघड होण्याऐवजी पदे पाडून शोध करीत बसावे लागते. एकंदरीत काव्याचें वाचन सहज ओघांत होणे अशक्य असून त्यासाठी संशोधन-बुध्दीचा वापर करावा लागतो. म्हणूनच ग्रंथाच्या प्रास्ताविकाचे लेखक मान्नीय सर जदुनाथ सरकार, ग्रंथनिदर्शक प्रस्तावना लिहिणारे व ग्रंथांतील भागांचे पृथक् अध्यायवार गोषवारा देणारे रियासतकार सरदेसाई व ग्रंथ जुळवून दाखवून संपादकांच्या चुकांचे परिमार्जन कांही बाबतीत करणारे परीक्षणकार श्री.पनपेन या तिघांकडूनहि ग्रंथाचे वाचन अथपासून इतिपर्यन्त जसे व्हावयास पाहिजे तसे झालेले नाही असे श्री. शेजवलकरांचे मत आहे. पहिल्या दोघांनी तर अवघी सामान्य दृष्टिक्षेप करून आंतील माहितीची जंत्री त्रुटित स्वरूपांत दिली आहे. त्यात मुद्यांचे कांही श्लोक त्यांच्या लक्षात तरी आले होते की नाही याची श्री. शेजवलकरांना शंका वाटते.

स्वत:चे वेतन व मान नाहीसा झाल्यामुळे चडफडणाऱ्या माणसांचे हे हेतुपूर्वक केलेले लिखाण आहे. त्यांत त्याचा राग व त्या रागाचे कारणही समजून येते. त्याचे जातीय हर्षामर्ष समजतात व त्याच्या मनाची अंधश्रध्द रचना निदर्शनास येते. कवीजवळ, ज्यांवर तो चडफडतो व बोटें मोडतो त्यांच्या सार्वजनिक गुणांची महती कळण्यासारखें मनहि नाही. समकालीनत्वामुळे इतरत्र व न नोंदले गेलेले काही खरे ऐतिहासिक प्रसंग मात्र प्रकरण सजविण्याच्या भरांत त्याच्या हातून निर्दिष्ट होतात व त्यांचा इतिहास संशोधकांस उपयोग होतो. सामाजिक परिस्थितीतील पक्षभेद व दोन पक्षांच्या परस्परांबद्दलच्या समजुती यांचेहि दिग्दर्शन यांपासून होते. अशा तऱ्हेचा प्रकाश इतिहासावरून क्वचितच मिळतो. संभाजीला शिवाजीचे प्रधान व अधिकारी सगळे चोर, भामटे, वाटत होते व कवीलाहि ते तसेच वाटतात. इतर भामटे नसले तर त्यांची मति फिरली होती, असें संभाजीच्या पक्षांतील लोकांचे मत होते, असें या लेखनावरून दिसते. पण शिवाजीचा ज्यावर परिपूर्ण विश्वास होता. ते भामटे असणें हे शिवाजीच्याच मंदबुध्दीचे लक्षण ठरेल व तसें मानण्यास महाराष्ट्र सहसा तयार होणार नाही.

पण परमानंदपुत्राने संभाजीची बाजू मांडण्याचाच निश्चय केला असल्यानें त्याने खरी खोटी हकीकत पदरचा मालमसाला घालून समजवून वाचकांचे मन संभाजीला अनुकूल बनविण्यासाठी विस्ताराने सांगितली आहे. त्यांत कांही मुद्यांच्या गोष्टीही आपणांस कळतात. राज्याभिषेकाच्या प्रसंगी जिवंत असलेल्या राण्यांत वडील व कदाचित पुत्रवती म्हणून सिंहासनावर पतीशेजारी उघडरित्या बसण्याची संधी मिळेपर्यंत सोयराबाईच्या मनांतही आपल्या मुलाला शिवाजीच्या पश्चात गादी मिळावी अशी कल्पना आली नसावी. पण नंतर मात्र व विशेषत: संभाजीबद्दल शिवाजीचे मन त्याच्या दुर्वर्तनामुळे उतरू लागले, तेंव्हा तिच्या मनाने उचल केली असावी व संधी पाहून तिने हस्तेपरहस्तें आपली

इच्छा शिवाजीच्या कानी घातली असेल. आपल्या गैरहजेरीत संभाजीला रायगडला सर्वाधिकारी म्हणून मागें नेमण्याऐवजी त्याच्या दुष्कृत्यांना आळा पडावा म्हणून त्याला बाहेरच ठेवण्याचा शिवाजीनें कर्नाटकच्या स्वारीस बाहेर पडण्यापूर्वीच हेतुपूर्वक प्रघात पाडलेला दिसतो. आपल्या या करण्याचे कारण शिवाजी संभाजीस असे समजावितो की, " तुला मानवणारी परिस्थिती कलिसंचारामुळे, म्हणजे आपापसांतील वैमनस्यामुळे, रायगडावर राहिलेली नाही. म्हणून तुझे येथे राहणे उत्तम नव्हे. प्रधानांचे व तुझे पटण्यासारखे दिसत नाही. म्हणून माझ्या सांगण्यावर भरवसा ठेवून तूं माझ्या हुकुमाप्रमाणें शृंगारपुरास राहून प्रभावळी सुभ्याचे काम पाहा. " (परमानंदकाव्यम, पृ.६६ श्लोक ८७ ते ९४)

या उलट संभाजी आपली इच्छा बापास कळवितो की, " माझी इच्छा पित्याकडून राज्य चावण्याची नाही. मी स्वपराक्रमावर नवीनच राज्य कमविण्यास समर्थ आहे. जो दुबळा मुलगा असेल त्याने बापाच्या सदिच्छेने राज्य मिळवून सचिवांच्या मदतीने ते करावे, पण मला मंत्र्यांचीही गरज नाही. " (परमानंदकाव्यम्, पृ . ६७).

अर्थातच हे सर्व परमानंदपुत्र देवदत्तरचित काव्य आहे, पण त्यावरून सोयराबाईने शिवाजी कर्नाटकच्या स्वारीस निघण्यापूर्वीच, राजारामाला महाराष्ट्राचे राज्य दे व संभाजीसाठी दुसरे शोधून काढ अशी गळ त्याला घातली होती व त्यामुळे पुढील प्रकार घडला, असे कवीचें म्हणणे आहे. (परमानंदकाव्यम्, पृ. ५७ ते ६०)

मनांतील कोणतीही इच्छा पतीसमोर मांडण्याचे धैर्य शिवाजीच्या बायकांना असेल असे वाटत नाही. शिवाजी असा जरबेचा पुरुष होता की, तसे करण्यास शिवाजीचे प्रधानसुध्दा त्याने विचारल्याशिवाय धजले नसते.

सोयराबाई तरूण व सुंदर असल्यामुळे शिवाजी तिचा गुलाम झाला होता हे कवीचे म्हणणेही लक्षांत घेण्यासारखे वाटत नाही. धाकटा पुत्र राजाराम याच्याबद्दल विशेष आपुलकी शिवाजीला वाटणें शक्य आहे कारण वडील पुत्राने आपले गुण उधळल्यामुळे आशा करण्यासारखी शिवाजीला तेवढीच जागा राहिली होती व सोयराबाई व प्रधान यांच्याकडे संभाजी कोणत्या नजरेने पाहतो हे लक्षांत आल्यावर शिवाजीला त्याचा विश्वास राहणे शक्य नव्हते. म्हणजे राजारामाची सोय लावणे हे शिवाजीचे आगंतुक कर्तव्य होऊन बसले.

जिंजीच्या स्वारीचे आद्य प्रवर्तक कारण राजकारणी होते, पण या नवीन पेचप्रसंगामुळे, एक नवीन राज्य महाराष्ट्रापासून किंचित दूर मिळाल्यास संभाजीची सोय करता येईल व त्याला हवे असलेले स्वातंत्र्य लाभून त्याचे समाधान करता येईल, अशी आशा शिवाजीला या स्वारीची निकड लागण्यास कारणीभूत झाली असावी. संभाजीला केवळ राज्याचा वारस म्हणून दूर करून प्रश्न सुटत नव्हता, तर त्याचे सामान्यत: समाधान राखून, त्यावर केवळ अन्याय झाला आहे असे वाटण्यास संधिहि न देता, शहाण्या बापाप्रमाणे त्याची सोय लावणे हेच शिवाजीचे कर्तव्य झाले होते वांशिक राज्यपध्दती-मध्यें जर उलटा माणूस निर्माण झाला तर राज्यास धोका निर्माण होतो. तसा होण्याचे शिवाजीच्या शहाणपणापुढेही टळले नाही आणि असे घडल्यामुळेच श्री.वा.सी. बेंद्रयांना व डॉ. सौ. कमल गोखले याना आपले ग्रंथ सजविण्यास संधि मिळाली व देवदत्ताचे कर्तृत्व तीन शतकानंतर पनळाला आले व आज तरी संभाजी महान म्हणून इतिहासांत प्रस्थापित करण्यांत आलेला आहे.

देवदत्तकाव्यामुळे कळून येणारी दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे, शिवाजीच्या गैरहजेरीत रायगडावर सर्वाधिकारी व्यवस्थापक म्हणून राहूजी सोमनाथ या सरकारकुनाला नेमण्याचा शिवाजीने प्रघात सुरू केला होता.

कवि त्याला `राजप्रतिनिधि` म्हणतो. (परमानंदकाव्यम् पृ. ५१ श्लोक १२४, पृ. ६८ श्लोक १ ते ३) त्याला प्रतिनिधी असे अधिकृत नांव मिळाले होते की नाही याबद्दल खात्री नाही. पण तोच रायगडावरील अधिकारी असे, संभाजी नसे, हीच गोष्ट अव्वल महत्वाची आहे. राजाच्या गैरहजेरीतील त्याची कामगिरी नाजूक व मोठ्या जोखमीचीही होती. व शिवाजीच्या या नियुक्तीबद्दल प्रधानांचेही सहमत असावे. शिवाजीच्या मृत्युसमयीही तो रायगडास होता. राज्याभिषेकाच्यावेळी इंग्रज वकिलाने राजाचा खास चिटणीस म्हणून त्याला दोन रेशमी वस्त्रें नजर दिल्याचे नमूद आहे. तो नुसता मुलकी अधिकारी नसून जरूरीप्रमाणे सैन्य बरोबर घेऊन जाणारा योध्दाहि होता. त्याचे मुख्य गुण शहाणपणा, न्यायवृत्ति, नि:पक्षपातीपणा, विश्वासूपणा व राजाच्या हुकुमाची तंतोतंत अंमलबजावणी करण्याची तयारी, हे असल्याचे दिसते. त्याच्या जागी स्वभावत: च युवराजाचीच योजना व्हावी हे सहजच होते. पण ते शिवाजीने कटाक्षाने टाळले. राजारामाच्या लग्नालाही संभाजीला स्वत: बरोबर घेतले नाही किंवा दक्षिणेच्या स्वारीतही त्याला बरोबर नेले नाही. यावरून संभाजी त्याच्या मनांतून व विश्वासांतून पूर्णपणे उतरलेला होता. त्याचे आणखी कारण, सोयराबाईबद्दलचा व प्रधानांविषयीचा संभाजीचा दूषित भाव हेच होते, हें इतिहासावरून स्पष्ट होते.

शिवाजीची तयारी अशाही मुलावर अन्याय करण्याची किंवा त्याला मोंगली पध्दतीप्रमाणे कायम दुर्गम व बेलाग डोंगरी किल्ल्यावर तुरूंगात ठेवून त्याचा जन्म फुकट घालविण्याची नव्हती, पण परंतु त्याच्या बखेडयापासून राज्यास धोका राहू नये, अशी व्यवस्था करण्याची होती. अखेरचा उपाय म्हणून एकराज्याच्या स्वतत्वाविरुध्द संभाजीला जिंजीचे राज्य स्वतंत्र तोडून देण्यासही शेवटच्या घटकेस शिवाजी तयार झाला होता. पण

संभाजीने ऐकले नाही. यानंतर संभाजीची व्यवस्था ठरविण्यापूर्वीच शिवाजीचा अंत झाला व त्याचा सर्व सावधपणा व राज्यहितदक्षता व्यर्थ ठरली.

सर्व गोष्टी घडून गेल्यानंतर व राज्यात स्थिरस्थावर झाल्यावर कवि आपले काव्य लिहित असल्याने त्याला मागील घडामोडींची रचना संभाजीला अनुकूल अशी आरंभापासून लावता आली. संभाजीला शिवाजीच्या मरणाची वार्ता केंव्हा कळली. हे इतिहासांत नोंदलेले नाही. पण कवि ठासून सांगतो की, ती शिवाजीच्या मृत्युनंतर लवकरच कळली. शिवाजीने प्रधानास काय लिहून दठेवले असेल याची कल्पना असल्यामुळे संभाजीने ताबडतोब राज्य बळकाविण्यास सुरूवात केली. कवीच्या मते प्रधानांनी शिवाजीच्या आज्ञे-प्रमाणें सोयराबाईजवळ जाऊन तिला मुलांसह राज्य करण्यास तिच्या इच्छेविरूद्धही तयार केले. अर्थात कवीने, सोयराबाई ही ढोंगी होती. तिला नव-याच्या मृत्यमुळे आता आपल्या हातांत सत्ता येणार म्हणून मनांतून आनंद झाला होता, तरी बाह्यत: भीति दाखवून, नाना शंकाकुशंका उपस्थित करून, प्रधानांनीच त्यांना शिवाजीची आज्ञा असेल त्याप्रमाणे करावे, असे तिने सुचविले व त्यांनी ती पडत्या फळाची आज्ञा समजून आपली पावले टाकण्यास आरंभ केला. असे रचलेले लिखाण अकारण संवाद वाढवून करून ठेवले आहे.

कवि पुढे सांगतो की, संभाजीने आपला गादी मिळविण्याचा प्रयत्न सुरू केला व हंबीररावाकडे हेर पाठवून त्याला व त्याच्या हाताखालच्या आनंदराव, मानाजी मोरे प्रभृती मुख्य सरदारांना राज्याच्या दिल्लीश्वरा-पासूनच्या रक्षणाखाली आवाहन केले. बापाचे खरे मत त्यांना न कळविता, शिवाजीनेच माझ्याकडे राज्य व दिल्लीश्वराचे वैर मरणापूर्वी सोपवून दिले आहे, अशी थाप संभाजीने ठोकून दिली. मंत्र्यांना ते कुमंत्री आहेत असे कवि

आरंभापासूनच म्हणतो. पुढे संभाजीच्या भाग्याचा दैवी पाठपुरावा सांगण्यासाठी मोरोपंत, अनाजी दत्तो, प्रल्हाद निराजी पन्हाळ्याकडे निघाले. तेव्हा त्यास पहिल्या पावलींच, पहिल्याचे पागोटे खाली पडणे, दुसऱ्याच्या पालखीपुढे बोडका शुद्र येणे व तिसऱ्याचा डोळा फडफडू लागणे, असले प्राकृत अपशकून झाल्याचे कवि आवर्जून सांगतो. त्यांत पुन्हा प्रल्हाद निराजी जिवंत असून संभाजीचा न्यायाधीश म्हणून काम करीत असल्याने त्याच्या मनाची दुसऱ्या दोघांपासून फारकत दाखवून, या अशुभ घटनांवरून, संभाजीने सेनापती व सैन्य आपल्या बाजूस आणविले आहे, असा तर्क आधीच कवि प्रल्हादाकडून करवितो.

हंबीररावाने पन्हाळ्याला जाऊन संभाजीचे राजा म्हणून ससैन्य अभिनंदन केले. नंतर सेनापतीच्या मदतीने सर्व मंत्र्यांना हस्तगत करून आपल्या-विरूध्द असलेल्या सर्व लोकांस संभाजीने शासन केले व तो पन्हाळगडावर स्थानापन्न झाला. त्याने काहींना तापत्या तेलाच्या कढईत टाकून व तळून मारले, काहींना बाणाने मारले, काहींना चिरले व काहींना कडेलोट करून त्यांचे चूर्ण केले. काहींना हत्तीच्या पायी दिले असे कवि सांगतो. ही सर्व वार्ता ऐकून त्याचा अंमल सर्व गडांवर व राज्यात बसला. मोंगल चकित झाले. श्रीरंगपट्टण, बिंदुपूर, मल्याचल, सिंहल, सेतुबंध, भागानगर, विजापूर यांकडून हत्ती, घोडे व नजराणे आले. नंतर कलशाच्या उपदेशावरून रायगडास जाऊन राज्याभिषेकाची त्याने तयारी केली. म्हणजे कवीच्या मताप्रमाणे सर्व गोष्टी ईश्वरी सूत्रानुरूप संभाजीला अनुकूलच घडून आल्या. (परमानंदकाव्यम् पृ. ३३ ते ४१) कवि हा स्वार्थसाधनासाठी यावेळी कलशाचा स्तुतिपाठक बनलेला दिसतो.

वर कवीनें दिलेली हकीकत खरी वाटते म्हणून येथे दिलेली नसून, वाचकांना कवीनें इतिहासाचा कसा मन मानेल तसा हात राखून उपयोग केला आहे. तें कळण्यासाठी किंचित प्रकाश त्यावर टाकलेला आहे. सर्व काव्य वाचणे ही एक शिक्षाच आहे. त्यापासून आनंद कोठेच लाभण्यासारखा नाही. कविच्या उपमा कोठेही बहुधा समर्पक नाहीत. मनाला येईल तेंव्हा महेश्वर, कलि, देवी, कवींद्र, मनीषी यांचा उपयोग कवि यथेच्छ करतो. प्रचलित लोकमत लक्षांत ठेवून शिवाजीला त्यानें कोठे दूषण न लावण्याची काळजी घेतलेली दिसते. पण शिवाजीच्या दरबारातील इतर माणसांचा त्याला इष्ट समाचार त्याने ठिकठिकाणी घेण्यांत कसून केलेली नाही. कवि आपल्या सभोवतालचा समाज बिघडलेला आहे, असे प्रतिपादन करतो. पण स्वत: सदाचारी असल्याचा आव आणतो. स्वत:ला बांधलेल्या रघुनाथ पंडितासारख्या माणसाला तो दूषणें लावतो. (परमानंद काव्यम् पृ. ५४, श्लोक ३३ ते ४५)

इतरांची सामान्य त-हेने निंदा करून ते भले नसल्याचे वाचकांच्या मनावर बिंबविण्याचा प्रयत्न करतो. मराठी राज्याच्या परमुलुखांत मुलूखगिरी करून द्रव्य संपादन करण्याच्या पध्दतीला तो स्पष्टपणे लूटमार म्हणतो. शत्रु जी टीका करेल तीच तो करतो. शिवाजीने मोंगलांना दिलेले किल्ले परत घेण्याचा उपक्रम केला ही गोष्टही त्याला अनुचित वाटते. (परमानंदकाव्यम्, पृ. ५५, श्लोक ५७ ते ६१) कवि पर्यायाने असे सुचवितो की, संभाजी असे कांही करीत नव्हता. त्याचें राज्य शिवाजीच्या राज्याहून जास्त सुसंस्कृत, प्रजाहिततत्पर व कल्याणकारी होते. यावरून संभाजीने प्रजेतील कांही अंशावर तरी आपली छाप पाडून स्वत:ला बरे म्हणावून घेण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. शंभुराजाच्या ऐश्वर्यांचे वर्णन करण्याची संधी न चुकविता जितक्या जास्त श्लोकांत ते करता येईल, तितके करण्याचा प्रघात कवीने ठेवला आहे. काव्याचा

आकार सर्वांत जास्त यामुळेच वृध्दिंद पावला आहे. संभाजी पित्राज्ञा सहसा मोडीत नाही. किंवा अवमान करीत नाही. पण इतकें असूनहि शिवाजी मोहाने त्यावर अन्याय करतो असें कवि भासवितो. शिवाजीलासुध्दा मनातून ज्येष्ठ पुत्राला ज्येष्ठ म्हणजे महाराष्ट्र राज्य व कनिष्ठाला मागाहून मिळविलेले कर्नाटकाचे राज्य देणे हाच योग्यक्रम आहे, हे पटत होते. पण पुत्रमोहामुळे त्याने तो क्रम बदलण्याचा प्रयत्न केला, असें कवीचे विवेचन आहे.

शिवाजीला मुलांच्या कल्याणाची इच्छा नेहमीच असलेली दृष्टीस पडते. त्याच्या हातून जाणूनबुजून कोणाकडे दुर्लक्ष झालें असेल असे वाटत नाही. संभाजीला शिवाजीने फार दुखविले असते तर तो एक वर्षानंतरहि परत आला नसता त्याच्यातहि सद्गुण आदीच लोपला नव्हता असाच याचा बोधहहोतो. पण शिवाजीचे अकालमरण निकट येऊन ठेपले आहे याची कोणालाच, त्याला स्वतःला सुध्दा कल्पना नव्हती. हाच निष्कर्ष काढावा लागतो. संभाजीची कवि कंबर बांधून जनसमजुतीविरुध्द स्तुतीच करण्यास प्रवृत्त झाला आहे, त्या अर्थी त्याचा कांही फायदा कवीला अवश्य झाला असावा, असा तर्कहि करता येतो.

येथवर वर्णन केलेल्या काव्यांविषयी, त्यांचे कर्तृत्व खरें देवदत्ताला चिकटते कीं त्यातील कांही भाग पुढें नातू गोविंद याने फार मागाहून जोडला आहे, याबद्दल नेहमीच शंका येण्यासारखी आहे. पण रघुनाथ पंडितराचा-कडून कडक परीक्षा फक्त परमानंदाच्या पुत्रांचीच शक्य होती. कारण रघुनाथ लवकरच क्षयाने मृत्युमुखी पडून, त्याच्या पदावर संभाजीच्यावेळी केशवभट्ट उपाध्याय पुरोहित याला पंडितराई मिळाली असे स्पष्ट विधान या ग्रंथात पृष्ठ १५२ वर १५ व्या श्लोकांत गोविंदाने केलेले आढळते, अर्थात हे विधान खरे असलेच असे नाही. एवढे मात्र स्पष्ट दिसते की, केशवभट

संभाजीच्या कारकीर्दीतही दरबार सोडून गेलेला नव्हता व त्यानंतर तो राजारामा बरोबर जिंजीला जाऊन व राजारामचरिताचे पांच अध्याय लिहून नंतर केंव्हा तरी मेला. गोविंदाच्या नांवावर लिहिलेल्या अखेरच्या `अर्भावतरण` प्रकरणाचा बराचसा भाग संभाजीच्या कारकीर्दितील शाक्तपंथाचा दरबारी बोलबाला, त्याला संभाजी व कवि कलश यांचा आश्रय व उत्तेजन व कोंकणातील सामाजिक अंदाधुंदी व विघटण यांच्या वर्णनांत गेला आहे. राजकारणी मुद्दा त्यांत नाही. तो शाहूला खूष करण्यासाठी व त्याच्या बापाचे गुण गाण्यासाठी लिहिला गेलेला आहे.एवढेच. त्यांतलि माहिती गोविंदाने प्रत्यक्ष पाहिलेली, ऐकलेली नसून ती परंपरागत त्याच्या कानावर आलेली दिसते. त्याचे महत्व आधीच्या भागांच्या तुलनेने ऐतिहासिकदृष्टयासुध्दां फारच अल्प आहे व काव्यदृष्टया हा ग्रंथ मोलाचा ठरत नाही. या परमानंदकाव्यालाच अनुपुराण असे दुसरे नांव योजिलेले आहे. सर्वसाधारणपणे इ.स. १७८२ मध्ये हा ग्रंथ रचला असावा.

अशातऱ्हेने १८ व्या शतकांतील संस्कृत शिव साहित्य यांमध्ये अय्याकलचे `शाहेन्द्रविलासकाव्यम्` व देवत व गोविंदाचे `परमानंदकाव्यम्` किंवा `अनुपुराण` या दोनच काव्यांचा समावेश होतो. काव्यदृष्टया व ऐतिहासिकदृष्टया यांचे महत्व फारच अल्प आहे. त्याचे सविस्तर विवेचन त्या प्रकरणांत केलेले आहे. वाचकांनी त्यावर जरूर तो विचार करावा.

प्रकरण चौथे

१९ व्या शतकांतील संस्कृत साहित्यातील
शिव चरित्र

प्रकरण चौथे

१९ व्या शतकातील संस्कृत साहित्यातील शिव चरित्र

अ) शिवकाव्य :

पुरुषोत्तम पंडितजी दीक्षित याने इ.स.१८२१ मध्यें हे काव्य समाप्त केले व पुढे पांच वर्षांनी त्यावर लगेच संस्कृत टिका लिहिली. इ.स. १८५६ मध्यें हा मृत्यू पावला. इ.स. १८८४ मध्ये 'काव्येतिहास' संग्रहात त्याचे शिवकाव्य छापून निघाले व पुढील सालीच श्री.वा.भा. भावे यांनी त्याचा मराठी अनुवाद कोल्हापूरास प्रसिध्द केला. म्हणजेच मूळ कवि दिवंगत होऊन पाव शतक लोटल्यानंतर लगेच त्याचा परामर्श घेण्यांत आला, हे त्याचे भाग्यच म्हटले पाहिजे. शिवभारतासारखे श्रेष्ठ दर्जाचे ग्रंथ जेथे शतकानुशतके अज्ञात राहतात व अद्यापि असंशोधित असे सहस्त्रावधि ग्रंथ कोठेतरी पडून आहेत व तेथे या पुरुषोत्तमाचे संस्कृत काव्य उजेडात येऊन त्याचे पद्यमय मराठी भाषांतरही व्हावे. याला सुदैवच म्हणणे योग्य होईल. यातील काही श्लोक लोकांच्या तोंडी होते, त्यामुळे त्याचे लवकर संशोधन झाले.

शिवकाव्याचे कथानक पुढीलप्रमाणे आहे. कवीने प्रकरणाला चमत्कार असे नांव दिलेले आहे. व काव्याचें पूर्वार्ध व उत्तरार्ध असे दोन विभाग केले आहेत. चमत्कार १ - मंगलाचरण, काव्यमाहात्म्य - विषयावतरण - शिवाजीमहाराज वर्णन - श्रीरामदास समागम व प्रसाद - शिवाजीस बापाचा उपदेश - त्यावर शिवाजीचे उत्तर, शहाजी विजापुरी परत येतो.

विजापूरच्या मुसलमान राजाचा दरबारी मंडळीस प्रश्न - मंडळीचे उत्तर - शहाजीचे उत्तर - विजापूरचा राजा चिंतातुर होतो.

चमत्कार २ - विजापूरच्या राजाची चिंता - शिवाजीला धरून आणण्याचा विडा विजापूरचा राजा तयार करतो. धर्मधुरंधर याने त्याचा प्रतिज्ञापूर्वक स्वीकार - धर्मधुरंधर व शिवाजी यांचे राजगडाजवळ युध्द - शिवाजीस धरण्याकरिता अफझलखानास पाठविले - त्याचे प्रयाण - त्याने दयालु नामक ब्राह्मण सामार्थ शिवाजीकडे पाठविला. त्याचे व शिवाजीचे भाषण - दयालु परत येतो व अफझलखानास हर्ष होतो. देवीपूजन - ठगास ठकविण्याचा बेत - प्रतापगडाजवळ तंबू ठोकला - सेनापतीस उपदेश - देवी प्रार्थना - दोन योध्यांसह शिवाजीचे प्रस्थान - अफझलखान प्रस्थान - शिवाजीचे रक्षणार्थ लोकांची प्रार्थना - उभयतांची भेट - अफझलखान पतन - त्याचा शिरच्छेद - यवनसेनापलायन -

चमत्कार ३ - अफझलखान व शिवाजी यांच्या फौजांची लढाई - शिवाजी सेनापति विजय - त्याचा सत्कार - तो लूट शिवाजीस देतो - शिवाजी शिपायास वाटून देण्याकरिता तो परत देतो - प्रतापगडावर भवानीची स्थापना - विजापूरचा राजा व त्यांची आई यांचा विलाप.

चमत्कार ४ - बारा वर्षात ३६० किल्ले शिवाजी बांधतो. गड सुसमृध्द करतो. मालवणचा किल्ला - सातारा राजधानी होते. गागाभट्ट - मुंज - लग्न - दिल्लीवर स्वारी - नर्मदास्नान - युध्द - बादशहाचा पराभव - दिल्लीहून फौज निघते.

चमत्कार ५ - शास्ताखान - शिवाजीचे अंगात देवी संचार करून युध्द कर म्हणून सांगते - शास्ताखानाची बोटे कापतो - शास्ताखान दिल्लीस परत जातो - त्याचा अपमान - शिवाजीवर जयसिंहाची योजना -

दिलेरखान - जयसिंह नर्मदातिरी देवीची आराधना करतो - मसलत - युध्द करू नको असे देवी सांगते - दिलेरखानाचा पुरंदरावर हल्ला - मुरारप्रभूचे शौर्य व मृत्यु. जयसिंह व शिवाजी यांचे सख्य - पुत्रासह दिल्लीस जातो - तेथे सत्कार - प्रतिबंध - चिंता - स्वप्नात देवीचे दर्शन - पेटाऱ्यांतून नजराणा पाठवितो - पेटाऱ्यांत बसून दिल्लीहून जातो - फकीर वेष - वाराणसीस येतो - भागीरथी स्तुती - बादशहा त्याचा शोध करतो - पता लागत नाही - स्वदेशी परत येतो. शके १५९६ मध्ये राज्याभिषेक - पुत्रद्वयप्राप्ति - राज्यविभाग - अष्टप्रधान - राज्योपभोगकाल - मृत्यु.

चमत्कार ६ - संभाजी - दिल्लीपति पराभव - औरंगजेब चिंताग्रस्त होतो - कब्जी - पूर्व प्रधान आवडत नाहीत - कब्जीचे नादी लागतो - दिल्लीपति भीमातीरी - दिल्लीपतीच्या कन्येचे लावण्य - कब्जी - दिल्लीपतीचे मन संभाजीविषयी दूषित करतो - संभाजीच्या सौंदर्याचे वर्णन - औरंगजेबाच्या कन्येचे संभाजीवर प्रेम - संभाजी व औरंगजेब यांची भेट - संभाजी कारागृही - संभाजीचा मृत्यु - औरंगजेबाची कन्या त्यामुळे शोक करते - औरंगजेब शाहूस घेऊन जातो.

चमत्कार ७ - शाहूजन्म - बादशहा व त्याची कन्या - यांना शाहूची क्रीडा पाहून आनंद - औरंगजेब दक्षिणेत शहरे वेढतो व मूर्ति फोडतो - पंढरीस येतो - विठ्ठलाचा कर कटीवर व शिरी लिंग असण्याची कारणे - नरसोबाचे वाडीस जातो - भृंगे - राजारामाचा पुत्र - शिवाजी व शाहूचे लग्न - अठरा वर्षे दिल्लीस वास - बादशहा स्त्रीसह दर्शनास बोलावितो - दासीस राणीचा वेष - बादशहाचे दर्शन - बादशहा चौथा हिस्सा आपल्या राज्याचा देतो - देशी जाण्याची आज्ञा मिळते - बादशहाच्या कन्येचा निरोप - ताराबाई हा खरा शाहू नव्हे असे म्हणते - ती युध्दास प्रवृत्त होते - बाळाजी विश्वनाथ शाहूस भेटतो - तो ताराबाईकडे जातो - शके १६२९ मध्ये शाहूस राज्याभिषेक.

चमत्कार ८ - शाहूच्या राज्याची भरभराट - बहिरोपंत पिंगळे - बाळाजी विश्वनाथ पिंगळे - बाळाजी विश्वनाथ रजपूत व यवन यांस जिंकतो - त्यास पेशवे पद मिळते - प्रधानमंडळ - शाहूची मृगया - दातृत्व - दहीभाकर देणारी बाई - तिला गांव इनाम - जयसिंह.

चमत्कार ९ - कोकणस्थ ब्राह्मणांचे दारिद्र्य - बाळाजी विश्वनाथाचे दोन पुत्र - बाळाजी विश्वनाथाचा मृत्यु - बाजीराव बल्लाळ पेशवा होतो - त्रिंबकराव दाभाडे सेनापती यांस बाजीराव ठार मारतो - गोदास्तुती - बाजीराव दक्षिणा घेतो - बाजीराव पंडित - साता-यास बाजीराव परत येतो - शाहू व बाजीराव - निजाम उल् मुल्क व बाजीराव यांचा बिघाड - सख्य - शाहू व बाजीराव

चमत्कार १० - पुण्याची वसाहत व भरभराट - ब्राह्मणांच्या दक्षिणेचा इतिहास - रमणा दक्षिणा समारंभ वर्णन - शाहूस अति संतोष - चिमाजी आप्पा वसईवर येतो - समुद्र स्तुति- वसई सर करतो - संतती - मस्तानी - समशेर बहादूर होळकरांसह उत्तरेस बाजीराव जातो - त्याचा नर्मदातीरी मृत्यु - राणोजी शिंदे व त्याचा वंश याचे वर्णन.

चमत्कार ११ - बाळाजी बाजीराव प्रधान - त्याजवर राज्यभार - पुण्याचे वर्णन, देशाची भरभराट - शाहूचे वार्धक्य - पेशव्यांचे हाती राज्यनिक्षेप - माहुली - कृष्णास्तुती - मृत्यु - शोक - उत्तरकार्य - शाहूचे वंशज.

उत्तरार्धम्

चमत्कार १२ - बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब - मंगलाचरण - राघोबादादाकृत उत्तर दिग्विजय - ऋतुवर्णन - उपवन क्रीडा वर्णन - जलक्रीडा वर्णन.

चमत्कार १३ - नानासाहेब - वर्षाऋतुवर्णन - शरदऋतुवर्णन - राघोबा दादाकृत उत्तर दिग्विजय - जयपूर - जोधपूर - दिल्ली विजय - यवन विजय - बल्लाळ संतती वर्णन - राघोबा संतती वर्णन - सदाशिवराव भाऊंची अनपत्यता - द्रव्याखिंडीदान - ब्राह्मणभञ्जन.

चमत्कार १४ - नानासाहेब - गोपिकाबाई - नानासाहेबांचे मन दूषित करते - सोनपत पानपत युध्द - नानासाहेब व गोपिकाबाई यांचा शोक -

चमत्कार १५ - थोरले माधवराव - कलितऐश्वर्या - कलिधर्म वर्णन - कलिस वर प्राप्ती - निजाम पुणे जाळतो - राक्षसभुवनची लढाई - हैदरचा पराभव - क्षयरोगाने माधवरावाचे निधन - रमाबाईचे सहगमन.

चमत्कार १६ - नारायणराव - पूर्वजन्मकृत वध.

चमत्कार १७ - सवाई माधवराव - जन्म - तळेगावची लढाई - विष्टूर (स्टयुअर्ट साहेब) यांचे पलायन - राजनीति - यशोदेशी विवाह - पुणे शहराचे वर्णन - हरिपंत फडके यांचे मरण - महादजी शिंद्यांचे मरण - निजाम युध्दाची त्यारी करतो.

चमत्कार १८ - सवाई माधवराव - खर्ड्याची लढाई - निजामाचा पराभव - निजामाची दुर्दशा - मशीरग्रहण - माधवराव गच्चीवरून उडी टाकतात - मृत्यु - नाना फडणवीसाचा मृत्यु - दौलतराव शिंद्यांचे वर्णन.

चमत्कार - १९ - अमृतराव यांची कारकीर्द.

चमत्कार २० - द्वितीय बाजीराव - स्तुती निंदात्मक वर्णन - इंग्रज लोक - चाकरीस ठेवले. सदाशिव माणकेश्वर दिवाण झाले - तीर्थाटण

सदाशिव माणकेश्वर व कवि यांची भेट - शिवाजी आदिकरून मराठे राजांवर संस्कृत काव्य करण्याविषयी सदाशिव माणकेश्वर कवीस सांगतात - कवीस स्वप्नात व्यासदर्शन व काव्य करण्याविषयी व्यासांची आज्ञा - बापू गोखले सेनापति झाले - मोरोबा दीक्षित दिवाण झाले - इंग्रजांबरोबर लढाई - (खडकीची) - बाजीरावचा पराभव - दीक्षित दिवाण यांचे मरण - बाजीरावाचे पलायन - बापू गोखले यांचे मरण - बाजीरावाचें भागीरथी तीरी (ब्रह्मावर्ती) राहणे - अल्पिफ्टनसाहेब पुण्यास राज्य करू लागतो - कविपूर्वज वर्णन - काव्यसमाप्ति काल.

अशा रितीने या काव्यामध्ये शिवाजीपासून ते दुसऱ्या बाजीरावापर्यन्तचा इतिहास संस्कृत पद्यरचना करून वीस चमत्कारांत पुरूषोत्तम कवीने वर्णिला आहे. क्वचित ठिकाणी कवीच्या हातून ऐतिहासिक गोष्टींच्या संबंधाने प्रमादही झाले आहेत. शिवाजी महाराजांनी सातारा शहर आपली राजधानी केली. वारणेच्या उत्तरेचा मुलुख संभाजीस दिला व दक्षिणेचा राजारामास दिला वगैरे गोष्टी प्रमादांची ठळक उदाहरणे आहेत. प्रत्येक कारकीर्दित घडलेल्या मुख्य मुख्य गोष्टींचे विवेचन केले आहे. कालाचा उल्लेख बऱ्याच ठिकाणी केलेला नाही. ऋतुवर्णन, वनक्रीडा , जलक्रीडा इत्यादी विषयही प्राचीन काव्यपध्दतीस अनुसरून कवीने यांत वर्णिले आहेत. शिवाय नारायणरावांच्या पूर्वजन्माचे वृत्त व आपला धर्म चालत नाही म्हणून कलीने केलेली तपश्चर्या अशा काही कल्पित गोष्टींही कवीने यामध्ये वर्णिलेल्या आहेत. हे ऐतिहासिक काव्य संस्कृतज्ञ पंडितांस प्रिय होण्यासारखे आहे. माझा विषय केवळ छ. शिवाजी महाराजांशी संबंधित असल्यामुळे मी या ठिकाणी फक्त पहिल्या पांच चमत्कारांचाच विचार करणार आहे.

मंगलाचरणामध्ये विष्णूची स्तुती केली आहे. नंतर शंकराची स्तुती केलेली आहे. त्यापुढे काव्यमाहात्म्याचे वर्णन केलेले आहे. नंतर केलेल्या

शिवाजीच्या वर्णनात शिवाजीची सर्व गुणवैशिष्ट्ये आलेली आहेत. जेंव्हा सर्व पृथ्वी यवनांनी पादाक्रांत केली, तेंव्हा धर्माचे आचरण करणारा व भूमी आपल्या बाहूंवर धारण करणारा शिवभूप जन्माला आला. लोकांचा ताप हरण करणारा, स्वतःच्या धर्माचे आचरण करणारा व स्वधर्माचा प्रवर्तक, शरणागतांचा व दीनांचा पालक, कलियुगातील दुःखाचा नाशक, मौल्यवान हत्तींना जिंकून घेणारा, मनुने सांगितलेल्या राजधर्माच्या मार्गावरून जाणारा, ब्राह्मणांचे पादपूजन करणारा, प्राप्त झालेल्या लक्ष्मीचे पूजन करणारा, दुसऱ्या स्त्रियांना मातेसमान मानणारा, स्वतःच्या स्त्रियांना शिव ज्याप्रमाणे अंबिकेला आपल्या अर्ध्या देहात समाविष्ट करतो त्याप्रमाणे एकरूप करणारा, इच्छेप्रमाणे धन प्राप्त करणारा, आपल्या पुण्याने भूमीला सुवर्णमय करणारा, इंद्रियांच्याद्वारे धन व ज्ञान प्राप्त करून घेणारा, ब्रह्मज्ञान संपन्न, प्रजेला पुत्रा-प्रमाणे वागविणारा, मनुच्या वाक्यांना अनुसरून अपराध्यांना मग ते आप्त-स्वकीय असले तरी शासन करणारा, बृहस्पतीप्रमाणे विचक्षण, कुबेराप्रमाणे धन देणारा व ते आपल्या खड्.गाच्या ताब्यात ठेवणारा, हनुमानाप्रमाणे भीमशक्ती शरीरात ठेवणारा, युधिष्ठिराप्रमाणे ज्याच्या ठिकाणी कृत, त्रेता व द्वापार या तीन युगांचा समन्वय झालेला, ब्राह्मणांच्या इच्छा पूर्ण करणारा वगैरे अनेक विशेषणे कवीने छत्रपतींना लावलेली आहेत.

पुरूषोत्तम कवींनी आपल्या संस्कृतमधील शिवकाव्याचे पूर्वार्ध व उत्तरार्ध असे दोन विभाग करून त्यात अनुक्रमे ११ व ९ असे एकूण २० पोट विभाग म्हणजे अध्याय केले आहेत. पण ह्या पोट विभागांना अध्याय, सर्ग, तरंग, स्तबक, उल्हास, शाखा, प्रसंग इ. पैकी सामान्यतः परिचित अशी एखादी संज्ञा न योजतां `चमत्कार` असे नांव दिले आहे. संस्कृत वाड्.मयात हे अपरिचित्व आहे. मराठी साम्राज्याच्या पावणे दोनशे वर्षांचा म्हणजे त्यातील बारा राजकारकीर्दिंचा कथाभाग कवीला सांगावयाचा आहे. त्यापैकी

पूर्वार्धाच्या अकरा चमत्कारांत शिवाजी, संभाजी, शाहू, बाळाजी विश्वनाथ, थोरले बाजीराव, बाळाजी बाजीराव अशा चार-साडे चार कारकिर्दी सांगितल्या असून, उत्तरार्धातल्या नऊ चमत्कारांत बाळाजी बाजीराव, थोरले माधवराव, नारायणराव, सवाई माधवराव, अमृतराव आणि शेवटचे बाजीराव अशा सहाज राजवटींचे वर्णन आले आहे. म्हणजे छ. राजाराम व ताराबाई ह्यांच्या कारकिर्दींचा ओझरता उल्लेख केला असून दहा कारकीर्द आपल्या काव्यांत घेतल्या आहेत. त्यातल्या पहिल्या पांच चमत्कारांत श्रीशिवराजाचीच कथा कवींनी गायिली आहे. यावरून व आद्य संस्थापक ह्या नात्याने एकंदर काव्याला ' शिवकाव्य ' हे नांव कवीने दिले व ते योग्यच आहे.

समाप्तिदर्शक वाक्यांत " इति श्री शिवकाव्य व्याख्यायां स्वकृतायां काव्यप्रकाशितायां प्रथमश्चमत्कारः । " अशाप्रकारे ' शिवकाव्य ' म्हणून ग्रंथनामाचा स्पष्ट निर्देश केला आहे. ' शिवकाव्य ' असे नाव या काव्याचे असले तरी या काव्याच्या ज्या निरनिराळ्या प्रती प्रकाशकांना मिळाल्या होत्या, त्यामध्ये ' कलि-विलास ' हेही काव्याचे एक नांव असल्याचे व तीन चार चमत्कारांच्या शेवटी पाठभेद म्हणून आलेल्या उल्लेखांवरून दिसून येते. आणि ते एका अर्थी उचितही वाटते कारण सर्व काव्यभर बहुतेक सर्व हालचालींच्या बुडाशी ' कलीचा संचार,' ' कलि-प्रेरणा,' ' कलिला वाटले म्हणून असे झाले ' हेच जेथे तेथे सांगितले आहे. राज्याभिषेकापासून ते राज्यनाश होईपर्यन्त हे सर्व ' कलिविलास ' होत असे कवीचे मत आहे. अर्थात त्यामुळे ' कलिविलास ' हे काव्याचे नाव संयुक्तिक ठरते व काव्याच्या पोट विभागांना चमत्कार असे नांव का दिले ते ही लक्षांत येते. कलीच्या विलासाचे अथवा लीलेचे वर्णन चमत्काराशिवाय अन्य कोणत्या शब्दाने करणार ? त्यामुळे चमत्कार या नांवाचा ही उलगडा होतो.

शिवकाव्य रचनेचा काल इ.स. १८२१ किंवा २६ हा येतो आणि प्रस्तुतच्या ह्या काव्यामध्यें " नवयिसप्तैकमिते (१७४९) स शाके हूणाधिपो लिपष्टननामधेय: । पुण्याभिधानी द्विजराजधानीमध्यास्य भूमिं निखिलां शशास । " तरी काव्याला ' शिवकाव्य ' असे नांव देऊन एका अर्थी शिवराज्य गेले असे सुचविले आहे. शिवाजी, बाजी इ. राज्यकर्त्यांनी जे राज्य मुसलमानांच्या हातून सोडविले, ते स्वराज्य म्हणून उपभोगले ते पुन्हा इंग्रजांच्या हाती गेले व कलीमुळे झाले, असे स्पष्ट सांगितले आहे.

यवनपादिहृतां सकलां महीं शिवनृपप्रमुखै: पुनरेवताम् ।
यवनपेष्णु निधाय कलि: कृती समभवत् कृतकृत्यमना: ।।
चमत्कार - १० ।। ४९ ।।

शिवकाव्य हे एका विवक्षित धाटणीने लिहिले आहे. त्यादृष्टीने पाहता उद्भव, उत्कर्ष व उच्छेद म्हणजे उत्पत्ति - स्थिति - लय - कर्ते जे ब्रह्मा, विष्णु, महेश यांचे अंश जे महाराष्ट्र चालक त्यापैकी रुद्रांशांपासूनचा तो उत्तरार्ध, ती ह्या शिवराज्याची उतरती कळा, असे म्हणता येईल.

" ब्रह्मांशप्रभवास्त्रय: शिवमुखा: विष्णवंशभूतास्ततो
बालाजि प्रमुखाश्च सदा जनसुखा: यावत्क्रमोपोत्तमौ ।
रुद्रांशप्रभवावतो गुणगणानेणालं वर्ण्य
स्यात् पापस्य लयस्तथापि पठत: श्रोतुश्च नित्यं तथा ।। ३० ।। "

अफझलखानाच्या स्वारीत शिवाजी राजांनी खानाचे कपट खानावरच उलटवून त्याचा वध केल्यानंतर मराठ्यांनी खानाच्या सैन्याच्या केलेल्या लुटीचे वर्णन चमत्कार ३ मध्यें आलेले आहे. त्यामध्ये शिवाजी सैन्य व अफझल सैन्य यांच्यामध्यें आलेले युद्धवर्णन -

" नृपस्य वीरैर्बहुधा विशीर्णा विद्रुतास्ते यवना: प्रभीता: ।
नृणां दधु: केचन वनमध्ये भटा: प्राणेमुश्च तथैव केचित् ॥ ३८ ॥ "

अफझलखानाचे कपट सांगताना -

" आलिंगनक्षणा यथं मृगराड्विनं
धृत्वा नृपस्य स: शिर: प्रविधाय बाह्वो:
तस्थौ नृपोऽपि बलवान्नखतोऽस्य कुक्षी
शक्त्या बिभेद विशिखो यवनो पपात ॥ ५५ ॥ "

चमत्कार-२

चमत्कार ११ मध्ये बाळाजी बाजीरावाच्या सुखस्वास्थ्य वैभवयुक्त राज्यकारभाराच्या वर्णनात त्याचा वसंतविहार वर्णन केला आहे. पुढे १०-१५ पद्यांमध्ये फुलझाडे व फळझाडे यांचे उपवन वर्णन आले आहे. त्यानंतर उपवन विहार वर्णन केला आहे.

जयसिंह जेव्हा प्रचंड सेनेसह व दिलेरखानासह शिवाजीला जिंकण्यासाठी उत्तरेकडून दक्षिणेकडे निघाला, तेव्हा वाटेत त्याने देवी भवानीची पत्करलेल्या कामांत यश यावे, म्हणून अनुष्ठाने, यज्ञ इ. धर्मकृत्ये करून प्रार्थना केली, त्यामुळे देवीने प्रसन्न होऊन तुझे मनोरथ पूर्ण होतील, असा वर दिला, त्या प्रसंगी देवी म्हणाते, " हे वीर, ते मनसि यत्सकलं भवेत्तत् " ॥ ३६ ॥ (चमत्कार ५).

चमत्कार ३ श्लोक ३१ मध्ये नेताजीचे नधु हे नामांतर किंवा संस्कृतीकरण चिंत्य वाटते.

पुरूषोत्तमाने आपल्या काव्यात कोंकणस्थ म्हणजे कोंकणातून आलेले असे स्पष्टीकरण केले आहे. (चमत्कार १, श्लोक ३)

हा कवि वत्सगोत्री व माध्यंदिनशाखाध्यायी असून त्याचे उपनाव ब्देदीष्टि असे होते. अहमदनगर जिल्ह्यातील ` पेडगांव ` या गांवी त्याचा जन्म, माधवराव बल्लाळाच्या कारकीर्दित, शके १६८८ (इ.स. १७६६) मध्ये झाला. नंतर सातारा प्रांतातील इस्लामपूर गांवी त्याने १२ वार्षापर्यन्त वेदशास्त्राध्ययन केले. नंतर वयाच्या १९ व्या वर्षी सातारा दरबारात पुराण सांगून वाहवा मिळविली व त्याला दरमहा ५० रूपयांची नेमणूक झाली होती. पुढे पेडगांवास येऊन त्याने लग्न केले व तेथे तो काही वर्षे राहत होता. तो नंतर सुप्रसिध्द रणभूमि ` खरडे ` या गांवी १२ वर्षे राहिला. असे त्याच्या काव्यातील एका उल्लेखावरून दिसते. तो व्याकरण, न्याय, मीमांसा, ज्योतिष, धर्मशास्त्र इ. विषयात निष्णात असल्यामुळे त्याचा प्रवेश तत्कालीन दरबारांतील विद्वत्सभेत होण्यास अडचण पडली नाही. धाकट्या बाजीरावाच्यावेळी सदाशिव माणकेश्वर हा अधिकारावर असता पुरूषोत्तम कवि पेडगांव येथे त्याच्या भेटीस गेला. तेंव्हा सदाशिवाने दिलेल्या समस्येची पूर्ती पुरूषोत्तमाने केल्यामुळे त्याला आश्रय मिळाला. पुढे त्यांची विद्वत्ता पाहून सदाशिवाने शिवाजीपासून मराठी राजांचे ऐतिहासिक काव्य रचण्यास त्यास सांगितले. त्यावरून हे काव्य लिहिण्यात आले. सदाशिव माणकेश्वराची आज्ञा ऐकून " अशाप्रकारच्या ग्रंथांत देवादिकांची स्तुती न येता नरस्तुती येईल, यामुळे माझा उपहास होईल यासाठी काय करावे ? या विचारात मी असता स्वप्नात मला व्यासाने दर्शन देऊन शिवाजीपासून हूणापर्यन्तच्या राजांचे वर्णन कर म्हणजे त्या योगाने तुझे व हा ग्रंथ ऐकणा-यांचे पाप नाहीसे होईल असे सांगितले " इ. पुरवणी ग्रंथकाराने आपल्या ग्रंथलेखनाच्या समर्थनार्थ जोडलेली आहे. सदाशिव माणकेश्वराने या कवीला हे काम सांगितले तेंव्हा

धाकट्या बाजीरावाची कारकिर्द चालू होती. त्या अर्थी ` शिवाजीपासून बाजीरावापर्यन्त इतिहास लिही. इतके पनार तर त्यास व्यास त्याच्या स्वप्नात सांगू शकेल. पण ` शिवमुखान् हूणान्तिमान् वर्णय ` असे व्यासाने सांगितल्याचे कवि वर्णन करतो, त्याअर्थी हा श्लोक रचला, तेंव्हा इंग्रजी राज्य सुरू झाले असले पाहिजे असे अनुमान करावे लागते. कवीने आपला ग्रंथ शके १७४३ मध्ये पेशवाई गेल्यानंतर ४ वर्षांनी पुणे येथे पुरा झाल्याचे सांगितले आहे हे लक्षांत घेतले असता व्यासांच्या दृष्टांताची संगती लागते.

यानंतर पाच वर्षांनी यावरील स्वकृत टीका पुरुषोत्तमाने दौलतरावाच्या राजधानीत म्हणजे लष्कर-ग्वाल्हेर येथे पुरी केली. हा शिव-काव्य ग्रंथ कवीने साताऱ्याच्या राजाकडे नेला होता तेव्हा राजा संतुष्ट होऊन त्यास जहांगीर देत होता. परंतु कवीने ती स्वीकारली नाही. तेंव्हा राजाने शेला पागोटे इ. पांचशे रूपयांचा विषय देऊन त्याची संभावना केली. पुण्यास त्याला रु. ५०-०० दक्षिणा मिळत असे. त्याने गंगालहरी, सीताश्री, सागर व आंबा यांचा कल्पित कलह इ. आणखी ग्रंथ लिहिले होते. आणि त्याने उत्तरवयात संन्यास ग्रहण करून वयाच्या ९० व्या वर्षी (इ.स. १८५६ मध्ये) देह ठेवला. ही माहिती काव्येतिहास संग्रहाच्या संपादकांनी दिली आहे. ती विश्वसनीय दिसते. अशाप्रकारे थोरल्या माधवरावांपासून इंग्रजी राज्य सुरू होईपर्यन्तचे मराठ्यांचे राज्य ज्याने प्रत्यक्ष पाहिले त्याचा हा ग्रंथ. या दृष्टीने त्यात बराच विश्वसनीय इतिहास सांपडेल असे कोणासही सकृद्दर्शनी वाटण्याचा संभव आहे. पण हा ग्रंथ प्रत्यक्ष वाचून पाहता अशी फारशी माहिती त्यांत आढळत नाही. आणि विचाराअंती असे असणे स्वाभाविक दिसते. कारण या कवीचे समकालीन व आजच्या लोकांच्या आदरास पात्र झालेले इतिहासकार म्हणजे मल्हार रामराव चिटणीस व ग्रँडफ, ह्यांच्याही ग्रंथाबद्दल आपणास असेच म्हणावे लागते की, ` त्यांनी दिलेली

ऐतिहासिक माहिती फार त्रोटक आहे व जी आहे तिच्यात दंतकथेचा भरणा अधिक असून विश्वसनीयतेचा अंश कमी. * त्यातून चिटणीस व ग्रँडफ यांना शिवाजीपासून मराठी कागदपत्र पाहण्यास मिळण्याजोगे होते. तसा प्रकार पुरुषोत्तम कवीचा नव्हता.

खुद्द बाजीरावाच्या पदरी परंपरा जाणणारी माणसे फारशी नव्हती. आणि बाजीरावाचे व सातारा दरबारचे आणि जुन्या परंपरेच्या घराण्याचे वाकडे होते. यामुळे पुरुषोतम कविला मागील माहिती मिळण्यास अडचण होती. शिवाय ऐतिहासिक वृत्तांताचे सांगोपांग वर्णन व पौर्वापर्य इ. गोष्टी बिनचूक देण्यासाठी झटणे हे इतिहास लेखकाचे आद्य कर्तव्य आहे. अशी जी आज सर्वमान्य कल्पना आहे. तिच्या उलट प्रकार सव्वाशे वर्षा-पूर्वी होता. याचा अर्थ सव्वाशे वर्षापूर्वीचे लेखक ऐतिहासिक काव्यात केवळ काल्पनिक गोष्टी लिहीत, असा नाही. तेही काही गोष्टी निश्चित करण्यासाठी खटपट करीत होतेच. पुरुषोत्तम कवीने शिवाजीच्या, नाना-साहेबांच्या व नारायणरावांच्या मृत्युतिथी बरोबर दिल्या आहेत व प्रत्येक कारकिर्दीतल्या एक-दोन ठळक गोष्टी बिनचूक सांगितल्या आहेत. यावरून माहिती मिळविण्यासाठी जुनी टिपणे पाहणे व वृध्दांच्या तोंडून दंतकथा ऐकणे हे उपाय योजले असले पाहिजेत. पण यासाठी फार थोडा वेळ घालविला असला पाहिजे असे त्याच्या ग्रंथावरून दिसते.

बारीक घडामोडी व पौर्वापर्य यापेक्षा आपला ग्रंथ काव्य या दृष्टीने कसा चांगला ठरेल याची चिंता त्याला अधिक वाटत होती. कालिदासाने रघुवंशात ज्याप्रमाणे एका राजाच्या कारकिर्दीतला एखादा प्रसंग निवडून त्याचे ठासावदार वर्णन केले आहे. त्याचप्रमाणे पुरुषोत्तम कवीनेही केले आहे. उदा. शिवाजी चरित्रातले अफझल, शास्ताखान व जयसिंह आणि मुरार प्रभु हे चार प्रसंग मुख्यत: सांगितले आहेत. पुढे कवजीच्या खटपटीने दिल्लीपतीची कन्या व

संभाजी यांची भेट व त्यांचे परस्परावरील प्रेम यांचे वर्णन आहे. आणि नंतर त्रिंबकराव दाभाडयांशी बाजीरावाचे युध्द, चिमाजीचा वसई संग्राम, पानिपतचे युध्द, राक्षसभुवनाची लढाई व तळेगावचा व खर्डे येथील संग्राम व या ऐतिहासिक भागांचे काही वर्णन ग्रंथात आहे. पण या ऐतिहासिक भागाला समुद्रस्तुति, कृष्णास्तुति, ऋतुवर्णन, जलक्रीडा वर्णन इ. प्रकार काव्यांत असले पाहिजेत म्हणून मुद्दाम जोडलेले दिसतात. ऐतिहासिकदृष्टया त्यांना कांहीच महत्व नाही, पण घडामोडींचा कार्यकारणभाव जोडताना ज्या कल्पना ग्रंथकाराने लिहिल्या, त्या मात्र रावबाजीच्या अखेरीस लोकांच्या मनांत घोळत असलेल्या विचारसरणीचा भाग म्हणून समजण्यास हरकत नाही. शिवाजी हा अवतारी पुरुष होता व त्याने स्थापिलेले राज्य सवाई माधवरावाअखेर चालले होते, ते रावबाजीच्या कारकिर्दीत एकदम नाहीसे झाले. या प्रकारचा उलगडा कोणात्या तरी रितीने करणे पुरुषोत्तम कवी व त्याचे समकालीन लेखक यांना भाग होते.

त्यांनी कलियुगाच्या कल्पनेचा आश्रय करून हा उलगडा केला असे तत्कालीन लेखनावरून म्हणता येते. सवाई माधवरावाच्यावेळी मराठी राज्य चांगले उभे असलेले दिसत असल्यामुळे त्या वेळच्या लेखकाला मराठी राज्याचा चालक हा ईश्वरी अंश अथवा अवतारी पुरुष आहे एवढे म्हणणे पुरेसे वाटले. त्याला कलियुगांत " यवतानेच राज्य शेवटी शिल्लक राहावयाचे " असे भविष्य कोणत्याही पुराणात आढळले नाही. ही गोष्ट राजवाडे खंड ४ मध्ये छापलेल्या साठे बखरीवरून सहज ध्यानांत येण्याजोगी आहे. पण त्यानंतर २५-३० वर्षांनी लिहिणाऱ्या पुरुषोत्तमाला मराठी राज्य संपले ही गोष्ट दृष्टीआड करता येईना. त्यामुळे त्याने " स्वराज्यांत अवतारी पुरुष झाले, तरी त्यांच्या ही वेळी कलीने डोके वर काढण्याचा प्रयत्न केला. " असे गृहीत धरून " ब्राह्मणांचे राज्य १०० वर्षे टिकेल " असे व्यासवचन असल्याचीहि पुरवणी जोडली.

तात्त्विक भूमिका ही प्रत्यक्ष घडामोडींच्या उलगडयासाठी कल्पनेने असावयाची असते हे लक्षात ठेवल्यास व पुरुषोत्तम कवि हा पुराणिक होता, हे लक्षात ठेवल्यास त्याचे म्हणणे समजण्यास अडचण पडत नाही. उदाहरणार्थ ' शिवाजीला भवानीने स्वप्नात येऊन स्वराज्य स्थापण्यास सांगितले व तूं खणशील तेथे तुला द्रव्य मिळेल ' असे अभिवचन दिले. यामुळे शिवाजीला ठिकठिकाणी द्रव्याचे हांडे सांपडले व पुष्कळ द्रव्य खर्चून अनेक गड बांधता आले. पण जलदुर्ग कसा बांधावा याची त्याला चिंता पडली. तेंव्हा समुद्रदेवीने त्याला स्वप्नांत येऊन या कामासाठी योग्य जागा नेमकी दाखविली, तेंव्हा मालवणाचा पाणदुर्ग बांधण्यात आला. अशारितीने राज्याचा जम बसू लागला, तेंव्हा कलिराजाला चिंता पडली की, " कृतयुगात देखील नलादि राजांना मी आपला प्रभाव दाखविला, आणि आता तर कलियुग म्हणजे माझे युग चालले आहे, तेंव्हा यावेळी शिवाजीला जर मी वठणीवर आणले नाही तर माझी अपकिर्ती होईल. "

अशावेळी गागाभट्टाने शिवाजीची मुंज केली व शिवाजीला गायत्री जप करण्याची बुध्दी झाली. अर्थात कलीच्या प्रतापामुळे शिवाजीला ही कल्पना प्रिय वाटली, पण या जपामुळे त्याला भूमिगत द्रव्य दिसणारी जी दृष्टि होती, ती नाहीशी झाली. त्याबरोबर कलीला आपण कृतकृत्य झालो असे वाटले. नंतर जयसिंहाला औरंगजेबाने पाठविले. तेंव्हा त्याला शिवाजीचे बळ भवानीच्या साह्यात आहे हे माहीत होते यामुळे त्याने सहस्त्र जप करून आधी देवीला प्रसन्न करून घेतले व देवीने शिवाजीला सांगितले की, तू जयसिंहाच्या भेटीस जा. पण त्याच्याशी लढू नको. त्यामुळे शिवाजी जयसिंहाशी लढला नाही.

पुढे औरंगजेब दक्षिणेत पंढरपुरास आला, तेंव्हा तेथील देवाच्या डोक्यास केस आहेत अशी खात्री झाल्यावर त्याने त्यास साष्टांग नमस्कार

घालून अलंकार इ. दिले. नंतर नरसोबाच्या वाडीस जाऊन तो मूर्तीची फोडाफोड करणार होता. पण त्या देवळातून विंचू, साप इ. अनेक घातक प्राणी धावून आले, हे पाहून औरंगजेब निघून गेला. बाजीराव बल्लाळाच्या वेळी पुन्हा सर्व बाजूंनी जम बसू लागला व चिमाजीला समुद्राने प्रसन्न होऊन आपण दुभंगून सैन्याला वाट दिली. तेव्हा पुन्हा कलीला चिंता पडली व त्याने मस्तानीला प्रेरणा देऊन बाजीरावाला मोहित केले. तेव्हा यवनी संगामुळे त्याचे संचित तप नाहीसे झाले. नंतर तो लवकरच मरण पावला.

नानासाहेबांच्या वेळीदेखील राज्याची वाढ झाली. तेव्हा कलि-प्रेरित गोपिकाबाईंनी विश्वासरावाला यौवराज्य देण्यात यावे असा आग्रह धरला आणि पानिपतच्या युध्दांत मराठ्यांचाच जय झाला होता. पण पळत सुटलेल्या मुसलमानी सैन्यांतील एका शिपायाला कलीने बुध्दी दिली की, एकवेळ आपण गोळी झाडावी. आणि ती गोळी नेमकी विश्वासरावाला लागली व तो मरून पडला, तेव्हां मराठ्यांच्या सैन्याचा धीर सुटून ते पळू लागले.

पुढे माधवरावाला कलीने क्षयाच्या व्याधीने ग्रासले. नारायणराव हा पूर्वजन्मी सिध्द पुरुष होता. पण त्याच्या हातून ब्रह्महत्या झाली होती. यामुळे त्याचा वध होणे क्रमप्राप्त होते. सवाई माधवरावाच्यावेळी फार चांगला जम बसत चालला, तेव्हा कलीने त्याला गच्चीवरून मुद्दाम ढकलून दिले, अशा रितीने शिवाजीपासून सवाई माधवरावाअखेर कलीचा प्रादुर्भाव अधून-मधून झाल्याचे पुरुषोत्तमाने वर्णन केले आहे.

पण रावबाजीची कारकिर्द त्याने स्वत: पाहिली असल्यामुळे त्यात केवळ कलीचा महिमा सांगून त्याला लावता येईना. बाजीराव कर्मनिष्ठ होता. उदार होता पण त्याचे राज्य गेले, याची उपपत्ति सांगताना पुरुषोत्तम म्हणतो की, त्याच्या अंगी शौर्य नव्हते. आणि इंग्रजांच्या सहाय्याने पेशवाईच्या

पदावर तो आला. तेंव्हा त्याने आपल्या राज्यातील सर्व सरदार सेनापति आपल्या विरुध्द आहेत असे पाहिले आणि त्याने इंग्रज सेनापती नेमला, तो इंग्रज सेनापती बाजीरावाच्याच हुकुमाने बाजीरावाच्या विरुध्द पक्षास असलेल्या सरदारांना मोडून राज्याची व्यवस्था पाहू लागला. त्याचप्रमाणे सदाशिव माणकेश्वर यांजकडे कारभार सोपविण्यात आला, तेंव्हा इंग्रज सेनापती व सदाशिव माणकेश्वर यांच्याकडे सर्व राज्याची व्यवस्था सोपवून बाजीराव चैनीत राहिला. अशारितीने नऊ वर्षे लोटल्यानंतर कलीच्या प्रभावाने बाजीरावाची बुध्दी फिरली, त्याने आपल्या इंग्रजी सेनापतीला काढून ते पद बापू गोखले याला दिले व कारभार सदाशिव माणकेश्वर यांजकडून काढून मोरोबा दीक्षित यांजकडे सोपविला. बापू गोखले याने पूर्वी लढाई पाहिलेली नव्हती, पण पोरांना जशी युध्दाची कथा गोड वाटते. तशी त्याला वाटून तो युध्दाला आनंदाने उत्सुक झाला आणि एकादशीच्या दिवशी हरिचरणाचे स्मरण करून अल्पिष्टनरूपी अग्नीवर उडया घेऊन खाक झाला. बापू मेल्यावर बाजीराव जिवंत होता तरी निर्माल्यवत् झाला व पुढे गंगातीरी राहून देवपूजेत कालक्रमणा करू लागला.

एकंदरीत यवनराजांकडून शिवराजांनी जे राज्य जिंकून घेतले होते ते परत यवनांना अर्पण करून कलिराजा कृतकृत्य झाला. पुरुषोत्तम कवीचा समकालीन सोहनी याने लिहिलेल्या पेशव्यांच्या बखरीतदेखील कलीच्या प्रभावाची उपपत्ति सांगितलेली आहे.

या ग्रंथाचे मराठी भाषांतर कै. वासुदेव भास्कर भावे, माजी हेडमास्तर, हेरले, ता. अळते, सं. कोल्हापूर यांनी इ.स. १९४२ ला लिहून प्रसिध्द केले.

त्यांनी मुळाहून अतिशय सरस अनुवाद केला आहे. वृत्त व अलंकार साधण्याचा प्रयत्न केलेला आहे. मूळातील कांही शृंगारिक श्लोकांचा वगैरे लोप केलेला आहे व काही ठिकाणी भर घालून उत्तम अभिप्राय व्यक्त करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

कवीच्या मृत्यूनंतर पाव शतक लोटल्यानंतर त्याचा लगेच अनुवाद प्रसिध्द झाला हे कवीचे भाग्यच म्हटले पाहिजे.

एकंदरीत ऐतिहासिक दृष्टीने हा ग्रंथ फारसा महत्वाचा नाही. पुराणिकांच्या भाटाने सांगितलेला हा मराठी राज्याचा इतिहास आहे व ऐतिहासिक सत्यापेक्षा काव्य म्हणूनच कवीने ह्याकडे जास्त लक्ष दिले आहे. म्हणून " पुराणिकाच्या भाटाने उत्कृष्ट संस्कृत काव्यात सांगितलेली एक इतिहास कथा " असेच या काव्यग्रंथाचे स्वरूप ठरते. व संस्कृत व मराठी अनुवाद वाचकांची काव्य आस्वादाची इच्छा पूर्ण करण्यास समर्थ आहे. या मराठी काव्याला खूप प्रसिध्दी लाभल्यामुळे याहून जास्त विवेचन या ठिकाणी करीत नाही.

ब) शिवराज-विजयम् :

१९ व्या शतकांतील बाणभट्ट म्हणून आपल्या असाधारण गद्य लेखनशैलीमुळे ख्याति पावलेले महाकवि अम्बिकादत्त व्यास यांनी प्रौढ, प्रगल्भ व ` समासभूयिष्ठ ` गद्य शैलीमध्ये प्रस्तुत गद्य चरित्र लिहिले. त्याचे संशोधन व मुद्रण करण्याचे कार्य पं.श्री. जितेन्द्रियाचार्य यांनी केले. (पहा - संस्कृत साहित्य भांडागार येथे मुद्रित, पृ.सं. ६४०) आजपर्यन्त ` शिवराजविजयम् ` या गद्यकाव्याच्या ६ आवृत्ती प्रसिध्द झाल्या आहेत. पं. अम्बिकादत्त व्यास आपल्या असाधारण पांडित्यपूर्ण प्रतिभेमुळे समकालीन विद्वत्समाजामध्ये भारत-भास्कर, साहित्याचार्य, व्यास इ. उपाधींनी प्रसिध्दी पावलेले होते. संस्कृत

गद्य कवी दंडी, सुबन्धु, बाण इ. विश्वविख्यात पंडित कवीनंतर बोटांवर गणना करता येण्याजोग्या विद्वान रत्नांमध्ये म.म. पंडित श्री. अंबिकादत्तजी व्यास परम विख्यात लेखक मानले जातात यांचे आजोबा जरी राजस्थानी होते, तरी श्रध्दातिरेकामुळे ते काशीला जाऊन स्थायिक झाले होते. व्यासजींचा जन्म जयपुरममध्ये इ.स. १८५९ मध्ये चैत्र शुक्ल ८ ला झाला. परंतु त्याचे अध्ययन काशीमध्येच झाले.

व्यासजी संस्कृतच्या गहन अभ्यासाप्रमाणे हिंदीचेसुध्दा प्रकांड पंडित होते. हिंदीमध्ये लिहिलेले यांचे अनेक गद्यग्रंथ आहेत. हिंदी गद्य शैलीच्या विकासामध्येसुध्दा व्यासजींनी स्पृहणीय कार्य केले. ` गद्यकाव्यमीमांसा ` या ग्रंथाचे लेखक हेच होते. पद्य लेखनामध्ये सुध्दा व्यासजी सिध्दहस्त होते. रोला छंदामध्ये लिहिलेले ` विहारी विहार ` यांच्या कीर्तिमध्ये भर घालणारेच आहे. व्यासजींनी हिंदी व संस्कृत मिळून ७८ पुस्तके लिहिलेली आहेत.

श्री. अम्बिकादत्त व्यास स्वामी दयानंद सरस्वती आणि भारतेन्दु हरिश्चन्द्र यांच्या समकालीन होते, हिंदी संस्कृतप्रमाणे बंगाली भाषेवर पण त्यांचे पूर्ण प्रभुत्व होते. २४ मिनिटांत १०० श्लोक रचण्याची त्यांच्यात अद्भुत क्षमता होती. यामुळे ` घटिकाशतक ` आणि ` सुकवि ` या पदवींनी ते सन्मानित झाले होते. अयोध्या नरेशांनी त्यांनी ` शतावधान ` या पदवीसह सन्मानपत्र आणि सुवर्णपदक भेट देऊन आपले आपणालाच सौभाग्यशाली समजले होते. व्यासजींचे कार्यक्षेत्र अधिकतर बिहार प्रदेश होता. मधुबनी, मुजफ्फरपूर, भागलपूर इ. शाळांमध्ये त्यांनी ` मुख्याध्यापक ` या पदावर त्यांनी कार्य केले होते. इ.स. १९०१ मध्ये त्याचा मृत्यू झाला. त्यावेळी त्यांचे वय केवळ बेचाळीस वर्षांचे होते.

रत्नाष्टकम्, प्रस्तारदीपिका, गणेशशतकम्, शिवविवाहम् ही त्यांची काव्ये व गुप्ताशुध्दि प्रदर्शनम् हे व्याकरणपर पुस्तक प्रसिध्द आहे.

महाकवि व्यासजींनी कादंबरी शैलीमध्ये शिवराज विजयं नावाचे गद्य काव्य लिहिले आहे. ज्यांमध्ये प्रात:स्मरणीय महाराष्ट्र मंडलमणि छ.श्री शिवाजी महाराजांच्या विजयाचे वर्णन केले आहे. यामध्यें कुशल लेखकाने आपल्या अप्रातिम प्रतिभेच्या प्रभावाने इतिहास व कल्पनांचा सुंदर समन्वय करून एक प्रकारची अपूर्व - हृदय - ग्राहिता निर्माण केली आहे.

जेंव्हा वाचक दंडीच्या अश्लीलतेने, सुबन्धुच्या क्लिष्ट कल्पना तसेच श्लेष - जटिलतेने आणि बाणाच्या वर्णन - विशलतेने कंटाळून जातात, तेंव्हा हे काव्य स्वत:च्या सरस सरळ शैलीमुळे कोमल अक्षरांच्या द्वारा अलौकिक लालित्यासह तन्मयता प्रदान करते.

महाकवि बाणानंतर संस्कृत साहित्यातील ही सर्वोत्कृष्ट कादंबरी आहे असे म्हटले जाते. अथपासून इतिपर्यन्त याची कथावस्तु कुतूहलमय तसेच ज्ञानवर्धक आहे. वाचकांची रुचि उत्सुकतेबरोबरच हळूहळू वाढत जाते. यामध्यें वर्णनाची विविधता पाहण्यासारखी आहे. कुठे पर्वतांचे चित्रिकरण केले आहे, तर कुठे वर्षा आणि वनांच्या दृश्यांनी मनाला भुरळ पाडलेली आहे. कुठे मोंगल दरबारांच्या राजेशाही थाटाने आश्चर्यात टाकले आहे, तर कुठे राजमार्गाच्या चित्रांनी आकृष्ट केलेले आहे. तर कुठल्या तरी प्रसंगात श्रावणाच्या झळींनी वाचकांच्या हृदयात आनंदोर्मी निर्माण केल्या आहेत. तर कुठे रण-भेदी झंकारांनी रोमांचित करून टाकले आहे. व्यासजींनी ज्याचे वर्णन करावयाचे ठरविले आहे. त्याला जणू काही मूर्तरूपच देऊन टाकले. कोठे कोठे संवादातसुध्दा इतकी स्वाभाविकता आलेली आहे, की ती अन्यत्र उपलब्ध होत नाही. वर्णनांच्या विशद करण्यातसुध्दा घटनांची तीव्र गतिशीलता आहे, ज्याला वाचताना वाचकांना थकवा येत नाही.

रचनेमध्यें प्रसाद, शैलीमध्ये शालिनता, वर्णामध्ये माधुर्य, पदयोजनेत लालित्य, कल्पनेत सौंदर्य, वर्णनात वैचित्र्य आणि अलंकारात सौकुमार्य इ. हे सर्व या कादंबरीचे सहज गुण आहेत. मानवी - मनोवृतीचे मार्मिक प्रदर्शन करण्यात व्यासजींनी चांगली सफलता प्राप्त झालेली आहे. काही ठिकाणी अंतर्गत द्वंद्वामुळे कादंबरीचे सौंदर्य आणखीनच खुलून दिसते.

या नाटकांत नायकाच्या बाजूने सर्व पात्रांचे चरित्र-चित्रण खूप सुंदर रूपात झाले आहे. सर्व पात्रे सजीव आहेत. वीररसाचे मूर्त) रूप शिवाजी, आदर्श आज्ञापालक, तसेच महासाहसी रघुवीरसिंह व गौरसिंह ही सर्व पात्रे सहृदयांच्या हृदय पटलावर आपली चिरस्मृति कायम कोरतात.

श्रीमद्अम्बिकादत्त व्यास यांच्या ' शिवराजविजयम् ' या संस्कृत गद्य कादंबरीत १२ निश्वास आहेत. सुमारे १०० वर्षांपूर्वीचे हे पुस्तक आहे. कादंबरीप्रमाणे हा ग्रंथ लिहिलेला आहे. ' गद्यं कवीनां निकषं वदन्ति ' असे म्हणतात ते या ठिकाणी योग्यच म्हटलेले आहे.

या प्रसिध्द कादंबरीत पुढील संस्कृतीकृत शब्द उपयोगात आलेले आढळतात.

अफजलखान: - अफजलखान, महामद: - महमूद, गजिनी - गझनी, अवरङ्गजीव: - औरङ्गजेब, मोद्गल - मोगल, शास्तिखान - शाहिस्तेखान, तुरुष्क - तुर्क, गौरण्ड - इंग्रज, पाठीन - पठाण.

श्री अम्बिकादत्त व्यासांच्या वडिलांचे नांव दुर्गादत्त होते. व ते गौड ब्राह्मण होते. संस्कृत-चंद्रिका या मासिकामध्ये त्यांची ही गद्य कादंबरी प्रसिध्द झाली होती. सदर कादंबरीचे कथासार माझ्या पाहण्यात आलेले आहेत. त्याचा परिचय पुढे करून देत आहे.

क) सरल-शिवराज-विजयः

' शिवराज-विजयम् ' हा गद्य कादंबरीचे ' सरल-शिवराज-विजय ' हे सरल कथासार आहे. आणि ते डॅा. नारायणशास्त्री काङ्कर यांनी संकलित केले आहे. ते राष्ट्रीय आयुर्वेद-संस्थानम्-जयपुर या ठिकाणी संस्कृत प्राध्यापक आहेत व त्यांना वैयाकरण-केसरी, विद्यावारिधिः, विद्यालङ्कार इ. पदवींनी गौरविलेले आहे. इ.स. १९७६ ला त्यांनी हे पुस्तक जयपुर येथे प्रकाशित केलेले आहे.

या संकलनाचे वैशिष्टय हे आहे की, कथेचा आवश्यक अंश वगळलेला नाही. आणि अत्यावश्यक वर्णनाचे ओझे वाचकांवर टाकलेले नाही. सरलता संपादन करण्यासाठी बहुधा संधी वगळले आहेत व विस्तार कमी करण्यासाठी आवश्यक तेथे शब्द व वाक्यांमध्ये परिवर्तनही केलेले आहे.

संस्कृतमध्ये अशाप्रकारचे सरल, रोचक तसेच राष्ट्रीय भावनांनी ओतप्रोत भरलेल्या कादंब-यांचा अभावच दिसतो. आजतागायत गद्यकाव्यांमध्ये बहुधा कल्पित कथानकांनाच स्थान दिलेले आहे. परंतु प्रस्तुत पुस्तकाच्या द्वारा वाचकांना केवळ परस्परालापासाठी उपयुक्त व्यावहारिक नूतन शब्द, कोमल कल्पना आणि अभिनव सामग्रीच प्राप्त होते असे नाही तर यामुळे ऐतिहासिक तथ्य असलेल्या घटनांबरोबर राष्ट्र संरक्षणाची नवीन शिकवण पण मिळते. असल्या पुस्तकांची सध्याच्या काळात अत्यंत आवश्यकता आहे. अमृतासारख्या सुंदर रचनेचे हे सार वाचकांचे हृदय उमलून टाकते. त्याचे थोडक्यात सार असे आहे.

सकाळच्या सूर्याला नमस्कार करून गुरूची सेवा करणारा एक ब्राह्मण पर्णकुटीतून बाहेर आला. पहार वेळ झाला, गुरूंची सन्ध्योपासनेचा समय झाला, म्हणून त्याने ' पुष्पाचयन ' करण्यास सुरूवात केली. त्याच्या

पर्णकुटीजवळ पुष्पवाटिका, पूर्वेकडे पवित्र पाण्याचे सरोवर, व दक्षिणेकडे सुंदर पर्वत शिखर आहे. तो फुले गोळा करीत असतानांच त्याचा मित्र त्या ठिकाणी येऊन फुले गोळा करण्यापासून थांबवितो व मी तुझे काम केलेले आहे हे सांगून यवनांच्या त्रासाने रडणारी एक मुलगी पर्वत शिखरावर पाहिल्याचे सांगतो. एवढयात गुहेमध्ये समाधीस्थ असलेले महामुनि समाधीतून जागे होतात व रडणाऱ्या बालिकेची चौकशी करून ' विक्रमाच्या राज्यांत दुराचरण कसे ? ' याविषयी आश्चर्य व्यक्त करतात. तेंव्हा शिष्य त्यांना १७ शतके ओलांडून गेल्याचे सांगतात व भारतवर्षात सध्या निरनिराळ्या क्रमाने पृथ्वीराज वगैरेचे राज्य संपून सांप्रत औरंगजेबाचे राज्य चालू आहे. परंतु अजून दक्षिणेकडे त्याचा पूर्ण अधिकार चालू नाही.

त्याने ' शास्तिखान ' नावाच्या यवनाला दक्षिण दिशेकडे पाठविले आहे व महाराष्ट्रात शिवाने जणूं काय ' शिववीरा ' चा अवतार घेऊन सिंह-दुर्गावर राहण्यास सुरुवात केलेली आहे, असा या कादंबरीचा प्रारंभ आहे. त्यामध्ये अद्भुतता, विशालता व रम्यता निर्माण केली असून वाचकांची उत्सुकता वाढविणारा सुंदर प्रारंभ केलेला आहे.

नंतर शिवाजी महाराज आग्र्याहून सुटका करून घेऊन परत येतात. नंतर सौवर्णी-परिणय महोत्सव होतो. नंतर सभेमध्ये येऊन सेनापति-विजयध्वज महाराष्ट्र राजाला निवेदन करतो की, मथुरेपर्यन्त यवन सेना पराभूत झालेली आहे, व सर्वजण महाराष्ट्रपतीचा जयजयकार करतात. तो जयध्वनि ऐकून वीरेन्द्रसिंहाने पर्णकुटीत पूजलेला योगिराज समाधी घेण्याची तयारी करतो. इंद्रपुराप्रमाणे महाराष्ट्र राज्य पाहून आशिर्वाद देऊन समाधीसाठी गुहेत प्रवेश करतात. अशा रितीने या गद्य कादंबरीचा शेवट केलेला आहे.

सदर कादंबरीचे १२ निश्वास असून ४ निश्वासानंतर पहिला विराम, आठ निश्वासानंतर दुसरा विराम व १२ निश्वासानंतर तृतीय विराम आहे.

अशा या गद्य संस्कृत कादंबरीमध्ये सुंदर शिवचरित्राचे स्मरण केलेले आहे. त्यातील कांही उतारे उदाहरणादाखल देत आहे.

तानरङ्ग.स्तु तैनेव तानपूरिका - हस्तेन - बालकेन अनुगम्यमान: रजत - पर्यङ्क. उपविष्टम् अफजलखानं ददर्श, सादरं दक्षिण - हस्तेन आदर सूचक - सङ्के.तसह - कारेण यथानिर्दिष्ट - स्थानं च अलश्चकार । ततः -

अफजलखान: - किन्देश - वास्तव्य: भवान् ? कथन्चात्र महाराष्ट्र देशे ?

तानरङ्ग. - श्रीमन् । राजपुत्रदेशीय: अस्मि । देशाटन व्यसनं च मां पर्याटयति ।

अफजलखान: - अहो । ततस्तु । बहुज्ञश्च भवान् (क्षणानन्तरम्) मूर्च्छना - प्रधानं गायति भवान् तान - प्रधानं वा ?

तानरङ्ग. - ईदृशं तादृशं च ।

अफजलखान: - अस्तु, आलप्यतां कश्चन राग: ।

ततः तानरङ्ग. तानपूरिकाया: स्वरान् संमेल्य पातित्वाम जानु: तन्न्या तानपूरिकां रणयन् रागमाला - गीतिम् अगायत् । यां श्रुत्वा स - साधुवादं वितीर्ण - कङ्क.णो अफजलखाने तानरङ्ग.: सप्रसादं तस्य गुणग्राहितां प्रशशंस ।

अथ अफजलखान: तम् उवाच - कथ्यताम्, अस्मिन् प्रान्ते भवादृशानां गुण - ग्राहका: के सन्ति ?

तानरङ्ग. अवदत् को नाम अपर: शिववीरात् ? स एव राजनीतौ निष्णात:, चन्द्रहासचालने चतुर:, बाणविद्या - वारिधि:, पुरुष - परीक्षक:, स्वधर्म रक्षण-सक्षम?, धैर्य-धारि-धौरेय:, गुणज्ञ: च वर्तते ।"

अशाप्रकारच्या संवादांतील सौंदर्य वाचकांच्या हृदयाला भिडणारे आहे.

" मास: अयम् आषाढ:, अस्ति च सायं समय:
अस्तं जिगमिषु: भगवान् भास्कर: अरुण-
वारिवाहानाम् अभ्यन्तरं प्रविष्ट: । क्षणेनैव
महान्धतमसं गगनतलं मर्यच्छदीत् । "

" अथ अस्तं गते मरीचि - मालिनि शनै: उदगात् निशानाथ: । समय: अयं शरदन्तस्य । शीतल: समीर: सरति । चिरम् अरुणा सन्ध्या रात्रीभूता । ईदृशे समये तोरण-दुर्ग-समीपे हनुमन्मन्दिरात् पूर्वत: व्यामूढा इव बहु दूरं गता सौवर्णी अकस्मात् शुश्राव हनुमत्स्तोत्र - पाठम् ।। "

अशाप्रमाणे सुंदर निसर्गवर्णने आलेली आहेत. " जात: अयम् अरुणोदय: । समये अस्मिन् शिवालये रघु - मङ्गलाकाङ्क्षिणी सौवर्णी प्रतिदिनम् इव अद्यापि महादेव -मूर्ति सम्पूज्य चिरम् अस्तोष्ट । शिवं ध्यायन्ती निमिलित - चक्षु: एव समपश्यत्, यत् - महादेव: स्वयं प्रकटीभूय रघुवीरं बाहुमूले गृहीत्वा 'एष: ते पति:, गृहाणीष्व ' इति कथयित्वा निलीन: इति । "

असे नजरेसमोर प्रसंग हुबेहूब उभे करणारे सुंदर प्रसंग या कादंबरीत आहे.

ऐतिहासिकदृष्टया ही कादंबरी शिवाजीनंतर जवळजवळ दोन शतकांनी निर्माण झालेली असल्यामुळे ऐकलेल्या व वाचलेल्या कथाभागावर रचलेली आहे. त्यामुळे ऐतिहासिकदृष्टया त्याचे महत्व नाही. पण काव्य-दृष्टया त्याचे महत्व खूप आहे.

संस्कृत गद्य कादंबरी म्हणून वाङ्मय प्रकाराच्यादृष्टीने तिचे महत्व आहेच. पण त्याशिवाय या कादंबरीचे बाह्यांग सजविण्यासाठी अनेक प्रसंग व पात्रे कल्पनेने निर्माण केली असून ती कथानकामध्ये बेमालूम बसविलेली आहेत. भाषा अतिशय मधुर आहे व वाचकांची उत्कंठा शेवटपर्यन्त टिकवून धरलेली आहे. अद्भुत, रम्य व सत्य यांच्या बेमालूम संयोगातून शिवचरित्राच्या ह्या मधुर रसधारा निर्माण झाल्या आहेत व वाचकांचे मधुर रसाने हृदया त्या परिपूर्ण भरून टाकतात.

ड) <u>शिवावतार - प्रबन्धः</u>

वयंकटेश - वामन सोवनी (इ.स. १८८२ ते १९२५) यांनी शिवाजी महाराजांच्या चरित्रावर प्रस्तुत प्रबंध लिहिला आहे. सोवनी हे मेरठ व प्रयोग येथे संस्कृताध्यापक होते. त्यांचे ` इन्द्रद्युम्नाभ्युदयम् ` हे अध्यात्मिक काव्य व दिव्यप्रबन्धः, ईशलहरी, रामचन्द्रोदयम् (सर्ग ४) ही काव्येही प्रसिध्द आहेत.

या प्रबंधाचा उल्लेख अर्वाचीन - संस्कृत - साहित्या या श्री.भा. वर्णेकर यांच्या पुस्तकांत राजपुरुषांची चरित्रे या प्रकरणांत पान क्र. ५१ वर ही माहिती दिलेली आहे.

१९ व्या शतकांतील संस्कृत साहित्यामध्ये आलेल्या शिव चरित्रामध्ये ` पुरुषोत्तमाने ` लिहिलेले ` शिवकाव्य, ` ` श्रीमद्अम्बिकादत्त व्यास ` यांनी

लिहिलेली ` शिवराज विजयम् ` ही संस्कृत गद्य कादंबरी एवढे संस्कृत शिव साहित्य आलेले आहे.

तसेच इ.स. १८२५ मध्यें सदाजीने लिहिलेले छ. शिवाजी विषयी असलेले काव्य त्याच्या साहित्य मंजुषा या ग्रंथांत आले आहे. ते तंजावरच्या हस्तलिखित विभागांमध्ये मी पाहिलेले आहे व ते हस्तलिखित या प्रकरणामध्यें उद्धृत करीत आहे.

त्याचप्रमाणे श्री. सोकनी यांचा ` शिवावतार प्रबंध ` हा प्रबंधही प्रकाशित झालेला आहे.

प्रकरण पांचवे

१० व्या शतकातील संस्कृत साहित्यातील
शिव चरित्र

प्रकरण पांचवे

१० व्या शतकातील संस्कृत साहित्यातील शिव चरित्र

अ) श्रीशिवाजि महाराज चरितम् :

भारतवीर रत्नमालेच्या दुसऱ्या रत्नामध्ये सदर पुस्तक प्रकाशित केले असून लेखक श्रीपादशास्त्री हसूरकर हे आहेत. हे इंदूरचे प्रसिध्द लेखक आहेत. यांनी संस्कृत साहित्याची फार मोठी सेवा केली आहे. पं. श्रीपादशास्त्री हसूरकरांची कांही अमुद्रित पुस्तके, पुढीलप्रमाणे आहेत. श्रीवर्धमानस्वामि-चरितम्, श्रीबुध्ददेवचरितम्, राजस्थान सतीनवरत्नहार, महाराष्ट्रसतीनवरत्नहार, महाराष्ट्र क्षात्रियवीर रत्नमंजूषा, सौराष्ट्रवीररत्नावली, महाराष्ट्रवीर-रत्नमंजूषा, श्रीशङ्कराचार्यचरितम् व विजयानगरसाम्राज्यम्, या चरित्रात्मक साहित्याव्यतिरिक्त मोक्षमंदिरस्य द्वादशदर्शन सोपानवलि या नांवाचा १८७ पृष्ठांचा एक उत्कृष्ट प्रबंध लिहिला असून त्यामध्ये चार्वाक, बौध्द, (वैभाषिक, सौत्रांतिक, योगाचार, माध्यमिक) जैन, नैय्यायिक, वैशेषिक, सांख्य, योग, पूर्वमीमांसा व उत्तरमीमांसा या बारा दर्शनांचा संक्षेपानेच पण सर्वंकषरीतीने परिचय करून दिलेला आहे. भारतीय दर्शनांचा परिचय इतक्या चांगल्यारीतीने करून देणारे दुसरे पुस्तक संस्कृतात नाही. पं. हसूरकरांच्या ' प्रतापसिंहचरितम् ' या पुस्तकावर विश्वकवि रवीन्द्रनाथ टागोर यांनी पुढील अभिप्राय दिला आहे.

" प्राय: संस्कृते गद्यकाव्यानि न सन्ति एव । यानि च सन्ति तानि समासप्रचुराणि दुर्बोधकान्यव्याप्तानि बालानाम् अनुपकारिणी । इदं नूतनं हसूरकरोपाह्व श्रीपादशास्त्रिणा लिखितं श्री महाराणा प्रतापसिंहचरितं तु

पूर्वोक्त - दोषावर्जितं विशेषतो मातृ मू सेवनाय सन्नद्धानां विद्यार्थिनाम् उपयोगि । अत एव मया अस्य पठनाय मदीये शांतिनिकेतन नाम्नि विद्यालये समानीता: शिक्षका: । इच्छामि च पुनरेतादृशानि नूतनानि संस्कृत-पुस्तकानि प्रादुर्भवन्तु इति ।"

कथावस्तु - १) पूर्वप्रसंग, २) कुलवृत्तम, ३) पितृचरितम्, ४) शिव-राज्य जन्म व बाल्य, ५) शिक्षण, ६) स्वराज्य स्थापनेची कारणे, ७) सहायलाभ, ८) स्वराज्यस्थापनारंभ, ९) पितृसंकट निवारण, १०) विजापुरा-धिपतीशी युध्द संग्राम, ११) नौकाबळ व समुद्रस्वामित्व, १२) दिल्लीपतिशी वैर व युध्द, १३) दिल्लीला गमन व कारागृहवास, १४) युक्तीने सुटका व स्वदेशाला गमन, १५) राज्याभिषेक व राज्यव्यवस्था, १६) कर्नाटकावर आक्रमण, १७) सज्जनांचा सहवास, १८) उपसंहार अशा रितीने विषयानुक्रम आलेला आहे.

सर्व भारतवर्षातील यवनांना जिंकून महाराष्ट्र भूमीला सौभाग्य-अलंकार घालणाऱ्या महात्म्या श्री शिवरायाचे पराक्रम माझ्यासारखा नम्र मानव कसा वर्णन करू शकेल ? असे नम्र मनोगत व्यक्त करून शिवाजीच्या गुणसंकीर्तनामुळे भारतीयांच्या मनांत विलीन झालेले संकल्प पुन्हा उत्पन्न व्हावे व त्यांनी त्याचे गुणग्रहण करण्याचा प्रयत्न करावा, अशी विनंती व ग्रंथाचा उद्देश स्पष्ट केलेला आहे. श्री. हसूरकरांनी सांगितलेली शिवाजीची गुणवैशिष्टये पुढीलप्रमाणे :

१) दीनदयालु - स्वकीय व परकीयांचेही रक्षण.
२) परधर्मद्वेषित्वं - स्वत:च्या मंदिराचे व परक्यांच्याही मंदिराचे रक्षण.

३) परांगनासंसर्गपराङ्मुखता - रामाप्रमाणे.
४) मातृभक्ति:
५) गुणग्राहकता
६) निरभिमानित्व
७) कृतज्ञता
८) आस्तिक्य
९) शौर्य.

यवन इतिहासकार शिवाजीवर कृतघ्नता, क्रौर्य, कपट, लुब्धत्व इ. चा आरोप करतात. त्यांना ठेकाने विचारले आहे की, " शिवाजी कृतघ्न तर औरंगजेब कोण ? " " शिवाजी कपटी तर अफझुलखान कोण ? " म्हणजेच हे आरोप पक्षपातीपणाचे आहेत.

प्रस्तुत चरित्राची रचना शिवाजी हा शंकराचा अवतार आहे ही कल्पना रुढ झाल्यानंतर २० व्या शतकांत केली आहे. प्रस्तुत चरित्रांत शिवाजीला आदर्श दाखवून त्याचे गुण वाचकांच्या मनावर बिंबविण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. शिवाजीचे दोष दाखविलेले नाहीत. आख्यायिका व दंतकथांचा समावेश चरित्रांत केला आहे. रामदासांचा केलेला उल्लेख अगदी अलिकडचा काळ दर्शवितो. भाषा अत्यंत सोपी व ओघवती आहे. संस्कृतमधील सोप्या गद्याचा उत्कृष्ट नमुना म्हणजे हे पुस्तक आहे. मुलांवर संस्कार करणारा असा हा उत्कृष्ट गद्यग्रंथ आहे. संस्कृतची आवड निर्माण होईल व मनावर सुसंस्कार होतील हे दोन्हीही उद्देश्य आजकालच्या समयाला उचित असेच आहेत.

शिवाजीचे गुणग्रहण करण्याचा वाचकांनी प्रयत्न करावा, हाच कवीचा प्रमुख उद्देश्य अगदी स्पष्ट दिसतो. ग्रंथाची मांडणी अतिशय सुंदर पद्धतीने केलेली आहे. भारत, महाराष्ट्र व त्यांतील प्रदेश यां विषयी

लेखकाला अभिमान आहे. लेखकाला वैदिक धर्माचाही अभिमान आहे. आग्याहून सुटका करून घेतांना शिवाजीने केलेल्या ' गुरुवासरव्रताचा ' उल्लेख हा नवीनच लेखकाच्या कल्पनाशक्तीतून निर्माण झालेला दिसतो. त्याला कोणताही ऐतिहासिक आधार नाही.

एकंदरीत हे चरित्र मुलांवर संस्कार करण्यासाठी व मुलांना संस्कृत आवड निर्माण करण्यासाठी अत्यंत उपयुक्त आहे.

प्रस्तुत लेखकाने छ. शिवाजी महाराजांना प्रस्तावनेत निखिलभूमंडल विख्यात, परद्रव्यपरकान्ता निस्पृह, सनातनधर्म रक्षाणबद्ध कंकण, स्वमातृभूमिस्वातंत्र्य, पालनाखरदीक्षित, दुर्मदोन्मत्तयवनेद्रिजितानां गर्वा, आर्यसुन्दरीणां शरणस्य, यवनराज्यधूमकेतोः, अपारशौर्याकरस्य, छत्रपतिपदवीभूषणस्य, महाराष्ट्र महिसौभाग्यतिलकस्य, भोसलेकुलसुधांशोः, इ. विशेषणे लावलेली आहेत. त्यातून त्यांच्या मनांतील पराकाष्ठेची भक्ति दिसून येते व १० व्या शतकांत छ. शिवाजी महाराजांना त्यांच्या उज्ज्वल चरित्रामुळे केवढे पूजनीय स्थान प्राप्त झालेले आहे हेही लक्षांत आले.

ब) <u>शिवप्रतापविरुदावली</u> :

प्रस्तुत पुस्तकांत दोन शतक काव्ये श्री. हजारीलाल शास्त्रींनी लिहीली आहेत. ' प्रतापविजय ' नांवाचे पहिले शतक असून यामध्यें प्रतापसिंहाचा गौरव करणारे १०० श्लोक लिहिले आहेत.

' शिवराजविजय ' नावाचे दुसरे शतक असून त्यामध्ये १०० श्लोक लिहिले आहेत. त्याचा सारांश पुढीलप्रमाणे आहे.

ज्या धर्मवीर पुरुषांनी देशासाठी आपले जीवन अर्पण केले, त्यांच्या स्मृतीरुपी पुण्यतीर्थामध्ये विनयपूर्वक ही सुंदर पद्यरुपी पुष्पांजली समर्पित करीत आहे, असे मंगलाचरण करुन काव्यसमर्पण केले आहे.

नंतर परब्रह्माला व गुरुला वंदन केलेले आहे. ज्या भारत भूमीवर वीरपुरुषांमध्यें सिंहरुप महाराजा शिवाजीप्रमाणे आतापर्यन्त कोणीही वीरपुरुष झाला नाही, पुढे होणार नाही, ज्या यशस्वी वीराने आर्यधर्म तसेच आर्य संस्कृतीची प्राण पणाला लावून, रक्षण केले. त्या अद्भुत अमृतमयी वीर-पुरुषाची वीरकथा सर्वांना पवित्र करते. विक्रमीय १७ व्या शताब्दीमध्यें शिवनेरी किल्ल्यांत शिवाजीचा जन्म झाला, तो किल्ला पर्वताप्रमाणे सुदृढ होता. अरणी जसा अग्नि निर्माण करतो, त्याप्रमाणे सुमाता जिजाबाईने देवतुल्य पुत्र शिवाजीला जन्म दिला. श्री शाहजीने पुत्राचा जन्मोत्सव विधिपूर्वक ब्राह्मणांची पूजा करुन विधिपूर्वक केला. ब्राह्मणांना संतुष्ट केले. राणी जिजबाईंनी ब्राह्मणांचा सन्मान केला. शिवादेवीवरुन त्यांचे नांव शिवाजी ठेवले. कारणाचे गुण कार्यात येतात त्याप्रमाणे शिवाजी बालपणीच आई-वडिलांच्या सर्व गुणांना पात्र झाला. शिवाजीच्या पितामह श्री मालूजीने लहानपणी शिवाजीला अश्वचालन कलेत कुशल केले व अस्त्र व शस्त्र चालविण्याच्या कलेत दक्ष केले. राजनीतीत अग्रगण्य केले. वीर, महान योध्दा, महान पुरुषां-मध्ये श्रेष्ठ, राजांमध्यें बलवान, बलवान पुरुषांमध्ये धीर, आर्यवीर, शिवाजी आपल्या कीर्तिने अमर झाला. राजनीति निपुण आर्य वीर शिवाजीने शत्रूंना जिंकून किल्ले मिळविले. औरंगजेब त्यामुळे चिंतातूर झाला.

यवनराजे शिवाजीच्या यशाला सहन करु शकले नाहीत. सूर्योदय झाल्यावर उलूक पक्षी जसा आंधळा होतो, त्याप्रमाणे यवन विकल झाले.

शिवाजीने औरंगजेबाच्या कपटनीतिला दाद दिली नाही. सद्धर्माचा सेतू, नीतिदक्ष, धैर्याचा हिमालय, सत्यचारित्र्य, संस्कृतीचा सुमेरुदंड, विजयी व अमर अशा शिवाजीने औरंगजेबाच्या कुनीतीला छिन्न करून हिंदू संस्कृती व सत्यता यांचे रक्षण केले. त्यामुळे रात्रंदिवस औरंगजेबाला झोप लागली नाही. शिवाजीची अमर कथा अमर झाली. औरंगजेबाने शिवाजीला कपटाने बोलाविले. शिवाजीने त्याच्या वस्तू ठोकरल्या व अपमान केला आणि तो राजभवनातून निघून गेला. औरंगजेबाच्या गुप्तहेरांना मारण्यास तो सांपडला नाही. शिवाजीने दिग्विजय केला. गोवध करणाऱ्यांचा वध केला. दिल्लीश्वर रात्रंदिवस विचार करू लागला.

औरंगजेबाचा परम मित्र अफजलखां विलाप करीत शिवाजीच्या तलवारीला भिऊन औरंगजेबापुढे राजभक्ती दाखविण्यासाठी कपटवेश धारण करून शिवाजीला मारण्यास गेला. शिवाजीने यमाप्रमाणे आलेल्या अफझलखांला पाहिले व वाघनखांनी तयार होऊन भेटण्यास गेला. अफझलखांचा दूत म्हणाला, " अफझलखां संधी करण्याकरितां आला आहे." शिवाजीने अफझलखांला आसन दिले, व अतिथिसत्कार केला. आलिंगन देण्यासाठी अफझलखानाने हात पसरले व तो शिवाजीला मारू लागला, तेंव्हा शिवाजीने त्याला वाघनखांनी फाडले व अफझलखान मेला व औरंगजेब हताश झाला. त्याने शहाजीला कैद केले.

शिवाजी आपल्या पित्याला कैद झाली हे ऐकून औरंगजेबाच्या घरी गेला. औरंगजेबाने दोन शिपायांना त्याला पकडण्यास सांगितले. शिपायांनी त्यास बेड्या घालून कैदेत टाकले व पित्याची सुटका केली. शाहजी घरी गेला. शिवाजीला ते ऐकून कैदेतील दुःख हलके वाटले. शिवाजीला कैद करूनही औरंगजेब भयभीत झाला. शिवाजीने चतुराईने सुटका करून घेतली. मोठमोठे वीर

कपटी वेशाने शिवाजीला शोधू लागले. मागे येणाऱ्या १०० शत्रूंना शिवाजीने ठार केले. तो सिंहाप्रमाणे फिरत होता व शत्रूला भिडत होता. त्याने शत्रूचे किल्ले जिंकले व अपार संपत्ति मिळविली. त्यामुळे शत्रू भयभीत झाले व शत्रूच्या स्त्रिया घाबरल्या. औरंगजेब विलाप करू लागला व त्याने युध्दासाठी शास्ताखानाला पाठविले. शास्ताखानाने वेढा दिला व शिवाजी युध्दासाठी बाहेर आला व त्याने शास्ताखानाचा पराभव केला. शास्ताखानाने शरणागती पत्करल्यावर शिवाजीने त्याला सोडले व दोन राज्यांचा प्रबंध केला. पुणे नगरीत राजधानी वसविली व तो प्रजापालन करू लागला.

भारतभूमी स्वर्गाप्रमाणे झाली व धनधान्यपूर्ण झाली. प्रजा निर्भय झाली. ब्राह्मणांना विशेष अधिकारपद दिले. जिजाबाईने शिवाजीला सांगितले की, " सिंहलदुर्ग जिंकून घे, नाहीतर मी शाप देईन. " शिवाजीने तानाजीला आज्ञा केली व दुर्ग जिंकून गौरवाचे रक्षण करण्यास सांगितले. तानाभटाने प्रतिज्ञा केली की, गड जिंकल्याशिवाय घरी परत येणार नाही व तो युध्दाला गेला. त्याने सैन्याला किल्ल्यावर चढण्याची आज्ञा दिली. कोणालाही किल्ल्यावर चढतां आले नाही, पण तानाजी किल्ल्यावर चढला व त्याने युध्द करून शत्रूंचा पराभव केला. उदयभानु व तानाजीचे युध्द झाले. तानाजीचा मृत्यु झाला व शेलारमामा रागावला व त्याने उदयभानुला मारले. किल्ला जिंकला. सिंह देऊन सिंहल दुर्ग मिळविला. राज्यस्थापना व आर्य संस्कृतीचे रक्षण शिवाजीने केले. सुरत नगरीवर चढाई केली व मोंगलांना मारून संपत्ती मिळविली. दिलेरखां व महाबतखां यांना औरंगजेबाने लढण्यासाठी पाठविले व सालेर किल्ल्यावर युध्द होऊन शिवाजीचा जय झाला. औरंगजेबाला भीति वाटून तो विचार करू लागला. प्रजा निर्भय झाली. तो साक्षात शिवशंकराचा अवतार होता. त्याच्या चरित्राने त्याने राजाना हर्ष निर्माण

केला. सूर्यचंद्र आहेत, तोपर्यन्त त्याची कीर्ति अमर राहील. देशासाठी त्याने जीवन समर्पण केले. त्याचा मोठा मुलगा शंभु व धाकटा राजाराम यांनी पित्याचे कार्य केले व शिवाजीचे चरित्र स्फूर्तिदायक झाले आहे.

अशारितीने १०१ श्लोकांचे हे खंडकाव्य शिवाजीचा गुणगौरव करण्यासाठी रचले आहे. ऐतिहासिकदृष्टीने हे काव्य बरोबर नाही. उदा. मालोजीने शिवाजीला शिकविले, शिवाजीने शहाजीची युध्द करून सुटका केली, अफझलखान हा औरंगजेबाचा दोस्त होता, शास्ताखानाचा युध्द करून शिवाजीने पराभव केला. जिजाबाईने शिवाजीला ' सिंहलदुर्ग घे, नाहीतर शाप देईन ' असे सांगितले. यासारखी अनैतिहासिक विधाने केलेली आहे. कवीने बहुधा हे काव्य ऐकीव माहितीवर रचले असावे असे वाटते.

प्रस्तुत काव्यांत उपमा व उत्प्रेक्षा यांची सुंदर योजना केलेली आहे. काव्याची भाषा ओघवती व सोपी आहे. शिवाजीविषयी अभिमान व भक्ती या काव्यात प्रकट झालेली आहे. शिवाजीचे गुण संकीर्तन व त्या थोर महात्म्याविषयी आदरभाव प्रकट करणे हाच या शतक काव्याचा स्पष्ट उद्देश आहे. अगदी अलीकडेच हे काव्य आहे.

विद्यालंकार श्री. हजारीलाल शास्त्रींनी याशिवाय पंचीकरणम्, कादंबरीशतकम्, षडदर्शन सिध्दान्त प्रक्रिया व अद्वैताब्द, संस्कृतमहाकवि-दिव्योपाख्यानम्, इंदिरा विजयप्रशस्ति शतकम्, वाशिष्ठ धर्मसूत्रम्, हकीकतराय नाटकम्, महर्षि-दयानंद प्रशस्ति शतकम्, सगुण ब्रह्मस्तुति, यजुर्वेदसन्धानम-न्मव्याख्या इ. अनेक पुस्तकेही लिहिलेली आहेत.

क) छत्रपतिसाम्राज्यम् :

'छत्रपतिसाम्राज्यम्' हे ऐतिहासिक नाटक. श्री. मूलशङ्कर माणिकलाल याज्ञिक यांनी लिहिले आहे. श्री. याज्ञिकजींचा जन्म गुजरातमध्ये नडियाद या गांवी ३१ जानेवारी, १८८६ मध्ये झाला. पित्याचे नाव माणिकलाल व आईचे नांव अतिलक्ष्मी होते. प्राथमिक शिक्षण नडियाद गांवी पूर्ण केल्यानंतर ते उच्च शिक्षणासाठी बडोद्याला गेले. बडोदा कॉलेजचे त्यावेळचे प्राचार्य श्री. अरविंद घोष यांच्या सहकार्याने व ते गुरु लाभल्याने ते बी.ए. उत्तीर्ण झाले. कौटुंबिक जबाबदारीमुळे त्यांना मुंबईच्या इंडिया पी. सी. बँकेत सर्वप्रथम नोकरीस प्रारंभ करावा लागला. नंतर इंदौर, भडोच वगैरे निरनिराळ्या ठिकाणी विविध जागांवर काम केल्यानंतर इ.स. १९१४ मध्ये शिनोर येथे शिक्षक म्हणून काम करु लागले. तेथून पुन्हा ३० व्या वर्षी राजकीय संस्कृत कॉलेज, बडोदा येथे महाराज सयाजीराव यांच्या आमंत्रणावरून प्राचार्यपद भूषविले. १६ वर्षांपर्यन्त महाविद्यालयाचे प्राचार्य राहून न्याय व्याकरण, साहित्य वगैरे समग्र शास्त्रांमध्ये जिज्ञासु विद्यार्थ्यांना अमृत-रस-धारावाणीने तृप्त आणि पारंगत केले.

त्यांनी १० वर्षे मेहसाणा येथील टी.जे. हायस्कूलमध्ये साहाय्यक शिक्षक म्हणून काम केले. येथून निवृत्त आयुष्याचे शेवटचे दिवस त्यांनी नडियाद गांवी घालविले. तेथेच १२ नोव्हेंबर, १९६५ रोजी आपल्या पांच मुलींना सोडून ते दिवंगत झाले.

याज्ञिकजींना संस्कृत भाषा व साहित्य यांविषयी विशेष अभिरुची होती. ते अभ्यास व मनन यामुळे अधिकारी विद्वान झाले होते. याच कारणामुळे त्यांच्या विद्वत्तेने आकृष्ट होऊन बडोद्याचे महाराज सयाजीराव यांनी त्यांना प्रसिध्द संस्कृत कॉलेजचे प्राचार्यपद देऊ केले. तसेच वाराणसीच्या विद्वत्समाजाने

त्यांना ` साहित्यमणि ` ही प्रसिध्द उपाधि देऊन विभूषित केले. सरस्वती आणि लक्ष्मी यांच्या जन्मजात विरोधामुळे त्यांना जीवनाच्या शेवटपर्यन्त निर्धनतेशी संघर्ष करावा लागला. तरीदेखील साहित्य रचनेच्या उत्कट ईच्छेने फलस्वरूप त्यांनी संस्कृत साहित्याला, आपल्या रचनांनी समृध्द केले. गुजराथ मधील साहित्य निर्मात्यांची दृष्टी नाटक रचनेकडे गेली नव्हती. याज्ञिकजींनी आपल्या कृतींनी साहित्यिकांना तिकडे आकर्षित केले आणि साहित्य समाजात नवीन परंपरेचा श्रीगणेशा झाला. त्याच्यानंतर दुसरे कांही नाटककार निर्माण झाले.

त्यांच्या संस्कृत साहित्यरचना १) छत्रपतिसाम्राज्यम्, २) संयोगिता स्वयंवरम्, ३) प्रतापविजयम् ह्या आहेत व गुजराती भाषेमध्ये १) हर्ष-दिग्विजयम् (नाटकम्) नैषधचरितम् २) तुलनात्मक धर्मविचार, ४) प्राचीन राज्यतंत्र, ५) सत्यधर्मप्रकाश याशिवाय विष्णुपुराणावर आधारित ` पुराणकथातरंगिणी ` नावाचे कथापुस्तक संस्कृतमध्ये लिहिलेले आहे.

गुजराथीमध्ये ` मेवाड्-प्रतिष्ठा ` नांवाचे पुस्तक लिहिले आहे.

त्यांच्या संस्कृत नाट्यकृती संस्कृत महाविद्यालयाच्या आचार्यत्व काळामध्येच (१९१६ ते १९२३) मध्यें प्रकाशित झाल्या होत्या. क्रमानुसार इ.स. १९१८ मध्ये संयोगितास्वयंवरम्, इ.स. १९१९ मध्यें छत्रपतिसाम्राज्यम् आणि इ.स. १९२१ मध्ये प्रतापविजयम् चे प्रकाशन झाले.

नाटकांचा संक्षिप्त परिचय खालीलप्रमाणे आहे. १) संयोगिता स्वयंवरम् यामध्यें प्रसिध्द हिंदू सम्राट पृथ्वीराज चौहाण व राजकुमारी संयोगितेची प्रणयकथा रंगविलेली आहे.

१) छत्रपति साम्राज्यम् यामध्ये महाराज वीर केसरी छत्रपती शिवाजीचे जीवन व त्यांचे शौर्यपूर्ण कार्य तसेच तत्कालीन यवनसम्राटाच्या दुर्नीतिविरुद्धचा संघर्ष व शेवटी स्वराज्य-स्थापनांच्या घटना एकत्रित केलेल्या आहेत.

२) प्रतापविजय - नांवावरूनच समजते की, या नाटकात मेवाडचा वीर महाराणाप्रतापसिंहचे जीवन प्रसंग उल्लेखित केले आहेत.

वैदर्भी रीती तसेच भारतीय वृत्तीमध्ये लिहिलेल्या या नाटकाची प्रांजल परिष्कृत भाषा, त्याचे भावप्रवण चित्रण एका सफल नाट्य प्रणेत्याचे स्मरण करून देते. रसाभिव्यक्ती आणि अलंकारांच्या सहज वापर झालेला आहे. अर्थान्तरन्यास, रूपक, दृष्टांत, अपहृति, निदर्शना, उपमा, अनुप्रास आणि विषय वगैरे अलंकारांचा प्रयोग विशेष करून पाहावयास सापडतो. साहित्यिक सौंदर्याच्या दृष्टीने नाटकाच्या प्रत्येक अंकात आलेले गीत, निसर्ग (प्रकृति) चित्रणासंबंधी आलेली स्थळे, वीररसाभिव्यक्ती पूर्ण छंदांचे काव्यत्व उल्लेखनीय आहे. प्रस्तावनेनंतर नाटकाचा प्रारंभ वीरभावपूर्ण कथनांनी होतो.

प्रस्तावनेचे गीत ज्यामध्ये वर्षाऋतुचे वर्णन केले आहे, ते असे - विशाल धरती जलाचे पूर्ण ध्याने आस्वादन करू लागली. चंचल मेघांचे दल इकडे तिकडे फिरू लागले. लोकांचा ताप नष्ट होऊ लागला. सिंह पर्वतांच्या उंच भागात आश्रय शोधू लागले. जलबिंदूंच्या भाराने वृक्षाचे समूह खाली वाकले. विशाल सागर उडया मारू लागले. मेघांचा समूह पाहून, मनुष्य शोकरहित व आनंदित होऊन लागले. हे किती स्वाभाविक व हृदय हरण करणारे आहे.

प्रकृतिचित्रण विषयक वर्णनांना वाचताना हृदय त्यातील भावांशी रममाण होऊन त्याबरोबर तादात्म्य स्थापित करण्यासाठी उत्कंठित होते.

ती निसर्गसाधने निर्जीव निसर्ग वस्तू नव्हते, तर जिवंत प्रेरणा स्त्रोत आहेत असे प्रतीत होते. पर्वतांचे खालचे, वरचे दुर्गम मार्ग जे वृक्ष, लता, कुंज व गवतांनी वेढलेले होते, ते प्रयत्न करून सापडत होते. त्यातून सहजपणे असे प्रतिबिंबित होते की, उपायांच्याद्वारे दुर्गम रस्त्यांना उल्लंघिले जाते, त्याच-प्रमाणे कुटिल शत्रूंवर विजय प्राप्त केला जाऊ शकतो. (अंक ७ श्लोक १)

सूर्योदय होतांच सूर्याच्या उज्ज्वल प्रकाश फैलाविणाऱ्या किरणांचा उदय होऊ लागला. पहा की, अपास्य दूरं मलिनां तमस्विनीं, क्षणेन तिर्यक् प्रसृतैर्नवांशुभि । लताप्रतानाम्रनिकुंजमण्डिता, दिवाकरेणारुणिता वनस्थली ।। (अंक २।२)

सूर्याने आपल्या नवकिरणांच्या उदयाने क्षणातच रात्रीच्या मलीन अंधःकाराला दूर सारून ` लता ` आम्रमंजरी आणि निकुंजनाने विभूषित वनस्थलाला रंजित करून टाकले. तेजस्वी विशाल हृदयाच्या पुरुषांचे महत्व आणि लोकमंगल भावनांच्या उदयाचे उदाहरण दुपारच्या पूर्ण उगविलेल्या सुर्याद्वारा उपस्थित केलेले आहे.

उद्भास्य शैलशिखरोच्छ्रित पादपाग्रैः
तेजोनिधिः किमुदितो विरमेद्विवस्वान् ।
अभ्युद्गतो गगनमध्यपदं क्रमेण,
धाम्ना निजेन निखिलं भुवनं चकास्ति ।। (अंक २।२)

" सूर्य उगवून पर्वतशिखरावर उगविलेल्या वृक्षांच्या वरील भागास प्रकाशित करूनच विश्रांती घेतो काय ? नाही तर, तो हुबेहुब आकाशाच्या मध्यापर्यन्त पोहोचून आपल्या किरणांच्या प्रकाशाने सर्व जगाला प्रकाशित करतो. "

पर्वतांची शिखरे फुलेल्या हिरव्या वृक्षांच्या ओळी, हवेच्या झोताने वृक्षांची पाने आपल्या फांद्यासहित झोके घेतात. सगळे वन जणू गंभीर सिंधु आहे. लाटा उचंबळत आहेत, पर्वतांच्या समोर वृक्ष, लता आणि लतावेलींच्यामुळे गहन वन ज्यामध्ये सगळीकडे प्राण्यांचा निवास आहे, वारा असल्यामुळे सर्व वन समुद्राशी ऐक्य प्रकट करीत आहे. (४।२०)

विशाळगड दुर्ग आपली उच्चता आणि दुर्जेयता यामुळे कवीला ऐरावत हत्तीसारखा प्रतीत होत आहे. हा विशाळगड किल्ला, आपली विशालता, उंच उंच पर्वत शिखरांमुळे, उन्नत गण्डस्थळाप्रमाणे सोंडेप्रमाणे सर्वांत प्रथम असलेला, दुराक्रमणीय, विस्तृत पार्श्वभागाने शोभित, इंद्राच्या ऐरावताची शोभा धारण करीत आहे. (५।१)

श्री याज्ञिकजींनी गाव, नगराची निर्मलता, रमणीयता यांचे दर्शन आदी अनासक्त भावनेने केलेले आहे.

लुलितमथिक नेत्रे पूरयित्वा रजोभि -
र्वसनमपहरन्तो लुण्ठकाश्चक्रवाताः ।
जनपदपुरमार्गे भ्रामन्तो यथेच्छं,
वियदभियनभीता उत्प्लवन्ते समन्तात् (अंक ५।११)

वर्षा काल आहे. हवा वाहात आहे. कवी म्हणतो की, गाव आणि नगराच्या मार्गामध्ये चक्रवायु (तेजवायु) स्वेच्छापूर्वक फिरत आहे. वादळाप्रमाणे भयभीत चारी बाजूंनी उठून आकाशाकडे जात आहे. आणि याप्रकारे हा लुटे-याप्रमाणे थकलेल्या प्रवाशांच्या डोळ्यांत धूळ फेकून त्यांच्या वस्त्रांचे अपहरण करीत आहे. एवढेच नव्हे तर एका ठिकाणी पर्वताच्या उंच शिखरावर, दाट वृक्षांच्या रांगा आणि झरे वगैरे कवीच्यादृष्टीने शिवाजीसाठी प्रबळ दुर्गाप्रमाणे प्रतीत होत आहेत.

पर्वताची ऊंच सकल धरती, त्याच्या गुहा, नानाप्रकारच्या लता, आणि वृक्षांनी सुशोभित वन, पर्वतांच्या ऊंच शिखरावरुन वाहणारे झरे हे सर्व आपल्यासाठी बलिष्ठ दुर्गाच्या रुपामध्ये व शत्रूंसाठी बांधाच्या स्वरूपात आहेत. (७।३)

अशी आणखी काही ठिकाणे या नाटकात आहेत की, जेथे नाटककाराने त्यांना पूर्णरूपाने कवित्व कल्पना आणि भावांनी सुशोभित झाले आहे.

प्रकृति सौंदर्याच्या चित्रणासरीज नाटककार शौर्याचे चित्रण करण्यामध्ये सफल आहे. प्रकृति चित्रण आणि शौर्य दोन्हीही परिपूर्ण असा हा छंद आच्छादितवोष्णरश्मिं निजघनतविभिर्वान्तमापादयन्दि- ईन्मर्यादभेदिनादैः स्तनितमटहैर्जर्गर्वमाघोषयन्दिः । धारासंपातभग्न - प्रतिभटविटपि - व्याकुलोपत्यकान्त, आक्रान्तो म्लेच्छसैन्यैर्जलधरनिवहै दुर्गराजः समन्तानत (अंक ७।४)

किल्ला चारही बाजूंची म्लेच्छ सेनेने घेरलेला आहे. आमचे वृक्षांची सैनिक प्रतिपक्षांच्या तलवारींनी छाटले गेले आहेत. जणूं काही ढग आपल्या दाट ओळींनी सूर्याला झाकून टाकत आहे. त्याप्रमाणें मोंगलाच्या सेनेमध्ये आमचा सेनापती घेरलेला आहे. ढगांच्या भीषण गडगटाप्रमाणे त्यांच्या हास्यातून निघणारे, गर्वपूर्णध्वनी, हृदयाला मर्मच्छेदित करीत आहेत. आमचे सैनिक असे व्याकुळ झाले आहेत की, जणूं ढगातून गळणाऱ्या जलधारांनी वृक्षांचे समूह व्याकुळ होतात.

नाटकाच्या पहिल्याच श्लोकांमधून हे स्पष्ट होते की, त्यामध्यें वीररस अंगीभूत होऊन प्रकट झाला आहे. म्हणून सर्वत्र शौर्य वगैरे भावांची अभिव्यक्ती स्वाभाविक आहे. हेच कारण आहे की, पर्वताच्या पहिल्या भागात असलेले दाट वन, झरे, नद्या, दुर्ग आणि विशाल वृक्षांचे एकेका वीर सैनिकांच्या रूपामध्ये जागोजाग वर्णन केलेले आहे. वर्णन वाचतांना वीरांचे शौर्ययुक्त शरीर प्रत्यक्ष दृष्टीला पडले आणि हृदय त्याच्या तेजाने प्रकाशित होऊन निर्भय होऊन जाते. शिवाजीचे शस्त्राने सजलेले रूपाचे वर्णन वाचून त्याच्या स्वरूपाचे दर्शन पाहता येते.

> प्रजवतुरगकल्पितासनोऽयं, कवचधर: करवालकुन्त नद्ध: ।
> अरुणितनयनो रुषा महोग्र:, सरभसमेत्यभितो द्विषां कृतान्त: ।।
>
> (अंक ४।१९)

वेगवान घोड्यावर बसून, कवच धारण केलेले, तलवार, भाला घेऊन लाल लाल डोळ्यांचा आणि महातेजामुळे भयानक, शत्रूंचा यमराज येत आहे. शिवाजीची सेना विजयासाठी निघालेली आहे. त्याचे रूप -

> सुतीक्ष्णभल्लासिधनु: समूर्जिता, विशालतूणीपरिणद्धपार्श्वा: ।
> स्वातंत्र्यसम्भावनया समेधिता: प्रयान्तु मे वन्यपदातिसंघा: ।।
>
> (२।११)

तीक्ष्ण भाले, तलवारी, धनुष्ये, कमरेला तूणीर लावलेले, स्वातंत्र्य भावनेने प्रोत्साहित बनत राहणाऱ्या आमची पायदळ सेना प्रस्थान करीत आहे.

या नाटकामध्यें दृष्टान्त, उपमा, अर्थान्तरन्यास, निदर्शना, अनुप्रास वगैरे अलंकारांचा समावेश सहज झाला आहे. येथे एक-दोन उदाहरणादाखल खालीलप्रमाणे -

स्वल्पोऽप्यग्निर्ज्वलयति न किं काननं शैलसंस्थं,
मत्तेभेन्द्रान्विदलति न किं लीलया सिंहशावः ।
बालोऽप्यर्को विकिरति न किं ध्वान्तमारात् क्षणेन,
सर्वत्राप्रतिहतरयस्तेजसां हि प्रभावः ॥

(१।१२)

अर्थान्तरन्यासाचा यामध्ये सहज समावेश झालेला आहे.

दृष्टांताचे उदाहरण - " साहाय्यमासाद्य महद्वनौकसां......
कृता कबन्धता " (अंक १।१४) आणि अन्त्यानुप्रासाचे उदाहरण -

" सुमसुकुमार - - - रम्य रमेश मां रसिकेश " (अंक ७ागीत)

रूपकाचे उदाहरण -

" पित्रोर्गुरोश्चाधि - - - केसरिणः किशोरः " (अंक १।४)

अपह्नुति -

" अवेहि नैनं - - - वपुरेवमूर्तिमत् " (२।६)

आणि निदर्शना -

" लोकप्रकाशन - - - युगपत्सुषमां दधाति " (३।१५) वगैरे.

वरील विवेचनावरून हे स्पष्ट होते की, छत्रपतिसाम्राज्यामध्ये योग्य प्रकृति चित्रण, रस वगैरेची पूर्ण अभिव्यक्ती, अलंकारांचा समावेश, उचित रीति नीतीने झाला आहे.

वीररसाचे मुख्यत्व, स्वराज्य संस्थापना, मंगल प्रयोजन, पराक्रमी प्रतापी नायक शिवाजी, इतिहास प्रसिध्द कथावस्तु हे सर्व या कृतीला एक श्रेष्ठ नाटकाची संज्ञा देण्यासाठी समर्थ आहे. दहा अंकाचे हे महानाटक आहे. श्री. याज्ञिकजी नाट्यरचनेत पूर्ण सफल झालेले आहेत. प्रस्तुत पुस्तक हिंदी अनुवादसहित प्रकाशित झालेले आहे.

ड) शिववैभवम् :

` शिववैभवम् ` हे पांच अंकी नाटक असून श्री. वि.पां. बोकील, सेवानिवृत एज्युकेशन इन्स्पेक्टर, प्रोफेसर ऑफ एज्युकेशन, पुणे यांनी हा संस्कृत नाट्य प्रबंध लिहिलेला आहे. शिवाजीच्या आयुष्य हे धाडसाच्या प्रसंगाने भरलेले आहे. त्याचे शारिरीक व बौध्दिक सामर्थ्य खूप प्रचंड असल्यामुळे तो मराठी राज्याची स्थापना करु शकला.

हे नाटक छ. शिवाजीच्या आयुष्यातील कांही प्रसंग घेऊन त्यावर उभारलेले आहे. प्रथम ब्रह्माला वंदन करुन नंतर सद्गुरुला वंदन करुन नांदीने नाटकाला प्रारंभ केला आहे. सूत्रधाराच्या संभाषणातून शिवाजीच्या कार्याची माहिती, ब्राह्मक्षात्रतेजाचा संयोगामुळे होणारे राष्ट्रकार्य याविषयी विवेचन करुन नाटकाचा परिचय करुन दिलेला आहे. अशारितीने विष्कंभकानंतर प्रथम अंकाची सुरुवात होते.

पहिल्या प्रवेशामध्ये देहूगावात शिवाजीचे सैनिक तुकारामाचे घर शोधतात व त्यांना शिवाजीने पाठविलेले मौल्यवान वस्त्र व उपहार भेट देतात. तुकाराम ते निरपेक्ष मनाने परत करतात. दुसऱ्या प्रवेशात तुकाराम महाराज विठ्ठलमंदिरात ग्रामवासीयांच्यासह बसलेले असतात. ते विठ्ठलाजवळ

शिवराज्याच्या यशा विषयी प्रार्थना करतात. तेथे रामदास व तुकाराम यांची भेट होते. रामदास अंतर्धान पावल्यानंतर शिवाजी तुकारामाच्या दर्शनासाठी येतात व तुकाराम त्यांना उजव्या हातात रामदासांचे दर्शन घडवितात. गुरुशिष्यांचा संगम होऊ दे, म्हणून आज्ञा देतात. तिसऱ्या प्रवेशामध्यें पुण्यामध्यें लालमहालाच्या प्रासादामध्यें शिवाजी व जिजामाता बसलेले असतात. तेथे शिवाजी जिजामातेला तुकारामाचे दर्शन घेतल्याचे सांगतात. तुकारामांनी रामदासांचे शिष्यत्व स्विकारण्याविषयी सांगितल्याचे सांगतात. एवढ्यात एक स्त्री मुलांसह रडत प्रवेश करते व जिजामातेच्या चरणावर पडते. यवनांनी त्यांचे धनधान्य साधुवेषात येऊन हिरावलेले असते. त्यांना अतिथिगृहामध्ये जिजामाता पाठवितात व पुरोहित भवानीचा प्रसाद आणून देतो. चवथ्या प्रवेशात हनुमान मंदिरात रामदासशिष्य सूर्यनमस्कार घालीत असतात. तेथे आलेल्या असहाय्य स्त्रीला अन्न व द्रव्य देऊन ते जिजादेवीकडे पाठवितात. तेव्हा राजा शिवाजी त्याठिकाणी प्रवेश करून त्याच्या कुशलाची चौकशी करतात ते सर्व स्वराज्य संपादण्यासाठी साहाय्य करण्याचे आश्वासन देतात.

दुसऱ्या अंकातील पहिल्या प्रवेशामध्ये जावळीदुर्गामध्यें चंद्रराव सचिवांसह राज्यव्यवहारा विषयी चर्चा करीत असतो. यवनांची तो स्तुती करत असतो. शिवाजीच्या दूताचा अपमान करून हाकलून देतो व प्रत्यक्ष त्याच्या मुलीला पळविण्याऱ्या यवनांचा हात कन्येने तोडला, म्हणून तिला दोष देतो. जावळी प्रदेशातील अरण्यात शिवाजी राजा व त्याचे सैनिक त्याच्या पाठोपाठ येतात. त्याठिकाणी सैनिकांचे व शिवरायांचे चंद्रराव हा राजनीतिविरुद्ध वागत आहे. अशा विषयावर संभाषण चालू असतां चंद्ररायाची राजकन्या शिवाजीला भेटते. त्याठिकाणी त्यांच्या अनुरागाचे दर्शन घडविले आहे. नंतर शिवाजी चंद्ररायाचे सैन्यबळ जाणून गुप्तमार्ग पाहून, स्वारी करून जावळी

दुर्ग जिंकून घेतो. जाकली दुर्ग घेतल्यानंतर राज्यसभेमध्ये शिवाजी राजा, चंद्रराय पुत्र, चंद्ररायाचे अमात्य बसलेले असतात. राजा शिवाजी चंद्ररायाच्या मुलाला सिंहासनावर बसतो. त्याचे सर्व आनंदाने स्वागत करतात. अमात्य राजा शिवाजीला मौल्यवान वस्त्रे अर्पण करतो व राजकुमारीशी त्याचा विवाह झाल्याचे सूचित केले आहे.

तिसऱ्या अंकात चापनळ गावांमध्ये राजा शिवाजी सैन्यासह रामदासांना शोधीत फिरतो. ते भेटतात. रामदास त्याचे स्वागत करतात. आशिर्वाद देवून मध्यान्ह समय झालेला आहे. भोजनाची वेळ झालेली आहे. असे सांगून श्रीराम मंदिरात पूजा समारंभ करून रामाच्या पायाचे उदक सर्वांना तीर्थप्रसाद म्हणून देतात. तेथे शिवाजी रामदासांची राहण्याची झोपण्याची व्यवस्था पहात असताना रामदास राहत असलेल्या मंदिराच्या द्वाराच्या छिद्रातून आंत पहात असताना शिवाजीला मूर्च्छा येते. कोलाहल ऐकून रामदास मंदिरातून बाहेर येतात व प्रेमदृष्टीने शिवाजीकडे पाहून त्याला सावध करतात. तोच चार वैदिक ब्राह्मणांचे वेदांच्या वादावरून भांडण जुंपते. तेंव्हा रामदास अद्वैत वेदांताचे माहात्म्य त्यांना पटवून देतात व असेर सद्गुरूचे वाक्य प्रमाण मानून ब्राह्मणांचा वाद संपतो. त्यानंतर शिवाजी व रामदास यांची तुकारामांबद्दल चर्चा होते. शिवाजी रामदासाला मौल्यवान वस्त्रे अर्पण करून पूजा करतो. रामदास ते सर्व शिवाजीला परत अर्पण करतात व खेद मानू नकोस. म्हणून सांगतात. रामदास संप्रदायातील दोन मुले भिक्षा मागीत असतात. ते आपली दिनचर्या सांगतात व त्यांना गुरू शिकवित असलेल्या ज्ञानाविषयी चर्चा करतात. शिवाजी त्यांना पारितोषिक देतो व त्यांच्या राज्यघटनेची प्रशंसा करतो.

चवथ्या अंकात डोंगराळ प्रदेशांत फिरणारे सैनिक यवनांचा कल्याणाचा खजिना लुटतात व खजिना आणि शाहजादी शिवाजीला नजर करतात. शिवाजी शाहजादीला भगिनीप्रमाणे वागणूक देऊन विजापूरला परत पाठवितो. नंतर जिजामाता व शिवाजी लालमहालांत रामदासांवर चर्चा करतात. त्यानंतर एक लोकनाटयसंघ प्रयोग करण्यासाठी त्याठिकाणी येतो. त्यांच्या अयोग्य नाटयप्रदर्शनासाठी शिवाजी त्यांची कानउघाडणी करतो. नंतर एक ख्रिश्चन धर्मप्रसारक स्वधर्माचा प्रसार करण्यासाठी येतो. शिवाजी त्याला स्वत:च्या मंदिरात धर्मप्रवचन देण्यास सांगतात, सार्वजनिक ठिकाणी नाही. कपट प्रयोग करणाऱ्या यवनांना न्यायालयामध्ये पाठविले जाते. देवालयामध्ये शिवाजी प्रवेश करतो. तेथे कीर्तन चालले असते. सर्वजण त्यांचे उभे राहून स्वागत करतात.

पांचव्या अंकाच्या पहिल्या प्रवेशामध्ये जिजामाता तुळसीची पूजा करीत असतात. तेव्हा राजा शिवाजीला जिजामाता बोलवितात व ग्रामसेवकाला शिक्षा करण्याचे कारण विचारतात. तो देशद्रोही असल्याचे सांगितले. व नंतर द्वारपालाच्या पाठोपाठ एक इंग्रज दूत उपहार घेऊन प्रवेश करतो व व्यापारासाठी परवानगी मागतो. शिवाजी करारपत्र करण्यास सांगतो. नंतर तानाजी, येसाजी व शिवाजी शस्त्रास्त्रासंबंधी विचार करतात. नंतर शिवाजी मोरोपंतांची पंतप्रधान पदासाठी लाच देऊन परीक्षा घेतात. ते कसोटीला उतरतात. सुमंताचीही तशीच परीक्षा घेतात. नंतर शिवाजी पत्नीसह जिजामातेला प्रणाम करण्यासाठी येतात. तेवढयांत एक इंग्रज दूत उपहार घेऊन शिवाजीला भेटण्यास येतो. रामदासही येतात. शिवाजी महाराज रामदासांना राज्यदान देवून टाकतो. हे योग्य केले नाही म्हणून रामदास त्यांना योग्य उपदेश करतात.

असे या `शिवविभवम्` नाटकाचे कथानक आहे. १० व्या शतकातील हे संस्कृत नाटक म्हणून त्याकडे पाहिले असता ऐतिहासिक सत्यतेच्या दृष्टीकोनातून त्यामध्ये विशेष कांही आढळत नाही पण साहित्यिक सौंदर्य वाचकांच्या मनावर परिणाम करणारे आहे व या नाटकाचे वैशिष्टय म्हणजे रामदास व तुकाराम यांच्या आध्यात्मिक व राष्ट्रीय विचारांवर भर दिलेला आहे. हे नाटक ऐकीव कथा व परंपरेने चालत आलेल्या ऐकीव आख्यानावर आधारित आहे. त्यांतील प्रसंगाना ऐतिहासिकदृष्टया कांहीही आधार नाही. या नाटकांत शिवाजीच्या आयुष्यांतील युध्द प्रसंगांना फारसे स्थान दिलेले नाही. तर त्याचे सामाजिक व धार्मिक कार्य कल्पनेने वर्णन करण्याचा प्रयत्न केला आहे व त्याच्या आयुष्यांतील अनुरागाने युक्त असा प्रसंग कल्पनेने रंगविण्याचा प्रयत्न केलेला आहे. या नाटकातील विचार हे २० व्या शतकांत शोभणारे आधुनिक विचार आहेत.

वास्तविक पाहता शिवाजी व रामदास, शिवाजी व तुकाराम हे विषय चालू शतकांत संशोधकांच्या नजरेस आलेले आहेत व त्यावर संशोधनही चालू आहे. हे विषय या नाटकात आलेले आहेत व नाटककाराने ते आपल्या कल्पनेने रंगविलेले आहेत. तुकारामांचे ज्यावेळी शिवाजीने दर्शन घेतले तेंव्हा त्याच्या हातामध्यें त्यांना सद्गुरु म्हणून रामदासांचे दर्शन तुकारामांनी घडविले, रामदासांनी प्रेममय दृष्टीने पाहिल्यानंतर शिवाजी मूर्छेतून सावध झाला, अशा कांही प्रसंगातून दैवी शक्तीचा प्रत्यय व अद्भुतरसाची निर्मिती केलेली आहे. नाटक पाहणाऱ्या प्रेक्षकांच्या मनावर प्रभाव गाजविण्यासारखे हे प्रसंग आहेत. त्यांनी परिणामकारकतेच्या दृष्टीने उत्तम कामगिरी बजाविलेली आहे.

या नाटकाचे आणखी एक वैशिष्टय म्हणजे तुकारामांचे नामसंकीर्तन, कीर्तनकाराचे कीर्तन रामदासशिष्यांनी म्हटलेले मनाचे श्लोक यांमुळे प्रस्तुत

नाटकांत भक्तीरसाचा अत्युत्तम उत्कर्ष साधलेला आहे. उदाहरणार्थ - तुकारामांचे नामस्मरण -

श्रीकृष्ण विक्रम यशो विबुधाभिवन्द्यं
श्रीकृष्ण पादमहिमा भवरोगनाशः ।
श्रीकृष्ण रूप रुचिरत्वमवर्णनीयं
श्रीकृष्णनाम सरसं तुलनातिगम्यम् ।। (अंक १।१२)

तसेच रामदासांच्या शिष्य बालकांनी म्हणलेले मनाचे श्लोक,

मनः कामरोगं त्यजेर्नैकरूपं
मनः क्रोधशत्रुं जहि स्वास्थ्यनाशम् ।
मनो लोभबुध्दिर्न सेव्या सबाधा
मनो मत्सरं मा भज व्यर्थदम्भम् ।। (अंक २।१६)

कीर्तनकाराचे कीर्तन,

" विजयतां पंढरीनाथः । " आनन्दस्वरूप परमात्मा ।
परमात्मांशो जीवात्मा । तस्मादानन्दस्वरूप एव जीवात्मा ।
इति तर्कसिध्दम । भो भोः सज्जनाः, अनुपश्यताम् -
" विजयोऽस्तु विठ्ठलस्य " - " विजयो स्तु विठ्ठलस्य "
(करतालेन सह पठन्ति सर्वे सभ्याः)

(अंक ४ था)

प्रस्तुत नाटकांत रामदासांच्या मठात दहा गायी व चार बैल पाळल्याचे दाखविले आहे. आणि ते कृषिकर्मामध्ये शेतकऱ्यांना मदत करतात असे दाखविले आहे. शिवाय मठपती राजा शिवाजीला सांगतात की, मठामध्ये पुष्कळ औषधी वनस्पती असून लोकहितासाठी त्याचा वापर केला जातो.

अशाप्रकारचा लोकसंग्रह हा स्वराज्याचा आधार आहे असे त्यावर शिवाजीचे विचार दाखविलेले आहेत. शिवाय रामदासांनी मठवासी व ग्रामवासी यांना मल्लक्रीडेचे शिक्षण देण्याची व्यवस्था केली आहे. कारण ते ` शरीरमाद्यं खलु सर्वसाधनम् ` हे गुरुवचन प्रमाण मानतात. पण ही शक्ति स्वजनांना त्रास देण्यासाठी वापरात आणावयाची नसते, असे विचार रामदासांच्या तोंडी उद्धृत केले आहेत.

छ. शिवाजी महाराजांनी कल्याणची शाहजादी विजापूरला परत पाठविली, तेव्हां ते स्वराज्य सेवकांना सांगतात की,

न विप्रकार्या वनिता कथंचि -
न्न वापराध्या मानसाऽपि नूनम्
कुलांगना ज्ञापयते भवानीं
मुदा च तस्या हितमेव साध्यम् ।। (अंक ४।१६)

त्यातून त्याचे स्त्रीविषयक उदार दृष्टीकोनाचे दर्शन घडते.

रामदास व तुकाराम यांची भेट नाटककाराने दाखविली आहे. तुकाराम रामदासांना सांगतात की, मी कांही सामाजिक कार्य केलेले आहे व माझे अवतारकार्य आता संपलेले आहे. महाराष्ट्र राज्य संस्थापक शिवाजीचे गुरू होण्याचे कार्य तुम्ही स्विकारा.

शिवाजी मोरोपंतांची पंतप्रधान कार्यासाठी परीक्षा घेतात. तेव्हां ते परीक्षेस उतरल्यानंतर ते म्हणतात,

विश्रंभार्हो गुणगणयुतो निश्चितस्त्वं प्रकामं
कार्याधारो निपुणमतिमानुत्त माधानमूर्तिः ।
दिष्टया लाभो भवति सुहृदस्त्वादृशां राज्यहेतो-
र्धन्यो धन्यो गुरुवरकृपापात्रभूतो ममात्मा ॥

(अंक ५ वा । १०)

सुमंताला शिवाजी म्हणतात -

भाग्येन वीरपुरुषाः सचिवा गुणाढ्या
निष्ठाव्रता जनपदेषु यशोधनाश्च ।
ज्ञानार्थिनो नियमपरंपरया सनाथा
अस्मत्कुले निरतमानस राजहंसाः ॥ ११ ॥

यासारख्या शिवाजीने व्यक्त केलेल्या विचारांना चाणक्याचा कौटिलीय अर्थशास्त्र या ग्रंथाचा आधार घेतलेला स्पष्ट दिसतो.

इंग्रजांच्या व्यापारकौशलाची शिवाजीने स्तुती केली आहे. ते म्हणतात -

आंग्ला व्याजविशारदा विभवसंपन्ना वणिग्वृत्तयो
राजन्ते खलु राजनीतिचतुरा आचारधारावराः ।

(अंक ५ । १५)

छ. शिवाजी रामदासांना राज्यदान देऊन टाकतात तेंव्हा रामदास त्यांना समजवितात की,

" भोः शिवभूप, तथैव स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः " इतिह भगवद्वचनं सुप्रसिद्धम् । तदनुसारेण -

संन्यासमार्गमनुयामि निजस्वभावात्
क्षात्रस्य योगमनुतिष्ठतु शिष्यवीर: ।
श्रीरामकृष्ण जनकादय उत्तमार्था
राजर्षिगौरवमयानथ राजयोगात् ।। (अंक ५।३०)

ही स्वराज्यामागची उत्कृष्ट कल्पना कथन करून त्याला उदात्त रूप दिलेले आहे व जिजामातेने रामदासांच्या स्वामीत्वाची खूण म्हणून भगवा झेंडा स्वराज्याचे चिन्ह म्हणून रामदासांकडून मागून घेतले, अशी कल्पना या नाटकांत केलेली आहे.

शिवाजी व जावळीची राजकुमारी यांच्या अनुरागाचे दर्शन घडवून शृङ्गाररस आणला आहे. छ. शिवाजीचे सामाजिक कार्य या नाटकांत विशेष वर्णन केलेले आहे.

प्रस्तुत नाटकाची भाषा सोपी व ओघवती आहे. सुभाषितांप्रमाणे श्लोकांची रचना केलेली आहे. उदाहरणार्थ -

समाजकण्टको नूनं स्वराज्यभेदको ऽपि वा ।
उच्छेद्यो मूलतो ह्याशु स्थैर्याय च सुखाय च ।।
प्रतिवसति साहसे श्रीस्तस्मात्सहसैव विक्रमं कुर्म: ।
ज्यामो जनानां सुखार्थं हितार्थम् ।।

कथावस्तुला योग्य अशी निसर्गवर्णनेही आलेली आहेत. उदाहरणार्थ सह्याद्रीचे वर्णन,

उत्तुंगो गिरिकूटपंक्तिनिवहो नाकंलिहो राजते
उत्संगो द्रुमवल्लरीपरिवृतो भूयिष्ठलाभान्वित: ।

निसर्गसौंदर्य,

> रम्यस्तस्य निवास उच्चशिखरे शैलस्य शोभायुते
> पाषाणोल्लिखिते च कन्दर वरे वृक्षावृते विस्तृते ।
> तो यौधा: प्रवहन्ति तत्परिसरे स्वच्छांभसा पूरिता:
> पुष्पाणां स्तबका: सुगन्धसहिता: प्रेंखन्ति वातेरिता: ।।

स्वभावरेखाही उत्तम रेखाटल्या आहेत. रामदासांचे शिवाजीला दिसलेले रूप वर्णन करताना,

> अहो वीर्यमितच्च धैर्य सम्भ्रमम्
> अहो कान्तिरेषा च शान्ति: सहासा ।
> अहो ब्रह्मतेजो महोत्साह युक्तम्
> अहो सर्वसाक्षित्वमीशानरूपम् ।।

किंवा

> ब्राह्मण स: महाभाग: काषायवसनावृत:
> कूर्च कमण्डलुं दण्डं भिक्षापात्रं च धारयन् ।।

भवानीचे रूप वर्णन करताना,

> गौरी महेशरमणी हिमवत्सुपुत्री
> उग्रव्रता बलयुता शुचितानुरक्ता ।। वगैरे

उपमा, उत्प्रेक्षा, रूपक, अर्थान्तरन्यास इ. अलंकारांची योजना केलेली आहे. मनाचे श्लोक व तुकारामांचे अभंग यांचे संस्कृत भाषांतर सुंदर केले आहे. `कौटिलीय अर्थशास्त्रातील` सिद्धान्त लक्षांत घेऊन राजनीतिविषयक विचारांची मांडणी केलेली आहे. स्वराज्यांचे एक उत्तम आदर्श

राज्य म्हणून चित्रीकरण केलेले आहे. राष्ट्रीय संघटनात्मक कार्य म्हणून संतांनीसुध्दा त्याला श्रेष्ठ दर्जाचे मानलेले आहे. कथानकांतील रामदास व तुकाराम भेट, शिवाजी व जावळी राजकुमारी यांची भेट यासारखे अनेक प्रसंग घटना, कल्पना, स्वतःच्या प्रतिभेने नाटककाराने निर्माण केल्या आहेत.

संस्कृतमधील नाटयशास्त्राच्या नियमानुसार प्रस्तुत नाटकाची मांडणी केलेली आहे. कल्पनेने घटनांची निर्मिती करून कथानकांत भर घातली आहे. कथानकाची गती कोठे खुंटत नाही. प्रसंग एकामागोमाग एक घडत जातात. रामदास व तुकाराम यांना या नाटकांत प्राधान्य आहे दैवी शक्ती दाखवून अद्भुत व शांत रसाची निर्मिती केली आहे. भक्तीरसाला बरेच श्रेष्ठ स्थान दिलेले आहे. प्रगल्भ विचार, हे या नाटकाचे वैशिष्टच आहे.

एकंदरीत वाचकांच्या मनावर दैवी व राजनीतिक विचारांचा ठसा ठळून शिवाजीच्या सामाजिक विचारांचा आढावा घेणे, हा नाटककाराने व्यक्त केलेला उद्देश सफल झालेला आहे.

ई) छत्रपतिः श्रीशिवराजः

हे नाटक श्री. भि. वेलणकरांनी लिहिलेले असून इ.स. १९७४ मध्ये ते प्रसिध्द झाले. प्रस्तुत नाटकाच्या नांदीमध्ये विष्णूची स्तुती व स्वातंत्र्य-लक्ष्मीचे वर्णन आहे. नाटककाराचे नांव नांदीच्या श्लोकांतच गुंफलेले आहे व शेवटच्या चरणांत शिवाजीच्या गुणांना अभिवादन केलेले आहे. नंतर प्रस्तावनेमध्ये मातृभूमीला वंदन, गीतेतील ` संभवामि युगे युगे ` या वचनाची आठवण करून देऊन अशाच एका परिचित कथेचा रसिकांपुढे सादर करीत आहे. असे विषय विवेचन करून १२ व्या शतकातील शेवटच्या दशकातील परिस्थितीचे

वर्णन केले आहे. अशा रितीने पारतंत्र्यरूपी अंधःकार पसरलेला असताना १७ व्या शतकांत स्वातंत्र्याचा सूर्योदयरूपी बाल शिवाजीचा जन्म झाला, पौर्णिमेच्या चंद्राप्रमाणे वाढणारा तो बाल शिवाजी प्रजेचे नेतृत्व करू लागला. रोहीडेश्वराच्या मंदिरांत प्रतिज्ञा करून अल्पावधीतच त्याने सत्ता स्थापन केली. तेंव्हा रागावलेल्या विजापूर नरेशाने त्याच्या पित्याला कैद केले. त्याने युक्तीने पित्याची सूटका केली व शहाजी आपल्या पुत्राला भेटण्यासाठी जेजूरीच्या मंदिरात आले. अशा प्रस्तावना संपली आहे.

पहिल्या अंकातील दुसऱ्या भागामध्ये जेजूरी देवालयाच्या मंडपात कांही मावळे आवेशाने व आनंदाने गीत गात असतात. जेजुरी नगरीतील राजशिबीर कक्षात सोयरादेवीची दासी रमा व जिजाबाईची दासी नीरा प्रवेश करते. त्याची हलकीफुलकी चेष्टा होते. महाराजांविषयी रमा चौकशी करते, कारण सोयरादेवींची तशी तिला आज्ञा आहे. महाराज महामात्यांबरोबर चर्चा करीत असतात. तेव्हढ्यात मोरोपंत प्रवेश करतात त्यांनाही महाराजांविषयी माहिती नसते. बाळाजी हा महाराजांची व्यक्तिगत व्यवस्था ठेवणारा असल्याने ते त्याला त्यासंबंधी विचारण्यासाठी जातात. बहिर्जी प्रवेश करून पुण्यामध्ये मोगल सेनेने धाड घातल्याची बातमी देतो. एव्हढ्यांत नेताजी प्रवेश करून पुणेमार्गाने शत्रूचे सैन्य अडविण्याकरिता जातो. तानाजीनेही जेजुरीत पुरेशी संरक्षणाव्यवस्था केल्याचे तो सांगतो. मोरोपंत नेताजीला पितापुत्र मिलनाच्या उत्सवप्रसंगी विघ्न येऊ नये, म्हणून काळजी घेण्यास सांगतात. कोंडाजी शहाजी आल्याची खबर देतो. नेताजी युध्दावर गेला आहे हे महाराजांना आताच सांगू नये असे मोरोपंत व बाळाजी ठरवितात व ते पूर्व-पश्चिम द्वाराने भेटीची व्यवस्था करतात. मंगल वाद्यघोषात शहाजींचे आगमन होऊन तुमाच्या पात्रांध्यें मुख पाहून ते भेटतात. नंतर शिवाजी शहाजीला परमानंदाच्या शिवभारताचे व अनुझल-

खानाच्या वधाचे वर्णन करून सांगतात व समर्थांचा शुभसंदेश येतो. बाजीप्रभुचे निर्वाण शिवाजी शहाजीला सांगतो.

दुसऱ्या अंकामध्ये नेताजी शत्रूचा पराभव करतो ही वार्ता कळताच शिवाजीला युध्दाला सज्ज होतो. तानाजी व नेताजी यांचे मतभेद होतात. शिवाजी त्याचे निराकरण करतात. नंतर बहिर्जी, परमानंद, कोंडाजी यांच्या संभाषणातून ख्रिस्ती लोकांचे दोष दाखविले आहेत. व शिवाजीच्या कार्यामुळे प्रभावित होऊन परमानंदाची पत्नी रमा स्त्रीसैन्य स्थापण्याची सूचना करते.

शहाजी जिजामातेची स्तुती करून शिवाजीला एक राजनीतिक सल्ला देतो व राजपद अपरिहार्य हे सांगून व उपदेश करून कर्नाटकात परत जातो.

नाटकाच्या तिसऱ्या अंकामध्ये शहाजीचा मृत्यू, शाहिस्तेखानाची दूरावस्था व आग्रयाहून सुटका इ. प्रसंग आलेले आहेत.

नाटकाच्या चवथ्या अंकामध्ये शिवराजाचे नेतृत्व स्थिर होते. रामदासांना शिवाजी गुरू मानतो. तानाजीचे सिंहगडासाठी बलिदान नेताजीचे धर्मांतर, शिवाजीने त्यांना हिंदुधर्मात घेतल्यामुळे तो त्याचा अधिकार आहे का असा प्रश्न निर्माण होतो. सर्व लोक व रामदास तसेच जिजाबाई त्याला राज्याभिषेकाची आवश्यकता पटवून देऊन त्यासाठी आग्रह धरतात. शिवाजी ते मान्य करतो.

नंतर पांचव्या अंकामध्ये राज्याभिषेकाची पूर्ण तयारी होते. अष्टप्रधानमंडळ निश्चित केले जाते. शिवाजीला राज्याभिषेक होतो. जिजाबाईंना स्वर्गवास, शिवाजीचे सांत्वन, शिवाजीची राज्यव्यवहारकोश

लिहिण्याची आज्ञा, भवानीची प्रार्थना व अखेर भरतवाक्य होऊन नाटक संपते.

हे पांच अंकी नाटक संस्कृत नाटयशास्त्राच्या नियमांना धरून लिहिलेले आहे. या नाटकाचा प्रारंभ पितापुत्रांच्या मिलनाने होतो. या मीलनप्रसंगात तथ्य आहे. त्यासाठी दोन अंकाची योजना केलेली आहे व या मीलनासाठी जेजुरी या क्षेत्राची निवड केली आहे. शहाजी महाराजांना महाराज ही पदवी प्राप्त झाली होती, हे समकालीन प्रामाणिक साधनांच्या उल्लेखांवरून आज सिध्द झालेले आहे. त्यामुळे शिवाजी महाराजांचा महाराज या शब्दाने केलेला निर्देश यथायोग्यच आहे.

नाटककाराकडे विशेष कलादृष्टि आहे. त्यादृष्टीने या नाटकांत शिवाजी-शहाजी-जिजादेवी यांच्या प्रसंगातून त्यांचे यथोचित भावप्रतिमा नाटककाराने निर्मिलेल्या आहेत. त्या रसिकांना संतोष देणाऱ्या आहेत, यात शंकाच नाही. पूर्वीच्या इतिहासकारांनी शहाजींची यवनसेवा केल्याबद्दल निंदा केली, पण नंतर नूतन प्रमाणे प्राप्त झाल्यामुळे स्वराज्य स्थापनेत त्यांचा भाग होता हे सिध्द झालेले आहे. या नाटकांत शिवाजीचा शहाजीविषयीचा आदर दाखविलेला आहे. या नाटकांत शिवाजीचा शहाजीविषयीचा आदर दाखविलेला आहे.

दुसऱ्या अंकामध्ये नाटयगुण उत्कटत्वाने प्रदर्शित झालेले आहेत. जेजुरीच्या पुरातन मंदिराच्या आंत असलेला शिलालेख ` यक्षप्रतिमयंकारिता ` वगैरे प्राप्त झालेला आहे. त्यादृष्टीने या विषयाचा या ठिकाणी केलेला उल्लेख योग्यच आहे. श्रीसमर्थ रामदास यांचे गुरू म्हणून प्रस्तुत नाटकात वारंवार सूचन केलेले आहे.

शिवाजी व समर्थ यांच्याविषयी सध्या वाद चालू आहे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्रीजोशी यांनी पुणे येथे केलेला दासबोधाचा उल्लेख प्राह्यच आहे. समर्थ रामदासमुध्दा पथ-प्रदर्शक होते यात संशय नाही. मनोबोधात आलेल्या केलेल्या श्लोकांचे संस्कृत भाषांतर हे सुरम्य व प्रशंसा करण्यासारखे आहे.

निधिनिवासकर ऐतिहासिक कविश्रेष्ठ परमानंद हा शिवाजीसह होता. परंतु स्वप्रतिभेने नाटककाराने त्याला युध्दभीरू, गोमान्तक दर्शना-मुळे मधुपान परायण असे उपहासात्मक वर्णन केलेले आहे. ते काही बरोबर वाटत नाही. कारण शिवचरित्रांत परमानंदाचे स्थान अद्वितीय आहे, त्यामुळे त्यांचा असा वापर करणे बरोबर वाटत नाही.

त्याचप्रमाणे ' योगसंग्रामात ' केलेला शेख महंमदाचा उल्लेख व हा कवीची विद्वता प्रदर्शित करतो. तानाजी व नेताजी यांच्या वाग्युध्दांत कवीची स्वतःची प्रतिभा दिसते. त्याला कोणताही ऐतिहासिक आधार नाही. दुसरा अंक फारच प्रभावी झालेला आहे.

वारकरी संप्रदाय व समर्थ संप्रदाय यांच्या शिष्यांतील कलह सत्य परिस्थितीवर प्रकाश टाकणारा आहे. छत्रसालाच्या बुंदेलखंड रक्षणासाठी शिवाजीने केलेली मदत सर्वांना माहितच आहे.

बजाजी निंबाळकराला पुन्हा हिंदू धर्मात सामावून घेतल्याची गोष्ट इतिहास प्रसिध्दच आहे. धर्मांतर केलेल्यांना पुन्हा हिंदुधर्मामध्ये सामावून घेणे हे फारच उपकारक कार्य आहे. पूर्वी शिवकालातच नव्हे तर सध्याही त्याचे फार महत्व आहे. धर्मकार्यासाठी वैदिक परंपरेप्रमाणे राज्याभिषेक केला होता, असे कवीने या नाटकांत प्रस्थापित केलेले आहे व

श्री. शिवराजांची भावप्रतिमा नाटककाराने उज्वल केलेली आहे. पण गागाभट्टांचा फक्त उल्लेखच केलेला आहे. प्रस्तुत नाटकांत श्री.केळणकरांनी स्वत:च्या प्रतिभेने शिवाजीची प्रतिमा रंगविलेली आहे.

प्रस्तावनेमध्ये आलेल्या मातृभूमीला वंदन करणाऱ्या गीतावर सावरकरांच्या जयोस्तुऽते ची छाप पडलेली स्पष्ट आढळते व गीतेच्या चौथ्या अध्यायाचाही आधार घेतलेला आढळतो. प्रस्तावना शिवजन्मापासून अफझलखान वधापर्यंतच्या सर्व घटनांचे ज्ञान करून देते. नांदीमधील काव्यात्मकता सुंदर आहे व शिवाजीचे गुणगायन हे उद्दिष्टही सूचित केलेले आहे. जागोजाग आलेली रूपके खुलून दिसतात. मल्लारि, स्वतंत्रताश्री, शुभ्रेन्दु, सोहिरा वगैरे शब्द वैशिष्टयपूर्ण संस्कृत शब्दांची आठवण करून देतात.

पहिल्या अंकात मावळ्यांनी गायलेल्या गीतावर श्री. ब.मो.पुरंदरे यांच्या 'राजा शिवछत्रपती' या पुस्तकांतील प्रारंभीच्या गोंधळ गीताची छाप असल्याचे जाणवते. पोवाडयाप्रमाणे असलेले महाराष्ट्राच्या गौरवशाली परंपरेचे आदर राखणारे हे एक स्तुतिगीत आहे. परमानंदाविषयीचा अनादर सोडल्यास पहिला अंक चांगला वठलेला आहे. त्यात काव्यात्मकतेचा वापर केला आहे. अनेक घटना एकत्रित आणल्या असून शिवाजी विषयीचा आदरभाव प्रत्येक ठिकाणी दिसून येतो.

मनाच्या श्लोकांचे भाषांतर हुबेहूब केले आहे. शिवाजी व शहाजी यांचे भाषण तेजस्वी असून त्यामध्ये राजनीतीचे सार एकत्रित आले आहे. जागोजाग मनाचे श्लोक, सुभाषिते व हितोपदेशासारखी भाषांतरित व रूपांतरित संस्कृत वाक्ये बेमालूम चमत्कृतपणे बसविलेली आहेत.

शिवाजी हा पितृभक्त, मातृभक्त, गुणी लोकांची योग्य कदर करणारा, राजनीतिज्ञ, स्वराज्यसंस्थापना करण्यासाठी रात्रंदिवस तळमळणारा, महाराष्ट्राच्या गौरवशाली परंपरेचे जतन करणारा, न्यायप्रिय, युध्दकौशल्य एकाचवेळी अनेक आघाड्यांवर लक्ष, इ. गुणवैशिष्ट्ये दाखविलेली आहेत.

अनुष्टुभ, उपजाति, इन्द्रवज्रा, उपेन्द्रवज्रा, रथोध्दता, स्वागता, विद्युन्माला, शालिनी, वियोगिनी, द्रुतविलंबित, वंशस्थ, भुजंगप्रयात वसंततिलका, पंचचामर, मन्दाक्रान्ता, हरिणी, पृथ्वी, शिखरिणी, शार्दूलविक्रीडीत, स्त्रग्धरा, कलावती, प्रभावती, रुचिरा, सदागति इ. वृत्ते योजलेली आहेत.

गझल, दोहा, साकी याप्रमाणे मात्रावृत्ताचीही योजना केलेली आहे. या नाटकांत अनेक सुंदर सुभाषितेही आलेली आहेत. उदाहरणार्थ

कर्मायत्तं फलं पुंसां दुर्जनस्य कुतो दया
वृक्षारोहे फलाकाङ्क्षी कपिं मर्दितुमर्हति ।।
न स्यात् सौख्यं, मातृभूः स्यात् स्वतन्त्रा
मृत्युः श्रेयान्, न स्वधर्मावमानः ।। वगैरे

श्री. केळणाकरांच्या साहित्यावरील काही जणांचे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

" यापूर्वी कुठलेही संस्कृत पुस्तक इतक्या सहजतेने वाचलेले स्मरत नाही. असामान्य भाषाप्रभुत्वाखेरीज सोपे लिहिणे जमत नाही. गाण्यांच्या भाषांतराने तर मी थक्कच झालो, तो एक चमत्कारच आहे. "

-श्री. पु.ल. देशपांडे

`संगीत सौभद्रम्` I cannot describe in words my joy and satisfaction at the consummate execution of the task. Your dialogues and songs are par excellence. Your mastery over the Sanskrit language is astounding.

-Shri P.K. Atre

Your ability at handling so many different metres is certainly amazing. They have been beautifully composed showing a thorough grasp of the language of Gods together with an ear for music in the selection of words.

-Dr. Sunitikumar Chatterji

It is a beautiful tribute to the extraordinary qualities of Dr. Kane.

-Prof. D. Sinor, Cambridge

प्रशंसनार्हा निःसंदेहमेषा नाट्यकृतिः । तस्यां निपुणं संविधानकं सहजमनोहरा प्रसादयुता लेखनशैली इति गुणद्वयं भूयिष्ठं दृश्यते इति मे मतिः ।

-डॉ. चि.द्वा. देशमुख

या आणि यासारख्या अनेक अभिप्रायावरून श्री. वेलणकरांच्या प्रसन्नमधुर शैलीची व संस्कृतवर असलेल्या प्रभुत्वाची जाणीव होते.

याशिवाय श्री. वेलणकरांनी विष्णुवर्धापन, गुरुवर्धापनं, जयमङ्गला, जीवनसागर, संगीतसौभद्र, कालिदासचरितम्, रणश्रीरङ्ग., कालिन्दी, कैलासकंप, स्वातंत्र्यलक्ष्मी, प्राणाहुती, हुतात्मा दधीचि, राज्ञी दुर्गावती,

जवाहरचिंतनं, विरहलहरी, मेघदूतोत्तरं, स्वातंत्र्यचिंतामणी, स्वातंत्र्यचिंता, स्वातंत्र्यमणि, गीताविर्णा, तत् त्वं असि, जन्म रामायणस्य, आषाढस्य प्रथमदिवसे, तन्यो राजा भवति कथं मे, तत्वमसि, छत्रपति: श्री शिवराज: इ. कादंबरी, नाटक, गीतसंग्रह इ. अनेक वाड्.मय प्रकारांत संस्कृतमध्ये ग्रंथरचना केली आहे.

शिवाय मराठीमध्ये राधामाधव व प्रणयधारा या दोन कादंब-या व इंग्रजीमध्ये Similes in Rigveda, Mail Arrangements इत्यादी अंतिर ग्रंथरचनाही केलेली आहे.

प) शिवराजाभिषेकम् :

डॉ. श्री.भा. वर्णेकरांनी लिहिलेले `शिवराजाभिषेकम्` हे नाटक म्हणजे सप्तअंकी रूपक आहे. संस्कृत वाड्.मयात असलेला रूपकांसलेचा उपक्रम स्तुत्य व अभिनव आहे.

या नाटककाराचे वास्तव्य नागपूर येथे असून संस्कृत साहित्याचे ते गाढे अभ्यासक व कवि म्हणून ते समाजाला सुपरिचित आहेत. यापूर्वीच कविता, नाटक, संवाद इ. क्षेत्रांत . ग्रंथकार या रूपाने त्यांनी पुष्कळ यश संपादन केले आहे व ते विख्यात आहेत.

त्यांचे `शिवराज्योदयम्` नावाचे ६८ सर्गाचे शास्त्रीय लक्षण व अनुबंधानी युक्त महाकाव्य प्रकाशित झाले आहे. हे महाकाव्य अप्रतिम सौष्ठव, महाकाव्याचे गुण आणि परिणाम आणि अनन्य माहात्म्यातिशय यामुळे आधुनिक संस्कृत भाषेतील कवींमध्ये त्यांना अत्युच्च पद मिळवून देणारे झाले.

प्रस्तुत स्तुत्य ` शिवराजाभिषेकम्म् ` आधुनिक युगांत हिंदु राज्याची प्रतिष्ठापना करणाऱ्या व गोब्राह्मण प्रतिपालक असलेल्या शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाच्या त्रिशत सांवत्सारिक महोत्सवप्रसंगी प्रयोगासाठी रचले.

डॉ. वर्णेकर काव्याचे अनुशीलन करणाऱ्या समकालीन साहित्यिक तसेच विद्वानांमध्ये गौरवाने परिचित आहेत. त्यांची कविता रसयुक्त, प्रसादपूर्ण व अर्थबोधक अशी आहे. कल्पनाशक्ती व रमणीय शब्दांची योजकता यांमुळे त्यांच्या वाणीने निःसंशय कविकुलगुरु कालिदासाचे अनुकरण केले आहे. कालिदासाप्रमाणें त्यांनीही वैदर्भीरितीचे अनुसरण केले आहे. वैदर्भीरितीचा जन्मदाता कालिदास तसेच विदर्भात वास्तव्य केलेल्या श्री.वर्णेकरांना या वैदर्भी शैलीच्या संदर्भात ` सारस्वती जन्मभूः ` अशी विद्वानांनी दिलेली ` पदवी ` सार्थच आहे.

मधुर वर्णांनी युक्त, शब्दांतून अचूक भावना व्यक्त करणारी व भावनांचे अंर्तनिरीक्षण करणारी, कवि अनुरागाचे प्रदर्शन करणारी, अशा या त्यांच्या कवितेने अनुपम रमणीयत्व धारण केले आहे.

भारतीय संस्कृती विषयक प्रेम प्रदर्शित करणाऱ्या कवीच्या दृष्टि-कोनातून धर्म, समाज या विषयींची आदर्श व्यवस्था प्रदर्शित केलेली आहे. म्हणूनच उत्कर्षदायक साहित्यिक गुणांनी युक्त अशा या नाटकाला सांप्रत राष्ट्रीय महत्व व आत्मियता प्राप्त झालेली आहे. वर्णेकर हे बहुश्रुत व बहुज्ञ कवी होत. विशाल भारतीय संस्कृत वाङ्मयात त्यांचे व्यक्तिमत्व स्पृहणीय व उद्बोधक म्हणून दृष्टीस पडते. पूर्वीच्या ग्रंथांमधून नाना पुराण, निगम-आगम शास्त्रांतील सूक्ष्म अवलोकन दृष्टीस पडते. तसेच या नाटकांतही दिसते. कवीची अवलोकन दृष्टी सूक्ष्म आहे. भारतीय इतिहासांतील मध्ययुगीन कालातील विशेष वृत्तांत या ठिकाणी वापरलेला आहे.

प्रस्तुत नाटकामध्यें समाजाचे प्रतिबिंब पडलेले दिसते. तसेच महाराष्ट्रीय संस्कृतीच्या छटा, विशेषत: लोक आचार, कुलाचार विषयक संस्कृती दिसून येते. भावग्रहणा व शब्दप्रतिमा दर्शविणारे कवी म्हणजे वर्णेकर हे होत. पूर्वीच्या कवींची शब्द योजकता व शब्दप्रकारांचे बाहुल्य येथे प्रदर्शित झालेले आहे. पूर्वसूरींना अनुसरून वर्ण्य-विषयांनी युक्त अशी वर्णेकरांची काव्य निर्मिती चातुरी वाचकांच्या मनाला आनंद देते. तशीच ती हृद्य व मनोहारिणी होय. तसेच कवीचे नवीन उपक्रम अनुकरणीय आहेत. त्यांचे भाषाविषयक नैपुण्य अमोघ आहे. वाणी त्यांना वश झाल्याप्रमाणे दिसते. वैदर्भी रीतिप्रमाणेच गौडी व पांचाली रीतींनीही योग्य स्थानी काव्य शोभा वाढविली आहे. कांही ठिकाणी सुप्रसन्न शब्द, तर काही ठिकाणी गंभीर अर्थ प्रकट करणारे थोडे शब्द, समास, सरस व सरल वाणी, ओजपूर्ण शब्दावली दृष्टीस येते. चरित्र-चित्रण करणारी, देशकालाचे अनुसरण करणारी, योग्य ठिकाणी परिवर्तन घडविणारी, मनाला आनंद देणारी आहे. रचनेत छंदाचे वैचित्र्य व विषयाची चमत्कृती आहे.

स्रग्धरा - शार्दूलविक्रीडीत वगैरे वृत्तातून समजलेल्या रमणीय शब्द छटा, अस्खलित पदप्रयोग पंडितराज जगन्नाथाची स्मृती करून देतात. वसंततिलका वगैरे छंदबद्द व नैसर्गिक पदविस्तारांनी युक्त असे काव्य आहे. शब्द व अर्थालंकारात कवी निपुण आहे.

प्रथम अंकात सात छाया दृश्य दाखवून नायकाच्या पूर्वचरित्र चित्रणात कवीने अद्भुत नैपुण्य दाखविले आहे. राज्याभिषेकाच्या वेळच्या वैदिक व पारंपारिक शास्त्रीय कार्यपद्दती कवीचे श्रोत्रियत्व दाखविते. वर्णेकर हे सर्वार्थाने कवी, नाटककार, गीतकार, साहित्यशास्त्रज्ञ, श्रोत्रिय विद्वान इ. अनेक भूमिका कौशल्याने एकाचवेळी पार पाडतात. शब्दांचे अन्वेषण, अर्थ-

प्रकल्प, रचना वैचित्र्य व नैसर्गिक प्रतिभाशाली कवी म्हणून ते प्रसिध्द आहेत. संस्कृत कवी समाजात त्यांना मानाचे स्थान आहे. गेली २५ वर्षे ज्ञानार्जनाची तपश्चर्या करून, सतत अभ्यास करून वर्णेकरांची प्रतिमा उत्कर्षाचे शिखर चढवीत आहे. " नागपुर संस्कृत साप्ताहिक पत्र भवितव्य " चे ते संस्थापक व संपादक या रूपाने त्यांनी स्वत:च्या स्वतंत्र गद्य शैलीचा आविष्कार केला आहे. स्फुट कविता रचनेमधील त्यांचे प्राविण्य वाखाणण्याजोगे आहे. अर्वाचीन संस्कृत साहित्य या शोधग्रंथाबद्दल त्यांना डी. लिट्. ही उच्च पदवी प्राप्त झालेली आहे.

भारताचा इतिहास निर्माण करणाऱ्या त्यासाठी अद्भुत योगदान करणाऱ्या विवेकानंद, सावरकर, जवाहरलाल नेहरू, रामकृष्ण परमहंस वगैरे देशनायकांना त्यांनी स्वत:च्या काव्यात अमर केले आहे. आणि छ. शिवाजी महाराजांच्या चरित्र विषयावर महाकाव्य व नाटकाची निर्मिती करून आपल्या निर्माण कृतींची त्यांनी पराकाष्टा घडवून आणली.

या नाटकातील सर्व पात्रे ऐतिहासिक आहेत. शिवाजी, जिजाबाई, सोयराबाई, शंभुराजे, राजाराम, गागाभट्ट, परमानंद, केशवदैवज्ञ, अनंतदेवभट्ट निश्चलपुरी, मोरोपंत, ऑक्झेण्डन ही सर्व पात्रे महाराष्ट्र इतिहास तज्ञांना सुपरिचित आहेत.

या नाटकात त्यांचा परिचय संभाषण वगैरेतून होत जातो. हिरकणी हे नाव तर सुविदित आहे. त्यासंबंधीची लोककथा या नाटकात सांगितली आहे. इतिहासाला अप्रसिध्द असे श्रीधर व देवदत्त हे परमानंदाचे पुत्र पित्याप्रमाणेच काव्यकलानिपुण दाखविले आहेत. हिरकणिकेची सखी रत्नमाला हे अनैतिहासिक कविकल्पित पात्र आहे. सर्व घटना दुरान्वयाने इतिहासग्रंथांशी जोडून कथावस्तुमध्ये प्रत्यक्ष प्रदर्शित केलेले आहे किंवा संवादातून निदर्शित केले. त्या त्या ठिकाणी निर्दिष्ट केलेली स्थाने वास्तव आहेत.

`शिवराजाभिषेकम्` नाटकाच्या कथावस्तुमध्ये प्रथम नांदी गायनानंतर सुप्रसन्न सूत्रधार शिवरात्रिनिमित्त शिवमंदिराकडे येऊन जाणाऱ्या व नेहमीच्यावेळी न आलेल्या गृहिणीची दीर्घकाळ प्रतीक्षा करीत असतो. त्याचवेळेस तेथे आलेली ती उशीराचे कारण निवेदन करते. शिवराज्य उत्सवाच्या निमित्ताने रायगडावर नव्याने बांधलेल्या श्री जगदीश्वर मंदिराच्या शिवअभिषेकासाठी पौलस्त्यपुरवासी सर्व सुवासिनी तेथे गेल्या होत्या, तेथे स्वतःच्या मातेबरोबर आलेल्या शिवराजाच्या दर्शनाने देवदर्शनाचे पुण्य प्राप्त झाल्याचे मोठया आनंदाने ती सूत्रधाराला सांगत असताना तो म्हणतो, `राजाच्या दर्शनाने देवदर्शनाचे पुण्य तेंव्हा प्राप्त होते, जेंव्हा तो राजा यथाविधी सुवर्ण सिंहासनावर बसून मस्तकावर अभिषेक करून घेतो आणि सर्व लोकांच्या हृदय सिंहासनी आरूढ झालेला शिवराज अजून अभिषिक्त झालेला नाही त्याचवेळी अचानक प्रवेश केलेला नट शिवराजचरिताचा लोकोत्तर महिमा वर्णन करतो. पडद्यामध्ये परमानंदाच्या गुरुकुलामध्ये आलेल्या श्री गागाभट्ट प्रमुख असलेल्या सभाजनांसाठी गुरुकुलांतील विद्यार्थी `पूर्वशिवचरितम्` नांवाचे अपूर्व छाया नाटक रात्री दाखविणार आहेत, अशी घोषणा ऐकून सर्वजण हे पाहण्यासाठी जातात.

छाया नाटक नांवाच्या पहिल्या अंकात सात दृश्ये आहेत.

पहिल्या दृश्यात प्राचीन शिवमंदिरात शिवलिंगाजवळ तलवार धारण केलेला हात उंचाविलेले शिवाजी प्रमुख असलेले तरुण प्रदक्षिणा घालीत आहेत. दुसऱ्या दृश्यात राजसभेमध्ये सिंहासनावर बसलेला व मंत्र्यांनी वेढलेला विजापुराधीश आहे. तेथे प्रवेश केलेला गुप्तहेर विजापुर साम्राज्याच्या शिवाजीने केलेला विध्वंस निवेदन करतो. तेंव्हा पडद्यामागे बसलेली यवनराजमाता सर्व अधिकाऱ्यांचा धिक्कार करते व सुवर्ण ताम्बूल युक्त पात्र सर्वांपुढे धरते. सभेमध्ये बसलेला अफझुल्लखान सर्वांचा धिक्कार करून विडा उचलतो. यवनराजमाता त्याला

रत्नहार समर्पण करते व शिवाजीला मारण्यासाठी राजा स्वत:च्या कमरेचे खड्ग. देतो. अफझुल्लखान सर्वांचा धिक्कार करतो.

तिसऱ्या दृश्यात सभागृहामध्ये मंत्री व अफझुल्लखान शिवराजाच्या आगमनाची प्रतीक्षा करीत असतात. शिवाजी ` जय जगदंबा ` अशी गर्जना करून मंडपामध्ये प्रवेश करून त्याला आलिंगन देतो. अफझुल्लखान, ` अरे, मेलो मी ` असे जोराने ओरडतो.

चवथ्या दृश्यात घनदाट अंध:काराने वेढलेल्या किल्ल्याभोवती फिरणारे यवन सैनिक डिंडिम घोषणा ऐकून झोपतात. त्यावेळी माले वगैरेंनी सज्ज असलेला शिवाजी मित्रांसहीत प्रवेश करतो. पडद्यामध्ये घोड्यांच्या टापांचा ध्वनि, ऐकू येतो. बाजिप्रभु शिवाजीला जाण्याबद्दल प्रार्थना करतो. मित्रमंडळींना आलिंगन देऊन शिवाजी जातो.

पांचव्या दृश्यात राजसभेमध्ये लोकव्यवहारासाठी धर्मासनावर आरूढ झालेला शिवराज तेथे दुसऱ्याच्या स्त्रियांचा अपहार करणाऱ्या अपराध्याचे पाय व हात तोडण्याचा आदेश देतो. नंतर यवनस्त्रीला घेऊन प्रवेश केलेल्या पुरुषाचा धिक्कार करून सेवकजनांच्या अपराधाबद्दल त्या धर्मभगिनीची क्षमा याचना करून तिला सौभाग्यालंकारांनी अलंकृत करून पतीजवळ पाठविण्याचा अमात्य मोरोपंतांना आदेश देतात.

सहाव्या दृश्यात आग्रा येथे राजप्रासादात कापुंली बांधलेला शास्ताखान व मस्तक बांधलेला जसवंतसिंह शिवराजाच्या आगमनाचे वृत्त ऐकून घाबरतात. नंतर कंगळी घातलेल्या राजपुत्रासह शिवाजी रामसिंहाबरोबर प्रवेश करतो. तेंव्हा श्रेष्ठ राजपुरुषांमागे स्थापन केलेल्या काष्ठपीठांवर आसन-परिग्रह करण्यासाठी निर्दिष्ट केल्यामुळे रागावलेला शिवराज ` अविचारी राजाच्या नगरीत थांबू इच्छित नाही ` असे म्हणून निघून जातो.

सातव्या दृश्यांत औरंगजेबाच्या कारागृहात पुत्राच्या सुटकेसाठी अवघड तप करणाऱ्या जिजाम्बाला सुना फलाहारासाठी प्रार्थना करतात, पण त्या ते स्वीकारत नाहीत, तेवढ्यांत ` जय जय रघुवीर समर्थ ` अशी गर्जना करीत प्रतिहारी प्रवेश करतो. संन्यासी वेष धारण केलेला शिवराज मातेला साष्टांग प्रणाम करतो.

पंडितसभा नांवाच्या दुसऱ्या अंकातील पहिल्या दृश्यांत हीरकणिका व रत्नमाला जिजाबाईच्या आज्ञेने शिवरात्रीच्या पारणा निमित्त गुरुकुलांच्या विद्यार्थ्यांसाठी दुग्धकुंभ नेतात. मार्गामध्ये हीरकणिका स्ववृतान्त निवेदन करीत शिवराजाच्या गुणग्राहित्वाचे वर्णन करते. पडद्यामध्ये जैत्रयात्रेसाठी जाणारा शिवराज गुरुकुलामध्यें एक तास थांबणार असल्याची घोषणा होते. परमानंदाचे पुत्र श्रीधर व देवदत्त हे गागाभट्ट वगैरे प्रमुखांच्या सन्मानासाठी सभागृह सजवितात.

दुसऱ्या दृश्यामध्यें परमानंद सभागृहांत आलेल्या गागाभट्ट व अनंत-देवभट्ट यांचे अभिनंदन करतो. त्यावेळी ` पूर्वशिवचरितम् ` यामध्यें शेवटी कवीने अभिषेक वर्णन केला नाही, असा अपूर्णत्वाचा दोष गागाभट्ट दाखवितात. राज्याभिषेक दाखविण्याची इच्छा असूनही तो झालेला नसल्यामुळे नाटकामध्यें प्रदर्शित केला नाही असे परमानंद आत्मसमर्थन करतो. तेंव्हा भट्टपादांनीच शिवराज्याभिषेकाचे आयोजन करावे असे अनंतदेवभट्ट म्हणतो. त्यावेळेला तांत्रिक निश्चलपुरी व केशवदैवज्ञ गागाभट्टांच्या दर्शनासाठी येतात. या पंडितांना राज्याभिषेक विषयक चर्चेमध्ये गागाभट्ट ` काशी नगरीतून आलेला हा गागाभट्ट शिवराज्याभिषेक केल्याशिवाय जाणार नाही ` अशी घोषणा करतो. तेथे संवादामध्ये तांत्रिक निश्चलपुरी तंत्रोक्ताभिषेकाचा अभिनिवेश प्रकट करतो. पडद्यामध्ये जैत्रयात्रेसाठी गेलेल्या शिवराजाचे गुरुकुलाकडे आगमन झाल्याची घोषणा होते.

महाराजानुमोदनं नावाच्या तिस-या अंकामध्ये गुरुकुलामध्ये शिवराजाचे मोरोपंतासह आगमन होते. परमानंद गागाभट्ट प्रभृतींचा यथाक्रम परिचय करुन देतात. सर्व पंडितवर्ग स्तोत्र गाऊन पुष्पमालांनी शिवाजीची पूजा करतो. त्या संवादाच्यावेळी शिवराज काशीक्षेत्राविषयी स्वत:ची श्रध्दा प्रकट करतो. ` यवनदास्यातून मुक्त केलेल्या काशी नगरीमध्ये भगवान विश्वेश्वराला रत्नाभिषेक योग्यवेळी करण्याची आकांक्षा शिवराजांनी स्वत: व्यक्त केली. गागाभट्टांनी राज्याभिषेकाची आकांक्षा स्पष्ट प्रकट केली, ` जर मला माता जिजाम्बाने राज्याभिषेक विधीला अनुमोदन दिले तर तुमचे मनोरथ पूर्ण होतील ` असे शिवराज म्हणातात. रणतूर्यध्वनि ऐकून पंडितांचे आशिर्वाद विनयाने घेऊन शिवराज जातात.

मातृसंमति नावाच्या चवथ्या अंकात पांच वर्षाच्या राजारामाला हीरकणिका खेळवीत असते. पण लाकडी हत्तींवर बसून तो संतुष्ट होत नाही. राजाराम शंभुराजासह जिजाम्बाच्या मंदिरी जातात. तेंव्हा मांडीवर खेळणा-या राजाराम व शंभुराजासह जिजादेवी रामायण कथा उपाध्यायाच्या मुखातून ऐकत असतात. त्यामध्यें रामराज्याभिषेक वर्णनाचा सर्ग चालू असतो. एवढयांत परमानंदासह गागाभट्ट वगैरे प्रमुख विद्वान जिजाम्बाच्या घरी येतात व योग्यतेनुसार परिचय झाल्यानंतर ते सर्व राज्याभिषेकासाठी आल्याचे येण्याचे प्रयोजन सांगतात. त्यावेळी ` जे कोणी शिवराजाच्या राज्यशासनाला प्रमाण मानीत नाहीत ते वेदोक्त राज्याभिषेकाच्यामुळे अवश्य प्रमाण मानतील ` असे गागाभट्टाचे भाषण ऐकून जिजाम्बा त्या अभूतपूर्व राज्याभिषेक उत्सवासाठी अनुमती देतात.

भगवदर्चनं नावाच्या पांचव्या अंकामध्ये शिवराजाच्या विजयवृतान्त श्रवणाने सुप्रसन्न झालेली जिजाम्बा स्वहस्ताने वेचलेल्या हजार कमळांनी जगदीश्वराच्या पूजेची इच्छा करते. ती आजारी व वृध्द असल्यामुळे पूजेसाठी

राजाराम पुढे गोळा करतो. त्याच वेळेत शंभुराजाही तेथे येतो. राज्याभिषेक महोत्सवासाठी नाना देशांत राहणाऱ्या विद्वान, कलावंत, सभासद यांच्या स्वागतासाठी महाराज युवराजांचीच नियुक्ती करतात. स्वतःच्या अभिषेका-पूर्वी भगवान महाबळेश्वराचा अभिषेक व छत्र धारण करण्यापूर्वी प्रतापदुर्गावरील अधिदेवता जगदंबेच्या शिरावर सुवर्णछत्र अर्पण करण्याचा समारंभ करण्याचे ठरवितात.

परमानंदासह सपत्नीक गेलेले शिवराज पंचगंगेने युक्त असलेल्या पवित्र महाबळेश्वर तीर्थाला पोहचतात. परमानंद तेथील हृदयंगम निसर्गसौंदर्याचे वर्णन करतो. तेथील पिप्पलवृक्षाखाली श्रीरामदासाने स्थापन केलेली मारुती मूर्ती पाहून त्यांच्या अनुग्रहाचा वृत्तांत शिवराज राणीला सांगतात. नंतर गाणाऱ्या व नाचणाऱ्या भाविकांचा घोळका पाहून श्री तुकारामांच्या स्मरणाने त्यांचा वृत्तांत राणीला निवेदन करून त्यांच्या वैराग्याची स्तुती केली. नंतर वटवृक्षाखाली विश्रांती घेणाऱ्या महाराजांची राणीसह शेकऱ्यांच्या स्त्रिया नीरांजन विधीने पूजा करतात. नंतर महाबळेश्वराच्या लिंगावर गंगा वगैरे सप्त-तीर्थजलांनी शिवराज अभिषेक करतात. काव्य करण्यांत कुशल असलेल्या परमानंदाने अभिनव महाबळेश्वरस्तोत्र रचले. त्यामुळे प्रसन्न झालेल्या शिवाजीने त्याला ' कवीन्द्र ' अशी पदवी देऊन व नवरत्नांचा हार देऊन त्यांचे अभिनंदन केले व अंबिकेसाठी सुवर्णछत्र अर्पण केले.

राजाभिषेक वर्णन नांवाच्या सहाव्या अंकामध्ये अस्वस्थ प्रकृती असलेल्या जिजादेवींच्या औषधासाठी कमलमधु आणण्यासाठी रात्री पाठविलेली रत्नमाला रामगिरीवर विदेशातून आलेल्या कलावंताचे नृत्य वगैरे पाहते. तिला विलंब झालेला पाहून हीरकणिका तिला रागावते. त्या दोघी औषध देण्यासाठी जिजामातेकडे जातात. तेथे रामायण वाचण्यासाठी आलेल्या उपाध्यायाकडे त्या गागाभट्ट विरचित राजाभिषेक प्रयोग ग्रंथातील शिवराजाभिषेक वर्णन ऐकण्याची

इच्छा करतात. उपाध्याय ते वर्णन वाचतात. त्यामुळे अतिशय आनंदित होऊन मनाने तो प्रसंग डोळ्यासमोर उभा करून अतिशय आनंदित होतात व निद्रासुखाचा अनुभव घेत असतांही मराठी गीत हळूहळू गातात.

सिंहासनारोहण नांवाच्या सातव्या अंकामध्ये ऑक्झोण्डन पुढारी असलेला युरोपीय प्रवाश्यांचा घोळका प्रवेश करतो. परमानंदाकडून प्रवेशपत्रक दर्शनानंतर त्यांना प्रवेशाची अनुमति मिळते. तेथे प्रासादाच्या महाद्वारा-वरील प्रचंड हत्ती पाहून त्यांना आश्चर्य वाटते.

पहिल्या दृश्यामध्ये सुवर्ण सिंहासनावर परिवारासह बसलेला शिवराज असून हातांत सुवर्णछत्र धारण केलेला गागाभट्ट मोठ्या आवाजात वेदमंत्र म्हणतात. प्रवासी पाश्चात्य प्रतिनिधींचे आगमन महाराजांना निवेदन केल्यानंतर त्यांच्या अनुज्ञेने प्रविष्ट झालेला तो घोळका स्वदेशाच्या पध्दतीप्रमाणें प्रणाम करून तूर्यध्वनीसह स्तुतिगीत गातात. पाश्चात्य शिवराजाला स्वतःची नाणकशाळा निर्माण करण्यासाठी प्रार्थना करतात. त्यांचा अभिप्राय जाणून ते स्वतःचा स्वावलंबनाचा सिध्दांत सांगतात व नंतर अतिथी गेल्यानंतर आईला वंदन करण्यासाठी शिवाजी परिवारासह जातो.

दुसऱ्या दृश्यामध्यें जिजाम्बा शिवराजाच्या आगमनाची प्रतिक्षा करीत असतात. तेथे निश्चलपुरी ` तांत्रिक अभिषेक झाल्याशिवाय राज्या-भिषेकाचे मनोरथ पूर्ण होत नाही ` असे सांगतो. त्याची इच्छा पूर्ण करण्याचा जिजाम्बा महाराजांना उपदेश करतात. नंतर मातृमहिमा गाऊन ` हे तुझ्या पुत्राचे वैभव तुझाया चरणावर अर्पण करीत आहे ` असे म्हणून राजमुकुट तिच्या चरणांवर अर्पण करून ` हेच माझे पूर्ण मनोरथ होय ` असे सांगतो व भरतवाक्य होऊन नाटक संपते.

अशा रितीने या नाटकांत ऐतिहासिकता व कल्पनारम्यता यांचे बेमालूम मिश्रण करून मधुर भाषा शैली, व्यक्तिचित्रे रेखाटण्याची अद्वितीय हातोटी, त्या पार्श्वभूमीवर हृदयंगम निसर्गवर्णन व हिंदू व महाराष्ट्रीय संस्कृतीतील आदर्शांचे चित्रण यामुळे हे एक अद्वितीय नाटक म्हणून प्रसिध्द झाले आहे.

फ) <u>शिवराज्योदयम्</u> :

डॉ. श्री.भा. वर्णेकर यांनी लिहिलेल्या ` शिवराज्योदयम् ` या संस्कृत महाकाव्यातील ६८ सर्गामध्ये आलेले विषय पुढीलप्रमाणे आहेत.

सर्ग-१ - सह्यमहाराष्ट्रीयम् - मंगलाचरण, सह्याद्रीचे ऋतूंमधील सौंदर्याचे वर्णन, निसर्गाची रमणीयता, महाराष्ट्रातील प्रमुख तीर्थस्थानांचे वर्णन, आधिदैविकता, पंढरपुराचे वर्णन, पांडुरंगाची भक्ति, ज्ञानेश्वर, योगशक्ति, वीरता, कलासौंदर्य, वेदाभ्यास, धर्मराज्य, मुसलमान शासनाची आपत्ती, रक्षणासाठी भगवंताची प्रार्थना इ. विषय आलेले आहेत. (श्लोकसंख्या ५९)

सर्ग-२ - साधुवर्गद्वयम् - दोन साधुंचा उदय, परमेश्वराची करुणा, तुकाराम वर्णन, रामदास वर्णन, शिवसूर्योदयाची अपेक्षा, इ. विषय आले आहेत. (श्लोकसंख्या ५०)

सर्ग-३ - वसंतमाङ्गल्यम् - वसंतऋतूच्या सौंदर्याचे वर्णन, जाधवरावांच्या घरी साजरा होत असलेला वसंतोत्सव, मंडपवर्णन, मित्रांचे आगमन, पिता-पुत्र संवाद, उत्सुक किशोरी, किशोर परिहास, किशोराचा प्रमोद, शिवशैलूषा वर्णन, किशोरांची कुङ्कुम रंगावली, जाधवरावांची सभ्य लोकांमध्ये प्रार्थना,

वांगल्या लोकांचे अनुमोदन, मंगलाष्टकांचे गायन इ. विषय आले आहेत. (श्लोकसंख्या ७९)

सर्ग-४ - शिवजन्म - जिजादेवीचे पतीच्या घरी आगमन, गर्भवती जिजादेवी, डोहाळ्यांचेवर्णन, उन्हाळ्याचे वर्णन, जन्मवेळ, जन्म, शिशुचे तेज, नामकरण, शिवाजीच्या नावाचा अर्थ, शिवाजी नावा विषयीची लोकप्रियता, (श्लोकसंख्या ५८)

सर्ग-५ - शिवशिक्षणम् - बाल शिवाजीचे वर्णन, बाल शिवाजीच्या वीरलीला, गुरू दादोजी, क्षात्रविद्याकौशल्य, जिजादेवींचे संस्कार, जिजाकृत हितप्रबोध. (श्लोकसंख्या ५६)

सर्ग-६ - दम्पतीमतभेद - पुत्राच्या वीरतेवर पित्याचा संतोष, जिजादेवीच्या भाषणामध्ये शिवचारित्र्य वर्णन, शहाजीकृत जिजाबाईच्या भाषणाची स्तुती, राजसेवामाहात्म्य वर्णन, जिजादेवीने केलेले शहाजीच्या माताचे खंडन, शहाजीची सचिंतता, शिवाजीच्या आगमनाने पित्याचा हर्ष, शहाजीने केलेल्या राजधानीचे वर्णन, विजापुराला जाण्याची बाल शिवाजीची उत्सुकता. (श्लोकसंख्या ५३)

सर्ग-७ - राजधानी प्रवास - प्रवासमार्गात निसर्गाने केलेले शिवाजीचे स्वागत, सह्याद्री दर्शन, सह्य - वनेचरांचे दर्शन, वनेचरांनी केलेले शिवस्वरूपाचे वर्णन, वनफळांचा आस्वाद, पित्याने केलेला राजसेवेचा उपदेश, सभेत म्लेंच्छ राजाचा प्रवेश, मस्तक न नमविणारा शिवाजी, राजसभेमध्ये शिवाजीचा परिचय, राजमार्गात शिवाजीने गोघातकाला केलेला दंड, जनतेला परमानंद, गायीविषयी वात्सल्य (श्लोकसंख्या ५५)

सर्ग-८ - पारतंत्र्य जुगुप्सा - राजधानीला परत आलेल्या शिवराजाची पारतंत्र्यग्रस्त लोकजीवन दर्शनाने अंतर्व्यथा व रोषाचा उद्रेक, पुत्राची अवस्था पाहून जिजादेवीचे व्याकुलत्व, शिवाजीचा हृदयव्यथा आविष्कार, निश्चयाची घोषणा, जिजादेवीचा आशिर्वाद. (श्लोकसंख्या ३८)

सर्ग-९ - स्वातंत्र्यप्रतिज्ञा - शिवसैनिक गणांचे वर्णन, श्रीरोहिडेश्वराच्या मंदिरात प्रवेश, प्रार्थना, प्रार्थनेचा प्रभाव. (श्लोकसंख्या ४९)

सर्ग-१० - स्वातंत्र्यदिनोदय - श्रीरोहिडेश्वर मंदिरापासून परत आलेल्या शिवसैनिकांचा सर्वत्र संचार, गुप्तहेराने केलेले रहस्य निवेदन, मातेच्या चरणी जयासाठी आशिर्वादाची याचना, अभूतपूर्वजयासाठी निश्चयाची घोषणा, तोरणादुर्गजयाची वार्ता, सर्वत्र आनंद, म्लेंच्छ अधिपतींना अशुभ दर्शने, तोरणादुर्गावर संस्कार, सुवर्णलक्ष्मीचा लाभ, नवीन राजमुद्रा, स्वातंत्र्यदिनाचा उदय. (श्लोकसंख्या ४४)

सर्ग-११ - विजययात्रा - शिवराजाचे वीरोत्पादक भाषण, गुरु दादोजीचे वर्णन, दादोजीने केलेले शिवगुण वर्णन, स्वातंत्र्यफुंदास उत्तेजन, शिव अनुयायांचा हर्ष व विजयसंचार (श्लोकसंख्या ४८).

सर्ग-१२ - शत्रुव्यथा - विजापुर राजाची हृदयव्यथा, मंत्रिसभेमध्ये भाषण, मंत्र्यांचा आत्मविश्वास, शिवराजावर आक्रमण करून प्रशमन करण्याचा निश्चय, विजापुर राजाची शहाजीला मारण्याची सूचना, अमात्य-वर्गाचे व मुस्तफाखानाचे भाषण, दोन्हीकडे आक्रमणाची सूचना, मुस्तफाखानाचे प्रयाण. (श्लोकसंख्या ५२)

सर्ग-१३ - विपत्तिव्याघातः - गुप्तहेर प्रवेश, शहाजी कैदेचा वृतांत जिजादेवीची दयनीय अवस्था, शिवाजीच्या मित्रमंडळींची शोचनीय अवस्था,

दुसऱ्या गुप्तहेराचा प्रवेश, फत्तेहखानाच्या आक्रमणाचे निवेदन, शिवराजाचा शत्रुसंहार करण्याचा संदेश, शिवसैनिकांचे वीरोत्पादन, शिवराजाच्या पुरंदर दुर्गाश्रय, कावजिविराचे सुभानमंगल दुर्गावर आक्रमण, फत्तेहखानाचा पराभव, बाजी पासलकरांचे रणामध्ये निधन. (श्लोकसंख्या ६१)

सर्ग-१४ - पितृमोचन - जिजादेवीची दु:खी अवस्था, समर्थ रामदासाचा राजनीतिच्या मार्गावरील उपदेश, हितोपदेशामुळे शिवाजीला आनंद, गुरुदक्षिणेसाठी सर्वस्व अर्पण, शिवराजाचे दिल्लीपतीशी सख्य संपादनाचा निर्णय, रामदासांचा संतोष, दूतप्रेषण, सावित्रीव्रत, जिजादेवी अवस्था, जिजादेवीने गायिलेले सावित्रीस्तोत्र, शहाजी सुटकेची बातमी. (श्लोकसंख्या ४४)

सर्ग-१५ - यवनराजकौटिल्यम् - शहाजीकडे गुप्तहेराने सांगितलेले विमोचनाचे कारण, दिल्लीपतीविषयी शिवराजाने पाठविलेले प्रेषित पत्र, विजापुर राजसभेमध्ये शहाजी राजाचा सन्मान, विजापुर राजाचे शहाजीला उद्देशून कृत्रिम अर्थगर्भ भाषण, पितृआज्ञेने कोंडाणा किल्ला अर्पण. (श्लोकसंख्या ५२)

सर्ग-१६ - स्वराज्य सुधारणा - शहाजीराजाच्या पुत्रदर्शनाची इच्छा, शिवराजाच्या प्रजापालनामध्ये भीमसेनाशी सादृश्य, महादाजि - पुत्रांना दंड, पुरंदरावर नेताजीची नियुक्ती, चंद्रावाचा दुष्टपणा, शिवसेनेचे जावळीवर आक्रमण व चंद्रावाचे पलायन, चंद्राव मर्दन, संभाजी मोहित्यांच्या सावत्रभावाचे दमन, सह्याद्रि दुर्गामध्ये भगवद्ध्वजा, दिल्लीपतीच्या खजिन्याचे अपहरण, सागर तीरावरील दुर्गावर विजय, महासागरावरील नौकादंडावर काषायध्वजांची शोभा, पाश्चात्यांचे रत्नकोश दान, शिवराजदर्शनामुळे सागराला झालेला हर्ष. (श्लोकसंख्या ८०)

सर्ग-१७ - विजापुरेश - विमातृ-प्रकोप - विजापुर नरेश विमातृची प्रकोप वेदना, शहाजीला उद्देशून मातेचे अहंकारासहित क्रोधपूर्ण भाषण, शहाजीने केलेली त्या भाषणाची प्रशंसा, शहाजी भाषणामध्ये शिवराजाच्या राजा विरुध्द आचरणाचा हेतु, भावी विपत्ती निवेदन करण्यासाठी दूत प्रेषण. (श्लोकसंख्या ५१)

सर्ग-१८ - अफझुल्ल प्रतिज्ञा - विजापुरची राजसभा, राजमातेचा सभा प्रवेश, भाषणात सर्वांचा धिक्कार, शिवाजीचे नाव ऐकून घाबरलेले सभागृह, अफझुल्लखानांचे अहंकारयुक्त स्वपराक्रमाचे भाषण, विडा उचलणे, राजमातेला हर्ष, राजाला हर्ष. (श्लोकसंख्या ५६)

सर्ग-१९ - अफझुल्ल सेनाक्रमण - सैन्याचा गोंधळ, अफझुल्लवीराचे वर्णन, अपशकुनांचा उपहास, तुळजापूर मंदिराच्या भवानी मूर्तीचा ध्वंस, गोहत्या, पंढरपुराचा ध्वंस, लोकांना त्रास, शिवाजीचे स्थिर वागणे, भवानीचा साक्षात्कार. (श्लोकसंख्या ५३)

सर्ग-२० - कान्होजीवीराचा निश्चय - कान्होजीचे शिवाजीकडे परत येणे, अफझुल्लखानाचे निशाणी असलेले पत्र, कान्होजीला उद्देशून शिवाजीचे भाषण, शिवाजीविषयी भक्तिमय कान्होजीचे भाषण, शिवाजीच्या आज्ञेने कान्होजीचे स्वग्रामी गमन, मित्रमंडळींना गोळा करून कान्होजीचे वीरभाषण, मित्रांची जिज्ञासा, शिवाजीचे अनुसरण करण्याचा कान्होजीचा निश्चय, अफझुल्लखानाच्या पत्राचे दहन. (श्लोकसंख्या ५४)

सर्ग-२१ - संग्राम प्रोत्साहन - प्रतापदुर्ग वर्णन, जिजादेवी दर्शन, प्रतापदुर्गाकडे जाऊन शिवाजी स्वनिश्चय मातेला सांगतो, अफझुल्लवधासाठी जिजादेवी शिवाजीला आदेश, शिवधर्मपत्नीचे प्रोत्साहन, भवानी दर्शन, शिवाजीचे युध्दासाठी प्रयाण. (श्लोकसंख्या ५१)

सर्ग-११ - आपदाघाता: - प्रतापदुर्गावर स्वबांधवांना उद्देशून शिवाजीचे भाषण, शिवराजकृत वर्षाकाल वर्णन, निमंत्रित व मित्रमंडळींचे प्रतापदुर्गावर संमेलन, गुप्तहेर आंग्ल व पोर्तुगीझ लोकांच्या प्रतिकूल कामे शिवाजीला निवेदन, शिवाजीची चिंताव्याकुलता, पत्नी निधनाची वार्ता ऐकूनही शिवराजाची गंभीरता. (श्लोकसंख्या ५१)

सर्ग-१२ - रिपूदूतागमन - शरदऋतु वर्णन, कृष्णाजि भास्कर या दूताचे शिवसदनी आगमन, शिवाजीला उद्देशून त्याचे हितोपदेशपर भाषण, अनझुल्लाचे पत्र प्राप्त करून शिवाजीचे भाषण, अनझुल्लाचे मन्दोन्मत्त संदेश पत्र, संयमी शिवाजीचा संग्राम निश्चय. (श्लोकसंख्या ५२)

सर्ग-१४ - शिवदूतप्रयाण - महाबळेश्वर वर्णन, कृष्णाजी भास्कराने पंताजीला उद्देशून केलेले अनझुल्लसेना शिबीर वर्णन, शिवदूताच्या अनझुल्ला-पुढे कृत्रिम विनय व शिवपत्रसमर्पणम्, कृष्णाजिभास्कर शिवपत्र वाचून दाखवितो, अनझुल्लाला उद्देशून शरणागति सूचक पंताजीचे भाषण. (श्लोकसंख्या ५७)

सर्ग-१५ - अनझुल्ल व्यामोह - शिवाजी शरण आल्यामुळे आनंदित झालेल्या अनझुल्लाचे भाषण, अनझुल्ल अनुयायांची भयसूचना, रत्न-व्यापाऱ्यांना शिवाजीकडे नेण्यासाठी पंताजीची अनझुल्लाला प्रार्थना, आत्मस्तुतिपर अनझुल्लाचे भाषण. (श्लोकसंख्या ५४)

सर्ग-१६ - व्यूहरचना - अनझुल्लसेनेचे दुर्गममार्गक्रमण, पंताजी शिवाजीची प्रार्थना अनझुल्लाला निवेदन करतो. अनझुल्ल शिवाजीची प्रार्थना स्विकारतो, शिवाजीची व्यूहरचना, संमेलन तिथीला आगमन, ज्यासाठी शिवाजीची शिवोपासना. (श्लोकसंख्या ५१)

सर्ग-१७ - शिवप्रयाण - मदिराउन्मत्त अफझुल्लाच्या मित्रांपुढे भाषण, अफझुल्लाची वेशभूषा, अफझुल्लाच्या प्रयाणासमयी पंताजींनी वीरसैनिकांना माघारी पाठविण्याची प्रार्थना, पूजा पुरी करून शिवाजीची जाण्यासाठी सिध्दता, शिवाजीकडे मित्रमंडळींची प्रार्थना, मित्रांना उद्देशून शिवाजीचा संदेश. (श्लोकसंख्या ६०)

सर्ग-१८ - सभा मंडप - प्रतापदुर्ग मार्गावर अफझुल्लांचे आतिथ्य-सत्कार, संमेलन मंडपाचे वर्णन, शिवराज वैभवाने चकित झालेल्या अफझुल्लांचे भाषण, शिवप्रतिनिधींचे मोहक भाषण, अफझुल्ला शिवाजी येण्याची वाट पाहतो, शिवप्रतिनिधींचे भाषण व दूत प्रेषण, शिवाजीच्या विलंबाचे कारण, अफझुल्लखान अंगरक्षकाला दूर ठेवतो, शिवप्रस्थान. (श्लोकसंख्या ४७)

सर्ग-१९ - अफझुल्ल वध - मंदिराच्या द्वाराजवळ शिवाजींचे आगमन, जवळ आलेल्या शिवाजीला उद्देशून अफझुल्लाचे भाषण, स्वाभिमानयुक्त शिवाजींचे प्रतिउत्तर, शिवराजा व अफझुल्लाचे आलिंगन, अफझुल्लाचे पोट फाडणे, खड्ग. उगारलेल्या कृष्णाजी भास्कराला उद्देशून शिवाजींचे भाषण, कृष्णाजी भास्कराचा वध, शिव अंगरक्षक अफझुल्ला अंगरक्षकाला ठार मारतो, अफझुल्लाचे शिरच्छेदन, युध्दाला प्रारंभ, युध्दवर्णन. (श्लोकसंख्या ७६)

सर्ग-२० - मातृसंतोष - अफझुल्लाचे शिर पाहून जिजादेवीची शांती, जिजादेवीचा दयामय संदेश, बंदिवासात टाकलेल्या शत्रूपक्षीयांना शिवराजाचे आलिंगन, पळणारे शत्रूसेनाधिकारी, खंडोजीला दंड, शिवयशोगायन उत्सव. (श्लोकसंख्या ५३)

सर्ग-३१ - शिवयशोवर्धन - विजापूरराजाचे जल्पित, दारुण रोदनध्वनी ऐकून निर्माण झालेला विकल्प, अफझुल्लाची निधनवार्ता श्रवण, अंकुशखान वृत्तांत निवेदन करतो, शिवराजाचे गुणवर्णन, शिवाजीचे यश ऐकून विजापुराधीशाला झालेली वेदना. (श्लोकसंख्या ५०)

सर्ग-३२ - रुस्तुमफाजलखानांचा पराभव - अफझुल्लपुत्रांची दु:खितावस्था, रुस्तुमखान स्वकीयांना दुरवस्था सांगतो, फाझलरुस्तुमांना युध्दासाठी राजाचे प्रोत्साहन, सैनिकांचा निरुत्साह, आक्रमण वृत्तांत ऐकून शिवराजाची सिध्दता, यवनांचा नाश, गरीब व शरणागतांच्या बाबतीत सदयता, शिवराज स्ववीरांचा सन्मान करतो. (श्लोकसंख्या ६६)

सर्ग-३३ - जौहराक्रमण - विजापुरांत शिवविक्रम प्रभाव, जौहरखानाचे प्रार्थनापत्र, जौहरखानाचे वर्णन, जौहराचा सन्मान, विजापुर नरेशाचे भाषण, पर्णालदुर्गावर शिवाजी स्वसंरक्षाची योजना आखतो. (श्लोकसंख्या ५०)

सर्ग-३४ - शृङ्गापति - विजापुर सेनेचे पर्णालदुर्गाकडे आगमन, शास्ताखानाचे आक्रमण, गुप्तहेर वृत्तांत निवेदन करतात. विजापुर सेना पर्णालदुर्गाला वेढा घालतात, शिवाजीचा संरक्षणासाठी संदेश. (श्लोकसंख्या ५८)

सर्ग-३५ - कूटप्रयोग - चिंताव्याकुळ जिजादेवी, जिजादेवी नेताजीची निर्भर्त्सना करते, नेताजीचे भाषण, नेताजीच्या पराभवाचा वृत्तांत, सुटण्यासाठी शिवाजीचे प्रयत्न, दूत प्रेषण, जौहराकडे शिवाजीचे पत्र, शिवदूताचे भाषण, शरणागति वार्तेने जौहर सैन्यामध्ये गोंधळ. (श्लोकसंख्या ६१)

सर्ग-३६ - महासाहस - शिवाजी आपले विचार बाजीप्रभुंना सांगतो, जाण्यास उत्सुक शिवाजीला बाजीप्रभु स्वसहकार्याची याचना करतो. शिवाजीची अनुमती, शिवाजी संभाव्य संकटाची सूचना देतो, निष्क्रमण, (श्लोकसंख्या ५१)

सर्ग-३७ - शत्रूवंचना - रात्री संचार करणाऱ्या जौहराच्या गुप्तहेरांना माणसांचे दर्शन, शिवराज गमनाची वार्ता जाणून जौहराचे सैनिक शिवाजीसहित माणसांचा घोळका पकडतात, गुप्तहेरांकडून जौहराकडे वृत्तांत, जोहराचा जावई शिवाजीला सास-याजवळ आणतो, न्हाव्याच्या दर्शनाने स्वत:ची फसवणूक जौहर ओळखतो. (श्लोकसंख्या ५२)

सर्ग-३८ - बाजिहैातात्म्य - जौहराचे सैनिक शिवाजीचा पाठलाग करतात, बाजीप्रभु शिवाजीला प्रार्थना करतो, शिवाजीची व्याकुळता, मृत्युंजय प्रार्थना, शिवराजाचे गमन, बाजीप्रभुची युध्दसिध्दता व प्रोत्साहनपर भाषण, युध्द वर्णन, शस्त्र नाहीसे झालेल्या बाजीप्रभूचे भाषण, बाजिचे हौतात्म्य. (श्लोकसंख्या ८३)

सर्ग-३९ - जीवदान - गुप्तहेरांकडून बाजी निधनाची वार्ता, दिवंगत मित्रांची दैवी वाणी श्रवण, मातृदर्शन, पर्णाल दुर्ग जौहराला अर्पण, गुप्तहेर कार्तलबखानाचा तुङ्.गारण्यातील प्रवेश सांगतात. तुङ्.गारण्यामध्ये युध्द, राजव्याघ्री कार्तलबखानाचा शरणागतीचा उपदेश करते, कार्तलबाच्या सैन्याचे, दैन्य, दूतमुखाने दयायाना, शिवाजीचा दयाळूपणा, जलपानतृप्त यवनसैनिक शिवाजीची स्तुती करतात. (श्लोकसंख्या ७१)

सर्ग-४० - सूर्यरावमर्दन - शिवराजाचा कोकण प्रवेश, परशुराम पुजा, सूर्यरावाची अनुकूलता, गोऱ्डदण्डन, विजापुर नरेशाचा सूर्यरावाला आदेश, सूर्यरावाची यवनांच्या ताब्यातील वृत्ती, तानाजीचा पराक्रम, सूर्यराव शृङ्.गारपूराचा आश्रय घेतो, शृंगारपूराचा विध्वंस. (श्लोकसंख्या ५५)

सर्ग-४१ - शास्ताखान विमर्दनम् - शिवाजीच्या भाषणांत संकटाचे वर्णन, मित्रांच्या भाषणांत कर्तव्यातील कठिणपणाचे वर्णन,

मित्रमंडळींना शिवाजीच्या कर्तृत्वाविषयी विश्वास, गुप्तहेरांचा संचार, शास्ताखानाच्या घरावर आक्रमण, शास्ताखान जागा होऊन रागावतो, शिवाजीच्या प्रवेशाने संभ्रम, शास्ताखानाचे पलायन. (श्लोकसंख्या ८०)

सर्ग-४२ - सूरतदहन - सुरतनगरीचे वर्णन, शिवाजीचा निश्चय, शिवाजीच्या गुप्तहेरांचा सुरतमध्ये संचार, सेनेचे प्रयाण, त्र्यंबकेश्वराचे पूजन, सेनासंचार, सुरतेमध्ये गोंधळ, सुरत अधिकाऱ्यांचा मुत्सद्दीपणा, नागरिकांची भयव्याकुळता, शिवाजीचा दूत इनायतखानाच्या सभेमध्ये पत्र वाचतो, नगर लुटण्याची शिवाजीची राजाज्ञा, सुरत दहन, यवनदूताचा शिवराजसभेमध्ये प्रवेश, शिवराजाचा शत्रूपहास, यवनदूताचा वध, संहारसत्र, दग्धनगरीचे वर्णन, शिवाजीचे प्रयाण. (श्लोकसंख्या ९९)

सर्ग-४३ - शहाजिनिधन - धनंजय शिवाजीचे प्रजेकडून अभिनंदन, पित्याच्या निधनाचा वृत्तांत दूताकडून श्रवण, जिजादेवीचा अग्निप्रवेशाचा निश्चय, शिवाजीची शोक विव्हलता, जिजादेवी वर्णन, मातेला उद्देशून शोकमग्न शिवाजीचे भाषण, जिजादेवी अग्निप्रवेशाचा निश्चय सोडते, शिवाजी शोक करीत पित्याच्या गुणांचे स्मरण करतो. (श्लोकसंख्या ५४)

सर्ग-४४ - खवासखान मर्दन - विजयाला प्रारंभ, इखलासाजीझाखानाचा पराभव, विजापुर राजसभेमध्ये खवासखानाचे ताम्बूल ग्रहण, शिवाजीला मारण्याचे यवनराजाचे आज्ञापत्र, शिवाजीचा मुधोळ नगरांत प्रवेश, कुंदांत घोरपडे वंशसंहार, खवासखानाकडे शिवाजीचा आदेश, खवासखानाचे उत्तर, यवनसैन्याचे उन्मथन - (श्लोकसंख्या ७६)

सर्ग-४५ - सिन्धुदुर्ग निर्माण - शिवाजीचा विजय, सागरामध्ये द्विपदर्शन, ब्राह्मणांना भय, सिन्धुदुर्गासाठी भूमिपूजन, विजययात्रा, सुवर्णतुलेचा

उत्सव (श्लोकसंख्या ३९)

सर्ग-४६ - जयसिंहाभियानम् - चिंताक्रांत दिल्लीपती, औरंगजेबाने जयसिंहाच्या विक्रमाची केलेली स्तुती, जयसिंहाचे स्वामीनिष्ठामय भाषण, जयसिंहाच्या सेनेचे प्रयाण. (श्लोकसंख्या ३७)

सर्ग-४७ - जयसिंह निघण्याची वार्ता कळवितो, शिवाजीच्या मित्रांना उत्साह, शिवाजीच्या भाषणांत कोषमाहात्म्याचे वर्णन, जलयुद्धासाठी शिवाजीचे प्रयाण, गोकर्णक्षेत्री ज्योतिर्लिंगाचे पूजन, श्रीगणेशार्तिक्यम्, श्रीशिवार्तिक्यम् शिवभक्ती, विजययात्रेमध्ये धनलाभ, (श्लोकसंख्या ५१)

सर्ग-४८ - पुरंदरयुद्धम् - गुप्तचर दिलेरखानाच्या आक्रमणाची वार्ता सांगतो, मुरारबाजीचा पराक्रम, शिवाजीची संग्रामनीति, (श्लोक-संख्या ४२)

सर्ग-४९ - जयसिंह प्रबोधनम् - मित्रमंडळीत, जयसिंहाचे भाषण, शिवाजीच्या राजदूताचा प्रवेश, राजदूताचे भाषण, जयसिंहाचे भाषण, जयसिंहाकडे शिवराजाचा संदेश, जयसिंहाच्या हृदयांत स्वाभिमान उद्दीपन, जयसिंहाची शिवाजीच्या दर्शनाची इच्छा, (श्लोकसंख्या ७४)

सर्ग-५० - जयसिंहाभिप्राय - जयसिंहाच्या शिबीरामध्ये शिवाजीचा प्रवेश, जयसिंहाने शिवाजीचा केलेला सन्मान, पुरंदरदुर्ग प्रदान, जयसिंहाचे भाषण, शिवाजीची तहाला अनुमती, शिवाजीला दिल्लीला जाण्याची जयसिंहाची प्रार्थना. (श्लोकसंख्या ५१)

सर्ग-५१ - राष्ट्रहितोपदेश - दिलेरखानाची चिकित्सा, शिवाजीची सूचना, पर्णालदुर्गावर अयश, नेताजि स्वाधिकारापासून दूर, दिल्ली प्रयाणाचा निश्चय, शिवाजी स्वबांधवाना हितोपदेश करतो. (श्लोकसंख्या ५२)

सर्ग-५२ - शिवप्रकोप - शिवाजीचे आग्र्याला गमन दिल्लीपतीला भेट, शिवाजीचा क्रोध, रामसिंहाला उद्देशून शिवाजीचे सक्रोध भाषण, सभ्यलोकांना संभ्रम, औरंगजेबाचे भाषण, रामसिंह शिवाजीची क्षमा मागतो, राजसभात्याग. (श्लोकसंख्या ५०)

सर्ग-५३ - निर्बन्धपाश - औरंगजेबाचे मित्र शिवाजीचा अपराध वर्णन करतात, निर्बन्धपाश, रामसिंहाची प्रतिज्ञा, शिवाजीचे भाषण, औरंगजेबाकडे शिवाजीचे पत्र, रामसिंहाची जागरूकता, पुत्रबन्धन वार्तेमुळे जिजादेवी व्याकुळ, समर्थ रामदासांचे आगमन, रामदासाचे भाषण. (श्लोकसंख्या ६६)

सर्ग-५४ - बन्धविमोचन - मुक्तीसाठी शिवाजीची परमेश्वराला प्रार्थना, अंतःप्रेरणा, शिवाजी फौलादखानाला वश करतो, मिष्टान्न वितरण, शिवाजीचे अस्वास्थ्य, गूढ प्रयाण, फौलादखानाची फसवणूक औरंगजेबाची व्यथा, नगाऱ्यावर शिवाजीची घोषणा व वर्णन, शिवाजीच्या अनुयायांना त्रास. (श्लोकसंख्या ६६)

सर्ग-५५ - मातृपुत्रसमागम - जिजादेवीची अवस्था, पुत्रमुक्तीसाठी भगवंताची प्रार्थना, तपस्व्यांचे आगमन, तपस्व्यांचा जिजादेवीला प्रणाम, मातृपुत्रसमागम, शम्भुराजा विषयीचे रहस्य, प्रजेला अतिशय आनंद. (श्लोकसंख्या - ६४)

सर्ग-५६ - पुनरुत्थान - जयसिंहाचे निधन, शिवाजीचे दिल्लीपतीला पत्र, दिल्लीपतीची विध्वंसाज्ञा, सप्तकोटीश्वर मंदिराचे निर्माण, विजयासाठी शिवाजीचे युध्दवीरांना प्रोत्साहन. (श्लोकसंख्या ६४)

सर्ग-५७ - सिंहगड विजय, तानाजीला उद्देशून शिवाजीचे भाषण, विवाहासाठी निमंत्रण, जिजामातेला उद्देशून तानाजीचे भाषण, मित्रांपुढे शिवाजीचे भाषण, सिंहगड युध्दवृत्तांत, सूर्याजीचे भाषण, शिवाजीचा मित्रशोक. (श्लोकसंख्या ७४)

सर्ग-५८ - स्वराज्य विमोचनम् - सार्वत्रिकी विजययात्रा, यवन-सेनापति पराभव, औरंगजेबाचे बहादूरखानाला पत्र, बहादूरखानाचे प्रत्युत्तर करदीकृत भूपाल शिवाजी. (श्लोकसंख्या ५५)

सर्ग-५९ - छत्रसाल प्रबोधनम् - शिवाजीच्या कीर्तिचा प्रभाव, छत्रसाल स्ववृतान्त शिवाजीस सांगतो, छत्रसालाची प्रार्थना, मुक्तियुध्दासाठी शिवाजीचा संदेश. (श्लोकसंख्या ५१)

सर्ग-६० - पर्णालविजय - पर्णालयदुर्गामध्ये शिवसैन्य प्रवेश, विजयवार्ता, वीरसन्मान, विजापुर राजसभेमध्ये खवासखानाचे भाषण, बहलोलखानाची शिवाक्रमणासाठी नियुक्ती, बहलोलाचे भाषण, बहलोलाचे प्रस्थान, शिवाजीकडून प्रतापरावाची नियुक्ती, पाण्याने व्याकुळ शत्रुसेना, बहलोलदूताची प्रतापरावाला प्रार्थना, प्रतापरावाची शत्रुसैन्याबद्दल सदयता. (श्लोकसंख्या ७१)

सर्ग-६१ - प्रतापराव हौतात्म्य - प्रतापरावांना शिवाजीचे पत्र, प्रतापरावाचा निश्चय, बहलोलखानाचा उपद्रव, सात वीरांसह प्रतापरावाचे हौतात्म्य, आनंदरावाचा पराक्रम, प्रतापरावाच्या निधनामुळे शिवाजीला शोक, भार्या निधन. (श्लोकसंख्या ३५)

सर्ग-६२ - गागाभट्टसंकल्प - वाराणसी वर्णन, गागाभट्ट - वंश - वर्णन, गागाभट्ट, गागाभट्टाचे शिवाजीकडे आगमन, गागाभट्टकृत शिवाजीचे स्तवन, राज्याभिषेक सूचना. (श्लोकसंख्या ६२)

सर्ग-६३ - भवानी - प्रार्थना - राज्याभिषेक वार्तेमुळे लोकांना आनंद उत्साह, राजधानी स्थापना, राज्याभिषेक मुहूर्त, प्रतापदुर्गावर गमन, भवानी स्तोत्र. (श्लोकसंख्या १२१)

सर्ग-६४ - राज्याभिषेकारम्भ - शिवाजीचा व्रतबन्ध व विवाह, गणपती आवाहन, वरुणपूजा, विप्रागाम, आशीर्वचन, मंत्रपाठ, पुण्याह-वाचन, मातृका आवाहन, पुरोहितवरणम्, ऋत्विग्वरणम्, विष्टरप्रदान, मधुपर्क, कंकण बंधन, बन्दिमोचन, वैनायिकी शांती, कलश स्थापना, अम्बिका विनायकपूजनम्, नवग्रहप्रतिष्ठापना, यजमानाभिषेक, बलिप्रदानम्, अम्बिका विनायक प्रार्थना, दक्षिणादान. (श्लोकसंख्या ४९)

सर्ग-६५ - शान्तिप्रयोग - मंडपप्रोक्षण, वह्निस्थापना, इंद्राणी-विनायकार्चनम्, स्वस्तिवाचन, अहन्या अभिषेक, अभिषेक मंत्र, यजमानमूर्धनि गोरसर्पिरित्यादि, गोघृतहवनम्, इन्द्राणी प्रार्थना, मत्स्यबलि विनायक प्रार्थना, सूर्योपस्थानम्, दक्षिणार्पणम्, ईशानी पूजन. (श्लोकसंख्या १४)

सर्ग ६६ - ग्रहयाग - अग्निस्थापना, ग्रहावाहनम्, अधिदेवता प्रत्यधिदेवतावाहनम्, नक्षत्रदेवतावाहनम्, लोकपालानावाहनम्, ग्रहनक्षत्र, दिक्पालादिवाहनम्, लोकपालाद्यावहनम्, ग्रहनक्षत्रादिहवनम्, चतुर्थ दिवसे विराम, पंचमे दिने नक्षत्रयाग, षष्ठे दिने नैर्ऋतियाग, सप्तमे दिने इंद्रपूजनम्, हवनानि, कलशोदकेन यजमानाभिषेक, मणिबन्धन, सहस्त्रभोजन. (श्लोकसंख्या २०)

सर्ग-६७ - राज्याभिषेकारम्भ - ७ व्या दिवशी संध्यासमयविधी, ८ व्या दिवशी प्रातःकाळी शिवाजीचा मंडप प्रवेश, मंडपपूजन, ध्वजपूजन, चतुर्घटस्थापन, अभिषेक शाळेमध्ये घटस्थापना, महावेदीवर अग्निनवग्रहस्थापना, हेमकलशस्थापना, गायत्रीमंत्र हवन, वेदसूक्त घोष, बलिदान, पूर्णाहुति, अभिषेक वर्णन, मंडप प्रवेश, आसन्दी समारोहण, अभिषेक प्रार्थना, ७ व्या दिवशी सायंकाळी गणेश पूजनादी विधी, भूमिशयन, शिवाजीचा मंडप-प्रवेश, मंडपपूजा, ध्वजस्थापना, चतुर्दिक्षु - चतुर्विध - घटस्थापना, वेदीवर औदुम्बरीयासन्दी स्थापना, अभिषेक शाळेमध्ये भद्रासन स्थापना, अष्ट दिशांना जलकुंभ स्थापना, कुंडामध्ये अग्निस्थापना, द्रव्यत्याग, होम, वेदमंत्र घोष, सर्व कुंडामध्ये पूर्णाहूती, अभिषेक शाळेमध्ये अभ्यञ्जनं मृत्संस्कार, गोमूत्रगोमया दिभिरभ्यञ्जनम्, मंडप प्रवेश, वेद्यारोहण, राज्याभिषेक प्रार्थना, शाखाभिषेक, सिंहासनाधिष्ठित शिवाजीवर विविधाभिषेक, स्तोत्रवाद्या-दिध्वनी, कांस्यपात्रात मुखावलोकन, सार्वत्रिक दानावली, शिवाजीचे औदार्य (श्लोकसंख्या ७२)

सर्ग-६८ - राज्याभिषेक - शिवाजी मंडपप्रवेश, रथारोहण, शरक्षेपण, मंडपप्रदक्षिणा, सप्तदशेषुभिः वैल्कलक्ष्यवेधन, रथदान, अक्षक्रीडा, स्वर्णासनारोहण, विश्रान्ति, उषःकाळी पुन्हा मंडप प्रवेश, मंडप वर्णन, शिवाजी वर्णन, स्वर्णसिंहासनाधिरोहण, गागाभट्टाची घोषणा, उपायन-प्रत्युपायन, मंडप प्रदक्षिणा, नगर प्रदक्षिणा, देवदर्शन, ब्राह्मार्पण. (श्लोकसंख्या ३५)

अशाप्रकारे ` शिवराज्योदयम् ` हे ६८ सर्गांचे महाकाव्य असून, सर्वांत कमी श्लोकसंख्या १४, सर्वांत जास्त श्लोकसंख्या १२१ आहे.

अनेक महाकवींनी आतापर्यन्त अनेक महाकाव्ये रसिकांपुढे ठेविली आहेत. त्यामध्यें वर्णेकरांचे ऊर्जस्वल, स्फूर्तिकारक, वीररसप्रधान, संस्कृत संजीवन आणि शिवप्रभूंच्या पवित्र जीवनाचे यशोगान करणारे 'श्रीशिवराज्योदयम्' हे नवीन संस्कृत महाकाव्य लिहिलेले आहे.

हिंदु समाजाचे दैवत असलेल्या या महापुरुषाच्या गुणसंकीर्तनामुळे स्वतःला पवित्र केलेल्या व चेतना दिलेल्या डॉ. वर्णेकरांनी एक एक पद स्वतःच्या बुद्धीने उपयोगात आणून या दैवी वाणीला पूर्ण तृप्त केले आहे.

कथानायकाच्या पित्याच्या मंगलविवाह समयी आशिर्वचनांमधून शिवप्रभूच्या जन्माचा स्फुट उल्लेख पुढीलप्रमाणे केलेला आहे.

" माद्यन्म्लेच्छगुणान निहन्तुमखिलांसत्रातुं सती सज्जनान् ।
धर्मं स्थापयितुं श्रुतिस्मृतिगतं पातुं च गोब्राह्मणान् ।। (३.७८)

त्याचप्रमाणे शिवाजीच्या जीवितकार्याविषयी -

" स्वधर्म, साम्राज्यसंस्थापन हे शिवाचे दृढव्रत आहे. (१६.३८)
तसेच नवस्वराज्यस्थापना हे एक महान व्रत. (२०.२१)

इत्यादी शब्दांमध्यें कवीने वर्णन केलेले आहे.

बाल शिवाजीविषयी, अबालसत्व (५.६), बालपणापासून वीररसामध्यें आसक्त (५.१९), गोरक्षणासाठी बालरूप धारण केलेला कृष्ण भूमीतलावर अवतीर्ण झाला. (७.५२), तरुण शिवाजीविषयी, अफझुल्लखानाने त्याला पाहिले. तो अजानुबाहु, उन्नत, प्रसन्न, विशाल नेत्र असलेला (१९.३) दिसला. त्याच्या गुणसंपदेविषयी लिहितांना शिवाजी हा मेरुस्थिरान्तःकरण (१३.२), निसर्गधीरः (१३.३०, २२.४०), प्रकृति धीर

(२२.४०), धीर धुरंधर (२२.४८), निश्चय धैर्यशाली (१९.४३), कर्तव्य नैष्ठिक (२२.४९), अन्याय निराकरिष्णु, (७.३०), स्वजनैक्यप्रिय (१६.२६), वदान्यशिरोमणि (१४.२७), न केवलं दूरदर्शी, गुढरन्ध्रो रिपुरन्ध्रदर्शी (१९.४), नीतिमर्मज्ञ (२२.२) त्याचप्रमाणे शत्रूंनी दिलेल्या प्रमाणपत्रानुसार अधिराजो हि धूर्तानाम् (१९.२८). त्याच्या आत्मसंयमना विषयी -

रिपुदौरात्म्यसंतप्तोऽप्यात्मन्यात्मानमाकुलम् ।
विकर्मणा: स संयेमे धर्मैकं प्रमाणयन् ।। (१६.११)

त्याचप्रमाणे,

प्रभूतकोपोऽपि विमृश्यकारी (१९.३९)
शृण्वन् अप्रकटीकृतात्व विकृतिर क्षमायमैः रपि (२२.५२)

त्याच्या आत्मविश्वासामध्ये निःशंकता पुढीलप्रमाणे -

स्वप्नेऽपि मम: नौरेति पराभव विकल्पना (२२.६)

त्याला पाहणाऱ्या अन्य प्रतिभाशालींच्या व गुरू दादोजींच्या मते त्याचे समर्थन,

मनुष्याणां सहस्त्रेषु क्वचिदेवावलोक्यते ।
कार्याकार्यविवेकार्थ प्रतिभा विश्वतोमुखी ।।
परमेशप्रसादेन जन्मसिध्दैव सा त्वयि ।। (११.४४,२५)

शिवाजीला कोणाला भीत होता व कोणापुढे शीर नमवीत होता ? याचे उत्तर अफझुल्लखानाला देताना तो म्हणाला,

" आजन्मतो नूनमहं बिभेमि श्रीरामचन्द्रादतिपूजनीयात् ।
तथैव पापाचरणादधर्म्यान्नैवान्यतो जातु कुतोऽपिमर्त्यात् ।।
(१९.१४)

म्हणून त्याप्रमाणे -

निजशिरो मणिकुण्डल मण्डितम् ।
यवनराजपुर: स्थितमुच्चकैरनमयद् गुरुराजपदाम्बुजे (१४.२७)

काव्यकलेच्या विनियोगासाठी किंवा अन्य सुपात्र व गुणानिर्धींसाठी काय केले तर -

" ' शिवराज्य ' कवि: स्थाने देवीं वाचम् अनीवृतत् । "

या महाकाव्यातील भारतीय संस्कृतीचा नेत्रदीपक आविष्कार प्रशंसनीय आहे.

केवळ गुणसंपत्तीमुळे या शिवचरित्राचा महिमा नाही. परंतु या विशाल पृथ्वीवर एक एका गुण विषयासाठी शिवाजी हा अलौकिक पुरुष आहे. आणि ध्येयाला जीवित अर्पित केलेल्या शिवाजीचे सर्व गुण स्वराज्य-संपादन फळासाठीच आहेत हे विशेष आहे. साध्य व साधन इत्यादी विषयांमध्ये शिवचरित्र हे भारतीय संस्कृतीचे अत्युत्कृष्ट प्रतीक आहे. या भारतीय संस्कृतीविषयी, डॉ.वर्णेकर म्हणतात -

" स्वधर्मे निधनं श्रेय: परधर्मो भयावह: ।
स्वधर्मार्थम् स्वराज्यम् । स्वराज्य स्थापनार्थम् प्रयतमानेन
पुरुषेण ऐश्वरं कार्यमिदम्, अहं निमित्तमात्रम् न
विस्मर्तव्यम् । साधनानाम च अनेकता, मा न वर्जयति
शत्रुविशेष सापेक्षां कुटिलनीतिम्, दण्डनीतिम् वा ।
वैयक्तिकी च चारित्र्यशुध्दि: या कस्यामपि परिस्थितौ
न आपनीया । इयं हि स्थूलत: भारतीया संस्कृती । "

भारतीय जीवनमार्गात जे जे आदर्श आणि जे जे व्यवहार्य आहे, त्या सर्वांची सुस्पष्ट अभिव्यक्ती म्हणजे शिवाजीचे चरित्र होय. शिवाजी हा अकस्मात उत्पन्न झालेला नाही, तर जो धर्म श्रुतिस्मृति पुराणांनी अंमलात आणलेला आहे, रामकृष्ण वगैरेंनी पाहिलेला, आणि गतकालामध्यें लोप पावलेला, नवीन कालामध्ये साधुसंतांनी आचारलेला, देश व भाषेचे पुन्हा उत्थापन करणारा व जे संस्कार मानवांमध्ये हजारो वर्षे संक्रमित होत गेलेले आहेत, त्या भारतीय परंपरेचा नेत्रदीपक आविष्कार म्हणजे शिवावतार होय. आईच्या दुधाबरोबरच ही भारतीय जीवन पध्दती शिवाजीने प्राशन केली, याचे सम्यक् प्रदर्शन डॉ. वर्णेकरांनी केलेले आहे.

मातेच्या मांडीवर झोपलेल्या बाल शिवाजीने रामायण-महाभारतादी कथा श्रवण केल्या, तसेच निरनिराळ्या प्रसंगातून जिजामातेने गोब्राह्मणरक्षण, क्षात्रधर्माचे अनुष्ठान, परस्त्री विषयी मातृत्वबुध्दी, सर्वधर्मसमानत्व इत्यादी कर्तव्यांच्या जाणीवे बरोबरच व उपदेशासह, सत्य, अहिंसा यांचे महत्व, अंगीकृत करूनही,

मान्यः स मे यः परमो हि धर्मः परं स सापेक्षा तथैव सेव्यः ।
देवद्रुहां पापकृतां खलानां जानीहि हिंसामपि ताम हिंसाम् ।।
(५.३८)

त्याचप्रमाणे, त्याची सापेक्षता, प्रतिपादन करताना पुन्हा ते म्हणतात,

जहीहि भोगान् सुखदानपि त्वं भोगा हि भोगा इव
पन्नगानाम । (५.४७

भोगलम्पटतेचा निषेध करतांना,

विना जगन्नाथकृपाकटाक्षं न दिव्यकार्ये प्रभवन्ति मर्त्याः ।।
(५,५०)

अशा हेतूने भगवंताच्या वचनाचा उपदेश करून शेवटी भव्य-दिव्य आदर्शमाला स्थापन केलेली आहे.

" आपत्सु रामः, समरेषु भीमः दानेषु कर्णश्च, नयेषु कृष्णः ।
भीष्मः प्रतिज्ञापरिपालनेषु, विक्रान्तकार्येषु भवाज्जनेयः ।।"
(५.५६)

श्रुतींनी श्लोकबध्द केलेले, मातृवचनांनी तसेच संस्कृत बुध्दीने शिवाजीचे बाह्य जनतेचे आदरस्थान झाले. ऊर्जस्वल, सुविमल, निजधर्मनिष्ठ, चारित्र्यच जनभक्तीचे एकमेव निदान होय. (५.५६)

" जयतु मायिनमुत्कट मायया - "

सर्व लोकांना हे विदितच आहे की, स्वतःचे जीवन अनेक प्राणहरण करणाऱ्या प्रसंगातून शिवाजी पार पडले. त्या कारणामुळे बालपणापासून त्याने शठेषु-शाठ्यम् नीति आत्मसात केली होती. त्याविषयी बोलताना सुप्रसिध्द महाराष्ट्रीय साधुपुरुष रामदास शिवाजीला ' कपटमेव हि कापोट्केरवरम् ", ' जयतु मायिनमुत्कट मायया, ' ' अधर्मेरअधमत्वयिहो चितम् ' असा उपदेश करतात. व्यक्तिधर्म निराळा, सामाजिक धर्म निराळा, राजधर्म निराळा, संन्यासीधर्म निराळा या दोन्हींचा संकर हे भारतीय संस्कृतीचे चिन्ह नव्हे व बुध्दिमानपणाचेही चिन्ह नव्हे.

शिवप्रभूंनी जो स्वातंत्र्य संग्राम आरंभिला, तो परमेश्वरी इच्छेने आरंभिला. पारतंत्र्याच्या दिवसापासून देवतासुध्दा त्याची प्रतिक्षा करीत होत्या, महाराष्ट्राचे साधु-संतदेखील त्याची वाट पहात होते, म्हणून कवीने वर्णन केले आहे की, रोहिडेश्वर मंदिरातील प्रतिज्ञेनंतर

* आलोकमायासुरविप्रसन्ना नभोनिलीतस्त्रिदशाः समस्ताः ।
तं दिव्यभानं शिवमित्रसंघं नक्षत्रचक्षुर्भिरिवानिमेषैः ।। *

शिवाजीने तोरणा किल्ला घेऊन स्वातंत्र्याचे तोरण उभारले, वीतरागार्णा साधुसंतांच्याही मनामध्ये आनंदलहरी उत्पन्न झाल्या, साक्षात ईश्वराच्या मनांतदेखील न मावणारा आनंद झाला.

* श्रीरामदास प्रमुखैश्च सद्भिः ध्याना व लग्नाक्षिभिरीक्षितान्तः ।
हृत्पुण्डरीके सहसैव काचिन्नवोदिता दीपक तोरणाभा ।।
जगौ तुकाराम मुनिर्निवीनम् अभङ्ग.छन्दं जयगीतमुच्चैः ।
तदा तदाकर्ण्य जहर्ष चेतः पाषाणमूर्तेरपि विठ्ठलस्य ।। *

(१०.२६)

म्हणूनच ते पारतंत्र्याच्या दिवसापासून वाट पाहिलेल्या स्वातंत्र्य-भाग्य दिवस खरोखरच आला, कारण की,

* आहूतो ह्यगणितसाधुवृन्द पुण्यैः आकृष्टः समरमस्वार्पित स्वदेहैः *

(१०.४४)

नायकाची उन्नती, त्याच्या चरित्राची भव्यता ही महाकाव्याच्या यशाला पुरेशी नाही, इतिहास हा वेगळा व काव्य हे वेगळे. निर्विकार घटना सांगून त्यामध्यें रसांची निर्मिती होत नाही. एकाद्याकारच्या काव्यकौशल्याची त्या ठिकाणी अपेक्षा नसते. श्री. वर्णेकरांना निवेदनाचा संक्षेप कुठे करावयाचा ? विस्तार कुठे करावयाचा ? हे चांगले माहित आहे. जिजाबाई-शहाजी यांचे रंग खेळणे, जिजामातेने बाल शिवाजीचे केलेले संस्कार, त्याचे विजापुरला जाणे, तेथे गोवध करणाऱ्याचा वध, श्री रोहिडेश्वर

मंदिरातील प्रतिज्ञा, शहाजीचा कारागृहवास, व मुक्तता, अफझुल्लखान वध इ. मुख्य घटनांचे विस्ताराने वर्णन व लहान घटनांचे सूचन केलेले आहे.

या कथेमध्ये वीररस आहे आणि त्यासाठी आवश्यक अशा विविध प्रसंगातून प्रासंगित वर्णने आलेली आहेत. येथे आलेल्या वर्णनांनी संकेताचे पालन केलेले आहे, व कथावस्तुशी एकरूपताही ठेवलेली आहे. या महाकाव्यातील पहिला सर्ग ` सह्यमहराष्ट्रीयम् ` या नांवाचा आहे. कालिदासाने ज्याप्रमाणे नगाधिराजाचे वर्णन केले आहे, त्याप्रमाणें जयवल्लीच्या अरण्याचे वर्णन केलेले आहे. अरण्याचे वर्णन असो की वर्षा वर्णन असो की युध्दवर्णन असो, सर्वत्र कवीची सूक्ष्मदृष्टी दिसून येते.

हा कवी शब्दचित्र कर्माचा स्वामी आहे. रामदास व तुकाराम यांच्या वर्णनाचे श्लोक अनुपम आहेत. त्यांती सौंदर्य उलगडून दाखविणेसुध्दा अवघड आहे.

हे महाकाव्य महाकाव्याच्या लक्षणांनी युक्त असेच आहे. शिवाजी हा महाकाव्याचा नायक होण्यास योग्य आहे व चालू २० शतकातले लिहिलेले हे या राष्ट्रपुरूषांवरील संस्कृत महाकाव्य अनुपम व अलौकिक आहे. जे लोक संस्कृत भाषेवर ती मृत झाली म्हणून आरोप करतात, त्यांना हे आव्हानच आहे.

शिवाय त्याच्या काव्यातील भाषेचा मधुर गोडवा हे वर्णनातील आहे. रसिकांनी स्वत:च त्याचा स्वाद चाखून अमृतआनंद प्राप्ती करून घेतली पाहिजे. तेंव्हा वाचकांनी व अभ्यासकांनी हे महाकाव्य अवश्य पाहावे. ते प्रकाशित झालेले आहे व त्याने मोठी प्रसिध्दी प्राप्त केली आहे.

ब) अध्यात्मशिवायनम् :

संस्कृतात आणि मराठीतही जुन्या काळात राम, कृष्ण, शिव इत्यादी देवतांचे गुणगान करणारे, नित्य परायण करण्यासारखे काही उत्तम पोथीवजा ग्रंथ निर्माण झाले. तसे शिवाजी महाराजांचे गुणगान करणारी, त्यांच्या आध्यात्मिक श्रेष्ठ गुणांची अलौकिकता मनावर बिंबविणारी, एका तासात वाचून पूर्ण करता येण्यासारख्या पोथींची आवश्यकता आहे, म्हणून आणि एखाद्या प्रवचनकाराला त्या पोथीच्या आधारे सप्ताहभर शिवचरित्रावर मंदिरात प्रवचन करता यावे म्हणून श्री वर्णेकरांनी ही पोथी लिहिलेली आहे.

जुन्या धार्मिक ग्रंथाचे स्वरूप संवादात्मक असते. या संवादात्मक पध्दतीत साहित्यिकदृष्टया व्यंजकता हा एक मोठा गुण आहे. तशीच ही पोथी संवादात्मक पध्दतीची आहे. संवादात वक्ता लोकमान्य बाळ गंगाधर टिळक आणि श्रोता स्वामी विवेकानंद आहेत.

लोकमान्य आणि विवेकानंद यांचा सुमारे दहा दिवसांचा सहवास लोकमान्यांच्या निवासस्थानी घडला होता, असा उल्लेख स्वामीजींच्या चरित्रात आहे, त्या वास्तव्यकाळात स्वामीजींनी आपल्या या अध:पतीत राष्ट्राच्या उत्थानाचा उपाय लोकमान्यांना विचारला असता लोकमान्य त्यांना म्हणतात की, " आत्मविस्मरण झाल्यामुळे निष्प्रभ आणि बलहीन झालेल्या हनुमंताचे सामर्थ्य जागविण्यासाठी जांबवंताने त्याला त्याचे प्रभावी पूर्वचरित्र ऐकविले त्याप्रमाणे या आपल्या राष्ट्राला त्याचे प्रभावी पूर्वचरित्र नीट सांगितले तर त्याचे सामर्थ्य जागृत होईल, शिवाजी महाराजांच्या चरित्रात या आपल्या राष्ट्राचे सर्व गुण एकत्रित झाले आहेत.

" वीरता साधुतोपेता साधुता चातुरीयुता ।
चातुरी लोकमङ्गल्या चरिते ऽस्मिन् विराजते ।। "

असे हे श्रेष्ठ चरित्र या देशांत सर्वत्र प्रसृत केले पाहिजे. लोकमान्यांचे हे उद्गार ऐकून स्वामी विवेकानंद म्हणतात, " शिवाजी महाराजांचे हे श्रेष्ठ चरित्र दुष्ट लेखकांनी अत्यंत दूषित केले असल्याने ते आपण शुध्द स्वरूपात संक्षेपतः सांगावे. " स्वामीजींची ही विनंती मान्य करून लोकमान्य टिळक त्यांना शिवाजी महाराजांचे चरित्र क्रमशः संक्षेपाने सांगतात. मध्येमध्ये स्वामीजी त्यांना काही प्रश्न विचारून स्पष्टीकरण मागतात. काही महत्वाच्या प्रसंगी दोघेही आपले अभिप्राय व्यक्त करतात. अशी या ' अध्यात्मशिवायनम् ' ची भूमिका आहे. तीनशे श्लोकांचा हा चरित्रग्रंथ साप्तहिक परायणाच्या सोईसाठी सात अध्यायांत विभागला आहे. उत्तम वाचकाला संपूर्ण ग्रंथाचे पारायण एका तासात करता येईल. नागपूरच्या बाबासाहेब आपटे स्मारक समितीने हे ' अध्यात्मशिवायनम् ' पोथीच्या स्वरूपात छापून १५-८-१९७४ ला प्रकाशित केलेले आहे. रसिकांनी त्याचा अनुभव घ्यावा.

प्रकरण सहावे

१० व्या शतकातील संस्कृत नियतकालिक
साहित्यातील शिव चरित्र

प्रकरण सहावे

२० व्या शतकातील संस्कृत नियतकालिक साहित्यातील शिवचरित्र

संस्कृतमध्ये २० व्या शतकात निर्माण झालेल्या नाटक, महाकाव्य, काव्य, चरित्र या निरनिराळ्या साहित्य प्रकारांत जसे शिवचरित्र गाइले गेले, त्याप्रमाणे निरनिराळ्या नियतकालिकामधूनही ते निरनिराळ्या वाङ्मय प्रकारातून प्रकट झाले आहे. त्याचा थोडक्यात आढावा या ठिकाणी घेत आहे.

अतिशय सुंदर असे ' श्री छत्रपति श्लोकपंचकम् ' ' संस्कृत भवितव्यम् ' च्या शनिवार दिनांक २६-१२-१९८१ च्या अंकात प्रसिध्द झाले असून ते श्री. जनार्दन रामचंद्र साल्पेकर, नागपूर यांनी रचलेले आहे. ते पुढीलप्रमाणे -

१) श्री छत्रपति श्लोकपंचकम्

श्री सूर्यान्वयमौलिमण्डनमणि श्रीराम वंशोद्भवः
दीनत्राणपरायणः खलु जिजामातुः सुनेत्रोत्सवः ।
धर्मध्वंसिमदोध्द तेभकुलभिच्छूरः शहाजीसुतः
श्रीमांश्छत्रपतिः सदा विजयते वन्द्यः शिवाजिर्महान् ।। १ ।।

प्रातः स्मरामि शिवछत्रपतिं सुनासम्
बालेन्दु कुङ्.कुमसुशोभितनेत्रमध्यम्
फुल्लोत्पलोपममुखं तु विशालनेत्रम्
मुक्तालसत् सितकिरीटमनिन्द्यभालम् ।। २ ।।

दृष्ट्वा सुभक्तिममलां शिवराज तुभ्यम्
प्रायच्छदप्रतिम शक्ति युतं भवानी
खड्.गं गिरीश तनया ऽरि मर्दनाय
भूयात् स एव सुजनार्ति विनाशनाय ॥ ३ ॥

कल्याणभागयवनेश्वर पुत्र भार्या
संमानिता ऽप्यरि वधूर्जन नीसमा या ।
तां शिक्षयन् युवतयः खलु मातृकल्पा
' धन्या ' इति प्रथितकीर्तिरयं शिवाजिः ॥ ४ ॥

राज्याभिषेकावसरे शिवो ऽयम्
सिंहासने हैममये विरेजे ।
स्वर्गे यथा वज्रकरः शचीन्द्रः
धन्यं महद् भारतवर्षभाग्यम् ॥ ५ ॥

जनार्दनकृतं ह्येनच्छ्लोक पंचकमुत्तमम् ।
विस्तार यतु सर्वेषां विश्वे ऽस्मिन् प्रियमङ्.लम् ॥ ६ ॥

-आकाशवाणी, नागपूर, सौजन्याने.

अतिशय सुंदर व भावपूर्ण शब्दांत लिहिलेले हे गेय काव्य आहे. २० व्या शतकांत शिवप्रभुविषयी जनमानसात तयार झालेली प्रतिमा त्यांतून स्पष्टपणे दृष्टिगोचर होते.

त्यानंतर शनिवार दिनांक २५-४-१९८१ च्या नागपूरहून प्रसिध्द होणाऱ्या ' संस्कृत भवितव्यम् ' च्या अंकात ' शिवभूपस्मृति ' नांवाचा अग्रलेख प्रसिध्द झाला आहे.

१) शिवभूपस्मृति

अस्मिन् सप्ताहे महाराष्ट्र शासनेन रायगड - दुर्गे छत्रपति शिवभूपस्य त्रिशतसांवत्सरिकीं पुण्यस्मृतिम् अनुलक्ष्य केन्द्रशासनस्य गृहमंत्रिणः श्रीमतः झैलसिंहस्य प्रमुखातिथ्ये प्रधानमंत्रिणः आध्यक्ष्ये विशेषः कार्यक्रमः आयोजितः इति सर्वथा उचितमेव । सार्धत्रिशतवर्षेभ्यः पूर्वं भारतदेशस्य विशेषतः महाराष्ट्रस्य परदास्यवशात् दयनीया स्थितिः आसीत् । शासकाः विधर्मीयाः सत्तामात्रलोलुपाः भोगप्रधानजीवनाः, प्रजायाः हितार्थं सम्यक् शासने असमर्थाः आसन् । न केवलं विधर्मिणां स्वबान्धवानामपि स्वकेन्द्रिता संकुचिता दृष्टिः, परिस्थित्यनुसारं लाभाय विवेकशून्यतया पाटव्वारवृत्तिश्च निराधार प्रजाया असहायजीवने अस्थिरत्वाय कष्टप्रदत्वाय च अभूत् । सर्वत्र नाममात्र सामन्तवृत्त्या बलिनां प्रभावः दुर्बलान् सज्जनान् निष्प्रभान्, निर्गुणान् चकार । मात्स्यन्यायस्य प्रवृत्त्या सत्प्रवृत्तानां न को पि त्राता दृष्टिपथं प्रयाति स्म । परंपरया च संत-संप्रदायेन या अध्यात्म प्रधाना विरागशीला वृतिः जनेषु निर्मिता, सा अस्मिन् संदर्भे कालोचिता अलक्ष्यत । अस्यां सर्वथा विपरीतायां परिस्थितौ, केवलम् आत्मविश्वासाधारेण स्वावलम्बेन शाहसूनुना शिवेन भोसलकुल मणिना लोकशक्तिः जागरिता, स्वराज्यं च निर्मितम् । न केवलं स्वराज्यस्थापनां एव शिवस्य अलौकिकत्व प्रमाणम् । स्वराज्यं परः सहस्त्रैः स्वपराक्रमेण स्थापितम् । शिवभूपेन लोकहितार्थं लोकशक्ति साहाय्येन नैतिकता प्रतिष्ठापनाङ्गभूतत्वेन धर्मराज्यं स्थापितं, तत्र च तदधिकारिभिः अबलान् प्रोत्साह्य सत्कर्मणो प्रवृत्तं, सर्वधर्मानुयायिषु विश्वासः जनितः इति जगति अदृष्टपूर्वं शिवचरितम् । वैयक्तिक नीतिश्च अयम् आदर्शभूतः राष्ट्रपुरुषः ।

गृहमंत्रिणा उपरि निर्दिष्टकार्यक्रमे स्वभाषणे प्रतिपादितं यत् शिवभूपेन जनाः निर्भीकाः कृताः, तत् पूर्णसत्यम् । तत्र शिवभूपेन स्वराज्य-

संकल्पनायां लोकराज्यं धर्मराज्यं इति च अभिप्रेतम् । लोकैः सर्वेषां हिताचय धर्मनीतिम् अनुसृत्य राष्ट्रघटकत्वेन वर्तितव्यम् इति सर्वप्रधानः हेतुः । अयं विधर्मीयः, अयं स्वधर्मबान्धवः इत्यादयः भेदाः तत्र अस्तं गताः । राष्ट्रधर्म एव एकः सर्वेषां मनसि प्रभावशक्तिः जातः । संतसंप्रदायस्य उपदेशेन सर्वं हिंदूसमाजः निवृत्तिपरः कृतः परंतु शिवसामर्थ्यात स्वराज्यप्राप्त्या निर्भीकाः जनाः याथार्थ्येन धार्मिकाः प्रवृत्तिपराः जाताः इति महान खलु राजनीतिमूलकः परिणामः ।

अन्यत्र अस्माभिः अस्मिन् विषये साधारं दर्शितं, परं संदर्भवशाद् अत्रापि निर्दिश्यते । शिवस्य कुलस्वामिनी अधिदेवता तुळजापुरवास्तव्या इति प्रथितम् । तत्र कृतनिवासेन केनाऽपि वैदिकर्तांत्रिकेन देवतास्तुतिपराणि मन्त्रगर्भितानि पद्यानि कृतानि खण्डितरूपाणि अप्रकाशितानि समुपलब्धानि । शिवराजसंज्ञकः अयं रामदासीयः कविः स्तोत्ररूपेण देवतां राष्ट्रस्वरूपां कल्पयति । अनेन सामान्यः जनः अपि शिवभूपस्य पराक्रमेण लोकशक्ति जागरणेन राष्ट्रकल्पनया भरितः आसीत्, इति स्पष्टं भवति ।

रणपण्डितः राजनीतिविशारदः लोकपरित्राणाय व्रतं धारयमानः सर्वधर्मसमभावं पुरस्कुर्वन्नपि वैदिकधर्मनिष्ठः पुण्यश्लोकः शिवभूपः संस्कृत-भाषायां बद्धादरः आसीत् । अस्य एकविंशशतकस्य आरम्भपर्यन्तं शिवभूपः साक्षरः अपि स्यात् न वा इति केचन संशेरते स्म । ऐतिहासिक संशोधनरतानाम् अभ्यासकानां परिश्रमेण साम्प्रतं भूयसा लिखितसामग्री उपलब्धा यस्याः आधारेण शिवस्य संस्कृतरसिकत्वं दृढं प्रतिपद्यते । 'नृपव्याहारार्थ' राज्यव्यवहारकोशं रचयितुम् आज्ञापयन्, वयसः षड्विंशतितमवर्षे एव पंचाङ्ग-शुद्ध्यर्थं करणकौस्तुभ ग्रंथरचनां दुक्प्रत्ययकारिणीं कारयन्, गागाभट्टादिभिः पूर्वमीमांसाशास्त्रवृद्धिम् अभीप्सन्, अन्यांश्च बहून् शास्त्रकलासु वाङ्मये च

प्रोत्साहयन् गुणज्ञः शिवनृपः स्वयमपि विद्यारसिकः आसीत् इति न सर्वे जानन्ति । दैववशात् तस्य वीरकर्माणि यथावत् वर्णयितुं शिवभारतकाराः परमानन्दसदृशः प्रतिभावान् अपि ऐतिह्यमूल्यविद् महाकविः उपलब्धः । ' मस्याऽब्दार्तं च यशोवितानं दिङ्‌मण्डलीमण्डपमातनोति ' इति गागाभट्टेन शिवविषये राज्याभिषेकात् दशवर्षाणि पूर्वमेव लिखितम् । संस्कृतभाषा पुरस्कारार्थं शिवनृपः दृढतरं कटिबद्धः अभवत् इति दिग्विजयिन्याः वैदिक संस्कृतेः भाग्यश्रियः समुत्कर्षः । दिग्विजयिन्याः वैदिकसंस्कृतेः इति च पठितमात्रेण न आक्षेप्तव्यम् । विवेकानन्दादिभिः आधुनिक काले अस्याः संस्कृतेः पताका पाश्चात्यदेशेषु दृढं स्थापिता । सांस्कृतिकः अयम् अस्त्रार्क विजयः साम्राज्यस्थापनात् प्रशस्यतरः । परमानन्देन साभिप्रायम् उक्तम् -

' कलिकल्मषापहारीणि हारीणि जनचेतसाम् ।
यशांसि शिवराजस्य श्रोतव्यानि मनीषिभिः ॥ '

या लेखांत शिवाजी महाराजांचे संस्कृत प्रेम, व आधुनिक काळातील छ. शिवाजी महाराजां विषयीचा भक्तिभाव, आदरभाव व अलौकिक व्यक्तित्व म्हणून श्रेष्ठपणा स्पष्ट केलेला आहे.

' संस्कृत भवितव्यम् ' नागपूर, शनिवार दिनांक २-२-१९७४ च्या अंकामध्ये संपादक डॉ. के.रा. जोशी, एम.ए., पीएच.डी. साहित्याचार्य यांनी संस्कृतमधून डॉ. श्री.भा. वर्णेकरांच्या ' शिवराज्योदयम् ' या महाकाव्याचे रसग्रहण केलेले आहे. ते फार उत्तम असल्यामुळे पुढे देत आहे.

३) शिवराज्योदयम्

बालशिवराजः विजापुरे राजसभां गच्छति । तदनुभवेन परम् उद्विजते तस्य मनः । तस्य मनः स्थितेः अत्युत्कटं चित्रणं कविता कृतम् । तां दुर्दशाम् असहमानः बालशिवराजः स्ववयस्यैः उपेतः रोहिडेश्वरं स्वरुधिराभिषेकेण अर्चन् स्वातंत्र्यसंपादनस्य उग्रां प्रतिज्ञाम् अकरोत् । इदं सर्वम् ओजस्वि दृश्यं वयं कविवर्णनाप्रभावेन नूत साक्षात्कुर्मः । अहो । श्री रोहिडेश्वरं पूजयतां बालवीराणां महती प्रार्थना । स्वातन्त्र्यसद्व्रतदीक्षिता-स्त्वच्चरण शरणागताः । वयमविचल निश्चया हर हर हर महादेव ॥

श्रुता नाम इयं प्रार्थना भगवत्या गिरिजया नूनं सा भवानी 'स्थाणुं' शंकरं विहाय उदग्रखड्.ग्रूपं धारयन्ती, 'श्रीशिवस्य' सवेतनं बाहुं श्रितवती । श्री शिवराजः 'भवानी खड्. प्राप्तवान्' इति सूचयन्तीं वर्णनां रसिकाः अत्र रसयितुम् अर्हन्ति ।

'स्थाणुं विहाय धृतभास्वरखड्.ग्रूपा । दोर्दण्डमाश्रितवती प्रबलं शिवस्य' ॥ (९.४९)

तदनन्तरम्, अगणित साधुजनैः स्वपुण्यचयेन आमान्त्रितः, रणयज्ञे हुतप्राणैः स्वातन्त्र्यवीरैः आकृष्टः जनतया चिराय अड्.गुलिगणनया प्रतीक्षित । लोकभाग्यं समुज्ज्वलयन् स्वातंत्र्यसूर्योदय दिवसः प्राप्तः । ततः अस्मिन् महामङ्.गले सुवर्णक्षणो श्रीतुकाराम सदृशः अपि कविः अभिनवम् अभंग-जयगीतं तथा रचयामास येन पाषाण विग्रहः श्रीपांडुरंगः अपि मनसि अत्यन्तं प्रमुदितः । कविः वर्णयति, 'जगौ तुकाराम मुनिर्नवीनम् । अभंगबध्दं जयगीतमुच्चैः । तदा तदाकर्ण्य जहर्ष चेतः पाषाणमूर्तेरपि विठ्ठलस्य ॥ (१०।२७)

तदनु प्रारब्धः स्वातन्त्र हेतुः परमभीषणः रणायज्ञः । तस्येदं समुज्ज्वलं वर्णनम् ।

हननं हवनं यत्र गर्जना मंत्रजागरः ।
रणायज्ञः सनः श्रेयान् क्षात्रधर्मानुयायिनाम् ॥ (११।१४)

वृध्दैः श्री दादोजि कोंडदेवैः यौवने पदे कुर्वन्तः ध्येयनिष्ठाः इमे युवकाः भृशं प्रोत्साहिताः ।

स्वदेशधर्ममुक्त्यर्थं युध्यतां संप्रयुध्यताम् ॥ (११।२१)

नयज्ञानां श्री दादोजिनामा अमरम् अनुशासनम् आसीत - " जयतु मायिनम् उत्कटमायया । "

श्री शिवराजेन स्वराज्यसिद्ध्यै सततं प्रयतमानेन लब्धाः साधुजना-शीर्वादाः । प्राप्तः सतीनाम् अनुग्रहः । कृतः नाना विपत्तीनां प्रतिकारः । जिताः पूर्वपूर्वतः बलीयास वीरशत्रवः । अयं सर्वः अपि समरप्रसङ्गः कविता वीररसपूर्णः यथायथं निपुणं वर्णितः । तदनन्तरं समुपस्थितं स्वराज्य ग्रहणहेतु अफझलखानकृतं परमभीषणम् आक्रमणम् । अस्मिन् महासंकटे श्रीशिवराजः प्रतापदुर्गं गन्तुकामः आसीत् । नवजातः शिशुं अत्यन्तं रुग्णां महाराज्ञीं च परित्यज्य तेन अवश्यं गन्तव्यम् आसीत । क्षणमात्रं तस्य हृदयं क्षुब्धम् । परं क्षणान्तरेणैव तस्य हृदयस्था उग्र-कर्मनिष्ठा तं रणायज्ञं निर्दोढुं प्रतापदुर्गाय गन्तुं प्रेरितवती । तस्येदं कविकृतं हृद्यं वर्णनम् -

" प्रियतमजनसंनिकर्षसिक्तं क्षणमेकं शिवमुग्रकर्मनिष्ठा ।
रणमखविधये प्रतापदुर्गं प्रतिगन्तुं त्वरयां चकार सद्यः ॥"

(२१-५१)

अत्रान्तरे पूर्वनिर्दिष्टा संभाजीराजस्य माता, ज्येष्ठा राज्ञी निधनं गता, इति संदेश प्रतापदुर्गे उपस्थित: । उभौ आपृच्छमान: श्रीशिवराज: पुरा ईष्यात् समाकुल: इदानीम् असशयं मानुषासुलभेन शोकेन अभिभूत: आसीत् । परं सागरगत: ज्वलन् वडवाग्नि: यथा न प्रकट: भवति एवं श्रीशिवराजस्य शोक: अपि मुखेनैव अदृश्यत । कवि: श्रीशिवराजस्य असाधारणं गांभीर्यं वर्णयति -

" सशोको हृदये तस्य नाव्यज्यत मनागपि ।
सागरान्तर्गत: किं नु व्यज्यते वडवानल: ।। "

कालमुखा: अफझलखान: विजापुराधीशस्य महासामन्त: । स्वशक्ते: तस्य गर्व: अद्भुत: । महाराष्ट्रं प्रविष्ट: मात्र: सस्वकीयै: पापाचारै: सर्वान् ' त्राहि-भगवन् ' इति प्रार्थना परवशान् अकरोत् । तुळजापुरवासिनी भवानी पंढरपुरस्य विठ्ठल: च उभौ अपि तेन अभिभूतौ । परं शिवराज: अप्रतीकारपर: स्वस्थ: इव आसीत् । जावली-कान्तारे घोरे अफझलखान: प्रविष्ट: । तस्य अभिमान: निश्चितता च कविना साधु वर्णिता । अफझलखान: अमन्यत - " कपय: कापिनाराणां केलङ्घयति महाम्बुधिम् । तत् किं नात्र मरण्यानीं लङ्घयेत् पुरुषोत्तम: ।। (५।२५)

महापयिना अफझलखानेन श्रीशिवराजस्य समागम:, नाम लब्धाङ्कुरे स्वातंत्र्ये सहसोपास्थितं घोरं प्राणसंकटम् आसीत् । अथापि तस्मिन् क्षणे वज्रनिश्चित: श्रीशिवराज: अक्षुब्ध: सन् स्वसहकारिण: स्वराज्यसेवकान् समावशत ।

न सन्मानकामो न वा वित्तलोभो
न च स्वार्थमोहो न शक्त्युग्मदो वा ।
मनस्यस्तु वो राष्ट्रसेवाव्रतानां
सखाय: कदाचित् कुतश्चित् कथंचित् ॥ (२७-२९)

अफजलखानेन साक्षात् संभाषणप्रसंगे कविनिर्दिष्टं श्रीशिवराजस्य उत्तरं श्रीशिवराजस्य सहजस्य तेजस: निर्भयताया: च प्रमाणं भवति । श्रीशिवराज: वदति - " आजन्मतो नूनमहं बिभेमि । तथैव पापाचरणाद्-धर्म्यात् नैवान्यतो जातु कुतोऽपि मर्त्यात् ॥ " अफजलखानस्य मायिन: कपटप्रयोगे लब्धप्रमाणेन शिवराजेन हत: अफजलखान: । लब्धसंकेतै: श्रीशिववीरै: ध्वस्तं सर्वम् अफजलखानस्य सैन्यम् । अस्मिन् प्रसंगे रौद्र-बीभत्स भयानकरसानाम् अपूर्व: खलु विलास: कविता साधित: । अफजलखानस्य वधं संकेतयन् महान् शतघ्नीध्वनि: नाम मत्त-शत्रु-नाश तृप्तेन सह्याद्रिणा कृत: अट्टहास: अशोभत । " तदैव दुर्गे नियते हि काले, महाशतघ्नीध्वनिरुज्जगार । सह्याद्रिणा नूनमुदीर्ण शत्रु प्रणाशतृप्तेन कृतोऽट्टहास: ॥ (२९.४१)

' संस्कृत-भवितव्यम् ' च्या शनिवार दिनांक ८-३-१९७५ च्या डॉ. श्री.भा. वर्णेकरांनी लिहिलेल्या ' अध्यात्मशिवायनम् ' या पुस्तकाचे रसग्रहण डॉ. ब.ग. पांडे, अध्यक्ष, बाबासाहेब आपटे स्मारक समिती, नागपूर यांनी केलेले आहे.

४) अध्यात्मशिवायनम्

श्री शिवराजाभिषेक - त्रिशताब्दी - महोत्सव - निमित्तं श्री. बाबासाहेब आपटे स्मारक समित्या डॉ. श्री.भा. वर्णेकर: इत: पूर्वं

शिवराज्योदयं महाकाव्यम्, शिवराजाभिषेकं नाटकं च विरच्य प्रौढाः संस्कृतज्ञाः तोषिताः । सन्मित्राणां निर्बन्धेन ते साधारण जनतायै उपयुक्तम् अध्यात्मशिवायनं पुराणोचिता भारते चिराय लब्ध प्रसारां संलाप-पद्धतिं समाश्रित्य अनुष्टुभेन छन्दसा रचितवन्तः । अध्यात्मशिवायने भारते शिवजन्मोत्सवस्य प्रथमः प्रवर्तकः लोकमान्य तिलकः वक्ता भारतीयानां श्रद्दास्पदं संन्यासिश्रेष्ठः कर्मयोगी विवेकानन्दः तु श्रोता । उभयोः मिथो भाषाणस्य विषया अस्ति शिवराजस्य वीरचरितम् । एवं किल श्रूयते यत् एकदा मान्यः स्वामी श्री विवेकानन्दः पुण्यपत्तनस्थे लोकमान्य तिलकानां सदने अतिथिरूपेण कतिचित् दिनानि अवसत् । तत्र उभयोरपि मातृभूमि - भक्तयोः देशकल्याण विचारः निःसंशयं प्रवृत्तः भवेत् । तत्र शिवचरित विचारः अपि भवितुं शक्नोति । शिवचरित्रविषये लोकमान्य तिलकानां दृष्टिः श्री विवेकानन्दानां दृष्ट्या संवदति । लोकमान्य तिलकानां मतेन शिवचरितचिन्तनं नाम अमोघं स्वदेश-स्वधर्म स्वभाषासेवायां प्रवर्तप्रेरणा निदानम् । अतः उभयोरपि शिवचरितपरं कथापकथनं समाश्रित्य कृता कविना स्वेच्छाकल्पिता अपि अध्यात्म शिवायनरचना रमणीया संवृत्ता । शिवचरितं तु कविवरः वर्णयति -

वीरता साधुतोपेता साधुता चातुरीयुता ।
चातुरी लोकमङ्गल्या चरितेऽस्मिन् विराजते ॥

शिवजन्मनः प्रभृति शिवराज्याभिषेकान्तं चरितम् अत्र वर्णितं तिष्ठति । सप्त अध्यायाः सन्ति । साधारण संस्कृतज्ञाः अपिअस्य पठने निःसन्देहं प्रवर्तितुम अर्हन्ति तथा सुबोधा, ऊर्जस्वला ऽपि प्रसन्न सरणिः अत्र तिष्ठति । केवलेन पादोनहोरात्मकेनापि कालेन ३१४ श्लोकमितं लघु-शरीरं काव्यमिदम् आन्तं पठित्वा श्रीशिवराज चरितं स्फूर्तिमयम् अनुसंधातुं शक्यते । ये किल शिवचरितम् एवं चिन्तयन्ति -

तेऽसत्य - सत्यारि - सुहृद विवेक
सध्दर्म - मलान् - सुहितार्थ - कामान्
स्वराष्ट्र - निष्ठामकल - प्रतिष्ठां
लोके लभन्ते जयमङ्गलानि ।
इति कविना स्वमतं प्रतिपादितम् ।

अध्यात्मशिवायनम् इति नाम लोकप्रियम् " अध्यात्म रामायणम् " इति नाम अनुसरति । अध्यात्मरामायणे रामचरितं स्वजीवन - विषयाकलम्बि इति व्याख्यातम् । तेन स्वसंस्कारे काचित् प्रेरणा उद्भवति । अत्रापि अध्यात्मशिवायने तथा दृष्टि विलसति ।

रेखाचिह्नैः सामासिक-पदानि अङ्कितानि इति अष्टमे अङ्कारे सन्धिर्नास्ति इति च पठने अर्थज्ञाने च महत् सौकर्यम् । मुद्रणम् अपि शुध्दं सुन्दरं च । लब्ध - संस्कृत - परिचयानां प्रौढानां कृते तु संस्कृताभ्यासंवर्धने इदम् अध्यात्मशिवायनम् महद् उपकारि तिष्ठेत् । संस्कृते किंचित ओजस्वि राष्ट्रहितप्रेरकं पठितुम अभिलषतां तरुणानां तु इदं प्रियतरं भविष्यति । सर्वैणापि नवसंस्कृतज्ञेन इदम् अवश्य पठनीयं पश्यामः ।

डॉ. वर्णेकरांच्या ' अध्यात्मशिवायनम् ' या ग्रंथाचा परिचय मागील प्रकरणांत करून दिलेला आहेच. रसग्रहणात्मक दृष्टीने हाही लेख प्रस्तुत पुस्तकावर प्रकाश टाकणारा व वाचकांची जिज्ञासा पुरी करणारा आहे.

' संस्कृत भवितव्यम् ' दिनांक ७-८-१९८१ च्या अंकात श्री.दे.गो. लांडगे यांनी ' देहल्यां शिवराजः ' नांवाचा एक संस्कृत लेख प्रकाशित केला आहे. तो पुढीलप्रमाणे.

५) देहल्यां शिवराजः

देहल्यां गते विंशतितमे दिनांके श्रीशिवाजीमहाराजस्य अश्वारूढाया: धातुमय्या: प्रतिमाया: अनावरण-समारोह: तत्र भवतां गिरिमहाशयानां राष्ट्रपतीनां करकमलाभ्यां सोत्साहं संपन्न: आसीत । अहं कथमपि निमन्त्रणेन अनुगृहत: आसम् । व्यवस्था विषये किं वक्तव्यम् ? केन्द्रीय शासकीया सा । दिष्टया मम व्यासपीठत: दशहस्तावधि अन्तरम् आसीत । तेन सर्वं यथावत् दृष्टं श्रुतं च सतो: अपि दृष्टिकर्णदोषयो: । निमन्त्रिता: शतश: आसन् । समारोहेण १½ होराम्य: काल: व्याप्त: । व्यासपीठे स्मृति-समित्या: अध्यक्ष: देहली महापौर:, देहल्या: उपराज्यप्रमुख:, राष्ट्रकवि:, रामधारी सिंह, दिनकर महामना राष्ट्रमति:, यशवंतराव चव्हाण: (अर्थमंत्री), वसंतराव नाईक, (महाराष्ट्र राज्यस्य मुख्यप्रधान:), सदाशिवराव साठे मूर्तिकार: च आसन् । राष्ट्रपतिं विहाय प्रत्येकस्य भाषणं अष्ट मिनिटेभ्य: न्यूनावधि जातम् । साठे महाशयै: उत्थाय नमस्कार एव कृत: । सर्वे व्यासपीठं अलंकृत-वन्त: आसन् । भाषणेषु दिनकरकवि: भाषणं अतीवस्फूर्तिप्रदम् आसीत । श्री. चव्हाण नाईकयो: मध्ये तरतमभाव: निर्देशयितुम् अशक्य: । उभौ अपि हृदयाकर्षकौ । राष्ट्रपते: मूलं भाषणं आंग्लभाषा ग्रथितम् । प्रतिपरिच्छेदं तत् हिन्दीभाषाया अनुवादितम् आसीत् । एतत् भाषणं गंभीरं विचारपरिप्लुतं, स्फूर्तिप्रदं सर्वाणि अतिशेते स्त्र ।

एतदुपरि स्मारक समित्या या भावी योजना आकारिता तां मन्त्री उपस्थापितवान् । भविष्यति स्मारक मन्दिरं रचयिष्यते । तन्मध्ये श्री शिवाजी संबन्धि स्मृतिजातं रक्षिष्यते छायाचित्राणि, शस्त्राणि, मुद्रिता-मुद्रित संदर्भग्रन्था:, चरित्रग्रन्था: इत्यादय? अभ्यासकानां कृते । तदर्थं

षड्लक्षरूप्यकात्मक: निधि: आयोजित: । तन्मध्ये लक्षद्वयं पूर्वमेव संचितम् एकलक्षात्मक: निधि: महाराष्ट्र सरकारात् अपेक्ष्यते प्रतिश्रुतोऽपि । अवशिष्टश्च अन्येभ्य: प्राप्स्येता भवतु इत: परं देहल्यां महाराष्ट्र - स्वातन्त्र्यस्थापकस्य मूर्तिरूपेण दर्शनं स्फूर्तिप्रदम् । छत्रपति: आग्रानगरे कंचित् कालं औरंगशाहस्य बन्दिवासे स्थित्वा - युक्त्या साहसेन च स्वदेशं प्रतिनिवृत: दिल्लीम आगत: वा न इति शंकास्पदं स्यात् किन्तु इत: परं श्री शिवाजी देहल्यां शोभिष्यते एव प्रेरयिष्यते च जनान् । राष्ट्रगानान्तरं समारोह: समाप्तिं गत: ।

उत्कृष्ट सोप्या संस्कृत गद्यामध्ये प्रस्तुत लेखामध्ये दिल्ली येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचा जो अनावरण समारंभ झाला, त्याचे वर्णन केले असून सदर लेख २० व्या शतकातील संस्कृत भाषेचा नमुना आहे.

ब) भारतवाणी :

` भारतवाणी ` मध्ये १९-५-१९५८ रोजी त्याचे संपादक डॉ.व.ग. राहूरकर यांचा ` शिवराज्याभिषेकोत्सव: ` हा लेख प्रसिद्ध झालेला आहे. तो पुढीलप्रमाणे -

१) शिवराज्याभिषेकोत्सव:

` होता यावन कीर्तिसागर बहू विस्तीर्ण भूमण्डलीं
त्याने भारतखंडभूमि सगळी व्यापूनिया टाकली
ईशेच्छे शिवजी अगस्ति मुनिसा झाला प्रतापी महा
संग्रामाचमने करुनि च जये त्या प्राशिलें की अहा. `

-गणेशशास्त्री लेले

" आसीद् यावनकीर्ति सिन्धुरिह विस्तीर्णो महीमण्डले
आभोगेन निजेन भारतभुव यो व्याप्य सर्वां स्थित:
संग्रामाचमनेन तस्य सलिलं पातुं समस्तं स्वयं
मन्ये गस्त्य इहाभवत् शिवनृप: श्रीमत्प्रभोरिच्छया ।। "

१५९६ तम शाके आनन्दनामसंवत्सरे ज्येष्ठ शुध्द त्रयोदश्यां शनिवासरे (ख्रिस्ताब्द: ६ जून, १६७४) श्री शिवाजीराजस्य राज्याभिषेक समारोह: रायगडदुर्गे समभूत । भारतभाग्यस्य महामङ्गलो यं दिवस: । धन्यास्ते महाराष्ट्र मावळवीरा: यै: शिवनृपस्य राज्यारोहण प्रसङ्गे.न स्वराज्यसंस्थापनं प्रत्यक्षीकृतम् ।

भोसले कुलं नाम उदेपुरीय सिसोदे रजपूत वंशीयम् अत: शास्त्राधारेण क्षत्रधर्माधिकारि इति तदानींतनै: विद्वद्भि: निश्चितं । तदनन्तरमेव प्रारब्धं राज्याभिषेकसामग्री संपादनम् । आवश्यकं मौञ्जीबन्धनं शिवराजस्य उपरि निर्दिष्टस्य एव मासस्य शुध्द चतुर्थ्यां समजायत । तदनु दशदिनं यावत् विविध धर्मविधि - विधानम् निर्वर्त्यमानम् आसीत् । ज्येष्ठ शुध्द षष्ठ्यां पट्टबन्धन् विधिं विधाय पुण्याहवाचन पूर्वकं यज्ञ: प्रारभ्यत । समारोहार्थं सप्तसमुद्राणां पुण्यसरितां च जलम् आनीतम् आसीत् । प्रारब्ध्व प्रात: त्रयोदयां प्रमुखो राज्याभिषेक विधि: । सिध्दा: सर्वे अष्टप्रधाना:, पत्रलेखका:, गणालेखका:, ऋत्विज, छन्दोगामात्या:, कोशरक्षका:, महालाधिकारिण:, यंत्रालयाधि-कारिण:, देशाधिकारिण:, नगराधिकारिणश्च । स्वयं महाराज: राज्ञी सईबाई, युवराज संभाजी समवेतं विविध स्नानादिविधिं विधाय, शुभ्रवस्त्राणि परिधाय क्षीरवृक्षादारु निर्मितं सुवर्णपत्रवेष्टितं सिंहासनम् उपजगाम । संजाते च इष्ट मुहूर्ते श्रीविष्णो: सुवर्णप्रतिमां षोडशोपचारै: संपूज्य प्राणप्रतिष्ठां विहितवान् तां च दक्षिण हस्ते कृत्वा, सिंहासनं प्रदक्षिणीकृत्य, पूर्वाभिमुखो

भूत्वा सिंहासनमध्यास्त । मङ्गलतूर्यं शतघ्नीनां निनादैः आपूरितं गगनतलम् । राजभूषणाधारिणः, चापेष्वसन - खड्गादि शस्त्रसहितस्य राज्ञ उपरि सुवर्ण-पुष्पवृष्टिः अभूत् । पौरोहित्यं च अस्य समारोहस्य प्रकाण्डपण्डिता श्री गागाभट्टाः (विश्वेश्वरभट्ट पैठणकराः) अकुर्वन् । सम्ये स्थित्वा श्रीशिवनृपतेः सुवर्णतुला अभूत् । तस्याः भारपरिमाणं १६००० होनाः आसीत् । एतद् द्रव्यं महाराजैः दानधर्मार्थम् एव व्ययीकृतम् । श्री गागाभट्टेभ्यः लक्षायिता दक्षिणा प्रदत्ता आसीत् । राजसभातः जगदीश्वरमंदिरं यावत् गजारूढाः महाराजाः समचलन । अनेन राज्याभिषेक प्रसङ्गेन एव राज्यव्यवहारकोशः, करणकौस्तुभः, शिवार्कोदयः, इत्यादयः ग्रन्थाः समुत्पन्नाः । सुरत ग्रामस्य अधिकारिणः पुत्रः हेन्री ऑक्झेंडन् नामा स्वयम् अस्मिन प्रसङ्गे. उपस्थितः आसीत् ।

अस्मिन्नेव समारोहे श्रीरामदास स्वामिनां कृपा चिन्हम् इति कृत्वा भगवद्ध्वज एव सेनाचिन्हमिति निश्चकाय महाराजा । पुरातनं मुस्लीमशकं निरस्य तत्स्थाने " राज्याभिषेकः शकः " तथा च " क्षत्रियकुलावतंस शिवछत्रपति महाराज " सिंहासनाधीश्वरः " इति बिरुदावली अपि स्वीकृता । महाभारत - स्मृति - कौटिल्यादि ग्रन्थान् अनुसृत्य एव राज्यव्यवहार पध्दतिः महाराजेन आरब्धा । यत्सत्य राष्ट्रधर्मस्य एव पुनः प्रस्थापना श्रीशिवनृपतिना कृता इत्यत्र न संशयः । धन्या खलु सा जिजामाता या एवं विधं सुतम् अभूत । धन्यास्ते मावळवीराः यैः शिवराजस्य साहाय्यं विहितम् । त्रिवारधन्याः ते स्वराज्यसंस्थापकाः श्रीशिवसम्राजः ।

प्रस्तुत लेखात श्रीशिवराज्याभिषेक उत्सवाला अनुसरून श्रीशिव-राज्याभिषेक प्रसंगाचे वर्णन केलेले आहे. सदर वर्णनात सईबाई महाराज्ञी झाल्या असे म्हणून फार मोठी ऐतिहासिक चूक झालेली आहे. तेवढे बाकी

वगळता सुंदर व सोप्या, संस्कृत गद्य भाषेत श्री शिवराज्याभिषेकाचे वर्णन केलेले आहे.

' भारतवाणी ' या पत्रिकेने ५ मार्च, १९५८ मध्ये ' श्री शिवाजी तुकाराम विशेषांक ' प्रसिद्ध केला. त्यामध्ये छ. शिवाजी महाराजांवर असलेल्या कांही प्रसिद्ध कवितांचे संस्कृत भाषांतर दिलेले आहे. ते पुढे उद्धृत करीत आहे.

' शिवस्वरूपं स्मर्तव्यं ' या शीर्षकाखाली ' शिवाजी मज जिंकवेना ' या कवितेचे डॉ. ग.बा. पळसुले यांनी संस्कृत भाषांतर केले आहे ते पुढीलप्रमाणे.

<u>शिवाजिर्न मया विजेयः</u>

" शिवाजिर्न मया विजेयः
जलं समुद्रस्य यथा ह्यमेदं
ग्रहीतुमग्निं च करेन शक्यम्
मध्याह्न सूर्यश्च न वीक्षणीयः
तथा शिवाजिर्न मया विजेयः ।"

श्री. रामदास स्वामींनी छत्रपती शिवाजी महाराजांवर लिहिलेल्या ' निश्चयाचा महामेरु ' या प्रसिद्ध कवितेचा संस्कृतानुवाद पुढीलप्रमाणे -

शिवस्वरूपं स्मर्तव्यं

निश्चयस्य महामेरू:

निश्चयस्य महामेरूर्जनतायाश्च संश्रय: ।
अखण्ड स्थिति - निर्धार: श्रीमान योगी महाशय: ।
नासीद भूमण्डले कोऽपि कुर्याद् यो धर्मरक्षणाम्
योऽव शिष्टो महाराष्ट्र धर्म: सोऽपि कृते त्वा ।।
धर्मसंस्थापनार्थाय नरा ईशांश संभवा: ।
संजाता भवितारश्च वरदानं तदैश्वरम् ।।
स्मर्तव्य: शिवराजोऽसौ तृणीकुर्याच्च जीवितम् ।
इहा तु त्र च वस्तव्यं कीर्तिरूपेणा नित्यदा
शिव-स्वरूपं स्मर्तव्यं स्मर्तव्यं शिव: विक्रम: ।
स्मर्तव्यश्च महोद्योग: शिवराजस्य भूतले ।।
कथं शिवनृपस्यासीद् भाषाणां, गमनं कथम् ।
स्मर्तव्यं च कथं तेन विहितो हृदयग्रह: ।।

डॉ. ग.बा. पळसुले यांनी हा संस्कृत अनुवाद केलेला आहे.

`शिवासारखा भूप झाला न कोठे` या कवितेचे ल.रा.पांगारकर यांनी केलेला संस्कृतानुवाद पुढीलप्रमाणे -

न योऽजीगणाद् विघ्नघातं महान्तं

न योऽजीगणाद् विघ्नघातं महान्तं
समुन्मूलिता पातशाही च येन

यशस्वी मनस्वी प्रभावांश्च जातो -
महाराष्ट्र भाग्योदयं ह्यागतोऽर्क: ।।
परस्त्री सदा यस्य माता समाना
भवानीसमा यस्य चासीद् जनित्री
तथा मातृभक्तस्य मार्गे न विघ्न:
सदाचार-कीर्तिश्च याता दिगन्तरम् ।।
उदारो महात्मा तथा धर्मशीलो
निजाचारसाधुत्वं संयमिमांश्च
अभून्नैव भूप: शिवाजी-सदृशो
वदन्तीति सर्वे दिगन्तेतिहासा: ।।

कवि भूषणाच्या " म्लेंच्छ वंशपर सेर शिवराज है ।" या प्रसिध्द कवितेचा संस्कृत अनुवाद पुढीलप्रमाणे.

<u>अस्ति बलवत्तरो म्लेच्छत: शिवो नृप:</u>

अस्ति बलवत्तरो म्लेच्छत: शिवो नृप:
इन्द्र इव जम्भतो, वाऽव इव अम्भसो
रावणात् सदम्भतो रघुकुलतिलको यथा ।
वायुरिव बलाहकात्, शम्भुरिव च मन्मथात्,
सहस्त्रबाहु-अर्जुनात् परशुरामवत् तथा ।
द्रुखण्डतो दवाग्निवत्, द्वीपिवन् मृगव्रजात्
सिंह इव हस्तिनो, वदति भूषण: कवि: ।
तेज इव तिमिरत: कृष्ण इव कंसत:
अस्ति बलवत्तरो म्लेच्छत: शिवो नृप: ।

भूषण कविच्या ' शिवाजी न होते ते ' चा संस्कृतानुवाद -

<u>सुन्ता भविष्यत् सर्वेषाम्</u>

वाराणस्या अनङ्क्ष्यत् श्रीः मथुरैष्यन् मशीदताम्
सुन्ताऽ भविष्यत् सर्वेषाम् अभविष्यत् शिवो न चेत् ।
हिन्दुत्वं रक्षितं तेन हिन्दुत्व - तिलकस्तथा ।
श्रुतिस्मृतिपुराणानि वैदिकी विधिरेव च ।।
रक्षितं राजपूतत्वं राजधान्यश्च रक्षिताः ।
धरायां रक्षितो धर्मो, गुणिनां च गुणास्तथा ।।
भूषणः सुकविर्वक्ति मरहट्टा जयिष्णवः
देशे देशेच्च कीर्तिस्ते गीयमाना श्रुतामया ।।
शाहसूनो करालस्ते कृपाणः शिव भूपते ।
दिल्लीदलं पराभूय अरक्षाद् वेदतालयान् ।।

' एक धर्मराज्य हवे ए भारते ' या रवीन्द्रनाथ ठाकूरांच्या कवितेचे डॉ. नलिमाधव सेन व डॉ. ग.बा. पळसुले यांनी केलेला संस्कृत अनुवाद पुढील प्रमाणे -

<u>एकं धर्मराज्यं भविता भारते स्मिन्</u>

वङ्. - रवीन्द्र - प्रणामांजलिः
एकं धर्मराज्यं भविता भारतेऽस्मिन्
कस्या दूर शताब्द्याः कस्मिन् अख्यात दिवसे
न हि ज्ञातम् अद्य ।

महाराष्ट्रस्य कस्मिन् शैले अरण्यान्धकारे उपविष्टस्य
हे शिवाजी राजन् ।
तव भालम् उन्दास्य इयं भावना तडित प्रभावत्
आसीद् अवतीर्णा
एक धर्मराज्य पाशे खण्ड - छिन्न विक्षिप्तं भारतं
बन्धयिष्याम्यहत् ।।
हे राजन्, तपस्विन्, वीर त्वदीया सौ उदारभावना
विधेर्भाण्डारे
गता स्ति संचयं, किं कालस्तस्याः
कणामपि पारयेद् अपहर्तुम ।
त्वदीयो सौ प्राणोत्सर्गः, स्वदेशलक्ष्म्याः पूजागृहे
तद् सत्य साधनम्
केन वा ज्ञातं यत्तद् भवेत् चिर-युगायुगान्तर कृते
भारतस्य धनम् ।
तस्मिन् दिने स्त्राभि र्न श्रुता कथा - अद्यत्वदीयः आदेशः
सशिरः प्रणामं ग्रहीष्यते ।
कण्ठे कण्ठे वक्षासि वक्षासि भारते सर्वं देशः
तव ध्यानमन्त्रे मेलिष्यति ।
ध्वजं कराभ्याम् उच्छाययिष्यामः विरागिणः उत्तरीय
वस्त्रम् दरिद्रस्य बलम् ।
एकं धर्मराज्यं भविता भारते अस्मिन् इति महा
वाक्यम् करिष्यते संबलम् ।
महाराष्ट्रि यैः सार्धम्, अद्य हे वङ्गियाः, एककण्ठं ब्रुत
जयतु शिवाजिः ।

महाराष्ट्रीयैः सार्धम्, अथ हे वङ्गीयाः एकसार्धंकृत
महोत्सवे सज्जाः ।
अथ एकस्मिन् सभातले भारतस्य पूर्वपश्चिम दिशौ
वामदक्षिणायोः ।
एकीभूय मुज्जीयाताम् एकसार्धं एक गौरवं
एक-पुण्य नाम्नि ॥

याव अंकामध्यें श्री. के.व्ही. कृष्णमूर्ति यांची ` शिवराज स्मरणम् ` ही कविता प्रसिध्द झालेली आहे.

शिवराज स्मरणम्

आ रामसेतुबन्धाद आ च सतीतात भूधरात् प्रथिते
भारतदेशे राजति सह्यनगान्तर्गतं महाराष्ट्रम् ॥ १ ॥

निनिग्रहीतुर्हि नृशंसान् अवितुं देशस्य गौरवं दयया ।
वीराग्रणीर्महात्मा शिवाजिनामाऽऽविरास शिवनेर्याम् ॥ २ ॥

नन्दाब्धि बाण धरणी (१५४९) शाकवत्सर फाल्गुनासिते पक्षे ।
तार्तीयीकदिने सावजनि जिजामातृ-गर्भ शुक्त्याहि ॥ ३ ॥

आ बाल्यतो ह्यमुष्मिन्ननितरसाधारणीं प्रतापर्द्धिम् ।
माता विलोक्य तस्मै वीरवराणां जगाद चरितानि ॥ ४ ॥

शैशव एव बलिष्ठो हस्तेनाभ्रामयत् स तत्र वारीम् ।
दुर्गाणि मृत्स्न्नयणि कृत्वा चिक्रीड सवयोभिः ॥ ५ ॥

सोऽयं जातु विजापुरमुपेत्य यवनैरधिष्ठितं दुष्टैः ।
बहुविधसाहसकृत्यैस्तेषां दर्पं व्यनीनशद्धीरः ॥ ६ ॥

यवनं कंचन गोवधतत्परमसकौ प्रधृष्य तद्धस्तम् ।
सासिं चकर्त सहसा करतलकलितेन खड्गेन ॥ ७ ॥

नमसा षोडशवर्षास्तु तोरणदुर्गं विजित्य वीर्येण
राज्यस्थापनामकरोद् दुर्गाण्यन्यानि चाददेऽरिभ्यः ॥ ८ ॥

अफझलखानिति यवनममात्यजिघांसुं समायानम् ।
चातुर्य-धैर्य-योगाद् अन्तकनिलयं प्रवेशयामास ॥ ९ ॥

कल्याणमण्डलाधिममात्यप्रत्यर्थिनं प्रमथ्यास्य ।
कोशमुमाहर सहसेत्यात्मनिदेशं गृहीतेन ॥ १० ॥

स्वस्यैव सैन्यपतिनोपधिनानीतां चतत्स्नुषां साध्वीम् ।
संपूज्य मातृवत्तां विससर्जास्मै च चुक्रोध ॥ ११ ॥

औरङ्.जेबनाम्ना दिल्लीपतिना प्रगृह्य वञ्चनया ।
बन्दीकृतोऽपि युक्त्या विमाचयन् स्वतंतः पलायिष्टः ॥ १२ ॥

गुणगण-भूषित-गागाभट-महाविप्र-निर्दिष्टे ।
सुमुहूर्तेऽसौ सिंहासनमारूढाद् यथावदभिषिक्तः ॥ १३ ॥

श्रीरामदास गुरुवर - चरणसरोजशिवाप्तविज्ञानः ।
धर्मस्थापन निपुणो गोब्राह्मण पूजकश्चासीत् ॥ १४ ॥

संस्कृत भाषोद्धरणे विहितश्रद्धो हि राजराजोऽसौ ।
राज्यव्यवहारितकोशं प्राचीकशदेव देवभारत्याम् ॥ १५ ॥

अज्ञानेन स्वीकृत यावन धर्म ब्जाजि नामानम् ।
निम्बाकरं दयया हिन्दुसमूहे यथाविधि स्व्यकरोत् ॥ १६ ॥

कालित रिपुगण-तिमिरः पालितजनतः प्रतापतः सूरः ।
फणितट (१६०२) मित शकवत्सर चैत्रशकादिनेऽस्तमगदसौ ॥ १७ ॥

उच्चैः श्रवसा तुल्यं वाजिनमाद्य खड्.हस्तो यः ।
वासवसमप्रभावो जिगाय शत्रून स कीर्तिशेषोऽभूत ॥ १८ ॥

श्रीशिवस्मरणं सततं जागतु भारते राष्ट्रे ।
अभिवर्धतां प्रजानां शौर्यं वीर्यं च देशभक्तिश्च ॥ १९ ॥

या कवितेत छ. शिवाजी महाराजांच्या आयुष्यातील ठळक प्रसंगांचा उल्लेख करून त्यांचे स्मरण भारताला देशभक्ती जागृत ठेवण्यास स्फूर्तिदायक ठरो, अशी अपेक्षा शेवटी व्यक्त केलेली आहे.

याशिवाय याच अंकात ' धर्मगोप्ता शिवोनृपः ' यामध्ये गोवध करणाऱ्या कसायाला शिवाजीने दिलेली शिक्षा ही कथा सोप्या संस्कृत भाषेत डॉ. ग.बा. पळसुळे यांनी मुलांना सांगितलेली आहे. याशिवाय लहान मुलांना समजतील इतक्या सोप्या भाषेत ' शठं प्रति शाठ्यम् ' यांत अफझुलखानाची गोष्ट श्री. ग.श्री. वारे यांनी व ' धन्य श्रीशिवछत्रपतिर्हि यस्य मातृत्वबुद्धिः परकामिनीषु ' यामध्ये कल्याणच्या सुभेदारांच्या सुनेची केलेली पाठवणी ही कथा श्री. ल. आठलेकर यांनी लिहिलेली आहे.

संस्कृत साहित्य परिषद, कलकत्ता जुलै १९३८ मध्ये Vo.XXI No.3 मध्ये ' श्रीशिवाजिविजय: ' हे नाटक श्री. आर. रंगाचार्य यांनी लिहिले असून त्यामध्ये जयसिंहाने शिवाजीवर केलेले आक्रमण व शिवाजीने आग्र्याहून करून घेतलेली सुटका हा प्रसंग कथन केला आहे. या कथेत मध्ये मध्ये कांही सुंदर श्लोक घातले असून दोन भागांत ही कथा सांगितली आहे. लेखकाकडे असलेले संस्कृत भाषेचे विपुल ज्ञानच दिसून येते.


' भारतवाणी ' या पाक्षिकामध्ये चैत्र शुध्द १ शके १८८२ मध्ये प्रा. सत्यदेव वर्मा, यमुनानगर यांनी शिवाजी महाराजांनी जयसिंहाला पाठविलेल्या ऐतिहासिक पत्राचा संस्कृत अनुवाद प्रकाशित केलेला आहे. ' छत्रपति श्री शिवराजस्य महाराजस्य राजानं जयसिंहं प्रति प्रेषितं ऐतिहासिकं पत्रम् ' मध्ये छ. शिवाजी महाराजांची राष्ट्रभक्ती ओतप्रोत भरलेली दिसते. प्रस्तुत लेखकाच्या भाषेत ओज व अर्थगंभीरता आणि नादमाधुर्य ओतप्रोत भरलेले आहे.

' संस्कृत भवितव्यम् ' च्या शनिवार दिनांक ३०-९-१९७२ च्या अंकात ' पुण्यश्लोक शिवो राजा ' या कथेत लेखक श्री. ठ.ग. बिन्निवाले यांनी शिवाजीचे स्मरण केलेले आहे व पुण्यश्लोक शिवाजी महाराजांचा स्त्रियांचे विषयींचा सुसंस्कृत दृष्टीकोन दाखविलेला आहे.

एकंदरीत २० व्या शतकातील संस्कृत साहित्यामध्ये आलेल्या शिवचरित्रामधून शिवाजी हा एक महान युगपुरुष व अवतारी पुरुष म्हणून प्रतिमा वाचकांसमोर उभी राहते.

प्रकरण सातवे

राज्याभिषेक


हिंदवी स्वराज्य

प्रकरण सातवे

राज्याभिषेक

अ) शिवराज्याभिषेकाचे प्रयोजन :

हिंदुशास्त्राप्रमाणे आणि विशेषतः पौराणिक काळातील रुढी-संस्काराप्रमाणे धार्मिक, सामाजिक अथवा राज्य-साम्राज्यविषयक मानमान्यतेला, इतकेच नव्हे तर विधीसंस्काराला, निकटवर्तीय व स्थानिक सामाजिक जमावाची अनुमती मिळणे आवश्यक असते, अशी अनुमती घेण्याचे टाळले गेले तर त्या विधिसंस्काराला आणि त्यापासून रुढीने प्राप्त होणाऱ्या अधिकारांना अगर मान्यतेला जनतेत किंमत दिली जात नाही.

१७ व्या शतकापूर्वी हिंदुस्थानात इस्लामी सलतनीचाच अंमल कित्येक वर्षे होता. सुलतानांच्या राज्यकारभारात धार्मिक बाबतीत भांडणाचे वगैरे सर्व निर्णय काझीकडे असत. इतर धर्मियांच्या भांडणाचे निकाल त्या त्या धर्मातील विद्वानांचे सल्ल्याने केले जात. मात्र या सलतनीत सर्व प्रजा समान मानली जाऊन सर्वांच्या व्यावहारिक गुन्ह्यांचे पारिपत्य सरकारी अधिकाऱ्याकडून केले जाई. त्यात भेदाभेद प्रचलित नव्हता. शहाजी महाराजास वजिरी प्राप्त झाल्यानंतर त्यांनाही सर्वधर्मीय व जातीय समाज समान मानून शिक्षा देण्याचा अधिकार प्राप्त झाला होता. शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्यस्थापनेनंतर हिंदुशास्त्रांचा अवलंब करण्याचे ठरविले, पण त्याचा परिणाम जातीय भांडणातच झाला. या भांडणाची तोड छ. शिवाजी महाराजांनी काढली तरी ती तात्पुरती ठरली.

त्याकाळी जातीजातींचे धार्मिक विधींचे हक्क ठरविण्याचे काम खास गागाभट्ट व काशीतील पंडितांकडे सोपविले जात होते. छ. शिवाजी राजांना यात तोंड काढण्याचा अधिकार नव्हता. शेंडे गोळक यांच्यावरील प्रामण्य व शेणवी जातीवरील आचारांबाबतचे आक्षेप व त्याचप्रमाणे चांद्रसेनीय कायस्थ प्रभूजातीवरील प्रामण्य यांचे निकाल गागाभट्टांकडूनच करवून घेतले होते. कायस्थ प्रभू ही ज्ञाती पूर्ण क्षत्रिय नसून तिला त्रैवर्णिकांना दिलेले षोडशसंस्काराचे पालन करण्याचा अधिकार नाही म्हणून प्रामण्य पुकारण्याची तक्रार मूलत: लेखकांच्या नोक-या कायस्थांना देऊ नयेत, त्या फक्त ब्राह्मणांनाच द्याव्यात या मागणीवरून उत्पन्न झाली होती. ह्या मागणीला शिवाजी महाराजांनी मान्यता दिली नाही. इतकेच नव्हे तर ब्राह्मण मंत्र्यांनी अधिकच जोर केला तेव्हा शिवाजी महाराजांनी आपण क्षत्रिय असल्याने ब्राह्मणांकडून सेवा घेणे धर्मबाह्य आहे म्हणून त्याचा विचार करणे जरूर आहे असा डाव टाकल्यावर ही तक्रार विरघळली. परंतु कायस्थ क्षत्रिय नसल्याने त्यांना अध्यापन म्हणजे लेखनवाचनाचा अभ्यास करण्याचा अधिकार नाही म्हणून नवीन भांडण सुरू केले आणि अप्रत्यक्षपणे त्यांना नोकरी पेशातून दूर करण्याचा प्रयत्न केला. गागाभट्टांनी याचा निर्णय ब्राह्मणाविरुद्ध दिला. त्याकाळी शंकराचार्यांना फारसा अधिकार प्राप्त झाला नव्हता. तो उत्तर पेशवेकाली झाला. सारांश, ईस्लामी सत्तांच्या काळात विधिसंस्काराचा जो लोप झाला, त्यामुळे ज्या जातींनी पुन्हा आपल्या विधिसंस्कारांची ठकल करताच, आपलीच ज्ञाती सर्वश्रेष्ठ, बाकी सर्व शूद्र ठरविण्याचा ब्राह्मणांनी अट्टाहास धरला. शिवाय ब्राह्मण ज्ञाती श्रेष्ठ म्हणून ब्राह्मणास कोणत्याही गुन्ह्याबाबत शिक्षा करण्याचा अधिकार वापरणे शिवाजी महाराजांना जड गेले. अफझलखाना-बरोबर हिंदवी स्वराज्याचा नायनाट करणा-या इस्लामी डावांत सामील होऊन खास शिवाजी महाराजांवर तलवार उपसणा-या ब्राह्मणांवर तलवार

चालविण्यास तत्कालीन समजुतीप्रमाणे शिवाजी महाराजांना माघार घ्यावी लागली. परंतु ही चळवळ ` हिंदवी स्वराज्य ` झाल्याची घोषणा होताच ब्राह्मणांनी आपले श्रेष्ठत्व टिकावे म्हणून केली, अर्थातच ही चळवळ ` हिंदवी स्वराज्या ` ला धोक्याची होती. या धार्मिक अडचणीमुळे समाजात द्वेष भावना वाढण्याची कारणे घडली व धार्मिक बाबतीत विषमता निर्माण केली गेल्याने समाजाचा संस्कृतीची पातळी बरीच खालावू लागली.

मराठे जहागिरदार आपल्याला राजे म्हणवीत. हिंदवी स्वराज्याची संस्थापना करणारा राजा शिवाजी आणि हे जहागिरदार यांच्या राजेपणात फरक मानला जात नव्हता. त्यासाठी स्थानिक लोकांच्या एकमेव संघटनेची जरूरी होती. स्वराज्याच्या नेतृत्वावर एकनिष्ठा असणे हिताचे होते म्हणून स्वराज्याच्या राजेपणात प्रजेच्यादृष्टीने फरक असणे जरूर होते. त्याचप्रमाणे राजसिंहासनही विधिपूर्वक व जाहिरपणे लोकांच्या नजरेस आणून उभारले गेलेले नव्हते. स्वराज्याची संघटना शिवाजी महाराजांच्या शौर्य धैर्यावर व गुणांवर तग धरून होती. त्याची जोपासना कशी होईल याचा विचार मंत्र्यांना शिवला नव्हता.

गागाभट्टांनी महाराजांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा केली व हिंदवी स्वराज्यातील वैगुण्यांची कल्पना करून दिली. छत्रसिंहासनाची प्राणप्रतिष्ठा करून सर्वाधिकारी राजपद मिळविल्याशिवाय श्रेष्ठ जातीतील गुन्हेगारांना शासन करण्याचा अन्य उपाय राहिला नाही याची महाराजांना जाणीव करून दिली. शिवाजी राजांनी त्यांची सूचना मान्य केली व सर्व विधी करून राजघटनेची घडी सुदृढ करण्याची विनंती केली. त्यासाठी आवश्यक ती साधनसामग्री उपलब्ध नसल्याने ते पैठणास गेले व नूतन विधीरचना तयार करून इ.स. १६७४ च्या फेब्रुवारी महिन्यात परतले. गागाभट्ट रायगडास

आल्यानंतर राज्याभिषेकास आवश्यक अशा तयारीची माहिती दिली. विशिष्ट प्रकारचे सिंहासन तयार करणे, निरनिराळे जलकुंभ आणणे, वेदमंत्र जाणणाऱ्या ब्राह्मणांना आमंत्रण देणे यासाठी अवधी लागणे जरूर होते. तरीपण हा कार्यक्रम ? जुलैपूर्वी ठरवणे आवश्यक होते. त्यात संकटे उद्भवली. शिवाजी महाराजांची पत्नी काशीबाई १६ मार्च, १६७४ रोजी मृत्यु पावली. तेरावे होईपर्यन्त महाराजांना रायगडी राहणे जरूर झाले. २४ फेब्रुवारी, १६७४ ला बहलोलखानाशी लढा देताना प्रतापराव गुजर मुख्य सेनापती पडल्याची बातमी आली. महाराजांना तातडतोब चिपळूणास जाऊन हंबीरराव मोहिते यांच्याकडे ते रायगडास परत आले. अशा अनेक संकटातून राज्याभिषेक सोहळा न टाळतां ठरलेल्या वेळीच ठरकून घेण्याची गागाभट्टांनी काळजी घेतली.

अशा रितीने हा राज्याभिषेक शिवाजी महाराजांना करण्याचे ठरविले व त्याची प्राथमिक तयारीही अनेक संकटातून पूर्ण केली.

ब) <u>गागाभट्टांनी घेतलेला राज्याभिषेकाचा निर्णय</u> :

गागाभट्ट हे अतिशय थोर अधिकारी पुरुष होते. गागाभट्टांचे घराणे दक्षिणेतील असून ते स्वतःला ` दिनकरतनय ` असे संबोधितात. पैठणाचे श्री. अनंतदेवभट्ट हे त्यांचे गुरु बंधु होते. त्यामुळे ते अधूनमधून पैठणास येत असत. येथे गागाभट्ट व शिवाजी महाराज यांचा राज्याभिषेकापूर्वी जो संबंध आला, त्याबद्दल काही विपर्यास केला असल्याने त्याबद्दल थोडी चर्चा करणे जरूर आहे. बखरकारांना त्यांचे संबंध नीटसे माहित नसल्यामुळे त्यांचा नवीनच संबंध जडला असे ते लिहितात. गागाभट्टास राज्याभिषेकासाठी आणण्याचा व त्यांचे मन वळवून तो विधी साजरा करण्यास उद्युक्त करण्याचा खटाटोप करण्यास त्यांना द्रव्यलालूच दाखवावी लागली असे ते भासवितात.

गागाभट्टांचा कोकणाच्या सामाजिक वादाशीही पूर्वी अगत्य संबंध आला होता. शेंडे-गोळक यांच्याबरील ब्राह्मण्य निर्णयात त्याचा प्रथम संबंध आढळतो. त्यानंतर गागाभट्ट कोकणात इ.स. १६६२ त आले. तेव्हा इ.स. १६६४ च्या सुमारातील शेणवी जातीच्या पांडळांचा निर्णय त्यांनी अनेक काशीस्थ व महाराष्ट्रातील पंडित उपाध्याय इत्यादींची शिवाजी महाराजांच्या निमंत्रणावरून राजापुरात सभा करून दिली, व तो निर्णय देताना इंदूरहून आधार ग्रंथ येईपर्यन्त तरी त्यांचे वास्तव्य इकडे झाले होते. त्यांच्याबरोबर अनंतदेवभट्ट ही होते. त्यानंतर कायस्थ प्रभूंबाबत निर्णय इ. १६६९ ते १६७१ मध्ये दिले.

'कायस्थधर्मप्रदीप' हा ग्रंथ लिहून त्यांच्या षोडश संस्कारांच्या अधिकाराचे विस्तृत विवेचन केले. याही निर्णयात सद्गुरु अनंतदेवभट्ट स्वामींचा संबंध असल्याचा रघुनाथ पंडित राजांनी उल्लेख केला आहे. या निर्णयावरून जातीजातींच्या धर्मव्यवहाराबद्दल किती प्रागतिक प्रवृत्ती होती हे सुस्पष्ट होते.

गागाभट्ट व शिवाजी महाराज यांची इ.स. १६६२ मध्ये तरी चांगलीच ओळख झाली होती. त्यांच्या 'समनयादि निर्णयास' शिवप्रशस्ती जोडण्याइतका शिवाजी राजांविषयी त्यांना आदर वाटू लागला होता, यात शंका नाही. या प्रशस्तीत गागाभट्टांनी शहाजी राजे यांचा असा उल्लेख केला आहे की,

'तस्मात्समुद्भिन्नकरावलुंठाकुराशा -
बुधप्रपूतशुभ्रकीर्तिप्रकाशः ।
लोकैः सदा हृदि धृतो गुणसंनिविष्टः
श्री शाहजीति नृपति भुवनैकरत्नम् ॥ १ ॥

त्यानंतर शिवाजी महाराजांची स्तुती येते -

तस्यात्मजः शिव इति प्रथितप्रभावः ।
सिध्दांगना जनसमाजसमिध्दकीर्तिः ॥
दाने यमः सुकृतिनां क्षितिपतिस्य दैन्यं
सैन्येन वैन्यसदृशः प्रतिभूमतीनाम् ॥ ३ ॥

यस्मिन्न साधारण धैर्य शौर्य
गांभीर्य सौंदर्य गुणैकधुर्ये
गिरीन्द्रभीमानुज सिंधुराज -
स्मराश्च साधारणतां भजंते ॥ ४ ॥

दानाय द्रविणार्जनं जन परित्राणाय वीरव्रतं ।
सत्याय प्रियभाषणं हरिपदध्यानाय चेतः स्थिति ॥
यत्सख्येन च चक्रवर्तिपदवी त्राता नृपा भूरिशो ।
दिल्लीन्द्रः क्षमाप यस्य कलहाल्लं केशतुल्योपमः ॥ ५ ॥

असौ शिवाजी रुचिरेण धाम्ना
नाम्ना च रूपेण च संगतार्थः ॥
रोषातुरे वक्षुषि यद्विपक्षो
निर्वातकांतार समोऽमितोऽभूत ॥
विश्राणनेषु व्यसनं यदीयं
विद्या प्रसंगेषु विनोदसौख्यम् ॥
यस्त्रावदातं च यशो वितानं
दिव्यंडलीमंडप मातनोति ॥

अयं शिवाजी राजा राज्य प्रशासद् स्ववर्णाश्रमेतरायो-
न्निवृतिधर्मलिंगासकरेण वर्तमन् इ. *

गागाभट्ट शहाजीराजांची स्तुती करताना त्यांना राजकुलांतील व नृपति अशी विशेषणे लावतात. या ठिकाणी आलेल्या शिवस्तुतीचा विचार केला तर या प्रशस्तीनंतर दहा वर्षांनी भोसले घराणे क्षत्रिय आहे हे पटविण्यासाठी धावपळ करण्याची गागाभट्टांना खास गरज नव्हती. यानंतर शिवाजी महाराज आग्र्याहून निसटून वाराणसीस गेले, तेव्हा दोनच वर्षांपूर्वी घनिष्ठ संबंध जडलेल्या गागाभट्टांची भेट शिवाजी महाराजांनी घेतली असणे पूर्णपणे संभवते. त्यानंतर पत्रव्यवहारही झालेला आहे. शिवाय इ.स. १६७२ अखेरपर्यन्त शिवाजी राजांचा लौकिक सर्वतोभूमी झाला असता हिंदुधर्माभिमानी गागाभट्टांना काशीस त्याची दखल नसेल असेही म्हणता येणार नाही. सारांश गागाभट्ट व शिवाजी महाराज यांना एकमेकांविषयी चांगलाच आदर होता आणि गागाभट्ट आपल्या गुरुबंधुकडे आल्यानंतर महाराजांची भेट घेतल्याशिवाय राहिले नसावेत. आपल्या दौ-यात राजे-रजवाड्यादि यजमानांची भेट घेण्याचा शास्त्री पंडितांचा त्यावेळी परिपाठ होता. गागाभट्ट सहज दक्षिणेत आले असे सभासद सांगतो, ' शिवराज्याभिषेक कल्पतरु ' तील निश्चलपुरीहि तेच सांगतो -

' तादृशे समये प्राप्तो गागाभट्टस्तु नासिकम् ।। ४ ।। '

थोर पंडितांचे आगमन झाल्याचे कळताच त्यांना सन्मानाने निमंत्रण देऊन त्यांची पूजा करणे हा त्याकाळी एक शिष्टाचार होता. गागाभट्ट नाशिकहून पैठणास गेले, तेथे त्यास महाराजांकडील निमंत्रण मिळाले व त्याच्या मनात तेथेच ही राज्याभिषेकाची कल्पना आली. परंतु गागाभट्टांचे हे आगमन इ.स. १६७२ च्या अखेरीस झाले असावे. त्यानंतर सभासद लिहितो त्याप्रमाणे गागाभट्टांनीच ' मराठा राजा छत्रपति व्हावा असे चितात आणिले ' व त्यानुसार बोलणे झाले.

आर्य संस्कृत्यनुरूप हिंदवी स्वराज्याची इमारत उभारली गेलेली पाहून गागाभट्टांसारख्या विद्वान व अत्यंत प्रागतिक पंडिताला या मंदिरात राजसिंहासनाची न्याय व धर्मशास्त्राप्रमाणे सविध प्राणप्रतिष्ठा करण्याची निकड व महती पटल्यास व ती घडवून आणण्याची आतुरता वाटल्यास नवल नाही. त्यात त्यांना त्यांच्या गुरुबंधूवा अनंतदेव भट्टाचाही पाठिंबा मिळाला असे दिसते. (शिवराज्याभिषेक कल्पतरु, भा.इ.सं.मं., त्रैमासिक पुस्तक, क्र. १०, १९,पृ. २१)

क) <u>शिवराजाभिषेक प्रयोग:</u>

छ. शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकासाठी काशीचे वेदमूर्ति विश्वेश्वरभट्ट (गागाभट्ट) यांना सन्मानाने निमंत्रित करण्यात आले होते. शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक विधीसाठी त्यांनी ` शिवराजाभिषेक प्रयोग: ` हा ग्रंथ लिहिला. भोसले वंशाचे क्षात्रियत्व सिध्द करण्यासाठी त्यांना फार मोठे संशोधन करावे लागले. त्याची थोडक्यांत माहिती पुढे येणार आहे. त्या आधी ` शिवराजाभिषेक प्रयोग: ` या ग्रंथाचे अंतरंग वाचकांना समजावे, म्हणून त्याचा थोडक्यात सारांश येथे देत आहे. हा ग्रंथ रचून एक स्वतंत्र विधी करुन या नवीन राज्याची प्रतिष्ठापना करण्याचे त्यांनी ठरविले व ऐन्द्राभिषेक विधि तुलादानविधि व तुलापुरुषादानविधि तयार करुन परत रायगडास १६७४ च्या फेब्रुवारी महिन्यात पैठणाहून परत आले.

धर्मशास्त्र विषयक अर्वाचीन कालखंडातील एक महत्वाचा ग्रंथ म्हणजे गागाभट्ट काशीकरकृत ` श्रीशिवराजाभिषेक प्रयोग: ` हा होय. धर्मशास्त्रान्तर्गत संस्कृत ग्रंथामध्ये राजाभिषेकविषयक निदान १०-१५ प्रमुख ग्रंथ आढळतात. त्यातील काही एका राजानंतर दुसरा राजा गादीवर येताना तयार करण्यात

आले आहेत. पुण्यश्लोक शिवाजीमहाराजांच्या सिंहासनारोहणाला अनेक दृष्टींनी असाधारण महत्व असल्याने तत्कालीन महान मीमांसक व धर्मशास्त्रज्ञ (कलीयुगीचा ब्रह्मदेव असे बखरकारांनी त्यांचे वर्णन केलेले आहे.) गागाभट्ट काशीकर यांनी या राष्ट्रीय महोत्सवासाठी राज्याभिषेक प्रयोगाचा स्वतंत्र ग्रंथ तयार केला " राजाभिषेकस्य महाप्रयोगं विश्वेश्वरो दिनकरिस्तनोति । "

या आरंभीच्या श्लोकार्धात व " इति श्रीमन्मीमांसकभट्ट नारायणसुत - श्रीमद्रामकृष्णतनुज - भट्ट दिनकरसूनु - गागाभट्ट नामक विश्वेश्वरकृतो राजाभिषेक प्रयोग: " या शेवटच्या वाक्यात गागाभट्टांनी स्वत:च्या ग्रंथ-कर्तृत्वाचा स्वच्छ निर्देश केलेला आहे. हा ग्रंथ पुण्याचे इतिहास संशोधक श्री.वा.सी. बेंद्रे मोठया प्रयासाने तीन वर्षांपूर्वी संपादित केला व त्याला ४२ पृष्ठांची अभ्यासपूर्ण प्रस्तावना जोडून शिवचरित्रविषयक एक अत्यंत महत्वपूर्ण घटनेसंबंधीचे भ्रमजाल दूर करण्याचे साधन उपलब्ध करुन दिले.

या अल्प ग्रंथात राज्याभिषेकाप्रीत्यर्थ करावयाचे निरनिराळे विधी दिनक्रमानुसार सात दिवसांत जसे करावयाचे होते, ते शिवाजी महाराजांच्या मुख्य पुरोहिताच्या मार्गदर्शनार्थ लिहून काढलेले आहेत. गागाभट्टांचे गुरुबंधु श्रीमद् अनंतदेवभट्ट (पैठणवासी) यांनी " राजधर्मकौस्तुभ: " या नांवाचा या विषयावरील एक ग्रंथ लिहिलेला आहे. तो अधिक सविस्तर असून त्यात पौराणिक मंत्रांचे स्वतंत्र प्रकरण आहे. गागाभट्टांनी पौराणिक मंत्रांना आपल्या ग्रंथात स्थान दिलेले नाही. " शिवराजाभिषेक प्रयोग: " हा ग्रंथ सर्वस्वी वैदिक मंत्रमय आहे. प्रस्तुत ग्रंथाचे मूळ हस्तलिखित बिकानेर राज्याच्या राजहस्तलिखित संग्रहात होते.

शिवराज्याभिषेकाची घटना राष्ट्रीयदृष्टया अत्यंत महत्वाची असल्याने व प्रस्तुत ग्रंथात तिचे अधिकृत स्वरुप आढळत असल्याने तिचे संक्षिप्त

निवेदन या ठिकाणी करणे अप्रस्तुत होणार नाही.

राज्याभिषेक विधीच्या आरंभापूर्वी महाराजांचा व्रतबंध झाला. त्यानंतर ` ब्रह्महत्यादिसकल पापक्षयद्वारा श्रीपरमेश्वरप्रीत्यर्थं ` ` अग्निदैवत्यं हिरण्यं, पितृदैवत्यं रजतं स्वशरीरसमाधिकतया तोलितं कुर्वन् ब्राह्मणेभ्योऽहं सम्प्रददे ` असे म्हणून महाराजांनी तुलादानविधी केला. हा विधि गागाभट्टांनी स्वतंत्रपणे रचला. त्यानंतर महाराजांचे पूर्वपरिणीत भार्यांशी वैदिक पध्दतीने समंत्रक विवाह झाले. (राज्याभिषेकाच्या महान समारंभाची नांदी किंवा प्रस्तावना म्हणून हे विधी झाले.) त्यानंतर ज्येष्ठ शु.६ शनिवार शके १५९६ (३० मे १६७४) या मंगल दिवशी ` मम प्रजापालनाधिकार सिध्दीद्वारा परमेश्वरप्रीत्यर्थं, साम्राज्यादिफलप्राप्त्यर्थं गणेशपूजनं तदङ्.गत्वे ब्राह्मणैः पुण्याहवाचनं पूजनं नान्दीश्राध्दं पुरोहितवरणादि च करिष्ये. `

असा संकल्प सोडून महाराज अभिषेकासाठी सिध्द झाले. दुसऱ्या दिवशी ऐन्द्रशांति, ऐशानयाग, तिसऱ्या दिवशी ग्रहयज्ञ, नक्षत्रहोम, चवथ्या दिवशी मंगळवार व नवमी हा निषध्द दिवस आल्याने समारंभ बंद राहिला. पाचव्या दिवशी उत्तरपूजनानंतर आचार्यांना प्रतिमादान केले. सहाव्या दिवशी कृष्णवस्त्र परिधान करून पक्व अपक्व मांस, मत्स्य व सुरा यांनी युक्त असा निर्ऋति याग व सातव्या दिवशी ऐन्द्रशांति समाप्ति, सहस्त्र ब्राह्मण भोजन झाल्यावर मंडप पूजन, विविधकुम्भस्थापना, महावेदीवर अग्नि व ग्रह यांची प्रतिष्ठापना, होम (या होमाच्या प्रसंगी सर्व वेदांच्या सर्वशास्त्रीय ब्रह्मवृंदांनी वेदमंत्रांचा उदघोष केला. द्वारपालांनी द्वारजप केला.) पूर्णाहुतीनंतर महाराज अभिषेक शाळेत गेले. तेथे सुगंधी तेले, चूर्णे विविध मृत्तिका, पंचामृत इ. नी युक्त अशी समंत्रक स्नाने त्यांना घातली. त्यानंतर शुभ्र वस्त्रे व चंदन धारण करून वेदमंत्रांच्या पावनमंगल घोषात मंडपप्रवेश करून

वेदीवर प्रतिष्ठित केलेल्या आसंदीवर दोन गुडघे टेकून महाराजांनी विधिपूर्वक आरोहन केले. नंतर अभिषेक झाला. पुढे अग्निप्रार्थनेनंतर अभिषेक शालेतील सुवर्ण सिंहासनावर आरोहण झाल्यावर प्रति इन्द्र झालेल्या शिवप्रभूला ब्राह्मणामात्यांनी हात धरून ` महते क्षात्राय, महते अधिपत्याय, महते जानराज्याय एषा वो भरता राजा सोमो ऽस्माकं ब्राह्मणानां राजा ` असा उद्घोष करीत निरनिराळ्या पवित्र उदकांनी अभिषेक करण्यासाठी अभिषेक शाळेत नेले. तेथे मंत्रवाद्यादिकांच्या उद्घोषांत अभिषेकविधि समाप्त झाला.

सात दिवसपर्यन्त शास्त्रशुध्द पध्दतीने चाललेल्या या महार्मंडल समारंभातील केवळ प्रमुख विधिंचा निर्देश ग्रंथाच्या अंतरंगाचे ओझरते दर्शन घडावे म्हणून येथे केला आहे.

हा राज्याभिषेक विधि, ऐंद्राभिषेक विधी म्हणून तयार केला होता, तरी तो गागाभट्टांनी आपल्या मार्गदर्शनाखाली भोसल्यांचा कुलोपाध्याय व पुरोहित बाळंभट यांचेकडून तत्कालीन रूढीप्रमाणे करून घेतला. बाळंभटाचे साह्यास सर्व वेदांचे व शास्त्रेचे पाठिक ब्राह्मण दिले. तत्कालीन ब्राह्मणांनी जो प्रामण्याकडे कल राखला होता (पुढे त्याचे थोडक्यांत विवेचन करणार आहे) त्या अनुरोधाने शिवाजी महाराजांच्या विधीत काही संस्कारातलि अपूर्णतेच्या वगैरे शंका कुशंका निघू नयेत म्हणून गागाभट्टाने महाराजांचा मौंजीबंधन विधि व विवाहविधी पुन्हा सशास्त्र उरकून घेतले. कारण तत्कालीन पुरोहित तेवढे तयार नसल्याने व त्याकाळी पुस्तकाच्या ने सहजासहजी विधीचे तपशीलवार वैदिक मंत्र वगैरेचे ज्ञान नसल्याने हे विधी तितक्या (म्हणजे गागाभट्टाचे आजे नारायणभट्ट यांनी विरचित अशा) मंत्रविधीने केले जात नसत. त्यामुळे क्षात्रिय समाजाच्या व्यक्तींना पूर्ण क्षात्रियत्वाची दीक्षा मिळणे जड होते. त्यानंतर महाराजांच्या हातून कळत नकळत घडलेल्या सर्व पापांचे क्षालन करण्यासाठी

तुलापुरुष दान व तुलादान विधी करून शिवाजी महाराजांना शुध्द व पूर्ण क्षत्रिय करून राज्याभिषेक झाला. नंतर या विधीतील दोष दाखवितानाही शिवाजी महाराजांच्याबाबत तक्रारीला जागा सापडली नाही.

हा राज्याभिषेक सोहळा एकंदर ११ मे ते ५ जूनपर्यन्त चालू होता. या विधीतील अभिषेक विधीने महाराजांना चारही वर्णीय लोकांनी आमचा राजा म्हणून अभिषेक केला.

ह्या शिवाजी महाराजांच्या राजाभिषेक विधीला ' राज्याभिषेक ' हा प्रतिशब्द नसून तो उत्तरकालीन राज्यारोहण किंवा मंचकारोहण किंवा संवत्सराभिषेकाला फक्त लागू पडतो.

या ऐन्द्राभिषेक विधीने छत्रपती शिवाजी महाराजांना जो सर्वाधिकार प्राप्त झाला, त्याचा उपयोग थोड्याच काळात महाराजांनी केला आणि सर्व जनतेला समानतेचा लाभ करून दिला. त्यायोगे जनता आपल्या सांस्कृतिक उत्क्रांती-साठी अधिकाधिक ओढ घेऊ लागली. शिवाजी महाराजांनी हुकूम काढून सर्व लोकांस जातीय व पंथीय लोकांस आपापले चालू व काही लुप्त झालेले आचारधर्म पुन्हा आचरणात आणण्यास सांगितले. हिंदूराजनीति व व्यवहारनीति यातील तत्वाप्रमाणे आपली वागणूक ठेवली. धार्मिक व पारमार्थिक पंथीयांच्याही शिकवणूकीला अवसर दिला. वैदिक ईश्वरार्चन पध्दतीबरोबर संतांच्याही भजन-पूजनाला मान्यता दिली. ख्रिस्ती फादर्स हिंदू प्रजेला बाटविण्याचे सारखे प्रयत्न करीत, त्याला आळा घालण्याकरिता अशा बाटलेल्यांना परत आपले हिंदुत्व स्वीकारावयाचे असेल तर त्यांना पावन करून घेऊन त्यांचा मूळ जातीमध्ये प्रवेश करून घेण्यास परवानगी दिली. राज्यातील प्रजेला न्यायदानाचे सर्वश्रेष्ठ अधिकार महाराजांस मिळाल्याने जनतेला बराच धीर आला व जातीयतेचे

आधारावर न्याय वगैरे देणे गोठविल्याने प्रामण्यादि यांतील बहिष्काराला बराच आळा बसला. ब्राह्मणांनाही गुन्ह्यांबद्दल शिक्षा करण्याचा शिवाजीस अधिकार प्राप्त झाल्याने त्यांच्याकडून धर्माचे नांवाखाली होणारा उपद्रव थांबला.

शिवाजी महाराजांच्या ज्या संघटनात्मक कार्यामुळे महाराष्ट्रात राजकीय, सामाजिक व पारमार्थिक संस्कृतीची मुळे खोलवर रुजली गेली, त्याच महाराष्ट्राच्या हृत्पटलावर राजसंस्थेच्या उत्क्रांतसंस्कृतीचे प्रतिबिंब चिरंजीव करण्याचे कार्य या ऐन्द्राभिषेक विधीत आहे. कारण त्या घटनेने अखिल समाजाला राज्यव्यवहारात समानतेच्या पातळीवर आणले. धार्मिक आणि व्यावहारिक पारतंत्र्याला आळा घालण्याचे एक तंत्र निर्माण झाले. काशीस्थ गागाभट्ट व पैठणचे अनंतदेवभट्ट यांचा निःस्वार्थी मानवतेचा जिव्हाळा शिवाजी महाराजांच्या सांस्कृतिक कार्यात सहज साह्यक झाला आणि शिवराज्याभिषेकाने १७ व्या शतकात राजकीय, सामाजिक, धार्मिक, पारमार्थिक आणि व्यावहारिक संघटनेचे एक उत्तम व प्रभावी साधन महाराष्ट्राच्या हाती आले. विधीच्या चिकित्सेपेक्षा त्या विधीमागील भावनांचा विचार केल्यास महाराष्ट्राच्या इतिहासातील सांस्कृतिक उत्क्रांतीची ही एक महत्वाची घटना होती आणि त्या विधीतील ऐहिक तपशिलांचा जीवन जरी विनाशी असला तरी त्या घटनेतील सांस्कृतिक तत्वांचा आत्मा अमर होता याची आजही प्रचिती येते. मात्र राज्यशास्त्र व समाजशास्त्र यातील ही मूल्ये चिकित्सेने व अभ्यासवृत्तीने शोधली पाहिजेत.

राज्याभिषेक प्रसंगी निर्माण झालेल्या वादाचे स्वरूप या ठिकाणी थोडक्यात देत आहे.

शिवाजीचे जे सरकारकून स्वराज्यनिष्ठ होते त्यांना शिवराज्याभिषेकाच्या विचाराने आनंद झाला, परंतु जे वर्णाश्रमधर्माचे नांवाखाली आपण शासनातीत असल्याचे मानून स्वैराचार करीत होते त्यांना आपल्या जन्मजात स्वातंत्र्याला धोका उत्पन्न होत असल्याची जाणीव झाली. गागाभट्ट व अनंतदेवभट्ट यांच्याशी शास्त्रार्थाने वाद घालण्याइतकी त्यांच्याजवळ विद्याही नव्हती व कुवतीही नव्हती. त्याचप्रमाणे आर्थिक व्यवहारात मराठ्यांची एक जमात शह देणार असेही त्यांना वाटू लागले. या भीतीने काही जातिनिष्ठ सरकारकुनांनी शिवाजी महाराजांच्या प्रचलित आचारधर्मातील वैगुण्यावरून तांत्रिक अडचणी उभ्या करण्याचा प्रयत्न केला, परंतु राजाला प्रत्यक्ष विरोध करणे, गागाभट्ट व अनंतदेवभट्ट यांना तोंड देणे हेही तितकेच दुर्घटव अनर्थावह होते, हे जाणून त्यांनी जुळते घेण्याचा प्रयत्न केला. सारांश, जो काही विरोध झाला तो अप्रत्यक्ष व वादविवादात्मक असावा.

शिवराज्याभिषेकाला विरोध करणाऱ्या ब्राह्मण सरकारकुनांनी पृथ्वीवर क्षत्रियवर्णच उरलेला नाही, अशी सबब पुढे करून शिवाजीच्या क्षत्रियत्वाबद्दल आक्षेप घेतला नाही उलट ` दिनकरोद्योत ` वगैरे शिवकालीन शास्त्रग्रंथात चार वर्णांचे अस्तित्व मानलेले आहे.

त्यांनी जे दोष दाखविले त्यामध्ये १) शिवाजीचा व्रतबंध झाला नसल्याने तो क्षत्रिय असूनही आचाराने शूद्र होता. राज्याभिषेकापूर्वी त्याचे मौंजीबंधन केल्यास तो दोष नाहीसा होईल हा गागाभट्टांचा अभिप्राय सर्वांस मान्य झाला. २) क्षत्रियांच्या उपनयनसंस्काराची कमाल मर्यादा २२ वर्षे असून शिवाजीचे वय अधिक झाले होते. यावर गागाभट्टांनी प्रायश्चित्ताची तोड काढली. ३) छापे वगैरे घालतांना शिवाजीकडूनच ब्रह्महत्याही झाली असावी,

त्यास शुध्दि नाही. त्यावर गागाभट्टाने `मात्स्या` च्या आधाराने `तुलादानाव्यतिरिक्त` तुला पुरूषा दानाने हा दोष नाहीसा होतो, हे सिध्द केले.

शिवाजीच्या पदरी काही क-हाडे व श्रृंगारपुरचे पंडित होते. ते शिवाजीच्या बाजूचे होते. राज्याभिषेकापूर्वी शिवाजीची एक मोठी अडचण होती ती म्हणजे ब्राह्मण गुन्हेगाराच्या शासनाबाबतचे परावलंबित्व, ब्राह्मणांनी वाद उपस्थित केल्यास, ब्रह्मवृंदास जमवून किंवा काशीस्थ ब्राह्मणांकडून ते सोडवावे लागत. तत्संबंधीची आज्ञा पंडितरावाच्या नांवाने काढावी लागे.

सारांश, शिवाजीला सामाजिक व धार्मिक बाबतीत सत्ता नव्हती. राज्याभिषेकानंतर राजप्रतिष्ठा प्राप्त झाल्यानंतर मात्र शिवाजी गुन्हेगार ब्राह्मणांना कडक शासन देऊ शकला असता. राज्याभिषेकापूर्वी तो त्यांना नोकरीवरून काढण्या व्यतिरिक्त जास्त काही करू शकत नव्हता. ही अडचण दूर करण्यासाठी ही शिवाजीने राज्याभिषेकाचा निर्णय घेतला. राज्याभिषेक होताच अगदी पंधरा दिवसांत शिवाजीने जातिधर्माच्या व्यवस्थेबद्दल आपल्या नांवाने आज्ञापत्रे काढली.

या राज्याभिषेक विधीचे आवश्यक वर्णन पुढे देत आहे.

राज्याभिषेक विधी -

गागाभट्टांनी सर्व विधी भोसल्यांचे कुलोपाध्याय व पुरोहित प्रभाकर-भट्टांचे चिरंजीव बाळंभट यांचे हस्ते करविला. आपण जवळ मार्गदर्शन करीत असले. बाळंभटाच्या साह्यास सर्व वेदांचे व शास्त्रांचे पढिक ब्राह्मण दिले होते. दान व भोजनार्थ सहस्त्र ब्राह्मण आणले होते. यज्ञशाळा व राजसभा यात लागणाऱ्या ब्राह्मणांसच फक्त रायगडावर नेले होते. बाकीचे पाचाडात ठेविले होते.

गागाभट्टांच्या पोथीवरून सर्व विधी मोठया समारंभाने, गांभीर्याने व वेदघोषात यशस्वीपणे पार पाडला असावा. कारण या पोथीत मंत्रांची वाटणी वगैरे माहिती तपशीलवार लिहून व समजावून सांगितली आहे. यांतील मुख्य कार्यांचा तपशील गागाभट्टांनी आखून दिला होता. तो व तत्कालीन पत्रात जे समारंभ झाल्याबद्दल उल्लेख आले आहेत ते पुढे देत आहे.

शुक्रवार २९ मे, १६७४ - शकावलीत उल्लेख असा आहे की, ' ज्येष्ठ शुध्द ४ घटी व राजश्रीची मुंजझाली. ' कांही उल्लेखांप्रमाणे हा मौंजीबंधन विधी निव्वळ धर्मशास्त्रासाठी व्हावयाचा होता, तर त्याला दोन दिवस कां लागावे अशी शंका उत्पन्न होते. परंतु या उल्लेखांत चूक नसून त्या दोन्हीही तिथी एकाच दिवशी आल्या होत्या, शुक्रवारी चतुर्थी सूर्योदयानंतर अवघी सहा घटिका होती व पांचव्या घटिकेला मुंज लागली व होमादि विधि पुढे तास-दोन तास चालले. साहजिकच मुख्य विधी पंचमीतच गेला.

याच दिवशी अपरात्मकाली प्रायश्चित विधी म्हणजे ' तुलापुरुषा दान, सुवर्णादि तुलादान ' आदि झाले. ऑक्सिंडन लिहितो - This day the Rajah according to the Hindoo customc was weighed in gould and poized about 16,000 pagothas, which money, to gether with one hundred thousand more, is to be distributed after his coronation unto the Braminys, who is great number are flockt hiter from all the adjacent countrys....

वेंगुर्ल्याचा डच वखारवाला लिहितो - The freebooter suvasy has been making preparations for some time past for having himself crowned king, and in the months of June (New style)

everything was ready and the Brahmans and Bhutts (who are learned men of the highest caste) and 11,000 persons from many places round about, with their wives and children, were assembled to perform the ceremony, according to the custom of the country, near the castle of Rairy...... This, however they refused but one of the chief among them complied, and Suasy ordered, 7,000 pagadas to be given to him us a present. This day was given up to the ceremony (Upanayan) and a sum of 17,000 pagodas distributed to the crowed which had collected to witness it. On the 14th June (4th New Style) Suasy made a great distribution to the learned men for the washing away of the sins he had committee, of gold to the weight of his body (weighing 17,000 pagodas or about 160 pounds) and the same of silver, copper, spelter, tin, lead and iron and of very fine linen, camphor, salt, nails, nuts, and mace, with the same quantity of other native, spices, bulter, sugar, etc...... of all fruits and all sorts of eatables, betel, and arrack included, he also gave to the weight of his body, two of the learned men proposed 1600 pagodas in addition on account of the Sin suasy might have committeed by his burnings, involving the death of women, children, cattle and Brahmans."

ऑर्बिसंडन फक्त तुलादानविधीचा उल्लेख करतो, पण आज्ञाह्य मुंजीचा, सुवर्णादि तुलादानांचा व तुलापुरुषादानाचा उल्लेख करतो. आज्ञाह्याला तिथीची माहिती नीट समजली नसावी. वरील माहितीवरून शिवाजी महाराजांचे वजन १७,००० पगोडे किंवा १६० पौंड व 'तुलापुरुषादाना' साठी तयार केलेल्या सुवर्णमूर्तीचे वजन १,२०० पगोडे म्हणजे ११-१२ पौंड असावे.

गागाभट्टांनी मौंजीबंधन आणि तुलापुरुषादानादि विधी एकाच दिवशी केले यात शंका नाही. उशीरा मुंज झाल्याबद्दल प्रायश्चित्त म्हणून तुलादानविधी आणि ब्रह्महत्यादि महान पापांच्या क्षालनार्थ 'तुलापुरुषादान' केले. गागाभट्टांनी हा 'तुलापुरुषादाना' च्या विधीचा प्रयोग मुद्दाम तयार केला. याच प्रयोग पोथीत 'दिनकरोद्योत' त दिलेले सुवर्ण, ताम्र आदि तुलादान प्रयोगही घेतले आहेत. तुलापुरुषादानविधीत सुवर्णाची विष्णुमूर्ति करून तिची प्रतिष्ठा, होम वगैरे झाल्यावर विसर्जन झाले की, तिचे दान ब्राह्मणांस करणे. तुलादान म्हणजे यजमानाच्या वजनाचे सोने, रुपे वगैरे धातू व धान्यादि इतर सर्व जिन्नस हे निरनिराळे वजन करून दान देणे. हे दान फक्त विधी चालविणाऱ्या सर्व वेदी व शास्त्रीय ऋत्विजास वाटून मिळे. हा प्रयोग गागाभट्टांनी नव्याने लिहिला असून तो बराच मोठा आहे. होमादी बरीच कार्ये यांत करावी लागतात. हा मुळात प्रायश्चित्त विधी असल्याने तो यावेळी व्हावयास नको होता परंतु शिवाजीच्या राज्याभिषेकसमयी कालाभावी हे विधी मुख्य राज्याभिषेक विधी सुरू करण्यापूर्वी करून टाकले. हा प्रायश्चित्त विधी व राज्याभिषेकाचा महोत्सव विधी यात एका रात्रीचा खंड राखून दोषाचे परिमार्जन केले, ते करण्यास तुला केलेले द्रव्य प्रत्यक्ष दान न करता दानाची क्रिया राज्याभिषेकानंतर ठरली. हा विधी अप्रकाशित असल्याने त्यांतील कांही भाग पुढे उद्धृत करीत आहे.

अथ मात्स्योक्तत्वाच्चतुः - कुंडीपक्षेण * सुवर्ण तुलापुरुषादान प्रयोगः ।। * ततो यजमानः ।। दानदिनात् पूर्वं दिने आचार्य ऋत्विग्भिः सह उपवासक्षौरे कृत्वा देशकालौ संकीर्त्य ब्रह्महत्यादिसर्वपापक्षयपूर्वक सर्व मन्वंतर कालावछिन्न सर्वलोक्याठस्थानन्विास पूर्वकार्क्वणकिंकिणीजाल मालिनाना विमान-भरणाकानेक्षारः पूजासहित श्री विष्णुपुरगमन पूर्वकल्पकोटिशानकाला विछिन्न श्री विष्णुपुराधिकरणक महीयमान विष्णुपुरवासानंतर भूपालमौलिमणी रंजित पादपीठ श्रध्दानित्वायत्नसहस्त्रया नित्वप्रदीप्त्प्रतापजित सर्वमही पलोका जराजत्वसर्गरोग निवृत्ति सिध्दिद्वारा श्रीपरमेश्वर प्रीत्यर्थं इवः सद्यो वा सुवर्णतुला पुरुषामहादानं प्रतिपादयिष्ये करिष्ये इति * हा झाला विधीचा संकल्प. पुढे दानाचा संकल्प वगैरे आला आहे तो -

> यत्कृतं मे स्वकायेन मनसा वचसा तथा ।
> दुःकृतं तत्सुवर्णस्थं यातु मुक्तिं सदा शुभम् ।।

इति पठेत ।। ततोस्तीर्थं पश्चिमे उपविश्य कुशपाणिः द्रव्योपरि तुलस्यादि प्रक्षिप्य प्राणानायम्य कुशतिलयवाजलहस्तौ देशकालौ संकीर्त्यान्तुमहिमैकैक मन्वंतरावछिन्नेत्यादिपूर्वोक्तं फलमुल्लिख्य ब्रह्महत्यादिकल्पापक्षय द्वाराश्रीपरमेश्वर प्रीतिकायोबागुर्वर्ति जानां नामगोत्रै समुच्चार्याग्निदैवत्यं हिरण्यं पितृदैवत्यं रजतं स्वशरीरसमाधिकं वा तोलितं गुर्वन्मृत्तिकाम्ये ऽहं । संप्रद देन ममेति ऋत्विक हस्तोपरिगुरुहस्ते संकल्पयेत् । ततोर्धं गुरवे ऽर्धम् त्विग्भ्योदद्यात् । जापकादिभ्यो ऽधिवासन दक्षिणा मात्रं । यदा तु यथेच्छ विभागपक्षास्तदा ग्रामेन यथाशक्ति रत्नैश्च गुर्वत्विजः वरितोष्य । तुलाद्रव्यं स्तेभ्यस्तदनुज्ञया जापकेभ्यो द्वारपालेभ्यो ऽन्येश्च नानागोत्रेभ्यो दिनांधकृपणेभ्यः यथेच्छ विभज्य दद्यात् । ते च स्वस्तीत्युक्त्वा * देवस्य त्वा * प्रतिगृण्हाण उक्त्वा स्वशालीयां

कामस्तुतिं पठेयुः । ततः कृतस्य तुलापुरुषमहादानस्य प्रतिष्ठार्थम् सन्तुवर्णानग्निदेवतान् गुर्वऋत्विग्भ्योऽहं दक्षिणां संप्रददे इति ।। सहस्त्रं सुवर्णं तोलितसुवर्णरजततृतीयांशं दशं तां गुर्वऋग्भिग्भ्यो दक्षिणां दद्यात् ग्रामरत्नांना वा दक्षिणात्वेन दानं ततो यजमानो यथाशक्ति ब्राह्मणभोजनसंकल्पं कृत्वा पुनः पुण्याहवाचनं (पृ. २३)

हा विधीप्रयोग रचल्याबद्दलचा शेवटचा उल्लेख असा -

" एवं कुंडीपक्षे मंडपाकरणपक्षे च तत्पूजाविना एकमेव प्रयोगः ।। "

" ज्ञेयं मीमांसिक धुरंधरः श्रुतंधरो न्यायेऽपि वागीश्वरः ।
साहित्यामृतसागरः सुजनताकल्लीरसालद्रुमः ।।
यद्विद्वन्मणिशेखरो दिनकराः प्रासूत विश्वेश्वरम् ।
तेनाकारिनवीनपद्धतिरियं तुष्ट्यै तुलायाः सताम् ।।"

(पृ. २४)

यानंतर सुवर्णताम्रादि तुलादनाविधी सांगितले आहेत. त्यांतील आधारविषयक भाग उद्घृत करते -

" तुलापुरुषातो राजन्यातितत्परयं पदं
सर्वदापविशुध्दात्मा मुक्तिं यात्यपुनर्भवाम् ।।
हत्वा तु ब्राह्मणं नृप तोलयेदात्मनस्तनुं ।।
सुवर्णेनात्मतुल्येन ब्रह्महत्यां व्यपोहति ।। (पृ. २४)

सुवर्णः सर्वरोगेषु प्रदद्यान्मृत्युंनोदनं ।। सुवर्णे सर्वदेवताः (पृ.२६) तुलापुरुषदानेन मृत्युं जयति मानवः ।। (पृ. २६) संपूज्य विष्णुप्रतिमां तुलामध्ये बध्नीयात् । ततः पूर्वोक्ताः तोलनीय द्रव्याधिदेवतां...।। " (पृ.२७)

शेवटी ` तुलापुरुषादान ` विधीखालील श्लोकार्ध पुन्हा देऊन पुढील चरणांनी ते शार्दूलविक्रीडित पूर्ण केले आहे

* वेनाकारि धृतो दिवोलनविधौ सत्प्रीतये पद्धतिः ।
इति गागाभट्टकृत दिनकरद्योते ताम्रादितुलादान प्रयोगः ॥* (पृ.१८)

या पुढे पुन्हा संकल्प येतो.

सारांश, ` सुवर्णतुलादानप्रयोग ` हा नवीन रचला आणि त्यापुढील तुलादानाचे प्रयोग ` दिनकरोद्योतां ` तून घेतले, हे गागाभट्टांनी स्पष्ट केले आहे हे दान प्रत्यक्ष देण्याचा कार्यक्रम ऑक्झिंडनने लिहिल्याप्रमाणे राज्याभिषेक समारंभ ठरल्यानंतर झाला. ऑक्झिंडनप्रमाणे त्यावेळी हजर असलेला निश्चलपुरीही हे प्रायश्चित दानविधी प्रथम ठरल्याचे सांगतो -

* प्रायश्चित्तं पूर्वपापशमनायाथकारितं ।
स्त्रीभावाविन्यपदेशे च मुहूर्ते शत्रुनाशकाः ॥ (शाखा २)
ततस्तुलासमारंभे ब्राह्मणांना सुखावहाः ॥ ५१ ॥
शिवराजमहोत्साहे तुलापुरुषासंज्ञके ॥ ५२॥ (शाखा ३)

गागाभट्टांनी या महादानाचे मानकरी फक्त ऋत्विगांनाच केले आहे. त्यांचिवेरीज इतर कोणालाही हे दान देऊन नये असा त्याने आदेश दिला असल्याने जापकादि ब्राह्मण नाखुषा होण्यास एक कारण झाले. वरची दक्षिणा द्यावयाची त्यांतहि जापकादि ब्राह्मणांची गणना द्वारपाळ, अंध वगैरे लोकांत केली आहे. हे जापकादिना साहजिकच मानहानिकारक वाटले. उलट गागाभट्ट शास्त्रीपंडित असल्याने त्यांना ही जापकांची लुडबूड धर्मबाह्य वाटत होती. शो. व्रतबंध व दानविधी ह्यांचा या राज्याभिषेकाशी संबंध नव्हता.

शनिवार १० मे - ज्येष्ठ ६ शनिवारी समंत्रक विवाह केला असे शकावल्या सांगतात. हेन्री ऑक्सिंडनने ' दोन बायकांशी लग्नविधि व्हावयाचा ' असल्याचे १७ मे च्या पत्रांत लिहिले आहे. मुख्य पत्नी किंवा राज्ञी आणि दोन स्त्रिया असे सांगण्याचा कदाचित त्याचा मुख्य उद्देश असावा, कारण नंतर तो ८ जूनला चवथ्या बायकोशी लग्न झाल्याचे लिहितो. निश्चलपुरी सांगतो -

' एवं धृतव्रतो राजा यो षिाभ्दिस्तांभिरेवहि ।
विवाहितो नराणां तु पश्यतां परमोत्सवं ।। ४४ ।। '

(शाखा २)

मराठयांत गोष्टा असतानाही ' राजा ' म्हणून मुद्दाम लोकांसमक्षा समंत्रक विवाह झाले हे सांगण्याचा त्याचा उद्देश दिसतो. निश्चलपुरी दोहोंपेक्षा अधिक पत्न्यांचा उल्लेख करीत आहे. राज्याभिषोक विधी प्रारंभ - प्रथम दिन - लग्नविधि समंत्रक झाल्याने वैदिक पध्दतिप्रमाणें राज्याभिषोकविधि सपत्निक करण्यास शास्त्रानुसार मोकळिक झाली. महाराजांनी आरंभी संकल्प सोडला तो असा - ' मम प्रजापरिपालनाधिकार सिध्दिद्वारा परमेश्वरप्रीत्यर्थं साम्राज्यादिकफलं प्राप्त्यर्थं गणेशपूजनं तदंगत्वेन ब्राह्मणैः पुण्याहवाचनं मातृकावसोद्धारापूजनं नांदीश्राध्दं पुरोहित करणादिकं च करिष्ये ' त्याप्रमाणे प्रथम गणेशपूजन, कलशसंस्थापन व नंतर पुण्याहवाचन, यजमानास अभिषिंचन षोडशमातृकापूजन, नांदीश्राध्द, पुरोहित वरण (मधुपर्क), रक्तसूत्रकंकण व पट्टबंधन इ. विधी झाले. नंतर ऋत्विग्वरणाविना विनायकशांति होमासहित झाली. बलि दिला. शेवटी आचार्याला दान वस्त्रे व इतर ऋत्विजांना यथाशक्ति दक्षिणा दिल्यावर ' विनायकाभिमो क्तपूजा ' झाली.

आचार्यास नमस्कार करून विभूति वाटाटल्यानंतर ` अग्निविसृज्य ` केला. पहिल्या दिवसाचा विधीसमारंभ संपला. संबंध पोथीत छापली असल्याने अधिक तपशीलात जाण्याची आवश्यकता नाही. परंतु या प्रथम भागात महाराजांच्या नांवाचा उल्लेख आला आहे, तो असा ` विष्टर अर्चेत - अविसृष्टो द्वेष्टयां योऽस्मान्द्वेष्टि यं च वयं द्विष्मः । शिववर्मणः चदातुः ।। इति `

रविवार - ३१ मे - द्वितीय दिन - पूर्व रात्री महाराजांनी आवश्यक फलशाकाहार, भूशय्या व ब्रह्मचर्य पाळले. दुसऱ्या दिवशी ऐन्द्रशांतीचे कार्य ठरले होते. त्याप्रमाणें " करिष्यमाणराजाभिषेकांगत्वेन ऐन्द्रशांति करिष्ये । " असा संकल्प सोडून कार्यारंभ केला. ऋत्विग्वरणाविनाच हा ऐन्द्रशांती विधी सुरू झाला. प्रथम कुंडात अग्निप्रतिष्ठा झाली. इंद्राणीचे पूजन, चतुष्कुंभस्थापन व त्यांत बलिदान होऊन ऐन्द्रशांतिविधी पूर्ण झाला. आचार्य व ऋत्विग् यांना यथाशक्ती हिरण्य दक्षिणा दिली. याही पोथीच्या भागात शिवाजी महाराजांचा उल्लेख असा आहे की, " ब्रह्मचारिणं शिववर्मणः कामायित्रं राजा राजाभिषेकं संवर्ध्दय वैश्रवणाय राज्ञे नमः ।। " या शांतिनंतर ` ऐन्द्रीशान्त्यङ्ग.त्वेन ऐशानिभागं करिष्ये ` असा संकल्प सोडून ` ऐशानयाग ` झाल्यावर या दिवसाचा विधीकार्य समारंभ संपला.

सोमवार - १ जून - तृतीय दिन - तिसऱ्या दिवसाच्या कार्याला ` ऐन्द्रीशान्त्यङ्ग.त्वेन ग्रहयज्ञं करिष्ये ` या संकल्पाने आरंभ झाला. ग्रहयज्ञानंतर नक्षत्रहोम केला. धेनुशंखादि दक्षिणा ग्रहयज्ञाबद्दल व घृतादि दक्षिणा नक्षत्रहोमाबद्दल दिल्यानंतर ब्राह्मणभोजन झाले.

मंगळवार - २ जून - चतुर्थ दिन - मंगळवार व नवमी हे दोन्हीही योग राज्याभिषेकाच्या कोणत्याही कार्यास निषिध्द किंवा वर्ज असल्यामुळे तो दिवस तसाच सोडला.

बुधवार - ३ जून - पंचम दिन - पांचव्या दिवसाचे कार्यहि ` ऐन्द्रीशांत्यङ्ग.त्वेन नक्षत्रयज्ञं करिष्ये ` हा संकल्पनी सुरु झाले. ठळपूजनानंतर आचार्याला ` प्रतिमा ` द्यावयाच्या त्या दिल्या.

गुरुवार - ४ जून - षष्ठम दिन - रात्री ` निर्ऋतियाग ` या भागात इतर याग द्रव्यांत पक्व व अपक्व मांस, मत्स्य व सुरा यांचेही बलिदान झाले. कृष्ण वस्त्र धारण करुन हा विधी केला. कृष्णपुष्पगंधांनीच पूजा केली. हे कार्य उरकल्यानंतर स्नान करुन शुभ्रवस्त्र परिधान करुन पुण्याहवाचन झाले. गाई दक्षिणा वगैरे देणे झाल्यावर या दिवसाचा कार्यक्रम संपला.

शुक्रवार - ५ जून - सप्तम दिन - प्रथम ऐन्द्रशांतीचे मुख्य कार्य संपविले. अयुत, सहस्त्र किंवा शत ब्राह्मण भोज झाले व कर्मसंपूर्णता वाचली. हे सर्व विधी सपत्नीकच झाले. नंतर मुख्य राज्याभिषक विधीस प्रारंभ झाला. शुक्रवारी २१ घटिका ३५ पळे द्वादशी होती. त्रयोदशीचा मुहूर्त असल्यामुळे सायंकाळपासून पहाटेपर्यन्त हा धार्मिक विधी चालला. राज्याभिषेक, सिंहासनारोहण व राजदर्शन असे तीन समारंभ त्रयोदशीस झाले. त्रयोदशी शनिवारी ११ घटिका ४५ पळेपर्यन्त होती. ऑक्सिंडेन लिहितो -

June - 5th - Neragy Punditt (Niraji Ravji Pandit) sent me word that on the morrow about 7 or 8 in the morning the Rajah Sevajee intended to ascend his throne, and he would take it kindly if I came to congratulate him therein.....

यावरुन या राजदर्शनाचेवेळी विशेष आमंत्रित पाहुणे नव्हते असे दिसते. हे आमंत्रण इंग्रज वकीलालाही असताना ते खाजगी स्वरूपाचे होते हे लक्षांत घेणे जरुर आहे. वेदघोषाच्या समयी इतरांचा तेथे शिरकाव होणे साहजिकच

तत्कालीन समजाप्रमाणे युक्त नव्हते. डच वखारवालाही वेंगुल्याहून या समारंभाबद्दल माहिती देतो की, On the 15th of June (5th New style) all the titting ceremonial having been accomplished he (Suasy) washed his body with water from the Ganges, which had been brought for the purpose and gave to each Brahman that day 100 Pagodas and to the chief of them 5,000 pagodas and promised to give him 2,000 pagodas a year. On the 16th (i.e. 6th New style) of June he seated himself on the New Throne which had been made ready, and was invosted by the assembly with the name Sivaraj......

उपरिनिर्दिष्ट दोन्ही पत्रांवरून असे दिसते की, ' राजदर्शनसमारंभ ' ६ जून रोजी सकाळी ७ ते ८ चे सुमारास करण्याचे ठरले असावे. त्यापूर्वी पहिले दोन समारंभ ठरले. शकावल्या व बखरी यांतील नोंदी सिंहासनारोहणाचा मुहूर्तकाल निदर्शित करतात. शकावलीतील नोंद सूर्योदयात् तिथिगणनेने दिली आहे. पंचांगात ही पध्दति स्विकारलेली आहे. ज्योतिषादृष्टया मुहूर्त चंद्रसूर्य यांच्या राशीनक्षत्राच्या गतीवरून योजनात व दर्शवितात. शकावलतील नोंद ज्येष्ठ शुध्द १२, शुक्रवार ११ घटी ३४ पळे विष्कंभ ३८ घटिका ४० पळे सि.४२ तीन घटिका रात्री ठरली. (शनिवार सूर्योदयापूर्वी तास सव्वातास म्हणजे नेहमी ज्यावेळेला गर्गाचार्यांचा मुहूर्त म्हणून संबोधितात ती वेळ). तेव्हां शिवाजीराजे सिंहासनी बैसले. छ.१० रबिलावल (शुक्रवारी सायंकाळी सुरू होतो.) सु।।। खमस सबैन अल्फन (आरबी किंवा फसली सन १०८४) यावरून राज्याभिषेकविधि शुक्रवारी सकाळी व सायंकाळी झाला. खास राज्याभिषेकाच्या विधीस शुक्रवारी सूर्यास्ताचे समयी प्रारंभ झाला व तो रात्रभर

वाजला. शनिवारी पहाटे ' सिंहासनारोहण ' विधी झाला. सकाळी ७-८ वाजता ' राजदर्शन ' वगैरे दरबारी समारंभ झाला. वरील स्पष्टीकरणाने इतिहास लेखकांच्या लिहिण्यात द्वादशी आणि त्रयोदशी व शुक्रवार आणि शनिवार यांचा घोटाळा कां झाला आहे हे कळेल. वास्तविक हा कालदर्शनपद्धतीचा फरक आहे. मूळ प्रसंगाच्या कालाचा नाही.

शुक्रवारी सकाळी ' ऐन्द्रशांति ' उरकल्यानंतर सायंकाळी राज्याभिषेक विधीस प्रारंभ झाला. प्रथम गणेशपूजन, स्वस्तिवाचन, मातृकापूजन, वसोर्धारापूजन झाल्यावर नांदीश्राद्ध, नारायणपूजन व आज्यहोम केला. आज्याहुति दिल्यानंतर राज्याभिषेकविधीस प्रारंभ झाला. यजमान सपत्नीक आल्यानंतर मंडपपूजा झाली. महावेदीभोवती प्रत्येक दिशेस चार-चार कुंभ स्थापले. पूर्वेस सुवर्णकुंभ, दक्षिणेस रजतकुंभ, पश्चिमेस ताम्रकुंभ व उत्तरेस मत्कुंभ ठेवून त्यातील एकेकात घृत, दुग्ध, दधि व जल भरले. पूर्वेच्या इतर कुंभात फक्त मधु व इतरांत जल भरले. ते कुंभ पल्लव व पुष्पांनी सुशोभित करून त्यांच्या गळ्यास वस्त्रवेष्टन करून ठेवले. औदुंबरशाखांची आसंदी केली होती, ती स्थापिली. त्याशिवाय अनेक नद्यांच्या व सागरांच्या पाण्याचे कुंभ आणि रत्न, गंध, पुष्प, फल इत्यादी औषधीपूर्ण जलाचे कुंभ जवळ ठेविले. नंतर महावेदीवर अग्नीची व ग्रहांची प्रतिष्ठा केली. मृदांची व कुंभांचीही विधिपूर्ण प्रतिष्ठा केली. त्यानंतर ' सर्वप्रधान ' होम केला. या होमाचे प्रसंगी सर्व वेदीय व शास्त्रीय ब्राह्मणांनी वेदमंत्रांचा घोष केला. जापकांनी जप व द्वारपालांनी द्वारजप (जयघोष) त्याचवेळी केला. या सर्वांच्या जागा प्रथम नेमून दिल्या होत्या व कोणी कोणते मंत्र म्हणावयाचे तेही ठरवून दिले होते. अशा तऱ्हेने पूर्णाहुति दिल्यानंतर यजमान अभिषेकशालेत गेले. सुगंधी तेले व चूर्णे यांनी व उष्णोदकांनी यजमानाचे समंत्र स्नान झाले. नंतर यजमान शुभ्र वस्त्र, गंधमाल्यादि लेवून पीठावर आले. निरनिराळ्या मृदा मंत्रघोषात त्यास लेले

लावली. नंतर पंचामृत स्नान घातले. पुन्हा यजमान शुक्ल वस्त्रांधानुलेपन करून वेदमंत्र मंगलघोषात मंडपात आले. वेदीवर प्रतिष्ठित केलेल्या आसंदीवर दोन गुडघे ठेवून (तळपाय लागू न देता) विधीपूर्वक आरोहण केले. नंतर राजांच्या अभिषेकास सुरुवात झाली. तेथे आचार्य सांवत्सर पुरोहितांनी समंत्र अभिषिंचन केले. नंतर आसंदीखाली उतरून अग्निसमीप येऊन प्रार्थना केली. तेथून अभिषेकशालेतील सुवर्ण सिंहासनावर आरोहण केले. आशय हा कि, आसंदीवर इंद्र म्हणून केलेल्या अभिषेकाने प्रति इंद्र झालेला राजा सिंहासनस्थ केल्यानंतर इतर ब्राह्मण अमात्यादि मंडळींनी त्यास आपला राजा मानून तेथून पुन्हा मंगलघोषात अभिषेकशालेत नेण्याकरिता ते त्याचे समीप आले. तेथून ब्राह्मणामात्यांनी राजांचा हात धरून व " महते क्षात्राय महते अधिपत्याय महते जानराज्यायैष वो भरता राजा सोमोऽस्माकं ब्राह्मणानां राजा । " असे म्हणत पुन्हा समंत्रघोषात निरनिराळ्या उदकांनी अभिषिंचन करण्याकरिता अभिषेकशालेत नेले. तेथे निरनिराळ्या कुंभातील उदकांनी यथाक्रमे अभिषिंचन करताना त्या सर्वांनी पुन्हा शिवाजी महाराजांना त्यांच्या मातापित्यांच्या नांवासह संबोधून " इमं देवा असपत्नं सुवध्वं महते क्षात्राय महते ज्यैष्ठाय महते राजातराजस्योन्द्रियाय - - - विष एष वो मी राजा सोमो अस्माकं ब्राह्मणानां राजा - - - " असा घोष केला. नंतर इतर अनेकविध मंत्रघोषात व वाद्यघोषात अभिषिंचन झाले.

या अभिषिंचनात सर्व वर्णांनी एकत्रित भाग घेतला होता. नंतर पुत्रवती सुवासिनींनी ओवाळीले. पुन्हा स्नान झाले. कास्यपात्रांतील घृतात मुखावलोकन केल्यानंतर ब्राह्मणांस दक्षिणा व अमात्यांस गो-अश्व-भूमि-सुवर्णादि अपरिमित दक्षिणा देऊन वस्त्रालंकार लेवून राजे मंडपात आले. तेथून आचार्यांबरोबर (गागाभट्ट) रथाजवळ गेले. रथविषयक समंत्र विधीनंतर

रथावर सविध ध्वज व छत्र स्थापले. अश्वविषायक मंत्रानंतर बसून तो चालविला. नंतर मंत्रित धनु धारण करणे वगैरे विधी संपल्यानंतर रथ परत आणला. राजे मंडपातील वेदीवर बसून तेथे सुवर्ण सिंहासनावर आरूढ होऊन अक्षक्रीडेनंतर शयनगृहात गेले. गागाभट्टांच्या प्रयोगात राजे आचार्य गागाभट्टांसह रथाजवळ गेले व नंतर तेथे काय केले याचा प्रयोगपोथीवरून बोध होत नाही. कारण पोथीत तंत्र दिलेले नाही. परंतु निश्चलपुरी फक्त म्हणून केवळ प्रयोगातील उद्देशा विषायीच्या अज्ञानाचे द्योतक असे वर्णन करीत असला तरी तो प्रसंग शास्त्र व व्यवहार या दृष्टीने महत्वाचा आहे. देवाब्राह्मणांचा प्रतिनिधी म्हणून रथात गागाभट्ट प्रथम बसले व नंतर त्यांनी राजाबरोबर रथ शिवाजीला पृथ्वी जिंकण्यासाठी दिला, असे निश्चलपुरीने सांगितलेले तंत्र व त्यावेळचे मंत्र यावरून स्पष्ट दिसते. अश्वांनाहि तशाप्रकारचा आदेश मंत्रांत आहे. निश्चलपुरी सांगतो,

* एतस्मिन्नंतरे सिध्दा रथो हेमपरिष्कृत: ।
आह गागा तु राजानं रथमारूह्यतामिति
पुनर्बुध्दिरियं जाता गागाभट्टस्य मानसे ।। ८० ।।
मया पूर्वं समारूह्य देयस्तुभ्यं नराधिप ।
स तथेत्युक्तवान् राजा गागाभट्टं नराधिप: ।। ८१ ।।

राजोवाच -

भवत्प्रसादलब्धेन रथेन पृथिवीमिमां ।
विजेष्यामिति मे बुध्दिस्तस्त्वंदारूह्य माचिरं ।। ८२ ।।
आरूह्य दत्ते गागाख्य ब्राह्मणेन रथोत्तमे
आरूढ: शिवराजोऽपि सर्वेषां तम पश्यतां ।। ८३ ।।

ऐरावत समारुढो महेन्द्रो इव वारणै: ॥ ८५)॥
(शाखा ४)

या प्रसंगाचा निर्दोष बुध्दीने विचार केला तर त्यावरून गागाभट्टांच्या डोळ्यात शिवाजीच्या राज्याबद्दल, सिंहासनाबद्दल, तसेच रथांच्या व अश्वांच्या विधिसंस्कारात कोणत्या उच्च भावना जागृत होत्या, त्याचे कल्पनाचित्र सहज लक्षांत येते.

पहाटे महाराज सभामंडपातील सिंहासनाजवळ आले. त्यावर ` वृषमार्जारद्विपिसिंहव्याघ्रचर्मे ` घालून ते आच्छादित केले होते. मधुपर्कादि मंत्र व मंगलवाद्य घोषात सिंहासनावर आरुढ झाले. दरबारात अथवा सभा-मंडपात अमात्य, पौर, जैगम, पंडित, वाणी आदि लोक उभे होते. त्यांना दर्शन दिले. तेंव्हा सांवत्सरपुरोहितांनी शिवाजीचा मातृपितृवंशपरंपरेत उल्लेख करून त्या सर्व मंडळींना ` तो क्षत्रिय राजा अभिषिक्त केल्याचे ` घोषित केले. तेंव्हा ब्राह्मणपुरोहितामात्य वगैरेनी राजाला प्रणामपूर्वक नजरनजराणे दिले. शिवाजीनीहि त्यांस वस्त्रे, सुवर्ण, भूमि वगैरे महादाने दिली. नंतर सशर धनु देऊन मंडपास प्रदक्षिणा घातली. गुरुस (गागाभट्टांस) नमन केले. सवत्स धेनूंची पूजा केली. अश्वांची व गजांची समंत्र पूजा केली. गजावर बसून नगरास प्रदक्षिणा घालून देवालयांत जाऊन देवाची पूजा केली व स्वगृहात गेले. सुवर्णादिक कलश वगैरे अमात्याचार्यास दान दिले. येथे धार्मिक विधी संपला.

वेंगुर्ल्याचा डच वखारवाला आब्राहाम याने सिंहासनारोहण प्रसंगी अमात्य वगैरे मंडळींनी जो नजरनजराणा केला, त्याची काही माहिती आपल्या पत्रात दिली आहे. तो सांगतो की, " त्यानंतर मोरोपंत मुख्य प्रधान यांनी मुजरा करून ८,००० होन आणून शिवाजी महाराजांच्या शिरावर ओतले.

मुख्य हिशेबनीस निळो पंडित (याच्या मुलांनी असा उल्लेख पाहिजे होता) ७,००० होन आणले. दोघा सरकारकुनांनी प्रत्येकी ५,००० होन आणून त्याप्रमाणेच शिवाजीला सुवर्णस्नान करविले. राहिलेल्या प्रधानांनीहि मुजरे केले आणि ते सिंहासनाच्या उभय बाजूंना रांगा करून उभे राहिले. संभाजी राजा सिंहासनाच्या पायरीवर बसला होता.*

शनिवार - ६ जून - अष्टम दिन - सकाळी ७-८ च्या सुमारास शिवाजी महाराजांनी पहिला दरबार भरवून व सिंहासनावर पुन्हा आरोहण करून सर्वांस दर्शन दिले. ऑक्सिंडनने आपल्या ' हकीकती ' त बांगली माहिती दिली आहे. तो लिहितो -

"About 7 or 8 of the clock went to Court and found the Rajah seated in, a magnificent throne and all the Nobles waiting on him (in) very rich affire, his sonne Sombagy Rajah, Peshava Moro Pandit and a Braminy (Gagabhatt) seated on the ascent under the Throne, the rust as well officers of the army as others standing with great respect. I made my obeysance at distance and Naransinay held up the diamond rings which was to be presented him. He presently took notice of us and enordered our caming nearer, even to the foot, of the Throne, where being vested we were desired to retire, which wee did, but not so soon but that I took notice. On each side of the Throne, there hung (according to the Moores manner) on heads of guilded lances many emblems of Government and dominion, as on the right hand

were two great fishes heads of gould with very large teeth. On the left hand several horses tails, a pair of gould scales on a very rich lance head poized equally, an emblem of justice, and as we returned at the palace gate there were standing two small elephants on each side and two faire horses with gould brid has and rich furniture, which made us admire which way the brought them up the hill, the passage being so difficult and hazardous......"

रविवार - ७ जून - चतुर्दशी. निषिध्द दिवस किंवा तिथि. परंतु दानविधी ठरकून टाकला. तुलादान कौरेची वाटणी राहिली होती, ती केली. आब्राहाम लिहितो -

"On the 17th (7th New style) of June a general gift of largesses was be gun to all the assembled envoys and learned men 3 or 4 rupees to each and 1 or 2 to women and children. This distribution continued for 12 days and every day Suasy feasted the people. It is said that the ceremony and distribution of largesses cost 1,50,000 pagodas....."

आब्राहाम सांगतो, त्याप्रमाणे दानाचे काम १२ दिवस चालणे शक्य आहे. पुढेहि काही दिवस चालले असते परंतु मातुश्री जिजाबाईंच्या मृत्यूने थांबले.

सोमवार - ८ जून - शिवछत्रपतींचा चवथ्या बायकोशी पुन्हा समंत्रक विवाह झाला. हा विवाह काही अपेक्षित व्यक्तिगत अडचणीमुळे लांबणीवर टाकावा लागला असावा. ऑक्सिंडन लिहितो -

"The Rajah was married to a fourth wife without any state or ceremony and do the every day distributes his alms to the Braminy....."

मंगळवार व बुधवार - ९ व १० जून - ऑक्झिंडन लिहितो की, हे दोन्ही दिवस ब्राह्मणांना दाने देण्यातच गेले.

बुधवार - १० जून - ज्येष्ठ वद्य ९, बुधवारी दोन प्रहर रात्री मातुश्री जिजाई आऊ पाचाडात निवर्तल्या. येथपर्यंन्त राज्याभिषेकाच्या धार्मिक विधी आचारांचा सारांश दिला.

या समारंभात इतिहासकालीन लेखकांच्या अदमासाप्रमाणे दोन व वीस हजार लोकांनी भाग घेतला होता. एक सहस्त्रापेक्षा थोडे अधिक ब्राह्मण असावेत. ब्राह्मणभोजनास दांपत्यांची गरज लागते. म्हणून त्यांतील पुष्कळांनी बायकामुलेही बरोबर आणली होती. त्यांच्या राहण्याजेवण्याची व्यवस्था पांचाडात केली होती. ऋत्विज् व विधीच्या सांगतेस लागणारी ब्राह्मण व इतर नोकर मंडळी मात्र रायगडावर होती. तत्कालिन रिवाजाप्रमाणे भोजनाची सिध्दता आचाऱ्यांच्या नसे. गावकरी व संबंधित लोक सहकार्याने आपापल्या कसबाप्रमाणे सर्व कामे वाटून घेऊन करीत. ही चाल अगदी विसाव्या शतकाच्या सुरुवातीपर्यंन्त, गावागांवातील सर्व उत्सव प्रसाद, व्रतबंध व लग्नादि शुभप्रसंगी जी ग्रामभोजने होत असत, त्यांत पाहावयास मिळे. त्यामुळे अशा सार्वजनिक कार्यात कधी बखेडा पडत नसे. दक्षिणाही देण्याचे काम शिवाजी महाराजांनी अगदी शिस्तवार केले असल्याचे दिसते. तुलादानाची वाटणी ठरीव होती. हे गागाभट्टांच्या प्रयोगपोथीवरून सिध्द आहे. इतकेच नव्हे तर मुरार जगदेवांनी केलेल्या तुलादानाची वाटणी कशी केली होती

त्याबाहेरी पुरावा मुरार जगदेवांच्या अग्रहारपत्रात पाहावयास मिळतो. त्याशिवाय नीळो सोनदेव, जिजाबाई वगैरेंनी तुलादाने केल्याचा उल्लेख आहे. त्यावरून शिवाजी महाराजांच्या तुलादानांत लूटालूट झाल्याने शेकडो माणसांची प्राणहानी झाली वगैरे माहिती काही बखरकारांनी दिली आहे ती सर्व त्यांच्या अज्ञानाचे द्योतक आहे किंवा त्यांच्या कथाख्यानी प्रवृत्तीतील अतिशयोक्तीची बाष्कळ कल्पना चित्रे होत. इंग्रज व डच व तत्कालीन लेखकांच्या लिहिण्यात वा सोहाळ्यात कांही विरोध अथवा अपघात झाल्याची वार्ता नाही.

निश्चलपुरीच्यावतीने ` व्यर्थापशुच्या उभे ` या उक्तीप्रमाणें टपून दुश्चिन्ह शोधणाऱ्या गोविंद बखरीलाहि क्षुद्र व किरकोळ बाबीपेक्षा अधिक कमाई करता आली नाही. यावरून राज्याभिषेक समारंभ पूर्णपणे व्यवस्थित व गांभीर्यपूर्ण असा झाला यात शंका नाही.

शिवकाली व लवाजम्याविना हजारो सैनिकांच्या सहज होणाऱ्या तत्कालीन व्यवस्थेचा विचार केला तर तो समाज सामुदायिक आचारविचारात किती सहकारी व सहिष्णु होता याची कल्पना येते. त्याचप्रमाणे उत्तर पेशवेकालीन लेखक शिवराज्याभिषेकाच्या प्रसंगात जे ब्रामण्यांचे व धार्मिक विरोधाचे नाटक जोडतात ते सर्व अवास्तव व पेशवेकालीन परिस्थितीचे प्रतिबिंब आहे, यात शंका नाही. तसेच शिवाजीच्या राज्याभिषेकाला किंवा ऐन्द्र्याभिषेकाला अथवा या महाराजाभिषेकाला ` राज्याभिषेक ` हा प्रतिशब्द बरोबर नसून तो उत्तरकालीन राज्यारोहण पध्दतीला किंवा सांवत्साराभिषेकाला फक्त लागू पडतो. मंचकारोहण हा राज्याभिषेक शब्दाने ज्या प्रसंगाचा उल्लेख केला जातो, त्यास समजावा.

शिवाजी महाराजांच्या या राज्याभिषेकानिमित्त जो खर्च झाला, त्यासाठी त्यांनी ' महालोमहालांच्या वतनदारांवर सिंहासनपट्टी घातली. त्यावेळी आपणास वीर (दापोडेच्या देशमुखावर) होन १००० होनपट्टी घातली. यावरून राहिल्या साहिल्या देशमुखांकडून झालेला दीड लाख होन खर्च वसूल केला, असे दिसते.

यानंतर जो दुसरा तांत्रिक सिंहासनारोहण विधी झाला त्याचे विवेचन थोडक्यांत करीत आहे.

ड) तांत्रिक सिंहासनारोहण विधि :

छ. शिवाजी महाराजांना राज्याभिषेक विधीने ' छत्रपति ' हे पद प्राप्त झाले, तेंव्हा त्यांनी आपल्या अविरोध विक्रमाची स्मृति म्हणून आपला राजशक चालू केला व आपल्या नांवाची नाणी पाडली. छ. शिवाजी महाराजांच्या कार्यात जरी विरोध झाला नसला तरी त्यांनी करून घेतलेल्या विधी संस्कारांतील तपशिलांबाबत थोडा वाद राज्याभिषेक समयीच उत्पन्न झाला होता. सामाजिकदृष्टया या किरकोळ प्रवादाची कोणीही फारशी दखल घेतली नाही. हा प्रवाद उत्पन्न करणाऱ्या पक्षाचा अध्वर्यु ' निश्चलपुरी ' हा होता. हा वाराणसी क्षेत्रातून दक्षिणेदेशी आला होता. प्रथम तो नाशिकात होता. त्याने कित्येक प्रकारे साक्षात्कार दाखविले. त्याने क्वचित शिष्यही केले. ज्यांनी त्याची सेवा केली, त्यावर प्रसन्न होऊन वरदान दिले. त्याचा फार लौकिक मात्र पसरला नव्हता परंतु तो भगवद्भक्त असून, त्याचे ठायी ईश्वरीकृपा विशेष होती.

गागभट्टांनी केलेल्या जापकांच्या अपमानामुळे, विशेषत: तुलादानाच्या वाटणीत या जापकांना भागीदार होऊ न दिल्यामुळे आणि जापक मांत्रिकांना

पौरोहित्यातून वगळल्यामुळे हा जापकवर्ग गागाभट्टांचा पाणउतारा करण्यासाठी उद्युक्त झाला होता. त्यांचा सारा रोख गागाभट्ट व त्याचे साथीदार यांच्यावरच आहे.

गोविंद कवि यांनी निश्चलपुरीची बाजू आपल्या ` शिवराज्याभिषेक कल्पतरू ` या संस्कृत ग्रंथात मांडली आहे. त्याची चर्चा पुढे करणार आहे. परंतु सर्व बारीक सारीक अनिष्ट प्रसंगांचे खापर हा पक्ष गागाभट्टांच्या माथ्यावर फोडतो व ज्या काही इष्ट गोष्टी घडून आल्या, त्याचे सर्व श्रेय शिवाजी महाराजांच्या पुण्याईला देतो. निश्चल हा पुरी पंथीय गोसावी होता. ` शिवराज्याभिषेक कल्पतरू ` कार गोविंद कवि लिहितो.

राईरीपर्वतात्प्राज्ञो निश्चलस्तीर्थमानसः ।
सर्वतंमार्थतत्वज्ञो यजुर्वेदकृताश्रमः ।। १ ।।
पूर्वाश्रमे ऽपि वैराग्य महाभाग्य भुगप्रजः ।
अद्वैतानंदपूर्णार्थाः सदसत्तत्वविन्मुनि ।। २ ।। (शाखा १)

गागाभट्टांनी जापकांना ` तुलादानात ` समभागी केले नाही, हे त्यांच्या ` तुलापुरुषादान प्रयोगा ` वरून सिध्दच आहे. तेंव्हा ते दान घेणाऱ्यांचे विडंबन निश्चलपुरी करू लागला नाही तर नवल कसले ?

शिवराजो विचार्यैव स्वकीये मानसे चिरं ।
द्रव्यदानेन लभ्यानि पुण्यरत्नानि नान्यथा ।। ५७ ।।

या मूळ हेतूचा विपर्यास करून तो सांगतो -

इति विप्रको हेम दत्वा तत्पुण्यसंचयं
जग्राह नृपतिर्विप्रा हर्षमाप्य धनागमात् ।। ५८ ।।

व्ययं न ते स्वपुण्यस्य जानंति द्रव्यलोलुपा: ।
बालानील मणिं त्यक्त्वा काककामा इव द्विज: ।। ५९ ।।

` कोल्ह्याला द्राक्षे आंबट ` या न्यायाने कुलापुण्यादानाचा उपहास केल्यानंतर तो आपल्या रागाचे खरे कारण सांगतो.

अत: महाभिषेकाय आहूता: वेदपाठका: ।
तेषु गागा समाहूय स्वकीयानवृणोज्जपे ।। ६० ।।

मया ये प्रेषिता विप्रास्तेषां कृत्वा तिरस्कृतिं ।
उक्तवान शिवराजाय नमस्कार्यो न ते पुरी ।। ६१ ।।

या अपमानाचा सूड घेण्याकरितां निश्चलपुरीने गागाभट्टास दोष लावण्यास सुरुवात केली. राज्याभिषेकापूर्वी शिवाजी महाराजांवर आलेल्या आपत्तीचे खापर तो गागाभट्टांवरच फोडतो. प्रथम

तस्यागमनत: केश्चित दिवसै: स्वामिवल्लभा ।
काशी त्यक्त्वा निजं स्थं स्वरूपेण व्यवस्थिता ।। ९७ ।।

तत: प्रतापराजश्च विख्यात: शत्रुतापन: ।
यवनेन हतो मग्नो गोष्पदे बुधिपारग: ।। ९८ ।।

२३ फेब्रुवारीला प्रतापराव गुजर लढाईत पडला व महाराजांची पत्नी काशीबाई १६ मार्चला वारली. गागाभट्ट रायरीस या आधी आला, म्हणूनच केवळ त्याला अपशकुनी ठरविला आहे, उलट हंबीररावाने मिळविलेला विजय,

संपगांवच्या पेठेची लूट, शिवाजी महाराजांनी घेतलेले केळना, यांचा संबंध मात्र तो गागाभट्टांच्या पुनरागमनाकडे लावीत नाही. तो शिवाजी महाराजांच्या पुण्याईचाच प्रभाव म्हणून सांगतो.

तत्प्रसंगेन हेम्नोऽपी व्ययं कृत्वाम भार्गवे (विपकूणा)
क्षेत्रे सैनिकतुष्टयर्थं राज्ञीभिन्वधान्म: ।। ३९ ।।

विधीकार्यात गागाभट्टांनी चुका केल्या व आपलाच हट्ट पुरविला, म्हणून अनेक विघ्ने आली, असे निश्चलपुरी सांगतो. प्रथम प्रसंग उपदेश-समयीचा -

क्षोभाविन्युपदेशे च मुहूर्ते शकुनाशका
आकाशतोपतश्चोल्का सर्वलोकभयानका ।।

परंतु

इत्थमुप्रात आरब्धे हनुमन्मंत्र योगत: ।
मया तस्मिन्क्षणे सापि वारिता कृपया शिव: ।।
गायत्रीमुक्त्वान्यागा राज्ञो गुरू मुखेन वै ।
दोषा क्रांति मुहूर्तेऽपि व्यक्तीत: श्रीशिवोप्रहीत ।। ४१ ।।

एकंदरीत निश्चलाच्या हनुमन्मंत्राला उल्काहि भ्याली. तुलापुरूषा दानाचे वेळी निश्चिलाचा अपमान झाला. तेव्हा गागाभट्टांच्या नाकावर काष्ठाचा तडाखा बसला व बाळंभट पुरोहिताच्या टाळूवर लाकडी कमळ पडले. (क्र.६१-४) राज्याभिषेक विधीतील वैगुण्ये दाखविताना तो सांगतो की, गागभट्टाने शिवाजीकडून पर्वतराजास बलिदान देवविले नाही. शिर्काईची

पूजा केली नाही, देशस्वामी भार्गवाचे अर्चन करवून घेतले नाही. " देशस्वामी भार्गवोऽपि नार्चितः क्षात्रियांतकः ।। " परंतु ही निश्चलाने भार्गवाचे अर्चन केल्याचा कोठे स्पष्ट उल्लेख केलेला नाही, असो.

तो पुढे म्हणतो, वेताळ, भूते, हनुमान यांची पूजा नाही. द्वारपाळ, भूतप्रेतपिशाच्यांना बलिही देऊन दिला नाही. इतकेच नव्हे तर मुख्य कार्यही ' कुयोगे कुमुहूर्ते चक्रु क्षो घातवासरे ' केले व त्यामुळे " इत्येतैश्च महादोषो गांगाभट्ट हठाकृतैः । विघ्नाजाता त्हंतेऽपि महाराज शिवाजिरे ।। ७५ ।। परंतु " शिवराजः शिवः साक्षादवतारी न चापर । अन्यथा विघ्नसंघस्य कथं नाशो भविष्यति ।। सिंहासन प्रतिष्ठेतील व्यंग्य दाखविताना निश्चल सांगतो -

आधारकल्पना नास्ति यस्मिन्सिंहासने कृता ।
नोपदिष्टा महाविद्या सिंहासननिवासिनी ।।

उलट ज्याचा संबंध नाही असे कांही प्रकार घडून आले ते शुभ होते असे सांगण्याचा त्याने प्रयत्न केला आहे.

आरोहणक्षणो जाता छिंका वाग्नेयकोणके ।
संभाजीमस्तकश्चैव गतं मुक्ताफलद्वयं ।।
शिवराज समीपस्थः क्षुद्रासिश्च विनिर्गतः ।
छिंकापनर्ळ तु मध्यस्थं क्षुद्रासि शत्रुमर्दनं ।।

रथांत बसल्यानंतर

वेध्यं वेधे दममनाः करस्था मुद्रिकापतत्
दत्ताजीनामको ण्यग्राहून संवर्तिनो भुवि
मुद्रिकापतेन हेतुर्न ज्ञातस्तम ने केनचित् ।।

हा हेतु कोणता तर,

> शिला सिक्तेन बाणेन तावच्छत्रुशिरांस्यह
> संपाद्य पाशयस्त्व भानयिष्यामि सर्वश:
> इतीव कारणान्मुद्रा गत्वा प्राप्ता पुन: करं ॥ ९१ ॥

निश्चलाने रथविधिवाही विपर्यास केला आहे.

सारांश, वरील सर्व क्षुद्र आरोपांचा विचार केला तर निश्चलपुरी किंवा हे लिहिणारा गोविंद नारायण बर्वे हे पूर्णपणे आचाराने अनार्य दिसतात. गागाभट्टांनी व अनंतभट्टांनी राज्याभिषेकाच्या मुहूर्ताबद्दल निरनिराळे आधार देऊन विधिही पुरातन ग्रंथांच्या आधारे पूर्ण वैदिक लिहिला आहे. आधारवचनेही दिली आहेत. गागाभट्ट व त्याचे कुळ या प्रयोगरचनेच्या कामात व शास्त्रार्थात अखिल हिंदुस्थानात विद्वन्मान्य होते. उलट बर्वे व निश्चलपुरी या बाबतीत पूर्ण अनभिज्ञ दिसतात. हे 'विष्णुसुप्तीती' त्यांनी केलेल्या या तथाकथित राज्याभिषेकावरून व त्यांच्या रथावरोहण विधिबद्दल 'पुनर्बुध्दिदरियं जाता गागाभट्टस्य मानसं' वगैरे लिहिल्यावरून स्पष्ट होते. राज्याभिषेक समारंभ आटोपताच निश्चलपुरींनी निरोप घेण्याच्या उद्देशाने राजांची घेट घेतली. त्यावेळी बर्वे लिहितो की, राजाला निश्चलाने स्पष्ट सांगितले की, त्या दिवसांपासून तेराव्या, बाविसाव्या, पंचावन्नाव्या व पासष्टाव्या दिवशी आणखी भयसूचक उत्पात होतील. कारण -

> " सिंहासनोपवेशाय महाविद्याविना न हि
> अधिकारस्त्वतश्चिंता जायते मम मानसे "

तेंव्हा राजा म्हणाला -

" गुरो त्वं मे विधिना तांत्रिकेण
अभिषेकं कुरु क्षिप्र यदि चेत्वकृपामयि ।
वैदिकं कर्म संवाद्य कर्तव्यमय तांत्रिकं
संपादितं वैदिकं तु तांत्रिके वर्तते स्पृहा ॥ "

नंतर हा मांत्रिक तांत्रिक विधी ललितापंचमीला करण्याचे ठरवून निश्चलपुरी तीर्थाटणात गेला. ज्या उत्पातांबद्दल गोविंदाने लिहिले ते अर्थात निश्चलपुरी डोळ्यांतही नसावेत. तसे त्याला वाटले असते तर त्याने पुन्हा हनुमन्मंत्रासारखे आणखी काही उग्र जप करून आपले शक्तिसामर्थ्य दाखविण्याचा मौका जाऊ दिला नसता. परंतु हे विवरण प्रत्यक्ष उत्पात झाल्याचे जगजाहीर झाल्यानंतर लेखनाच्यावेळी स्मरणांतून भविष्य म्हणून उपयोग करून आपली कथा रंगविली आहे इतकेच.

तेरावे दिवशी जिजाई आपल्या पुत्राचा हा अद्वितीय सोहळा पाहून परलोकवासी झाली. बाविसाव्या दिवशी प्रतापगडावरील पागा विजेच्या उत्पाताने जळली. इतर दिवशी अश्व व गज मेले. असेच बारीक सारीक अपघात घडले. परंतु या लेखकाने निश्चलपुरीचा शक्तिसंजीवनी जलाचा अभिषेक संपताच दुसरे दिवशी प्रतापगडच्या देवीच्या मंदिरावर वीज पडून ते दुभंगले, त्याचा मात्र थांग लागू दिला नाही. विष्णुसुप्तीत व भर पावसात, पुरातन-शास्त्रांच्या विरुद्ध केलेला हा विधि या उत्पाताचे कारण मानणे हि युक्त झाले असते परंतु केवळ गागाभट्टांनी केलेले वाईट ठरविण्याकरितां शिवाजी महाराजांच्या देवी उपासनेचा फायदा घेऊन त्यास आपल्या महंतीसाठी तांत्रिक विधीस प्रवृत्त केले. शिवाजी महाराजांस अश्वमेघाप्रमाणे येईल त्या शत्रूस जिंकून निरंकुश सत्ता मान्य करावयास लावण्याची आकांक्षा असल्याने त्यांनी निश्चलाचे म्हणणे मान्य केले.

थोडा विचार केला तर केवळ गोविंदाच्या लिहिण्यावरून हे सर्व विचार निश्चलपुरीचेच होते किंवा ते सर्व याच शब्दांत सांगण्यास निश्चलपुरी धजला असे मानणे जरा धोक्याचे आहे. मांत्रिक विधीबरोबर तांत्रिक विधीही करण्यासाठी गागांचे दोष न दाखविता महाराजांचे मन वळविणे शक्य होते. आणि निश्चलपुरीने तसेच केले असले पाहिजे. शिवाजी महाराजांनी ज्या उद्देशाने एवढा समारंभ केला तो फोल होता हे जाहीर करून त्याचे मागील लोकांच्या भावनांना धक्का लागेल असे कोणतेही कृत्य करण्याचे त्यांनी मनातसुद्धा आणले नसते, तसे केले असते तर राज्याभिषेकाचे स्वारस्यच नाहीसे झाले असते. तसेच केवळ काकतालीय न्यायाने घडलेल्या क्षुद्र गोष्टींवरून महाराज गागाभट्टांसारख्या पंडितांची विडंबना ऐकून घेतील काय ? याची शंका आहे. त्यांचा कथाथाट नेहमीच्या भरमसाट आख्यानाचाच भासला आहे. शिवाय जो विधी प्रत्यक्ष केला असे म्हटले आहे तो फक्त सिंहासनात व राजांच्या ठायी शक्ति संचार करण्यापुरताच आहे. गागाभट्टांच्या विधित सिंहासनाचे शक्तीची प्रतिष्ठा केली नव्हती. त्यांचा मुख्य भर राज्य देवांचे व राजा विष्णूचा अंश इतकीच श्रेष्ठ दर्जाची प्रतिष्ठा करण्याकडे होता. ज्या गागाभट्टांनुयायांनी ग्रामदेवता, गृहदेवता, मंडपदेवता, स्थानदेवता, स्तंभदेवता यांच्या पूजनाचा अशास्त्र प्रकार जाणून बुजून गाळला, त्यांना या आसनमहात्म्यांपेक्षा राजशक्तीचा देवांशच अधिक मान्य असल्यास नवल नाही.

सारांश, शिवाजी महाराजांनी फक्त या मांत्रिक अभिषेका शिवाय जापकांना छत्रतीत राजशक्ती व सिंहासनात देवीशक्ती प्रतिष्ठित करण्याची मोकळीक दिली असती तर दुधांत साखर पडेल, एवढयापुरतीच निश्चलाची विनंती असली पाहिजे. राजराजेश्वरी मंत्र घेण्यात त्यांनी प्रथम तयारी दाखविली नाही. परंतु तो विधीचाच भाग झाल्याने त्या मंत्राचाहि स्वीकार केला इतकेच.

शकावलीत नोंद आहे की, " आश्विन शुध्द ५ (डिसेंबर २४, सप्टेंबर, १६७४) पुन्हा सिंहासनारोहण, दुसरी नोंद - आश्विन शुध्द ६, प्रतापगडी देवालयावर वीज पडली. " ' शिवराज्याभिषेक कल्पतरु ' त दुसऱ्या अभिषेकाचा काळ पुढील श्लोकात दिलेला आहे.

शाके शालिवाहस्य वर्षे आनंदसंज्ञके ।
मासस्याश्विने सिते पक्षे पंचम्यांबुधवासरे ।। २३४ ।।

अनुराधाख्य नक्षत्रं आयुष्मान्योगके शुभे
कुंभलग्ने मह राजो ह्याभिषेक महोत्सवे ।। २३५ ।।

हा दुसरा प्रयोग कसा केला याची माहिती गोविंदाने दिली नाही. मंत्राची योजना वगैरे त्याला काही माहित नसावी. परंतु त्याने जी काही माहिती दिली आहे, त्यावरून असे दिसते की, निश्चलाने सुरुवातीस कुलदेवता ग्रामदेवता, स्थानदेवता आदींचे पूजादि विधी केले, परंतु हे ऋत्विर्जांनीच ठरवले. यांत यज्ञभागहोम केलेले दिसत नाहीत. सर्व कार्यक्रम एका दिवसाचाच आहे. निश्चलाने कलश स्थापना वगैरे करून पूजाविधी तंत्रानुसारे ठरवला. मेघयंत्र नाना वर्णांनी चित्रित केले. मंडप व स्तंभ अलंकृत केले. मंडपांत तसेच सिंहासनाजवळ भूमिसंबोधन केले. पुन्हा शुभ सिंहासन (सुवर्ण सिंहासनांतील औदुंबर शाखांची आसन्दी) करून तीत मंत्राने सिंहगात्रांची प्राणप्रतिष्ठा केली. राजा प्रथम राजसभेत खड्.ग घेऊन गेला, नंतर त्यांनी द्वारपालदेवतांस बलिदान दिले, नंतर अष्ट सिंहास बलि दिला. हे अष्ट सिंह म्हणजे अष्टराज्या अधोभागी पूर्वी स्थापित केलेले सिंह, सिंहावरील आसन म्हणजे सिंहासन या कल्पनेने अष्ट सिंहाची योजना आसंदीत केली. ती अशी - अष्ट सिंहाची नांवे - पूर्वेस सिंह, आग्नेयेस हर्यक्ष, दक्षिणेस नाग, नैऋत्येस केसरी, पश्चिमेस मृगेंद्र व वायव्येस शार्दुल, उत्तरेस गजेंद्र आणि ईशान्येस हरि. निश्चल सांगतो -

* अष्टानां पृष्ठभागे तदासनं परिकल्पितं ।
सिंहासनमिति प्रोक्तं तदेव भुवि दुर्लभं ।। १५५ ।।

नंतर येथील देवतांस बलि दिले. बलि दिले नव्हते म्हणून उत्पात झाले. त्यामुळे सिंहासनासमेत भीति वाटत होती. ती बलि देऊन नाहीशी केली, असें निश्चल सांगतो. (शाखा ६, श्लोक १५९-१६५). निश्चलपुरीने सिध्द केलेल्या सिंहासनास राजाने नमन केले. शिवशक्तींच्या अशा कुंभातील जलांनी राजाला राजमंडपात अभिषिंचन केले. ती करीत असतां निश्चलपुरीने राजास ' शक्तिसंजीवनी ' राजराजेश्वरी विद्या दिली. हे अभिषेकाचे वर्णन गोविंदाच्या शब्दांत असे -

अथ वेद्यां रत्नमय्यां रौप्यमयं महासनम् ।
स्थापयित्वाभिषेकाय मया राजोपदेशितः ।।

तत्राष्टौ कलशा दिक्षु स्थापितारत्नपूजीताः ।
यैस्वहस्तगतैः सर्वं जगत्सिंचनि चंद्रमा ।।

अत एवामृतमयः क्षिप्ता सत्कलशेषु ते ।
पल्लवैः पंचभिर्युक्ताः रक्तकौशेयसंयुताः ।।

वितानैर्हैत्रचित्राढ्यैः शोभिते राजमंडपे ।
मणदीपादिसंयुक्ते पुष्पजाति विराजते ।।

वाग्देवतास्वरूपाभिः स शिवाभिस्तु शक्तिभिः ।
धृता हस्तेषु कलशा शिवराजाभिषेचने ।।

पृथुराजं यथा सर्वा महानद्यश्च सागराः ।
स्वरूपेणाभिषेकार्थं मागतास्तद्वदत्रहि ।।

अभिषिक्त: शक्तिभिस्तु वाशिन्यादिभिरादित: ।
ततो मव्यास्थितेनाथ कलशेन शिवांभसा ।।

राजराजेश्वरीविद्या यस्य तोये प्रतिष्ठिता ।
पीतांबरा महाविद्या ब्रह्मास्त्रं मत्प्रकीर्तितं ।
सापि तस्मिन् घटे विप्र मयैव सुप्रतिष्ठिता ।।

दशविद्यायैस्तायै शिवराजक्षितीश्वरं ।
अभ्यषिंचमहं तत्र शिवछत्रपतिं नृपं ।।

देवतासंनिधौ तस्य सुंदरी जगदंबिका ।
सन्निधौ पूर्वमासीद्या सेदानीं प्रकटाभवत् ।।

यतो गृहीतुमारब्धे राजराजेश्वरीमनुं ।
शाहसूनो: शिवस्यैवमाभिषेक महोत्सव: ।।

हा शिवशीक्तिमयी जलाने केलेला अभिषिंचन विधी बहुधा पौराणिक असावा. हा वाद्यमंत्रघोषांत झाला. नंतर राजांनी सूक्ष्म वस्त्र लेवून पर्वतप्राय अन्न तयार ठेवले होते ते बलिमंत्राने दान दिले. त्यायोगे रायरी पर्वत संतुष्ट झाला. नंतर सुवासिनींनी राजाला ओवाळीले. राजा अंतर्गृहातून जाऊन परत राजसभेत आला व मंत्र जयघोषात सिंहासनावर आरोहण करिता झाला. प्रजाजनास दर्शन दिले. सारांश जापक तंत्राने सिंहासनात व राजात शक्ति-सामर्थ्य प्रतिष्ठित करण्यापुरताच हा विधी होता. या प्रसंगाचे वर्णन गोविंदाने इ.स. १७०० नंतर काही काळाने केले आहे. गोविंदाने जो गागाभट्टांच्या कृतीचा बाऊ केला आहे. त्या दृष्टीने पाहिले तर निश्चलाचा विधी म्हणजे थातुर-मातुर करणाऱ्या मांत्रिकापेक्षा अधिक किंमतीचा दिसत नाही. एकंदरीत वैदिक

व मांत्रिक विधीने शिवराजांस राज्याभिषेक झाल्याने निरंकुश सत्ता प्राप्त झाली. पूर्वीच्या राज्याभिषेक विधीचे निष्फलत्व भासेल असे वाचेने अगर कृतीने कांहीही केलेले दिसत नाही. त्याच्यादृष्टीने शक्तीची पूर्तता बाकी राहिली होती. ती कुलस्वामिनीच्या नवरात्र महोत्सवात निश्चलास करू दिली इतकेच. मात्र या पूर्ति-कार्याने शिवराज्याभिषेकाची पूर्तता झाली, असे सर्व पंडांना वाटले. अविरोध राज्यसिंहासन आणि राजा यांना मान्यता मिळाली.

सांस्कृतिक उत्क्रांतीच्यादृष्टीने सतराव्या शतकांतील महाराष्ट्र ही एक इतिहासातील अद्वितीय घटना आहे. सुवर्णाला जसजसे तावून सुलाखून घेण्याचे प्रयत्न केले म्हणजे अधिकाधिक कसास उतरत जाते. तसाच महाराष्ट्राच्या संस्कृतीचा हा सतराव्या शतकांतील इतिहास चिकित्सेच्या मुशीत घालून काढू लागलो की तो अधिकाधिक तेजःपूर्ण व सकस ठरतो. स्वरूपशोभेसाठी सुवर्णाची भूषणे करिताना सुवर्णाला निकस करण्याचा जसा प्रामाणिक प्रयत्न होतो, तसेच आत्ममहतीसाठी मातृपितृसंस्कृतीचे लेणे वढविताना अज्ञानाने या संस्कृतिला निकस बनविली जाते. महाराष्ट्राने या १७ व्या शतकातील सांस्कृतिक उन्नतीचा साज चढविण्यासाठी गेली दोन तीन शतके असाच प्रकार केला आहे. त्यामुळे या उत्क्रांत संस्कृतीचे तेज व कस गढूळ केला गेल्याने आताच्या चिकित्सा युगातील प्रामाणिक निरीक्षकालाही त्या संस्कृतीची परीक्षा करणे दुरापास्त होऊन बसले आहे.

१७ व्या शतकांतील संतांच्या कामगिरीने समाजाची नैतिक व पारमार्थिक समाधानाच्या संस्कृतीचे सकस बीजारोपण केले. अखिल भारतात दोन चार शतके स्वार्थ आणि सत्ता हीच राजकीय, सामाजिक व धार्मिक व्यवहारांतील मुख्य सूत्रे झाल्याने कुटुंब, जाती, राज्य व धर्म या चारी संस्थांना तडे गेले होते. राजपुत्राने राज्यभोग घेणे, अमात्याने राजाचा खून करून सत्ता

चालविणे, सासऱ्याने जावयाचा खून करण्यास प्रवृत्त होणे, बंधुबंधुनी एकमेकांशी सेवकवृत्तीसाठी झगडणे आप्तेष्टांच्या धर्मसंस्थेचा विध्वंस करण्यास त्याच हीन वृत्तीने उद्युक्त होणे वगैरे तत्कालीन रूढ प्रवृत्तींनी कुटुंब व समाज हा पूर्णपणे विस्कळित व असंघटित झाला होता. त्यावेळी धार्मिक, सामाजिक, राजकीय व्यवहारात नैतिक व संघटनात्मक उत्क्रांत संस्कृतीची बीजे रोपित आणि अंकुरित करण्याचे कार्य शिवाजी महाराज व त्यांचे प्रासंगिक कदाचित क्रांतिवादी साहाय्यक यांनी केले. संत आणि हे राजव्यवहारतज्ञ कर्मधर्मसंयोगाने या शतकात एकाचवेळी एकमेकांना पूरक कार्य करीत राहिले आणि त्यामुळेच हा योग महाराष्ट्राच्या सर्वांगीण संस्कृतीला थोडयाच अवधीत उत्क्रांतावस्थेस नेण्यास समर्थ व कारणीभूत झाला. शिवाजी महाराजांच्या या संघटनात्मक कार्यामुळे महाराष्ट्रांत राजकीय, सामाजिक व पारमार्थिक संस्कृतीची मूल्ये खोलवर रूजली गेली, त्याच महाराष्ट्राच्या हत्पटलावर राजसंस्थेच्या उत्क्रांत संस्कृतीचे प्रतिबिंब चिरंजीव करण्याचे कार्य या शिवराज्याभिषेक विधीत आहे. कारण त्या घटनेने राज्यव्यवहारात अखिल समाजाला समानतेच्या पातळीवर आणले. धार्मिक आणि व्यवहारिक पारतंत्र्याला आळा घालण्याचे एक तंत्र निर्माण केले.

काशीस्थ गागाभट्ट व पैठणचे अनंतदेव भट्ट यांचा निःस्वार्थी मानवतेचा जिव्हाळा शिवाजी महाराजांच्या सांस्कृतिक कार्यात सहज साहाय्यक झाला आणि शिवराज्याभिषेकाने १७ व्या शतकांत राजकीय, सामाजिक धार्मिक आणि व्यावहारिक संघटनेचे एक उत्तम व प्रभावी साधन महाराष्ट्राच्या हाती आले. विधीच्या चिकित्सेपेक्षां या विधीमागील भावनांचा विचार केल्यास महाराष्ट्राच्या इतिहासांतील सांस्कृतिक उत्क्रांतीची ही एक महत्वाची घटना होती.

ई) श्रीशिवराज्याभिषेक कल्पतरू :

" श्रीशिवराज्याभिषेक कल्पतरू " या ग्रंथाच्या हस्तलिखित पोथीची प्रत कलकत्ता येथील बंगाल एशियाटिक सोसायटीच्या संग्रहालयांत (क्रमांक जी १०१८५) आहे व तिच्यावरून संपादक द. वि. आपटे व का. ना. दीक्षित यांनी मजकूर नकलून घेऊन भारत इतिहास संशोधन मंडळ त्रैमासिक वर्ष १०, चैत्र ते ज्येष्ठ श. १८५१, मार्च, जून १९२९ मध्यें प्रकाशित केलेला आहे. त्यावरून सदर पोथीची १३ पाने असून १२ वे पान एकाच बाजूने लिहिले आहे आणि १, ८, ९ व ११ ही चार पाने दोन दोन कागद चिकटवून बनविलेली आहेत. या ' कल्पतरू ' ग्रंथाच्या ' शाखा ' असून शाखासमाप्तिदर्शक संकल्प, गोविंद उवाच, निश्चल उवाच वगैरे वाक्य, अष्ट दिग्गजांची नांवे, ही तांबड्या शाईने लिहिलेली आहेत. श्लोकांचा अनुक्रम दाखविणारे आकडे किंवा पूर्वश्लोकार्ध निदर्शक एकेरी चरणरेघ या लिखाणात कोठेही नाही. अक्षराच्या वळणावरून पाहतां पहिली सात पाने एका लेखकाची व बाकीची पाने दुसऱ्या लेखकाची आणि ४, ४।।, ५, ५।।, ६।।, ७, ८, ९, ९।।, १०, १०।। व १३ या पृष्ठांवर समासात अधिक लिहिलेले श्लोक तिसऱ्या लेखकाच्या हातचे दिसतात आणि हे तीन्ही लेखक शिवकालीन आहेत. समासात अशारितीने अधिक असलेले श्लोक संपादकांनी चौकटी कंसात व तांबड्या शाईचा मजकूर अवतरण चिन्हांत दाखविला आहे.

ग्रंथाच्या नांवावरून यातील विषय गागाभट्टकृत शिवराज्याभिषेक वर्णनात्मक असेल असे वरवर पाहणाऱ्यास वाटण्याजोगे आहे पण ग्रंथातील सबंध मजकूर वाचून पाहता हा समज चुकीचा आहे, हे लक्षांत येते. या ग्रंथाचा वर्ण्य विषय म्हटला म्हणजे गागाभट्टकृत शिवराज्याभिषेक विधीतील कांही दोष दाखवून निश्चलपुरीने तांत्रिक पध्दतीने ललिता पंचमीस (आश्विन शु.५)

केलेल्या दुसऱ्या राज्याभिषेकाची माहिती देणे हा आहे. निश्चलपुरीचा उल्लेख बखरीत असून ' तारीख इ शिवाजी ' मध्ये याचे नाव अचलपुरी असे दिलेले आहे. प्रतापरावाचा मृत्यु, काशीबाई नांवाच्या राजपत्नीचा मृत्यु, सप्तकोटेश्वराच्या देवालयाचा जीर्णोद्धार वगैरे बारकाव्याची माहिती यात आहे. आणि राज्याभिषेकाच्यावेळी मंत्रोक्त विवाह झाले ते पूर्वीच्याच बायकांशी झाले इ. या ग्रंथातील माहितीवरून, महाराजांनी उतार वयात अनेक नवी लग्ने केली असल्याबद्दल अनेक ग्रंथकारांनी चालविलेले कुतर्क नाहीसे होण्याजोगे आहेत. ललितापंचमी ही सायंकाळी असते हे लक्षांत ठेवले असतां या ग्रंथात दिलेल्या दुसऱ्या राज्याभिषेकाच्या तिथीचा वाराशी मेळ बसतो. त्याअर्थी हा कालोल्लेख गणितदृष्टया बिनचूक आहे. ग्रंथाची संस्कृत भाषा सुबोध असल्यामुळे श्लोक सहज समजतात.

ऐतिहासिक संकीर्ण निबंध खंड ६ वा, शक १८७७ भा.इ.सं.मं. क्र. ८८ मध्ये श्री. य.ग. फडके, मनोहर यांनी श्रीशिवराज्याभिषेक कल्पतरू संबंधी एक लेख प्रसिध्द केलेला आहे. त्यामध्ये आलेली त्यांची मते या ठिकाणी उद्घृत करीत आहे.

भाषाशैलीच्या व काव्यदृष्टया उच्चप्रतीचा ग्रंथ नाही. केवळ वृत्तान्तकथनात्मक आहे. एकंदर श्लोक १२६। आहे. महत्वाचे शब्द व शाखासमाप्तीदर्शक संकल्प तांबडया शाईने लिहिले आहेत. हस्ताक्षर शिवकालीन आहे. गागाभट्टकृत राज्याभिषेकातील दोष दाखवून ललिता-पंचमीस निश्चलपुरीने केलेल्या तांत्रिक विधीने केलेल्या दुसऱ्या राज्याभिषेकाचे वर्णन करणारा हा ग्रंथ आहे.

या कल्पतरूच्या आठ शाखा आहेत. त्यामध्ये निश्चलपुरी रायगडास गेला. गोविंदाची व त्याची भेट झाली. तेंव्हा त्याने गोविंदाला माहिती

सांगितली की, गागाभट्टाच्या आगमनापासून सुरु झालेल्या अनिष्टाचे निवारण हनुन्मंत्राच्या योगे केले. शिवाजीला झालेले अपशकून कथन करुन गागाभट्टाच्या वशिष्ठांच्या ब्राह्मणांचा अव्हे केला. त्यामुळे गागाभट्टाच्या नाकास लाकूड व बाळंभट्टाच्या मस्तकावर लाकडी कमळ पडले. अशारितीने उपस्थित झालेली विघ्ने व अनिष्ट गोष्टी कुमुहूर्तावर अभिषेक केल्यामुळे व स्थानिक देवांचे पूजन व बलिदान न केल्यामुळे झाले. असे निश्चलपुरीने सांगितल्यामुळे तांत्रिक विधीने राज्याभिषेक करुन घेण्याचे शिवाजीने मान्य केले. नंतर ललितापंचमीस अभिषेक महोत्सव झाला.

समारंभावर लिहिलेले ४२ श्लोक असून ते मुळचे आहेत व १९२॥ श्लोकांची मागाहून भर घातलेली आहे. म्हणजे मुळच्या $\frac{१}{५}$ पेक्षा अधिक भर म्हणजे मुळाचाच विस्तार आहे. कांही ठिकाणी व्यर्थ खोडलेले आहे.

१) शिवाजीची स्त्री काशी १८-३-१६७४ रोजी वारली.
२) ३०-५-१६७४ शिवाजीचा विवाह पूर्वीच्याच स्त्रियांशी झाला.
३) गागाभट्टाने केलेला राज्याभिषेक वेदोक्त किंवा पुराणोक्त वैदिक विधीनेच झाला. ४) गागाभट्टास नाशिकहून शिवाजीने स्वागताने बोलावून आणले.
५) शिवाजीचा शत्रु-तुकारामाचा उल्लेख येथे केलेला आहे. इतरत्र तो इतिहासांत कोठेही नाही. ६) सप्तकोटीश्वर देवाल्याचा शिवाजीने जीर्णोध्दार केला इ. नवीन ऐतिहासिक माहिती या ग्रंथावरुन कळते.

लोकानुरंजन व गतानुगतिक सामान्य जनांच्या मनांतील विकल्प दूर व्हावा या इच्छेने दुसरा राज्याभिषेक झालेला आहे.


या ग्रंथाचा कर्ता " कर्वोपनामक नारायणभट्ट सुरिसूनु गोविंदमुखपद्मवासिन्यनिरुध्द सरस्वती कृतौ " नारयाणसुत गोविंद कर्वे हा लेखक त्यामुळे शाक्तग्रंथाचा प्रसार झाला नाही. कारण गोविंद हा रामोपासक भागवतधर्मी

आहे. शाक्तपंथी नव्हे. निश्चलपुरीदेखील योगीन्द्र व तंत्रविद्या पारंगत असला तरी तो शाक्तपंथी नव्हता. तांत्रिक विधि म्हणजे पुराणोक्त विधी असा अर्थ असू शकेल. राजारामाच्या मृत्यूपूर्वी ग्रंथाची रचना झालेली आहे. समकालीन ग्रंथातून शिवाजीला विष्णूचा अवतार मानले आहे व उत्तरकालीन ग्रंथातून शिवाचा अवतार मानले आहे. प्रस्तुत ग्रंथात शिवाचा अवतार हा उल्लेख कालदृष्टया प्रथमचाच दिसतो. तथापि भाषा शुध्द आहे सरळ, सोपी, वर्णनात्मक भाषा आहे. काव्यदृष्टया हा ग्रंथ सामान्य प्रतीचा आहे.

राज्याभिषेक राजकीयदृष्टया व सांस्कृतिकदृष्टया अत्यंत महत्वाचा असल्याने त्यावर प्रकाश टाकणारे १७ व्या शतकातील हे दोन समकालीन संस्कृत ग्रंथ श्रीशिवराजाभिषेकप्रयोग: व श्रीशिवराज्याभिषेक कल्पतरु यांचा थोडक्यात आढावा या ठिकाणी घेतला आहे हे महत्वाचे प्रकरण असल्यामुळे स्वतंत्र प्रकरण पाडलेले आहे.

प्रकरण आठवे

श्री शिवछत्रपतींची राजमुद्रा


श्री
प्रतिपच्चं
द्रलेखेववर्धिष्णुर्वि
श्ववंदिताशाहसू
नोःशिवस्यैषामुद्रा
भद्रायराजते

प्रकरण आठवे

श्री शिवछत्रपतींची राजमुद्रा

श्री शिवछत्रपतींची राजमुद्रा संस्कृतमध्ये आहे व तिचा मतीतार्थ फार सुंदर आहे. म्हणून हे लहानसे प्रकरण पण अतिशय महत्वाचे असल्याने स्वतंत्र करीत आहे.

ही राजमुद्रा पुढीलप्रमाणे आहे, त्यामध्ये अनुष्टुभ श्लोक गुंफलेला आहे -

प्रतिपच्चंद्रलेखेव
वर्धिष्णुर्विश्ववंदिता
शाहसूनोः शिवस्यैषा
मुद्रा भद्राय राजते ।।

" पौर्णिमेच्या चंद्राप्रमाणे वाढणारी, विश्वाला वंदनीय अशी शहाजीचा पुत्र शिवाजी याची ही मुद्रा लोककल्याणार्थ शोभून दिसत आहे. " अशा उदात्त अर्थाने युक्त असलेली ही मुद्रा संस्कृतमध्ये आहे ही गोष्ट विशेष महत्वाची आहे.

अशी ही सुंदर मुद्रा श्री शिवछत्रपती केव्हापासून वापरू लागले याचे उत्तर शोधतांना असे आढळते की, श्री. राजवाडे यांनी मराठ्यांच्या इतिहासाची साधने खंड १५ वा प्रसिध्द केला आहे. त्यातले ४३७ (चाकण प्रांत) वर ही मुद्रा असून त्या लेखाचे साल अर्बैन अल्मन म्हणजे सुहूर सन १०४० दिले आहे. सु.१०४० जमादिलाखर ६ म्हणजे शके १५६१ प्रमाथी संवत्सर, आश्विन शुध्द ८, मंगळवार

येतो. (खरे जंत्री) चाकणाकर द्रोह यास चाकण व इंदोर येथे ज्या इनामबाबी पूर्वीपासून चालत आल्या, त्यापुढे चालविण्याविषयी त्या पत्रांत शिवाजी राजाने हुकूम दिला आहे. त्यावरून चाकण परगणा यावेळी शिवाजीकडे आला हे निःसंशय ठरते. शिवाजीराजे यांची पवित्र मुद्रा शिरावर धारण करणारा सर्वांत जुना अस्सल लेख आज हा एकटाच आहे. या लेखाचा विचार करीत असताना असे दिसते की, शिवाजी महाराजांच्या बेद्याला प्रारंभ शके १५६२ त झाला अशी एक वृद्धपरंपरा आहे. (श्री संप्रदायाची कागदपत्रे ले. ३६८)

सभासदाच्या मताप्रमाणे शिवाजी महाराज १२ वर्षांचे असताना त्यास शहाजी महाराजांनी पेशवे, सुरनीस वगैरे चार-पांच अधिकारी बरोबर देऊन पुणे प्रांती ठेविले. पण सभासदाने साल दिलेले नाही, तथापि या मोघम उल्लेखावरूनही शिवाजी महाराजांची हालचाल पुणे प्रांताकडे त्याच्या अगदी बालपणीच सुरू झाली होती असे दिसते. सामान्य लोकांच्या समजुतीत तोरणा घेऊन शिवाजीने आपला कार्यारंभ केला असे आहे. परंतु अलिकडे उपलब्ध झालेल्या विश्वसनीय ऐतिहासिक साहित्याधारे शके १५६१-६२ मध्येच शिवाजी महाराजांचे उद्योगास प्रारंभ झाला होता. आणि वरील ले. ४३७ चा अस्सल कागद त्याचा स्वच्छ व निःसंदेह पुरावा आहे.

सभासदाच्या विधानास शिवभारतातील उल्लेखाने स्पष्ट बळकटी येते. तो म्हणतो -

शिववर्मा यदा वर्षं द्वादशं प्रत्यपद्यत ।
तदा नृपश्च्यशाहवर्मा नियोगेन पिनाकिनः ॥ १ ॥
ततः कतिपयैरेव गजवाजि पदातिभिः
मौलैराप्तैरमात्यैश्च ख्यातैरध्यापकैरपि

बिल्दैश्च ध्वजैश्चैः कोषेणापि च भूमसा ।
तथा परिकरैरन्यैरनन्य सम्कर्मभिः ॥ २६ ॥

अशाप्रकारे पोक्त सरंजाम देऊन शहाजीराजांनी शिवाजीस पुण्यास पाठविले. श्री. बृहदीश्वर शिलालेखांतही अशीच साक्ष आहे.

शके १५६२ व शिवाजी महाराजांचे वय बारा असताना स्वराज्य स्थापनेचा उद्योग प्रसिध्दपणे आरंभिला गेला. परंतु यावरून शके १५६२ मध्यें एकदम या थोर मसलतीचा प्रारंभ झाला असे मानणे भ्रामक होईल. कारण अशा थोर मसलती बराच काळ चांगल्या शिजाव्या लागतात व त्याचा प्रारंभही ' वंकुप्रवेशात् मुसलप्रवेशः ' अशा न्यायाने व्हावा लागतो. मुसलमानी सत्तेला जे शिवशाहीचे खग्रास ग्रहण महाराष्ट्रात लागले, त्याचा उघड प्रारंभ जरी शके १५६२ त लोकविश्रुत झाला असला तरी त्याचा वेध शहाजीने पेत्रगिरीस निजामशहावर छत्र धरले, तेंव्हापासूनच लागला असे समजण्यास चिंता नाही. १५६२ मध्यें शहाजीने शिवाजीस ' तख्त बांधून ' दिले, पण त्यापूर्वीच त्याची उठावणी झाली असावी, हे मात्र निश्चितच आहे.

शके १५५१ मध्यें मुलाचा जन्म झाल्यापासून ते १५५८ त विजापुरकरांची ताबेदारी पत्करेपर्यन्त शहाजीराजांची ५, ७ वर्षे फार धामधुमीत गेली. त्या सात वर्षांत पिता-पुत्रांची निवांत भेट झालीच नाही. शके १५५९-६० मध्यें एकदा व पुन्हा १५६१-६२ मध्ये दोनदा शहाजी व शिवाजीच्या भेटी झाल्या असाव्यात.

शके १५६१ च्या माथ्यावर जी शिवमुद्रा झळकत आहे ती म्हणजे राजीखुशीने किंवा राजकारणाने उभ्या केलेल्या स्वत्या सुम्याची पताका आहे. ही मुद्रा पाहिल्यानंतर या मुद्रेचा यथार्थ अभिप्राय काय आहे ? आणि त्यावरून महाराष्ट्र - स्वराज्या स्थापनाविषयक कोणती अनुमाने सूचित होतात ?

इत्यादी प्रश्न मनांत उभे राहतात. अखिल महाराष्ट्र मुद्रासंग्रहात या शिवराज मुद्रेच्या तोडीची एकही मुद्रा नाही. इतकी ही मुद्रा एकमेवाद्वितीय आहे. तिचा आशय फारच भव्य व दिव्य आहे आणि तिची व्यंजना तर केवळ अलौकिक आहे. ' विश्ववंदिता ' हे पद फारच मननीय आहे. आणि हे स्वातंत्र्य व सत्ता यांचे निःसंशय दर्शक आहे असे कै. प्रो. लिमये यांनी दिलेले मतही विचारणीय आहे. (इंडियन रिव्ह्यू - फेब्रुवारी १९१९, फर्ग्युसन कॉलेज क्वार्टर्ली) "This expresses the idea of sovereighty of independent political existence as clearly as words can express it." (कित्ता पृ. १६१) स्वराज्यसंस्थेच्या चंद्राच्या प्रतिपदेची किंवा प्रारंभाची केवळ सूक्ष्मदर्शांवाचून इतरास सहज न दिसणारी, पण कलेकलेने दिवसेंदिवस वढत जाणारी बारीक कोर उगवली असून ती वाढत वाढत जाऊन पौर्णिमेच्या चंद्रमंडलाप्रमाणे परिपूर्ण होऊन, सर्वत्र शांतता आणि सुख यांचे साम्राज्य पसरवून, सकळ विश्वाला संतुष्ट करून सर्वांच्या आदराला पात्र होईल आणि सर्वांचे मंगल करील, एवढा विलक्षण, रम्य व गंभीर, पवित्र आशय या मुद्रेत भरलेला आहे. थोडक्यात बोलावयाचे म्हणजे शिवाजी महाराजांच्या थोर मनाची ही मुद्रा म्हणजे शुध्द व सत्य प्रतिमा आहे. मुद्रा असावी तर अशी असावी. शिवाजी महाराजांनी स्थापिलेल्या महाराष्ट्र राज्याचा ही मुद्रा म्हणजे सारभूत इतिहास आणि त्या विभूतीच्या चरित्राचे केवळ रहस्य आहे.

अशी ही अलौकिक मुद्रा शिवाजी महाराजांनी स्वतःच कल्पिली असेल काय ? कारण ही मुद्रा महाराज केवळ बालवयी असता म्हणजे महाराजांचे वय दहा-बारा वर्षांचे असताना त्यांच्या नावाने झळकू लागली आहे. शिवाय महाराजांचे वडील शहाजी महाराज यांच्या खास मोकास अंमलात पुत्र शिवाजीराजे यांचे नावे शहाजी महाराज यांनी आपण स्वतः पोट मोकासा पाडून त्यास स्वतंत्र अधिकारी मंडळ नेमून दिले. शिवाजी राजे यांची कुंदी फार

तीक्ष्ण होती. त्याचे साहस, शौर्य इत्यादी गुण लहानपणापासून प्रत्ययाला येऊन लागले होते या विषयी संशय नाही. परंतु त्याचे कोवळे वय पहाता जरी त्यांची उडी मोठी होती आणि बुध्दि विशाला होती. तथापि विचार तेव्हा परिपक्व झाला होता असे म्हणता येत नाही. ते सृष्टिधर्माला जर विरुध्द पडते. आपल्या उदरात एवढा मोठा गूढ व गंभीर अभिप्राय धारण करणारी मुद्रा स्वयंबुध्दीने निर्माण करण्याइतकी शिवाजी महाराजांची बुध्दी प्रौढ झाली असेल असे मानणे युक्तीत येत नाही. आणि इतिहासाची ही साक्ष याच बाजूला झुकत आहे. स्वतंत्र पोट मोकासा मिळाला, तेव्हाच स्वतंत्र मुद्राही करून मिळाली असली पाहिजे आणि हा व्यवहार जरी शिवाजी महाराजांचे कानावरून गेलेला असला तरीही घटना घडविणारे शहाजी दादाजी प्रभृति पिकलेले मुत्सद्दीच असले पाहिजेत. त्याच्यासारख्या परिणत प्रज्ञांचेच ते काम असणार. शिवाजीच्या अंगचे तेज पाहून शहाजी-जिजाऊ दादाजी प्रभृति चतुर वृध्दांना सत्ता स्थापनेचा डाव पुन्हा खेळून पाहण्याची आशा वाटली असण्याचा संभव आहे. सहजस आहे की, साहस करून पाहण्यासारखा मुलावा डौल दिसत होता तेव्हा तशी उभारणी सावधगिरीने केली असली पाहिजे. राजकारण नेहमी ` दुलग ` ठेवावे लागते, तरच यशप्राप्तीचा संभव असतो. शिवाजीला शहाजीने पोटराज्य करून दिले ते गुण पाहून दिले असले पाहिजे त्याला शिवदिग्विजयकाराचा आधार आहे. तो म्हणतो की, " शिवाजी महाराज पुणे प्रांती राहून दादाजीपंतांनी विद्याभ्यास करविला. मल्लयुध्द, शस्त्रयुध्द करावयाच्या गति शिकविल्या, राजे गुणज्ञ एकवेळ सांगितले म्हणजे पाठ व्हावे. (शिवभारतकार असेच राजांच्या बालबुध्दीचे वर्णन करतो) असे बुध्दीचे तैक्ष्ण्य अकराबारा वर्षांचे वय होता कारभार विचार बारीक मोठा पाहू लागले. न विचारता केला तरी दादाजीपंताशी बोलावे आम्ही मूल आहो, म्हणून कळवू नये हे काय ? तुम्ही वडील आम्हांस सांगोन करावे. त्यात न्यूनाधिक्य आमचे बुध्दीने विचार सुचला तरी सांगू.

ग्रहण करावयाजोगा असला तरी तसे करावे. त्यास आमचे युक्तीस येईल ते प्राधान्य. आम्हांस शहाणे करावयास वडिलांनी सांगितले. तुम्ही व्यवस्था लाविली तरी आम्ही कोणत्यारीतीनी बुध्दिवंत व्हावे ?` हे ऐकून दादाजी-पंतांनी कोणताही विचार जाबसाल लहानमोठा विचारल्याशिवाय करावयाचे सोडून दिला. कचेरीत जे करणे ते करावे. न्याय पंचाईत निवाडे मोठे कडोनिकडीचे आले तरी बुध्दिकुशलत्वे दोष काढून वादावादी त्याचे मुखे खोटाखरा त्याचे त्यांनी म्हणावे अशा रितीने पंचायती कराव्या. " (शि. दि. पृ. ७२-७३)

या लिहिण्याप्रमाणे शिवाजी महाराज लहानपणीच राजकारणात लक्ष घालू लागले होते. लहानमोठेपणाच्या ज्या ज्या मर्यादा सांप्रत लोक मानतात. त्याहून मराठी अंमलात निराळ्याच काही रूढ होत्या, त्यावेळी आपापल्या व्यवसायात मुले सातव्या आठव्या वर्षापासून पडू लागत. जरी आमचे देशी-राजे सोडले तरी बाबर, अकबर प्रभृती चकताई शहांचे किंवा चौदावा लुई अगर बारावा चार्लस यासारख्या युरोपियनांचे इतिहास वाचले असतां हीच रीति तेथे आढळे. त्यावेळी मुलामुलींचे विवाहही अल्पवयातच होऊन ती लवकरच परंपरा चालवू लागत हे शेकडो प्रमाणे देऊन सिध्द करता येईल. अलिकडील कित्येक लेखकांना हे न कळल्याकारणाने काही अद्वातद्वा शंका त्यांनी काढलेल्या दिसून आल्या आहेत. शिवाजीही त्याच क्रमांत वाढला.

अकरावे, बारावे वर्षीच त्याचे लग्न दादाजीपंताचे विद्यमाने पुण्यात शहाजीच्या अप्रत्यक्षतेत ठरवून घेण्यात आले. तो प्रसंग वर्णिताना दिग्विजय-काराने लिहिले आहे की, " महाराज प्रौढ जाले. हित अनहित समजो लागले राजकारण करून आक्रमणशक्ति विशेष धरिते जाले जाणोन दादोपंतास राजांनी पुण्यासच समारंभ करून महाराजांचे विचारे कार्यसिध्दि करावी म्हणोन

आज्ञा पाठविल्यावरून ..... लग्न केले. शके १५६२ विक्रम संवत्सरी वैशाख मास शुक्ल पंचमीस यथाविधि पाणिग्रहण झाले. " (पृ. ९८-९९) यावरून अकरा-बारावे वर्षी हल्लीपेक्षा मुलांस बरेच प्रौढत्व आले असे मानून जुन्या अमदानीत सोळाव्या वर्षी " पुत्रे मित्रवदाचरेव " हा न्याय लागू होई. क्याने प्रौढपणा असा जरी त्याकाळी लवकर येत होता असे मानावे लागते व अर्थातच बुध्दीही सांप्रत कालाच्या तुलनेने अधिक लवकर परिपक्व होत असे मानणे युक्त होईल, तरी देखील शिवाजी महाराजांच्या मुद्रेप्रमाणे गूढगंभीर मुद्रा कल्पिण्याइतपत दूरदर्शित्वाचे प्रौढपण बुध्दीला येत असेल असे मानणे चुकीचे होईल.

या पुण्यातील पहिल्या लग्नानंतर " उभयता वधुवरे पहावा " म्हणोन त्यास शहाजी राजे यांनी विजापुरी आणविली. ते वर्तमान पातशापावेतो पोचून त्यांनी " ते लग्न काय खेळ जाला, दुसरे लग्न येथे करावयाचे " (शि. दि. पृ. १११) असा प्रेमाचा हट्ट गाजवून विजापुरास तो समारंभ ठरला असावा. परंतु शिवाजी महाराजांचा एकंदर यवनविरोधाचा प्रकार पाहून हे प्रकरण फारच बिथरेल या भयाने शहाजीराजे यांनी पुन्हा (यावरून दोन भेटीचा अर्थ कळावतो) पुण्यास रवानगी करून दिली. (शि. दि. पृ. ११२) हाच अर्थात १५६२ साली स्वतंत्र सताक्रमणाचा प्रारंभ, तदनंतर मग " तमाम मावळे व कोकणी लोकांची राजकारणे " (कित्ता पृ. ११६) शके १५५८ ते १५६२ या काळात सावकाशीने व सावधगिरीने जे राजकारणाचे थर महाराष्ट्रीयांकडून चढविण्यात येत होते, त्याला उत्तरेकडील मोगलाच्या दक्षिणेत होणाऱ्या पैनलाव्याने मजबुतीच आली असण्याचा संभव आहे.

स्वराज्याच्या उदयकालच्या चतुःसीमा या आपल्या विचार परिलुप्त आणि अत्यंत माननीय लेखात रा द. वि. आपटे यांनी (भा. इ. सं. मं. त्रै. १८४५) शिवाजीच्या उलाढालीस मोगलांची अंतस्थ फूस होती की काय असा संशय येतो. (कित्ता पृ. ९१) तो संभव सुचवून ठेविला आहे. निजामशाही कोलमडून पडलेली आणि मोगलशाहीचा जोर प्रत्यही वाढत चाललेला अशा

पेचात आदिलशाही सापडलेली पाहून पुणे प्रांती ` स्वराज्य ` अंमलात शहाजी शिवाजी यांचा जो दुलग-दुरंगी राजकारणाचा डाव चालू होता. त्यातील अगदी आतील पापुद्रा शिवमुद्रेच्या साहाय्याने पाहण्याचा प्रयत्न केला असतां केवळ एक मुद्रेच्या डौलावरुनी राजकारणाच्या मरीव बनावाचे निश्चित अनुमान बांधणे धोक्याचे आहे. उत्तरोत्तर जसजसा आपला ऐतिहासिक प्रमाणसंग्रह वाढत जाईल, तसतसा हा तमसावृत्त परंतु अतिरमणीय इतिहास स्पष्टतर होत जाईल.

शके १५७३ त जिजाऊ आईसाहेबांनी ` चिरंजीव राजश्री सिऊबावा ` इनाम अनामतीचा हुकूम पिनरविल्याचे आपणास तिच्या अस्सल आज्ञापत्रावरुन जसे ज्ञात झाले आहे. (भा.इ.सं.मं.शके १८४२ चित्राव-वे-हवडे इनामासंबंधी श्री. मुजुमदार यांचे टिपण) तसे आणखीहि पुरावे न जाणो लवकरच प्रगट होतील आणि मग आज चाचरत चाचरत करावी लागणारी अनुमाने निश्चयाने सिध्दांतवत ग्राह्य होतील.

शिवाजी महाराज एक अलौकिक विभूति होती यात संशय नाही. तथापि त्यांनाही पायावाचून मंदिर उभारता आले नसते हे ध्यानात वागविले पाहिजे. उत्तरेत शहाजहान तर दक्षिणेत शहाजी हे (राधामाधवविलासचंपू) कविवचन केवळ कल्पना किंवा स्वामित्वचन न मानता शहाजीची तोलदारीच यथार्थतेने दर्शविते. असेच मानले पाहिजे आणि मग शिवाजी महाराजांनी आपणास ` शाहसूनु ` म्हणून गौविण्याचे सकारणत्वहि ओघानेच युक्त ठरते.

वरील गोष्ट न विसरतां जर शिवचरित्राचे मनन केले तर आपली विधाने निर्दोष जाणवतील, तसे न करिता जर आपण शिवाजी महाराजांनी अकरावे बारावे वर्षीच स्वराज्यस्थापनेचा उद्योग केवळ स्वच्छंदीने प्रारंभिला असे समजू लागलो तर तो इतिहास न होता ती अद्भुत कथा होईल. शिवाजीच्या नावाची केलेली मुद्रा केवळ शहाजीचा हक्क वहिवाटणारा मुलगा म्हणूनच केली

असती तर प्रतिपच्चंद्राच्या वर्धमान वैभवाचे स्मरण करून देणारी ती असली मुद्रा करणे साध्यासिध्या मराठी स्वभावास, परंपरेस व्यवहारास व शिवाजीच्या पोरपेशास जुळते ना. ती मुद्रा शिवाजीच्या नांवे करून देणाऱ्याच्या मनांत पोटमोकासदारीची क्षुद्र कल्पना वावरत नसून रामराज्य सदृश भव्य अशा भावी स्वराज्याचे सुखस्वप्नच निःसंशय नांदत असले पाहिजे. उलटपक्षी, वडिलांच्या विषयी तिरस्कार मनांत वागवून स्वतःच निराळा, स्वतंत्र असा रस्ता आपण चालू लागून शहाजी प्रभृतींना सर्वथा वावडा वाटणारा स्वराज्याचा उपक्रम आपणाच चार सवंगडे मिळून शिवाजीने समजा शके १५६८ त तोरणा घेऊन आरंभिला असे समजले तर मग पूर्वी १५६१ साली गळ्यांत बांधलेली आणि पारतंत्र्याच्या कल्पनेत जन्मलेली, मुद्रा अशुभ आणि अपमानकारक समजून शिवाजीने दूर भिरकावून देऊन बापाचे नांवदेखील नसलेली नवीनच स्वतंत्रशी मुद्रा केली नसती काय ? शके १५६१ तील मुद्राच शिवछत्रपतींनी राज्याभिषेका-तरही चालविली यावरून त्या मुद्रेची परंपरा शिवप्रभूस अखेरपर्यन्त अभिमत होती, असेच अनुमान प्राप्त होते. अशादृष्टीने विचार केला तरी देखील येथवर केलेल्या विवेचनाला पुष्टीच मिळते.

अशाप्रकारे ही शिवप्रभूची परम आदरणीय मुद्रा फारच मोठे ऐतिहासिक कूट सोडविण्याला व अद्भुतविध्वंसनाला केवढे साहाय्य आज आपल्याला करीत आहे. प्रतिपदेच्या चंद्राचा दृष्टांत केवळ अप्रतिम आहे. प्रतिपदेचा चंद्र सामान्य जनास दिसत नाही. परंतु ज्या भाग्यवंतास दिसतो ते स्वतःस धन्य समजतात अशा प्रसंगावरून सुचलेला शाखाचंद्रन्याय तर सुप्रसिध्द आहे. प्रतिपच्चंद्र लहान व बहुजनांना अदृश्य असतो. परंतु तो ` विश्ववंदित ` असतो. तसेच मावळच्या दरीखोऱ्यात उभारले जाणारे हे स्वराज्याचे निशाण लवकर नदिसणारे परंतु अखेर विश्वजनांच्या अभिवादनाला पात्र होणार आहे. हा विश्वास अंतरांत जागवूनच झाली ती राजकारणी उभारणी करण्यांत आली.

आणि तिचा हेतुही विश्वोपकारीच होता. चंद्रही कलेकलेने वाढून सर्व सृष्टि अमृतसिंचनाने हृष्ट व पुलकित करतो, तद्वतच हे स्वराज्य आपले सार्वभौमत्व सिध्द करील हा विश्वास सर्वांनी राखावा, असेही मुद्रा सुचवित आहे. मराठी सत्ता वावटळीसारखी किंवा वाणव्यासारखी उद्भवली किंवा ती एका कोणातरी लोकोत्तर एकट्यानीच होय असे भ्रामक समज ही मुद्रा पाहून आता कोणी बाळगू नये. आणि मराठी सत्तेची, शिवकालीन उभारणी ही पायापासून शिखरापावेतो सुरेख व सशास्त्र उभारलेली न खचणारी, विश्ववंद्य अशी प्रासादरचना आहे असे पक्के समजावे. श्री. पोतदारी यांनी या मुद्रेकडे अधिक संशोधनात्मकदृष्टीने पाहून त्याचा अभ्यास केला आहे.

ही मुद्रा केंव्हा झाली व कोणी केली इ. वादात शिरण्याचे आम्हांस प्रयोजन नाही. ती संस्कृतात आहे, या गोष्टीला आमच्या दृष्टीने विशेष महत्व आहे.

स्वराज्य संस्थापनेच्या महान् संघर्षांतहि शिवाजी महाराजांचे लक्ष संस्कृत भाषेकडे होते. त्या भाषेचे राष्ट्रीय व सांस्कृतिकदृष्टया असाधारण महत्व महाराजांच्या क्रांतदर्शी दृष्टीला १७ व्या शतकांतही दिसत होते व म्हणून त्यांनी आपल्या राज्यामध्यें संस्कृत भाषेचा उध्दार करण्याच्या दृष्टीने मोठे महत्वाचें कार्य केले. महाराजांच्या प्रत्यक्ष प्रेरणेने त्या काळी कांही महत्वाचे संस्कृत ग्रंथ निर्माण झाले. त्यामध्यें राज्यव्यवहारकोश, करणकौस्तुभ, शिवार्कोदय:, शिवभारत इ. समावेश आहे. त्यांचा परिचय मागें करून दिला आहे म्हणून या संस्कृत राजमुद्रेला महत्व आहे. अप्रत्यक्षरित्या संस्कृत साहित्याची सेवा करणारे छत्रपति शिवाजी महाराजांसारखे जे विद्यारसिक नृपती होऊन गेले, अशा सर्व संस्कृत सेवक राजपुरुषांमध्ये छत्रपति शिवाजी महाराजांचे स्थान फार मोठे आहे. संस्कृत भाषेचा उध्दार प्रयत्नपूर्वक करणाऱ्यामध्ये त्याचे स्थान अलौकिक आहे.

प्रकरण नववे

संस्कृतमधील छ. शिवाजी महाराजांच्या चरित्राविषयी उपलब्ध असलेले हस्तलिखित साहित्य

प्रकरण नववे

संस्कृतमधील छ. शिवाजी महाराजांच्या चरित्रा-विषयी उपलब्ध असलेले हस्तलिखित साहित्य

अ) समयनय:

गागाभट्टाचे ' समयनय ' हे हस्तलिखित मला भांडारकर ओरिएंटल रिसर्च इन्स्टिटयुटमध्ये लिमये ग्रंथ संग्रहात हस्तलिखित विभागामध्ये प्राप्त झाले. ते सन १६८०-८१ मध्ये लिहिलेले आहे. म्हणजे छ. शिवाजी महाराजांच्या मृत्युनंतर ते लगेच लिहिलेले आहे. गागाभट्ट हे छ. शिवाजी महाराजांना समकालीन होते व त्यांनी सदर ग्रंथ छ. संभाजी महाराजांसाठी लिहिला. म्हणून त्याचे अतिशय महत्व आहे. त्याचा प्रारंभ व शेवट पुढीलप्रमाणे आहे.

अथ गागाभट्टकृत समयनय प्रारंभ:
(कार्यनिर्णयोपयोगी धर्मशास्त्र)

श्री गणेशाय नम: । गणपतिमभिगम्यसांगमेकंद शारथसूनुवरस्यपादपद्मं ।।
दिनकरचरणौ प्रणम्यमूर्ध्ना समयनयंतनुतेत्दात्मजोथ ।। १ ।। सिंहासन छत्र-
धराधिराजराजाधिराजैकशरण्यभूत: ।। शंभु: स्वयंभु: प्रभुरस्तुतुष्ट:
स्फुरत्प्रतापोज्वल दिग्विभाग: ।। २ ।। अखंडकाल: सकल: प्रसिध्द: सर्वेश्वरा-
त्मासदैवचिंत्य: ।। यस्यैकखंडान्प्रवंदतिवादायनर्तुमासांश्च दिनानिवाद्या: ।। ३ ।।
तिथीन्मुहूर्तानिपितत्रमुख्योह: पंचभेदास्तिलकव्रतादौ ।। चांद्रस्तुजन्मव्रतयुक्सौरो
गवायनादौ खलु सावन: स्यात् ।। ४ ।। किकल्पितास्ते गुरुसेवनादौत्रेधा निजे

छैवहितत्र हेतुः । आयुर्विभागे खलु तारकादिर्बृहस्पतेश्चाण्यधिवत्सरोयं ।। ५ ।।
राशिं परित्यज्य यदैवमध्ये राश्यंतरं चे द्धिषाणः प्रयातः । पूर्वं तुराशिंसमुपैति
नैवाधिवत्सरं तं ब्रुवतेत्रिवृद्धाः ।। ६ ।। संवत्सरोथ परिवत्सर संज्ञक पंचकस्य
एकैकशः क्रमश एतदिहाभिधानं ।। ७ ।। तिलानांम वानांतथावासरं
चक्रमाघ्दान्य कस्यामभ्यस्यदानं ।। प्रशस्तेथने दक्षिणां चोत्तं चोयकेवा
पिशातिक्रमात्कर्मणिास्तः ।। ८ ।। त्यानंतर ऋतु, मास, दीपावलि, माधव,
होली वगैरेचे वर्णन करुन शेवटी -

निषेधास्त्वयणो स्त्वर्मुसांचमेधादि कानांनतेचिंतिताः प्रत्यभावात् ।। ६६ ।। दिनकरत-
नयेनतेनयागाभिधविबुधेन निरीक्ष्यसंनिबंधान् ।। रघुवरकृपया मुनानिबत्धः समयनयः
सुखमेतुशंभुराजः ।। ६७ ।। शाकेदस्मवियद्रसक्षितिमिते रौद्रोभिधेवत्सरे
विश्वामित्रकुलारविंदतरणिा गांगास्यसूरिः कृती ।। श्रीमन्दोसलवंशभूषाणमणौः
संपोषित छत्र परच्छा नंदायस्दाभ्वेदशिथिलाकीर्त्यै प्रसादायव ।। ६८ ।।
इति श्री गागाभट्टकृत समयनयः समाप्तः ।।

अशारितीने मला हे हस्तलिखित उपलब्ध झाले. हा ग्रंथ शिवाजी महाराजांच्या मृत्युनंतर लगेचच संभाजी महाराजांसाठी लिहिलेला आहे. तेंव्हा जिज्ञासु वाचकांनी त्यावर संशोधन करुन पितापुत्रांच्या संबंधावर आणखी काही प्रकाश पडतो का ते पहावे.

ब) साहित्य-मंजूषा :

तंजावर येथील सरस्वती महाल ग्रंथालयामध्ये साहित्य मंजूषा नावाचे हस्तलिखित उपलब्ध झाले. त्यामध्ये सदाजी नांवाच्या एका कवीने इ.स.१८२५ मध्ये साहित्यशास्त्रनिष्ठ सदर ग्रंथामध्ये शिवाजीचे चरित्र व इतिवृत्त वर्णिले आहे ते फार दुर्मिळ असल्यामुळे येथे उद्घृत करीत आहे.

साहित्य मंजूषा
(दाजी प्रणीता)

श्रीमान्कौशिक गोत्रजश्च सुयशाः जित्वा भवान्या वरात् आप्रालेयनगाद्रि-
सागरतटांतं चक्रवालं भुवः । दध्रे यो यवनद्विपेषु हरितां राजन्यवंशाग्रणीः
आसीच्छत्रपतिः स्वयाक्कयस्वर्दुः शिवाजिन्नृपः ।। यः स्वस्योभ्दवराघशुक्ल-
हुतभुग्धस्त्राङ्कु.रिबुधिसंख्याब्दस्थितशालिवाहन शके चाडिगोत्रापृथ्वीमिते ।
आनंदेश्विज शुक्ल शुक्लमदनाहे प्राप्य काशीस्थितात् गागाभट्टत आप्लवं नृपपदे
प्रावर्तयस्त्वंशकम् ।। स तु कौंकणा गेरायरि नामनि दुर्गे वसत्सुतौ तस्य ।
संबाजिर्जेष्ठा न्यो राजारामाख्य आसुतः प्रबलौ ।। संबाजिस्तनयो बभूव
सुयशाः शाहुः स कृष्णानदीं ।। सीमानं परिकल्प्य दक्षिणपयोधयन्ते
धरामण्डले । राजारामसुतं चकार नृपतिं कौल्हे दिग्गान स्वयम् । प्रालेया-
द्रयवधीन् शशास विषायान् सप्तर्षिदुर्गे वसन् ।। राजारामसुतौ शिवाजि-
रिति विख्यातो ग्रजो न्योमहान् । संभाजीत्यभिधान आसतुरिति द्वौ
सार्वभौमो तयोः । संभाजिः करवीरनामनि महालक्ष्म्यालये पत्तने क्षेत्राणां प्रवरे
स्थितो वनितलं पातिस्म । तस्यात्मजः ।। देवीभक्त गणाग्रणीगुरुपदांभोज
द्विरेफो निशम् लक्ष्मीमूर्तिमती स्थिता सुनगरे यस्या द्विजातिः प्रियः ।
शौर्यादार्यतिरस्कृतार्जुनबलिः संसारसक्तः परे पुंस्यासक्तमना विदेह सदृशश्चासी-
च्छिवाजिन्नृपः ।।

संबाजिसंज्ञे प्रथमात्मजे स्य तु
प्राप्ते द्युलोकं सहसा ततो वरे
शहाजिसंज्ञे धरणीं प्रशासति
ग्रन्थोद्यमो यं तु तदाश्रितस्य सन्-

अथ कवेः कुलवर्णनम् ।

श्रीमन्नृसिंहकुलदैवत एतद्‌वि -

पालान्वयप्रवरतः शाक कृच्छिवाजेः ।

यो जोशिरायपदवीं समवाप काश्याम् ।

सन्यासिलब्ध गणपप्रतिमाप्रसादात् ।

यत्कोङ्क.णेस्ति प्रथितं तु सङ्‌. मे -

श्वराख्यमत्यन्तसमृद्धिमत्पुरम्

तमत्यकार्तीतिक वंशसागरात्

बल्लाळसंज्ञोऽजनि यो द्विजाधिपः ॥

यो दैवज्ञवरः

पुरदैवतमपि यस्य जाखमाताख्यम् ।

सद्‌दागरोपनामा

शाण्डिल्यान्वयज रभमुखाराख्यः ॥

तस्यात्मजास्तु बहवः प्रवभूवरेषां

मध्येसुधीर्दशरथो नृपमान्य आसीत् ।

चिन्तामणिः किल तदीयसुतेषु मुख्य-

चिन्तामणौ पचितिप्रवणो स आसीत् ।

बल्लाहस्तस्य पुत्रोऽग्रज इतरसुतो बाजिसंज्ञस्तयोस्तु ।

ज्येष्ठो बल्लाळनामा नृपतिबहुमतो विद्वदालीषुमान्यः ।

बल्लाकैकतानो नरहरिभजकः कौलदैत्यापहं-या

लक्ष्म्याभक्तः सुवक्ता ऽभवदमलयशास्तस्य पुत्रास्तुमंच ॥

विद्वान्दाता रामचन्द्रश्च राज्ञो

मान्यो दक्षोन्यस्तु नारायणाख्यः ।

जीवो ज्योतिर्विद्वरो राघवोऽन्य

काणादज्ञो दाजिसंज्ञस्तथैकः ॥

यस्तेषामवरो गजाननपदाम्भोजाद्विरेफनो महालक्ष्मीध्यानपरो
नृसिंहचरणासक्त: सदाचारवान् ।
स्वज्येष्ठात्प्रतिलब्धनाटक रसालङ्कार काव्यादिक:
श्री सिद्धेश्वरसूनुनामत इह प्राप्तलिशास्त्रोन्नत: ।

स दाजिसंज्ञ: किल शालिवाह-
शकेऽश्व वेदाश्व धरामिते त्विषो ।
शुक्ले तृतीयाख्यातिथौ च काव्ये
वारे समाप्तामकरोदिमां मुदा ।।

नरसिंह: कुलदेवतमाराध्य इमाननो महालक्ष्मी: ।
करवीरस्था भिजगज्जननी नृप्यन्क्नेन काव्येन ।।

अशा रितीने ग्रंथाच्या शेवटी त्याने स्वत:ची व शिवाजीची माहिती दिली आहे. कविचे नांव सदाजी नसून दाजी असले पाहिजे. या कवीची वंशावळ आढळते, ती पुढे देत आहे

सदाजिसंज्ञ: किल शालिवाहने
शुकेश्ववेदाश्वधरामिते त्विषो
शुक्ले तृतीयाख्यातिथौ च काव्य-
वारे समाप्तामकरोदिमां मुदा

शिवाजि
: संभाजी
: : शाहु
: राजाराम
: : शिवाजि
: : : शहाजी (१८२५ इ.स.)
: : शांभाजि

सड.मेश्वर (शाण्डिल्य कोङ्कण)
: बल्लाळदैवज्ञ
: दशरथ
: चिन्तामणि
: बल्लाळ
: सदाजि (१८२५ इ.स.)

अशी वंशावळ एका जीर्ण तुटया कागदावर लिहिलेली मला सरस्वती महाल तंजावर येथे आढळली. ती येथे दिलेली आहे.

क) त्रिपुर विजयचंपू :

तंजावर येथील सरस्वती महाल, ग्रंथालयामध्ये ` नृसिंह ` नांवाच्या अमात्याने लिहिलेला वरील हस्तलिखित ग्रंथ उपलब्ध झाला. त्याच्या प्रारंभी भोसले कुळाची माहिती दिली आहे, ती येथे उद्धृत करीत आहे.

श्रीगणेशाय नम: ।।

अथ गणपति माद्यं भावयन्नं तद्गे.
उजत शशिसवर्ण चन्द्ररेखावतंसं ।
सुरवर मुनिवृन्दै रर्चितांघ्रिं नितांतम्
निरवधि कल्याणानां नीरधिनित्यमीडे ।। १ ।।

शिवौ नमस्यामि शिवं करौ सतां
शुभाय मह्यं महसां महानिधी ।
श्यामावदातौ शशिसूर्यपावक -
प्रकाशमानाब्ज विकासलोचनौ ।। २ ।।

वाणीं नमामि कल्याणीं कीरवाणीं कलानिधिम्
वाणी विभूत्यै मह्यं वीणापुस्तक धारिणीं ।। ३ ।।

गुरून्नमामि कृपापयोधीन्
समस्त कल्याणगुणा महाशयान्
महाकवीन् काव्यसमान् सुमेधस:
सदामधुस्यंदि वच: परंपरान् ॥ ४ ॥

श्रीमानेकोजि भूप: प्रथितगुणमणि:
पुण्यकीर्ति र्वदान्यो ब्रह्मण्य:
सत्यसंध: सुरपतिविभव:
पालयन् भूमिमास्ते ।
कावेरी नीर पूरै रतिजित दुरितै:
सर्वत: पाविता तां
देवस्थानै: पुराणै: कलिकलुषा हरै-
र्यैजूभिव्यप्ति सीमां ॥ ५ ॥

राजन्द्रोत्सलवंश सिंधुशशिन:
स्वात्यंत वाक्चातुरी -
धारासार सुधारसै र्द्विजवरान् तु
ष्टान् सदा कुर्वत: ॥

श्री तंजापुरपालक क्षितिपते र्दोर्दंडभग्नद्विषा
स्तस्यात्मात्यवरो ' नृसिंह ' इति य: ख्यातो बुध र्भूतले ॥ ६ ॥

श्रीजयंती प्रसूर्यस्य राजते रमणीमणि:
पिताण्या नंदयज्वाभूत ब्रह्मण्यो विद्वदग्रणी: ॥
भारद्वाज कुलोत्पन्न: सोऽहं बालत्यामुदा ॥

प्रस्तुत ग्रंथाची सुरूवात अशी असून शेवट पुढीलप्रमाणे आहे.

श्रीमन्दरद्वाज कुल जलधि कौस्तुभस्य
श्रीमदेकक्षत्रापति सिध्द: सौराज्य धुरंधरस्थ
नृसिंह्मात्यस्य कृतौ ।
त्रिपुरविजय नाम चंपू: समाप्तिमगमत् ।।

प्रस्तुत हस्तलिखिताचा नं. ५७० (ब), ४०३६ आहे.

ड) इनकुलतेजो निधि :

तंजावर येथील सरस्वती महाल, ग्रंथालयामध्ये प्रस्तुत हस्तलिखित असून ते तुळजाराजकृत आहे व त्यातही भोसले वंशाची माहिती दिलेली आहे.

श्री
इनकुलतेजो निधि
तुळजाराकृत
(गणित उपकर्णाध्याय)

श्रीमहागणपतिर्जयति ।। श्री रेणुकांबायै नम: ।।

यदीयांघ्रिद्वंद्व निखिलामिगमांत: प्रकटित प्रभावं भक्तानांस्मृतमभिमतानेक फलदं सखे: प्रत्यूह प्रशमनपटु: विश्वविन्दतो सुरेभूया द्वौरीप्रणाय वनयोव: करूणाया ।। १ ।। सानंदं गिरिजाकरण्य प्रकरं प्राप्तोरय: केवलं रोमांच: प्रकटी करोति महतीं प्रीतींसिखे द्धवतां । इत्येवं----च: स्मितमुख: कामं विवाहोत्सवे कल्याणानिकरोत्वव: प्रतिमदं----मणि: ।। २ ।। या यत्पाराब्धरज: कणो ज्वलमला सिधांजनेन

स्फुटी जायते निध्यौ दिशासुसरणौ गुढा: परार्थाभिरा: । यान्नत्वाकृति नौ थर्जं तिसहसा सूबतीसुसघास्यंरिनी स्तादिवीं वचसामपारकर्ष्यांक ल्लोलिनीं भावये ।। अज्ञानध्वांतमस्तंभ तितन्नंयासारा त्सामस्तंयभेज: संम्य नारध्ये शशिमुखवचरा: दीपिताशांतराला: यस्मारम्नेति सौख्यंगरिस्त्र कल्येन कालो विभक्त: । संपूर्ण संभजाभिधमणिारभिमतग्रंथल्पार्थ सिध्यौपम्यामित्रं लोकहितोरयं हटशिरोम्नं कलानांनिधिं पृथ्वीसुनूमुशार विक्रमकरं सौम्यंसमस्वार्थ रांवागीशंसुरराजपूजितपदं काव्यं कलाकोविंद । छाया सुनूमशोष्ठावधम कलं स्वर्भानूमंतभेजे ।। आसीन्मालोजिराजो दिनकरकुलराजसुत: शाहराज: पुत्रस्तथैक राध: सकल गुण निधि: भोसलांभोधिचंद्र: शिपांबातस्य भार्या त्रिभुवनानि दिनास्तकुमारसुयोमी । शाहेंद्र श्री शरोफावनिप निरुकर्ष: क्षोणिपालावंतंस: ।। तेषां पुण्यप्रभावाहि धुरिवकलधरोस्त्रय: सकलनां पुकोजि क्षोणिपाल स्कलध नटयते क्षितिपाल: कुमार: गांभीर्य स्थैर्य धैर्यस्त्रिभुवन महितायै दार्थवासूर्य शौर्य प्रोद्यत्सौहर्यशालि नथविनसरयानं हिताशोष्ठालोक: । तेनासौ सेव्यमानस्वत-लघनटयते: षाण्मुक्तेनेबशंभु: । श्रीरामेणे व भास्वत् कुलघदशार भौम मन्मथेनेव विष्णु: । इप्त: प्रसिद्धं पृथ्वीपति विपुल यश: सोमसौमिक राह: ।

अशारितीने प्रस्तुत हस्तलिखितात मालोजीपासून भोसले कुळाची माहिती व पुढे तंजावरच्या मराठी राजांचे वर्णन केले आहे.

त्याचा नंबर ७७१, ४२६३, ११३२३ असा आहे.


काव्यम् Bundle 61 st.

B. L. No. 5018. राजवर्णनम् by श्रीनिवासः ।

D. 4234 3 to 22 Sheets.

5021 ग्रंथ ५२

श्रीगणेशाय नमः॥ आसीच्चंदावकाशप्रसृतसितयशा दक्षिणाशाविभूषा शौ
र्यश्रीकेलिसौधायितकरकमलोदग्रराजकृपाणः॥ नानादेशोपसीदद्बुधज
ननिकरस्तूयमानावदानः खंडेरावरन्ववाये त्रिभुवनमहिते श्रीवराटक्षितीशः॥१॥
सौंदर्यसिंधुरितिसारसलोचनाभिः सौजन्यभूमिरिति साधुजनावलीभिः॥
वैरस्यभूरिरिति पंडितमंडलीभिरालक्ष्यते स्म कलितावतरस्सुधीमान्॥२॥
तदन्ववाये प्रथितप्रभावः श्रीमान् ... नराधिपायः॥ औदार्यशौर्या
दिगुणैरनन्यां पुरातनक्षोणिभृतोऽस्यशेत॥३॥ त्यागोदधीचिशिबिकर्ण
ऋ मुखाः प्रतीताः शौर्येर्जुनप्रभृतयो धरणीमहेशाः॥ आसन्कृतादिषु यु
गेषु कलौ तु तेषां तेषां त्वयो धुरमगाहत पूतकीर्तिः॥४॥ तस्मादजायत
निजायतने गुणानां मा ज्ञानबोधविमलः परसोजिनामा॥ यस्य प्रतापद
हनं करबालधूमः मासो विपक्षमनुमापयतीह चित्रं॥५॥ यत्सत्य थि



शारदनीरदपारदतुषारहीरकधांशुसमवर्णो ॥

श्रीगणेशायनमः ॥ ॐ नमः सर्वकल्याणभाजनायपिनाकिने । नमो लक्ष्मी निवासाय
देवतायैगिरेनमः ॥ १ ॥ विघ्नध्वांतविनाशनोद्यतरविं विघ्नाटवीपावकं विघ्नाद्रि
नैककुलिशं विघ्नभपंचाननं । विघ्नाब्धिं विपवनतयमनर्घं विघ्नाघसंघापहं प्रारब्धप्रि
तसिद्धये हर्मानतं विघ्नेश्वरं सार्थये ॥ २ ॥ डमरुश्लकपालकृपाणिकं विलसद्
संदोहं निरवद्यगुणाकरं भक्तमनमतिदातारं शिवानंदं गुरुं भजे ॥ श्रीमज्ञानजिनाम
कल्याणमूरारासाय नमो ॥ नमो लक्ष्मीनिवासाय देवताय गिरेनमः

नायक

नेदद्दायीनंटाक:॥ [illegible] पंनिमौलिमालामाणिक्यनं [illegible] तपादपद्म:॥ प [illegible] ०
न्यंपरिमार्ष्टुकामो [illegible] मालेनामा वसुधाभिनाय:॥५॥ मध्या [illegible] गनु [illegible]
सितिप्रस्फुरत्यांस्तुत्रानपदप्रपानुजलिता [illegible] ता [illegible] भारा कुल [illegible] ॥ पांथानां निव [illegible] न [illegible]
गुहावन लिनीपनस्यपवित्रज ध्यानै:वी चिर दंवपाणिवल्लनै: श्रीमान [illegible] राक: शुभ:॥
॥६॥ येनाभूजिपदा [illegible] मीशितुरमा [illegible] नस्य [illegible] भा: [illegible] मै: स्वीयवरांगकेन नरनुप्राभप्र
हर्ष:शिव:॥ तु वेतंभति [illegible] रान्वं यपरा धासि यो जनि [illegible] भवतरंतात्यायन्रा ॥ भिया [illegible]
ल्लसेइन्द्रूतावकीसंत [illegible] ॥७॥ गौर्यणम्मान्ना न सुसंयतनरा ननो रेन [illegible] पुष्मितं पे॥ जा
तेनुश्रीलाचलमूलग्गानुसर्वापिमर्यंनवशं [illegible] विनन्ये॥८॥ पद्रागमतापावलि [illegible] प्रभमा

सुरा पुरारि [illegible] णांभातं पमर्थ प्रदं

[illegible] निजन पाजितवती कातांरत्रि [illegible] स्य तां

विलनांग:शिव:चंद्रचूड:॥ [illegible] श्रीगमनोधित्रोनस्तु [illegible] विधि:पंकजाननिर्वाणं मपंड [illegible] ॥ तस्या
रम:श्राहद्दनिर्वासद:पुत्रोमहेंद्रस्य यथाजयंत:॥ यथाकुमार:शशि [illegible] स्थलयावभवा [illegible] र. प्रथितो
कीर्ति:॥१०॥ [illegible] स्युर्मानिजगतां मान्यावदान्या [illegible] सुवसु [illegible]
मन [illegible] ॥ श्रीशाह:शितिपाल मौलिविलसन्माणि [illegible] न्यादसेरा [illegible]
श्रीमन्ना [illegible] ॥११॥ यस्यार [illegible] व [illegible] पंस [illegible] न्ना [illegible] पुरंदमरं [illegible] ॥ वादंतु
पर्णु [illegible] संघ: [illegible] मुनु [illegible] सुधामयूख [illegible] ॥ पञ्च [illegible] पूर्ण [illegible] पुगन्न [illegible]
सणं [illegible] मत्ता [illegible] मनंगजा [illegible] दद्दारा जादिजेप्या मुदा॥ [illegible] तनेद्द [illegible] नापंन्न [illegible]
म्लेच्छजलोका [illegible] ताबमू [illegible] मला:सर्वादिग्रा [illegible] ॥१३॥ यस्मिन् शासति [illegible]
[illegible] वर्णा अमी [illegible] न प्रवणा [illegible] धर्मो [illegible] ॥ [illegible] नाम [illegible]

नैवाग्निरार्क[illegible]शालभं निवृत्त[illegible]चैवारम् । किमपरं नैवापमृत्युद्भवा ॥१४॥ यस्यार्थिपृथ्वीपतिमस्तकांत
र्मल्लिघृष्टं चूर्णनजातकीर्तिं ॥ आप्तनूतवैपुत्स्यपुत्राहमरूपमहाराजपरंपरेव ॥१५॥ तस्यात्मजश्चाग्रय
इवक्षितिपतेरात्तांवरांग्या नु सुन्नीजानेन तु पारवीहित्रुमगान्नुकांविकामाहितं ॥ तत्रायाप्यमस
ल्लिवस्यजननी दिल्लीपतिहर्षिणः मान्यात्पकमहीपतेर्जनि[illegible]प्रत्यग्रकामः कृतैः ॥१६॥ उदं च्यरूप
मदसीयसुराजहास्तवोजितोर्जनपदास्थितिवासकारी ॥ नासेत्यपाः किमपरः पिसुराजराजिः किं
वानलः किमु महेंद्रसुतो जयंतः ॥१७॥ दातावनीपकजनस्य निजेप्सितानां गास्तानमस्तमुत्स्थित
दुर्जनानां ॥ आतास्वकीयपदपंकजसेवकानां धाम्नां निजेन परिपंथिजनस्य पानं [illegible] ॥१८॥ यत्कीर्ति
हंसीजगतीतलेषु विभ्रम्य विश्रांतिमृगंतुकामा ॥ स्नात्वा जलेनिम्नगायाः संसर्गतंत्रं द्रव ली
नत्वं ॥१९॥ इंगालवंशप्रभवोसुरूपांदीपाविरूपख्यात तयामुद्रह ॥ नाम्नाथ यथार्थनगुण[illegible]कीर्तिपः

श्चेकराजः प्रथितः पृथिव्यां ॥२०॥ दीपांबिकायां मदनानुरूपा दुर्गावतीजाततनयात्मभवा ॥ श्रीजन्मा
नृपः प्राभावनीपस्तथा तृतीयस्तुलजस्समाप ॥२१॥ यस्मिन्महाम्भनरवृत्यधिपे प्रतं नामाधारेणा
स्यदभक्तनः रत्नरामभद्रः ॥ तस्मिन्कुलेजनि नृपत्तम महानुभावः श्रीशाहराजइति रत्नजितकी
र्तिः ॥२२॥ प्रजावनेरंजनलब्धवर्णः स्वकीयकीर्त्याजितरत्नवर्णः ॥ माहिन्म्यविभाग [illegible]तिविरोजितपि [illegible]
६ त्पसाक्षाहन्त्यपः प्रवर्णः ॥२३॥ [illegible]गराजपदपंकजसेवाधासरसिणकृतेपरस्य ॥ ज्ञातनामनृपतः
पदपंराजमौलिमणिरंजितपादपीठ ॥२४॥ पर्वापितत्रावेश्वरकलोत्तरांमलोपिद्रः प्रा
गोर्वीशवरांगमौलिमणिमाला राजनोवत्पदः ॥ रत्नं श्रीमान् [illegible]मार्पितयश्चक्रेमहाराज प्रभुः
सर्वेनुन्ताकुरामविहितसेनास्वकीयपदं ॥२५॥ पत्नाकविलगाणि पूर्णि नमस्[illegible]नापुर्या स्वर्गं
गवाहृयहृहांगणगता रम्याकुबेरात्मजा ॥ यस्यांप्रीतिवशाद्देवावसरसा काशाद्भृतः श्रीहरिः

सर्वामौ तुल्ये [illegible] विजये [illegible] भाचंद्रतारं [illegible] ॥२६॥ [illegible] भूमिजानि जननं [illegible] आमना
रंजनचारुरीतिं ॥ अवाप्य [illegible] तमां [illegible] विराजितेर्थ्या तुल्ये [illegible] तायं ॥२७॥ वाहाः [illegible]
मानस [illegible] प्रवाहाः नागाः [illegible] मनगमतियाननागाः ॥ यस्यासते [illegible] दानिवर्गाः सोयं
नृपो विजयते तुल्य आशितीद्रः ॥२८॥ [illegible] नीतिवीता [illegible] चरणाघानसंजात [illegible]
[illegible] त्यितात्र व्रजमलिना [illegible] रावदिव [illegible] ॥ [illegible] प्रपितार [illegible] भवानदा
नालि [illegible] बालं चलं ने [illegible] रपने [illegible] सर्वदास्ते ॥३०॥ मन्वादि [illegible]
तिमुख [illegible] शिष्टाचार [illegible] व्याप्य [illegible] योजगति ॥ [illegible] पार्श्व
[illegible] सहनेः पादस्व [illegible] ततः [illegible] पातु [illegible] ॥ [illegible] जय
गुतोयं तुल्य [illegible] शुभं [illegible] राजकुमा [illegible] ॥ श्रीमान् [illegible] गुणवान् [illegible]

जनानांत्र मुदं कराजः ॥३१॥ संगीत [illegible] नयक [illegible] स्वाद्यो [illegible] नाना [illegible]
[illegible] नन्यं नमे यान्वितः ॥ शास्त्रे शास्त्र [illegible] पतनां [illegible] विचार [illegible]
जातिनि गुणवान् [illegible] जनामान्यः ॥३२॥ [illegible] कर्म [illegible]
[illegible] ॥ [illegible] मुने [illegible] यंतनो [illegible] तुल्य [illegible]
लिः ॥३३॥

वसुधराधिपतय: संग्रामसन्नाहिनो दृप्यद्धुधुकरीद्रतुंगतुरगप्रातैर्भदीप्ती
कृता ॥ कल्पांताबुदगर्जनाद्भुतिकाकुंथकरोरिद्धिभिंभाभंभाव मनु ष्टा
यस्याद्भि स कृत: कांतार नाशिश्रयत् ॥६॥ अस्तोकावककृपालाकुलबल
धकमलश्री निरासीद मुक्तारासिस्फाराति प्रमीपरिचरत्न नो द्वाम श्रीमप्रता व
मनाहृत्यामन श्रीविहरणकमलमासी धृहस्मारविंदो भूप: पुण्यैरगण्यैर्जै
नकमनुसरत्पूर्णिमावाजिनामा ॥७॥ एतस्य वर्णानिरासकारिणा वि
तैनजनमकानुवर्तिनाम हहदाद्वार थिनवकिजनस्थानमनम्बरथिनाथ
कं [illegible] ॥८॥ तस्मात्पद्मनाभ: कमलमवद्वा पयस्तससामुत्तनिजे [illegible]
मीनकेतु मनमथनरकत [illegible] प्राप्तसुभिप्रकर्ष: ॥ [illegible]
[illegible] महि मावमना बन तुल्य: श्रीवराणव [illegible] नामरतकविमवोनीर १
मावाजिनामा ॥९॥ जनाप्रपिनिरंतरमत्र मणसंक्रमो हिलरप्रमातुर


[illegible] सितनक्षत्रवरस्यमदूपते: ॥ सुधानिधिसुरापगाप्रवरनय: प्रपागारतीमुनी
निधरणी मयांप्रशिरमवसे वारिधिरातम् ॥१०॥ तस्यासीत्पुत्रो पुण्य: सुरगुरुकमिता
तत्र नाम प्रवासि: सनु: श्री [illegible] नामार्जुन इव भिधेनं धर्ममार्गानुसारी
[illegible] मोहार मानुष्यु निहू समनरुविर्णीसुरापस्यकी निदानश्रीश्री [illegible] जिनमन
तमनिधनकर्णमार्गप्रवृत्ता ॥११॥ यस्यप्रीदरपाल्लवावृ पतिकलाप्रावी [illegible]
[illegible] : श्री [illegible] नकर्णपार्श्वरनरम्भविविलासरत्नो ॥ आदापि पुनरस्त
[illegible] बुधगावीचिंता मार्जिप्रानवं श्रीसं तस्याबुनं धराधिपमाग: केपापमीगमनत ॥
तस्मादवरिवा मनूविधिहररहरय: पूर्व [illegible] प्रभावाद कदमावाल श्रीमु [illegible]
निपति शिव [illegible] नयो नामनोप ॥ तन्नस्यमोगुणो [illegible] रपिवजनननत: श्री [illegible]
[illegible] मेहे दोधारल स्यातुजम्मा शिवनृप मिरम्म देकम [illegible] तनोपि ॥१३॥
धर्मार्थकामैरवमत्तिमद्भि: सदानुरत्तनरत्ननगरमौभि: ॥ स्वतेजसाभि [illegible]

तशात्रुवर्गः सराजसिंहः पृथिवीं शशास ॥१४॥ तेष्वग्रजः शंभुमहीमहेंद्रः नेंदी
वसाक्षाच्छिवधर्मवक्ता ॥ अरातिदंतावलिदर्पहंता संतापहारी वसुधासुधारास्मृ ॥१५॥
शिवक्षमेशः शिव एव साक्षाद्दहीनसत्त्वाभरणोप्यराजत ॥ यस्यास्मिते नत्य
भवन्तरीणं नामावशेषा नगरी विशेषाः ॥१६॥ दिल्लीपुराधीशमुखावनीशाः
वीरागीव ग्रहमात्रिकः सः ॥ वरूथिनीरन्वहमेतदीया निजप्रतापज्वलने
हा ॥ अनेकदुर्गाधिपतिश्रियोसौ सामंतचूडामणिरंजितांघ्रिः ॥ चमूपतीनां
यवनावनीदास्संवतेकालनलतां प्रपेदे ॥१८॥ यमंतरा विश्य मुदा भवानी
कर्तव्यचिंता समकालमेव ॥ निवेदयंतीहितकार्यजातमन्वग्रहीत्स्कंदमिवा
तिवेलं ॥१९॥ निर्जितसर्वानवनीमहेंद्रान्नृपः ससिक्तासनमध्यरोहत् ॥
श्रि याधत्तदील्लीपतिर्तत्रालयमनन्यगं छत्रपतीतिशब्दं ॥२०॥ तस्यानुज
न्मेकधरावलारिः मुक्तामणिर्भोसलवंशजातः ॥ गुणैरशेषैर्विबुधप्र २
शास्यो रन्वर्थनामेति यमाहुरार्याः ॥२१॥ सत्येहरिश्चंद्र इमिव क्षमायां तुल्यं

रथास्यंदननंदनेन ॥ आसेदिवांसं रणरंगपद्मोजयैदिराज्यं रणुते स्मा ॥
न यी ॥२२॥ तेनाविरमैयोराज्यमखिलं धर्मेण संरक्षता पूर्वे राघवधर्मनंदन
मुखा विस्मारिता भूभुजः ॥ यस्योत्तुंगतरंगपाणिविगलद्दानोत्तुपं कीमवद्
स्थाली संभवकीर्तिकेतवलतोपग्रः सुवर्णोचलः ॥२३॥ सचोल देशां पृथु
नालिकेरश्रियं समाक्रम्य महीमहिष्याः ॥ कवेरजाकेतवहाररम्यैसाद्रानुरागो बु
भुजे महीद्रः ॥२४॥ बुद्ध्या बृहतिसमः किलतस्य मैत्री काकाजि पंडित इति प्रथितो
च भूव ॥ तद्बुद्धिमार्गधारिताखिलकार्यजालत्वर्गपुरंदर इवैष शशास ॥२५॥
तस्यैकराजस्य गुणैकनूना वापीवि धाता: कमलेव विष्णोः ॥ दाक्षायणीव
स्मरशासनस्य दीपांबिकाभूत्किलधर्मपत्नी ॥२६॥ अरुंधतीवात्मभवस्त नं
जं सीतेव रामं नलिनीव भानुं ॥ ज्योत्स्नेव चंद्रं ललनाम णिः स्तोसं प्राप्य कां
तं तमिमं व्यलासीत् ॥ तस्यामजस्रं नवनीसुधांशोश्शाहेंद्र नामा शरभाभिधानः ॥
अविप्रतीतस्तुलजाभिधश्च समानरूपाकृतिशालिनोमी ॥२८॥ ते ...

शाहमही महेंद्रो श्रीमार्जुनाख्याभिवधर्मसूनुः॥ आमुकपार्श्वे गुणैनो वधिप्यां
सहोदरा प्याभवनी प्रवाक्ति ॥२९॥ एकत्र तारावृति सुंदरस्य परत्र पार्श्वे स्फुरद
कैभासः॥ [illegible] लस्यानुकरोपि निरमी सदानृपोसौ सहसोदराभ्यां ॥३०॥ उर्व
रापरिक्षैव पुर [illegible] शारदे रिपौ वैनेर्षनंनक॥ आवरध परत्र पनिद्रवं आनं
वी सहरापशुनेशाभारै॥३१॥ अस्यासोपि भुजः प्रयाणपटहध्वाने रुदारकमेवं
[illegible] कुंभपवरत्नवनास्वर्तमौ [illegible] तिहारिरंतरेनेजपक्षेविघडमं
देरेर्ध्वं से शिथिलीकृतेन्नतिथिरो रसैधिवैधैरपि॥३२॥ गाद्यमव धैरपिद
धवञ्चे श्रवूथबंधैर्घबंधै॥ [illegible] सगैरै विधैर्हिनानिनयस्य सौ शाहमहीश
कारिः॥३३॥ [illegible] तरसकृादिनी निर्गताभिः [illegible]
षतनद्रुस [illegible] रसार [illegible] योरणीभिः॥ [illegible] मद्दलपद्दत
लन्यास्त धन्यमहीदो रालोकालोकमूर्मीधरमधिभुवनं कोध्वनी नाविं
नास्मात्॥३४॥

श्रीमलवंशावली ४



॥ श्रीशाहजी [illegible] राम [illegible] शिव भूसुरेंद्रे ॥

[illegible] लिखित [illegible]


॥ श्रीशारदा प्रसादेन [illegible] सर्व [illegible]

[illegible] ॥ २ ॥ श्रीशे [illegible]

[illegible] ॥ २ ॥

[illegible]

श्लो ७१



[illegible] रामस्य पूर्वै शिवभूसुरेन्द्रे ॥

[illegible]

ई) भोसल - वंशावळी
(वेंकट भट्ट विरचिता -)

तंजावर येथील सरस्वती महाल ग्रंथालयामध्यें वरील हस्तलिखित मिळाले. ते अतिशय महत्वाचे आहे. त्यांच्या तेथून काढून आणलेल्या मायक्रो फिल्म फोटो कॉपीजच्या झेरॉक्स शेजारी दिल्या आहेत.

भोसल - वंशावळी
श्री गणेशाय नम:

आसीदाशावकाश प्रसृतसितयशा दक्षिणाशाविभूषा
शौर्यस्त्रीकेलिसौधायित करकमलोदग्रराजत्कृपाणा: ।।
नानादेशोपसीदद् बुधजन निकरस्तुत्य मानोवदान्य:
चण्डा शौरन्वयाये त्रिभुवनमहिते श्री वराट क्षितींद्र: ।। १ ।।

सौन्दर्यसिन्धुरिति सारसलोचनाभि:
सौजन्य भूमिरिति साधुजनावलीभि:
वैदग्धभूरिरिति पंडितमंडलीभि:
आलक्ष्यतेस्म कलितावतर: सुधीमान् ।। २ ।।

तदन्ववाये प्रथितप्रभाव: । श्रीमानभूदेकनराधिपो य: ।
औदार्यशौर्यादि गुणैरवन्यां । पुरातनक्षोणिभृतोऽत्य शेत ।। ३ ।।

त्यागे दधीचिशिबिकर्णमुखा: प्रतीता:
शौर्येऽर्जुन प्रभृतयो धरणीमहेन्द्रा : ।
आसन्कृतादिषु युगेषु कलौ तु तेषाम् ।
तेषां च यो धुरमगाहतमूतकीर्ति: ।। ४ ।।

तस्मादजायत निजायतनं गुणानाम्
आजानबोधविमल: `परसो जि` नाम ।
यस्य प्रतापदहनं करवालधूम: ।
प्रायो विपक्षमनुमापयतीह चित्रम् ।। ५ ।।

यत्प्रत्यर्थिवसुन्धराधिपतय: संग्रामसन्नाहिनो
दृप्यद्गन्धकरीन्द्र तुंग तुरगाव्रातैर्मदांधीकृता: ।
कल्पान्ताम्बुद गर्जनारभटिकाकुट्टाक भेरिध्वनिं
श्रावं श्रावमनल्पसाध्वसभृत: कान्तारमाशिश्रयन् ।। ६ ।।

अस्तोका चक्रवाला कवल यशस्य त्कीर्तिरासीदमुष्मा-
दासीत्कारातिभूमीपरिवृढ दलनोद्दाम भीम प्रताप: ।
ततादुद्दानलक्ष्मी विहरण कलनासौध हस्तारविन्दो
भूप: पुण्यैरगण्यैर्जन कमनुसर` न्वीर - बाबाजि` नामा ।। ७ ।।

येन दूषण निरसनकारिणा विश्रुतेन जनकानुवर्तिना ।
इह दाशरथिनेव किंजनस्थानमन्वरचि नोपकंटकम् ।। ८ ।।

तस्मादुद्यत्प्रताप: कमलभव इवाभ्यस्तसत्यानुवृत्ति -
र्जज्ञे पाठीनकेतुप्रमथन इव प्राप्तभूम्नि प्रकाश: ।
क्ष्मालक्ष्मीसाहचर्य स्फुरद दुरुमहिमा पद्मनाभेन तुल्य: ।
प्रौढत्यागावधूतामरतरुविभवो वीर मालोजी नामा ।। ९ ।।

जगत्त्रयनिरन्तरभ्रमणसंभ्रमोदित्वर: -
रमातुरयश: सितकृद्वरस्यणङ्.पते: ।
सुधानिधीसुरापगाप्रभृतय: प्रपागारताम्
भजन्ति धरणी मणोश्चरितमस्य पारे गिराम् ।। १० ।।

तस्यासीत्पूर्णपुण्यः सुरयुवतिगणस्तूयमानप्रशस्तिः
सूनुः शाहेन्द्र नामार्जुन इव नियतं धर्ममार्गानुसारी ।
राकानीहारभानुद्युति हसनरुचिर्भासुरा यस्य कीर्ति-
दर्निश्रीश्वोज्जजभे सततमतिधरं कर्णमार्गप्रवृत्ता ॥ ११ ॥

यस्यप्रौढिरपास्तवाक्पतिकला प्राविण्यभिष्ठानिधिः
शौर्यं न्यक्कृतकर्णपार्थसमर प्रावीण्यविस्तारितम्
औदार्यं पुनरस्तवैबुधगवी चिंतामणि प्राभवम् ।
शीलं तस्य वसुन्धराधिपमणेः केनोपमीयेत तत् ॥ १२ ॥

तस्मादवैरिवासन्विधि हरहरयः पूर्वपुण्यप्रभावात्
एकस्त्रापाल शम्भुक्षितिपतिशिवभूजानयो नामतो ये ।
तत्र ज्येष्ठो गुणौधैरपि च जननतः शंभुभूमीमहेन्द्रो
धीरस्तस्यानुजन्मा शिवनृपतिरभूत् एकभूभृत् ततोऽपि ॥ १३ ॥

धर्मार्थकामैरिवमूर्तिमद्भिः सदानुवृत्तस्तनयैरमीभिः ।
स्वतेजसा निर्जितशत्रुवर्गः स राजसिंहः पृथिवीं शशास ॥ १४ ॥

तेष्वग्रजः शंभुमहीमहेन्द्रो नदादिशाक्षात्क्षिवधर्मवेत्ता ।
अरातिदंतावलिदर्पहंता संतापहारी वसुधासुधादाम् ? ॥ १५ ॥

शिवक्षमेशः शिव एव साक्षादहीन्सत्वाभरणो व्यराजत् ।
यस्य स्मिते न ह्यभवन्नराणां नामावशेषा नगरी विशेषाः ॥ १६

दिल्लीपुराधीशमुखावनीशदुर्वारगर्वग्रहमात्रिकः सः ।
वरूथिनीरन्वहमेतदीया निजप्रतापज्वलने जुहाव ॥ १७ ॥

अनेकदुर्गाधिपतिः शिवोऽसौ सामन्तचूडामणिरञ्जितांघ्रिः ।
चमूपतीनां यवनावनींदोः संवर्तकालानलतां प्रपेदे ॥ १८ ॥

यमंतराविश्य मुदा भवानी कर्तव्यचिंतासमकालमेव ।
न्निवेदयन्ती हितकार्यजातमन्वग्रहीत्स्कंद मिवातिवेलम् ॥ १९ ॥

निर्जित्य सर्वान्यवनीमहेन्द्रान् नृपः स सिंहासनमध्यरोहत् ।
योधत दिल्लीपतिचित्तशल्यमनन्यगच्छन्नृपतीतिशब्दम् ॥ २० ॥

तस्यानुजन्मैक धराव्दलारिः मुक्तामणिर्भौंशल वंशजातः ।
गुणैरशेषैः विबुधप्रशस्तैरन्वर्थनामेति यमाहुरार्याः ॥ २१ ॥

सत्ये हरिश्चन्द्रमिव समार्या तुल्यं दशस्यन्दननन्दनेन
आसे दिवांसं रणरङ्गभूमौ जयेंदिरा यं वृणुते स्म नित्यम् ॥ २२ ॥

तेनोवर्मिणोन राज्यमखिलं धर्मेण संरक्षाता
पूर्वे राघवधर्मनन्दनमुखा विस्मारिता भूभुजः ।

यस्योत्तुंगतुरंगपाणिविगलद्दानांबुपंकीभवत्
क्षोणिसंभवकीर्तिकैतकलतापद्मः सुवर्णाकरः ॥ २३ ॥

स चोलदेशं पृथुनालिकेरश्रियं समाक्रम्य महीमहिष्याः ।
कावेरजाकैतवहाररम्यं सान्द्रानुरागं बुभुजे महीन्द्रः ॥ २४ ॥

बुध्द्या बृहस्पतिसमः किल तस्य मन्त्री
काकाजि पंडित इति प्रथितो बभूव ।
तद् बुध्दिमार्गधुरिता खिलकार्यजातः
स्वर्गं पुरन्दर इवैष शशास पृथ्वीम् ॥ २५ ॥

तस्यैकराजस्य गुणैरनूना वाणीं विधातुः कमलेव विष्णोः ।
दाक्षायणीव स्मरशासनस्य दीपांबिका ऽभूत्किल धर्मपत्नी ॥ २६ ॥

अरुंधतीवात्मभुवस्तनूजं सीतेव रामं नलिनीव भानुम् ।
ज्योत्स्नेव चन्द्रं ललनामणिः सा संप्राप्य कान्तं तमियं व्यलासीत् ॥ २७ ॥

तस्यामभूवन्नवनीसुधांशोः शाहेन्द्रनामा शरभाभिधानः ।
भुवि प्रतीतस्तुकुजाभिधश्च समानरूपाकृति शालिनो भी ॥ २८ ॥

तेष्वग्रजः शाहमहीमहेन्द्रो भीमार्जुनाभ्यामिव धर्मसूनुः ।
अमुव्रताभ्यां गुणशेवधिभ्यां सहोदराभ्यामवनीं प्रशास्ति ॥ २९ ॥

एकत्रतारापतिसुन्दरस्य परत्र पार्श्वे स्फुरदर्कभासः ।
हेमज्वलस्त्वानुकरोति लक्ष्मीं सदा नृपोऽसौ सह सोदराभ्याम् ॥ ३० ॥

उर्वरां परिचितेव पारदैः शारदैरिव घनैर्घनं नभः ।
आवरत्यपरमप्यनिह्नवं जान्हवीसदृशयद्यशोभरैः ॥ ३१ ॥

अस्य क्षोणिभुजः प्रयाणपटहध्वानैरुदारक्रमैः
वैरिस्त्रीकुचकुंभपत्ररचना संवर्तमौहूर्तिकैः ॥
आक्रांते हरिदन्तरे किजघटे विध्यंडभांडोदरे-
र्ध्वसे शिथिलीकृतोन्नतिधराभृत्संधिबन्धैरपि ॥ ३२ ॥

गद्यप्रबन्धैरपि पद्यबन्धैश्चंपूप्रबन्धैरपि हृद्यबन्धैः ।
शास्त्रप्रसंगौर्विविधैर्दिनानि नयत्यसौ साहमहीवलारिः ॥ ३३ ॥

हृद्ये सारस्वताध्वन्यन्वर तरस-हादिनी निर्गताभिः ।
शृंगारोत्कृष्टतद्धसम्यविसरत्सारणीधोरणीभिः ।
व्यासे वैरिंक्वामामृदुलपदतलन्यासधन्ये महीन्दो- ।
रालोक्लोकभूमीधरमधिभुवनं कोऽ ध्वनीनो विनास्त्वात् ।। ३४ ।।

श्रीशाहजी भूपत्रिंशवर्णना रामस्य पूर्वैरिव भूसुरेन्द्रैः ।।
गंगाधरार्यैर्विहिता स्वबुद्धिः रामेणा सेयं लिखिता त्वदाज्ञया ।। १ ।।

कोष्टक - १

श्री	तः	व	रा	र	ण	रं	स्य
सु	ष्टु	शा	ति	तु	ते	दा	द्रे
ग	न	स	स	म	सा	भ्रा	गी
वै	द्म	वे	दे	स्वो	य	चं	प्र
प्र	चं	य	स्वो	दे	वे	द्म	वै
गी	भ्रा	सा	म	स	स	न	ग
द्रे	दा	ते	मु	ति	शा	ष्टु	सु
स्य	रं	णा	र	रा	व	तः	श्री

श्री शारदाप्रसादेन चतुरंगीयसद्मसु ।
सर्वैष्टु रामचंद्रेणा भ्राम्यतेऽ स्वोऽ त्विवेगतः ।। २ ।।
श्रीवैप्रसगणातेचं सायतः सदाम तुभ्रा (सदामतुभ्रा ।)
ष्टुशादेवेप्रम्यद्रेस्वो नतिगीर सुचरारं ।। ३ ।।

अत्र तृतीयस्य पद्मस्य प्रथम द्वितीय तृतीय चतुर्थ पादा: प्रथम द्वितीय तृतीय चतुर्थ पंक्तिषु चतुरंगीया सु यथाक्रमंलेख्या: । तथाष्टमपंक्तिमारम्य पंचमान्तमपसव्येन लेख्या: एवं च चतु: षष्टि ग्रहा: परिपूर्णा भवन्ति । ततश्च श्रीशारदा प्रसादेनेति द्वितीयं पद्यं उच्यार्थ प्रथम: श्रीवर्णो यत्र तत्राश्व: स्थापनीय: तदुत्तरं शारदादयो यत्र वर्णा वर्तते तत्र क्रमेणाश्वश्वालनीय: एवं प्रकारेणो पद्यं आवर्तितं चेदश्वश्चतु: षष्टि ग्रहेष्वपि गच्छति । यथा उपरिलिखितं ++ नैनं द्रष्टव्यं । इदं श्रीमल्लक्ष्मी ++ सकोल्लपुरी-करींगिडिंवकटभट्टसुरि ++++ पद्यम् ।। २ ।।

का. ६१

कोष्टक - २

१	३२	९	२०	३	२४	११	२६
१६	१९	२	२९	१०	२७	४	२३
३१	८	१७	१४	२१	६	२५	१२
१८	१५	३०	७	२८	१३	२२	५
५	२२	१३	२८	७	३०	१५	१८
१२	२५	६	२१	१४	१७	८	३१
२३	४	२७	१०	२९	२	१९	१६
२६	११	२४	३	२०	९	३२	१

वरील श्लोक को.नं.१ मध्ये आहे. पण तो बुद्धीबळाच्या डावातील घोड्याच्या गतीप्रमाणे म्हणजे कसा वाचावयाचा हे को.नं. २ वरून कळते. मूळ प्रतीत जशा क्रमाने (श्लो.२) तो लिहून अश्वगतीप्रमाणे वाचावा म्हणून

लिहिले आहे. त्या क्रमाने तो संपूर्ण वाचता येत नाही. मुळांतही त्या अक्षरक्रमाबद्दल संशय दाखविलेला आहेच.

प) तंजावर येथील हस्तलिखित संस्कृत
ग्रंथातून घडणारे शिवदर्शन :

हा मूळ इंग्रजी लेख पं.एन. विद्यानाथ शास्त्री, साहित्य शिरोमणी यांनी लिहिलेला असून अतिशय महत्वाचा व दुर्मिळ लेख आहे व तो तंजावर येथे असलेल्या हस्तलिखित साहित्यावर आधारलेला आहे.

कलिकल्मषापहारीणि हारीणि जनचेतसाम्
यशांसि शिवराजस्य श्रोतव्यानि मनीषिभिः ।।
शिवभारत अध्याय १, श्लोक-२३

छ. शिवाजी जो मराठा साम्राज्याचा संस्थापक होता. त्याच्या जीवनाबद्दलच्या ऐतिहासिक वास्तवतेस प्राधान्य किंवा मूल्य देणे हे त्या काळात अगदी अशक्य होते. त्या काळात भारतीयांची ग्रँड डफ व इतर पाश्चिमात्यांच्या लिखाणावर अंधश्रध्दा होती. पण या इतिहासकारांचा महत्वाचा उद्देश तोटक्या माहितीवर संपूर्ण इतिहास लिहिणे, जिथे माहिती नसेल तिथे तर्काने काम चालविणे व संधी मिळेल तिथे भारतीय राज्यकर्ते कसे असंस्कृत होते व त्यांची सत्ता कशी चुकीची होती हे दाखविणे हाच होता. पण आता हे दिवस निघून गेलेत. पुष्कळ सखोल अभ्यासक संशोधनाच्या क्षेत्रात उतरले असून त्यांनी शिवाजीबद्दलच्या अज्ञात वास्तवतेवर प्रकाश टाकला आहे आणि परिणामतः पूर्वीच्या या चुकीच्या गोष्टी खोडून काढल्या आहेत.

या लेखांत प्रामुख्याने स्पष्ट करावयाची गोष्ट म्हणजे शिवाजी व त्याचे वंशज यांची वैशिष्टये व जीवनाबद्दलचे काही वाङ्.मयीन पुरावे उद्धृत करणे होय. हे पुरावे तंजावरच्या प्रसिध्द सरस्वती महाल ग्रंथालयात संग्रहित केलेल्या हस्तलिखितामधून ज्यांचा संग्रह येथील मराठा राज्यकर्त्यांनी अविरत प्रयत्न करून केला आहे त्यातून घेतले आहेत.

शिवाजी हा भोसले घराण्यातील वंशज असे म्हटले जाते. भोसले हा प्राकृतिक (बहुतेक महाराष्ट्रीय) शब्द आहे. ` भास्वतकुल ` या शब्दाचा अर्थ ` विद्वान जमात ` असा होतो. खालील संदर्भ ही गोष्ट सिध्द करते.

अभूयतेक्ष्वाकु भगीरथश्री
रामादिभिर्यत्र यशोधुरीणै:
आहुस्तदेवाक्षर मङ्.भैदै:
भास्वत्कुलं भोसल नामधेयम् ।
शाहेन्द्रविलासम् सर्ग १, श्लोक क्र.६.

भास्वद्वंशो भोसलाख्यो जगत्या
मस्ति क्षीरोदन्वत स्तुत्यधर्मा
यस्योद्भूतानम्दुतान्वीक्ष्य देवा:
न श्लाघन्ते नाकलोकाधिवासम् ।।
संगीत - सारामृतम् - पृ. १ व पं.३-४

` कलौ वर्णद्वयं स्मृतम् ` व ` नन्दान्तं क्षत्रिय कुलं ` हे स्मृतीतील श्लोक असे दर्शवितात की, सध्या क्षत्रिय वर्णाचे अस्तित्व संपूर्ण नष्ट झाले नाही. क्षत्रियधर्मानुसार शिवाजीचे कौशिक गोत्र व आश्वालयन सूत्र आहे. याकरिता खालील संदर्भ पाहावा.

श्रीमान् कौशिकगोत्रजश्च सुयशा जित्वा भवान्या वरात्
आप्रालेयनगां त्रिसागरतटां तं चक्रवाडं भुवः ॥
दधे यो यवनद्विपेषु हरितां राजन्यवंशाग्रणी:
आसीच्छत्रपतिः स्वयावक्वयस्वद्धं: शिवाजिनृप: ॥

साहित्य मंजूषा पृ. १, श्लो. १

कौशिकगोत्रोत्पन्नस्य आर्द्रानक्षत्रे मिथुनराशौ जातस्य
शरभेन्द्रभूपालना -
मधेयस्य कुाराशिकस्य नगरस्य च द्वादशस्थानशान्तिदोषा-
परिहारार्थं ॥

शनैश्चरशान्ति पृ. १, पं.२-३

असे म्हटले जाते की, शिवाजीचे पूर्वज पूर्वी सौराष्ट्र देशातील सोमनाथ क्षेत्रांत राहात असत व नंतर तेथून शिवगिरी येथे स्थायिक झाले. पुढील उतारे असे दाखवितात की, ते शिवाचे कट्टर भक्त होते.

सौराष्ट्रे पुण्यदेशे नृपतिरभवत्कोपि विख्यातकीर्तिः ।
सोपि श्रीसूर्यवंशाभरण मणिरभूत् सोमनाथैकभक्तः ॥ ३० ॥

संगीतमकरन्दम् पृ. ७१ व पृ. ९

ततो भोसलवंशस्य स श्रीमानादि पुरुषः ।
मुन्निवृत्या सांबशिवं समाराधयद्व्ययम् ॥

-प्रपंचसारामृतम्, बाबाजी-वंशावली-
वर्णनाध्याय श्लो. ३०

वैराग्येण विहाय राज्यमखिलं यातो दिगन्तान्तरम्
नो तत्याज महेश्वरस्य भजनं संसारसारं तु यत् ।
इत्थं भूमिपतिश्चकार वसतिं यस्मिन् गिरीशो गिरौ
कारुण्यैकनिकेतनो विधृतवान्भिल्लाकृतिं सुन्दरम् ।।

संगीतमकरन्दम् पृ. ७२, पं.८-१०

या वंशात प्रस्तुत कलियुगामध्ये शंभुपर्वतप्रदेशी श्रीमहाराष्ट्र-देशाधिपति शौर्यौदार्यगुणप्रख्यात राजा शंभू म्हणून अवतरला...... । त्या सरिसे शंभू पर्वतावरी श्रीसांबशिवप्रसादार्थ अनुष्ठानही करीत आला ।।

तंजावरचा शिलालेख पृ.१,
श्रीमन्द्भोसलवंशचरित्र, पृ.१.

शिवगिरी परिसरातील छोटया देशाचा राजा मालोजी हा शिवाजीचा अजोबा होता व भोसले घराण्यातील प्रमुख व्यक्ती होता. रणांगणावर एक शूर योध्दा म्हणून तो चमकला व ' वीर मालोजी ' असे ओळखला गेला. त्याच्या कुटुंबाची देवता शंकर याचा तो कट्टर उपासक होता व त्याने शिवगिरी येथे मोठा तलाव खणाला.

रामादिनामान्तरतां प्रपन्नैः मालोजिराजादिभिरोघ वंशः ।
कामप्युदारं गमितः प्रकर्षं कल्पद्रुमाद्यैरिव दुग्धसिन्धुः ।।

शाहेन्द्रविलासम्,स.१,श्लो.७

मालोजिक्षितिपाल मौलिरभवत् तत्रेमदानोदकैः
सिक्ताभिस्तवमूत्थरेणुभिरभि व्याप्ताभिरप्रस्थले ।
सक्ता कर्दमिते विभान्त्युडुगणव्याजेन यत्सैनिकम्
व्याविध्दाहितकुंभिकुंभगलिता मुक्तामणिश्रेणयः ।।

संगीतसारामृतम्, [illegible]

तस्यात्मजो मल्ल इति क्षितीश: परोऽप्यविठ्ठलभूमिपाल:
ईशावतारश्च परो मुरारे वंशावतारा विव भूमिपालौ ।।

संगीतमकरन्दम् पृ. ७२, पं. ३-४

तत्रापि शंभुर्निजभक्तलोभात्कैलासवासं मनुते महेश: ।
तस्मिन् स्थले सूर्यकुलावतंसो मालोजिनामा कृतवान् तटाकम् ।।

संगीतमकरन्दम् पृ. ७३, पं. ४-६

विविध ठिकाणी त्याचा उल्लेख मालोजी, मालू, मालवर्मा, मल्लारी असा आहे. मराठ्यांमध्ये रूढ असलेले मल्लारी हेच त्याचे योग्य नांव होते. इतर त्या नावाची अपभ्रष्ट रूपे होत.

इ.स. १६०९ मध्यें मालोजी व त्याची पत्नी उमा त्यांच्यापोटी शहाजी पुत्र जन्मला. त्याचे वडील मृत्यू पावताच लहानपणी तो गादीवर बसला. विठोजी हा त्याचा पालक होता.

तदनन्तरों शाहजी राजे निजामशाहाचे अनुमतीनें आपले स्वराज्यपदास शालिवाहन शके १६४३ (इ.स. १६२१) तख्तनिशी जाह्ले ।।

तंजावरचा शिलालेख पृ. ६
श्रीमन्द्भोसल्वंश चरित्र - पृ.७, पं.५-७

जीवनाच्या सुरूवातीच्या काळातच त्याने ` मराठ्यांचा महान योध्दा ` असे नाव कमावले. दिल्लीच्या सुलतानाला मदत केल्यावर त्याने त्याची परतफेड म्हणून आनंदाने त्याला पांढरे रेशमी छत्र, झेंडा व इतर खानदानी गोष्टी बहाल केल्या. हे खालील उता-यावरून स्पष्ट होते.

मालोजिभूभर्तुरभूद्विशेषमान्यस्तनूजो भुवि शाहभूपः ।
निधिर्गुणानां निजकीर्तिकान्ताविहारसीमायितवैजयन्तः ॥
शाहेन्द्रविलासम्, स.१, श्लो. ११

तस्यासीत् पूर्णपुण्यस्सुरयुवतिगणस्तूयमानप्रशास्तिः ।
सूनुः शाहेन्द्रनामार्जुन इव नियतो धर्ममार्गानुसारी ॥
भोसलवंशावलिः

विततविमलकीर्तिर्मन्मथाकारमूर्तिः
परकरिहरिरूपः शाहनामा महीशः ।
व्यरचि तदभिधानाद् ग्रन्थ एषो विशेषात्
स जयति मकरन्दः वाक्संगीतपूर्वः ॥
संगीतमकरन्दम् पृ. ७४, पं.१-२

ख्यातस्स नामाभिरमान्वयी यो महीपतेश्शाहजिनामधेयः
प्रतापभाजां प्रथमं यमाहुः ज्योतिष्मतां भानुमिव प्रशस्तम् ॥
यदीय साचिव्यसमेधित श्रीः
दिल्लीपतिर्भूरि कुतूहलेन
प्रायच्छदन्यच्छ सितातपत्र-
ध्वजादिनानाबिरुदाङ्कलक्ष्मीम् ॥ २ ॥
राघवचरितम् स.१, श्लोक २,३

अलि आदिलशहाच्या दरबारात काम करीत असताना शहाजीवर राज्याची धुरा सांभाळण्याची जबाबदारी त्याने टाकली. त्यामुळे हा विजापूरचा सुलतान काळजी व त्रासातून मुक्त झाला.

महासेनश्शंभोरिव कलशसिन्धोरिव शशी
कुमारस्तस्यासीत् सहजिनृपनामा गुणनिधिः ।
धुरो भारं यस्मिन्निखिलमपि विन्यस्य यवन-
क्षमाधीशः क्लेशं विजयपुरनेता स विजहौ ॥
संगीतसारामृतम् पृ.२ पं.७, पं.१-२

रणांगणावर त्याचे शौर्य पाहिलेल्या लोकांना तो देवचा अंशावतार किंवा देवसेनापती वाटे. संकटकाली शंकर त्याचे रक्षण करी, असे म्हटले जाते.

उमेति नाम्ना किल धर्मपत्नी मल्लारिराजस्य सुतावसूत ।
षडाननश्शाहमहीपनामा परश्शरञ्जीति गजाननोऽसौ ॥
पृ.७३, पं.४-५

कलौ युगे षण्मुखतां विहाय षाड्गुण्यमास्थैकृतं विधाया ।
जानामि दण्डायुधकैतवेन तच्छाहभूपाल विलोकितं ते ॥
पृ.७३, पं.८-१०

श्रीशाम्भुर्देव देवस्सहभवति सहादेवनामासि सत्वं ।
ये दुष्टाः कौरवास्ते क्व निशितशरैर्नाश मेष्यन्ति सद्यः ॥
संगीतमकरन्दम् पृ. ७४ पं. ५-६

स्वतः सज्ञान असल्यामुळे शहाजीने त्याच्या दरबारात अनेक विद्वान पंडितांना राजाश्रय दिला होता. 'पर्णालपर्वतग्रहणाख्यानम्' चा लेखक, कवी जयरामाने त्यांच्या ग्रंथात हा ग्रंथ शहाजीस आवडला असल्याचा उल्लेख केला आहे.

महाराजाधिराजोपि शृण्वन तुष्टो भवत् पुरा -
पर्णालयपर्वतग्रहणाख्यानम् अ.१, श्लो.२१

संगीत मकरंदचा लेखक देव हा पण त्याच्या राजकवीपैकी एक होता. शहाजीच्या वंशजाची संगीताची आवड ही वंशपरंपरागत होती व शहाजी हा त्याला प्रथम कारणीभूत झाला.

शहाजीला अनेक बायका होत्या त्यापैकी जिजाबाई व तुकाबाई या प्रमुख होत.

पतिं तमेनं प्रमदामनोज्ञं मोहादवृण्वन्महिला हि बह्वः ।
महौजसस्तासु च तस्य जाताः सुतास्सुवीरास्सुगुणाभिरामाः ।
राघवचरितम् स.१, श्लोक ४

विभाग - २

शहाजीच्या पहिल्या पत्नीस जिजाबाईस शके १५५१ च्या फाल्गुन शुक्ल कृष्णतृतीयेस (इ.स. १९-२-१६३०) शिवाजी, प्रसिध्द राष्ट्रीय नेता असलेला पुत्र झाला.

शांभाजिराजश्च शिवाजीराजो जीजांबिकायां तनयावभूताम्
तुक्कांबिकायां सुत एकभूपः तस्य त्रिभिस्तैर्मुदितो मनोऽभूत ।।
शाहेन्द्रविलासम् स.१, श्लोक २७

मूबाणप्राणचन्द्राब्दै (१५५१) स्सम्मिते शालिवाहने
शके संवत्सरे शुक्ले प्रवृत्ते चोत्तरायणे ।।
शशिरर्तौ वर्तमाने प्रशस्ते मासि फाल्गुने
कृष्णपक्षे तृतीयायां निश्चि लग्न सुशोभने ।।
शिवभारत अ.६, श्लोक २६-२७

कुलदैवत शंकराचे स्थान असलेल्या शिवगिरीवर त्याचा जन्म झाल्याने त्याला शिवाजी हे नांव दिले.

यता श्शिवगिरेर्मूर्ध्नि जातस्स पुरुषोत्तमः ।
ततः प्रसिध्दो लोकेऽस्य शिव इत्यभिधाऽभवत ।।
शिवभारत, अ.६, श्लोक ६३

याचा उच्चार शिवाजी करावा कारण ` शिव ` हे शंकराचे नांव व ` जी ` हा आदरार्थी प्रत्यय होय.

पण सामान्यपणे ` शिवाजी ` असा नांवाचा उल्लेख झाल्याने अभ्यासकांनी वेगवेगळ्या प्रकारे त्याचे विश्लेषण केले आहे.

" शिवं आजौ यस्य," " शिवा आजिः यस्य," " आजौ शिवः " जो युध्दांत सतत यशस्वी होतो किंवा जो धर्मानुसार लढतो किंवा जो शंकराप्रमाणे रणांगणावर चमकतो. वरीलपैकी कोणतेही विश्लेषण त्याला उचित आहे. इ.स. १६७४ मध्ये बनारसच्या प्रसिध्द ब्राह्मणाने-गागाभट्टाने जुन्या भारतीय रीतीनुसार शिवाजीचा राज्याभिषेक केला. दक्षिण पठाराचा तो राज्यकर्ता झाला.

आनन्देपि च (जेष्ठ १) शुक्लमदनाहे प्राण्य काशीस्थितात् ।
गागाभट्टत आप्लवं नृपपदे प्रावर्तयत् स्वं शकम् ।। २ ।।

साहित्य मंजूषा पृ. १, पं.४-७

युगे युगेऽवतार्योर्वी तेन तेन किलात्मना ।
अनुगृह्णाति यो देवो निगृह्णाति च दानवान् ।। २६ ।।

स एवायं महावीर: पर्वतानामधीश्वर: ।
दाक्षिणात्यो महाराज: शाहराजात्मज: शिव: ।। २७ ।।

(Cf. दिवे अ.१, श्लो.२४)

अधारि किल हस्ताग्रे गोवर्धनागिरि: पुरा ।
इदानीन्तु वतानेन धृतास्सर्वे महीधरा: ।। २८ ।।

शिवभारत पृ. ३ पं.१-५ अ.१ श्लो.२६

शिवाजी शंकराचा एवढा गाढा भक्त होता की, त्याच्या सर्व अनुयायांनी तोच दृष्टिकोन स्विकारला. तो शंकर व विष्णूचा अवतार समजला जातो. अर्थात उच्च शक्ती असलेला तो सामान्य माणूस नाहीच. ज्यांनी शिवाजीच्या ख-या इतिहासाचा अभ्यास केलाआहे. ते विधान न्याय्य मानतात व असा निष्कर्ष काढतात की, तो दैवी सामर्थ्य प्राप्त झालेला अंशावतार होता.

हर्ता धरित्रीभारस्य संहर्ता प्रतिभूभृताम् ।
मम्दक्त (शिवभक्त:) एष सर्वेषामण्यधृष्यो भविष्यति ।।

शिवभारत अ.१०, श्लोक १७.

मोठे अत्यन्त तेजी मिळूनि सहजी मारितो देशमौजी द्रव्ये नेऊनि गाजी प्रणमुनि गुरूजी जो महादेव पूजी । ब्रह्मा ज्याते न्वाजी हरचरणरजी जो सदा चित्त योजी । तो हा आला शिवाजी भुवन गजभजी मोगला देत बाजी ।। ३ ।।

Praise of Shivaji of Panhalgad

शिवक्षमेशाश्शिव एव साक्षात् अहीनसत्वाभरणो व्यराजत् ।
अस्य स्मितेत ह्यभवन्नराणां नामावशेषा नगरीविशेषा: ।।१२ ।।

भोसलवंशावलि: पृ.२ पं.५-७

मनीषिण ऊचु: ।

हर्तुं वसुन्धराभारं धर्तुं धर्मं सनातनम् ।
संहर्तुं यवनान्सर्वान्कर्तुं कर्मातिमानुषम् ।। १ ।।

जागर्ति ह्यवतारोयं साक्षाद्भगवतो हरे: ।
शिवराजस्वरूपेण श्रीमान् भृगुकुलान्वये ।। १२ ।।

शिवभारत पृ. २ आणि
अ.१, श्लो. ११-१२

कवीन्द्र उवाच

कदाचिदात्मनात्मानं पश्यन्तं मां समाधिना ।
स्तिमिताक्षं जगत्साक्षी भगवान्भूतभावन: ।। ३५ ।

सुप्रसन्नानन: श्रीमान्पुण्डरीक विलोचन: ।
शिवराजस्य रूपेण निजं रूपमदर्शयत् ।। ३६ ।।

शिवभारत पृ.४ व पं.५-७
अ. १ श्लोक ३५-३६

शंकराएवढीच भवानीवर शिवाजीची तेवढीच भक्ती होती. दुर्गा ही त्यांची कुलदेवता होती व अजूनही या भागात तिची त्यांच्या वंशजाकडून पूजा केली जाते. ही राजराजेश्वरी देवता हीच क्षत्रियांनी उपासना करण्यास योग्य देवता होय. दुर्गा त्याचे मातेप्रमाणे रक्षण करी. त्याच्या देहात संकटकाली प्रवेश करून त्याला मदत करी. जेव्हा तो पुढील योजनांचा विचार करी, तेव्हा ती त्याला मार्गदर्शन करी.

विष्णु: श्रीमद्भोसलवंशोयं नेतररस्तु ममैव स: ।।
सूर्यनारायणस्त्वात्र श्रीमान वंशो महाद्युति: ।। २६ ।।

श्रीमान शंभुर्महादेव: सर्वानन्द प्रदायक: ।
भवानी चण्डमुण्डादिमहिषासुर मर्दिनी ।। २७ ।।

कुलदैवतमेतस्य वंशस्य समुदीरितम् ।।
प्रपंचसारामृतम्, बाबाजी-वंशावली वर्णनाध्याय, श्लो. २६-२८

इयं भगवती देवी गिरिजा भक्तवत्सला ।
समये समयेऽभ्येत्य नमिमं पालयिष्यति ।।
भगवत्या: प्रसादेन महाप्राणो महाभुज: ।
सोऽवेक्षते जगत्कृत्स्नं न सहायमवेक्षते ।।

शिवभारत, अ. १०, श्लोक १६,
अ. २६, श्लोक १९.

यमन्तराविश्य मुदा भवानी कर्तव्यचिन्तासमकालमेव ।
न्यवेदयन्ती हितकार्यजातं अन्वग्रहीत्स्कन्दमिवाम्बिकेलम् ।। १९ ।।
भोसलवंशावलि: ।

अहिंदूपासून हिंदूधर्माचे रक्षण करणे हेच शिवाजीचे मुख्य ध्येय होते. हिंदूधर्माचा उच्छेद करणे व हिंदूपैकी पुष्कळांना बाटविणे हेच मुसलमान राज्यकर्त्यांचे मुख्य कार्य होते. शिवाजीने जर त्यांना प्रतिकार केला नसता तर हिंदूधर्म संपूर्ण नष्ट झाला असता. मारीच जसा ' राम ' शब्दातील ' रा ' हे पहिले अक्षर कानावर पडताच घाबरत होता त्याप्रमाणे शिवाजीमधील पहिले ' शि ' हे अक्षर ऐकताच दिल्लीचा बादशहा गडबडत होता.

शृणु तावन्महाराज श्रीशिवस्याप्रजस्य ते
कल्किनो निष्कलंकस्य तुरुष्कवरमर्दनम् ।
प्रोच्यते भावि यच्चास्मै तदिदानीं निरूप्यते ।। १९ ।।

पर्णालपर्वतग्रहणाख्यानम्, अध्याय-१

करिष्यत्येष बलवानिह कर्मातिमानुषम् ।
म्लेच्छान्निहत्य महतीं कीर्तिं विस्तारयिष्यति ।।

अ. ६ श्लो. ६४

बत दिल्लीपतेर्मूर्ध्नि प्रतापेन तमन्त्ययम् ।
निर्जवरणमाधाय जगदाज्ञापयिष्यति ।।

अ. ६, श्लो. ६८

वर्धमानः क्रमेणैव त्वत्पुत्रोऽयमुरुक्रमः ।
समाक्रम्यावनीं सर्वां यवनान्निहनिष्यति ।।

अ. १०, श्लो. १५

शिवभारत.

श्री भगवान उवाच

वैद्यकेशिमुखाश्चान्ये दनोः पुत्रास्सहस्त्रशः ।
रौद्रदारस्सर्वधर्माणामधर्मांश्च प्रवर्तकाः ॥ ४५ ॥
मयैव निहताः पूर्वमवतार्य तदा तदा ॥
. . . . ॥ ४६ ॥
इदानीमपि दैत्यानां वधाय यवनात्मनाम्
वसुधामवतीर्णोऽस्मि तनुमादाय मानुषीम् ॥ ४७ ॥

शिवभारत पृ. ५ व पं. १-५
अ. १, श्लो. ४५-४७

शिवाजीराजोऽथ विभुर्यशस्वी
प्रागल्भ्यमत्युन्नत मालम्बे ।
चण्डैर्भुजादण्डमहः प्रकाण्डैः
विखण्डयन् यावनमण्डलानि ॥

शाहेन्द्रविलासम् स. १, श्लोक २२

महिष्यां जीजायामभवदनघस्तस्य नृपतेः
कुमारः शम्भोजिः क्षितिविदितमाहात्म्यजनिभूः ।
शिवोज (शिवाजी) स्तद्भ्राता स्वयमपि चन्द्रासनगतो
द्विषान्दिल्लीशं यो यवनकुलविश्वं समकरोत् ॥

संगीतसारामृतम्, पृ. १ पं. १-४



तंजावरच्या सरस्वती महाल ग्रंथालयातील एका पोथीच्या मुखपृष्ठावर रेखाटलेले शिव–समर्थांचे दुर्मिळ चित्र.
(रेखाटन इ. स. १८२०) पण जुन्या चित्रांवरून पाहूनच ही चित्रे रेखाटलेली दिसतात.

अधिकतरदयावान्दीर्घकालं निमग्नं
सुतमिव तुहिनाद्रेस्सान्त्वयन् भीतमूर्वीम् ।
शिवधरणिमहेन्द्रस्तं पनालाख्यमेवं
यवनजलधिमध्यादुज्ज्वकैरुज्जहार ॥

पर्णालपर्वतग्रहणाख्यानम् अ.१ श्लो.५२

नाजूक जागा गड हा पनाला
शंभुने केला तुमचा हवाला
आणूनिया चंपकपुष्पमाला
पूजा करावी शंभुशिवाला ॥ १ ॥

स्वर्गी देव भिती कपाट रिघती मेरु गुहा सेविती
पाताळी वसती वनीं दवडती हे दानवांची स्थिती ।
स्वप्नी हे स्मरती सचिन्त उठती आला शिवाजी कृती
जैसे भूमिपती समस्त पळती उद्विग्न दिल्लीपती ॥ २ ॥

Praise of Sivaji of Panal ghad
Page 117, LI-I-II Subject 17.

रामदासांच्या ` आत्माराम ` पुस्तकाच्या मुखपृष्ठावर शिवाजीचे एक चित्र सापडले आहे आणि त्यावरून हे स्पष्ट होते की, रामदास हे शिवाजीचे केवळ आध्यात्मिक गुरू होते, असे नव्हे तर ते राजकीय गुरूसुध्दा होते. मोरोपंतांच्या एका श्लोकावरून शिवाजी व रामदास यांच्या संबंधावर प्रकाश पडतो.

मान्य शिवाजी राजा न म्हणो मी यासि साधु काय निका ।
तन्महिमा नत सुजना न कळे मूढा जनासि आधुनिका ॥ १ ॥

लाजविलें शिवराजे धनदा वन्दास दान-वारीनें
वा गुरुदास्य जमावें वानावे सतत दानवारीनें ॥ २ ॥

मोरोपंत पृ.६ पं. -६-१०

शिवाजीकडे तो केवळ राजा या दृष्टीने पाहू नये, तर तो इतर श्रेष्ठ साधुंच्या पंक्तीतला श्रेष्ठ साधु होता. आजकालच्या सर्वसामान्य लोकांना शिवाजीच्या अलौकिक मोठेपणाची कल्पना निश्चितच करता येत नाही. ते केवळ त्याला मोठा मानतात, त्याच्या साधुत्व या कार्याचे महत्व ते डोळ्याआड करतात.

कुबेरालासुध्दां लाजवेल एवढे दातृत्व त्याच्याजवळ होते. त्याच्या हाताखालच्या लोकांना दिलेले दान पाहून कुबेरालासुध्दा लाज वाटेल, त्याला मर्यादा नव्हती. असुरांचा शत्रु असलेल्या कृष्णाने गुरुसाठी जे आत्मसमर्पण केले, ते सुध्दा शिवाजीच्या तुलनेने कमीच आहे. शिवाजी आपल्या सहकाऱ्याबद्दल जसा उदार होता तितकाच त्याच्या मनांत गुरुबद्दल आदर होता. श्री. शास्त्रींच्या मतानुसार वरील काव्यात आलेला ` गुरु ` हा शब्द रामदासांबद्दल आहे असे दिसते. रामदास हे रामाचे भक्त होते, शिवाजी हा शिवाचा भक्त होता. हे वेगळेपण त्यांच्यात असूनसुध्दा त्यांचे एकमेकांशी अतुट नाते होते. म्हणून त्यांच्यात कधीही मतभिन्नता निर्माण झाली नाही.

कवी आणि विद्वान, जसे कवीन्द्र, परमानंद, जयराम, रघुनाथ पंडित व गागाभट्ट हे आणि यासारख्या विद्वानांना जसा त्याच्या वडिलांनी राजाश्रय दिला होता, त्याप्रमाणें शिवाजीच्या दरबारात राजाश्रय होता पुढील कवितांवरून हे स्पष्ट होते.

यानि यानि चरित्राणि विहितानि मया भुवि ।
विधीयते च सुमते तानि सर्वाणि वर्णय ।।

शिवभारत अ.१, श्लोक २६

इतो राजगडे गत्वा गृहीतं राजदर्शनम् ।। २८
ततः श्रीमच्छिवेनेयं सुरती लुण्ठिता पुनः ।
तद्देवरमहाराष्ट्रभाषायुग्मेन वर्णितम् ।। २९ ।।

पर्णालपर्वतग्रहणाख्यानम्

माता यस्य सती गुणाऽर्चितगुणा राजायिनाम्नी हनू-
मद्वंशाभरणं पिता ध्वरिवरो नारायणाख्यस्सुधीः ।
तेन श्रीशिवसार्वभौमनृपतिप्रेमैकधाम्ना समा-
म्नातोऽयं वधुनाभनामविदुषा तोषाय कोशस्सताम् ।।
इति श्रीशिवछत्रपतिप्रियामात्येन नारायणाध्वरिसूनुना ।
रघुनाथेन शिवराज नियोगतः कृते व्यवहारकोशे पण्यवर्गो
दशस्समाप्तः ।। ..... राजकोश निघंटु (शेवटचा श्लोक)

शिवाजी जरी अशिक्षित होता, तरी त्याच्या या पंडिताबरोबर किंवा रामदासांबरोबर फारच थोडया चर्चा झाल्या होत्या. कवींद्राने त्याच्या शिक्षणाबद्दल खालील उद्गार काढले आहेत.

आख्याति लिखितुं यावदाचार्यो वर्णमिदिमम् ।
तावद्वितीयमप्येषा लिखित्वा समदर्शयत् ।। ७२ ।।
सर्वासामपि विद्यानां द्वारभावमुपागतां ।
लिपिं यथावदाखिलां ग्राह्यामास तं गुरु: ।। ७३ ।।

शिवभारत अ.१०, श्लोक ७२,७३.

राजा छत्रपती स्वामीचे ठाई गुण ।।

१) देवाची ठाई निष्ठा, २) बळे परवर (प्रखर), ३) राजकिळेची (राजकळेची) अदब, तरतिबरा (?) हारवेश उत्तम, ४) दरशनी, ५) रत्नपरीक्षा, ६) अश्वपरीक्षा, ७) शस्त्रपरीक्षा, ८) जितिकी हत्तीमी आरास्ता (?) ९) बोलणे रसिक, १०) डोळ्यामध्ये शरम, ११) शाळ्यांपरीक्षा, १२) गजपरीक्षा, १३) न्याय करणे उत्तम, १४) शहाणपण, १५) राजकारणी १६) मनुशाची पारखि, १७) घोड्ये चढाईत, १८) हत्तीचढाईत, १९) वरदकविताशक्ति, २०) इमानि, २१) शूर, २२) उदार, २३) वित्पन्न, २४) सखोल, २५) धीर

वही-

यावरून असे दिसते की, शिवाजी हा सुशिक्षित होता आणि अत्यंत हुशार होता.

आपल्या डोळ्यासमोर आपल्या धर्माचा -हास झालेला पाहण्यापेक्षा शत्रूंच्या हातातून धर्माच्या मुक्ततेसाठी आपल्या प्राणांचासुद्धा त्याग करावा अशी भावना शिवाजीचा इतिहास वाचणा-या वाचकाच्या मनात निर्माण

होतात. त्यांनी निर्माण केलेल्या नैतिक मूल्यांप्रमाणे वागण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. भारतमाता, आपला धर्म व आपले तत्वज्ञान यांसाठी आपले बलिदान केले पाहिजे यासाठी सर्व देशप्रेमी भारतीयांनी शिवाजीच्या इतिहासाचा अभ्यास केला पाहिजे.

पन) धर्मराजविजयम् :

छ. शिवाजी महाराजांविषयी असलेले संस्कृत साहित्य मी गोळा करीत असताना माझी कोल्हापूर येथील संस्कृतची आवड असलेले व संस्कृतचे गाढे व्यासंगी श्री. गं.बा. दंडगे यांच्याशी भेट झाली व त्यांच्याकडे असलेले हे ` धर्मराजविजयम् ` हे नाटक त्यांनी मोठया उदार मनाने आढेवेढे न घेता मला अभ्यासांकरिता दिले.

सदर नाटक एका वहीत हाताने लिहिलेले असून त्याची काही पाने अगदी जीर्ण झालेली आहेत. कांही ठिकाणी ती थोडीशी फाटलेली आहेत. शाईही एक-दोन प्रकारची वापरलेली आहे. परंतु तरीसुद्धा प्रस्तुत नाटक वाचता येण्यासारख्या परिस्थितीत आहे. त्यावर लेखकाचे नाव नाही.

हे हस्तलिखित प्राप्त झाल्यानंतर मला अतिशय आनंद झाला व यातून आपल्याला बरीच काही नवीन माहिती उपलब्ध होऊन छ. शिवाजी महाराजांच्या चरित्रावर नवीन प्रकाश पडेल अशी अपेक्षा माझ्या मनांत निर्माण झाली. अज्ञात कवीचे हे ऐतिहासिक नाटक हातात आल्यामुळे त्याच्याविषयी फार मोठया उच्च अपेक्षा उंचावल्या व त्यादृष्टीने हे नाटक मी वाचण्यास सुरुवात केली.

या नाटकाची कथा पुढीलप्रमाणे आहे - काशीचा राजा धर्मराज याला यवनांनी कैद केले. तेंव्हा त्याची पत्नी सरस्वतीने आपली दोन मुले मालती नामक स्त्रीकडे स्वाधीन करून त्यांना सांभाळण्यास सांगितले व तिने तपस्वी वेष धारण करून ती तापसी झाली. नंतर त्या राजाचा प्रधान व सेनापती तुरुंगातून निसटले व शिवाजीने मावळ्यांच्या साह्याने यवनांचा पराभव करून धर्मराजाची सुटका केली व त्याला काशीच्या राजगादीवर पुन्हा अभिषेक केला. नंतर त्याचे आपल्या पत्नीशी पुनर्मीलन झाले व शेवटी धर्मराजाने शिवाजीला " तू खूप मोठा अवतारी पुरुष आहेस व पुढे खूप मोठे कार्य करशील " असा आशीर्वाद दिला असे या नाटकाचे कथानक आहे.

प्रस्तुत नाटकाच्या पहिल्या पानावर व्हिक्टोरिया राणीचा उल्लेख असून हे नाटक रविवार दि. १८ जानेवारी १८८७ मध्ये लिहिले आहे असा उल्लेख आहे. पण लेखकाने स्वतःचे नाव लिहिलेले नाही. हा उल्लेख पाहिल्या-नंतर असे लक्षांत येते की हे नाटक सर्वसाधारण ९८½ वर्षापूर्वीचे आहे. ते काही फार प्राचीन नाही. शिवाय त्यात व्हिक्टोरिया राणीचा उल्लेख आहे, त्यावरून ते इंग्रजांच्या कारकीर्दीतच लिहिलेले आहे. फारसे प्राचीन नाटक नाही.

या नाटकात शिवाजी व रामदास यांची चातुर्वर्ण्यव्यवस्थेवरील एक चर्चा आलेली आहे. त्यामध्ये " जर सर्वजण सुशिक्षित झाले तर मग निरनिराळे व्यवसाय कसे अस्तित्वात राहतील ? व समाजव्यवस्था विस्कळीत होईल, म्हणून प्रत्येकाने ज्ञान घेतले पाहिजे. पण आपआपला व्यवसाय केला पाहिजे. " अशा आशयाची चर्चा आलेली आहे. विचार हे नेहमी कालचक्राप्रमाणे बदलते असतात. आणि या ठिकाणी प्रकट झालेले विचार पूर्ण आधुनिक काळातील आहेत असे वाटते. त्यामुळेही हे नाटक फारसे प्राचीन

आहे असे वाटत नाही. या नाटकात ` प्रधान ` हे पात्र आलेले आहे असे पात्र जुन्या संस्कृत नाटकात आलेले नाही. ` अमात्य ` असे पात्र असते. त्यामुळे ` प्रधान ` हे योजलेले नाव या नाटकाचे अर्वाचीनत्वच सिद्ध करते.

हे सात अंकी नाटक आहे. सातवा अंक फारच लांबल्यामुळे मध्येच कोणीतरी अंक आठवा असे लिहिलेले आहे. संस्कृत साहित्यामध्ये नाटकाचे जे प्रकार सांगितलेले आहेत, त्या दशरूपकामध्ये असा संस्कृत नाट्यप्रकार कोठेही आढळत नाही. म्हणून हे नाटक भारतीय संस्कृत नाट्यशास्त्राच्या नियमामध्ये बसणारे नाटक नाही.

शिवाजीने यवनांचा पराभव करून काशीराजाची सुटका केली. या पलिकडे शिवाजीविषयी दुसरा कोणताही उल्लेख या नाटकात नाही. कदाचित शिवाजीच्या अगदी प्रारंभीच्या अवस्थेचे हे वर्णन असावे दुसरे म्हणजे यवन राजा कोणता याचाही उल्लेख नाही. फक्त यवन एवढाच शब्द वापरलेला आहे. नावाचा कोठेही उल्लेख केलेला नाही.

त्यामुळे या नाटकामुळे शिवाजीच्या जीवन चरित्रावर तसा काही फारसा नवीन प्रकाश पडत नाही. दुसरे म्हणजे काशी नरेश धर्मराज हा इतिहासाला ज्ञात नाही. ज्याचे नाव या नाटकाला दिले, त्या पलीकडे कोणताही ऐतिहासिक उल्लेख ज्ञात नाही. त्यामुळे हे नाटक ऐतिहासिक ठरत नसून पूर्ण काल्पनिक आहे असे वाटते. शिवाय या नाटकाचे नाव जे ` धर्मराजविजयम् ` असे दिलेले आहे तेही योग्य वाटत नाही. कारण यामध्ये धर्मराजाने कोणताही विजय मिळविलेला नाही. विजय शिवाजीला मिळालेला आहे. म्हणून या नाटकाचे शीर्षकही योग्य वाटत नाही.

अशा रितीने हे नाटक ऐतिहासिक तर मुळीच म्हणता येणार नाही. ते काल्पनिक आहे, त्यामुळे शिवाजीच्या जीवन चरित्रावर तसा फारसा प्रकाश पडत नाही.

या नाटकामध्ये नाट्यगुणही फारसे आढळत नाहीत. त्यावर कालिदासाची छाप पडलेली आढळते व राजनैतिक नाटकांमध्ये प्रसिध्द असलेल्या मुद्राराक्षसाची छाप पडलेली आढळते. यामध्ये संस्कृत गद्य-रचना एकंदरीत कमीच असून पद्य रचनेचे प्रमाण जास्त आहे. श्लोकांची संख्या जास्त आहे. भाषा अगदी सोपी आहे. ज्या व्यक्तीला उच्च प्रतीचे मराठी समजते, त्याला हे संस्कृत नाटक सहज समजेल. फारशी अडचण निर्माण होणार नाही.

अशा तऱ्हेने हे नाटक काल्पनिक आहे व त्यामध्ये उच्च प्रतीच्या नाट्यगुणांचा अभाव आहे व नवीन माहितीही फारशी उपलब्ध होत नाही त्यामुळे मोठाच अपेक्षाभंग होतो.

प्रकरण दहावे

संकीर्ण साहित्य

प्रकरण - दहावे

संकीर्ण साहित्य

अ) जयसिंहराजं प्रति श्रीमच्छत्रपते:
शिवप्रभो: पत्रम्

अनुवादक: कविराज:

फारसी साहित्यामधील काहीचे संस्कृतमध्ये भाषांतर केले गेलेले आहे. " जयसिंहराजं प्रति श्रीमच्छत्रपते: शिवप्रभो: पत्रम् " छ. शिवाजी महाराजांनी जयसिंहाला उद्देशून फारसी भाषेमध्ये एक छंदोबध्द पत्र पाठविले होते. त्या पत्रामध्ये शिवाजी महाराजांची अव्याज राष्ट्रभक्ति उत्कटपणे प्रकट झाली आहे. या पत्राचे हिंदी, मराठी इ. प्रादेशिक भाषांमध्ये उत्कृष्ट अनुवाद झालेले आहेत. त्याचा ६० श्लोकांमध्ये संस्कृत अनुवाद ` कविराज ` हे नाव धारण करणा-या एका अज्ञात कवीने केलेला आहे. उत्कृष्ट अनुवादाचा एक दुर्मिळ नमुना म्हणून हे संपूर्ण पत्र अतिशय महत्वाचे आहे. म्हणून याठिकाणी त्याचे संपूर्ण मराठी भाषांतर उद्घृत करीत आहे.

" राजाधिराज वरमाण्डलिक प्रणेत: रम्यस्थिति प्रसव: ।
भारत पुष्पवाटया: ।
श्रीरामचंद्रमहितांश । तव प्रभावाद् नूनं समुन्नतशिरो
रजपूतजाति: ।। १ ।।
शौर्यश्रियैव तव बाबरवंश राज्यलक्ष्मीरियं प्रबलताम्यते
नितान्तम् ।।

भाग्यैः शुभैरनुपमैश्च तया ऽत्मनो ऽलमासादिता
विजयहेतुसहायता वे ।। १ ।।

तारुण्यदीप्त । जयसिंह । कुशाग्रबुद्धे । भाग्याभिवृध्द ।
बल-वीर्य समृध्दिशालिन् ।

आशीर्मयी त्वमुररीकुरु मे प्रणाममल्पां श्रिया नि-मांच
मदीयसेवाम् ।। २ ।।

- -

- -

स्वप्नस्य वास्तवफलं तव दर्शयिष्ये
प्रक्ष्याम्यहं समदि वीर वतुलं त्वाम् ।

भूयान्मनोमतमिदं यदि तन्न पत्रं सैन्य भवेत् तव
मदीय - कृपाणलक्ष्यम् ।। ५८ ।।

संछादये न्निजमुखं भगवान् दिनेशः सन्ध्या - पटांचल -
वंशादवशो यदा इवः ।

खड्गस्तदा मम निरावरणो हि भूयात् स्वत्यस्तु
विज्वर ते रजपूत वीर ।। ५९ ।।

(अर्वाचीन संस्कृत साहित्य - भाषान्तरित
संस्कृत साहित्य - डॉ. श्री.भा. वर्णेकर -
पान नं. २४४ ते २४८)

१) राजाधिराज, मांडलिकांचा श्रेष्ठ नायक, भारतरुपी पुष्पवाटिकेच्या रमणीय स्थितीचा निर्माता, श्री रामचंद्राचा आदरणीय अंश असणाऱ्या (जयसिंहा) तुझ्या प्रभावामुळे खरोखर रजपूत जातीची मान उंचावली आहे.

२) बालरवंशाच्या या राज्यलक्ष्मीला तुझ्या शौर्याच्या वैभवानेच अत्यंत प्रबलता प्राप्त होत आहे. आपल्या अनुपम आणि मंगल भाग्यामुळे तिला विजयाचे भरपूर साह्य मिळाले आहे.

३) तारुण्याची झळाळी असणाऱ्या कुशाग्रबुद्धी, भाग्यशाली, शक्ति, पराक्रम व समृद्धीने शोभणाऱ्या (जयसिंहा) माझ्या आशीर्वाद-युक्त प्रणामरूप सेवेचा स्वीकार कर.

४) जगन्नाथ आपले सदैव रक्षण करो आणि धर्मयुक्त न्यायाचा मार्ग (आपणांस) दाखवो. माझ्यावर आक्रमण करण्यासाठी आणि दक्षिण दिशा जिंकण्यासाठी आपण आला आहांत, असे खरोखर आज माझ्या कानावर आले आहे.

५) हिंदूजनांच्या हृदय व नेत्रातील रक्तधारांच्या सिंचनाने मुखाची आरक्तता मिळवू इच्छितोस परंतु या कृत्याने तुझे मुख काजळाने माखले जाईल हे जाणत नाहीस हे खरोखर मोठे दुःख आहे.

६) कारण तुझ्या वागण्याने या कृत्यामुळे, तुझी जन्मभूमी असलेल्या या भारतावर आणि अतिपवित्र धर्मावर मोठे संकट कोसळत आहे, हे तू जाणत नाहीस हे किती विलक्षण आहे.

७) हे महनीय कीर्ति जयसिंहा, आरंभिलेल्या कामाचा तू अंतर्दृष्टीने क्षणभर जर विचार करशील तर तुझे बाहू व विलखताचा पुढील भाग उजळेल हे तुला दिसेल.

८) हे कुशला, तो लालिमा ज्या लोकांच्या रुधिराने झाला ते बांधव किंवा परके असोत. हे उदार हृदे, त्या लालिम्याचा परिणाम इहपरलोकी गुलाबी होईल की काळा ? (याचा विचार कर)

९) धैर्यवंता, या प्रबल दक्षिण देशास जिंकण्यास तू स्वत: होऊन आला असतास तर माझे हे मस्तक आणि दृष्टि तुझ्या चरणावर मी अंथरली असती.

१०) हे वीरा, तुझ्या या तेजस्वी अश्वाला अनुसरून तुझ्या या मोठया सेनेसह मी एकदम गेलो असतो आणि अत्यंत आनंदाने ही सारी दक्षिण दिशा तुझ्या स्वाधीन केली असती.

११) धर्मद्रोही, सर्व सज्जनांचा हिंसक अशा यवनाधिपति औरंगजेब राजाच्या कपटपूर्ण जाळ्यात स्वत: पडून अरे ! आम्हालाही त्यात पाडण्यासाठी आला आहेस.

१२) हे वीरवरा ! खरोखर कोणत्या रीतीने आपणाशी मी खेळावे ते थोडेही मला कळत नाही. शुभकारी अशा आपणास मिळावे का ? तर मग श्रेष्ठ असा पुरुषार्थाचा लाभ नाहीच होणार.

१३) वीरपुरुषाने परंपरेची सेवा करू नये. सिंह कधीही कोल्ह्याची वृत्ती धारण करीत नाही. धारदार तलवार आणि परशु जर मी वापरीन तर उभयपक्षी हिंदूचाच नाश होईल.

१४) या यवनांच्या रक्ताचे पान करण्याची इच्छा सोडून देऊन आपल्या लोकांचे रक्त सांडण्यास माझी तिखट तलवार बाहेर काढावी याबद्दल माझ्या मनाला अतीव दु:ख होत आहे.

१५) जर यवन स्वतः युद्दासाठी आले असते तर आज युध्दरूपी अरण्यात शिकारी असणाऱ्या श्रेष्ठ पराक्रमी अशा आमचे ते खरोखर लक्ष्य झाले असते.

१६) केवळ स्वार्थ साधण्यात मग्न असणारा, परहिंसेबद्दल आदर बाळगणारा, करुणेचा लेशही नसणारा, न्याय्य अशा धर्ममार्गावरून भ्रष्ट झालेला हा औरंगजेब भूतलावरील नरराक्षस आहे.

१७) जेंव्हा अफझलखानाचा पराक्रम निष्फळ झाला, शाहिस्ताखानाचे सामर्थ्यही विफल झाले, तेंव्हा त्याने लढण्यासाठी आपणास पाठविले आहे. खरोखर तो भित्रा माझे आक्रमण सहन करण्यास असमर्थ आहे.

१८) आपआपसातील आघातांनी जखमी झालेला सिंहांचा समूह थकून जावा, वनराजाकडे आलेली गिधाडे नाचावीत. हिंदू समाजात कोणीही वीर ठरू नये अशी त्याची दृढ दुष्ट आशा आहे.

१९) हे गुप्त कपट चतुरकुंदीच्या आपण कसे जाणत नाही ? अरेरे हे किती विलक्षण आहे. त्याच्या जादूच्या कुशल कलाप्रयोगाने आपण अत्यंत भ्रान्तचित्त झाला आहांत, असा माझा तर्क आहे.

२०) जगात शुभा शुभ फलांचा अनुभव घेतला आहे. उद्यानांत फुलांचे काटे एकत्र आले आहेत. आमच्याशीच लढणारे तुम्ही अरेरे हिंदूंची मस्तके तोडणार हे योग्य नाही.

२१) पराक्रमाने मोठी थोरवी प्राप्त झालेली असूनही तुम्ही तारुण्यातील पोरकट खेळात मग्न होऊ नका. सादी नांवाच्या श्रेष्ठ साधूने सांगितलेली श्रेष्ठ आणि उत्तम वाणी सदैव स्मरणात ठेवा.

१२) सर्व ठिकाणी घोड्याला दौडत नेऊन नये, प्रसंगी यश प्राप्त न झाले तर पलायन करावे. वाघ आपला स्वभाव प्राण्यावर दाखवितो. तो गृहयुध्द करीत नाहीच.

१३) वीर वरा, तुझ्या तिखट तलवारीला पाणी असेल, आणि धावणाऱ्या वेगवान घोडयात सामर्थ्य असेल तर धर्मद्विष्टयांचा निःपात कर. ईस्लाम धर्माचे निर्मूलन कर. तेच तुला उचित होईल.

१४) उदार मनाचा राजपुत्र दाराशिको जर या देशाचा राजा झाला असता तर प्रजेला दुर्दैवी हिंदू जनतेला सहज मिळणारी सर्व सुखे चिरकाल मिळाली असती.

१५) निष्पाप जसवंतसिंहाशी प्रतारण केलीस, योग्य-अयोग्य याची काळजीही केली नाहीस कोल्ह्याची वृत्तीही पूर्णपणे मिळवीत नाहीस, तू हें सिंहाबरोबर युध्दाचे साहस करीत आहेस.

१६) परधर्मी राजाची सेवा करून बांधवांचा द्रोह करण्यात कष्ट घेण्याने तुझा काय लाभ होणार ? ऐश्वर्य, मान, श्रेष्ठपद प्राप्ति लौकर होईल हे मृगजळच आहे.

१७) पुष्कळ श्रमाने लावण्यवती रमणी संपादन करून, उपभोगासाठी जो मूर्ख ती दुसऱ्याला देतो त्यात आणि देश जिंकून यवनांना अर्पण करणाऱ्या तुझ्यात कोणता फरक आहे ?

१८) भ्रांतचित्त जयसिंहा, त्या कपटी राजाच्या खोटया अनुकंपेची कास्तुती करीत आहेस ? झुंजारसिंहाने केलेल्या सर्व साहाय्याचे काय फळ मिळाले ते सर्व तुला ठाऊक आहेच.

२९) कुमार श्री छत्रसाल नृपाच्या भोवती या दुष्ट शिरोमणीने संकटे निर्माण केली. इतर हिंदूवरही मोठी आपत्ती आणली हे आपण जाणत नाही का ?

३०) त्या दुष्टाशी - नीचाशी आपण विवाह संबंध घडविलात ते ही मला माहीत आहे. अरे ! म्हणून आपण आपल्या विश्वविख्यात कुळाची थोरवीही नष्ट केलीत.

३१) त्या नरराक्षसाशी केलेले हे विवाहबंधन तिरस्करणीय तसेच रक्तबंधनाच्या दृष्टीने दृढही नसते. स्वत:चे ईप्सित साधण्यासाठी वडिलांचे प्राण आणि भावांचे रक्तही जुमानले नाही.

३२) राजनिष्ठेच्या निमित्ताने ` मी दोषशून्य आहे ` असे आज आपले भरपूर समर्थन करीत असशील तर शहाजहान राजाच्या बाबतीत तुझे वागणे कसे होते याचे क्षणभर स्मरण कर.

३३) जर तुला देवाने कणभर बुध्दि दिली असेल, आपल्या पराक्रम-पौरुषाची बढाई सांगत असशील तर आपल्या जन्मभूमीला झालेल्या अतिव तापाने तप्त झालेले खड्ग. दु:खितांच्या अश्रूंनी ओले कर.

३४) परस्परांशी झुंजण्याची ही योग्य वेळ नव्हे, हिंदू वीरावर महान कार्यभार आहे. आपल्या देश, धन, देवालये, देवमूर्ति, बालकांवरसुध्दा असह्य संकटे आहेत.

३५) जर यांची दुष्कृत्ये काही काळ चालू राहिली, हिंदू कुळाच्या चिन्हाने जर सत्ता स्थापिली नाही तर या साऱ्या विशाल देशावर मूठभर म्लेंच्छ राज्य करतील.

३६) हे स्वार्थ साधणे आहे हा महत्वाचा हेतु नाही, असा अभिप्राय असेल तर हा दुरात्मा आमच्याशी कशी प्रतारण करतो आणि मुखावर अनेक प्रकारचे विकार दाखवितो ते पहा.

३७) हा दुष्ट, अरे! आमच्याच घट्ट साखळ्यांनी आमच्या लोकांचे पाय बांधून टाकतो. (पायात बेडया ठोकतो) आणि आमच्या शेकडो धारदार तलवारींनी आमचाच शिरच्छेद दुष्ट भावनेने करतो.

३८) म्हणून आपण हिंदु लोक, हिंदु धर्म आणि हिंदु राष्ट्राच्या रक्षणार्थ, हे वीरवरा, धैर्याने आणि एकतेने या वेळी प्रयत्नांची पराकाष्ठा करू या.

३९) आपण आज निश्चित हेतु धरून महान प्रयत्न करायला हवेत आणि गंभीर असे अनेक उपाय योजायला हवेत. वीरपुरुषाने देशरक्षणार्थ आवश्यकतेनुसार सर्व उपाय केले पाहिजेत.

४०) आता आपणास श्रेष्ठ वीरवृत्तीच्या सहाणेने तलवारी लखलखीत करायला हव्यात. कपटपटु तुर्की राजाला तुर्कांच्या युक्तिसंभाराने योग्य उत्तर द्यायला हवे.

४१) त्या कपटी राजाच्या विनाशास उत्सुक असणाऱ्या पराक्रमी जसवंतसिंहाबरोबर जाल. हे रणधुरंधरा, राणाराजसिंहाशी एकी कराल तर मोठेच कार्य होईल.

४२) सर्व दिशांनी जोरदार लढाई करा, दुष्ट सर्पाचे मस्तक दगडांनी छेदून टाका, मग त्याला आपल्या कृतीचा कायम विचार करावा लागेल आणि दक्षिणेकडे कपटजाल पसरविण्यास तो समर्थ होणार नाही.

४३) करवती आणि भाले हातात घेतलेल्या वीरांसह मी त्याचा जोराने समूळ उच्छेद करीन. आदिलशाह आणि गोवळकुंडचा सुलतान कुतुबशाहा यांचाही नक्कीच नायनाट करीन.

४४) गर्जणाऱ्या ढगांसारख्या शूरांच्या समूहांनी येथे खड्.धारेच्या तीर्थात त्या पापी दुष्टांना स्नान घालीत आणि दक्षिण भारतात इस्लाम धर्माची (नावनिशाणीही) चिन्हेही नाहीशी करीन.

४५) कर्तव्यदक्ष श्रेष्ठ मालाईत वीरामुळे उसळणाऱ्या कल्लोळांनी युक्त आणि गंभीर घोष करणाऱ्या अशा नदीप्रमाणे दक्षिणेतील पर्वतमध्यातून मी अत्यंत समान अशा उत्तरेकडील भूभागाला मी गाठीन.

४६) आपणास मिळून आपली सेवा मी करीन. आपल्या सहकार्याचे मोल मी शकला विचारीन. आपण सर्वजण बारही दिशांना रुध्द करून त्याच्या समरांगणाचा संकोच करू या.

४७) सैन्याच्या चंचल लाटांच्या पुराने शत्रूचा पुराणा उंच वाडा आपण बुडवू या. सिंहासन गेल्यावर औरंगजेब या नावाची शोभा नष्ट होऊन ते व्यर्थच होईल. (औरंग - सिंहासन, जेब - शोभा औरंगजेब - सिंहासनाचे भूषण).

४८) याचे हिंस्त्र खड्ग. कुठेतरी लुप्त होईल, त्याचे कपटजाल क्षणात विच्छिन्न होईल, (शत्रू) रक्ताची नदी भूमीवर आपण वाहायला लावू या आणि तीमध्ये स्वर्गात गेलेल्या पितरांनाही तर्पण करू या.

४९) न्यायप्रिय अशा जगत्सूर्याच्या कृपेने या दुष्ट शत्रूंच्या घर, जमिनी खाली करू या. अंत:करण, डोळे आणि हात एकत्र आल्यावर हे मित्रवर्या एकमेकास अनुकूल असे हे कार्य खरोखर कठीण नाही.

५०) दोन अंत:करणाची मिळणी झाली तर उंच अशा पर्वतालाही लगेच जमीनदोस्त करू आणि समुद्रही कोरडा करू. या बाबतीत मला खरोखर पुष्कळ बोलायचे आहे. माझ्या पत्रात ते लिहिणे योग्य नाही.

५१) आपण दोघे भेटलो तर संभाषण पुष्कळ करावे, अशी इच्छा आहे. म्हणजे श्रम आणि दु:ख निष्कारण होणार नाहीत. तुमची इच्छा असेल तर समक्ष येऊन भेटेन आणि बोलाल ते सर्व प्रेमाने ऐकेन.

५२) आपण दोघे बंधू एकांतात सुंदर वदन असणा-या ओढणी नसलेला वार्तालाप करू या. तिच्या केसातील जटिलता फणीच्या साहाय्याने प्रेमाने एकदम दूर करू या.

५३) प्रयत्नांची चांगली पराकाष्ठा करू या. उन्मत्त राक्षसाबद्दल मंत्राची योजना करू आणि शोध करून तसेच सिध्दि येथे जवळ आणू. शिवाय आपण दोघांना उज्ज्वल करू या.

५४) खड्.गाची, अश्वाची, देशाची आणि धर्माची खरोखर शपथ घेतो. माझा सहवास तुझ्यावर थोडीशीही आपत्ती न आणो. अफजलखानाच्या वधाच्या प्रसंगाने तू शंकित होऊ नकोस.

५५) माझ्या मरण्यासाठी हबशी वंशाचे ६२०० घोडेस्वारासह तो येथे आला होता, मी त्यावर अगोदर प्रहार केला नसता तर हे हेतुयुक्त पत्र तुला कोणी लिहिले असते ?

५६) आपली भीति मला वाटत नाही. हे वीरवरा, जयसिंहा, तू स्वत: कोणत्याही कारणाने माझा शत्रू नाहीस. योग्य उत्तर पाठविलेस तर मी एकटाच रात्री तुमच्याकडे येईन.

५७) शाहिस्ताखानाचे खिलखतात सांपडलेले गुप्त पत्र मी दाखवीन. तुझ्या डोळ्यांतील संशयाचे पाणी काढून टाकीन. नंतर तुझी सुखद वाटणारी मोहनिद्रा (भुरळ)दूर होईल.

५८) स्वप्नाचे वास्तव (खरेखुरे) फळ तुला दाखवीन. हे वीरवरा, त्याचे उत्तरही तुला मी विचारीन. हे जर तुझ्या मनाला मान्य झाले नाही तर तुझे सैन्य माझ्या तलवारीचे लक्ष्य होईल.

५९) जेंव्हा उषा संध्येच्या पदराने निष्प्रभ झालेला भगवान सूर्य-नारायण स्वत:चे मुख झाकील, तेंव्हा माझे खड्ग. आवरणरहित होईल. हे ज्ञानी अशा रजपूतवीरा, तुझे कल्याण असो.

या पत्रामध्यें शिवाजीचा हिंदुधर्माविषयीची श्रद्धा, दूरदर्शी विचार, विचारांतील कळकळ, आपला धर्म, राष्ट्र, प्रजाजन याविषयी वाटणारी आस्था, राष्ट्राभिमान, धर्माभिमान, उदारपणा हे गुण दिसून येतात. शिवाय कवीची ओघवती व सोपी भाषा शैली, अलंकारांचा सहज वापर, विचारांतील ठाशीवपणा व ओजस्वीपणाही दिसून येतो.

ब) श्री बृहदीश्वर मंदिरावरील शिलालेख

फार प्राचीन कालापासून राजघराण्याविषयी व त्या कालच्या नैतिक, धार्मिक, कौटुंबिक स्थितीविषयी सुद्धा इतिहास रचून ठेवण्याची आमच्या पूर्वजांची चाल होती. याची साक्ष रामायणमहाभारतादि ग्रंथ पटवीत आहे, मधून काही कालपर्यन्त परकीय राजसत्तेने आलेल्या अवनतीने किंवा अन्य कांही कारणामुळे इतिहास लेखनाची चाल बंद पडल्यासारखी झाली होती. परंतु जेंव्हा मराठ्यांनी स्वधर्म व स्वराज्य ह्यांची स्थापना

केली, तेंव्हा पनार प्राचीनकालीन इतिहास लेखनपध्दतीपेक्षा त्यांच्या दृष्टीसमोर असलेल्या मुसलमानी गद्यात्मक इतिहास लेखनपध्दतीचा स्वीकार करून जे कित्येक ऐतिहासिक लेख लिहिले, त्यांतलि तंजावर येथील श्री बृहदीश्वराचे देवालयांतील प्राकाराचे भिंतीवर खोदलेला तंजावर राजघराण्याचा इतिहास हा प्रसिध्द शिलालेख एक आहे.

ह्यामध्यें श्री नारायणापासून सूर्यनारायण मनु, इक्ष्वाकु इ. पौराणिक सूर्यवंशीय परंपरेची संज्ञा सांगून पुढे महाराष्ट्राचे धर्माभिमानी व राज्य संस्थापक श्री शिवाजी महाराजांच्या पूर्वीच्या चौदा पिढ्याबद्दल माहिती दिली आहे. त्यातून काही पिढयाविषयी फक्त वैदिक साक्षात्कार सांगून पुढे काही पिढयांची अ त्रोटक माहिती दिली आहे. छ. शिवाजी महाराजांचे आजे मालोजी यांच्या कारकीर्दिपासून विशेष माहिती व त्या त्या गोष्टी घडलेल्या कालाचे शक व संवत्सर दिले आहेत आणि त्या पुढे तंजावर राजवंशीय शेवटील राजे श्री शिवाजी महाराज यांचे वडील श्री शरफोजी महाराज यांच्या कारकीर्दितव त्यांच्या चिटणीसांनी लिहिलेला आहे. ह्यावरून हा इतिहास अव्वल इंग्रजीत लिहिला आहे. लेखाचे शेवटी " आता शरफोजी महाराज सर्वदा शिवपुराण ऐकणे व शिवपूजा करून यात्रादिकही करीत सन्मार्गीतव आहेत. सकल जनासही सकल राज्यासही वैषम्य तिरस्कार या दोहींचा परित्याग करून त्या त्या मताचे मताप्रमाणे वेदाप्रमाणे चालवीत व सकल जनांसही व्यसन न येता युक्तप्रकारे प्रतिपालन करिताहेत. श्रीमद्भोंसल वंशांत महादंपतीश्रेष्ठ श्रीमच्छंकर प्रसादजनित प्रतापस्वीकृत दिल्ली चातुर्भाग स्वातंत्र्य विपक्षाकृत दिल्ली राजसार्वभौम अवनीशकुलललामायमान महाराष्ट्र तथा चोळदेशाधिपती पुण्यश्लोक राजांचे चरित्र सकल मनोभीष्टदायक ऐसे प्रथम वर्ण (ब्राह्मण) महाराष्ट्र जाति भगवंतरायाचे पौत्र विठ्ठलरायांचे पुत्र प्रस्तुत चोळदेशाधिपती

श्रीमंत राजश्री महाराज छत्रपती शिरफोजी महाराजेसाहेब यांचे निज सेवक आश्वलायन सूत्र शाखाध्याय यांकडून लिहिले जे ते शालिवाहन शके १७२५ रुधिरोद्गारी संवत्सर मार्गशीर्ष वद्य अमावास्या भौमवारी इंग्रेजी सन १८०३ इसवी डिसेंबर १३ लेखन सीमा समाप्त.

हा शिलालेख श्री शरफोजी महाराज यांच्या हयातीत लिहिला गेला आहे इतकेच नव्हे तर खुद्द लेखक महाराजांच्या चिटणीसीवर असल्यामुळे त्यांच्या आज्ञेनेच लिहिला असण्याचा संभव आहे. तसे नसले तरी त्यांची अनुमती तरी खचित असली पाहिजे.

भाषा ही मराठयांच्या दप्तरापेक्षांहि कमी सुधारलेली दिसते. कारण नेताजी पालकरांचे नाव ` नेतोजी ` असे दिले आहे. एकंदरीत शब्दांचे अपभ्रंश वगैरे असून भाषेच्या शुध्दपणाकडे विशेष दृष्टी दिलेली दिसत नाही.

काल शक १७२५ हा दिलेला आहेच. परंतु हल्ली आमच्या पूर्वजांचा इतिहास जाणण्याची इच्छा उत्पन्न झालेली आहे, त्यासाठी इतिहासाची साधने जमविण्याची चोहोंकडे खटपट चालली आहे. त्यांत ह्या लेखाचा बराच चांगला उपभोग होईल. शिवाय यात शिवाजीच्या पूर्वीच्या १४ पिढ्यांचा उल्लेख केला आहे, त्याचाही इतिहास संशोधकास उपयोग होईल.

वाचकांची उत्सुकता अपुरी राहू नये म्हणून येथे केवळ त्यांची क्रमवार नांवे देत आहे. सूर्य नारायण-मनू-इक्ष्वाकु-शंभु-येकोजीराजे-शरभराजे-महासेन-येक शिवराजा-रामचंद्र-दुसरा येकोजी राजे - वराह राजे - तिसरा येकोजी राजे - ब्रह्माजीराजे - शाहजीराजे - अंबाजी राजे - परसोजी - बाबाजी - बाबाजीची दोन मुले - मालोजी व विठोजी - विठोजीची आठ

मुले - संभाजी, खेलोजी, मालोजी, परसोजी, नागोजी, मनोजी, कंकाजी, त्रिंबकजी व मालोजीची दोन मुले - शाहजी व शरफाजी - शाहजीची तीन मुले - संभाजी, शिवाजी व येकोजी. अशारीतीने कमी अधिक विस्तारांत सर्वांचे वर्णन अखेर शरफनोजी पर्यन्त केलेले आहे. भोंसल वंशाचे संपुर्ण चरित्र या बृहदीश्वराच्या मंदिरावर कोरलेले आहे.

जवळ जवळ पुस्तकाची ११० पाने एवढी पाने या मंदिरावर कोरलेली आहेत हे फार आश्चर्याची व कौतुकाची गोष्ट आहे, यात शंकाच नाही. म्हणून येथे आवर्जुन याचा उल्लेख करीत आहे.

शिलालेख हे ऐतिहासिक साधनांमध्यें महत्वाचे असतातच. या शिलालेखांवर ` भोंसल वंश चरित्र ` हे पुस्तक तंजावर सरस्वती महाल सीरीज नं. ४६ मध्यें प्रकाशित केले आहे. तंजावरच्या सरस्वती महाल, ग्रंथाल्यातर्फे ते इ.स. १९५१ मध्ये प्रकाशित झाले असून त्याचे इंग्रजी व तामीळ भाषांतरही त्या पुस्तकांत दिले आहे. त्याची दुसरी आवृत्ती इ.स. १९८० मध्यें प्रकाशित झाली आहे.

त्या पुस्तकात ` श्री ` तंजावर वेट्टियान् काणीयाच्ची या शीर्षकाखाली पुढीलप्रमाणे मजकूर प्रसिध्द झाला आहे. " पूर्वेकडील पेटेत तंज्यान कोडियन, सिन्नान, आजितागाईत अनभोगीताहेत ते जाता बाकी पैरमानाने आजितागाईत अनभोगीत येत्याप्रमाणे पैरमानाने अनभोगीत येणे म्हणून वाझून तंज्यान कोडियान सिन्नान यास जयपत्रिका देऊन श्री बृहदीश्वर स्वामी देऊळाचे शिखरी लिहिले असे. "

क) शिवाजी महाराजांच्या राज्यपद्धतीचा उगम

महाराज हे व्यवहारी मुत्सद्दी होते. कर्मठी नव्हते. त्यांनी राज्याभिषेकाच्या निमित्ताने हिंदुपदपातशाहीच्या पुनरुज्जीवनाचा जो उपक्रम केला तो निव्वळ शास्त्री पंडितांच्या सांगण्यावरूनच केला असेल असे कोणीही समजू नये. जसे जसे राज्य वाढत गेले, तसे तसे त्याला एक स्वरूप हि येत होतेच. शहाजीने जहागिरीच्या व्यवस्थेसाठी जी माणसे नेमली तीच अष्टप्रधानमंडळाचे मूळ होत. " बराबर शामराव निळकंठ म्हणून पेशवे करून दिले व बाळकृष्णपंत नारोपंत दीक्षितांचे चुलतभाऊ मुजुमदार दिले व सोनोपंत डबीर व रघुनाथ बल्लाळ सबनीस ऐसे देऊन दादाजीपंतास व राजेयांसि पुण्यास रवाना केले." हाच सभासदाच्या शब्दांत प्रधानमंडळाचा उगम होय. राज्याभिषेकापर्यन्त ही संख्या सात झाली होती. तीत पंडितराव दानाध्यक्ष एवढेच नवीन सामिल करून अष्टप्रधान मंडळ बनविले. शिवाजीच्या सल्लागार पंडितांचा राजनीतिशास्त्रावरील ग्रंथांपैकी फक्त शुक्रनीति साराशीच परिचय होता असे दिसते. कारण दहा प्रधानांची यादी दुसऱ्या कोठेही एका जागी सापडत नाही. दहांच्या जागी आठांचाही पर्याय सुचविला आहे. कौटिल्य किंवा तन्मतानुयायी कामंदक या दोहोंच्याही ग्रंथांत होऊ शकत नाही. मंत्रीसंख्येबद्दल कौटिल्याचे मत कामंदकाच्या पुढील श्लोकांत ग्रंथित झालेले आहे. तो -

> द्वादशेति मनुः प्राह षोडशेति बृहस्पतिः ।
> उशना विंशतिरिति मन्त्रिणां मन्त्रिमंडलम् ।।

म्हणजे मनुशिष्यांचे मत १२, बार्हस्पत्याचे १६, व उशनाचे - शुक्राचार्यांचे मत २० मंत्री असले पाहिजेत. यावर कौटिल्याचे त्याच्या नेहमीच्या रीतीचे मत " यथासामर्थ्यम् " व " स्वसामर्थ्यानुरूप " असे दिलेले आहे. अर्थात

कौटिल्य-कामंदककाळी शुक्रमत २० मंत्री असावे असे होते. तै नीतिसारकाही दहा वा आठ असे होते व तेंच शिवाजीने ठरवले, मनुचेहि एक मत " सप्तवाष्टौ " (७ । ८) असावे असे होते व राजधर्मपर्वाचा हि त्यास पाठिंबा होता.

शुक्रनीतीतील श्लोक याप्रमाणे -

पुरोधा च प्रतिनिधि: प्रधान: सचिवस्तथा ।
......एता भृतिसामास्त्वष्टौ राज्ञ: प्रकृतय: सदा ।।
शुक्र २ श्लोक ६९-७४

प्रो.सेन यांनी नऊ प्रधान असावेत असे लिहिलेले होते. पुढे या नवांच्या यादीतून प्रतिनिधी व पंडित गाळून सेनापति नवीन घातला व अष्टप्रधान मंडळ झाले हे म्हणणे चूक आहे. पंडित गाळला नसून पुरोधा गाळला व प्रतिनिधी न निर्मिता सेनापति आंत घातला. शिवाजीने पहिल्या शुक्रमतापेक्षा गौणमत पसंत केले. यातच त्याच्या शहाणपणाचा व दूरदृष्टीचा अनुभव येतो. व कालाप्रमाणें बदल करण्याची प्रागतिक प्रवृत्ती दिसून येते. कौटिल्याच्या मताप्रमाणे राजाच्या गुरुस्थानी शोभणारा वरच्या दर्जाचा ब्राह्मण शिवकाली दुर्मिळच होता. पुन्हा राजाला सल्ला देण्याइतका तो व्यवहारातहि हुशार असला पाहिजे. केव्हा राजाधिकाराला मर्यादा घालणारा मंत्री शिवाजीला आवडण्यासारखा नव्हता. शिवकाली एकसूत्रीपणाची अत्यंत आवश्यकता होती. शिवाजीने नवीन मंत्री निर्माण न करता असलेल्या अधिका-यांना नवीन संस्कृत नावे दिली. (कारण हिंदूधर्मपुनरुज्जीवनाकांक्षी) नीतिसारकाली क्षात्रिय सेनापतीला मंत्रिमंडळात स्थान नव्हते. शिवाजीने सेनापतीला मंत्रिमंडळात स्थान दिले, म्हणून महाराजांना सुधारक म्हणण्यास हरकत नाही.

शिवाजीचा सचिव हा मुख्यत: चिटणीस होता. मंत्री परराष्ट्रीय प्रधान होता. तो खाजगी कारभारी व बातमी पुरविणारा झाला. सुमंत्र फडणीस - जमाबंदी खात्याचा प्रधान होता तो जामबंदीप्रधान झाला. शिवाजीच्या मुख्य प्रधानाकडे मोठेपणा असून त्याखेरीज नीतिसारांतील प्रतिनिधीचा कांहीसा अधिकार होता. प्रत्येकाने पडेल ते काम करावे अशीच शिवाजीची शिस्त होती.

नीतिसारकाराने जावार अधिकार विभागणीची योजना केली. त्याचा शिवाजीने बराच उपयोग केलेला दिसून येतो. शिवाजीचे देशमुख व पाटील हे मराठेच असत. सेनापति हा नेहमी क्षत्रिय असावा, हा नियम प्रधानमंडळापुरताच ठेवला होता.

अठरा कारखाने व बारा महाल यांची नांवे शिवाजीने बदलली. संस्कृत नांवे प्रचलित करण्याचा शिवाजीने प्रयत्न केला. शिवाजीचे सहा प्रधान, लढवय्ये व लेखणीबहादूर होतेच व तेवढयापुरते ते दुसऱ्याचे काम उचलण्यास तत्पर असत. कोणीही प्रधान दुसऱ्यापेक्षा विशेष बलाढय असा नव्हता. शिवाजीने इनामे व जहागिरीऐवजी भरपूर पगार देण्याचाच प्रधान ठेवल्याने ते राजाला डोईजड होण्याचा संभव नव्हता. शिवाय कोणीही अधिकारी कायम वा वंशपरंपरागत न नेमण्याचा हेतू दिसतो. वर्तणूक पसंत असेपर्यन्त ठराविक मुदतीचे प्रधान असत. कार्यकौशल्य पाहून बदलणे, कायम न ठेवणे, मुलगा बापाप्रमाणे असेल तरच नेमणे, बढती करणे, तीन अधिकारी प्रत्येक खात्यावर नेमून त्यावर एक मुख्य नेमणे.

राजशासनमंत्रांवर करावयाच्या खुणा, सह्या व मुद्रा याबाबतीत शुक्रनीतिसार व छत्रपतींची पध्दति यात फार साम्य आढळते. छत्रपती कौटिल्याचा उपदेश डोळ्यापुढे ठेवून वागणारे होते. म्हणून शिवछत्रपतींच्या

धोरणावर संस्कृत राजनीतीशास्त्राचा परिणाम अभ्यासपणे हे स्वतंत्र व बोधप्रद आहे.

ड) छत्रपती शिवाजी महाराजांचा जीवनपट

१६३० फेब्रुवारी १९	-	शिवाजी महाराजांचा जन्म
१६४५	-	हिंदवी स्वराज्याची स्था शपथ
१६४६ जानेवारी २८	-	राजांच्या मुद्रेचे पहिले उपलब्ध पत्र.
१६४७ मार्च ७	-	दादोजी कोंडदेवाचा मृत्यू
१६४७ मार्चनंतर	-	सिंहगड घेतला, स्वराज्याचे तोरण
१६५६ जानेवारी १५	-	जावळीवर कब्जा
१६५६ एप्रिल-मे	-	रायगड ताब्यात
१६५९ नोव्हेंबर १०	-	प्रतापगडाच्या पायथ्याशी अफझलखानाशी भेट व त्याचा वध
१६५९ नोव्हेंबर २८	-	पन्हाळगड घेतला.
१६६० मार्च २	-	सिद्दी जौहरचा पन्हाळ्याला वेढा
१६६० जुलै १२	-	राजांचे पन्हाळ्याहून प्रयाण
१६६१ मार्च	-	राजापूरच्या इंग्रज वखारीची लूट
१६६३ एप्रिल ५	-	शाहिस्तेखानावर छाप व मानहानी
१६६४ जानेवारी ६-१०	-	सुरतेची पहिली लूट
१६६४ नोव्हेंबर २५	-	सिंधुदुर्गाची पायाभरणी
१६६५ मार्च ३	-	जयसिंगाचे पुण्यात आगमन
१६६५ जून १३	-	पुरंदरचा तह
१६६६ मार्च ५	-	राजांचे आग्र्याकडे प्रयाण
१६६६ मे १२	-	औरंगजेबाशी आग्रा येथे भेट

१६६६ ऑगस्ट १७	-	आग्र्याहून सुटका
१६६६ नोव्हेंबर २०	-	शिवाजीराजे रायगडावर परतले.
१६७० फेब्रुवारी ४	-	सिंहगड काबीज व तानाजीचा मृत्यू.
१६७० आक्टोबर	-	सुरतेची दुसऱ्यांदा लूट
१६७४ फेब्रुवारी २४	-	नेसरीची लढाई व प्रतापराव गुजरांचा मृत्यू
१६७४ जून ६	-	राज्याभिषेक
१६७४ जून १७	-	जिजाबाईचा मृत्यू
१६७४ सप्टेंबर २४	-	दुसरा राज्याभिषेक
१६७६ आक्टोबर ६	-	कर्नाटक दिग्विजयासाठी प्रयाण
१६७७ मे १३	-	जिंजिचा किल्ला काबीज
१६७७ जुलै २३-२४	-	एकोजीची भेट
१६७८ मे-जून	-	रायगडास महाराज परत
१६७८ डिसेंबर १३	-	संभाजी मोगलांकडे
१६७९ ऑगस्ट	-	खादेरीची तटबंदी सुरू
१६८० जानेवारी १३	-	महाराजांकडे संभाजी परत
१६८० एप्रिल ३	-	महाराजांचे निर्याण

ई) शिवचरित्राचा आराखडा

१) प्रकरण १ ले - शिवाजीपूर्वीची शंभर वर्षे - हिंदूंना पध्दतशीर दडपण्याची इस्लामी राजनीति - मुसलमानी साम्राज्यामुळे झालेली हिंदूंची अवनति - मुसलमान धर्मप्रकारकांचे कार्य.

२) प्रकरण २ रे - शिवाजीचे पूर्वज व शाहजींचे स्वराज्य - स्थापनेतील कार्य - बाबाजी भोसल्यासंबंधीची माहिती -भोसले घराण्याचे

क्षात्रियत्व, राजपुतत्व - जाधवरावांच्या घराण्याची थोडक्यांत माहिती - मालोजी व विठोजीची परोपकाराची कृत्ये - घृष्णेश्वर मंदिरावरील मालोजीचा शिलालेख - शाहजीचे पूर्वायुष्य - शाहजीच्या आयुष्याचे भाग (१) मलीक अंबरच्या हाताखालील काळ (१६०८ - २६), (२) आदिलशाहीच्या हाताखालील काळ (१६२५ - २८), (३) पुनश्च निजामशाहीकडे (१६२८-२९) लखूजी जाधवरावांचा खून व शाहजी मोंगलाकडे (१६२९ - ३०), (४) शाहजीचे निजामशाही स्थापण्याचे व रक्षिणाचे प्रयत्न (१६३० - ३६) त्यात अपयश - शाहजीचे शिवाजीच्या स्वराज्यस्थापनेंतील कार्य.

२) प्रकरण २ रे - जन्म - बालपण - शिक्षण - मनोविकास - जन्मकाळाची परिस्थिती - शिवजन्माची निश्चित तारीख, १६३०-३६ या काळात शिवाजी कोठे होता ? शहाजीची दोन ठिकाणी जहांगीर. १६३७-४७ शिवाजीची निवासस्थाने, १६३६ - मावळचा पोटमोकासा शिवाजीच्या नांवे, १६३७-३९ जिजाबाई व शिवाजी यांना कसबे खेड येथे बापूजी मुद्गल न-हेकर यांच्या वड्यांत ठेवले, १६३९ शाहजी कर्नाटकांतून महाराष्ट्रात परत, परत तो बंगळुरास जाताना शिवाजी व जिजाबाई त्याजबरोबर गेली. १६४१ शिवाजीचे पुण्यांत आगमन - शिवाजीचा विवाह - दादाजींची कामगिरी - बारा मावळे घेतली - नमुनदार कारभार - शाहजीवरील विजापुर दरबाराची गैरमर्जी, शाहजीचा पुण्यातील जहांगिरीशी असलेला संबंध - शिवाजीचे शिक्षण - दादाजी व जिजाबाईची शिक्षण देण्यातील कामगिरी, शिक्षणामुळे शिवाजीचा झालेला मनोविकास - शाहजीकालीन परिस्थितीचा व बालपणच्या खडतर आयुष्याचा त्याच्यावर झालेला परिणाम - मुसलमानी संस्कृतीचा शिवाजीवर झालेला परिणाम. बंगळूरच्या वातावरणाचा परिणाम.

४) प्रकरण ४ थे - स्वराज्याचा श्रीगणेशा व त्यावरील पहिली संकटे - १६३९ ते १६५५.

५) प्रकरण ५ वे - स्वराज्याचा विस्तार.

६) प्रकरण ६ वे - अफजलखानाचा वध.

७) प्रकरण ७ वे - पन्हाळगडाचा वेढा व शाहिस्तेखानाची स्वारी.

८) प्रकरण ८ वे - तळकोंकणावरील स्वाऱ्या.

९) प्रकरण ९ वे - सुरतेची पहिली लूट

१०) प्रकरण १० वे - जयसिंगाची स्वारी.

११) प्रकरण ११ वे - शिवाजीची आग्रा भेट

१२) प्रकरण १२ वे - सुटकेनंतरची तीन वर्षे

१३) प्रकरण १३ वे - पुनश्च चढाईचे धोरण.

१४) प्रकरण १४ वे - शिवाजी व इंग्रज संबंध

१५) प्रकरण १५ वे - शिवराज्याभिषेक

१६) प्रकरण १६ वे - शिवाजी व इंग्रज संबंध

१७) प्रकरण १७ वे - राज्याभिषेकानंतर

१८) प्रकरण १८ वे - कर्नाटकची स्वारी

१९) प्रकरण १९ वे - शिवाजीची शेवटची वर्षे

२०) प्रकरण २० वे - खांदेरी - उंदेरीची चकमक

२१) प्रकरण २१ वे - शिवाजीचे महानिर्याण

२२) प्रकरण २२ वे - शिवाजीचे कार्य व त्याचे मूल्यमापन.

प) छ. शिवाजी महाराजांचे कौटुंबिक
जीवन व व्यक्तिमत्व

महाराजांसारख्या इतिहास प्रसिध्द व्यक्तींचे चरित्र अभ्यासताना व लिहिताना त्याद्वारे त्या चरित्राशी निगडीत विविध स्वरूपाच्या जिज्ञासांची पूर्ति व्हावी अशी प्रत्येकाचीच अपेक्षा असते. महाराजांच्या संदर्भात ते कसे दिसत, कसे बोलत, त्याचे कुटुंब केवढे होते, स्वभाव कसा होता, त्याचे एकूण व्यक्तिमत्व कसे होते हा तपशील जाणून घ्यावासा वाटतो, म्हणून हे प्रकरण लिहित आहे.

इ.स. १६६४ च्या जानेवारीत महाराजांनी सुरतेवर हल्ला केला, त्यावेळी काही इंग्रजांनी त्यांना प्रत्यक्ष पाहिले, त्यात अँथोनी स्मिथ हा होता. तो महाराजांबद्दल लिहितो : " महाराज मध्यम उंचीचे, रेखीव बांध्याचे व चपळ आहेत. ज्यावेळी ते बोलतात त्यावेळी ते स्मितहास्य करीत असल्यासारखे दिसतात. त्यांचे नेत्र विशाल, तेजस्वी असून दृष्टि तीक्ष्ण आहे. इतर मराठ्यांपेक्षा वर्ण गौर आहे."

इ.स. १६७४ सालच्या ६ जूनला हेन्री ऑक्झेंडनने महाराजांना राज्याभिषेकाप्रीत्यर्थ नजराणा दिला. तो म्हणतो, " चेहरा सुंदर व पाणीदार, इतर मराठ्यांच्या मानाने वर्ण गोरा, डोळे तीक्ष्ण, नाक लांब व बाकदार व जरासे खाली आलेले, दाढी कापून हनुवटीचे खाली टोकदार केलेली, मिशी बारीक असून मुद्रेत त्वरा, निश्चय, कठोरपणा व जागरूकता हे गुण स्पष्ट दिसतात."

दुसरे वर्णन कॉस्म द गार्द या पोर्तुगीज लेखकाचे आहे. तो म्हणतो, " महाराजांचा चेहरा मोहक होता, निसर्गाने त्यांना असावी तशी चेहरेपट्टी दिलेली होती. विशेषत: त्यांचे काळेभोर व विशाल नेत्र एवढे तेजस्वी

होते की, जणू त्यातून अग्निस्फुलिंग बाहेर पडत आहेत."

महाराजांच्या रूपासंबंधीची ही वर्णने त्रयस्थांनी केलेली असल्यामुळे विश्वसनीय समजण्यास हरकत नाही.

महाराजांच्या कुटुंबाविषयी श्री. रा.ब. पारसनीस यांच्या मते १) सईबाई, २) सोयराबाई, ३) पुतळाबाई, ४) सगुणाबाई, ५) सक्वारबाई, ६) लक्ष्मीबाई, ७) गुणवंताबाई या त्यांच्या पत्नी होत्या.

श्री बृहदीश्वर मंदिरावरील शिलालेखानुसार १) सईबाई, (निंबाळकर) २) काशीबाई (जाधवराव) ३) सक्वारबाई (गायकवाड), ४) पुतळाबाई (पालकर) ५) सगुणाबाई (शिर्के), ६) सोयराबाई (मोहिते), ७) मालहोंची लेक (पानसंदाची लेक), ८) विचाऱ्यांची लेख या पत्नी होत्या.

भारत इतिहास संशोधन मंडळ, त्रैमासिक वर्ष १० - यानुसार १) सईबाई, २) सगुणाबाई, ३) सोयराबाई, ४) पुतळाबाई, ५) काशीबाई, ६) सक्वारबाई, ७) लक्ष्मीबाई, ८) गुणवंताबाई या त्यांच्या पत्नी होत्या.

शिवाजी महाराजांना खालील प्रमाणे अपत्ये होती. १) सईबाईला एक पुत्र व तीन कन्या अशी चार अपत्ये त्यापैकी संभाजीचा जन्म शके १५७९ मध्ये झाला व विवाह शके १५९१ मध्ये येसूबाई उर्फ जिऊबाई-शिर्के-मळेकर यांच्या कन्येशी झाला.

सक्वारबाई उर्फ सखूबाई ही कन्या - फलटणच्या महादजी नाईक निंबाळकरांना दिली.

राणूबाई ही कन्या जाधवांना दिली.

अंबिकाबाई ही कन्या हरजी राजे महाडिक तारळेकर यांना दिली व महाराजांचा हाच जावई विशेष कर्तृत्ववान दिसून येतो.

२) सोयराबाईला एक पुत्र व एक कन्या अशी दोन अपत्ये. पुत्र राजाराम शके १५९१ मध्ये झाला व त्याचा पहिला विवाह प्रतापराव गुजरांची कन्या जानकीबाई हिच्याशी झाला. ती वारली. दुसरे लग्न हंबीरराव मोहित्यांची कन्या ताराबाई हिच्याशी व तिसरे लग्न राजसबाई - कागलकर घाटगे यांच्या मुलीशी झाले. ताराबाईला शिवाजी व राजसबाईला संभाजी हे मुलगे झाले. बाळीबाई उर्फ दीपाबाई ही कन्या विसाजीनामक सरदाराला दिली.

३) सकवारबाईची कन्या कमळाबाई ही जानोजी पालकर याला दिली.

४) सगुणाबाईची कन्या राजकुंवरबाई उर्फ नानीबाई ही गणोजी राजेशिर्के-मलेकर यांना दिली.

म्हणजे महाराजांना सहा कन्या व दोन पुत्र होते.

येव्हेनाचा उल्लेख ग्राह्य धरल्यास महाराज एकमुखत असावेत. डग्लसने त्यांना समुद्रस्नानाची आवड असल्याचे नमूद केले आहे. भूगोलाचा त्यांचा विशेष व्यासंग आहे. देशातील केवळ लहान-मोठी शहरेच त्यांना माहित आहेत असे नव्हे तर प्रत्येक जागान् जागा, झुडुप न् झुडुप त्यांना ठाऊक आहे, अशा सर्व मुलखाचे त्यांनी नकाशे तयार केलेले आहेत असे फ्रेंच प्रवासी अॅबे कॅरे याला चौलच्या सुभेदाराने सांगितले.

महाराजांनी आपल्या प्रतिभेच्या साहाय्याने अनेक नवीन युध्दप्रकार शोधून काढले. त्यांच्या प्रतापाबद्दल कॉस्म द गार्द म्हणतो " महाराज एकाच वेळी अनेक ठिकाणी स्वाऱ्या करीत व त्या प्रत्येक स्वारीत ते स्वत: असल्याच्या वार्ता कानी पडत. त्यामुळे गार्द ने म्हटले आहे की, " महाराज आपल्या ऐवजी दुसऱ्या कोणास स्वाऱ्यांवर पाठवीत की ते जादूगार होते अथवा काही भूतपिशाच्च त्यांच्याऐवजी स्वारीवर जाई हे गूढ अजून उकललेले नाही. हिंदुस्थानात सर्वत्र याच विषयाची चर्चा असून विभिन्न मतांचा गोंधळ उडालेला आहे. "

शिवाजीने उर्दू व पर्शियन या दोन्ही भाषांत पुष्कळ प्रगति केली होती व संस्कृतचा श्रीगणेशा केला होता असे राजवाडे खंड ४, पृ. ७४ वर म्हटलेले आहे.

महाराजांच्या चरित्रात कितीतरी हृद्य प्रसंग आढळतात. त्यांच्याविषयी बऱ्याच दंतकथाही आढळतात. कांही त्यांच्या वेळेस निर्माण झाल्या व काही नंतर निर्माण झाल्या, पण कितीही जिज्ञासा पुरी करण्याचा प्रयत्न केला तरीसुध्दा मनाची शांती प्राप्त होत नाही. कारण महाराजांच्या व्यक्तिमत्वाभोवती गूढ वलय पसरलेले आहे. कारण त्याचे बोलणे-चालणे तर नव्हेच पण सर्व कांही अलौकिक आहे.

प्रकरण आकरावे

उपसंहार

प्रकरण - आकरावे

उपसंहार

या मुमूर्षु समाजाला शुध्दीवर आणण्याचा प्रयत्न वेगवेगळ्या व्यक्तींनी मधून मधून केलेला आढळतो. यापैकी कांही संत महंत होते, कोणी धर्माचार्य होते व कोणी हिंदूवीर होते. पण त्यांत शिवाजी हा एकच पुरुष असा झाला की, त्याने सर्व मुसलमान राज्यकर्त्यांच्या, धर्माभिमान्यांच्या व धर्मवीरांच्या संघटनेला, बळाला व युक्तीला न जुमानता एक स्वतंत्र हिंदुराज्य औरंगजेबासारखा सर्व दृष्टींनी कार्यक्षम व प्रबळ बादशहा अधिकारावर असताना स्थापले, आणि त्यांचा जोर एवढा मोठा ठरला की, त्या राज्याच्या वारसदारांनी हिंदूंची लाट पुन्हा एकदा सिंधुपार नेऊन पोहचविली. एवढ्या प्रबळ संघटनेचे बीजारोपण करणारा जो एकमेव वीर, त्यांचे संस्कृत साहित्यामध्ये आलेले चरित्र जाणून घेणे एतद्देशीयांना बोधप्रद व हितकर ठरेल, असे समजून प्रस्तुत प्रयत्न केलेला आहे.

छ. शिवाजी महाराजांचे चरित्र हा विषय अतिशय व्यापक आहे. जो जो अभ्यास करीत जावे, तो तो त्यासंबंधी आणखी नवी माहिती उपलब्ध होते, अशा परिस्थितीत या विषयाला मर्यादा घालणे हे फार कठीण काम होऊन बसते. त्यामुळे संस्कृत साहित्यातील शिवचरित्राचा अभ्यास करताना इतिहासामध्ये प्रवेश न करण्याचे भान वारंवार ठेवावे लागत होते. त्यादृष्टीने आणि विषयमर्यादेच्या दृष्टीने १७ व्या शतकातील संस्कृत साहित्यात आलेले शिवाजीच्या चरित्रविषयक ग्रंथ, १८ व्या शतकातील, १९ व्या शतकातील नियतकालिकातील, राज्याभिषेक, मुद्रा, हस्तलिखित व शेवटी संकीर्ण या प्रमाणे त्याची विभागणी करून त्याचे अध्ययन केले.

त्यामध्ये १७ व्या शतकांतील सर्वांत महत्वाचा ग्रंथ म्हणजे परमानंदाचे शिवभारत होय. यामध्ये कवीन्द्र परमानंदाने अफझलखानाच्या वधाचा प्रसंग सांगताना जे शिवाजीचे वर्णन केले आहे ते एखाद्या चित्रकाराप्रमाणे केलेले आहे. तो म्हणतो, " उत्तम कवच घातलेला, शिवाजी राजा भोसला, तुरा खोवलेल्या शुभ्र पगडीने व केशराचा शिडकावा मारलेल्या अंगरख्याने फारच शोभत होता. त्या वज्रकायास या कवचाची काय गरज ? एका हातात तलवार आणि दुस-या हातात पट्टा धारण करणारा तो शिवाजी राजा नंदक, खड्ग. व कौमोदकी गदा धारण करणा-या प्रत्यक्ष विष्णुप्रमाणे शोभत होता. " एखादा शिल्पकारसुध्दा त्यावरून शिल्प तयार करू शकेल.

शिवाजीच्या शिक्षणाविषयी पुरावा या ग्रंथात आहे. त्यामुळे शिवाजीला अशिक्षित ठरविणा-या टीकाकारांचे म्हणणे आपोआपच निकालात निघते. शिवाजीच्या राजनीतिविषयीचा एक सुंदर पुरावा या ठिकाणी आहे. शिवाजीचे एकट्याचे डोके नव्हे तर अनेक डोकी शिवशाहीत काम करीत होती. विचारविनिमय होत होता, याचा हा स्पष्ट पुरावा आहे.

काव्य या दृष्टीने हा ग्रंथ उत्कृष्ट आहे. काव्य व इतिहास या दोन्ही दृष्टींनी हा ग्रंथ महत्वाचा आहे. या ग्रंथामुळे अनेक भ्रामक कल्पनांचा निरास झाला व ऐतिहासिक सत्य जगापुढे आले. या देशाची इतिहास लेखनाची परंपरा नव्या पध्दतीने जोपासली. संस्कृत व फारशी लेखन पध्दतीचा सुरेख संगम या ग्रंथात झाला आहे. या ग्रंथात काव्यात्मता व कल्पकता कवी म्हणून आहेच, पण त्याचबरोबर इतिहासाकडेही पाहण्याची दृष्टी दिलेली आहे. राजगडावर केलेल्या राजसभेचा या ग्रंथात जो उल्लेख आलेला आहे, तो इतर कोणत्याही ग्रंथात आलेला नाही. समकालीन ग्रंथ व छ. शिवाजीच्या आज्ञेने निर्माण झालेला

ग्रंथ तसेच कवीने शिवाजीसह अनेक प्रसंगात भाग घेतला असल्यामुळे हा ग्रंथ इतिहास व काव्य द या दोन्ही दृष्टींनी फारच महत्वाचा आहे.

त्या खालोखाल दुसरे महत्वाचे काव्य म्हणजे " पर्णालपर्वतग्रहणाख्यानम् " होय. त्याचा कवि जयराम १२ भाषेत काव्य करणारा पंडित असून भाषाकोविद आहे. त्यामुळे प्रस्तुत ग्रंथात काव्यात्मकता आहे, पण त्याबरोबर पन्हाळगड जिंकल्याचे सूक्ष्म वर्णन केले आहे. त्यातून शिवाजीच्या युध्दनीतीचे दर्शन होते. प्रस्तुत ग्रंथ रसमाधुर्याने ओतप्रोत भरलेला असून एखाद्या कीर्तनकाराप्रमाणे ग्रंथ सांगण्याची पध्दती आहे. त्यामुळे वाचनात अधिकाधिक गोडी वाढत जाते. काव्य या दृष्टीने हा ग्रंथ जास्त महत्वाचा आहे. सदर कवी समकालीन असल्यामुळे प्रस्तुत ग्रंथात आलेले ऐतिहासिक सत्य महत्वाचे आहे, पण ते शिवभारताच्या मानाने कमी आहे, तरीसुध्दा या ग्रंथाची योग्यता मात्र कमी होत नाही.

याच लेखकाच्या राधामाधवविलासचंपूमध्ये शिवाजीला संस्कृत ज्ञान होते. त्याच्या ठिकाणी रसिकता होती हे स्पष्टपणे सांगितले आहे. या ग्रंथात शहाजी व जिजाई यांची थोरवी सांगून भोसल्यांचे रजपूतत्व व क्षात्रियत्व सिध्द केलेले आहे. शहाजीचा दरबार असून तो कवींना आश्रय देत असे, असे सांगितले आहे. जयराम कविही त्याच्या पदरी होता. शिवाय शहाजीला आपले क्षात्रियत्व, रजपूतत्व व शिसोदिया वंशत्व मान्य असल्याचा हा ग्रंथ मोठाच पुरावा आहे. स्वराज्याची प्रेरणा मालोजीपासून सुरू झाल्याचे कवीने म्हटलेले आहे. समकालीनत्वामुळे त्याने सिध्द केलेले शिवाजीचे क्षात्रियत्व त्या कालापासूनच सर्वांना मान्य होते, असे स्पष्ट होते. म्हणून राज्याभिषेकाच्यावेळी त्यासंबंधी निर्माण झालेला वाद निरर्थक असल्याचे दिसून येते.

गागाभट्टांनी जी `शिवराज-प्रशस्ति` लिहिली आहे त्यामध्ये औरंगजेबासारख्याला अद्दल घडविल्यामुळे झालेला आनंद त्यांनी व्यक्त केला असून स्मृतींचा उध्दार व हिंदुधर्माचे रक्षण हे शिवाजी महाराजांचे मोठे कार्य गागाभट्टांनी मानले आहे. गागाभट्ट हे वृत्तीने कवि नसले तरी जाडे विद्वान होते. राज्याभिषेकाच्यावेळी शिवाजींच्या क्षात्रियत्वाविषयी जो वाद निर्माण झाला, त्यासाठी त्याचे क्षात्रियत्व शोधून काढण्यास त्यांनी खूप श्रम केले. शिवाजी महाराजांच्या प्रेरणेनेच त्यांनी शिवार्कोदय व दिनकरोद्योत हे ग्रंथ लिहिले. शिवाजी महाराज विद्यावृंदीस उत्तेजन देणारे होते, पण त्यामध्ये इतर राजांहून शिवाजीचे वेगळे वैशिष्टय दिसून येते. हिंदवी स्वराज्य स्थापून त्यांनी महाराष्ट्र धर्माचे रक्षण केले त्यासाठी ग्रंथ तयार करून घेतले. केवळ वाङ्.मय सजविण्यासाठी ग्रंथास उत्तेजन न देता राज्याच्या बळकटीचे हे एक मोठे अंग आहे, ह्या विशिष्ट धोरणाने ग्रंथ करविले. संस्कृत-विषयी प्रेम, आदर, अपार जिव्हाळा व निष्ठा शिवाजी महाराजांकडे होती.

कृष्ण दैवज्ञ (ज्योतिषी) यांना आज्ञा करून पंचांगशुध्दीसाठी `करणकौस्तुभ` हा ग्रंथ महाराजांनी तयार करवून घेतला. पंडित रघुनाथ हणमंते यांच्याकडून `राज्यव्यवहार कोश` तयार करून उर्दू व फारसी शब्दांचे संस्कृत शुध्दीकरण व व्यवहारात मराठी भाषेचे शुध्दीकरण करून घेऊन संस्कृत भाषेचा उध्दार केला. हिंदवी स्वराज्याची स्थापना करीत असताना संघर्षाच्या काळातही संस्कृत भाषेकडे त्यांचे लक्ष होते. राष्ट्रीय व सांस्कृतिकदृष्टया संस्कृत भाषेचे असाधारण महत्व ओळखण्याइतकी दूरदृष्टी त्यांचेकडे होती. वर उल्लेख केलेले ग्रंथ शिवाजी महाराजांच्या जीवनचरित्रावर प्रकाश टाकण्यास उपयोगी असून त्यावरून त्याच्या व्यक्तिमत्वाचा स्वतंत्र पैलू

दृष्टीस येतो. स्वतःच्या परंपरेचा, स्वत्वाचा, स्वभाषा, स्वधर्म, स्वचालीरीती यांचा त्यांना अभिमान होता. संस्कृतविषयी विलक्षण अभिमान बाळगणारा असा हा राजा होता.

बुधभूषणामध्ये राजा संभाजीने स्वतः दिलेली स्वतःची, शिवाजीची व घराण्याची माहिती फार महत्वाची आहे. राजा संभाजीने रचलेला संस्कृत ग्रंथ म्हणून याला महत्व तर आहेच, पण तो समकालीन व घरातील व्यक्तीनेच रचलेला आहे, म हे महत्वाचे आहे. त्यातील मजकूर खरा मानला पाहिजे. केशवपंडिताच्या राजारामचरितात शिवाजीविषयी फारसा उल्लेख नाही.

संकर्षण सकळकळेकृत शिवकाव्य हे इतिहास व काव्य या दोन्ही दृष्टींनी महत्वाचे आहे. संशोधन करण्यासारखे हे काव्य आहे. प्रस्तुत काव्याचा लेखक सकळकळे हा कोण ? शहाजीच्या पदरी व बिकानेर राजाच्या पदरी असल्यामुळे त्याचे समकालीनत्व पुराव्याने सिद्ध होते. प्रस्तुत ग्रंथात उल्लेखिलेले मुनी धरणीधर व वनमालबाळ कोण ? गोळे यांची सुंदर सून परत पाठविली ती कोण ? जावळीवर हल्ला केला तो सोयरिकेच्या मिषाने नव्हे तर शिकारीच्या निमित्ताने. हे पुराव्याने प्रस्तुत ग्रंथातून सिद्ध होते. जावळीच्या युद्धाचे इतरत्र कोठेही नसलेले सूक्ष्म वर्णन सदर ग्रंथात केले आहे. मो-यांच्या सैन्याची बेसावध कत्तल प्रथमच या ठिकाणी समजते. उत्तर-कोकण मोहिमेतील गड घेणे याचा इतरत्र कोठेही उल्लेख नाही. प्रस्तुत ग्रंथातून दक्षिणेतील रजपूत राजांचे व शिवाजीचे संबंध प्रथमच प्रकाशात येत आहेत. एकंदरीत जिज्ञासू वाचकांनी त्याचा ऐतिहासिकदृष्टया शोध घेण्याचा प्रयत्न करावा. संशोधन-दृष्टया हे काव्य महत्वाचे आहे.

दुस-या प्रकरणातील ` शाहेंद्रविलास ` हे काव्य शिवाजीचा धाकटा सावत्र भाऊ एकोजी याचा मोठा मुलगा शहाजी यांचेवर आहे. शिवाजी

महाराजांची माहिती फक्त पहिल्या सर्गात आली आहे. पण हा कवि श्रीधर वेंकटेश हा अय्याकल नावाने दक्षिणेकडे फार प्रसिध्द असून त्याचा काळ इ.स. १६८४ ते १७१० या दरम्यान असल्यामुळे हा ग्रंथ जवळजवळ १७ व्या शतकाचा शेवट व १८ व्या शतकाचा प्रारंभ अशा कालखंडात असल्यामुळे हा ग्रंथही फार महत्वाचा आहे. त्याची रचना महाकाव्याप्रमाणे आहे.

" परमानंदकाव्यम् " किंवा " अनुपुराण " हे काव्य परमानंदाचा पुत्र देवदत्त व नातू गोविंद याने लिहिले असून ते शाहूची मर्जी संपादन करण्यासाठीच केवळ लिहिले आहे. ऐतिहासिकदृष्टया ते छत्रपतींच्या जीवनावर फारसे प्रकाश पाडत नाही. फक्त संभाजीच्या पक्षातील लोकांची मते काय होती हे जाणण्यासाठी त्याचा उपयोग होतो व काव्य म्हणून ही भाषा क्लिष्ट असून त्यात कोणतेही सौंदर्य नाही. म्हणून ऐतिहासिकदृष्टया व काव्यदृष्टया याचा काहीही उपयोग नाही. संभाजीला राज्याभिषेक झाल्यानंतर व त्याचे राज्य स्थिरस्थावर झाल्यावर हे काव्य रचलेले आहे. शिवाजीला दोष दिलेला आहे व लोक त्यावर विश्वास ठेवणार नाहीत, म्हणून ' कलि ' हे सर्व दोषांचे कारण सांगितले आहे.

पुरुषोत्तम कवीच्या शिवकाव्यात शिवाजीपासून दुसऱ्या बाजीराव-पर्यन्त मराठी राज्याचा इतिहास सांगितला आहे. प्रत्येक गोष्टीचे कारण कलि हेच सांगितले आहे. ऐतिहासिकदृष्टीने या काव्याचे महत्व काहीच नाही. पुराणाच्या पध्दतीने सांगितलेले उत्कृष्ट संस्कृत काव्य या दृष्टीने हा ग्रंथ महत्वाचा आहे. त्याहून त्याचा अधिक सरस मराठी अनुवाद श्री. भावे यांनी केला असून तो वाचकांची उत्सुकता पुरी करणारा आहे. पुराणिकाच्या थाटात सांगितलेला काव्यरसास्वादाचा उत्कृष्ट अनुभव देणारा हा काव्यग्रंथ आहे.

शिवराज-विजय ही श्रीमदम्बिकादत्त व्यास यांची उत्कृष्ट गद्य कादंबरी आहे. प्रस्तुत ग्रंथात बाणासारखी शैली वापरली आहे. महाकवि बाणानंतर संस्कृत साहित्यातील सर्वोत्कृष्ट कादंबरी असे याला मानले जाते. कथावस्तु कुतूहलमय तसेच ज्ञानवर्धक आहे. वाचकांची रुचि उत्तरोत्तर वाढतच जाते. वर्णनातील विविधता पाहण्यासारखी आहे. वर्णने वाचताना मनश्चक्षुपुढे कोठे डोंगरद-यांची चित्रे उपस्थित होतात, तर कुठे वर्षा व वनाचे वर्णनमनाला मोहून टाकते. व्यासजी ज्याचे वर्णन करतात त्याला मूर्तरूप देऊन टाकतात. संवादात स्वाभाविकता आहे. घटनात तीव्र गतिशीलता आहे. शैली सरस, सरल व कोमल-कान्त पदावलीने युक्त व अलौकिक लालित्यासह तन्मयता प्राप्त करून देणारी आहे. रचनेत प्रसाद, शैलीत शालीनता, वर्ण-विन्यासात माधुर्य, पदयोजनेत लालित्य, कल्पनेत सारल्य, वर्णनात वैचित्र्य व अलंकारात सौकुमार्य हे सर्व कादंबरीचे सहज गुण आहेत. मानवी मनाच्या मार्मिक प्रदर्शनात व्यासजींनी सफलता प्राप्त केलेली आहे. दण्डी, सुबन्धु व बाण यांचे दोष अचूक टाळले आहेत. स्वप्रतिभेने इतिहास आणि कल्पनेचा सुंदर समन्वय साधून अपूर्व हृदयग्राहिता निर्माण केलेली आहे. म्हणून उत्कृष्ट संस्कृत गद्य कादंबरी म्हणून ` शिवराजविजय ` चे महत्त्व अनन्य साधारण आहे.

त्याचे सरल कथासार डॉ. नारायणशास्त्री कांकर यांनी केले आहे. यातूनच त्याचे महत्त्व सहज लक्षात येण्यासारखे आहे. त्या संकलनात कथेचे आवश्यक ते सर्व भाग एकत्रित करून अत्यावश्यक वर्णनांचा त्यात समावेश केलेला आहे. सरलतेसाठी संधी कमी केले आहेत व संक्षेपासाठी वाक्यात परिवर्तन केलेले आहे. सरल, रोचक तसेच राष्ट्रीय भावनेने ओतप्रोत भरलेल्या कादंबरीचा संस्कृत साहित्यात अभावच आहे. प्रस्तुत कादंबरीने व्यावहारिक नूतन शब्द, कोमल कल्पना आणि अभिनव सामग्री वाचकांना प्राप्त होते व जी आजही आवश्यक असलेली ऐतिहासिक घटनांसह राष्ट्रसंरक्षणाची नवीन शिकवणही मिळते.

श्री. हसूरकर शास्त्री यांचे ' श्रीशिवाजीमहाराज चरितम् ' हे सोप्या संस्कृत गद्याचा उत्कृष्ट नमुना आहे. छ. शिवाजी महाराजांच्याविषयी पराकाष्ठेचा अभिमान लेखकाच्या मनात आहे. मुलांनी शिवाजीचे गुणग्रहण करावे व त्यांच्या ठिकाणी संस्कृतची आवड निर्माण व्हावी, म्हणून हे चरित्र लिहिले आहे, ते मुलांवर संस्कार करण्यासाठी अतिशय उपयुक्त आहे, यात संशय नाही.

श्री. हजारीलाल शास्त्री यांचे ' शिवप्रतापबिरुदावली ' हे काव्य अनैतिहासिक आहे, पण शिवाजीचे गुणसंकीर्तन व शिवाजीविषयी आदर या भावनेने प्रेरित होऊन लिहिलेले सोपे शतक-काव्य आहे. अत्यंत सोपी भाषा व वीर पुरुषाचा स्मृतिरूपी गौरव ही दोन वैशिष्टये या काव्याची आहेत.

श्री. याज्ञिक यांचे ' छत्रपतिसाम्राज्यम् ' हे १० अंकी महानाटक असून, प्रांजल परिष्कृत भाषा, भावप्रवण चित्रण, रसाभिव्यक्ती व अलंकारांचा सहज वापर या साहित्यिक सौंदर्याबरोबरच, गीत, निसर्गचित्रण. वीररसाभिव्यक्ती, पूर्ण छंदाचे काव्यत्व, स्वाभाविक व हृदय हरण करणारी गीते आहेत. त्यांचा निसर्ग निर्जीव निसर्ग वस्तू नव्हेत तर जिवंत प्रेरणा-स्त्रोत आहे. शौर्याचे चित्रण अप्रतिम झालेले आहे. श्रेष्ठ नाटकाची संज्ञा देण्यास हे नाटक समर्थ व योग्य आहे. नाटककार म्हणून लेखक सफल झालेले आहेत. हिंदी अनुवादासहित सदर ग्रंथ प्रकाशित झालेला आहे.

श्री. बोकील यांचे ' श्रीशिववैभवम् ' हे कल्पनारम्य नाटक असून रामदास व शिवाजी, शिवाजी व तुकाराम, तुकाराम व रामदास या संबंधावर आधारित नाटक आहे. छ. शिवाजी महाराजांच्या सामाजिक कार्याविषयी इथे विचार मांडलेले आहेत. युध्दाचा फारसा विचार केलेला

नाही. फक्त जावळी येथील एकाच युध्द प्रसंगाचे वर्णन केलेले आहे. राजनीति-विषयक खोल विचार मांडलेले आहेत. भक्ती व अद्भुतरसाला प्राधान्य दिलेले आहे. दैवी शक्ती व चमत्कारांचे वर्णन केलेले आहे. कल्पनेने प्रसंगाची निर्मिती केलेली आहे. कथानकाला गति आहे. व प्रेक्षकांच्या मनावर परिणामकारक योजना केलेली आहे. २० व्या शतकातील आधुनिक विचारांचा पुरस्कार या ठिकाणी केला असून घटना व प्रसंगांची एकामागून एक चित्रमय मांडणी केली आहे.

श्री. वेलणकरांनी ` छत्रपति: श्री शिवराज ` हे राज्यारोहण त्रिशत सांवत्सारिक महोत्सवाच्या निमित्ताने हे नाटक रचले. नाटकाचा प्रारंभ पितापुत्र मीलनाने होतो, त्यामध्ये तथ्य आहे. शहाजीचा स्वराज्य स्थापनेमध्ये भाग होता हे प्रमाणांवरून सिध्द झाल्यामुळे या ठिकाणी शिवाजीची त्यांच्या-विषयीची आदरभावना स्पष्ट केलेली आहे. नाटककाराकडे कलादृष्टी आहे. नाट्यगुण उत्कटत्वाने प्रदर्शित झालेले आहेत. रामदासांचे गुरू म्हणून वारंवार सूचन केले आहे. मनाच्या श्लोकांचे व मराठी गीतांचे संस्कृत भाषांतर सुरम्य व प्रशंसा करण्यासारखे आहे. समर्थ व वारकरी संप्रदायातील कलह सत्य परिस्थितीवर प्रकाश टाकणारा आहे. धर्मांतर केलेल्यांना पुन्हा हिंदुधर्मामध्ये सामावून घेणे या उपकारक कार्यासाठी राज्याभिषेक केला असे या नाटककाराने प्रतिपादन केलेले आहे. स्वप्रतिभेने शिवाजीची प्रतिमा रंगविलेली आहे. प्रसन्न मधुर शैली, अलंकाराची योजना, वृत्तांचा वापर सहज व सोपे संस्कृत यामुळे हे नाटक सहजसुंदर व परिणामकारक ठरेल. पण छ. शिवाजी महाराजांचे समकालीन पंडित परमानंद यांचा जो उपहास केला आहे, तो कांही योग्य वाटत नाही. त्याची पत्नी दासी म्हणून दाखविली आहे. हे ही अयोग्य व बुध्दीला न पटणारे आहे. या नाटकांवरील मान्यवरांचे अभिप्राय त्यांच्या सहजसुंदर सरसतेमध्ये भर घालणारे आहेत.

` श्रीशिवराजाभिषेकम् ` हे डॉ.वर्णेकरांचे ऐतिहासिक नाटक असून त्यामध्ये छाया रूपक श्रृंखलेचा अभिनव प्रकार वापरात आणला आहे. पहिल्या अंकात सात छाया दृश्य दाखवून नायकाच्या पूर्वचरित्र चित्रणात कवीने अद्भुत नैपुण्य दाखविले आहे. राज्याभिषेकाच्या वेळच्या वैदिक व पारंपारिक शास्त्रीय कार्यपध्दती कवीचे श्रोत्रियत्व दाखविते. डॉ.वर्णेकर हे सर्वार्थाने कवी, नाटककार व गीतकार, साहित्यशास्त्रज्ञ, श्रोत्रिय विद्वान इ. अनेक भूमिका ते कौशल्याने एकाचवेळी पार पाडतात. शब्दांचे अन्वेषण, अर्थ-प्रकल्प, रचना वैचित्र्य व नैसर्गिक प्रतिभाशाली कवी म्हणून ते प्रसिध्द आहेत. त्यांनी स्वत:च्या स्वतंत्र गद्य-शैलीचा आविष्कार केला आहे. स्फुट कविता रचनेमधील त्यांचे प्राविण्य वाखावण्याजोगे आहे. या नाटकातील सर्व इतिहास-प्रसिध्द पात्रांचा परिचय संभाषणातून होत जातो. हिरकणिकेची लोककथाही येथे सांगितली आहे. इतिहासाला अप्रसिध्द असे श्रीधर व देवदत्त हे परमानंदाचे पुत्र पित्याप्रमाणे काव्यकला निपुण दाखविले आहेत. हिरकणिकेची सखी रत्नमाला हे अनैतिहासिक कविकल्पित पात्र आहे. सर्व घटना दूरान्वयाने इतिहास ग्रंथाशी जोडून कथावस्तूत प्रत्यक्ष प्रदर्शित केल्या आहेत. किंवा संवादातून निदर्शित केल्या आहेत. निर्दिष्ट केलेली स्थाने वास्तव आहेत. हृदयंगम निसर्गचित्रणे, हिंदू व महाराष्ट्रीय आदर्शाचे चित्रण व मधुर भाषाशैली हे या नाटकाचे वैशिष्टय आहे.

` शिवराज्योदयम् ` हे त्यांचेच ५ ६८ सर्गांचे महाकाव्य असून सर्वात कमी श्लोकसंख्या १४, सर्वात जास्त श्लोकसंख्या १२२ आहे. वीररस प्रधान, ऊर्जस्वल, स्फूर्तिकारक असे हे संस्कृत महाकाव्य आहे. भारतीय संस्कृतीचा नेत्रदीपक आविष्कार येथे घडतो. प्रशंसनीय असे हे महाकाव्य आहे. केवळ गुणसंपत्तीमुळे शिवचरित्राचा महिमा नाही, तर विशाल पृथ्वीवर एकेका गुणविषयासाठी शिवाजी अलौकिक पुरुष आहे. ध्येयाला जीवित अर्पित

केलेल्या शिवाजीचे सर्व गुण स्वराज्य संपादण्यासाठीच होते. साध्य व साधन इ. विषयात शिवचरित्र हे भारतीय संस्कृतीचे अत्युत्कृष्ट प्रतीक आहे. भारतीय जीवनमार्गात जे जे आदर्श व व्यवहार्य आहे, त्या सर्वांची सुस्पष्ट अभिव्यक्ती म्हणजे शिवाजीचे चरित्र होय. देवता व संत ही या अधिकारी पुरुषाची वाट पाहात होते ते अकस्मात निर्माण झालेले नाही, तर जो धर्म श्रुतिस्मृति, पुराणांनी आणलेला, रामकृष्णांनी पाहिलेला, गतकालात लोप पावलेला, नवीन काळात साधुसंतांनी आचारलेला, देश व भाषेचे उत्थापन करणारा, हजारो वर्षे संक्रमित होत गेलेल्या संस्कारातून निर्माण झालेला, भारतीय परंपरेचा नेत्रदीपक आविष्कार म्हणजे शिवावतार. गोब्राह्मण रक्षण, क्षात्रधर्म अनुष्ठान, परस्त्रीविषयी मातृत्वबुध्दी, सर्वधर्मसमानत्व, सत्य व अहिंसा यांचे महत्व, तसेच शठेषु-शाठ्यम् नीति, इ. गुण वर्णन केलेले आहेत. इतिहास व काव्य हे वेगळे असते. या महाकाव्यात रसनिर्मिती झालेली आहे. कवी हा शब्दचित्र कर्माचा स्वामी आहे. त्यांच्या भाषेत मधुर गोडवा आहे. महाकाव्य रचनेच्या नियमांनी बध्द असलेले अंतर्बाह्य रसात्मक असे हे महाकाव्य २० व्या शतकातील एक चमत्कारच आहे व संस्कृत भाषा मृत झालेले नाही, याचा पुरावा आहे.

डॉ. वर्णेकरांच्या नुकत्याच प्रकाशित झालेल्या 'अध्यात्मा-शिवायनम्' या पोथीत स्वामी विवेकानंद व लोकमान्य टिळक यांच्या संवादातून शिवचरित्र सांगितले असून प्रवचन अगर कीर्तन करण्यास ही पोथी उत्तम आहे. जुन्या पुराणाप्रमाणे संवाद काव्य हे त्याचे वैशिष्टय असून एक अभिनव प्रकारचा हा प्रयोग आहे.

या संस्कृत ग्रंथाबरोबरच संस्कृत नियतकालिकांमधून शिवाजी महाराजांचे पुढीलप्रमाणे दर्शन घडते. 'संस्कृत भवितव्य' २६-१२-८१ च्या अंकात

श्री. जनार्दन साल्पेकर यांनी ` श्री छत्रपति श्लोक पंक्क ` लिहिले असून ते एक सुंदर लघुकाव्य असून, गेयता आणि प्रासाद यांनी मुक्त असे ते काव्य आहे.

२५-४-८१ च्या संस्कृत भवितव्यमध्ये सोप्या संस्कृत गद्यात ` शिवभूप-स्मृति ` हा अग्रलेख आहे. २-२-७४ च्या अंकात डॉ. के.रा. जोशी यांनी ` शिवराज्योदयम् ` हा डॉ. वर्णेकरांच्या महाकाव्याचे फार सुंदर रसग्रहण केलेले आहे. प्रस्तुत महाकाव्य २० शतकातील असून अतिशय महत्वाचे आहे. म्हणून सदर रसग्रहणाचा आवर्जुन उल्लेख करीत आहे. ८-३-७५ च्या अंकात डॉ. ब.ग. पांडे यांनी ` अध्यात्मशिवायनं ` चे रसग्रहण केले असून ते वाचकांची जिज्ञासा वाढविण्यास व प्रस्तुत ग्रंथाची माहिती करून देण्यासाठी उपयुक्त आहे. ७-८-८१ च्या अंकात श्री. दे.गो. लांडगे ` देहल्यां शिवराज: ` नावाचा एक संस्कृत लेख प्रकाशित केला आहे. त्यामध्ये शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या अनावरण समारंभाचे वर्णन आधुनिक संस्कृत गद्यात केलेले आहे.

डॉ. व.ग. राहूरकर यांनी १९-५-५८ च्या ` भारतवाणी ` मध्ये ` शिवराज्याभिषेकोत्सव: ` या लेखात शिवराज्याभिषेकाचे वर्णन केलेले आहे. सदर लेखात सईबाई महाराज्ञी झाल्या, असे अनैतिहासिक विधान केले आहे. पण तरीही सुंदर व सोप्या संस्कृत गद्य भाषेत राज्याभिषेकाचे वर्णन केलेले आहे. ५ मार्च, १९५८ च्या ` भारतवाणी ` च्या ` श्री शिवाजी-तुकाराम विशेषांकात ` शिवस्वरूपं स्मर्तव्यं ` या शीर्षकाखाली काही प्रसिध्द संस्कृत कवितांचे संस्कृत भाषांतर प्रसिध्द केले आहे. ते पुढीलप्रमाणे ` शिवाजि नै मया विजेय: ` - डॉ. ग.बा. पळसुले, ` निश्चयस्य महामेरू जनतायाश्च संश्रय: ` डॉ. पळसुले, ` न यो जगिणायद्द विघ्नघातं महान्तं,` - श्री. पांगारकर, ` अस्ति बलवत्तरो म्लेंच्छत: शिवो नृप: ` या संस्कृत अनुवादासह, ` शिवाजि न होते तो ` यांचे भाषांतर वाराणसीच्या श्री. मथुरैष्यन् यशोदताम यांनी

केले आहे. श्री. रवीन्द्रनाथ ठाकूरांच्या ` एक धर्मराज्य हवे ए भारते ` याचे ` एकं धर्मराज्यं भविता भारते स्मिन् ` असे डॉ. नील माधवसेन व डॉ. ग.बा. पळसुले यांनी केलेले संस्कृत भाषांतर प्रसिध्द झालेले आहे. याच अंकात श्री. के.व्ही. कृष्णमूर्ति यांच्या ` शिवराजस्मरणम् ` या कवितेत शिवाजीच्या आयुष्यातील प्रमुख घटनांचे स्मरण करून त्याचे स्मरण भारतदेशात देशभक्तिसाठी जागृत ठरो, अशी अपेक्षा व्यक्त केलेली आहे.

याच अंकात ` धर्मगोप्ता शिवो नृपः ` यामध्ये ` गोवध करणाऱ्या कसायाला शिवाजीने दिलेली शिक्षा ` ही कथा सोप्या संस्कृत भाषेत डॉ. ग.बा. पळसुले यांनी लिहिलेली आहे. आणखी दोन सोप्या संस्कृत कथा - ` शठं प्रति शाठ्यम् ` यामध्ये ` अफजलखान वधाची कथा ` श्री. ग.श्री. वारे यांनी व ` धन्यः श्री शिवछत्रपतिर्हि यस्य मातृत्वबुध्दिः परकामिनीषु ` यामध्ये ` कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेची कथा ` श्री. ल. आठलेकर यांनी लिहिलेली आहे.

संस्कृत साहित्य परिषद, कलकत्ता जुलै १९३८ च्या मध्ये ` श्रीशिवाजिविजयः ` हे नाटक ` श्री.आर. रङ्गाचार्य ` यांनी लिहिले असून त्यामध्ये जयसिंहाने शिवाजीवर केलेले आक्रमण व शिवाजीने आग्र्याहून करून घेतलेली सुटका ` हा प्रसंग कथन केला आहे. या कथेत मध्ये मध्ये काही सुंदर श्लोक आले आहेत. लेखकाच्या विपुल संस्कृत ज्ञानाचे हे द्योतक आहे. ` भारतवाणी ` या पाक्षिकामध्ये चैत्र शुध्द १ शके १८८३ मध्ये प्रा.सत्यदेव वर्मा यांनी ` छत्रपति श्री शिवराजस्य महाराजस्य राजानं जयसिंह प्रति प्रेषितं ऐतिहासिक पत्रम् ` मध्ये छ. शिवाजी महाराजांची राष्ट्रभक्ति केलेली आहे. प्रस्तुत संस्कृत अनुवादामध्ये लेखकाच्या भाषेत ओज, अर्थगंभीरता, व नादमाधुर्य आहे.

संस्कृत भवितव्यम् च्या शनिवार दि. ३०-९-५२ च्या अंकात 'पुण्यश्लोक शिवो राजा' हे श्री. ठ.ग. बिन्निवाले यांचे लघुनाटक असून त्यात कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेची गोष्ट सांगितलेली आहे. परस्त्री माते समान मानण्याची त्यांची वृत्ति येथे स्पष्ट केलेली आहे.

एकंदर २० व्या शतकातील छ. शिवाजीसंबंधी असलेले संस्कृत चरित्र पाहिले असता शिवाजी एक अवतारी महान पुरुष अशीच शिवप्रतिमा डोळ्यासमोर उभी राहते.

छ. शिवाजी महाराजांना राज्याभिषेकाचे प्रयोजन काय ? असा प्रश्न जेंव्हा डोळ्यासमोर उभा राहतो, तेंव्हा धार्मिक, सामाजिक, राज्य-साम्राज्य-विषयक मानमान्यतेला स्थानिक सामाजिक जमावाची अनुमती आवश्यक असते. हिंदवी स्वराज्य स्थापनेनंतर शिवाजीने हिंदूशास्त्रांचा अवलंब करण्याचे ठरविले, पण त्याचा परिणाम जातीय भांडणात झाला. धार्मिक भांडणात तोड काढण्याचा अधिकार शिवाजी महाराजांना नव्हता. विधीसंस्काराची उकल होतांच, आपली जाती सर्वश्रेष्ठ व बाकीच्या शूद्र ठरविण्याचा ब्राह्मणांनी अट्टाहास धरला. तेंव्हा त्यांना गुन्ह्याबाबत शिक्षा देण्याचा अधिकार वापरणे महाराजांना जड गेले. परंतु ही चळवळ हिंदवी स्वराज्याला धोक्याची होती. धार्मिक बाबतीत विषमता निर्माण झाल्याने समाजाच्या संस्कृतीची पातळी खालावू लागली असे श्री. केंद्रे म्हणतात.

हिंदवी स्वराज्याची स्थापना करणारा शिवाजी व मराठे जहागिरदार यांच्या राजेपणात फरक मानला जात नव्हता. ही परिस्थिती हिंदवी स्वराज्याला घातक होती. हिंदुस्थानच्या स्थानिक प्रजेची परकीय आक्रमकापासून मुक्तता व्हावी, हेच हिंदवी स्वराज्य संस्थापनेचे उद्दिष्ट होते.

परंतु हे राजसिंहासन, विधिपूर्वक व जाहीरपणे उभारले गेले नव्हते.

`श्रीशिवराजाभिषेक प्रयोग:` हा समकालीन गागाभट्टांनी रचलेला ग्रंथ पूर्णपणे वैदिक आहे. गागाभट्टांनी आपल्या पोथीची रचना विशिष्ट प्रकारे केल्याने राज्याभिषेकाचे कोणते विधी कोणत्या दिवशी झाले ते समजते व कालनिर्णयही आपोआप होतो. प्रस्तुत ग्रंथ शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक कार्यासाठीच लिहिलेला आहे. राज्याभिषेकापूर्वी पासूनच शिवाजी व गागाभट्टांचे संबंध फार चांगले होते. आर्य संस्कृतीस अनुसरून हिंदवी स्वराज्याची स्थापना झालेली पाहून या पंडिताला राजसिंहासनाची न्याय व सविध प्राणप्रतिष्ठा करावी असे वाटले. तेव्हा काही स्वार्थनिष्ठ लोकांनी अप्रत्यक्ष किंवा वादविवादात्मक विरोध केला. ती सर्व मते गागाभट्टांनी खोडून काढली. छत्रसिंहासनाच्या धर्मसिध्द प्रतिष्ठेने हिंदवी स्वराज्याला सांस्कृतिक, राजकीय, नैतिक किंवा सामाजिक श्रेष्ठ दर्जा व स्थैर्य प्राप्त होण्याचे सामान्य उद्दिष्ट या राज्याभिषेकामागे होते. त्यामुळे वर्णाश्रमधर्माच्या आचारवैशिष्टयामुळे सोसाव्या लागणाऱ्या अडचणी दूर होणार होत्या, श्रेष्ठ जातीतील लोकांना महाराज शिक्षा करू शकत नव्हते, पण राज्यपद प्राप्त होताच १५ दिवसांतच शिवाजी महाराजांनी यातिधर्माबद्दल आपल्या नावाने आज्ञापत्रे काढली व आवश्यकतेनुसार कडक शासन दिले. राजकीयदृष्टया गुप्ततेत ही सर्व तयारी पूर्ण झाली. कारण परिस्थितीच तशी होती. त्यामध्ये वैयक्तिक अनेक अडचणी आल्या, पण सामाजिक महत्वाला अग्रस्थान देऊन राज्याभिषेक ठरवून घेण्यात आला. `श्रीशिवराजाभिषेकप्रयोग` मध्ये त्याचे सविस्तर वर्णन केलेले आहे. म्हणून हा ग्रंथ फार महत्वाचा आहे. कारण राज्याभिषेकाची घटना राष्ट्रीयदृष्टया महत्वाची आहे.

त्यानंतर महाराजांना दुसरा तांत्रिक राज्याभिषेक झाला, त्याचे वर्णन ' शिवराजाभिषेक-कल्पतरु ' मध्ये आलेले आहे. त्यात गागाभट्टकृत राज्याभिषेकातील काही दोष दाखवून ललितापंथमीस निश्चलपुरीने केलेल्या दुसऱ्या राज्याभिषेकाचे वर्णन केलेले आहे. उपस्थित झालेली विघ्ने व अनिष्ट गोष्टी ही कुमुहूर्तावर अभिषेक केल्यामुळे व स्थानिक देवांचे पूजन व बलिदान न दिल्यामुळे झाली असे तो म्हणतो. शिवाजी महाराजांनी दुसरा तांत्रिक विधीने राज्याभिषेक करून घेण्याचे मान्य केले. या अभिषेकाने सिंहासनामध्ये शक्ति प्रविष्ट झाली.

शिवराज्याभिषेकामुळे १७ व्या शतकात राजकीय, सामाजिक, धार्मिक व व्यावहारिक संघटनेचे एक उत्तम व प्रभावी साधन महाराष्ट्राच्या हाती आले. काशीस्थ गागाभट्ट व अनंतदेवभट्ट यांचा निःस्वार्थी मानवतेचा जिव्हाळा या सांस्कृतिक कार्यात सहज साहाय्यक झाला. परंतु विधीच्या चिकित्सेपेक्षा विधीमागील भावनांचा विचार केल्यास महाराष्ट्राच्या इतिहासातील सांस्कृतिक उत्क्रांतीची ही एक महत्वाची घटना होती. म्हणून या राज्याभिषेक प्रकरणाचे स्वतंत्र रीतीने विवेचन केलेले आहे. दोन्हीही ग्रंथ समकालीन असल्यामुळे ऐतिहासिक पुराव्याच्या दृष्टीने महत्वाचे आहेत.

" प्रतिपच्चंद्ररेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता ।
शाहसूनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते ।। "

हा.छ. शिवाजी महाराजांच्या मुद्रेचा संस्कृत श्लोक असून, ही मुद्रा संस्कृतमध्ये आहे या गोष्टीला विशेष महत्व आहे तो अनुष्टुभ श्लोक गुंफलेला आहे. ही शिवाजी महाराजांची पवित्र मुद्रा धारण करणारा लेख मराठ्यांच्या

इतिहासाची साधने खंड १५ ले. ४३७ मध्ये वाकणकर क्षेत्रे यांना इनामबाबी चालविण्यासंबंधी दिलेला हुकुम, हा सर्वांत जुना अस्सल लेख होय. सभासद, शिवभारत, शिलालेख, शिवदिग्विजयकार यांनी शके १५६१ पासून ही मुद्रा वापरात असल्याचे सिध्द केलेले आहे. विलक्षण रम्य, गंभीर व पवित्र आशय हा मुद्रेत भरलेला आहे. महाराजांच्या थोर मनाची ही मुद्रा म्हणजे शुध्द व सत्य प्रतिमा आहे. महाराष्ट्र राज्याचा सारभूत इतिहास व त्या विभूतींच्या चरित्राचे केवळ रहस्य म्हणजे ही मुद्रा होय. संस्कृत भाषेचा प्रयत्नपूर्वक उध्दार करणारे, अप्रत्यक्षरीत्या संस्कृतची सेवा करणारे, राष्ट्रीय व सांस्कृतिक महत्व जाणून भाषा उध्दाराचे महत्वाचे कार्य शिवाजी महाराजांनी केले आहे. त्यांची मुद्रा संस्कृतमध्ये आहे, हे आमच्या दृष्टीने महत्वाचे आहे.

भांडारकर ओरिएंटल इन्स्टिटयूटमध्ये हस्तलिखित विभाग पाहात असताना मला गागाभट्टांचे ' समयनय: ' हे हस्तलिखित सापडले. ते इ.स. १६८० चे असून छ. शिवाजीच्या मृत्यूनंतर छ. संभाजी महाराजांसाठी लिहिले असून ते पितापुत्रांच्या संबंधावर प्रकाश टाकण्यास समर्थ ठरेल, असे वाटते.

दुसरे संस्कृत हस्तलिखित तंजावर येथील सरस्वती महाल या आंतरराष्ट्रीय प्रसिध्द ग्रंथालयामध्ये मिळाले. ' साहित्य-मंजूषा ' या साहित्यशास्त्र निष्ठ ग्रंथामध्यें इ.स. १८२५ मध्यें सदाजी कवीने शिवाजी चरित्र व इत्तिवृत्त वर्णिले आहे ते फार दुर्मिळ असल्याने येथे उद्धृत केलेले आहे.

तुकाराजाच्या ' संगीतसारामृत ' या हस्तलिखित ग्रंथामध्ये सदाजी व शिवाजी यांच्या कुलाविषयीची माहिती दिलेली आहे. ती ही याठिकाणी उद्धृत केलेली आहे.

तसेच ` तुळजाराजकृत ` इन्कुल तेजोनिधी व नृसिंह अमात्य कृत ` त्रिपूर विजयचंपू ` या दोन्ही हस्तलिखित ग्रंथामध्ये भोसले कुळा विषयी जी माहिती दिलेली आहे, ती ही या प्रबंधात सादर केली आहे.

सरस्वती महाल, तंजावर येथेच श्री. वेंकटभट्ट विरचित ` भोसल वंशावली ` हा ग्रंथ मिळाला व महाराष्ट्र राजकृत वंशावली मिळाली, ती ही येथे उद्धृत केली असून तेथून त्याच्या आणलेल्या मायक्रो फोटो कॉपीजच्या झेरॉक्स कॉपीजही प्रबंधात जोडलेल्या आहेत.

छ. शिवाजी महाराजांविषयी बरेच हस्तलिखित संस्कृत साहित्य तंजावर येथील सरस्वती महाल, ग्रंथालय येथे आहे त्याचा एकत्रित आढावा ` तंजावर येथील सरस्वती महाल ग्रंथालयातील संस्कृत हस्तलिखित ग्रंथामधून घडणारे शिवदर्शन या लेखात घेतलेला आहे. शिवाजी केवळ एक महान युगपुरुषच नव्हता, तर तो श्रेष्ठ दर्जाचा संत ही होता. हे शिवाजीच्या व्यक्तिमत्वाचे वेगळे दर्शन सदर लेखात घडविलेले आहे.

मला कोल्हापूरचे श्री. ग.बा. दंडगे यांच्याकडून ` धर्मराज-विजयम् ` नाटकाची हस्तलिखित प्रत मिळाली. हे नाटक १८ जानेवारी १८८७ मध्ये व्हिक्टोरिया राणीच्या काळात व लोकांच्या मनात स्वातंत्र्याची भावना जागृत होऊन लागल्यानंतर लिहिलेले असून आधुनिक विचार यात आलेले आहेत. शिवाजी व रामदास यांची शिक्षणासंबंधीची चर्चा येथे आलेली आहे. ऐतिहासिकदृष्टया हे नाटक महत्वाचे नाही व फारसे काव्यगुणही त्यामध्ये नाहीत. लेखकाचे नांव अज्ञात आहे.

या हस्तलिखित संस्कृत साहित्यामध्ये आलेले शिवचरित्र पाहून अभ्यासकांनी व वाचकांनी त्यावर विचार करून शिवचरित्रावर काही नवीन प्रकाश पडतो का ते पहावे.

फारसी साहित्यातील काही साहित्याचे संस्कृतमध्ये भाषांतर केलेले आहे. छ. शिवाजी महाराजांनी जयसिंहाला उद्देशून फारसी भाषेमध्ये एक छंदोबध्द पत्र पाठविले होते. त्या पत्रामध्ये छ.शिवाजी महाराजांची अव्याज राष्ट्रभक्ती उत्कटपणे प्रकट झालेली आहे. या पत्राचे हिंदी, मराठी इत्यादी प्रादेशिक भाषांमध्ये उत्कृष्ट अनुवाद झालेले आहेत. ` जयसिंहराजं प्रति श्रीमच्छत्रपतेः शिवप्रभो पत्रम् ` असा त्याचा ६० श्लोकांमध्ये संस्कृत अनुवाद ` कविराज ` हे नांव धारण करणाऱ्या एका अज्ञात कवीने केलेला आहे. उत्कृष्ट अनुवादाचा एक दुर्मिळ नमुना म्हणून त्या संपूर्ण पत्राचे मराठी भाषांतर येथे उद्धृत केलेले आहे.

तसेच तंजावर येथे श्री बृहदीश्वर मंदिराच्या प्राकारावर भोसले वंशाचे संपूर्ण चरित्र कोरलेले आहे. हा शिलालेख हे एक फार मोठे आश्चर्य आहे. जवळ जवळ पुस्तकाची ११० पाने भिंतीवर कोरलेली आहेत. ही कौतुकाची गोष्ट आहे. त्यावर ` भोसल वंश चरित्र ` हे पुस्तकही प्रकाशित झालेले आहे, म्हणून आवर्जून त्याचाही उल्लेख केलेला आहे.

` शिवाजी महाराजांच्या राज्यपध्दतीचा उगम ` या लेखांत त्यांच्या राजनीतीवर झालेला संस्कृतचा परिणाम ही गोष्ट प्रामुख्याने स्पष्ट केलेली आहे. ` छ.शिवाजी महाराजांचा जीवनपट ` या लेखांत शिवाजी महाराजांच्या जीवनांतील महत्वाच्या घटना कालानुक्रमाने दिल्या आहेत. ` शिवचरित्राचा आराखडा ` व ` शिवाजी महाराजांचे कौटुंबिक जीवन व व्यक्तिमत्व ` यांचेही

थोडक्यांत विवेचन विषयानुषंगाने केलेले आहे. अशा रीतीने संस्कृत साहित्यात शिवचरित्र विषयक जेवढे उल्लेख आलेले आहेत ते सर्व या प्रबंधात एकत्रितपणे दिलेले आहेत. एकप्रकारचा हा संस्कृत शिवसाहित्य कोशच तयार केलेला आहे.

महाराजांसारख्या इतिहासप्रसिध्द व्यक्तीचे चरित्र अभ्यासताना, लिहिताना किंवा वाचताना त्या चरित्राशी निगडित विविध स्वरूपाच्या जिज्ञासांची पूर्ती व्हावी, अशी प्रत्येकाची अपेक्षा असते. महाराजांचे एकूण व्यक्तिमत्त्व कसे होते हे जाणून घेण्याचा प्रत्येकाचा प्रयत्न असतो.

महाराजांचा अनेक लोकांशी संबंध आला. त्यापैकी इ.स. १६६४ जानेवारीत महाराजांनी सुरतेवर हल्ला केला, त्यावेळी काही इंग्रजांपैकी अँथोनी स्मिथ व रेव्हरंड एस्कालिअटने महाराजांचे वर्णन केले आहे. ते म्हणतात, " महाराज मध्यम उंचीचे, रेखीव बांध्याचे व चपळ आहेत. ज्यावेळी ते बोलतात. त्यावेळी ते स्मितहास्य करीत असल्याप्रमाणे दिसतात, त्यांचे नेत्र विशाल, तेजस्वी असून दृष्टी तीक्ष्ण आहे. वर्ण इतर मराठ्यांपेक्षा गौर आहे.

राज्याभिषेकाप्रीत्यर्थ हेन्री ऑक्झेंडनने नजराणा दिला त्यावेळी त्याने टिपलेले महाराजांचे वर्णन, " चेहरा सुंदर व पाणीदार, इतर मराठ्यांच्या मानाने वर्ण गोरा, डोळे तीक्ष्ण, नाक लांब व बाकदार, जरासे खाली आलेले, दाढी कापून हनुवटीचे खाली टोकदार केलेली, मिशी बारीक असून मुद्रेत त्वरा, निश्चय, कठोरपणा व जागरूकता हे गुण स्पष्ट दिसतात. "

कॉस्म द ग्रार्द हा पोर्तुगीज लेखक म्हणतो, " महाराजांचा चेहरा मोहक होता. निसर्गाने त्यांना असावी तशी चेहरेपट्टी दिलेली होती. विशेषत: त्यांचे काळेभोर व विशाल नेत्र एवढे तेजस्वी होते की जणू त्यातून अग्नि-स्फुल्लिंग बाहेर पडत आहेत. "

महाराजांच्या चरित्राचे अध्ययन केले असता, त्यांचा स्वभाव विवेकी, बुध्दिमत्ता कुशाग्र, निर्णयशक्ती अचूक व शीघ्रगामी असली पाहिजे. ते धाडसी तर होतेच पण हे धाडस अचूक प्रयत्नावर अधिष्ठित असल्याने ते यशस्वी होत. ते शीघ्रकोपी असावेत, लौकरच शांतही होत असावेत, योग्य तो आदर आस्था इतरांविषयी ते बाळगत. पण त्यांच्या सौजन्याचा, विश्वासाचा वा नम्र स्वभावाचा गैरफायदा घेण्याची कोणाचीही प्रज्ञा नसे. ते मातृभक्त व पितृभक्त होते. स्वधर्मावर त्यांची दृढ परंतु डोळस श्रध्दा होती. ते व्रतवैकल्ये करीत, दानधर्म करीत व ग्रहणकाळाचे वेळी तीर्थक्षेत्री ही स्नानार्थ जात. ते शंभुमहादेवाचे व भवानीचे उपासक होते. समर्थ सहवासात आल्यावर श्रीरामाची उपासनाही ते करीत असावेत. त्यांच्या धूम्रपानासंबंधी उल्लेख आढळत नाही. मात्र विडा खाण्याची त्यांना आवड असावी, असे वाटते. रामायण, महाभारताव्यतिरिक्त आलंकारिक व वीरश्री युक्त गाणी ऐकण्याची, पोवाडे व कीर्तने ऐकण्याचीही आवड त्यांना होती. समुद्रस्नानाची त्यांना आवड असल्याचे डग्लसने नमूद केलेले आहे.

महाराजांची बुध्दिमत्ता एवढया श्रेष्ठ प्रतीची होती की, त्यांच्या बुध्दीला अनाकलनीय असे जगात काहीच नसेल. त्यांची कर्तृत्वशक्ती तर त्यांच्या बुध्दिमत्तेपेक्षाही वरचढ आहे. ते अतुलनीय पराक्रमी योध्दे होते, थोर मुत्सद्दी होते. वाटेल ती गोष्ट हाती घेण्याला आणि करून दाखविण्याला ते समर्थ होते. महाराजांना दगदगीचे काही वाटत नसे. कार्यात विघ्ने आल्यास त्यांना विशेष अवसान चढे. चांगल्या चांगल्या तज्ञांची अक्कल गुंग व्हावी, एवढा त्यांनी गडाच्या तटबंदीचा अभ्यास केला होता.

भूगोलाचा त्यांचा विशेष व्यासंग होता. देशातील लहान मोठ्या शहरांचेच नव्हे तर मुलुखाचे त्यांनी नकाशे तयार केलेले होते.

संपूर्ण देशातील प्रत्येक राजाच्या दरबारात महाराजांचे गुप्तहेर असत. त्यासाठी ते प्रचंड धन खर्च करीत. महाराजांच्या अधिकाऱ्यांनीच नव्हे तर सभासद, शाहीर अज्ञानदास, कवीन्द्र परमानंद, कवि भूषण इत्यादी व समर्थांनीही महाराज अवतारी पुरुष होते असे म्हटले आहे. समर्थांनी महाराजांच्या राज्यनिर्मितीच्या उद्योगाला योगसाधनेचाच प्रकार समजून त्यांना ' श्रीमंत योगी ' म्हणून संबोधिले आहे. हृदयस्थ नारायणाने प्रेरणा केल्यामुळे महाराजांनी हा उद्योग आरंभिला व विशेषतः तुळजाभवानीची कृपा त्यांचेवर होती असे वर्णन त्यांनी केलेले आहे.

महाराजांचे अधिकारी, त्यांचे आश्रित कवी, शाहीर वा बखरकारांनी महाराजांना ' ईश्वरी अवतार ' म्हटले तर एक वेळ स्तुती या सदरात गणले जाऊ शकेल, परंतु समर्थांची गोष्ट तशी नव्हती. रामदास हे पूज्य, आदरणीय संत होते. राजकर्त्यांची स्तुती करणे हा साधुसंतांचा उद्योगही नव्हता. पण रामदासांनी स्पष्टपणे छत्रपतींना ईश्वरी अवतार मानले आहे, हे उघड आहे.

महाराजांना हे अवतारित्व प्राप्त झाले ते अलौकिक व्यक्तिमत्वामुळेच. या व्यक्तिमत्वाच्या ज्या वैशिष्टयांमुळे त्यांना ईश्वरीय अवताराच्या कोटीत गणले. ती वैशिष्टये म्हणजे त्यांचे ध्येयदर्शित्व, प्रताप, अतुलनीय सेनापतित्व, प्रतापामागे वसत असलेले ईश्वरीय अधिष्ठान त्यामुळे दुष्टांचा संहार व सज्जनांचा प्रतिपाळ करणारा म्हणून शिवकल्याण राजा, द्रष्टेपणा याबरोबरच त्यांचे ' बोलणे-चालणे अलौकिक ' होते ' सलगी देणेही अलौकिक ' होते.

महाराजांच्या चरित्रात कितीतरी हृद्य प्रसंग आढळतात. शेवटी समर्थांची भावधुंद लेखणीही

" शिवराजास आठवावे । जीवित तृणवत् मानावे ।
इहलोकी परलोकी रहावे । कीर्तिरूपे ।।
शिवरायाचे आठवावे रूप । शिवरायाचा आठवावा प्रताप ।
शिवरायाचा आठवावा साक्षेप । भूमंडळी ।।
शिवरायाचे कैसे चालणे । शिवरायाचे कैसे बोलणे
शिवरायाचे सलगी देणे । कैसे असे ।। "

असे म्हणते.

अशा रीतीने छ. शिवाजी महाराजांचे चरित्र हा एक मोठा सागर आहे. संस्कृत साहित्यामध्ये जे काही छ. शिवाजी महाराजांचे चरित्र आलेले आहे, त्याचे साक्षेपी विवेचन करण्याचा एक प्रामाणिक प्रयत्न केलेला आहे. शिवचरित्राचा हा एका वेगळ्याच बाजूने केलेला अभ्यास शिवचरणी अर्पण करीत आहे.

संदर्भ ग्रंथ

संदर्भ ग्रंथ सुचि

१) अनुपुराण - गोविंद - Life of Sambhaji - incomplete manuscript, Acc. No. 9386 A/B, Central Library, Baroda (unpublished) Also see Gaekwad Oriental Series No. CXX, 1952, matter mixed up.

२) अध्यात्मशिवायनम् - डॉ. श्री.भा. वर्णेकर (प्रकाशक - पं. गिरिराज शर्मा, भारती भवन, जयपुर-राजस्थान, १९७६)

३) अर्वाचीन संस्कृत साहित्य - डॉ. श्री.भा. वर्णेकर (प्रकाशक - रतनलाल अगरवाल, मॉडर्न बुक स्टोअर्स, अकोला-नागपूर, १९६३)

४) आकाशभैरवकल्प - (संस्कृत) Manuscript No. 6707 in the Tanjore Maharája's Saraswati Mahal Library, Tanjore (Dr.Burndl's Catalogue, 1879. (Unpublished)

५) इनकुलोतेजो निधी -(अप्रकाशित हस्तलिखित) तुकजाराजकृत सरस्वती महाल ग्रंथालय, तंजावर (No.771, 4263, 11323)

६) करणकौस्तुभ - कृष्ण दैवज्ञ (ज्योतिषी) - आनंदाश्रम, पुणे, प्रत.

७) कायस्थधर्मप्रदीप - गागाभट्ट काशीकर - संपा. कारखानीस, म.का. १९१९.

८) कामंदकीय नीतिसार -

९) छत्रपति शिवाजी महाराज चरितम् - श्रीपादशास्त्री हसूरकर, इंदूर - भारतरत्नमाला, पुस्तक १ ले, द माळवा स्टेशनरी व प्रिंटिंग वर्क्स लि., इंदूर.

१०) छत्रपतिः श्री शिवराजः - श्री.भि. वेलणकर - (प्रकाशन - देववाणी मंदिरम् - इंदिरा निवास, मुंबई-४, १९७४).

११) छत्रपतिसाम्राज्यम् - श्री. मूळशंकर माणिकलाल याज्ञिक (प्रकाशक - देवभाषा प्रकाशन - अलाहाबाद-६, संवत् २०२६, ऑगस्ट १९७१, हिंदी अनुवादक - शिवशंकर त्रिपाठी.

१२) जयसिंह राजं प्रति श्रीमच्छत्रपतेः शिवप्रभो पत्रम् - फारसी पत्राचा छंदोबद्ध संस्कृत अनुवाद - कविराज - (अर्वाचीन संस्कृत साहित्य - डॉ. वर्णेकर - भाषांतरित साहित्य).

१३) त्रिपुरविजयचंपू - (हस्तलिखित - अप्रकाशित) नृसिंह सरस्वती महाल, ग्रंथालय, तंजावर (५७० ब, ४०३६).

१४) दिनकरोद्योत - गागाभट्ट काशीकर.

१५) दंडनीतिप्रकरणम् - धर्मकल्पतान्तर्गत नीतिमंजरी - केशव पंडित - संपा. वा.सी. बेंद्रे)

१६) धर्मराज विजयम् (हस्तलिखित - अप्रकाशित) अज्ञात कवि - इ.स. १८८७ गडहिंग्लज येथे सापडलेले.

१७) नृसिंहचंपू - संकर्षण सकळकळे (हस्तलिखित - अप्रकाशित) सरस्वती महाल, तंजावर.

१८) नटेशविजयः (संस्कृत) संपादक - वा.सी. बेंद्रे - पुरुषार्थ मासिक, शिवाजी अंक, औंध १९३० इ. (प्रकाशित).

१९) पर्णालपर्वतग्रहणाख्यानम् - कवि जयराम पिंडये विरचित - संपाद.स.म. दिवेकर, कल्याण १९२३ (प्रकाशित).

२०) प्रपंचसारामृत किंवा राजरंजन पुराण - (हस्तलिखित अप्रकाशित) सरस्वती महाल, तंजावर, एकाजी उर्फ भावसाहेब.

२१) परमानंदकाव्यम् - देवदत्त - Gaekwad Oriental Series No.CXX, 1952.

२२) बुधभूषणम् - श्रीमच्छंभुनृपविरचितम् - edited by H.D. Velankar and published by Bhandarkar Oriental Research Institute's Government Oriental Series Class C. No. 2, Poona, 1926.

२३) भोसलवंशावळी - (अप्रकाशित हस्तलिखित) वेंकटभट्ट - सरस्वती महाल, ग्रंथालय, तंजावर, D ४२४० B ५०२०.

२४) भोसल वंश चरित्र - तंजापुरी श्री बृहदीश्वरालयस्थ शिलालिखित भोसल वंश चरित्र - (प्रका. सरस्वती महाल, लायब्ररी डॉ. बर्नेल्स कॅटलॉग)

२५) भारतवाणी पत्रिका - भां.ओ. रि. इ., पुणे.

२६) महाराष्ट्र राजकृत वंशावलि - (अप्रकाशित - हस्तलिखित) तुळजाराजकृत - सरस्वती महाल, ग्रंथालय, तंजावर).

२७) शम्भूराजचरितम् - हरिकवि - श्रीसूर्यपुरस्थित श्री नारायणसूरिसुनु हरि कविविरचिते विजयांके शंभुराज - चरिताख्यं महाकाव्य (संस्कृत) (अप्रकाशित) Manuscript incomplete, No. 191, 1875/6, composed in 1741 Samvat (i.e. 1684 A.D.) Manuscript Department B.O.R.I., Poona.

२८) शंभुविलासिका - Or हैहयेन्द्रकाव्यव्याख्या (संस्कृत) (अप्रकाशित) by Hari Kavi son of Narayansuri, Commentary on हैहयेन्द्रकाव्य by the same author written for Sambhaji Raja, Acc.No.829/ 1875-6, Manuscript Department B.O.R.I., Poona.

२९) राधामाधवविलासचंपू - जयरामपिण्डये - संपा. वि.का. राजवाडे, (प्रकाशन - चित्रशाळा छापखाना, पुणे शक १८४४) व दुसरी प्रत, धुळे १९१७ (प्रका.)

३०) राजारामचरितम् - केशवपंडित - अथवा केशव पंडित कृत श्री छत्रपति राजाराम महाराज यांचे चरित्र किंवा जिंजीचा प्रवास - संपा. वा.सी. बेंद्रे, भा.ई.सं.मं. स्वीय ग्रंथमाला क्र. २६, पुणे १९३१ (प्रकाशित).

३१) रामाभिषेककाव्यं - केशवपंडितकृत सरस्वती महाल, तंजावर (A ४२२९, ग्रंथसंख्या - ३१६).

३२) श्रीशिवभारत - कवींद्र परमानंद विरचित - संपा. स.म. दिवेकर, कल्याण, १९२७.

३३) श्रीशिवभारत - आनंदाश्रम प्रत, पुणे.

३४) कवीन्द्र परमानंदकृत शिवभारतम् - सं.द.वि. आपटे व स.म. दिवेकर, भा.इ.सं.मं. पुरस्कृत क्र. ३, पुणे १९२७ (प्रका.).

३५) शिवराजप्रशस्ति - गागाभट्ट काशीकर - भा.इ.सं.मं. चतुर्थ संमेलन वृत्त शके १८३८ संपादक व प्रकाशक - खंडेराव चिंतामण मेहेंदळे व दत्तो वामन पोतदार - भाद्रपद शु. १-१८३९.

३६) शिवार्कोदय - गागाभट्ट काशीकर (संस्कृत अप्रकाशित) अल्वार महाराजांच्या संग्रहालयातील.

३७) श्रीशिवराजाभिषेक प्रयोग: - गागाभट्ट काशीकर - (अप्रका.) बिकानेर संग्रह. संपा. वा.सी. बेंद्रे - भा.ओ.रि.इ. पुणे, प्रका. पी.पी.एच. बुकस्टॉल, मुंबई-४, १९५९ (प्रका.)

३८) श्रीशिवराजाभिषेक प्रयोग: - गागाभट्ट काशीकर - संपा. डॉ. माईनकर टी.जे. बॉम्बे युनिव्हर्सिटी - १९७५.

३९) शिवराजाभिषेककल्पतरु - गोविंद नारायण बर्वेकृत संपा. द.वि.आपटे व का.ना. दीक्षित, भा.इ.सं.मं. त्रैमासिक वर्ष १० अंक १, मार्च १९२९, पृ. २९ ते ४०, पुणे (प्रका.)

४०) शिवकाव्य - संकर्षण सकळकळे (प्रका.) संपा. डॉ. रा.पा. गोस्वामी, भा.इ.सं.मं., स्वीय ग्रंथमाला, १०९, कै. विनायकराव औतूरकर निधी प्रकाशन-१, इ.स. १९७४.

४१) शाहेन्द्र विलासम् - श्रीधर वेंकटेश (Pub.) S. Gopalan, सरस्वती महाल, तंजावर, कल्याण प्रेस, त्रिचि, १९५२, स.म.ग्रं. सिरिज नं. ५४.

४२) शिवकाव्य - पुरुषोत्तम - भां.ओ.रि.इं.

४३) शिवराज विजयम् - श्रीमद्अंबिकादत्तव्यास - (प्राप्तिस्थानम् व्यास - पुस्तकालय, मानमंदिरम् - काशी, १९४५)

४४) शिवप्रताप बिरूदावली - श्री. हजारीलाल शास्त्री, प्रका. हजारीलाल शास्त्री, मु.पो. खिलावड, जि. सोनीपत (हरयाणा) श्रावणी २०३० वि. - आचार्य प्रिंटिंग प्रेस, दयानंद मठ, रोहतक).

४५) श्रीशिववैभवम् - श्री. वि.मा. बोकील, भा.ओ.रि.इ. पुणे (प्रका.)

४६) शिवराजाभिषेकं - डॉ. वर्णेकर - शारदा - गौरव ग्रंथमाला क्र. ३१, पुणे-१०, १९७४.

४७) शिवराज्योदयम् - डॉ. वर्णेकर, शारदा गौरव ग्रंथमाला, पुणे-३०, १९७२.

४८) शिवावतार प्रबंध - सोवजी - १९२५.

४९) शिवाजिचरितम् - श्री. वागीश.

५०) संगीतसारामृतम् (अप्रकाशित) शाहजीराजीय वंशावली, सरस्वती महाल तंजावर, गंगाधर खंडोकृत हस्तलिखित १६५०..

५१) साहित्यमंजूषा - सदाजी (अप्रकाशित - हस्तलिखित). सरस्वती महाल, ग्रंथालय, तंजावर.

५२) संगीतमकरंदम् - शाहजी (अप्रकाशित, हस्तलिखित), सरस्वती महाल, तंजावर.

५३) सरल-शिवराज-विजय - डॉ. नारायणशास्त्री काङ्कर - विद्या वैभव भवनम् - सुमेरु कर्णमार्ग, जयपूरम्, १९७६.

५४) समयनयः गागाभट्टकृत - अप्रकाशित by Hari Kavi, son of Narayan Manuscript in the Limaya Collection, B.O.R.I., Poona

५५) संस्कृत भवितव्यं

५७) हैहयेन्द्रकाव्य - अप्रकाशित - हस्तलिखित by Hari Kavi, son of Narayan commentary on हैहयेन्द्रकाव्यं by the same author for Sambhaji Raja Acc. No. 828 of 1875-6 manuscript Department, B.O.R.I., Poona

५८) हैहयेन्द्रकाव्य व्याख्या - Manuscript Acc.No. 8291
1875-6, B.O.R.I., Poona.

मराठी ग्रंथ

५९) श्रीमान योगी - रणजित देसाई.

६०) असे होते मोगल - निकोलास मनुची संपा. ज.स. चौबळ

६१) अर्वाचीन संस्कृत साहित्य - डॉ. वर्णेकर

६२) ऐतिहासिक संकीर्ण साहित्य

६३) कृष्णाजी अनंद सभासद बखर - संपा.कासकर १९६० २ री आवृत्ती.

६४) छत्रपति शिवाजी महाराज - केळूसकर, १९२०.

६५) पुण्यश्लोक छत्रपति - हरदास बाळशास्त्री.

६६) भारत इतिहास संशोधन मंडळ संमेलन वृत्त

वार्षिक इतिवृत्त त्रैमासिके स्वीयमाला वार्षिक अहवाल वगैरे

६७) राजा जयसिंग व शिवाजी महाराज - राजवाडे

६८) राजा शिवछत्रपती - ब.मो. पुरंदरे

६९) राजवाडे लेखसंग्रह - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री, १९५८

७०) राजवाडे लेखसंग्रह - संग्राहक - जोशी शं.ना., १९३०.

७१) रायगडची जीवनकथा - आवळसकर, शां.वि., १९६२.

७२) राजवाडयांची गागाभट्टी - परिशिष्टे - कायस्थधर्मदीप संपा.कारखानीस म.का., १९१९.

७३) शक्कर्ते शिवराय - विजय देशमुख.

७४) शिवचरित्र प्रदीप - भा.इ.सं.मं., १९२५.

७५) शिवचरित्र संशोधन वृत्त - ग.ह. खरे.

७६) शिवाजी निबंधावली खंड-१-२, श्रीशिवचरित्र कार्यालय, पुणे,
प्रकाशक - आपटे द.वि., केळकर न.चि.

७७) शिवकाव्य - साने का.ना., १९३०.

७८) शिवचरित्र संशोधन वृत्त शके २८२.

७९) शिवछत्रपति संकल्पित शिवचरित्राची प्रस्तावना, आराखडा व
साधने, श्री. शेजवलकर.

८०) श्रीशिवदिग्विजय बखर - नंदुरबारकर संपा. ल.का. दांडेकर शके १८१७.

८१) शिवछत्रपतींचे सप्तप्रकरणात्मक चरित्र - चिटणीसकृत हेरवाडकर, १९६७.

८२) श्रीशिवछत्रपती - एक स्मरण - राज्याभिषेक त्रिशतसंवत्सरी वर्ष
प्रकाशक - कऱ्हाड कला व वाणिज्य महाविद्यालय, कराड, १९७५.

८३) शिवप्रभूचे चरित्र - वाकसकर.

८४) शिवछत्रपती शिवाजी महाराज यांचे चिकित्सिक चरित्र खंड १ व २,
केंद्रे

८५) शिवपुत्र संभाजी - डॉ. कमल गोखले.

८६) शिवचरित्राचे पैलू - म.म.द.वा. पोतदार, संपादक कमल गोखले.

८७) श्री शिवशाहीचा लेखनालंकार - आ.बा. जोशी, आबा चांदोरकर
(श्री शिवराज्याभिषेक वर्ष - २६०)

८८) शिवचरित्र - एक अभ्यास - सेतु माधवराव पगडी, शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर, १९७१.

८९) तंजापुरी श्री बृहदीश्वरालयस्थ शिलालिखित भोसल वंश चरित्र
तं. सांबमूर्तिराव, १९०७.


९०) वार्षिक इतिवृत्त - भा.इ.सं.मं. अहवाल स्वीय ग्रंथमाला क्र. १ शाके
१८३२, क्र. ७ शाके १८३५, क्र. ९ शाके १८३६, क्र. ११, शाके १८३७,
क्र. १७ शाके १८३८, पुणे (प्रकाशित)

इंग्रजी ग्रंथ

91) Chhatrapati Shivaji Y Setu Madhavrao Pagdi, 1974.

92) Shivaji and His Times (5th Edition) Jadunath Sarkar, 1952.

93) Life of Shivaji Maharaj - Takakhav N.S., 1921.



।। अभंग ।।
श्रीसिवंतसुखासाटी ।।

अंनरक्राजगजेडी ।। ना
हिं नाडियानें गोडी ।।१
क्षचौ-यौशींचीजोडी ।।२
मनुर्षजंन्मगे-ल्यावारे ।
कावकरशीलबारे ।।३
शिवराजेसांगजना
ल्पानोसोडीकीवासना
४ ।। छ ।। छ ।। छ ।। छ ।। छ ।

शिवाजी महाराजांनी रचलेला एक अभंग प्रथमच उपलब्ध होत आहे.
(सरस्वती महाल–तंजावर)